# The Drinched Book

UNIVERSAL
LIBRARY
OU_192100
UNIVERSAL
LIBRARY

OUP—881—5-8-74—15 000

OSMANIA UNIVERSITY LIBRARY

Call No. M954.7 K29M Accession No. [illegible]

Author [illegible]

Title [illegible]

This book should be returned on or before the date last marked below

# मराठे व इंग्रज

## ( मराठेशाहीचें शतसांवत्सरिक वाङ्मयश्राद्ध )

" जगांत चिरकालिक असें कांहींच नाहीं; जगाचा क्रम
सर्वांस सारखाच माहीत आहे "
—कान्होजी आंग्रयाचें इंग्रजांस उत्तर

लेखक

**नरसिंह चिंतामण केळकर**

**प्रकाशक**

**केशव रावजी गोंधळेकर,**

मालक—**रावजी श्रीधर गोंधळेकर बुकडेपो** बुधवार चौक, **पुणें.**

मुद्रकः—केशव रावजी गोंधळेकर,

'जगद्धितेच्छु प्रेस,' ५०७ शनवार पेठ, पुणे.

शके १८४४ ( तृतीय मुद्रण ) सन १९२२

# प्रस्तावना

बरोबर शंभर वर्षांपूर्वी पुण्यांतून मराठेशाही नष्ट झाली ! प्रस्तुत पुस्तक हें तिचें प्रथम-शत-सांवत्सरिक वाङ्मयश्राद्ध आहे.

मराठेशाहीचा खरा अंत कोणत्या दिवशीं झाला याविषयीं मतभेद होण्याचा संभव आहे. कित्येक तो दिवस ता. १२ फेब्रुवारी सन १७९४ हा मानतात; कारण या दिवशीं प्रसिद्ध मराठा वीर महादजी शिंदा वारला. महादजी हा लष्करी दृष्टीनें मराठेशाहीचा मुख्य आधारस्तंभ होता याबद्दल मुळींच वाद नाहीं.

कित्येक तो दिवस ता. १३ मार्च सन १८०० हा मानतात; कारण, त्या दिवशीं प्रसिद्ध मराठा मुत्सद्दी नाना फडणवीस हा वारला. नानाबरोबर मराठेशाहींतील सर्व शहाणपण गेलें, असे इंग्रज इतिहासकारांनींहि आपल्या ग्रंथांतून म्हठले आहे.

कित्येक तो दिवस ३१ डिसेंबर १८०२ हा मानतात; कारण, त्या दिवशीं वसईचा तह होऊन बाजीराव हा इंग्रजांचा सर्वस्वीं गुलाम बनला व मराठी राज्याच्या काळ-जाची इंग्रजांच्या मध्यस्थीच्या पाचरीनें अनेक शकलें झालीं !

कित्येक तो दिवस ता. २३ सप्टेंबर १८०३ हा मानतात; कारण, त्या दिवशीं शिंद्याचा असई येथील लढाईत प्रत्यक्ष पराभव होऊन मराठा सरदारांचा मित्रसंघ फुटला व मराठेशाहीला आता तरणोपाय नाहीं हें जगजाहीर झालें.

कित्येक तो दिवस ता. १७ माहे नवंबर १८१७ हा मानतात, कारण, त्या दिवशीं पुण्यांत शनवारच्या वाड्यावर इंग्रजांचे निशाण लागलें.

कित्येक तो दिवस ता. ३ जून १८१८ हा मानतात; कारण, त्या दिवशीं बाजी-राव अशीरगडाजवळ ढोलकोट येथें जनरल मालकम याच्या स्वाधीन होऊन त्यानें राज्यावर उदक सोडलें.

कित्येक तो दिवस ता. १६ मे सन १८४९ हा मानतात; कारण, त्या दिवशीं मराठेशाहीची जी मूळची-सातारची-गादी ती खालसा झाली.

वरील सहा-सात तारखांपैकीं कोणती तारीख मराठेशाहीची खरी श्राद्धतिथि मानावयाची ही ज्याच्या त्याच्या मनोधर्माची गोष्ट आहे. सामान्यतः सन १८१६-१८ हें साल मराठेशाहीच्या अंताचे साल मानतात, व तेच स्थूलमान आम्हांलाहि ग्राह्य वाटतें.

प्रतिसांवत्सारिक श्राद्ध तिथीला करतात, शतसांवत्सरिक श्राद्ध त्या उभ्या वर्षांत केव्हांहि केलें तरी चालेल.

प्रस्तुत पुस्तक बरोबर ता. ३ जून १९१८ रोजीं प्रसिद्ध करावें असें प्रथम मनांत असल्यामुळें तें लिहून पुरें करावयाचें काम चालढकलीवर पडले होते. पण चालू मार्च महिन्यांत आम्हांला हिंदुस्थानाबाहेर जावें लागेल व कदाचित् १९१९ साला-पूर्वी परत येतांहि येणार नाहीं असें कांहीं दिवसांपूर्वी निश्चित झाल्यामुळें पुस्तक-प्रसिद्धीचें काम शक्य तितक्या घाईनें उरकून घ्यावे लागलें.

मराठे व इंग्रज यांचा संबंध मूळ आला तेव्हांपासून तो पेशवाई नष्ट होईपर्यं तचा—पण फक्त या उभयतांच्या संबंधापुरता—त्रोटक इतिहास पूर्वार्धात दिला आहे व उत्तरार्धात कांहीं मुद्दयांचे विवेचन केलें आहे. तथापि, मराठे व इंग्रज यांच्यासंबं धाचे सांगोपांग आणि मनाजोगे विवेचन करावयाचे तर आणखी एक एवढेंच पुस्तव लिहावे लागेल, असें माहिती गोळा करितांना आढळून आले. न जाणो, पुढे केव्ह हवा तितका वेळ मिळाल्यास कदाचित् ही गोष्ट घडून येईलहि ! प्रस्तुत पुस्तकांत योजिलेल्या अनेक विषयांचा विस्तार स्थलसंकोचामुळें यथाप्रमाण करितां आला नाहीं यामुळे कांहीं भागांना निव्वळ टिपणाचेंहि स्वरूप आले आहे हे आम्ही जाणून आहो

वास्तविक पाहतां, प्रस्तुत विषयावरील पुस्तक ज्याने इतिहासाचा व्यासंग जन्मभर केला आहे अशाच एकाद्या गृहस्थाकडून लिहिलें गेलें असतें तर ते हवे होतें. तथापि, आमच्या विनंतीवरून निदान या पुस्तकास उपोद्घात तरी लिहिण्याचें गु. रा. रा. वासुदेव वामनशास्त्री खरे यांनीं कबूल केलें याबद्दल आम्ही त्यांचे फा आभारी आहो.

हें पुस्तक छापून हातावेगळें करण्याच्या कामीं मुख्य मदत येथील प्रिंटिं एजन्सीचे मालक रा. रामकृष्ण दत्तात्रेय पराडकर यांची झाली. छापखान्यांकडे हेल पाटे घालणें, प्रुफें केवळ शुद्धाशुद्धाच्याच नव्हे तर युक्तायुक्ताच्याहि दृष्टीनें वाचणे व दोन ठिकाणीं छापण्याचे काम करावे लागल्यामुळे आमची धांदल वांचविण्याकरित स्वतःची धादल करून घेणे या गोष्टी जर पराडकर यांनीं पत्करल्या नसत्या तर, हे पुस्तक या थोड्या मुदतींत निघणें शक्य नाहीं अशा समजुतीने कदाचित् ते छाप खान्याकडे गेलेंहि नसतें. म्हणून रा. पराडकर याच्या श्रमाबद्दल त्यांचे आभा मानिले पाहिजेत. तसेच छपाईचे काम लवकर उरकून देण्यास मदत केल्याबद्दल चित्रशाळा व जगद्धितेच्छु छापखान्यांचे मालक, विषयाची वेळोवेळीं चर्चा करून अखेर विषयानुक्रमणिका तयार केल्याबद्दल रा. रा. दत्तोपंत आपटे बी. ए., यांचेहि आभार मानणे जरूर आहे.

पुणें ता. १ माहे मार्च
सन १९१८. } नरसिंह चिंतामण केळकर.

## दुसऱ्या आवृत्तीची प्रस्तावना

प्रस्तुत ग्रंथाची प्रथमावृत्ति एक महिन्यातच संपली, व ग्रंथांतील मजकुरात निर्विवाद फरक करावा लागेल इतकी प्रतिकूल टीकेची सामग्री उपलब्ध होण्या पूर्वींच लोकाची वाढती मागणी पुरविण्याकरितां ही पुनर्मुद्रितावृत्ति काढावी लागली

पुणें ता. २५।११।१८

## तिसऱ्या आवृत्तीची प्रस्तावना

पूर्वींच्या आवृत्तींत विशेष फरक न करिता ही तिसरी आवृत्ति काढलेली आहे.

ता. १।६।२२ —प्रकाशक

# उपोद्घात

महाराष्ट्राचा नुसता इतिहास समजावून देणारीं पुस्तकें बऱ्याच लोकांनीं लिहिलीं आहेत; परंतु त्याहूनहि अधिक महत्त्वाचें काम सदर विषयावर सविस्तर स्वतंत्र टीकाप्रबंध निर्माण करणें हें होय. असलें बिकट काम रा. रा. नरसोपंततात्या केळकर या अधिकारी गृहस्थांनीं हातीं घेऊन पार पाडिले याबद्दल वाचकवर्ग त्यांचा ऋणी आहे. असल्या ग्रंथांतून स्थल काल व व्यक्ति यांसंबंधाचे निर्देश क्वचित् बिनचूक नसले तरी ती गोष्ट मुद्दयाची नसल्यामुळें त्या त्या ठिकाणच्या ऊहापोहाला वैगुण्य येत नाहीं. प्रत्येक स्थळीं साधकबाधक प्रमाणे दाखवून ग्रंथकार आपलें म्हणणें कितपत सिद्ध करितो एवढेच मुख्यत्वें पहावयाचें असतें. आणि तशा दृष्टीनें पाहणाऱ्याला रा. रा. नरसोपंत केळकर यांनीं प्रकरणशः केलेली चर्चा मुद्देसूद व समर्पक आहे हेच मान्य करावे लागेल. ग्रंथकाराच्या या चर्चेपासून निष्पन्न होणारा तात्पर्यार्थ, मराठ्यांचें राज्य इंग्रजांनीं कां व कसें घेतलें, हात्र होय. आतांच्या काळांत या विषयाचे महत्त्व निव्वळ ऐतिहासिक आहे हे उघडच आहे तरी त्याच्या चिंतनापासून 'पुढच्यास ठेच मागचा शहाणा' या न्यायाने आजमित्तीससुद्धां फारच बोध घेतां येण्याजोगा आहे. या विषयावर मीं चार शब्द लिहावे अशी ग्रंथकारांची इच्छा दिसल्यानुळे या उपोद्घाताच्या रूपानें तसें करीत आहे.

हें पुस्तक पाहिल्याबरोबर पहिली गोष्ट मनांत येते ती हीच कीं, हें शतसांवत्सरिक वाङ्मयश्राद्ध म्हणून जे केलें आहे ते अंतरित श्राद्ध होय! याची खरी तिथि (म्हणजे तारीख!) ३१ दिसेंबर सन १९०२ ही होय. कारण, मराठी साम्राज्याच्या स्वातंत्र्याचा लोप होऊन त्या तारखेस बरोबर शंभर वर्षे झालीं! सन १८०२ सालच्या शेवटच्या दिवसानें स्वराज्याच्या स्वातंत्र्याचा शेवट पाहिला! सर्व स्वतंत्र मराठी राज्यास पूर्वीपासून 'शिवशाही' हें नांव चालत आलें आहे! या शिवशाहीला हुकमतींत वागवून तिचें स्वस्तिक्षेम संभाळण्याचा ज्याचा परंपरागत अधिकार त्या बाजीराव पेशव्यानें सन १८०२ च्या दिसेंबर महिन्याच्या ३१ व्या तारखेस इंग्रजांशीं वसईचा तह करून त्यांचा आश्रय व ताबेदारी संपादन केली! शिवशाहीच्या स्वातंत्र्यसौभाग्याचा कुंकुमतिलक तिच्याच त्या नादान पोरानें त्या तहाच्या चिंटोऱ्यानें पुसून टाकला!

सन १८१८ सालीं मराठी राज्य नष्ट झालें हें म्हणणें खरें नाहीं. कारण, अजूनसुद्धां दोनअडीच कोटी रुपये उत्पन्नाचें मराठी राज्य आहेच! परंतु त्या राज्याला

आतां कोणी शिवशाहीचा भाग म्हणत नसून तो ब्रिटिश साम्राज्याचा एक घटकावयव आहे असेंच मानण्यांत येते. पेशवाई बुडाल्यामुळें पुष्कळ श्रीमंत घराणीं धुळीस मिळालीं, हजारों लोकांचें अन्न गेलें, ही गोष्ट वाईट झाली हें खरें; परंतु नागपूरचें राज्य खालसा झालें त्यापेक्षां पेशवाई नष्ट झाली या गोष्टीला अधिक किंमत देतां येत नाहीं. बाजीराव जर इंग्रजांशीं सरळपणानें वागता तर दुसऱ्या कित्येक मराठी संस्थानांप्रमाणें त्याचेंहि संस्थान कदाचित् अद्यापिसुद्धां जिवंत राहिलें असतें, परंतु शिवशाहीच्या दृष्टीनें त्याची किंमत केव्हांहि शून्यच ठरली असती!

शिवशाहीचें स्मरण १९०२ मध्यें होवो अगर १९१८ मध्यें होवो, तें शतसांवत्सरिक असो, प्रतिवार्षिक असो अगर प्रत्यहीं होणारें असो; जेव्हां जेव्हां हें स्मरण महाराष्ट्रांत जन्म पावलेल्या कोणाहि मनुष्यास होतें, तेव्हां तेव्हां तो आपल्या मनास खेदानें व आश्चर्यानें असा प्रश्न करितो कीं, हें गतकालीन राज्यवैभव इतक्या अल्पावकाशांत कसें नष्ट झालें? मोठे मोठे विशाल बुद्धीचे मुत्सद्दी व महापराक्रमी सरदार शिवशाहींत हयात होते ते सर्वच अदूरदृष्टि होते कीं काय? इंग्रजी हल्ल्यापासून स्वराज्याचा बचाव करण्याचा उपाय कोणींच कसा आगाऊ योजून ठेविला नाहीं? परद्वीपाहून आलेल्या मूठभर इंग्रजांनीं शिवशाही पादाक्रांत केली हें घडलें तरी कसें?

या प्रश्नांचीं उत्तरें आजपर्यंत अनेकांनीं अनेक दिलीं आहेत तीं सर्वच खरीं आहेत असें नाहीं. कांहीं तर अगदींच अप्रयोजक आहेत; पण बऱ्याच उत्तरांत सत्याचा थोडाबहुत अंश निर्विवाद आहे. असल्या त्या सर्व उत्तरांवर सविस्तर टीक या ग्रंथांत आलीच आहे. तरी विषयाचें स्वरूप वाचकांच्या लक्ष्यांत अधिक स्पष्टपणें यावें म्हणून त्याची निराळ्या तऱ्हेनें मांडणी केल्यास ती रा. केळकर यांच्या टीकेस अधिक पोषकच होईल.

मराठ्यांच्या कर्तबगारीमुळें महाराष्ट्र जरी एका काळीं महत्तर बनलें होतें, जरी हे मराठे लोक एका काळीं सर्व हिंदुस्थानाला अजिंक्य भासत होते, तरी त्यांनासुद्धां इंग्रजांनीं जिंकलें, यावरून इंग्रजांच्या अंगीं नसणारे कांहीं विशेष राजकीय दुर्गुण मराठ्यांच्या अंगीं जन्मसिद्ध असले पाहिजेत, कांहीं विशेष गैरसोईच्या परिस्थितीनें त्यांचे हातपाय जखडले गेले असले पाहिजेत, आणि अशा दुर्गुणांचा व परिस्थितीचा फायदा इंग्रजांस मिळाला असला पाहिजे हें स्पष्ट आहे. तर असे हे मराठ्यांचे दुर्गुण कोणते होते व त्यांच्या परिस्थितींत कोणत्या गैरसोई होत्या याचा आपण विचार करूं.

मराठ्यांमधला प्रमुख दुर्गुण म्हटला तर देशाभिमानाचा बहुतांशीं अभाव हा होय. या सद्‌गुणाची पैदासच जर मुळीं हिंदुस्थानांत अत्यल्प होते,

व भाबडे असल्याचें सर्व जगाला प्राचीन काळापासून माहीत आहे. कोणीहि परके लोक आम्हांवर स्वाऱ्या करोत आणि आमचीं राज्यें बळकावोत, आमच्या ग्रामसंस्था धर्मसमजुती, रीतिरिवाज, वतनहक्क, यांत राज्यकर्ते जेथपर्यंत हात घालीत नाहींत तेथपर्यंत ते लोक कोण आहेत, काय करितात, याची पंवाईत आम्ही करीत नाहीं! धार्मिक बाबतींत परमतासहिष्णुता हा दुर्गुण आहे हें आम्हांस ठाऊक आहे; पण राजकीय बाबतींत परचक्रासहिष्णुता हा अमोलिक सद्गुण आहे हें आम्हांला ठाऊक नाहीं! शिवाजीपासून शाहूच्या कारकीर्दीस सुरुवात होईपर्यंत मराठे लोकांत देशाभिमानाचें वारें खेळत होतें असें पुष्कळांस वाटतें; पण त्या वृत्तीला देशाभिमान हें नांव देण्यापेक्षां राज्याभिमान हेंच नांव देणें अधिक योग्य आहे! कारण कीं, महाराजांच्या फौजेंतले मराठे जर मुसलमानांशीं एकनिष्ठेनें लढत होते तर त्यांचेच आणखी भाऊबंद मुसलमानी फौजांत होते तेहि तितक्याच एकनिष्ठेनें महाराजांच्या फौजांशीं लढत होते! शाहूच्या कारकीर्दींत राज्याच्या दोन वांटण्या झाल्याबरोबर या राज्याभिमानाचेहि दोन तुकडे होऊन पेशवे भोसले गायकवाड आंग्रे प्रतिनिधी सचिव कोल्हापूरकर इत्यादि संस्थानें झालीं, आणि त्याहि संस्थानांतून शिंदे होळकर पटवर्धन रास्ते इत्यादि आणखी सरंजाम निर्माण झाले; त्याबरोबर वर सांगितलेल्या राज्याभिमानाचेहि आणखी बारीक तुकडे होत होत शेवटीं तो अदृश्य झाला! पेशवाईच्या काळांत राज्याभिमान अस्तित्वांत होता म्हणावें तर त्या राज्याचे शत्रु निजामअल्ली व हैदरअल्ली यांच्या पदरीं हजारों मराठे शिलेदार व सरदार होते; आणि ते पेशव्यांशीं लढतांना त्यांचें नुकसान करण्यास बिलकूल कसूर करीत नव्हते! पेशवाईबद्दल ब्राह्मणांना तरी अभिमान होता म्हणावें तर तेहि पेशव्यांशीं वैरभाव धरणाऱ्या जाट रोहिले रजपूत इंग्रज फ्रेंच इत्यादि लोकांच्या पदरीं राहून पेशवाईचें अकल्याण करण्यास प्रवृत्त होतच होते! ईस्ट इंडिया कंपनीचीं मुंबईखाल्याचीं पायदळ पलटणें पेशवाईची रयत असलेल्या मराठ्यांचींच होतीं आणि यांपैकीं हजारों लोक इंग्रजांच्या वतीनें समरांगणांत पेशवाई फौजांशीं लढतांना मृत्यु पावले आहेत! याच्या उलट इंग्रजांचा देशाभिमान कसा प्रखर व जागृत होता हें सुप्रसिद्धच आहे. एका इंग्रज डॉक्टरानें बादशहाच्या मुलीला औषध देऊन बरें केलें तेव्हां बादशहा खुषीनें त्या डॉक्टराला लाख पन्नास हजार रुपये देता; परंतु डॉक्टरानें दुसरें कांहीं बक्षीस न घेतां बादशहास अर्ज केला कीं, माझ्या देशाच्या लोकांस तुमच्या राज्यांत व्यापाराची सवलत द्या म्हणजे मला बक्षीस पोंचलें! मीर जाफरच्या मृत्युपत्रामुळें क्लाइव्हला मिळालेल्या पैक्याचा विनियोग त्यानें आपल्या देशाच्या लष्करी अंमलदारांच्या उपयोगार्थ केला आणि खर्ड्यांच्या लढाईनंतरच्या तह ठरवितेवेळीं निजामअल्लीनें नाना फडणवीस यास तीस हजार रुपये उत्पन्नाचें गांव दिलें तें त्यानें स्वतःकरितां खुशाल ठेवून घेतलें!

चारचौघांनीं मिळून एखादी संस्था चालविण्याची अगर एखादा कारभार पार पाडण्याची आम्हांला संशय नाहीं; यामुळें तसलें कार्य आमच्या अंगावर पडलेंच तर तें एकचित्तानें चालवणें आमच्या हातून निभत नाहीं. मतभेद व तट पडून शेवटीं तंटे होतात, पुष्कळ वेळां ते तंटे विकोपास जाऊन भलताच अनर्थ ओढवतो, हें आपण नेहमीं पहातों. जी गोष्ट हल्लींच्या व्यवहारांत तीच पूर्वींच्या राज्यकारभारांत घडून येत होती ! शिवाजी दिल्लीस गेला तेव्हां मोरोपंत पेशवे व अण्णाजी दत्तो सचिव यांजवर राज्याचा कुलअकत्यार सोंपवून गेला होता. पण त्या दोघांत मत्सर व द्वेष उत्पन्न झाल्यामुळे राज्यकारभार सुरळीतपणें चालेनासा झाला ! शिवाजी लौकरच परत आल्यामुळें त्या वेळीं वाईट परिणाम झाला नाहीं, तरी पुढें तो संभाजीच्या कारकीर्दींत झालाच ! राजारामानें संताजीस मुख्य व धनाजीस दुय्यम सेनापति नेमून त्यांवर सैन्याचा सर्व कारभार सोंपविला असतां त्या दोघांत चुरस वाढून संताजी मारला गेला ! शाहूच्या कारकीर्दींत सेनाकर्ते व सेनापति यांची एका मोहिमेवर रवानगी झाली असतां भांडण होऊन सेनाकर्त्यांवर मोठाच संकटाचा प्रसंग ओढवला होता ! प्रत्येक स्वारींतला पत्रव्यवहार पहा, हाताखालच्या सरदारांनीं मुख्य सरदाराशीं बांकून वागावें, कुचरपणा करावा, फंदफितुर करावा, असें कधीं घडून आलें नाहीं असा प्रसंग फारच विरळा ! बारभाईच्या करस्थानाचा कसा बोजवारा झाला ! नाना बापू मोरोबा व चिंतो विठ्ठल कसे भांडले, आणि शेवटच्या दोघांनीं आपल्या सोबत्यांवर सूड उगवण्याच्या हट्टास पडून पेशवाई इंग्रजांच्या घरांत घालण्याचा कसा घाट घातला होता, हे प्रसिद्धच आहे. इंग्रज लोकांत असे तंटे होत नाहींतसें नाहीं; नेहमीं होतात. परंतु समूहस्वरूपानें कामें करण्याचें त्यांच्या अंगवळणीं पडलें असल्यामुळें त्यांचे तंटे विकोपास जाऊन उद्दिष्ट कार्याचा घात होण्याचें भय नसतें.

समूहस्वरूपानें आम्हीं केलेलीं कार्यें यशस्वी होत नसल्यामुळें आमचें राज्यतंत्र पाश्चात्त्यांप्रमाणें संस्थाप्रधान असूं शकत नाहीं; तर तें व्यक्तिप्रधानच असावें लागतें. म्हणजे बुद्धिमान् उत्साही निग्रही अशा एखाद्या प्रबळ व्यक्तीनें पुढें सरून मुख्याधिकारी व्हावें आणि इतरांनीं त्याच्या प्रेरणेनें कामें करावीं हेंच आमच्या प्रकृतीला मानवतें. पण जेव्हां अशी एखादी प्रबळ व्यक्ति अधिकारारूढ होते तेव्हां आधीं प्रथम ती अधिकार आपल्या घराण्यांत कायमचा राहील असाच बंदोबस्त करून टाकते ! असे एका कुळांतले अधिकारी एकामागून एक चांगले निपजले तर राज्यतंत्र उत्तमच चालतें. पण तसें घडलें नाहीं, एखादी व्यक्ति वाईट निघाली, तर तें एकदम कोसळतें ! शिवाजीनें माणसें तयार केलीं, किल्ले बांधले, सेना व आरमार निर्माण केलें, प्रत्येक खात्याच्या शिस्ती बांधून दिल्या, सर्व कांहीं केलें; पण मागून संभाजी गादीवर येतांच मागची पंचवीस-तीस वर्षांची मेहनत मातीमोल झाली ! बाळाजीपंत नाना-

पासून माधवरावापर्यंत एकामागून एक चार पेशवे चांगले निर्माण झाले त्यामुळें पेशवाईचें राज्यतंत्र ठीक चाललें. पण त्यांमागून राघोबाची उत्सवमूर्ति पुढें येतांच तंटेभांडणांचा सुकाळ होऊन राज्यास कायमची उतरती कळा लागली! नाना फडणवीस हे मराठ्यांतले अद्वितीय कारस्थानी पुरुष होते, महादजी शिंदे मराठ्यांतले अद्वितीय सेनानायक होते, हें खरें; पण ते मेल्यावर पुढें काय? पुढें सारा अंधार! त्यांची अक्कल व त्यांची करामत त्यांच्याबरोबर गेली ती गेलीच!

ईस्ट इंडिया कंपनीसारख्या संस्थेंत असा प्रकार कधीं होऊं शकत नाहीं. तिचा प्रमुख अधिकार आधीं अयोग्य माणसाच्या हातीं जातच नाहीं; आणि गेलाच तरी तो माणूस संस्थेच्या कायद्यांनीं चोहोकडून जखडून गेला असल्यामुळें संभाजी अगर बाजीराव याप्रमाणे स्वच्छंदानें वागूं शकत नाहीं. संस्थेच्या कारभारांत कालमानाप्रमाणे नेहमीं नवे जुने होत असते. त्यांत नवा उत्साह, नव्या कल्पना, नवे मार्ग, यांची भर पडत असते. त्यामुळे तिचा जोम व व्याप कायम राहून क्रियासातत्य अविच्छिन्न राहते. एकसत्ताक राज्य चांगलें कीं अनेकसत्ताक राज्य चांगले, या वादाशीं येथें कांहीं कर्तव्य नाहीं. पेशवाईचें राज्यतंत्र अव्यवस्थित व व्यक्तिप्रधान होते, आणि ईस्ट इंडिया कंपनीचे राज्यतंत्र सुव्यवस्थित व संस्थाप्रधान होतें. पहिल्याचा उत्साह मावळत चालला होता, तर दुसऱ्याचा अधिकाधिक वर्धमान होत होता, एवढेंच आम्हांला सांगावयाचें आहे.

आमच्या लोकात ज्ञानार्जनाची हौस नाहीं. नवीन कल्पना बसवावी, नवीन शोध लावावे, हा हव्यास आम्हाला नाहीं. कोणी कल्पक अगर शोधक मनुष्य निघालाच तर पडेल तो पैका खर्च करून त्या मनुष्यास उत्तेजन देऊन त्याची कल्पना अगर शोध व्यवहारात आणावा याची जरूरीच आम्हांला भासत नाहीं! दुसऱ्याचे नुसते अनुकरण करण्याची बुद्धि मात्र आम्हांत आहे एवढे खरें. तोफखान्याचीच गोष्ट ध्याना! युरोपियन लोक तोफा मारण्यांत पटाईत आहेत. तोफांच्या बळावर त्याना फारच आश्चर्यकारक करामत करून दाखवितां येत, हें युरोपियन आरमारें इकडे प्रथम आलीं तेव्हा आम्हांला कळले. याला प्रत्यंतर तोफेच्या मरामतीकरिता माणसे लागतात, त्यांना पेशवाईत दर्यावर्दी व खलाशी हींच नांवे होतीं, आणि इंग्रजी फौजेंतसुद्धां या कामावरच्या हिंदी लोकांस 'लॅस्कार' असेच म्हणत असत; असो. आम्हीं गोरे लोकांच्या आरमारापासून तोफा विकत घेतल्या, कांहीं येथें ओतविल्या, आणि दारूगोळासुद्धां त्यांच्याच सांगण्याप्रमाणें तयार करूं लागलों. पण पुढे त्या बाबतींत उत्तरोत्तर अम्हांस सुधारणा करतां यावी ती कांहींएक आली नाहीं; त्यामुळे या कामांत इंग्रजांची अगर फ्रेंचांची बरोबरी आम्हांला कधीं करता आली नाहीं. ते हरहमेशा सुधारणा करीत गेलें आणि एकदा कधीं फिरंग्यांनीं सोळाव्या शतकांत कित्ता घालून दिला तोच आम्ही वळवीत बसलो! इंग्रजांनीं

विजयदुर्ग घेतला, मागून दहा वर्षांनीं मालवण घेतलें! तरी आम्ही “इंग्रजानें आगळीक करून मालवण घेतले. फारच शेफारला! वाढते मोडतच आहे.” असें चरफडण्यापलीकडे अगर “शिवलंका (शिवाजीनें पाण्यांत बसविलेले लंकेप्रमाणें असाध्य स्थळ) होती. किल्ला निर्मिल्या तागायत दुसरियास साध्य झाला नव्हता.” म्हणून दुःखोद्गार काढण्यापलीकडे काय केलें? पुनः आणखी दहा वर्षांनीं साष्टी घेतली; तरी आम्ही सावध झालोच नाहीं, व तोफांच्या बळावर आमच्या किल्ल्यांचें रक्षण कसें करावे हे आम्हीं शिकलो नाहीं! मग सिंहगड पुरंदर रायगड वासोटा इत्यादि किल्ले इंग्रजांनीं आम्हांपासून भराभर हिसकून घेतले यांत दोष कोणाचा? बरें, तोफा ओतणारे कारागीर अगर दारूगोळा तयार करणारे अगर चापाच्या बंदुका तयार करणारे कल्पक लोक आमच्यांत नव्हते असेहि नाहीं! पुण्याच्या तोफखान्यांत पाहिजे तेवढाल्या तोफा व गरनाळा युरोपियन व देशी कारागीर ओतून देत असत हे तर राहोच, पण मिरजेसारख्या किल्ल्यांतसुद्धां लागतील तशा तोफा ओतून घेतां येत असत आणि कुलपी व दुसऱ्या कित्येक प्रकारचे गोळे, एकसारख्या तास पाऊण तास जळणाऱ्या चंद्रज्योती, आणि बाण व दारू तयार होत असे. पंचरसी तोफा ओतण्याची मजुरी तिच्या वजनावर दर शेरास शंभर रुपये याप्रमाणे आकारली जात असे असें आम्हीं जुने दप्तर चाळतांना वाचल्याचे स्मरते. यापेक्षां इंग्रजी तोफा विकत घेतल्या तर त्या स्वस्त पडत त्यामुळे गरजू सरकारें आयत्या वेळीं त्याच विकत घेत! झीज सोसून स्वदेशी माल घ्यावा व देशी कारागिरांस उत्तेजन द्यावे हे तत्त्व त्या वेळींसुद्धा पसंत नव्हतेच!!!

तोफखान्याची शिरत अशी म्हणण्याजोगी पेशवाईत फारशी असल्याचें त्या वेळेच्या लेखांत दिसून येत नाहीं. पानशांनीं कधीं कुठे तरवार (अथवा खरें बोलायचे तर तोफ!) मारली होती त्याच लौकिकावर ते पेशवाईच्या अखेरीपर्यंत तोफखान्याचे दरोगे होते! त्यांच्या तोफांचा चांगुलपणा त्या तोफांनीं पूर्वी कधींकाळीं दाखविलेल्या करामतीवर मोजला जात असे! मग हल्लींची करामत कशीही असो! एकाद्या वेढ्यांत मराठी तोफांचा किल्ल्यावर भयंकर भडिमार होण्याचें भय नव्हतेंच! कारण, दारूगोळ्याच्या खर्चावर दरोग्याची काकदृष्टि नेहमीं फिरत असायची; शिवाय फार बार केले तर तोफा फुटतील अगर बिघडतील ही मोठीच पंचाईत होती! असल्या जुन्या तोफा आणि ‘कृष्णमृत्तिके’ची टंचाई असल्यावर मग काय विचारावें? आमच्या फौजांचे मोर्चे एखाद्या किल्ल्यास बसले म्हणजे मोर्च्यांत गोलंदाजांनीं एकदां तोफेचा बार काढून पुनः बार भरून ठेवावा, मग चिलीम ओढावी, घटका दोन घडका गप्पागोष्टी कराव्या, इकडे थोडें हिंडावें, मग तोफेजवळ जाऊन भरलेला बार सोडावा आणि दुसरा भरून ठेवावा, पुनः चिलीम गप्पा वगैरे प्रकार व्हावे! याप्रमाणें सायंकाळपर्यंत दहा-

पांच बार काढून तोफ तळावर आणून पोंचती केली म्हणजे संपला रोजगार ! या लिहिण्यांत अतिशयोक्ति बिलकुल नाहीं. इंग्रज प्रेक्षकांनीं जे लिहून ठेवलें आहे त्याचाच उद्धार आम्हीं येथें केला आहे व जुना पत्रव्यवहार आम्हीं जो वाचिला आहे त्यावरून अशीच वहिवाट अमलयाचें अनुमान निघतें. सन १७७४ पासून १७८१ पर्यंत पेशवाई फौजांची इंग्रजांशीं राहून राहून सहा वर्षें लढाई सुरू होती, तींत पानशांनीं दहापांच वेळां तरी इंग्रजी फोजेवर तोफांचा म्हणण्याजोगा एलगार केला असल्यास फारच म्हणावयाचे ! हरिपंतनात्यांची तोफा मारण्याची शक्कल या युद्धांत कांहीं निराळीच होती ! ते लांब पल्ल्याच्या फारच मोठ्या तोफा नेऊन त्यांचा मारा इंग्रजी फोजेवर दीड दोन कोसांवरून करीत. इतक्या लांबून हे काम करविण्याचा हेतु एवढाच कीं, सुदैवानें टोपीवाल्याला एकदोन गोळे लागले तर त्याचीं शेंपन्नास माणसें मरतील. तसे नाहीं झालें तरी निदान त्याचा हल्ला आल्यास आगाऊच तोफा काढून पिछाडीस पोंचवितां येतील !

कोणी म्हणेल कीं, तोफखान्याच्या कामांतली हेळसांड तुम्ही वर्णन करितां ही निदान दौलतराव शिंद्याला तरी लागू नाहीं. कारण, त्याचा तोफखाना इंग्रजांच्या बरोबरीचा होता हे खुद्द इंग्रजांनींच कबूल केले आहे. होय, हें म्हणणें खरं आहे. पण त्यावरून आमचे हिंदी लोक तोफा मारण्यांत इंग्रजांच्या बरोबरीला आले होते असे मात्र सिद्ध होत नाहीं. कारण, शिंद्याचा तोफखाना फ्रेंच व इंग्रज अंमलदारांनीं तयार केलेला असून त्याची वहिवाट सुद्धां तेच लोक करीत होते; आणि असल्या परस्वाधीनपणामुळे अखेर शिंद्याचा फायदा न होता घातच झाला ! कारण, परकी लोकांपैकीं पुष्कळ असामी शिंद्यास आयते वेळीं दगा देऊन इंग्रजांकडे निघून गेले ! खुद्द सर्व पलटणांवरचा मुख्य मुसा पिरू यानेच सर्वांआधीं इंग्रजांशीं सूत जुळवून विजयाचा रस्ता सुधारल्यावर त्यानें घातलेले तोफा व बंदुका तयार करण्याचे कारखाने आयतेच दारूगोळ्यासह इंग्रजांच्या हातीं अल्प श्रमानें लागावे, यांत नवल तें काय ?

लढाईंत तोफांचा घोडेस्वारांपेक्षा पायदळाशीं निकट संबंध असतो. कारण, शत्रूचा हल्ला आल्यास तोफांचा बचाव पायदळच करूं शकते. हल्ला करणारें पायदळ कवाइती असेल तर बचाव करणारें पायदळहि कवाइतीच पाहिजे हे अगदीं खरें; तथापि हैदरअल्लीच्या कवाइती पायदळाची कवाईत बेतबाताची असल्यामुळें माधवराव पेशव्यांच्या अखेरीपर्यंत पायदळ पलटणें तयार करण्याची आवश्यकता पुणे दरबारास भासली नाहीं, आणि केव्हांहि झालें तरी अशीं कायमचीं पुष्कळ पलटणे ठेवण्याची पेशवेसरकारास सोयहि नव्हती ! याचें कारण बहुतेक पेशवाईराज्य सरंजामांत वांटलें गेलें असून ते सरंजाम घोडेस्वाराचे होते. कांहीं मुलुख सरकारांत होता त्याच्या उत्पन्नांतून खर्चवेंच भागवून शिवाय इंग्रजांच्या लढाईकरितां पलटणांची तरतूद करणें

अवश्य होतें. सरंजाम कमीजास्त करावे, स्वार कमी करून पायदळ वाढवावें, तर राजपत्रीं म्हणजे महाराजांनीं दिलेल्या सरंजामांत विनाकारण हात घालण्याचा अधिकार खुद्द पेशव्यांस नव्हता तो नानांस कोठून असणार? अशी स्थिती असल्यामुळें वसई कल्याण वगैरे कोंकणांतल्या मुलुखाचा इंग्रजांपासून बचाव करण्यासाठीं नानानें दहा-पंधरा हजार हंगामी पायदळ चारदोन वर्षें बाळगलें होतें ते अशिक्षितच होतें. त्या पायदळांत सिंधी रोहिले अरब पुरभय्ये वगैरे सर्व परदेशी लोक होते!

घोडेस्वार हे पायदळास पूर्वीपासून तुच्छ मानीत आले आहेत. इंग्रजांशीं सालबाईच्या तहापर्यंत ज्या लढाया झाल्या त्यांत गनिमी काव्यानें मराठ्यांचा बराच बचाव झाला. प्रत्येक प्रसंगीं एका इंग्रजास दहावीस मराठे असें प्रमाण पडत गेल्यामुळें राघोबास पेशवाईवर स्थापण्याच्या कामीं इंग्रजांचा काट चालला नाहीं. त्यावरून पायदळ पलटणे चाकरीस ठेवून त्याची विद्या नवीन प्राप्त करून घेण्यापेक्षां आपली जुनी गनिमी पद्धतच फार चांगली, असा नाना पाटीलबावा फडके पटवर्धन इत्यादिकांचा ग्रह होऊन बसला; परंतु पुढें लौकरच टिपूशीं लढण्याचा प्रसंग आला व त्याची कवाइती फौजेची जय्यत तयारी मराठी मुत्सद्द्यांच्या व सरदारांच्या कानीं येऊं लागली, तेव्हां त्यांचा तो ग्रह डळमळूं लागला! पुढें सन १७८६ मध्यें टिपूवर मोगल व मराठी फौजा येऊन हरिपंततात्या चालून गेले. त्या खेपेस टिपूनें तोफांच्या भडिमारानें मराठी व मोगल फौजा हैराण केल्या आणि छापे घालघालून त्यांची फार दुर्दशा केली! त्या सुमारास हिंदुस्थानांत पाटीलबावांनीं डिबॉईन या फ्रेंच सरदाराकडून सहजगत्या दोन पलटणें तयार करविलीं होतीं. आसपासच्या जमीनदारांस दहशत बसविण्यापुरतीच ती तरतूद होती. दक्षिणेंतून टिपूच्या लढाईचीं वर्तमानें जों जों शिंद्याच्या कानीं येऊं लागलीं तों तों आलेल्या अपयशाचें परिमार्जन करण्याकरिता टिपूवर स्वारी करण्याची पाळी आपणावर कधीं तरी येणार असें त्याच्या मनात येऊं लागले. त्या वेळीं दिल्लीच्या बादशहाचें राज्य त्याच्या वहिवाटीस असल्यामुळें असली कवाईत शिकलेली विदेशी फौज बादशहाचें नाव पुढें करून त्यास ठेवतां येण्याजोगी होती व त्याप्रमाणे त्याने पुष्कळ पलटणें व त्याना लागणारा तोफांचा सरंजाम दोनतीन वर्षांत तयार करविला. सन १७९१ त महादजी शिंदा देशीं आला तेव्हां श्रीरंगपट्टणच्या स्वारींत सामील होण्याची त्याची तयारी झाली होती; परंतु तो पुण्यास येतो तों टिपूशीं तह होऊन फौजा परत फिरविल्याचीं वर्तमानें आलीं; त्यामुळें तो बेत तितकाच राहिला. कवाइती पलटणांच्या जोरावर इंग्रजांवर पगडा बसविण्याची शिंद्यास इच्छा झालीच नसेल असे म्हणवत नाहीं पण तीं पलटणें ठेवतांना उद्देश निराळा होता एवढेंच येथें सांगवयाचें आहे.

शिंद्याच्या या नवीन कवाइती फौजेंतले अंमलदार इंग्रज व फ्रेंच जातीचे असून त्यांनीं ती फौज फारच चांगल्या तयारीला आणली होती. तथापि असली

फौज ठेवण्यापासून इंग्रजांशीं लढतांना शिंद्यास फायदा व्हावयाचा तो झाला नाहीं. दौलतराव शिंदा म्हणे कीं, मी इंग्रजांशीं माझीं पलटणें लढवीन; आणि रघोजी भोसला म्हणे कीं, माझ्याजवळ पलटणें नाहींत, मी गनिमी तऱ्हेनेंच लढणार! शिंद्याजवळ घोडेस्वार पुष्कळ होते, तेहि भोंसल्याप्रमाणेंच बोलत होते; परंतु युद्धाचा बेत व त्याची तरतूद कोणींच केली नसल्यामुळे भोसल्याची गनिमी राहिली, शिंद्याच्या घोडदळाची बाजू विरघळली, आणि इंग्रजांचा सर्व मारा पलटणांवरच येऊन पडला! आधींच कांहीं पलटणें व सरदार आयत्या वेळीं शिंद्यास सोडून इंग्रजांस मिळाल्यामुळें लढाईच्या मसलतीची घडी विसकटली होती. त्यांतून कांहीं पलटणें राहिलींसाहिलीं तींहि एखाद्या लढाईत एकत्र होण्याचा योग आला नाहीं! थोडथोड्या पलटणांचा आसई अल्लीगड लासवारी वगैरे ठिकाणीं इंग्रजांशीं लढाया झाल्या त्यांत त्या पलटणांचा मोड झाला.

शिंदे व भोसले यास इंग्रजांशीं लढण्याचा प्रसंग आला तेव्हां त्यांनीं होळकरास सामील करून घेण्याविषयीं यत्न करण्याची पराकाष्ठा केली. तथापि त्या वेळीं तो त्यांस अनुकूल झाला नाहीं; लढाईचा तमाशा पहात स्वस्थ राहिला. पण पुढच्याच वर्षीं इंग्रजांच्या लढाईची बाणी एकट्या होळकरावर येऊन बेतली तेव्हा तो संकटांत पडला! आपणास साहाय्य करण्याविषयीं मराठी राज्यातल्या सर्व सरदारांस त्यानें पत्रें पाठविलीं होतीं. अशा पत्रांपैकीं परशुरामपंत प्रतिनिधीस त्यानें जे पत्र पाठविलें त्यांत लिहिलें आहे कीं, “आजपर्यंत हिंदु राज्य सर्वत्रांनीं एकदिल राहून चालविलें. अलीकडे ज्याचे त्याचे दौलतींत गृहकलह होऊन राज्यास विपर्यास पडून हिंदुधर्म नाहींसा होण्यास मूळ झाले. याचे छेदन करण्यास सर्वत्र एकदिल झालें पाहिजे, तरच मूळाचे छेदन होऊन स्वधर्माचार पूर्ववत्प्रमाणें चालून हिंदूंची कायमी राहील. इकडील क्रम जो आरंभिला आहे हाच यावद्देह चालवावा असे मनात आहे. यांत परमेश्वर अनुकूल होऊन जे घडवील तें खरे! परंतु एकानेच असा प्रकार करून सर्वत्रांनीं तमासे पाहून आपापली दौलत सांभाळून असावे, यांतील परिणाम कसा हे मनीं विचारून ज्यांत हिंदुधर्माची कायमी व परिणामास नीट ते करावें! याचा विचार तुम्हांसारख्यांनीं न केला तरी दुसरे कोण करितील!” या पत्रांतले विचार फारच योग्य आहेत. पण ते आदल्याच वर्षीं होळकरास सुचले असते व तो शिंदे-भोंसल्यांस मनापासून हातभार लावता तर किती चांगलें झाले असतें!

मराठ्यांनीं परकी लोकांचा तोफखाना, परकी लोकांचे कवाइती अथवा आरबांसारखें अशिक्षित पायदळ, व बडे बडे परकी अंमलदार चाकरीस ठेवून त्यांच्या भरावर राज्याचा बचाव करण्याची आशा धरली ती कशी निष्फळ झाली याचें एवढा वेळपर्यंत विवेचन केलें. हाच पैका ज्यांना ‘मावळे’ अशी सामान्य संज्ञा होती त्या

देशी पायदळावर खर्च करून व त्यांवर देशी अंमलदार नेमून तें पायदळ उजगारीला आणिलें गेलें असतें तर त्याचा कांहींच उपयोग झाला नसता काय? पण ते पडले देशी! ते कोणाच्या नजरेंत भरणार? पठाण आरब रोहिले रांगडे यांना पगार सातपासून दहा रुपयेपर्यंत आणि मावळ्यांना पगार तीन किंवा चार रुपये! परदेशी लोकांनीं आमच्या मोहिमा कराव्या आणि मावळ्यांनीं आमची कोठी देवघर आणि बाय-कापोरें संभाळावीं! हेच मावळे इराण– दुराणांतल्या काबूल–कंदाहारांतल्या कडव्या धिप्पाड जवानांना शिवाजीच्या हयातींत काळाप्रमाणे भासले, आणि पेशवाईंत तेवढे नादान ठरले, हे खरें कीं काय? तसें म्हणावें तर हेच मावळे जगांत उत्कृष्ट लढवय्ये म्हणून नाणावलेल्या इंग्रज फ्रेंच वगैरे लोकांच्या खांद्यास खांदा भिडवून सांप्रतच्या महायुद्धांत बरोबरीनें लढतात, आणि जर्मनांससुद्धां चीत करूं शकतात, हेंहि निदर्शनास आलेंच आहे! योग्य उत्तेजन व शिक्षण मिळाल्यास येथपर्यंत यांची पात्रता आहे हे पेशवाईंत कोणास देखील खरें वाटले नसते! यावर इंग्रज अंमलदार म्हणतील कीं, हा महिमा मावळ्यांच्या दर्दुमीचाहि नव्हे, अथवा त्यांच्या शिक्षणाचाहि नव्हे. ते शिक्षण त्यांना आम्ही देतों, लढाईंत आमच्या हुकमतीखालीं त्यांचें सारे कामकाज होते, सबब या यशाचे मालक आम्ही आहों! पण पलट-णांची मुख्य अंमलदारी देशी लोकास मिळून ते लढाईंत काय करूं शकतात, हें पहाण्याची संधीच जर मुळीं आम्हांला मिळत नाहीं, तर इंग्रज अंमलदार म्हणतात तेंच खरें, असें आम्हीं तरी का मानावें?

First Maratha War या शब्दांचा अर्थ 'इंग्रजांचे मराठ्यांशीं पहिलें युद्ध' असा होतो परंतु हे इंग्रजांचे युद्ध सर्व मराठ्यांशीं घडून आले, म्हणजे ईस्ट इंडिया कंपनीचे सर्व मराठी साम्राज्याशीं युद्ध झाले, असें मात्र मुळींच नाहीं! पेशवाई म्हणजे 'शिवशाही' अथवा सर्व मराठी राज्य आहे, मात्र शिवशाहीचा तो एक मोठा भाग होय, हे आपण पुष्कळ वेळां विसरतो. सर्व मराठी साम्राज्यावर पेशव्याची हुकमत चालावी असे शाहूनें ठरवून दिलें होते खरें, पण त्या हुकमतीला कांहीं मर्यादा ठेवलेल्या होत्या, आणि त्या मर्यादांचें उल्लंघन पेशव्यासहि करितां येणें शक्य नव्हतें. शाहू मरण पावला तेव्हां राज्यांत पेशवे भोसले गायकवाड आंग्रे सावंत प्रतिनिधि सचिव अक्कलकोटकर व आणखी कित्येक सरदार असून या सर्वांचे लहानमोठे पृथक् पृथक् सरंजाम होते. आपण मेल्यावर या सरदारांस कोणी शास्ता नाहींसा झाल्यामुळ हे सरकारचाकरी करणार नाहींत, राज्याची वाढ व उत्कर्ष होण्याचे बंद होईल, हे आपसांत भांडून राज्याचें वाटोळें करितील, असे मनांत आल्यावरून आपल्या मरणोत्तर सर्व राज्यावर देखरेख ठेवणारा कोणी अधि-कारी नेमावा असा शाहूनें विचार ठरविला. भोसले अथवा गायकवाड हे शाहूच्या जातीचे असल्यामुळें या दोघांपैकीं कोणाच्या तरी गळ्यांत हें काम अडकवून द्यावें

असें त्याच्या मनांत होते. पण आपल्याऱ्यानें पेशव्याशीं स्पर्धा चालविणे होणार-नाहीं असे समजून ते दोघेहि त्या वेळीं तो मुख्याधिकार पतकरण्यास धजले नाहींत मग शाहूने निरुपाय होऊनच राज्याची वडीलकी पेशव्याच्या हवालीं केली; आणि त्यांस सनद दिली कीं, तुम्हीं सरकारी फौज व तिचे जेवढे म्हणून सरदार आहेत त्या सर्वांवर हुकमत चालवून राज्य संभाळावे व परमुलुखीं स्वाऱ्या कराव्या. सरंजामदारांच्या अंतर्गत कारभारांत तुम्हीं हात घालूं नये, व जेथपर्यंत ते राज्याची इमानाने चाकरी करीत आहेत तेथपर्यंत त्यांच्या त्यांच्या सरंजामाचे मुलुख बिनबोभाट त्यांजकडे चालवावे. माझा चुलत भाऊ संभाजी यास कोल्हापूरचे संस्थान निराळें तोडून दिले आहे ते त्याजकडे स्वतंत्र तसेच राहूं द्यावे. इनाम वर्षासन नेमणूक वतन वगैरे जे जें म्हणून मीं व माझ्या पूर्वजांनीं दिलेले आहे ते तें सर्व शिरस्त्याप्रमाणे ज्याचे त्याजकडे चालवावें.

यावरून हें लक्षांत येईल कीं, परचक्राचें निवारण करण्याकरितां व परमुलुखावर स्वारी करण्याकरितां गायकवाड व भोसले इत्यादि सरदारांच्या फौजा चाकरीस बोलावण्याचा पेशव्यांस अधिकार मिळाला होता, आणि जर ते त्याचा अधिकार न मानतील, परचक्रास मिलाफी होऊन बंड अथवा फंदफितूर करतील, तर त्यांचे शासन करून त्यांचे सरंजाम खालसा करण्याचा अधिकारहि पेशव्याच्या हातीं आला होता. शाहूच्या सनदेप्रमाणे राज्यावर हुकमत चालविण्याचा हा अधिकार नानासाहेब व माधवराव यांनीं आपल्या सामर्थ्याप्रमाणे चालविला. परंतु तोच अधिकार कारभारी या नात्याने नाना फडणवीस यांस चालविण्याचा प्रसंग आला तेव्हां त्यांना कोणी जुमानीनासे झाले! आमचा राज्यकारभार व्यक्तिप्रधान असल्याचें पूर्वीं सांगितलेच आहे. ज्या त्या व्यक्तीचे कर्तृत्व त्या त्या व्यक्तीपुरते! शाहूचा दरारा नानासाहेबांत नव्हता, आणि नानासाहेबाचा माधवरावांत नव्हता; मग माधवरावाचा दरारा नानासारख्या कारभाऱ्यांत कोठून असणार?

इंग्रजांशीं लढाई सुरू झाली तींत गायकवाडांनीं त्याशीं निराळा तह करून आपला बचाव करून घेतला. आंग्रे व सावंत उदासीनच होते. भोसले गोड बोलत होते तरी आंतून इंग्रजांस अनुकूल होते. त्या वेळीं त्यांनीं पेशव्यांस काडीचीहि मदत केली नाहीं. कोल्हापुरकर तर सांगूनसवरून विरुद्धच होते. सचिवांना नोकरीची माफीच होती. अक्कलकोटकर व प्रतिनिधि हे चाकरीवर धाकदपटशामुळे कां होईना, पण हजर रहात; तरी त्यांचीं पथकें लहान आणि अर्थात् उपयोगहि थोडाच! ज्याचे सरंजाम पेशव्यांनीं उत्पन्न केले, असे सरदार विंचुरकर राजेबहाद्दर रास्ते पटवर्धन धायगुडे बिनीवाले इत्यादि होत. या सर्वांची मिळून पंधरापासून वीस हजारांपर्यंत फौज होती. शिवाय हुजुरातीचे जुने मानकरी सरदार थोरात घोरपडे पाटणकर दरेकर वगैरे होते; त्यांचीं

किरकोळ पथकें चाकरीवर होतीं. त्या साऱ्यांची संख्या पांचसहा हजार होईल. ही पेशव्यांची दक्षिणेतील फौज झाली. उत्तरेकडल्या फौजेंत शिंदे व होळकर हेच मुख्य होत. होळकराचा सरंजाम साडेचौऱ्याहत्तर लक्षांचा आणि शिंद्याचा साडेपांसष्ट लक्षांचा. या दोघांची मिळून चाळीसपासून पंचेचाळीस हजारपर्यंत फौज होती. त्यांतली निम्मी तिकडच्या मुलुखाच्या संरक्षणार्थ ठेवून बाकीची निम्मी वीसबावीस हजार त्यांस दक्षिणेंत आणतां येण्याजोगी होती. शिवाय पेशवेसरकारच्या पागा पुण्याच्या आसपास असत. ते तीनपासून चार हजारपर्यंत स्वार होते. ही पेशवे-सरकाची खडी फौज झाली. एवढ्या फौजेच्या बळावर म्हटलें तर पेशव्यांना त्या वेळची इंग्रजी फौज जेरीस आणणे फारसे कठिण नव्हतें. पण नानाच्या कारकीर्दीत एवढ्या मोठ्या फौजेला इंग्रज आवरतां आवरतां पुरे वाट झाली ! याचें कारण नाना-साहेबांच्या वेळच्या वीस हजार स्वारांचा दम या वेळच्या पन्नास हजार फौजेंत उरला नव्हता हेच होय.

आधीं मुळीं पुरंदरचा तह ठरेपर्यंत वर्ष दीड वर्षाच्या अवधींत शिंदे होळकर यांनीं स्वस्थ बसून मौज पाहण्याखेरीज कांहींच केलें नाहीं. ते पुणेदरबारशीं फटकून होते इतकेच नव्हे, तर राघोबास साधेल त्या तऱ्हेने मदत करण्यास तयार होते ! पुरंदरचा तह ठरल्यानंतर मात्र महादजी शिंद्याने पेशवाईच्या संरक्षणाचा जो बाणा धरला तो मरेपर्यंत सोडला नाहीं. वडगांवच्या लढाईत, गुजराथच्या स्वारींत, माळ-व्यांतल्या लढायांत त्यानें फारच चांगली मर्दुमी केली व इंग्रजांवर आपला दरारा बसविला. नानास त्यांचीं आर्जवे करावीं लागत, लहर संभाळावी लागे, तो मागेल ते द्यावे लागे हे खरें; पण त्याने मन घालून सरकारचें काम केलें हें कांहीं खोटे नाहीं. होळकराकडे पहावे तर त्याने बोरघाटाखालीं लढाई झाली, त्याखेरीज दुसरी कांहीं नांव घेण्यासारखी कामगिरी केली नाहीं एवढेच नव्हे, तर मध्यंतरीं मोरोबादादास मिळून पेशवाईवर मोठेच संकट आणण्याचा त्याने घाट घातला होता ! दक्षिणच्या फौजेंत पटवर्धनाची व हुजुरातवाल्यांची फौज बऱ्यापैकीं होती व त्यांनीं कामकाजहि चांगलें केले. बाकीचे सरंजामी होते, त्यांचें लक्ष टाकभाज्याचे काम करून कसे तरी दिवस काढण्याकडे होतें, असेंच म्हणावे लागते. दक्षिणेतल्या पुष्कळ पथकांत व होळ-कराच्या फौजेत निकृष्ट प्रतीच्या स्वारांचा भरणा फार झाला असल्याचा बोभाटा झाला होता. सरकारचे लांचखाऊ कारकून असल्याहि स्वाराची गणती घेत ! त्या गणतीचे वर्णन कोणी थट्टेखोराने असें केलें आहे कीं, घोड्याचे चार आणि माणसाचे दोन असे सहा पाय दिसले कीं घाला त्याचे घोडेस्वारांत नांव ! गणतीच्या कार-कुनाची मूठ दाबली म्हणजे घोडें दहा रुपयांचें असो कीं वीस रुपयांचें असो, स्वार म्हणवणारा लष्करचा भडभुंजा असो कीं भिस्ती असो, तें कशाला तो पहातो आहे ! घोडे म्हणजे घोडें आणि स्वार म्हणजे स्वार !!! हें वर्णन थट्टेचे असलें तरी खऱ्या

वस्तुस्थितीहून फारसें भिन्न नव्हतें! फौजेची संख्या वाढविण्याखेरीज असल्या स्वारांचा दुसरा कांहींच उपयोग नव्हता. छाती करून तरवार मारावी, इंग्रजांचीं पलटणें कापून काढावीं त्यांच्या तोफा घ्याव्या, त्यांची रसद बंद करावी, हा हुरूप एवढ्या मोठ्या फौजेंत फारच थोड्या सरदारांच्या अंगीं दिसून येत होता. ज्याला त्याला माझें घोडें माणूस कसें बचावेल हीच काळजी!

मराठी फौजेची ही स्थिती लक्षांत आली म्हणजे इंग्रजांचें गतिस्वातंत्र्य कायम राहिलें, ते दोनदां मराठ्यांच्या फौजेस न जुमानतां पुण्याहून चालून आले, त्यांनीं अनेक वेळां त्यांवर हल्ले करून त्यांस हुसकून लावलें, त्यांची दहशत न बाळगतां डभई अहमदाबाद वगैरे इत्यादि किल्ले घेतले, याचें कांहींच आश्चर्य वाटत नाहीं! वडगांवच्या लढाईंत इंग्रजांचा पराजय झाला. जनरल गॉडर्ड याचे लष्कर लुटून व त्याचे शिपाई मारून मराठ्यांनीं त्यास हैराण केले, नापारच्या लढाईंत त्यांनीं इंग्रजांच्या पलटणांत शिरून कत्तल केली, हे मराठ्यांचे पराक्रम त्यांच्या संख्येच्या व पूर्वीच्या लौकिकाच्या मानानें कांहींच नव्हत.

माधवराव पेशव्याचा अकालीं मृत्यु पानपतच्या युद्धाप्रमाणेंच मराठ्यांस घातक झाला असें इतिहासलेखक ग्रँट डफ् म्हणतो ते अगदीं खरे आहे. कारण कीं, तो पेशवा मरण पावल्यापासून राज्यांत अव्यवस्था आणि लष्करी कारभारांत ढिलाई व बेकैदी जी एकदां उत्पन्न झाली ती अखेरपर्यंत कधीं नाहींशी झालीच नाहीं! सवाई माधवराव प्रौढ वयाचा असता आणि तो माधवरावाप्रमाणें तरतरीत बुद्धीचा आणि हिंम्याचा माणूस असता तर ही अस्वस्थता व बेकैदी मुळींच उत्पन्न झाली नसती. पण तो बाल्यावस्थेंत आहे, त्याच्या घरांत भाऊबंदकी सुरू झाली आहे, व इंग्रजांसारखे परचक्र राज्याला ग्रासूं पहात आहे, असे दृष्टीस पडतांच चोहोंकडे दंगेखोरांनीं उचल खाल्ली! हे दंगेखोर म्हणजे कोणी भुरटे चोर नसून त्यांपैकीं कांहीं संस्थानिक होते! त्यांच्या पदरीं हजार पाचशें जमाव असून शिवाय कित्येकांच्या ताब्यांत किल्ले व ठाणीं होतीं. बारभाईंनीं राघोबाचें उच्चाटन केल्यापासून सालबाईचा तह ठरेपर्यंत सात आठ वर्षें या संस्थानिकांनीं व इतर दंगेखोर जातींच्या नाइकांनीं सर्व राज्यांत बेबंदशाही माजवून रयतेस त्राहि त्राहि करून सोडलें! कृष्णेपलीकडे कोल्हापूर राजमंडळाचे दंगे, कित्तूर शिरहट्टी डंबळ येथील देसायांचे दंगे, पूर्वेकडे सुरापूरच्या बेरडांचा दंगा, सातारा प्रांतीं रामोशांचा दंगा, पुणें-जुन्नरकडे कोळयांचा दंगा, नाशिक व खानदेश प्रांतीं भिल्लांचा दंगा असे एक ना दोन किती सांगावे! त्या दंग्यांच्या वावटळींत पटवर्धन रास्ते धायगुडे विंचुरकर राजेबहादूर होळकर या सर्वांच्या सरंजामाचे मुलुख सांपडले होते व त्यामुळें त्यांची फार दुर्दशा झाली होती. मुलुखांतून वसूल येईना, आणि फौजा तर ठेवावयाला पाहिजे आणि तिचे पोट चालवायला पाहिजे! अशी स्थिती झाल्यमुळें सरंजामी सैन्यास कांहीं सुचेनासें झालें.

इंग्रजाशीं लढतांना जो तो सरंजामी आपापल्या ठिकाणीं विचार करी कीं, या इंग्रजांच्या पलटणांवर मीं हल्ला केला तर ती कापून काढीन अथवा हटून मागें येईन. ते कसेंहि होवो, पण या घटकेच्या खेळांत माझीं पांचशें घोडीं पडलीं तर त्यांची वाट काय ? पांचशे घोड्यांचा पैका तीन लाख रुपये होतो. एका घटकेच्या जुगारांत मीं हे तीन लाख रुपये घालविले तर सरकार कांहीं मला ते देत नाहीं. कारण, सरकारचीच मुळीं अन्नान्नगत झाली आहे, ते मला काय देणार ? सरंजामांतून तर दंग्यामुळें पैका येत नाहीं, मग हा पैका भरून निघायचा कसा ? उद्यां शिलेदार आमचीं घोडीं तरी द्या, नाहीं तर त्याची किंमत तरी द्या, म्हणून घरांत धरणें देऊन बसले तर प्राण देण्याची पाळी येईल ! याकरितां हिम्या करण्याच्या भरीस न पडतां मागें रहाण्यातच सुरक्षितपणा आहे ! ज्या दंग्याधोप्यांमुळें क्षात्रवृत्तीस काळिमा आणणारा हा प्रसंग या मानी सरंजामदारांवर ओढवला ते दंगेधोपे सरंजामी पद्धतीमुळेंच उत्पन्न झाले होते ! ! !

शाहूने व पेशव्यांनीं सरदारांस मोटमोठाले प्रांत व तालुके देण्याची वहिवाट सुरू केली त्यामुळें सरदाराचे सरकारी कामावरचे लक्ष्य उडून आपल्या सरंजामांकडे वेधलें गेले. ते मगरूर होऊन धन्यास उलट्या गोष्टी सांगूं लागले आणि स्वतंत्र होण्याची संधी पाहूं लागले. त्यामुळें राज्यांतले ऐक्य नाहींसे होऊन राज्य बुडालें असें पुष्कळ लोक म्हणतात, ते सर्वांशीं खरें नाहीं; तसेच सरंजामी पद्धत सुरू केल्यास दोष एकट्या शाहूवर अथवा पेशव्यांवर लादणें वाजवी नाहीं. मध्यवर्ती सत्ता खंबीर असली म्हणजे सरंजामी काय आणि इतलाखी काय, सर्वच नोकर नम्र व कर्तव्यतत्पर असतात. शिवाजीनें आपल्या सरदारास सरंजाम दिले नसले तरी देशमुखीसारखीं वतनें दिलीं होतीं; आणि त्या वतनाबद्दल सरकास लष्करी चाकरी करावी लागे. हीं वतनें म्हणजे लष्करी सरंजामच नव्हेत काय ? त्या वेळीं सर्व हिंदुस्थानांत कमी जास्त मानानें ही सरंजाम देण्याची पद्धति प्रचलित होती. गुजराथ माळवा बुंदेलखंड यांतले संस्थानिक आपणांस दिल्लीच्या बादशहाचे सरंजामच म्हणवीत होते. रोहिले पठाण व शीख यांचे सरदार सर्व सरंजामीच होते मग शाहूनें अगर पेशव्यांनीं रोख पैका देण्याची सोय नसल्यामुळें आपल्या सरदारांना सरंजाम तोडून दिले यांत काय बिघडलें ?

सरंजामी पद्धति जारीनें अमलांत आल्यामुळें तिच्यायोगानें परिणामी राज्यास बळकटी यावी ती न येतां दुर्बळपणाच आला असें मीहि म्हणतों. पण माझ्या म्हणण्याचा अर्थ मात्र निराळा आहे ! अजमासें १७२०।२५ पासून १७६० पर्यंत मराठ्यांच्या परमुलखी स्वाऱ्या होत होत्या. जो मुलूख ज्या सरदारानें काबीज करावा तोच मुलूख त्या सरदारास महाराजांनीं सरंजाम करून द्यावा. पुन्हा त्या सरदारानें आणखी मुलुख घेतला तर तोहि फौजेच्या खर्चाकरितां महाराजांनीं

सरंजाम म्हणून नेमून द्यावा, असें होऊं लागलें; तेव्हां शूर व उत्साही सरदारांत महत्त्वाकांक्षा उत्पन्न होऊन परमुलखावर स्वाऱ्या कराव्या, लढाया माराव्या, लुटीवर पोट भरावे, आणि प्रदेश काबीज करवेल तो महाराजांकडून सरंजाम म्हणून मिळवून आपली सरदारी कायम करावी, आपले घराणे कीर्तिमंत व वैभवसंपन्न करावें, असें ज्या त्या सरदाराच्या मनांत येऊं लागलें. नंतर हजारों स्वारांच्या झुंडी गोळा करून हे सरदार यंदा माळवा, पुढच्या वर्षी दुसराच एखादा प्रांत, याप्रमाणें निरनिराळ्या प्रांतांत मोहिमा करूं लागले. शाहूमहाराजांनीं आपल्या हयातींत जें हें मोहिमांचें सत्र सुरू करविलें तेच पुढें नानासाहेब पेशव्यांनीं चालू ठेविलें. त्याचा परिणाम असा झाला कीं, दक्षिणेकडे म्हैसूर अर्काट त्रिचनापल्लीपर्यंत आणि उत्तरेस दिल्ली पंजाब आग्रा अयोध्या रोहिलखंडपर्यंत सर्व देशांतून मराठ्यांचा व्याप पसरला. पण मराठ्यांनीं जर हे एवढें राज्य १७२० पासून १७६० पर्यंत मिळविलें तर तें पुढच्या चाळीस वर्षांत घालवूनहि टाकलें ! ईस्ट इंडिया कंपनीनें इ. स. १६०० पासून १८०० पर्यंत २०० वर्षांत जेवढें राज्य मिळवले तेवढें राज्य मराठ्यांनीं चाळीस वर्षांत कमावलें ! मात्र मराठ्यांचे राज्य थोड्याच काळात नष्ट झालें आणि कंपनीचें राज्य अद्यापि कायम असून उत्तरोत्तर त्याचा उत्कर्ष होत आहे. महापूर आला म्हणजे नदीचे पाणी आसपास पांचचार कोसपर्यंत पसरतें आणि मग ओसरता ओसरतां अखेरीस उन्हाळ्यांत पात्रांत सुद्धां पाण्याचा बिंदु रहात नाहीं, त्याप्रमाणे मराठी राज्याची स्थिति झाली !

सरंजाम मिळविण्यासाठीं परमुलुख जिंकून राज्य वाढविण्याची सरदारांना हांव सुटली नसती, किंवा महाराज छत्रपतींनीं तसें न करण्याविषयीं त्यांस उत्तेजन देण्याऐवजीं " आहे तेंच राज्य प्रथम चिरस्थायी करा, त्यांतलीं बंडें मोडा, शिस्त बसवा, कायदेकानू चालू करा, हाव मुलुख भरभराटीस येऊं द्या, मग दुसऱ्या प्रांताला हात घाला, " अशी सक्त ताकीद दिली असती, तर राज्य इतके वाढलें नसतें हें खरें; परंतु त्याला बळकटी आली असती यांत कांहीं संशय नाहीं. जिकडे सूर लागेल तिकडे मोहीम करून भालेराई गाजवण्याच्या फंदांत पडलेल्या मराठे सरदारांना लाहोरावर स्वारी करण्यास फावलें, आणि बालेघाटाचा मुलुख—ज्याला साधुसंतांची जन्मभूमि व प्राचीन खरोखरीच महाराष्ट्र म्हणतां येईल तो पैठण औरंगाबाद नांदेड जालना बीड वगैरे मुलुख—ताब्यांत घेण्याची फुरसत मिळाली नाहीं ! शांततेच्या काळांत मराठ्यांचें राज्य सर्वत्र होतें आणि अस्वस्थतेच्या काळांत कुठेच नव्हतें अशी दशा होण्याचें कारण कोणताहि प्रांत मराठ्यांच्या ताब्यांत पूर्णपणे आला नव्हता हेंच होय.

पूर्वी मुसलमानी राज्यांत हक्कदार व वतनदार लोकांचें मोठें प्राबल्य असे व वसुलाच्या कामांत त्यांनीं सरकारच्या आहारीं पडण्याऐवजीं सरकारच त्यांच्या आहारीं पडलेलें असे. हे देशमुख देशपांडे देसाई सरदेसाई सरदेशपांडे वगैरे

प्रत्येक प्रांताचे मुलकी अधिकारी गांव किल्ले व गढ्या बळकावून बसले होते व आपापल्या वतनाचा वसूल सरकारास न विचारतां परभारें करण्याची त्यांस संवय लागली होती. कर्नाटकाच्या बाजूस मराठ्यांनीं ज्या ज्या परगण्यांत स्वाऱ्या केल्या त्या त्या परगण्यांत असल्या बखेडेखोर देसाई वगैरे लोकांचीं बंडें तशींच राहूं दिलीं; आणि भिल्लाणांत व गोंडवणांत भिल्लांचीं गोंडांचीं आणि बुंदेलखंडांत बुंदेल्यांचीं संस्थाने निर्वेध राहूं दिलीं, तीं राज्यांत नेहमीं अस्वस्थता उत्पन्न होण्यास कारणीभूत होत असत. तुंगभद्रेपलीकडे टिपूचें राज्य होतें तेथेंहि पूर्वी असेच देसाई वगैरे प्रबळ पाळेगार होते. परंतु टिपूनें त्यांचा बीमोड करून आपलें सर्व राज्य निष्कंटक करून टाकलें होतें, त्यामुळे मराठे मोंगल व इंग्रज यांशीं वर्षानुवर्ष त्याचे युद्धप्रसंग होत असतांहि त्याच्या राज्यांत कधीं दंगा झाला नाहीं! अशा निष्कंटक राज्याचा उपभोग मिळत असल्यामुळें टिपूच्या एकतंत्री एकसूत्री राज्याचें सामर्थ्य इतकें वाढले कीं तो वर सांगितलेल्या तिघांहि शत्रूंस म्हणजे मराठे मोंगल व इंग्रज यांस आवरेनासा झाला!

मराठी राज्यांत वारंवार दंगे व क्रांति होण्याचें आणखी एक कारण असे होतें कीं, त्या राज्यांत राजकीय संबंधाच्या मिळकतीवर–मग ती मिळकत एखाद्या पाटलाची असो, वा सरदाराची जहागीर असो–कोणाचा वारसा चालावा हे ठरलेले नव्हतें! फार काय सांगावें, पण खुद्द छत्रपतींचें सिंहासनसुद्धां या अशाश्वतीच्या संकटांतून मुक्त नव्हते! भावाभावांत ज्याच्या मनगटाचा जोर चालेल त्याने वडिलार्जित उत्पन्न खावें अगर अधिकार भोगावा अशी त्या वेळची वहिवाट होती! सरकारांतून योग्य माणसाची निवड प्रथम होई; परंतु जर मागून त्या माणसाच्या भावानें ' मी अधिक नजराणा देतो, मलाच तो अधिकार द्या,' असें म्हटले तर फायद्यावर नजर देऊन सरकार त्याचेंहि म्हणणे कबूल करायाला कचरत नसे! शाहू व ताराबाईचा पुत्र शिवाजी यांत राज्याचा योग्य वारस कोण याबद्दल हल्लीं आम्ही वाटेल तितका वाद करूं, पण त्या काळचीं माणसें असली चर्चा कधींच करीत नव्हतीं! तीं म्हणत कीं, ताराऊचा मुलगा शिवाजी हा जसा थोरल्या शिवाजीचा नातू, तसाच शाहू देखील थोरल्या शिवाजीचा नातूच आहे. दोघेहि योग्य वारस आहेत. ज्याची सरशी होईल त्याला आम्ही मुजरा करूं! पेशव्यांच्या घरांत नानासाहेब व भाऊसाहेब यांमध्यें वांकडें आलें तेव्हां कोल्हापूरच्या संभाजीनें भाऊसाहेबांस पेशवाईचीं वस्त्रें दिलीं. तीं वस्त्रें देण्याचा संभाजीला आणि घेण्याचा भाऊसाहेबाला वाजवी हक्क नव्हता असें कोणींच मानलें नाहीं! भाऊसाहेबाच्या वर्तनाला आम्ही ' पेशवाईविरुद्ध बंड' असें नांव ठेवून तो भयंकर गुन्हा समजूं; पण तसें त्या वेळीं खुद्द नानासाहेब पेशव्यांनासुद्धां वाटलें नाहीं! सरदारीबद्दल भांडण लागलें म्हणजे लोक एवढेंच पहात कीं, वादीप्रतिवादी हे मूळ संपादकाचे योग्य वारस आहेत कीं नाहींत? ते तसे असल्यास मग त्यांच्या भांडणांत कांहीं फायदा दिसल्याशिवाय आपणास पडण्याचें

कारण नाहीं अशीच लोकांची समजूत होती ! गायकवाडांच्या घरात भांडण लागलें व ते सरकारांत आलें म्हणून फत्तेसिंग व गोविंदराव यांस एकमेकावर चढ करून नजराणा भरावा लागला. भोसल्यांच्या घरात भांडणें लागलीं तीं त्यांनीं सरकारांत आणलीं नाहींत म्हणून सरकारनें त्यात लक्ष्यहि घातलें नाहीं. सरकारचें म्हणणें कीं, भांडणारे चौघे भाऊ राणोजींचे पुत्र असल्यामुळे सर्वांचा हक्क सरदारीवर आहेच. तंट्याचा निकाल होऊन जो शेवटीं सर्वमान्य ठरेल त्यालाच आम्हीं सरदारीचीं वस्त्रें देऊं म्हणजे झालें ! सवाई माधवराव व राघोबादादा यात भांडण लागलें असतां गायकवाड व भोसले वगैरे पेशवाईबाहेरचे सरदार त्या भांडणांत पडले नाहींत याचें कारण हेंच होय.

जातिद्वेषामुळें राज्य गेलें असे जे म्हणतात ते कोणाच्या जातिद्वेषामुळे कोणचें राजकारण बिघडले हे कांहींच सांगूं शकत नाहींत. मराठ्याच्या राज्यकारभारांत भिन्न जातींच्या लोकांचे संबंध नेहमीं एकत्र येत होते. त्या अर्थीं खरे पाहिलें तर या जात्याभिमानाचा परिणाम राजकारणावर नेहमीं होत असला पाहिजे; पण तसा तो झाल्याचे इतिहासात कोठेंहि नमूद नाहीं. यावरून राज्यनाशाशीं जातिभेदाचा कांहींएक संबंध नाहीं, व तो केव्हाहि राजकारणाच्या आड येत नाहीं, असें सिद्ध होते. फार झालें तर इतिहासातल्या एकदोन गोष्टींचा जातिभेदाशीं संबंध जोडतां येईल. पैकीं पहिलींतला पुरावा ऐकीव माहितीचा व संशयग्रस्त आहे. ती गोष्ट नारायणराव पेशव्यांच्या खुनासंबंधाची होय. नारायणरावानें प्रभूंचा छळ केला म्हणून त्यांस प्रभूंनीं गारद्याकडून मारविलें असें कांहीं जुन्या प्रभू मित्राच्या तोंडून मी ऐकलें आहे. पण या गोष्टीला सदरहू मित्राच्या सांगण्यापलीकडे कांहीं पुरावा नाहीं. दुसरी गोष्ट मात्र अनुमानानें खरी धरता येण्याजोगी आहे. शाहूनें मरते वेळीं पेशव्यास मुख्याधिकाराची सनद दिली ती तुळाजी आंग्रे मानीनासा होऊन त्यानें पेशव्याशीं बिघाड केला; तो आरमाराच्या व किल्लेकोटाच्या भरावर पेशव्यास कस्पटाप्रमाणें लेखीत असे; सबब पेशव्यानें पांच चार वर्षे उद्योग करून अखेरीस मुंबईकर इंग्रजांच्या मदतीने त्याचें राज्य घेतलें व त्यास सहकुटुंब कारागृहांत घातले. पण यांत बहुतेक लोकांना माहीत नाहीं अशी गोष्ट ही आहे कीं, तुळाजी आंग्रे हा चितपावनांचा कट्टा द्वेष्टा असून तो त्यांचा फार छळ करूं लागला होता ! तुळाजीची हद्द बाणकोटापासून विजयदुर्गापर्यंत होती व हा टापू तर चितपावनांचें माहेरघर होय ! पेठे फडके परचुरे रास्ते भावे देशमुख घोरपडे जोशी बारामतीकर जोशी सोलापूरकर जोशी बर्वे पटवर्धन मेहेंदळे भानू लागू इत्यादि पेशवाईतील दरबारी व सरदारी लोकांचीं मूळ घराणीं याच टापूंतलीं आहेत. आपल्या अधिकारास न जुमानणाऱ्या प्रतिनिधीला आणि दमाजी गायकवाडाला पेशव्यानें त्यांचे सरंजाम खालसा न करितां सोडून दिलें आणि तुळाजीचा मात्र समूळ उच्छेद केला, यावरून पेशव्याच्या वर्तनाला जात्यभिमानाची कांहीं तरी प्रेरणा असावी असें अनुमान करणें अन्यायाचें होणार नाहीं. हा चित-

पावनांचा द्वेष तुळाजीच्या मृत्यूबरोबरच शांत झाला. पेशवाईत पुढे कोणी तुळाजीचा संप्रदाय चालवणारा सत्पुरुष उत्पन्न झाला नाहीं. हल्लींच्या काळांत मात्र कोणा देशी-विदेशी लोकांच्या अंगांत तुळाजीचा समंध संचरत असल्याचा केव्हां केव्हा भास होतो !

कोणत्या गुणांच्या अभावामुळें आम्हीं इंग्रजांसारख्या युरोपियन राष्ट्रास कुंठित करूं शकलो नाहीं, असल्या राष्ट्राने टक्कर दिली असतां ती सोसवण्याचे सामर्थ्य आमच्या राज्यांत कां राहिलें नव्हते, याची मीमांसा एवढा वेळ करण्यांत आली तिच्याच अंगत्वाने कारस्थानांच्या बाबतींत इंग्रजांस आम्हांवर कां यश मिळवितां आलें हे सांगणे ओघासच येतें. मुंबई व सुरत या बंदरांबाहेर इंग्रजांचा व्याप नव्हता, तेव्हांच शिवाजीने त्यांस तेथून कां घालवून दिलें नाहीं, हे आपले राज्य घेतील हे ओळखून हिंदी राजेरजवाड्यांनीं या परकी लोकांस प्रथमपासून कां जरबेत ठेवले नाहीं, इत्यादि प्रश्न उत्थापित करणारे लोक त्या वेळची वस्तुस्थिति लक्षांत घेत नाहींत त्या काळांतल्या लोकाची ज्ञानमर्यादा सामान्यतः किती आकुंचित होती याचा विचार केला म्हणजे व्यापाराकरितां आपल्या देशात आलेल्या त्या गोऱ्या लोकांचें खरे स्वरूप ध्यानांत न आल्याबद्दल कोणासहि दोष देता येत नाहीं. हे गोरे लोक व्यापारासाठीं वखार बांधायला जागा मागतात, रुमालानें हात बांधून नम्रतेनें उभे राहतात, पायांवर डोके ठेवतात, इतकेच त्या त्या हिंदी स्थानिक अंमलदाराच्या दृष्टीस पडले ते त्यानीं खरे मानले. या व्यापाऱ्यांना वखारीकरितां जागा दिली तर हे स्वतःकरिता आमच्या मुलुखाची भली मोठी वखार बनवून टाकतील, ज्या रुमालाने त्यांनीं स्वतःचे हात बांधले आहेत त्याच रुमालाने ते आमच्या मुसक्या आंवळतील, हे आज पायावर डोके ठेवतात पण उद्यां आमच्या डोक्यावर पाय ठेवतील, असल्या विचित्र कल्पना ते स्थानिक अंमलदार किती धूर्त असले तरी त्यांच्या मनांत कशा याव्या ?

व्यापाराचें निमित्त करून हेच इंग्रज युरोपखंडाच्या कोनाकोपऱ्यांत कोठेंहि पाय ठेवते, तर हे कोण, कशाकरितां आले, ही चौकशी तत्काल होऊन त्यांचें तेथून उच्चाटन झाले असतें ! पण हिंदुस्थानच्या समुद्रकिनाऱ्यावर इंग्रज वगैरे युरोपियन लोक किल्ले बांधून राहिले होते तरी शेंपन्नास वर्षे त्यांजकडे कोणी ढुंकून पाहिले नाहीं ! याचे कारण हिंदुस्थान हा अफाट देश, त्यांत अठरापगड जात, शिवाय त्यांतच मुसलमान पारशी ख्रिस्ती ज्यू इत्यादि परधर्मी लोकांची खिचडी झालेली, शिवाय या देशांत शेकडो राज्यें व हजारों संस्थाने ! अशा स्थितींत इंग्रज फ्रेंच वगैरे अनोळखी लोक येथें येऊन राहिले तर ते खरोखर व्यापाराकरितां आले आहेत कीं कशाकरितां आले आहेत याची चौकशी कोण करणार ? कोणाचे झालें तरी चालू व्यवहारावर लक्ष असणार, इंग्रज स्वतःस व्यापारी म्हणवतात तर त्याशीं व्यापारच करावा !

अधिक पंचाइत करण्याचे काय कारण ? त्यांनीं किल्ले बांधले म्हणून संशय घ्यावा तर कोणीहि लुंगासुंगा पाळेगार गढ्या टाणीं बळकावून धटाईच्या गोष्टी सांगतच असतो, त्यांतलेच हे ! असलेच विचार कोणाच्याहि झालें तरी मनांत येणार. त्यांतून इकडच्या राजेरजवाड्यांस या परकी लोकांशीं स्नेहभावानें वागणेंच अधिक फायदेशीर वाटत होतें. कारण, या परकी लोकांच्या व्यापारामुळें आपलें जकातीचें उत्पन्न वाढतें, लागेल तो परदेशी जिन्नस हे आणून देतात, आणि सर्वांत मुख्य गोष्ट ही कीं, हे उत्तम गोलंदाज व उत्तम लढवय्ये असून शिवाय स्नेहाखातर तोफा व दारूगोळा विकीत असल्यामुळे संकटाच्या वेळीं याचा मोठाच उपयोग होण्याजोगा होता !

सन १७३७ त मराठ्यांनीं पोर्तुगीज लोकांपासून साष्टी घेतली त्या दिवसापासून साष्टीवर मुंबईकर इंग्रजाचा डोळा होता. किल्लेदारास लांच देऊन अथवा अन्य कांहीं युक्तीनें निदान बळजबरीनेसुद्धां, साष्टी घ्यावयाचीच असे ठरवून योग्य संधीची प्रतीक्षा करीत ते बसले होते. मध्यंतरीं माधवराव व राघोबा यांच्या कलहापासून आपल्याला या बाबतींत कांहीं फायदा करून घेतां येईल असें त्यांस वाटत होतें, परंतु ती त्यांची आशा निष्फळ झाली. शेवटीं नारायणराव पेशव्याचा खून होऊन पेशवाईत तारांबळ उडालेली पहाताच मुंबईकर इंग्रजांनीं साष्टीस वेढा घालून तो किल्ला काबीज केला !

अडचणीच्या वेळीं मुंबईकर इंग्रजांनीं पेशव्यास गांठलें व आपला हेतु सिद्धीस नेला यापेक्षां पेशवाई भरभराटींत असतां अगर निदान माधवरावाच्या कारकीर्दीत जरी मराठ्यांचें व इंग्रजांचें युद्ध जुंपलें असतें, तरी ते मराठ्यांस अधिक श्रेयस्कर झालें असतें. पण तसें घडून आलें नाहीं हा इंग्रजांचा दैवयोगच समजला पाहिजे ! पानपतचें युद्ध जर झालें नसतें, तर पेशव्यांची स्वारी बहार व बंगाल याच प्रांतावर झाली असती. कारण, हिंदुस्थानांत त्या दोहोंखेरीज दुसरे प्रांत मोकळे राहिलेच नव्हते ! तसें झालें असतें तर ह्रासीच्या लढाईत क्लाइव्हनें मिळविलेलें यश व्यर्थ झालें असतें आणि पुढच्या दहा वर्षांत इंग्रजांनीं त्या प्रांतीं जो फैलावा केला तो त्यास करता आला नसता ! हैदरअल्ली जर उपटसुंभाप्रमाणें मध्येच नवीन शत्रु निर्माण झाला नसता, तर माधवरावाच्या स्वाऱ्या पूर्वीप्रमाणें अर्काट त्रिचनापल्ली वगैरे मुलखावर चालू राहिल्या असत्या आणि अर्थातच मद्रासकर इंग्रजांना गाशा गुंडाळण्याचा प्रसंग आला असता ! सन १७६५ त मुंबईकरांनीं मालवण घेतलें व बंगालच्या इंग्रजांनीं मल्हारराव होळकरावर छापा घालून त्याची नासाडी केली. त्या वेळीं इंग्रज–मराठ्यांचें युद्ध होण्याचा योग होता. परंतु मल्हारराव मृत्यु पावल्यामुळें तें प्रकरण तेवढ्यावरच थाबलें. सन १७६६ त मद्रासकर इंग्रजांनीं निजामअल्लीस सामील करून प्रथम हैदरावर व मागून पेशव्यांवर स्वारी करण्याचा बेत केला होता. परंतु माधवरावाच्या हुशारीमुळें तो त्यांचा बेत तडीस

गेला नाहीं. पुढें सन १७७२ त दुआबांत मराठ्यांच्या आणि इंग्रजांच्या चकमकी झाल्या. परंतु त्याच वेळीं माधवराव मृत्यु पावल्यामुळें ते युद्ध पुढे चालू राहण्याचें अर्थातच बंद पडलें; आणि अडचणीच्या भलत्याच वेळीं म्हणजे राघोबाचा पाठलाग करण्यांत पेशव्यांच्या फौजा गुंतल्या असतां, इंग्रजाशीं युद्ध सुरू करण्याचा प्रसंग त्यांस प्राप्त झाला ! तात्पर्य, या पहिल्या युद्धाची सुरुवात इंग्रजानीं आपल्या इच्छेप्रमाणें व सोईप्रमाणें केली; त्यात मराठ्यांची इच्छा अगर सोय कोणतीच नव्हती !

मराठ्यांशीं पहिले युद्ध सुरू झाल्यानंतरच्या वर्षसहामहिन्याच्या अवधींत इंग्रजांनीं जे लेख लिहिले आहेत, त्यांत मराठ्यांचे राज्य केवढें, त्यांची फौज किती छत्रपति पेशवे भोसले गायकवाड शिंदे होळकर यात तारतम्यानें कोणाचें महत्त्व किती, त्याचे परस्परसंबंध कोणते, त्यांचीं घरगुती भाडणे कशाबद्दलचीं, कोणास काय मिळालें असतां तो आपणास अनुकूल होण्याचा संभव आहे, इत्यादि तपशीलवार माहिती बहुधा बिनचूक लिहिलेली आढळते. पण याचें आश्चर्य मानण्याचें कांहीं कारण नाहीं ! कारण, यापूर्वी पुष्कळ दिवसांपासून या हिंदुस्थान देशाचें राज्य हप्त्याहप्त्यानें आमच्या पदरांत पडणार आहे, अशीं सुखस्वप्नें इंग्रजांस पडूं लागलीं होतीं ! त्यातल्या कर्त्या माणसांचे चिंतन याच विषयावर नेहमीं चाललेलें होतें. एक पुस्तक आम्हीं पाहिलेलें आहे. ते एका इंग्रजानें अठराव्या शतकात लिहिलेलें आहे. त्याचा विषय हिंदुस्थानचें राज्य कसें घ्यावें हाच आहे. अर्थात् या विषयावर त्या काळांत दुसरीं पुष्कळ पुस्तकें व निबन्ध टिपणें वगैरे लिहिलेलीं असतीलच. त्या वेळीं या देशात मिशनऱ्याचा फैलाव नव्हता. परंतु फिरस्ते व व्यापारी इंग्रज शेकडो होते. ते प्रत्येक प्रांतात फिरत. त्यांनीं लिहून ठेवलेल्या प्रवासवर्णनांत शहरे किल्ले मार्ग लोकरिवाज स्थानिक राजकारणें सर्व काहीं बारीकसारीक माहिती आस्थेनें लिहून ठेवलेली असे व ती कंपनी सरकारच्या उपयोगीं पडे. कांहीं तरी निमित्त काढून लष्करी अम्मलदार प्रवास करीत तेव्हां मिलिटरी खात्याच्या उपयोगाची माहिती गोळा करीत व मोठमोठ्या देशी राजाच्या दरबारांतून जे इंग्रज वकील होते, ते राजकारणाची सर्व माहिती मुख्याधिकाऱ्याकडे लिहून पाठवीत. इंग्रज लोक शोधकबुद्धीचे आहेत व विद्यार्जनाचा त्यांचा हव्यास दांडगा आहे. वेद शास्त्रे स्मृति पुराणें वगैरे ग्रंथांची सर्व माहिती त्यांनीं हिंदुस्थानचें अधिराज्य मिळविण्याआधींच गोळा केली होती ! पेशवाईच्या अखेरपर्यंत सर्व बाजूंचें ज्ञान संपादन करण्याचा त्यांचा उद्योग एकसारखा सुरू होता. सन १८०३ सालीं नॉक्स या नांवाचा इंग्रज म्हैसुराहून पुण्यास जात असता मिरजेस थोडा वेळ मुक्काम करून राहिला होता. पण तितक्याहि धांदलींत त्यानें मिरजेच्या जहागीरदारास पत्र लिहिलें कीं " तुम्हांस जहागीर कधीं कोणीं दिली, तिचे उत्पन्न किती, तुमच्या घराण्यांतल्या लोकांनीं पेशवे सरकारच्या

कोणकोणत्या कामगिऱ्या केल्या. या सर्व गोष्टींची मेहेरबानीनें तवारीख लिहून मला द्याल तर मी आभारी होईन !

अशा तरतरीत चौकस स्वभावाच्या इंग्रज लोकांशीं लढण्याची मराठ्यांवर पाळी आली; पण त्यांस या इंग्रज लोकांविषयीं कांहींच माहिती नव्हती ! या लोकांचा मूळ देश कोण, हे येथें कशाकरितां आले, यांची पहिली वसाहत कोठची, मागून कोणकोणत्या बंदरांत त्यांनीं वसाहती केल्या, यांचा स्वभाव गुणदोष कोणचे, यांची राज्यवस्था व सैन्यव्यवस्था कशी, यांचें सैन्यबल व द्रव्यबल किती, इत्यादि मुद्यांची माहिती मराठी मुत्सद्यांनीं व सरदारांनीं अवश्य मिळवावयास पाहिजे होती; परंतु आमच्या आळसामुळें व हलगर्जीपणामुळें आमच्या राजकारणाचें हें अंग नेहमीं लुलें पडे एकट्या नानानें मात्र इंग्रजांविषयीं कांहीं सटरफटर माहिती गोळा केली होती व तो बातमी फार चांगली राखीत होता असें त्याच्या लेखांवरून दिसतें. एरवीं पहावें तो चोहोंकडे गाढ निद्राच लागलेली होती ! हें इंग्रज लोक किती आहेत व कोठून येतात हें ठाऊक नसल्यामुळे त्यांची दहशत मराठ्यांच्या मनावर उगीचच्या उगीच बसली होती ! इंग्रजांशीं लढाई सुरू असतां बातम्या येऊं लागल्या कीं, इंग्रज मुंबईकडून आले, त्यांचा गुजराथेंत धुमाकूळ सुरू आहे, कांहीं मद्रासेकडून जलमार्गानें येत आहेत, कांहीं हैदराशीं लढत आहेत, कांहीं यमुना उतरून काल्पी-वर चालून येत आहेत ! अशा चोहोंकडच्या बातम्यांनीं भांबावून गेलेला एक सर-दार त्रासून लिहितो कीं, " हे शिंदळीचे इंग्रज आहेत तरी किती ! जेथें तेथे तेच उद्भवतात हें काय आहे न कळे ! ! " अशा बिकट परिस्थितींत सुद्धां नानानें इंग्र-जांच्या कारस्थानावर ताण करून त्यांस हातटेकीस आणलें: तह करण्याविषयीं त्यांनीं मराठ्यांचीं आर्जवें करूं लागावें अशी स्थिति उत्पन्न केली, याबद्दल त्याची वाहवा होत असते ती योग्यच आहे. सालबाईच्या तहांत इंग्रजांस साष्टीचा टापू मिळाला हा कांहीं त्यांनीं पांचसात वर्षें मोठे नुकसान सोसून चालविलेल्या युद्धाचा योग्य मोबदला नव्हे !

सालबाईच्या तहानंतर पेशवाईच्या अखेरपर्यंत इंग्रज व मराठे यांचे राजकारणाचे सामने पुष्कळ वेळां झाले, व लढायाहि पुष्कळ झाल्या. त्यांत जे वैगुण्य मराठ्यांस नेहमीं जाचत असें तें हेंच कीं, त्यांस इंग्रजांची कांहींएक बातमी कळत नसे ! घरभेदे हे केव्हांहि कोठेंहि झालें तरी असायचेच; पण पेशवाईत त्यांचा सुळसुळाट फारच झाला होता ! मराठी फौजांचे बेत व हालचाली इंग्रजांस नेमक्या कळाव्या व त्यांची बातमी मात्र यांस कांहीच कळूं नये, असें नेहमीं होत असे ! इंग्रजांच्या जातीचा एकहि घरभेद्या मराठ्यांस कधीं भेटूं नये हें केवढें आश्चर्य आहे.

इंग्रजांची राहणी व भाषा निराळी. त्यांचे रिवाज व शिस्त निराळी. ते कारणा-शिवाय आम्हांशीं बोलतसुद्धां नाहींत. मग आम्हांशीं मिळूनमिसळून वागायचें दूरच राहिलें ! त्यांच्या अंगीं जात्याभिमानाचा ताठा असल्यामुळें हिंदी लोकांशीं

फटकून वागणेंच त्यांना आवडते. त्यामुळें त्यांचे बेत बातम्या सर्व कांहीं त्यांचें त्यांच्यांत राहते; बाहेर फुटत नाहीं. त्यांची कोणतीहि बातमी मराठयास न कळण्याचें मुख्य कारण हेंच होय. पण याबरोबरच त्यांच्यासंबंधाच्या खोट्या बातम्या पसरण्यास हा इंग्रजांचा एकलकोंडेपणा कारण होतो हेंहि ध्यानांत ठेवलें पाहिजे! शिंदे व भोसले यांचा पराजय झाला तरी यशवंतराव होळकराच्या पराक्रमावर मराठयांचा फार विश्वास होता. त्यामुळे होळकराचें व इंग्रजांचें युद्ध जुंपलें तेव्हां होळकराची जागोजाग फत्ते झाल्याच्या बातम्या पुण्याच्या बाजारात नेहमीं पसरत होत्या! या बातम्यांत अतिशयोक्ति व विसंगतपणा फार असे व उत्तरहिंदुस्थानातून पत्रें येत त्यात त्या लिहिलेल्या असत. खुद्द पुण्यातल्या पुण्यांत ज्या बातम्या उठत त्यांतल्याहि कांहीं कांहीं फारच विचित्र असत! उदाहरणार्थ, पुढील मासला पहाः- " होळकराने गोरे लोक धरले, त्यांपैकीं तीनशे लोक नाके कापून सोडून दिले. त्यांतले दोनशे येथे पुण्यास आले. तेव्हां येथल्या इंग्रजानीं त्यांस विलायतेस रवाना करण्याकरितां मुंबईस पाठविले. हे नकटे विलायतेस जातील तर आपली इजत जाईल व आपणास शिक्षा होईल या भयाने मुंबईवाल्यांनीं त्या लोकांस गलबतांत घालून समुद्रांत नेऊन बुडविलें!!!

असल्या बातम्यांवर विचारी माणसांचा विश्वास बसणें दुर्घट होते. पण सामान्य लोकांस मात्र त्या खऱ्या भासत असल्या पाहिजेत असे वाटते. होळकराच्या लढाईंत इंग्रज फार जेर झाले असून संकटांत पडले आहेत अशी बातमी पटवर्धनाचा वकील पुण्यास होता तो त्यास नेहमीं लिहून पाठवी. एका पत्रांत " डाकेबरोबर सावकारी वर्तमान आले. अश्वदल ( होळकर ) याची प्रबलता जलचर ( इंग्रज ) पेचांत आहे. ऐसे लिहिले आहे. शिंदे याचीं पत्रे छ ९ साबानचीं आलीं त्यात वर्तमान लिहिले आहे त्यात अतिबलवत्ता अश्वदळाची लिहिली आहे. लील (Lord lake) साहेबाचीं पलटणे बुडविलीं; दहावारा पलटणें घेऊन यमुनापार लखनौकडे जात होता. त्यासभोंवतीं घेरा पडला, असे लिहिले आहे. " इतकें लिहून सदरहू वकील इंग्रजाच्या घरीं शोध घेऊन तेथील बातमी प्रत्यंतरादाखल लिहितो ती अशीः--' छ. १६ रमजानीं इंग्रजांकडील डांक आली. जेवावयाला जात होते. इतकियांत डाक येऊन दाखल जाहली. सबब तीनचार असामी खुरशीवर बसोन डाकेचे तीन फर्द पाहिलेवर डोईची टोपी काढून भूमीवर आपटली. नेत्राश्रु पतन करूं लागले. चौकीदार वगैरे होते त्यांस दूर दूर उभे केले. सारेजण जमा होऊन खुरशांवर बसोन कौशल होऊन नंतर एक इंग्रजानें एक अधिकारियास हातीं धरून उठविले." वकिलानें कोणा बुटलेरास शेपन्नास रुपये देऊन इंग्रजाच्या घरची म्हणून विकत घेतलेली ही बातमी आपल्या धन्यास लिहून कळविली. तिने त्या धन्याचें कितपत समाधान झाले असेल हे जाणणे आम्हीं वाचकांवरच सोपवितो.

आमचा पुणें--सातारा इंग्रजांनीं कां घेतला आणि त्यांचा मद्रास--कलकत्ता

आम्ही कां घेऊं शकलों नाहीं, याचा संक्षेपाने येथपर्यंत विचार केला. देशाभिमान-शून्यता, समूहरूपाने कार्य करण्याची नालायखी, स्वार्थसाधनाची बेसुमार हांव, आळस, हेळसांड दुसऱ्याच्या ओंजळीने पाणी पिण्याची संवय, इत्यादि दुर्गुण आमच्या समाजाच्या अंगीं जे खिळले आहेत तेच आमच्या राज्यनाशाला कारण झाले आहेत. असल्या दुर्गुणांनीं खिळखिळे झालेलें कोणतेहि पौरस्त्य राष्ट्र सुधारलेल्या पाश्चात्त्य राष्ट्राशीं विरोध प्राप्त झाला असतां टिकाव धरूं शकत नाहीं. हिंदुस्थान जर इंग्रजांनीं घेतलें नसतें तर फ्रेंचांनीं घेतलेच असते. प्रवाहांत पडलेलीं भांडीं एकमेकांवर आदळलीं असतां त्यांतले कोणते फुटावयाचें, मातीचे कीं,लोखंडाचें, हे ठरलेलेच आहे ! हल्लींचा काळ असा आला आहे कीं, आम्हीं पाश्चात्त्याची बरोबरी तरी करावी, नाहीं तर त्यांचे मजूर तरी होऊन रहावें ! राज-कारण, उद्योगधंदे, कलाकौशल्य, भौतिक शास्त्रांचा उपयोग, प्रत्येक गोष्टींत हीच स्थिति आहे जर आम्हांस पाश्चात्त्यांची बरोबरी करण्याची हिंमत असेल तर या लेखांत वर्णिलेले आमचे दुर्गण आम्हीं टाकले पाहिजेत. पूर्वी स्वराज्य होतें तें याच दुर्गुणांमुळे गेले हे समजून जर आम्ही सावध झालो नाहीं, तर नवीन स्वराज्य मिळून सुद्धां व्यर्थच आहे, हाच इतिहासडिंडिमाचा घोष प्रत्येकाच्या कानीं घुमत राहिला पाहिजे !

मिरज,<br>
ता. ८।३।१९१८.

वासुदेव वामन खरे.

# अनुक्रमणिका

## मराठे व इंग्रज

### पूर्वार्ध

#### इतिहास

**प्रकरण पहिलें:—इंग्रजांपूर्वीचें महाराष्ट्र—** ( १–८ ) मराठे व इग्रज यांची पहिली भेट झाल्या वेळी त्याची परस्परांविषयीची वृत्ति–इग्रज व हिंदुस्थान यांचा सबंध आला हे आश्चर्यातलें आश्चर्य–सतराव्या शतकाच्या प्रारभीं उदयोन्मुख झालेल्या दोन सत्ता–तत्कालीन हिंदुस्थानची स्थिति–दिग्विजयानें अतर्व्यवस्थेत जेत्याचा हात शिरत नसे–मुसलमानी विजयाचे सामान्य स्वरूप–त्यानें हिंदु अधिकार भ्रष्ट झाले नाहींत–उत्तर व दक्षिण हिंदुस्थानांतील मुसलमानी सत्तेतील भेद–दक्षिणेतील मुसलमानी अम्मल मराठ्यांना जाचक न वाटण्याची कारणे ( ५ )–मुसलमानांनीं मराठ्यांना पूर्णपणे कधींच जिंकलें नव्हते ( ६ )–महाराष्ट्राची भू–रचना स्वातत्र्यबुद्धीस अनुकूल ( ७ ) इग्रजांना मराठी सत्तेशीं लढावे लागले; मुसलमानांशीं नव्हे ( ७ )–मोंगलांच्या दक्षिणेतील स्वाऱ्यांमुळे मराठे स्वातत्र्याची इच्छा करू लागले ( ८ ).

**प्रकरण दुसरें —इंग्रज हिंदुस्थानांत कां व कसे आले ?** ( ८–१७ ) हिंदुस्थान व यूरोप यामधील प्राचीन काळचा व्यापारी संबध ( ९ )–या व्यापारी दळणवळणाचे मार्ग ( १० )–हिंदुस्थानांत खिस्ती धर्माचा प्रसार ( १० )–हिंदुस्थानांतील पोर्तुगीज रियासत ( ११ )–डच रियासत ( १२ )–१६०२ पूर्वी हिंदुस्थानांत आलेले इग्रज ( १३ )–इलिझाबेथचे अकबरास पत्र ( १४ )–हॉकिन्स हिपॉन कीलिंग डाउटन रो कीलिंग व केरीज यांनीं केलेल्या उलाढाली ( १५ )–हिंदुस्थानाशीं चालणाऱ्या व्यापारापासून युरोपियन व्यापाऱ्यांना मिळणारा जबर फायदा ( १६ )–रोचा रिपोर्ट ( १७ )

**प्रकरण तिसरें:—मराठे व इंग्रज–पूर्वरंग** ( १८–८० ) मराठे मोंगल व इंग्रज यांचे सबंध ( १८ )–शिवचरित्राचे पर्यालोचन ( १९ )–शिवाजी व इंग्रज यांचा राजापूर सुरत कारवार व हुबळी येथे आलेला संबध ( २०–२२ ) –१६७४ चा तह ( २३ )–शिवाजी इग्रज व शिद्दी यांचे संबंध ( २४ )–शिवाजी व इंग्रज यांच्या सबंधाविषयीं 'मराठी रियासती' मधील उतारे

( २५–२९ )–खांदेरीउदेरीप्रकरण ( २९–३० )–संभाजी व इंग्रज ( ३१ ) –सावतवाडीकर देसाई व इंग्रज ( ३२ )–आंग्रे व इंग्रज ( ३३ )–पहिला बाजीराव हबशी व इंग्रज ( ३३ )–आंग्रे नानासाहेब व इंग्रज ( ३४ )–पोर्तुगीज मराठे व इंग्रज ( ३४ )-पिटोचें मुंबईच्या गव्हर्नरास पत्र ( ३५ )–मराठ्यांनी वसई घेतल्यामुळे पोर्तुगीज व इंग्रज यावर झालेला परिणाम ( ३६ )–शाहूच्या दरबारांत पेशव्यांचे शत्रु कोण याची टेहळणी करण्यासाठी इंग्रज वकील पाठवितात ( ३७ ) गॉर्डन शाहूची भेट घेतो ( ३७ )–१७३९ मध्ये मराठ्यांविषयीं इंग्रजाचे अभिप्राय (३८–३९)–चिमाजीकडे इंचबर्डची वकिली ( ३९ ) इंग्रज व पेशवे मिळून आंग्र्याचा पराभव करतात ( ४१ )–मराठे व इंग्रज यांचा तह ( ४१ )–नानासाहेब व मुंबईकर यांमधील पत्रव्यवहार व स्पेन्सरचा रिपोर्ट ( ४२ ) –वुइल्यम प्राइझ यास १७५९ साली मुंबई कौन्सिलने दिलेली समजूत ( ४३ )–प्राइझ व नानासाहेब यांची भेट ( ४४ )–मॉस्टिन यास माधवरावाकडे पाठविल्या वेळीं दिलेली समजूत ( ४५ )–मॉस्टिन माधवरावास भेटतो ( ४६ )–मॉस्टिनचें मुंबईस पत्र ( ४७ ) मॉस्टिन नाना फडणविसाची गांठ घेतो ( ४७ )–मॉस्टिन व ब्रोम यांचें माधवराव व राघोबा यांशीं बोलणे ( ४८–४९ )–माधवराव व मॉस्टिन यांच्या दरम्यान ठरलेली कलमें ( ५० )–इंग्रजांचा वकील पुण्यास राहू दिल्यामुळे झालेले परिणाम ( ५१ )–दादासाहेब पेशव्यांच्या शत्रूकडे मदत मागतात ( ५२ )–इंग्रज साक्षी घेतात ( ५३ )–इंग्रज राघोबाशी तह करतात ( ५४ )–मुंबईकर व कलकत्तेकर इंग्रज यांमधील मतभेद ( ५४ )–मुंबईकरांचा खलिता ( ५५ ) राघोबाचा पक्ष उचलण्यापासून इंग्रजांचा होणारा फायदा ( ५६ )–राघोबाच्या नादानीची मीमांसा ( ५७ )–राघोबाची महत्त्वाकांक्षा ( ५७ )–माधवराव व राघोबा ( ५८ )–राघोबा व नारायणराव ( ५९ ) राघोबा व बारभाई ( ६० )–राघोबा व महादजी ( ६० )–राघोबाचा पळ ( ६१ )–इंग्रजाशी तह करतो (६२)–कलकत्तेकर व मुंबईकर इंग्रज यांमधील मतभेद ( ६३ )–राघोबाची बिकट स्थिति ( ६४ )–इंग्रज राघोबाचा पक्ष सोडतात ( ६५ )–इंग्रजी मुलखातून निघून जाण्याबद्दल राघोबास तगादा ( ६६ )–पुरंदरचा तह ( ६७ )–राघोबाचें इंग्लंडच्या राजास पत्र ( ६७ )–मराठे व फ्रेंच याच्यामध्ये तह झाल्याच्या अफवा ( ६८ )- पुण्याच्या कारभाऱ्यांत दुही माजलेली पाहून इंग्रज पुनः राघोबाचा पक्ष उचलतात ( ६९)–कर्नल एगर्टनची मुंबईहून ससैन्य रवानगी ( ७० )–एगर्टनच्या हालचाली व इंग्रजांचा पराभव ( ७१ )–वडगांवचा तह (७२)–राघोबा शिंद्याच्या स्वाधीन होऊन त्याची झांशीकडे रवानगी करण्यांत येते ( ७३ )–सवाई माधवरावाचें विलायतच्या बादशहास पत्र ( ७४–८० ).

**प्रकरण चवथें:–मराठे व इंग्रज–उत्तररंग–( ८१–११८ ) गाडर्डे**

पुण्यावर चालून येतो व पराभूत होतो (८१)–राघोबा शिंद्याच्या कैदेतून निसटतो ( ८२ )–हैदरअल्लीने उचल खाल्लयामुळे इंग्रज मराठयांशीं सालबाईचा तह करतात ( ८३ ) राघोबा कारभाऱ्याच्या स्वाधीन होतो ( ८४ )–इंग्रजांचा वकील मॅलेट पुण्यास येतो ( ८५ )–मराठ्यांची टिपूवरील मोहीम ( ८५ )—टिपूवरील दुसरी स्वारी ( ८६ )–टिपूवरील तिसरी स्वारी (८७)–महादजीच्या मागे नानाची स्थिति ( ८८ )–नाना बाजीरावास गादीवर येऊं न देण्याची खटपट करतो; पण मग आपणच त्या गोष्टीस कबूल होतो ( ८९ )–चिमाजी आप्पाचे दत्तविधान ( ९० )–शिंद्याच्या गोटांत नानास कैद ( ९१ )–नाना शिंदे बाजीराव व इंग्रज यांची कारस्थाने ( ९२ ) नानाचा मृत्यु ( ९२ )—शिंदे व बाजीराव यामध्ये युद्ध ( ९३ ) इंग्रजी सैन्य ठेवून घेण्यास बाजीराव संमति देतो ( ९४ )–कर्नल क्लोजची मध्यस्थी ( ९४ )–वसईचा तह ( ९५ )–बाजीरावाची पुण्यास स्थापना ( ९६ )–आसई व लासवारी ( ९६ )–१८०३ मधील व्हाइसरायाने केलेले पेशवाईचे परीक्षण ( ९७ )–शिंदेशाहीचे परीक्षण ( ९८ )–इंग्रजांचे होळकराशीं युद्ध व तह ( ९९ )–बेकार शिपायाची स्थिति व पेंढाऱ्याची वाढ ( १०० )–बाजीरावाचा मूर्खपणाचा कारभार ( १०१ )—त्र्यंबकजी डेंगळ्याचा स्वभाव ( १०३ ) गंगाधरशास्त्र्याचा खून ( १०४ )—या खुनाच्या प्रकारणाची दुसरी बाजू ( १०५ )–बापू मैराळाने लिहिलेली खुनाची हकीकत ( १०६ ) त्र्यंबकजी इंग्रजाच्या कैदेत पडतो व तेथून निसटतो ( १०७ )–पेशव्याकडे अल्पिष्टनाचा त्र्यंबकजीस धरण्याबद्दल तगादा ( १०७ )–बाजीराव व इंग्रज यामध्ये नवा तह (१०८)–बाजीराव छत्रपति व सरदार यांना समतांत घेण्याची खटपट करतो ( १०९ )–इंग्रजांच्या सैन्यांत फितूर करण्याचा प्रयत्न ( ११० ) बाजीराव व अल्पिष्टन यात बिघाड होऊन खडकीची लढाई होते ( १११ )–स्मिथ पुण्यास येतो व पुण्यास इंग्रजी निशाण फडकू लागते (११२)–बाजीरावाच्या मागे पुण्याची स्थिति (११३)–स्मिथ बाजीरावाचा पाठलाग करतो ( ११५ )- अष्टीची लढाई ( ११६ )—बाजीराव मालकमच्या स्वाधीन होतो. ( ११७ ) बाजीरावाचा ब्रह्मवर्तांतील आयुष्यक्रम ( ११८ ).

**प्रकरण पांचवें:—मराठा राजमंडळ व इंग्रज**—( ११९–१५० ) सातारकर भोसले व इंग्रज (११९)–कोल्हापूरकर भोसले व इंग्रज (१२२)—नागपूरकर भोसले व इंग्रज ( १२४) सावतवाडीकर भोसले व इंग्रज (१३४)–शिंदे व इंग्रज ( १३७ )–होळकर व इंग्रज ( १४० )–गायकवाड व इंग्रज ( १४२ )–आंग्रे व इंग्रज ( १४६ )—पटवर्धन व इंग्रज ( १५० ).

# उत्तरार्ध

## विवेचन

**प्रकरण पहिलें—मराठे व इंग्रज यांचा समकालीन उत्कर्षापकर्ष**–( १–७ )–मराठे व इग्रज यांच्यासबधाच्या कालावधीचे चार विभाग ( १ )–या विभागांची सामान्य रूपरेखा ( १ )–इग्रजी सत्तेची एकसारखी चढती कमान ( २ )–मराठे व इग्रज यांच्या सत्तेचे शिवाजीच्या राज्यारोहणापर्यंत अन्योन्यसापेक्ष पर्यालोचन ( ३ )–राजारामाच्या मृत्यूपर्यंत ( ४ )–पानिपतपर्यंत ( ५ )–पेशवाईअखेर ( ६ ).

**प्रकरण दुसरेंः—मराठेशाही कशानें बुडाली ?** ( ८—४२ )—ब्राह्मणांची जबाबदारी ( ८ )–मराठ्यांची जबाबदारी ( ९ )–मराठ्यांचे व्यापारी धोरण चुकले होते काय ? ( १० )–इग्रजांची मदत घेण्यांत मराठ्यांनी चूक केली काय ? ( १२ )–प्राणसकटाच्या वेळीं सर्वजण परक्याची मदत घेतात ( १२ )–नानासाहेबाची चूक (१३)–ही चूक मराठ्यांनीं सरसकट केली आहे ( १४ )–इंग्रजांची व तत्कालिन राजेरजवाड्यांची परिस्थिति ( १५ )—दुसऱ्याची मदत घेणे केव्हां बाधक होते आणि केव्हां नाहीं ( १६ )–नाशाची खरीं कारणे ( १७ )–सवत्या सुभ्याची आवड व राष्ट्राभिमानाचा अभाव ( १७ )–हिंदुस्थानच्या साम्राज्यपटावर बुद्धिबळाचा डाव ( १९ )–इग्रजांचे धोरण कळत असून देखील मराठ्यांना आडवितां आले नाहीं ( २० )–इग्रजांकडे दोष नसून मराठ्यांचा राग येतो ( २० )–इग्रजाना फार अडचणी होत्या ( २० )–आपसांतल्या भांडणांत मराठ्यांनीं इग्रजांना बोलावून त्यांचा फायदा करून दिला ( २१ )–मराठ्यांच्या आपसांतील फुटीमुळे इग्रजांना राज्य मिळालें ( २२ ) मध्यवर्ती सत्तेचा अभाव (२३)–सरंजामी पद्धतीची उपपत्ति ( २३ )–मराठेशाही फेडरेशन नव्हती, कॉनफिडरेसि होती ( २४ )–मध्यवर्ती सत्ता कमजोर झाल्यामुळे मराठी राज्य बुडाले ( २५ )–इंग्रजांनीं राज्य कसे मिळविले ( २६ )–प्रो. सिली यांच्या म्हणण्याचा खरा अर्थ ( २७ )–इंग्रजांनीं मराठ्यांचे राज्य तरवारीच्या जोरावर घेतले ( २८ )–इतर साधनांनींहि कांहीं मुलुख मिळविला ( २९ )–सातारची गादी खालसा करण्यांत झालेला अन्याय ( २९ )–पेशव्यांनीं सातारकर महाराजांना कैदेंत ठेवले नव्हते. ( ३० )–महाराज ' स्वतंत्र राजे ' होते ' पदरचे संस्थानिक ' नव्हते (३३)–राजाचे अधिकार प्रधानानें मर्यादित केले तरी तो पदभ्रष्ट होत नाहीं ( ३४ )–इंग्रज व सातारकर यांचा तह स्नेहाचा होता ( ३४ ) सातारचें राज्य इग्रजसरकारनें खालसा केले ही गोष्ट बेसुमारच झाली ( ३५ )–जातिभेद व राज्यनाश ( ३६ ) जातिभेद असला तरी तो पुरातन होता ( ३६ )–पेशव्यांच्या

वेळीं राजकारणांत जातिनिष्ठ आवडनिवड दाखविली गेली नाहीं (३६)—वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या जातीच्या लोकांची भरती साहजिक होते (३७)—मराठेशाहींतील कलह जातीच्या किंवा पोटजातीच्या अभिमानानें उत्पन्न झाले नव्हते (३८)—हिंदुस्थानांत परकीयांचा प्रवेश हिंदु लोकांच्या आपसांतील दुहीमुळे झाला आहे (३९)—शिवाजी धीट धाडसी व बुद्धिमान् असून महाराष्ट्रभक्त होता म्हणून त्याला यश आलें (४०)—महाराष्ट्रांतील लोकांना व्यक्तिनिष्ठ स्वार्थ विसरण्यास लावण्यास अलौकिक विभूति निपजावी लागते (४१)—तात्त्विक न्यायबुद्धि व व्यवहार अशा दोन दृष्टींनी जातिभेदाचा विचार केला पाहिजे (४२).

**प्रकरण तिसरें—मराठेशाहीची राजव्यवस्था** (४३–९९)—अलीकडे महाराष्ट्राच्या इतिहासाची बरीच सामग्री प्रकाशित झाली आहे (४३)—न्या. रानड्यानीं केलेली मराठ्यांच्या सत्तेची मीमांसा (४४)— इतर जातींपेक्षां मराठ्यांचा विशेष गुण (४४) मराठ्याची लष्करी व्यवस्था (४५)—सरदारांची फौज व जहागीर यांचा तपशील (४६) मराठी फौजेत पायदळापेक्षा घोडदळाचा भरणा अधिक होता (४७) युरोपियनांशी संबंध आल्यापासून तोफखान्याकडे मराठ्यांना लक्ष द्यावे लागले (४८)—महाराष्ट्रांत लष्करी शिक्षणाच्या शाळा व कवाइती शिस्त नव्हती (४९)—पायदळांत मराठ्यांपेक्षा इतर जातींचाच भरणा अधिक होण्याची कारणे व परिणाम (५०)—कवायती पायदळ व तोफखाना यांचा भाऊसाहेब व महादजी यांनीं केलेला उपयोग (५२)—मराठे इंग्रजांपासून बंदुका विकत घेत (५३)—मराठ्याची शस्त्रे (५४)—मराठी लष्कराचा मुक्काम व त्याची हालचाल (५४)—कवायती फौजेमुळे युरोपियन अधिकाऱ्यांचें प्रस्थ वाढलें (५५)—दुसऱ्या बाजीरावाच्या वेळीं मराठ्यांच्या एकंदर फौजेचा अंदाज (५६)—हिंदुस्थानांत गोऱ्या गारद्यांचा सुळसुळाट (५६)—डिबॉइनचा इतिहास (५७)— पॅरन ब्रिगेट गार्डनर वगैरे गोरे अधिकारी (५९)—गनीमी कावा सोडून कवाइती पद्धति स्वीकारण्यांत मराठ्यांनी चूक केली काय ? (६०)—मराठ्यांचें आरमार (६१)—कोंकणांतील अधिकारी देशांतील अधिकाऱ्यांपेक्षां अधिक स्वतंत्र असत (६१)—कोंकणांतलि दर्यावर्दी संस्थानिक (६२)—शिवाजीचे आरमार (६२)—शिवाजी व इंग्रजादि युरोपियनांच्या आरमारी लढाया (६३)—कान्होजी आंग्र्याचे आरमार (६४)—आंग्रे घराण्यांत गृहकलहाचा प्रवेश (६७)—इंग्लिश आरमार व धुळपाचे आरमार यांमधील लढाई (६९)—मराठी आरमाराची व्यवस्था (७०)—मराठ्यांची मुलकी व्यवस्था (७०)—मराठ्यांचा राज्यविस्तार (७२)—शिवकालीन (७२)—सुभे दक्षण व हिंदुस्थानचा झाडा (७३)—पातशाही दौलतीचा तपशील (७४)—इंग्रजांचें उत्पन्न

(७५)–मराठ्याच्या दौलतीची सांपत्तिक स्थिति (७६)–दप्तर (७९)–सनदा (८०)–किल्ले (८१)–जमनिबाव (८२)–गांवकामगार (८३)–लोकसरक्षण (८४)–तुरुग (८४)–न्यायखाते (८५)–कर व जकाती (८६)–व्यापार व वसाहत (८७)–सरकारी कर्ज (८८)–टांकसाळ व नाणीं (८९)–अबकारी (९१)–वेठ गुलामगिरी (९२)–प्रवास व टपाल (९२)–पदव्या (९४)–विद्यावृद्धि व सुधारणा (९५)–इंग्रज व मराठे यांची तुलना (९६)–मराठ्यांचे परावलंबन (९७)–शिक्षणपद्धति (९७)–मराठेशाहीत शिक्षणाची जबाबदारी ब्राह्मणांवर होती (९९).

**प्रकरण चवथें–मराठ्यांचें पातशाही धोरण** (१००–१२९)–मराठ्याचें धोरण (१०१)–मराठ्यांचे पातशाही धोरण म्हणजे काय? (१०१)–मराठ्यांना हिंदुपदपातशाहीचा हक्क होता (१०२)–मराठ्यांचे दिल्लीच्या पातशाहीसंबधाचे धोरण (१०२) एतद्विषयक अडचणी (१०३)–खानदानी घराण्यांतील मराठ्यांना पेशव्याविषयीं हेवा वाटत होता (१०४)–सरदाराची अवश्यकता (१०४)–सरदारांचे महत्त्व व मराठा संघ (१०५)–दिल्लीची सत्ता हातीं घेण्यास मराठ्यानी योजिलेली युक्ति (१०६)–हक्कांतून हक्काच्या सहाय्याने हक्क मिळविणे (१०७)–इंग्रजांनीं देखील हाच उपाय योजिला (१०८) चौथाईच्या हक्काची हकीकत (१०८)–शिवाजीच्या वेळची स्थिति (१०९)–पातशाही सनदा मिळविण्याचा शिवाजीचा प्रयत्न (११०)–शाहूनें मिळविलेली पातशाही सनद (१११)–चौथाईच्या हक्काच्या संरक्षणार्थ मराठ्यांना करावी लागलेलीं युद्धें (११२)–नादिरशहाविरुद्ध पातशहा बाजीरावाकडे मदत मागतो (११३)–नानासाहेब माळव्याची सनद मिळवितो (११४)–मराठे लाहोरपर्यंत जातात (११५)–दिल्लीतील दोन पक्ष (११६)–मराठ्यांना पानपतानंतर दिल्लीकडची बोलावणी पुनः आली (११७)–शहाअलम इंग्रजाना सोडून मराठ्यांच्या साहाय्याने दिल्लीस आला (११७)–महादजीने पेशवाईत वजन संपादन केले (११८)–सालबाईच्या तहानंतर तो फिरून दिल्लीकडे गेला (११८)–महादजी व इंग्रज यांचा संबध (११९)–वकीलमुतलक म्हणजे काय? (१२०)–पातशाही सत्तेच्या पांघरुणाखालीं खरी कार्यकारी सत्ता हातीं घेण्याचा उपक्रम शिवाजीने केला होता तो महादजीने शेवटास नेला (१२१)–दिल्लीच्या स्थितीसंबधानें जुन्या पत्रांतील उतारे (१२२) पातशहाने इंग्रजांस दिलेल्या सनदेचा दाखला (१२२) ब्रौन व पाटीलबुवा (१२३)–पाटीलबुवाच्या हातून दिल्लीचा कारभार झेंपत नाहीं (१२४)-पाटीलबुवाचे गुणदोष (१२५)–डिबॉइन (१२६)–नजिबखान इंग्रज व मराठे (१२७)–पातशहा पेशव्यांच्या कारभारावर खूष आहे (१२८)–मराठे म्हैसुरास देखील चौथाईचा हक्क

सांगतात ( १२९ ).

**प्रकरण पांचवें:—उपसंहार** ( १३१--१४६ ) इंग्रजांच्या अडचणी ( १३१ ) व्यापाराप्रमाणे राज्यस्थापनेकडे इंग्रजांचे पूर्वीपासून लक्ष होतें ( १३२ )—इंग्रजांचे पाऊल सहसा मागें म्हणून कधीं आलें नाही ( १३२ ) -अठराव्या शतकाअखेर इंग्रज मराठ्यांना भारी झाले होते. ( १३३ )— इंग्रजांचे सुदैव ( १३४ )—इंग्रजांचे सद्गुण व दोष ( १३४ )-मराठ्यांचा बेशिस्तपणा व स्वाभिमानशून्यता ( १३६ )—मराठेशाहीच्या वेळेशी आजच्या स्थितीची तुलना ( १३७ )—अंगावर पडलें म्हणजे कर्तेपण येतें ( १३८ ) —सध्याच्या मराठी संस्थानिकांची स्थिति ( १४० )—स्वराज्य जाऊन शंभर वर्षे झाली तरी त्याची स्मृति कायम आहे ( १४१ )—गतकालची आठवण काढण्याचा हेतु ( १४२ )—जुन्या काळाकडे पाहण्याच्या दोन दृष्टि ( १४३ ) —राजवाड्यांचे उद्गार ( १४३ )—आजची आमची इच्छा व शक्ति ( १४३ ) —मॉरिसन व केळकर यांचा संवाद ( १४३ )—मराठ्यांची राजकीय महत्त्वाकांक्षा ( १४५ )—मराठ्यांना सध्या हिंदी म्हणवून घेण्यांतच अभिमान वाटतो ( १४६ ).

**उत्तरार्ध समाप्त**



सवाई माधवराव व नानाफडणीस.



नारायणराव पेशवे यांचा मृत्यु.

# मराठे व इंग्रज

## ( मराठेशाहीचें शतसांवत्सरिक वाङ्मयश्राद्ध )

### प्रकरण पहिलें

## इंग्रजांपूर्वीचें महाराष्ट्र

मराठा व इंग्रज यांची अगदीं पहिली भेट कोठें केव्हां झाली असेल याचा नक्की दाखला तर मिळणे शक्य नाहीच; पण कष्टाळू बारीकडोळ्या इतिहाससंशोधकासहि या भेटीचा शोध लागणें कठीण. फार काय, उभयतांची गांठ प्रथम पडली असेल तेव्हा मराठ्याला हा इंग्रज किंवा इंग्रजाला हा मराठा असे ओळखतांहि आले नसेल. इंग्रज प्रथम हिंदुस्थानात आले तेव्हा मुसलमानांचे राज्य होते. अर्थात् त्या वेळीं इंग्रजाच्या डोळ्यात मुसलमान तेवढा भरण्यासारखा होता; मराठ्याकडे त्याचे लक्ष कशाला जाईल ? सुरतेच्या किंवा दुसऱ्या एखाद्या कोंकणी बंदराला लागलेले इंग्रज टक दिल्लीकडची वाट धरीत उलटपक्षीं मराठ्याने जेव्हा पहिला इंग्रज पाहिला असेल तेव्हा त्याला इंग्रजाचे नांवहि ऐकून माहीत नसेल. त्या वेळीं डच व पोर्तुगीज व्यापारीच इकडे हिंडत असत यामुळे टोपीवाल्यात टोपीवाला सहज मिसळला गेला असेल. मराठा पाहून इंग्रजाला वाटलें असेल कीं, 'मांडचोळणा, पायघोळ अंगरखा व विचित्र पगडी घालणारा हा कोणीतरी अर्धवट रानटी मनुष्य असावा.' उलट इंग्रजांची ती शिपतरी टोपी, तो अवाढव्य गळपट्टा व गोरा रंग पाहून मराठा मनात म्हणाला असेल 'कोण विचित्र ध्यान हे'! अद्यापि खेडेगांवांतून काबुली व्यापारी चाकूकात्र्या विकावयाला गेला असतां गांवची मुले जशी त्याच्याभोवती कौतुकाने गोळा होतात तशीच पूर्वीं इंग्रज व्यापारी पाहून गोळा होत असतील. पहिल्यापहिल्या इंग्रज प्रवाशांनीहि हिंदी लोकांची वर्णने लिहून ठेविली आहेत, त्यांत खेडवळ मुलांची कुतूहलपूर्ण दृष्टिच दिसून येते. कोणाहि दोघां विदेशी लोकांची प्रथम भेट अशीच आश्चर्यजनक असावयाची !

या पहिल्या भेटीच्या वेळीं इंग्रजाला 'आपण मराठ्यांचे राज्य जिंकून घेऊन त्याचे धनी होऊं' असें, किंवा मराठ्याला 'आपणासमोर नमणारे, अदबीने बोलणारे, गिऱ्हाइकांना खुष करूं पाहणारे हे सौदागर आपले राजे होतील' असें कशाने

मनांत येणार ? पण ईश्वराची लीला विचित्र आहे ! तिच्यायोगानें अनेक चमत्कार या जगांत घडून येतात, आणि सहा हजार मैलांवरच्या इंग्रजांनीं समुद्रमार्गानें हिंदुस्थानांत व्यापारी म्हणून यावें व अखेर येथील अधिराजे होऊन असावें हा त्यांतलाच एक चमत्कार होय ! इतक्या दूरच्या लोकांचा इतका निकट संबंध आल्याचें जगाच्या इतिहासांत हें प्रायः पहिलेंच उदाहरण असावे. आतां, जगांत कोणतेहि लोक अनंत काळपर्यंत एकाच देशाला चिकटून बसलेले आढळत नाहींत. मानव वंशाचे उगम शोधण्याची दिव्यदृष्टि लाभल्यास मनुष्याचा स्थानिक देशाभिमान कदाचित् सर्वच नष्ट होऊन त्याची विश्वबंधुत्वाची दृष्टि प्रभावी होईल. लो० टिळकांच्या उपपत्तीप्रमाणे आर्यन् लोक उत्तरध्रुवापासून निघून हळूहळू खालीं येत येत भूमध्य रेषेपर्यंत आले असे मानलें तरी, खुद्द हिंदुस्तानांतच त्यांची वस्ती इतक्या दीर्घ काळपर्यंत झालेली आहे की, त्यांना आपण परक्या देशांत आहों असे वाटणे शक्य नाहीं. इंग्रजांचे आद्य पूर्वज व आमचे आद्य पूर्वज हे कदाचित् उत्तरध्रुवाजवळ कधीं काळीं एकत्र नांदत असतीलहि; पण मनुष्याच्या आठवणीपलीकडच्या व वाङ्मयाच्या उगमापूर्वींच्या गोष्टी जमेस धरतां येत नाहींत. या दृष्टीने आम्ही हिंदु आर्य अनादिकालापासून हिंदुस्तानचे रहिवासी आणि इंग्रज लोक अनादिकालापासून युरोपचे रहिवासी असेच मानिलें पाहिजे. इंग्रज व मराठे मूळचे भाऊबंद माना किंवा सर्वस्वीं परके माना; त्याचा असा निकट संबंध येणे हें आश्चर्यांतले आश्चर्य होय.

सतराव्या शतकाच्या प्रारंभीं हिंदुस्तानांत एकसमयावच्छेदेकरून दोन निरनिराळ्या राजकीय सत्ता उदयोन्मुख झाल्या. पैकी एक म्हणजे इंग्रजांची सत्ता इकडे तेव्हां प्रथमच नवीन अस्तित्वांत येणारी असून दुसऱ्या म्हणजे मराठ्यांच्या सत्तेचे मात्र पुनरुज्जीवन होत होते. तेराव्या शतकाच्या आधीं हिंदुस्तानांत सर्वत्र हिंदु राजांची सत्ता प्रचलित होती. पूर्वकाळाप्रमाणे या वेळीं सर्व हिंदुस्थानभर आपला अंमल प्रस्थापित केलेला असा एकच हिंदु अधिराजा किंवा सम्राट् नव्हता. पण सर्व हिंदुस्थानभर मिळून दहावीस प्रमुख स्वतंत्र राजे, व त्यांनीं जिंकलेले नसले तरी त्यांच्या आश्रयाने रहाणारे शेकडो उपराजे मांडलिक पाळेगार नाईक सरदेशमुख वतनदार पाटील वगैरे होत. हिंदुस्थानांत स्थानिक स्वातंत्र्याची परंपरा फार जुनी आहे. परचक्र आलें तरी विजयी राजानें फार तर खंडणी घेऊन परत जावें. तेव्हांहि विजिगीषा प्रबळ असली तरी ती आधुनिक काळाप्रमाणें जिंकलेल्या देशास घोरपडीप्रमाणें निरंतर चिकटून बसत नसे; किंवा जळूप्रमाणें जित राष्ट्राच्या सत्त्वाचें रक्त आतां अधिक पिण्यास जागा नाहीं, पोट फुगून गात्रें विगलित झालीं, म्हणून सुटत नसे. देश जिंकणें हें काम केवळ कीर्तीकरितां व हौसेखातर होत असे; पोटाकरितां होत नसे.

भारतांत किंवा रामायणांत दिग्विजयाचीं वर्णनें आहेत; पण या दिग्विजयास निघालेले वीर व योद्धे प्रतिपक्षानें नुसती मान लववून जिंकल्याची कबुली दिली किंवा सन्मानपूर्वक करभार दिला म्हणजे निघून जात. एखाद्या राजानें दुसऱ्या देशावर राजकीय अंमल प्रस्थापित केला तरी तेथें तो आपले सुभेदार किंवा 'गव्हर्नर' कायमचे नेमीत नसे. व असे अधिकारी नेमले गेलेच तरी ते जित देशाच्या अंतर्व्यवस्थेत बिलकुल हात घालीत नसत. त्या वेळच्या 'जबाबदारी'चा अर्थच वेगळा होता. आपली संस्कृती स्वाभिमानामुळे एखाद्या राजास श्रेष्ठ वाटली तरी ती दुसऱ्या लोकांवर लादण्याची किंवा त्यांच्या घशांत बळजबरीनें कोंबण्याची 'जबाबदारी' आपणावर आहे असें ते मानीत नसत. अशोक वगैरे राजांनीं परदेश जिंकले; परतु जित लोकांना घरची चूल कशी मांडावी किंवा मुलांना कसें वागवावे याविषयीं सक्तीचे शिक्षण देऊन शहाणे करण्याची आकांक्षा त्यांनी कधींही धरली नाहीं. धर्म चालीरीति न्यायनिवाडे शिक्षण बदोबस्त ग्रामव्यवस्था व्यापारउदीम या सर्व बाबतींत सनातन पद्धतीप्रमाणे लोकांना वागण्याची पूर्ण मोकळिक असे, व राजाधिकारी आणि प्रजा यांचा सबंध प्रत्यक्ष असा क्वचितच येई. प्रत्येक जातीची जमात किंवा 'पचायत' असून राजाज्ञांचा अमल त्यांच्याच मार्फतीनें होई. जित राष्ट्र करभार देई; पण त्याबद्दल ग्रामसंस्था जबाबदार असून, ग्रामसंस्थेपरता दुसरा कोणी अधिकारी नाही असेंच मानिलें जाई.

मुसलमान लोक हिंदुस्थानांत तेराव्या शतकापासून आले. त्यांच्या काळापासून या पूर्वींच्या स्थितीत थोडे अंतर पडले. हे लोक विदेशी असून त्यांचे दिग्विजय केवळ कीर्तीकरितां होत नसत. पश्चिमेप्रमाणें पूर्वेकडेहि ते जेथे जेथे गेले तेथे तेथे कायमचें ठाणे देऊन राहिले. स्वतःच्या व स्वकीयांच्या उदरभरणाचा भार त्यांनीं जिंकलेल्या प्रजेवर टाकण्यास सुरवात केली. केवळ करभारानें त्यांचे समाधान न होता, सालदरसाल आपला चरितार्थ चालविण्याला व मिजास भोगण्याला त्यांना वसुलाची आवश्यकता भासूं लागली. यामुळें प्रजेवर कराचें ओझें कायम पडूं लागलें. मुसलमान राजे जिंकलेल्या मुलखावर आपले सुभेदार किंवा 'गव्हर्नर' नेमूं लागले; तरी पण ग्रामसंस्थांच्या व्यवस्थेत त्यांनीं हात घातला नाहीं. धर्माचा प्रसार करण्याकडे त्यांचें लक्ष असले तरी, त्यांत व्यक्तींचाच संबंध येई. मुसलमान लोक परदेशांतून आलेले असूनहि त्यांनीं आपल्या मूळच्या देशाचा संबंध कायमचा तोडून टाकून हिंदुस्तान हा देश आपला असा मानिला होता. त्यांनीं कायमची वस्ती याच देशांत केल्यामुळें आपलीं घरेंदारें येथेंच थाटलीं, वतनवाड्या येथेंच मिळविल्या, व्यापारउदीम येथेंच मांडला, देवळें व मंदिरें येथेंच बांधलीं, पैसा अडका येथेंच खर्चला. तात्पर्य, हिंदुस्थान हा स्वदेश म्हणून पतकरून स्थानाभिमान येथलाच धरिला.

शिवाय दुसरी एक महत्त्वाची गोष्ट अशी कीं, मुसलमान राज्यकर्त्यांनीं हिंदु लोक जित म्हणून अधिकारभ्रष्ट केले नाहीत. गांवच्या दप्तरदाऱ्या, परगणेमहालांच्या तालुकदाऱ्या, प्रांताच्या सुभेदाऱ्या व लष्करांतल्या सरदाऱ्या या मुसलमानी अमलांत हिंदु लोकांना मिळत. त्यांतूनहि एखादा हिंदु मुसलमान झाला म्हणजे मग तर बोलावयासच नको. विलायती मुसलमान व देशी मुसलमान असा भेद पातशहाच्या मनांतहि येत नसे. किंबहुना मुसलमान लोक हिंदु स्त्रिया करीत असल्यामुळें हिंदु लोकांना पातशहाजाद्यापर्यंतचा अधिकार मिळणें शक्य होतें. अहमदनगरच्या पातशाहीचा पहिला राजा व वऱ्हाडांतील इमादशाहीचा पहिला राजा हे दोघेहि मूळचे ब्राह्मण होते असें सांगतात. मुसलमान लोक हे आळशी चैनी व मिजासखोर असल्यामुळें, राज्यकारभाराचें काम ते आपण होऊन कधीं उकरून तर काढीत नसतच. पण अधिकारपरत्वें प्राप्त होणारा कारभारहि होता होईतो ते परक्याच्या म्हणजे हिंदूच्याच हातून करीत. या सर्व कारणामुळें मुसलमानी राज्यांत 'आपण स्वदेशी असून पारखे झालों' असें हिंदूंना वाटत नसे एवढेंच नव्हे, तर मुसलमानी राज्य आपल्याच आधारावर आहे असें त्यांना वाटे; तें इतकें कीं, पातशाहीचा नोकर होणें हा एक प्रकारचा बहुमान आहे असेंच ते मानीत. हिंदुस्थानांत जेथें जेथें म्हणून अभिजातवर्ग पुढाकार घेण्यास तयार होता तेथें तेथें त्याला जुनी राजकीय मान्यता शिल्लक उरली होती, व नवी मान्यता मिळविण्यास अवसर होता. मुसलमानी राज्यांत जुन्या वतनदाऱ्या शाबूत राहिल्या व नव्याहि मिळाल्या. उत्तरहिंदुस्थानांत मुसलमान राजांनीं एका उदेपुरखेरीज बाकी बहुतेक रजपूत राजेरजवाडे जिंकल्यावर खेहांकित करून घेतले होते. दक्षिणेंत तर सोळाव्या शतकांत मुसलमानी राज्यांशीं फटकून वागणारा व त्या राज्यांचें स्वामित्व मान्य न करणारा असा विजयानगरशिवाय एकहि राजा उरला नव्हता. दक्षिणसमुद्राच्या आसपास मात्र मुसलमान राजांचा अमल अखेरपर्यंत पसरला नव्हता म्हणून तेथें अनादिपरंपरा उच्छिन्न न झालेलीं अशीं हिंदुराजांचीं--फार काय द्रविडी म्हणजे अनार्य राजांचींहि--घराणीं लहानशींच पण स्वतंत्र राज्यें चालवीत होतीं.

तेराव्यापासून सोळाव्या शतकाअखेर मुसलमान लोकांचा अमल हिंदुस्थानांत अबाधित चालला. उत्तरेस त्याची कदर विशेष होती; दक्षिणेस ती बरीच कमी होती. उत्तरेच्या आधी दक्षिणेंत फार दिवस स्वतंत्र अशीं मुसलमानी राज्यें स्थापिलीं जाऊन दिल्लीच्या बादशहाच्या अमलाला त्यांनीं सोडचिठ्ठी दिली होती. पण हीं राज्यें तुटक व लहान असल्यामुळें दिल्लीच्या पातशाहीपेक्षांहि या राज्यांना हिंदु अधिकारी व हिंदु प्रजा यांच्या मोहबतीवर व आधारावर अधिक अवलंबून रहावें लागे. दक्षिणेंतील मुसलमान राजांच्या पदरचे हिंदु सरदार हेच त्या राज्यांचे खरे आधारस्तंभ होते. दिल्लीच्या पलीकडे जवळच इतर स्वतंत्र

मुसलमानी राज्यांच्या हद्दीला सुरवात होते ती थेट कॉन्स्टँटिनोपलपर्यंत जाते. किंबहुना हिंदुस्थानांतील मुसलमानी राज्य हे आशिया खंडांतील मध्यवर्ती मुसलमानी रियासतीच्या वृक्षाची एक शाखाच होय असें म्हटलें तरी चालेल, अर्थात् दिल्लीच्या दरबारी खास विलायती अस्सल मुसलमान वंशाच्या बियाण्याचा पुरवठा वरचेवर व मुबलक होई. मुसलमान लोकांच्या फार काळच्या वस्तीनें व धर्मप्रसारानें दिल्लीच्या आसपास मुसलमान लोकांची संख्या पुष्कळच वाढलेली होती. पण दक्षिणेकडे यावें तसतसें या दोन्ही बाबतींतली उणीव भासत असे. दक्षिणेचा पल्ला लांब, इकडची मुसलमानी राज्यें 'ब्राह्मणी' म्हणजे सुरवातीसच ब्राह्मणकृपेनें उत्पन्न झालेली; यामुळे त्यांचा ओढा हिंदूंकडे उपजतच थोडाबहुत होता. झुफीरखानास ज्याप्रमाणें एका ब्राह्मणानें दास्यांतून मुक्त केलें, तसेंच दिल्लीच्या बादशहाविरुद्ध बंड करून राज्याचें स्वातंत्र्य राखण्यालाहि हिंदूंनीं त्याला मदत केली होती. दक्षिणेंत मुसलमानांची वस्ती कमी असून, हिंदूंनीं मुसलमानी संस्कृती स्वीकारण्यापेक्षा मुसलमानांनींच हिंदु संस्कृती अधिक स्वीकारली होती. तात्पर्य, कोणत्याहि बाजूनें पाहिलें तरी मुसलमानी राज्याचा अमल सुरू असताहि हिंदूंना आपलें वर्चस्व कमी झालें असें वाटण्यास फारसें कारण नव्हतें.

दक्षिणेंतील मुसलमानी राज्यें मराठ्यांना फारशीं जाचक वाटलीं नाहींत याचें कारण, राजा मुसलमान असला तरी बहुतेक सर्व मुलकी व लष्करी कारभार हिंदूंच्या हातीं असे. हिंदूंचा धर्मच्छळ सहसा होत नसे. फकीरअवलियाप्रमाणें ब्राह्मणांसहि वंशपरंपरेच्या देणग्या धर्मार्थ दिल्या जात. विजापूरचा एक पातशहा दत्तात्रेयाचा भक्त असल्याचें प्रसिद्धच आहे. किल्ल्यांना मुसलमान सुभेदारांचीं नांवें कागदपत्रीं लागलीं तरी खरी सत्ता हिंदु मदतनिसाच्या हातीं असे. सरदार मुरारराव हा गोवळकोंड्याच्या एका पातशहाचा दिवाण होता. तसेंच शेवटच्या पातशहावर मदनपंडित नामक ब्राह्मणाचें इतकें वजन होतें कीं, त्याच्यामुळे या पातशाहीचा व शिवाजीचा स्नेह अबाधित राहिला. दादो नरसू काळे हा मलिकंबराप्रमाणेंच प्रसिद्ध असून त्यानें पातशाहींतील जमीनबाबींची व्यवस्था उत्कृष्ट केली होती. मोंगलाच्या दरबारीं अहमदनगरच्या दरबारांतून जाणारे वकील प्रायः ब्राह्मण असत. बुऱ्हाणशहाचा एक प्रधान ब्राह्मण होता. विजापूरच्या दरबारी एसू पंडित नांवाचा ब्राह्मण 'मुस्ताफा'चें काम करी. गोवळकोंड्याच्या दरबारचे आकण्णा मादण्णा हे दोघे मुत्सद्दी सुप्रसिद्धच आहेत. मराठे सरदारांस मोटमोठ्या मनसबदाऱ्या दिल्या जात. एका 'ब्राह्मणी' पातशहानें २०० मराठे शिलेदार आपले शरीरसंरक्षक म्हणून ठेवले होते. वाघोजी जाधवराव नाईक हा मराठा सरदार पातशहाला गादीवर बसविण्याचे व पदच्युत करण्याचे खेळ अनेक वेळां खेळला, यामुळे त्याला ब्राह्मणी पातशाहींतला 'किंग-मेकर' म्हणावयास हरकत नाहीं. मुरारराव जाधव यानें विजापूरदरबारचें

अब्रू एकवेळ राखली. शहाजीनें अहमदनगर व विजापूर या दोन्ही दरबारांत मोठें ऐश्वर्य भोगलें. अहमदनगरच्या बालपातशहास मांडीवर घेऊन यानें स्वतःच पातशाहीचा अधिकार अनेक वर्षें गाजविला. शिरके जाधव निंबाळकर घाटगे मोरे महाडीक गुजर मोहिते हे सरदार बलाढ्य असून पदरीं दहादहा वीसवीस हजार फौज बाळगीत.

पण ब्राह्मणी–मुसलमानी राज्यांशीं अशा रीतीनें स्नेहभावानें वागणारे मराठे हे मोगलांच्या स्वाऱ्या दक्षिणेकडे होऊं लागतांच उग्र रूप दाखवूं लागले. मोगलांशीं मराठ्यांनीं जवळजवळ दोनशें वर्षें युद्ध केले; पण आपली सत्ता केव्हांहि सर्वस्वी त्यांच्या हातीं जाऊं दिली नाहीं. मोगलांच्या स्वाऱ्यांपूर्वी दोनशें वर्षें तयार होत आलेल्या क्षात्रक्षेत्रांत व कर्तृत्वभूमींत रुजलेल्या स्वातंत्र्याच्या बीजास मोंगलांच्या हातून झालेल्या धर्मच्छळाच्या आणि स्वातंत्र्यनाश करण्याच्या प्रयत्नाच्या उष्णतेने अंकुर फुटून त्याचा वृक्ष झाला, व त्याला शिवाजीमहाराजांच्या काळीं स्वतंत्र हिंदुपदपातशाहीचे गोड व स्पृहणीय फळ आले.

पण त्यांतल्यात्यांत हिंदु लोकांतहि एक वर्ग असा होता की, मुसलमानी अमल देशांत चालू असतां त्याने आपलें डोकें फारसें कधींच नमविले नाही. या अमलाखालीं तो पूर्ण स्वतंत्र नसला तरी स्वतंत्रप्राय होता. चौदाव्या शतकांत महाराष्ट्रावर मुसलमानी सत्तेची लाट आली तिला मराठ्यांनी जरी क्षणभर मान लवविली तरी समुद्रांत डुंबणाऱ्या पटाईत पोहणाराप्रमाणें त्यांनी उलट लवकरच त्या लाटेवर स्वारी केली व लाटेचें पाणी तोंडांत घेऊन तेच तिच्यावर थुंकण्यास प्रारंभ केला. मुसलमानांनीं कधींहि पूर्णपणे न जिंकले असे सर्व हिंदुस्थानांत एक मराठेच होत ! लढवय्ये रजपूतहि मुसलमानांना अखेर शरण गेले; पण मराठे कधींहि गेले नाहीत !

महाराष्ट्राची भूमीच कदाचित् अशी असेल की, तिच्यांत स्वातंत्र्यबुद्धीचे पीक सदा पिकावे. महाराष्ट्रांतील नद्यांचे 'पाणी' च तसे असे म्हणणे हा कदाचित् नुसता भाषालंकार ठरेल. पण महाराष्ट्राची भूरचना, म्हणजे त्याच्या भोंवतालचें पर्वतांचे वलय, त्यांतील दऱ्याखोरी, त्याची समशीतोष्ण हवा, या सर्व गोष्टींचा परिणाम मराठ्यांच्या स्वभावावर झाला असल्यास नवल नाहीं. महाराष्ट्रांतील अनेक पहाडी किल्ले हेच नुसते घेतले तरी ते ज्याच्या ताब्यांत असतील त्याला साऱ्या जगास तुच्छ मानावयास लावतील, असें या किल्ल्यांपैकीं एखाद्याच्या माथ्यावर नुसतें उभे राहून चौफेर नजर फेकणारास सहज वाटण्यासारखें आहे. पल्लेदार तोफांची युक्ती निघून कोस अर्धकोसावरून किल्ल्याची तटबंदी जमीनदोस्त करितां येऊं लागेपर्यंत, हे किल्ले म्हणजे स्वातंत्र्यनिधिसंरक्षण करण्याच्या संगीन पोलादि पेट्याच होत्या असे म्हणतां येईल. या किल्ल्यांच्या आश्रयानें राहणारे लोक धाडसी चपल व काटक असून त्यांना दुसऱ्याच्या अंमलाखालीं राहण्याचें

केव्हांहि संकट वाटे. प्रत्येकानें आपल्या मिरासीच्या वडिलोपार्जित जमिनींत शेतीवाडी करावी व मिळेल त्या भाजीभाकरींत संतुष्ट राहून स्वाभिमान रक्षावा, अशी परंपरा महाराष्ट्रांत मुसलमान शिरण्यापूर्वी तर होतीच; पण खुद्द मुसलमानांनाहि हा महाराष्ट्राचा पन्नास साठ हजार चौरस मैलांचा पट्टा केव्हांहि पुरा काबीज करितां आला नाहीं. त्यांची व्यक्तिनिष्ठ स्वातंत्र्यप्रियता ग्रामसंस्थांच्या आड येत नसे; पण एकछत्री अमलाचें त्यांना वावडें असल्यामुळे असा एकछत्री अमल—विशेषतः परकीयांचा—त्यांच्यावर केव्हांच फार काळ टिकला नाही. परशत्रु आला असतां कांहीं वेळ ते एक विचार करू शकत. पण शांततेच्या काळांत, त्यांच्या स्वातंत्र्यप्रियतेमुळे, ते एकमेकांतील कलहास प्रवृत्त होत.

मराठ्यांनी परकीय सिथियन लोकांस दोनदां पराभूत करून परत लावले; पण चालुक्य गुप्त शिलाहार यादव यांनी आपआपसांत अनेक वेळां रणसग्राम केल्याचें इतिहासांत नमूद आहे. मराठ्यांच्या अगी एकलकोंडेपणाचा व भांडखोरपणाचा दोष बराच आहे; पण तो स्वातंत्र्यप्रियतेमुळेच होय. उत्तरहिंदुस्थानांत बाराव्या शतकापासून मुसलमानांचा अमल थोडाबहुत सुरू झाला. पण या अमलाचा प्रवेश दक्षिणेत होण्यास दोन अडीच शतकें लागलीं, व पुढे झाला तरी तो अमल फार काळ टिकला नाहीं. त्यांतल्यात्यांत निदान मावळ प्रांत व सह्याद्रीचा घाट माथा यांत तर मुसलमानांस थारा असा केव्हाच मिळाला नाही; एवढेच नव्हे, तर दिल्लीची पातशाही कमकुवत होतांच मावळे—मराठ्यांनी पातशाहीच्या भव्य इमारतीचे दगड एका मागून एक ढासळण्यास सुरुवात केली; व अखेर त्यांनी दिल्ली व तेथील पातशहा हस्तगत करून जवळ जवळ पन्नास वर्षेपर्यंत साम्राज्य सत्तेचे सुख अनुभविले. त्यांच्या महत्त्वाकांक्षेप्रमाणे त्यांना दिल्लीस हिंदुपदपातशाही स्थापित करितां आली नाही हे खरे. तथापि इंग्रज जेव्हां साम्राज्यसत्ता स्थापू लागले तेव्हां त्यांना खरा प्रतिबंध मराठ्यांकडूनच झाला. एल्फिन्स्टन सर विल्यम हंटर सर आल्फ्रेड लायल वगैरे इंग्रज इतिहासकारांनीं प्रांजलपणें असें कबूल केले आहे की, "आम्ही हिंदुस्थानांतील साम्राज्यसत्ता जिंकून घेतली ती मुसलमानांपासून नव्हे, तर मराठ्यांपासून. मुसलमानांच्या हातून ती सत्ता त्यापूर्वी केव्हांच गेली होती. आमच्या शेवट ज्या लढाया झाल्या त्या मुसमानांशी नसून मराठ्यांशीच होत्या." तात्पर्य, पातशाही सत्तेत इंग्रज हे खरोखर मराठ्यांचे वारस होत, मुसलमानांचे नव्हत.

मोंगल लोकांच्या स्वाऱ्या दक्षिणेंत झाल्या, त्या प्रथम मुख्यतः मराठ्यांवर नसून बंडखोर मुसलमानी राज्यांवर होत्या. यामुळें मुसलमान व मराठे या दोघांनीं मिळून त्यांच्याशी टक्कर दिली. पण मुसलमानी राज्यांचा पाड मोगलांविरुद्ध लागत नाहीं असे जेव्हां मराठ्यांनीं पाहिलें तेव्हां त्यांनीं आत्मरक्षणाची तयारी स्वतंत्र रीतीने सुरू केली. अहमनगरचे राज्य वांचविण्याचे चांदबिबी

मलिक अंबर व शहाजी भोसले यांनीं पुष्कळ प्रयत्न केले; पण ते सिद्धीस न जातां मोगलांनी अहमदनगर सतराव्या शतकाच्या प्रारंभीं घेतले तेव्हां कित्येक मराठे सरदारांनी मोगलांच्या पदरीं मनसबदाऱ्या पतकरल्या, कित्येक विजापूरच्या दरबारी गेले, पण कित्येक अजीबात स्वतंत्र होण्याचाच विचार करू लागले. मोगलांच्या स्वाऱ्या दक्षिणेवर न होत्या तर मराठापदपातशाहीची स्थापना इतक्या लवकर झाली नसती. 'ब्राह्मणी' राजांच्या पदरीं राहून मराठ्यांनी जें महत्त्व मिळविलें तेंच त्यांना पुढें स्वतंत्र होण्याला कारणीभूत झालें. झगडावयाचें तें झगडून मग मुसलमानांकरितां कां? स्वतःकरितां झगडलों तर स्वातंत्र्य तरी मिळेल, असें मराठे सरदारांना वाटू लागलें. त्यांनी महाराष्ट्रांतील किल्ल्यांच्या डागडुजीस पूर्वींच प्रारंभ केला होता; व अकबरानें दक्षिणेवर जी स्वारी केली तिनें दक्षिणेंतील मुसलमानी राज्यें बुडविण्याबरोबरच मराठ्यांचें राज्य स्थापण्याच्या कामास मदत केली. तात्पर्य, अशा रीतीनें सतराव्या शतकाच्या प्रारंभीं—ज्या वेळीं इंग्रज हे व्यापारी कंपनी स्थापून हिंदुस्थानांत जाऊन व्यापार मांडण्याच्या उद्योगास लागले होते त्या वेळीं—मराठे हे स्वराज्य स्थापण्याच्या उद्योगास लागले होते. इंग्रज हे या वेळीं मराठ्यांस नांवानेंहि ओळखीत नसून त्यांचा मानस फक्त मोगलांच्या परवानगीनें आपलीं जहाजें हिंदुस्थानच्या बंदरांत नांगरून व्यापारी मालाचे सौदे पटविण्याचा होता. मराठेहि या वेळीं इंग्रजांस नांवानें ओळखीत नसून त्यांचा मानस हिंदुस्थानांत —निदान महाराष्ट्रांत तरी—नष्ट झालेल्या हिंदुपदपातशाहीची प्राणप्रतिष्ठा पुन्हा करावयाची व त्याकरितां मोगलांसारख्या बलाढ्य शत्रूशीं कां होईना पण झगडा करावयाचा होता. इंग्रजांनीं या वेळीं हातांत तागडी सरसावली होती, तर मराठ्यांनी तरवार सरसावली होती. दोघांनाहि निरनिराळ्या रीतीनें मोगलांच्या अंतरंगांत प्रवेश करावयाचा होता. शिवाजीच्या जन्माच्या वर्षीं सुरत येथील इंग्रजांची व्यापारी वखार १५ वर्षांची झाली होती. अशा रीतीनें उदयोन्मुख झालेल्या इंग्रजांचा व मराठ्यांचा संबंध पुढें एकमेकांशीं कसा आला व त्याचे अखेर परिणाम काय झाले, याची हकीकत आतां आम्ही सांगणार आहों. पण यापूर्वीं मराठ्यांची हकीकत थोडक्यांत दिली आहे, त्याचप्रमाणें इंग्रज हिंदुस्थानांत कां व कसे आले याचीहि थोडीशी हकीकत देणें जरूर असल्यामुळें ती पुढील प्रकरणांत देत आहों.

## प्रकरण दुसरें

# इंग्रज हिंदुस्थानांत कां व कसे आले?

इंग्रज लोक हिंदुस्थानात प्रथम व्यापाराकरिता आले. त्यांच्यापूर्वी पुरातन कालापासून युरोपांत जी अनेक राष्ट्रे उदयास आलीं त्यांपैकीं बहुतेकांचा हिंदुस्थानाशीं व्यापारी संबंध आलेला आहे. किंबहुना असेंहि अनुमान काढण्यास हरकत नाहीं कीं, आशियांतील व त्यांतूनहि हिंदुस्थानांतील व्यापार ज्या राष्ट्राच्या ताब्यात जाई तेंच राष्ट्र विशेष वरच्या दर्जाचें मानलें जात असे. ख्रिस्ती शकापूर्वी दोन हजार वर्षांपासून, म्हणजे खाल्डियन लोकांच्या वेळेपासून, हा व्यापार युरोपियन लोक करीत आलेले आहेत असा समज आहे. हा समज खरा असो वा खोटा असो; तथापि ग्रीक सत्तेपासून युरोपचा व हिंदुस्थानचा व्यापारी संबंध इतिहासावरून पूर्ण सिद्ध होत आहे. या गोष्टीस आरंभ इ. स. पूर्वी ३२७ पासून, म्हणजे शिकंदर बादशहाच्या हिंदुस्थानावरील स्वारीपासून झाला. ह्या स्वारीबरोबर आलेले इतिहासकार व वकील या मंडळींनीं हिंदुस्थानाविषयींची माहिती युरोपांतील लोकांस करून दिली. हिंदुस्थान हें संपत्तीचें माहेरघर आहे ही गोष्ट शिकंदर बादशहासहि ह्याच स्वारीनंतर प्रथम कळून आली. चंद्रगुप्ताच्या दरबारीं असलेल्या मेगॅस्थिनीज नामक ग्रीक वकिलानें त्या वेळच्या हिंदु लोकांच्या चारित्र्याविषयीं खालीलप्रमाणें आपलें मत लिहून ठेविलें आहे. तो म्हणतो कीं, " स्त्रियांचें अत्युच्च पातिव्रत्य, गुलामगिरीचा अभाव इत्यादि गोष्टींत हिंदुस्थानची बरोबरी करणारा देश क्वचितच सांपडेल. सर्व आशियाखंडामध्यें हिंदु लोकांपेक्षा जास्त पराक्रमी लोक कोणीहि नव्हते. दाराला कुलूप लावण्याची गरज त्यांना कधींच भासत नसे. खोटें बोलणें त्यांना कधीं स्वप्नांतहि माहीत नव्हतें. त्यांना कधीं न्यायपीठाची पायरी चढणें ठाऊक नव्हतें. उत्तम शेतकरी व कुशल कारागीर असून हे फार मेहेनती असत. यांना कोणचेंहि व्यसन नसे."

ग्रीकसत्ता नामशेष झाल्यावर पुढें रोमन लोक उदयास आले. यांचाहि हिंदुस्थानाशीं मोठ्या प्रमाणांत व्यापार चालू असे. रेशमी व इतर उंची कापड जवाहीर मोती सुवासिक द्रव्यें मसाल्याचें सामान हस्तीदंत इत्यादि जिनसा रोमन लोक हिंदुस्थानांतून नेत. त्याचप्रमाणें अनेक तऱ्हेचे रंग व औषधीहि रोममध्यें रवाना होत. त्या वेळीं हिंदुस्थानांतून युरोपमध्यें कच्चा माल फारसा जात नसे, ही गोष्ट विशेष ध्यानांत ठेवण्यासारखी आहे. रोमन

लोकांचा ऐषआराम हिंदुस्थानांतून जीं रत्नें व मोती वगैरे जिनसा जात त्यांवर मुख्यत्वेंकरून अवलंबून असे.

रोमन लोकांचा पाडाव झाल्यावर व्हेनिशिअन लोक वैभवास चढले. यांचे लक्ष विशेषतः व्यापाराकडे होते. हिंदुस्थानमधील युरोपचा व्यापार यांनी पूर्णपणे काबीज केला होता. हे लोक भरभराटीत असतां एक विशेष गोष्ट घडून आली व तिच्या योगानें व्हेनिशिअन सत्तेस उतरती कळा लागून शेवटीं व्हेनिसचें नांवहि ऐकू येईनासें झाले.

वरील विशेष गोष्ट म्हणजे आफ्रिकेच्या खालच्या बाजूकडून हिंदुस्थानास जाण्याच्या नवीन मार्गाचा शोध ही होय. आतांपर्यंत हिंदुस्थानचा व्यापार खालील दोन तीन मार्गांनी चालू होता. सुवेझच्या संयोगभूमीचा मध्येच अड थळा आल्यामुळे पूर्वसमुद्रावरील माल भूमध्यसमुद्रावर उतरण्यास दोन मार्ग होते. एक, इराणच्या आखातातून वर जाऊन पुढे जमिनीवरून यूफ्रेटिस नदीच्या कांठाने आशियामायनरमधून जाई; आणि दुसरा, तांबड्या समुद्राच्या उत्तर किनाऱ्यावर उतरून जमिनीवरून मिसरदेशांतून भूमध्यसमुद्रावर उतरे. पण ह्याशिवाय अगदीं उत्तरेकडचा एक तिसरा मार्ग होता. हा हिंदुस्थानच्या उत्तरेकडून निघून मध्यआशियांतील ऑक्सस ऊर्फ अमूदर्या नदीच्या कांठानें कास्पियन समुद्रावरून काळ्या समुद्रावर उतरे. ह्याचे कास्पियन समुद्राच्या उत्तरेकडून व दक्षिणेकडून असे दोन फांटे होते. ते दोनहि काळ्या समुद्रावर एकत्र होत. आफ्रिकेच्या दक्षिण टोकास वळसा घालून हिंदुस्थानास जाण्याच्या वरील मार्गाचा शोध लागेपर्यंत वर सांगितलेल्या तीनहि मार्गांचा उपयोग केला जात असे. या तीनहि मार्गांमध्ये अडचणी पुष्कळ असत. रस्त्यानें धोका फार असे. खर्च व श्रम अतोनात लागत. नवीन मार्गाचा शोध लागल्यापासून फारच उपयोग झाला. हा मार्ग १४९८ साली वास्को दि गामा नांवाच्या पोर्तुगीज गृहस्थानें शोधून काढिला. तेथपासून हिंदुस्थानाशीं युरोपियन लोकांचा दळणवळणाचा मार्ग सरास असा प्रथम खुला झाला. यापुढे युरोपियन लोक हिंदुस्थानांत एकामागून एक येऊंच लागले. १६ व्या शतकांत हिंदुस्थानांत पोर्तुगीज लोकांचे, १७ व्या शतकांत डच लोकांचे व १८ व्या शतकांत फ्रेंच लोकांचे वर्चस्व होते आणि तेथून पुढें इंग्रजांच्या वर्चस्वाला सुरुवात झाली.

नवीन मार्गाचा शोध लागल्यावर पोर्तुगीज लोकांबरोबरच हिंदुस्थानामध्यें ख्रिस्ती धर्माचा उघडपणें प्रवेश झाला. ह्यापूर्वीसुद्धां म्हणजे ख्रिस्तजन्मापासून ७५ वर्षांच्या आंतच हिंदुस्थानांत ख्रिस्ती धर्म डोकावू लागला. सेंट थॉमस हा ख्रिस्तभक्त व शुभवर्तमानाचा प्रसार करणारा साधु इ. स. ६८ या वर्षी मद्रासजवळ मेला किंवा मारला गेला म्हणतात. याच्यापूर्वी कित्येक वर्षे मलबार

(R No....42....)

व कारोमांडल यां किनाऱ्या लगतच्या प्रांतांत तो खिस्ती धर्माचा उपदेश करीत फिरत असे. इ. स. १८९ या वर्षी ट्यांटीनस या नांवाचा खिस्ती मिशनरी हिंदुस्थानांत आला. इ. सनाच्या तिसऱ्या शतकाच्या अखेरीस मलबार किनाऱ्यावर खिस्ती धर्मांचे बीज चांगलेच रुजले होते. ४८६ सालीं बॅबिलॉन येथून नेस्टोरियन नामक खिस्ती धर्मपंथाचे उपदेशक मलबार किनाऱ्यावर उतरून त्यांनीं खिस्ती धर्माचा प्रसार करण्याचे काम सुरू केले होतें. आठव्या शतकांत आर्मिनियन मिशनरी सेंट थॉमस याने मलबार किनाऱ्यावर खिस्त देवतेचें मंदीर बांधले; हेच हिंदुस्थनांतील पहिले खिस्ती देऊळ होय. ८८३ सालीं इंग्लडचा राजा आलफ्रेड याने आपले दोन धार्मिक प्रतिनिधि सेंट थॉमस याच्या कबरस्थानाच्या यात्रेस पाटविले होते असे सांगतात. अशा रीतीनें युरोपियन व्यक्ती हिंदुस्थानांत मधूनमधून आल्याचे दाखले सांपडतात. तथापि एवढी गोष्ट खरी की, पोर्तुगीज लोक हिंदुस्थानात आल्यापासून खिस्ती धर्माचा प्रसार विशेष प्रमाणांत झाला.

धर्मप्रसार व व्यापारवृद्धि हे दोन हेतु डोळ्यांपुढें ठेवून पोर्तुगीज लोक हिंदुस्थानांत आले. पहिला हेतु दुसऱ्या हेतूस पोषक न होतां उलट त्यास विघातकच झाला ही गोष्ट पुढे निदर्शनास येईल. वास्को दि गामा हा प्रथम कालिकत येथे येऊन दाखल झाला. त्या वेळीं कालिकत शहर मोठ्या भरभराटींत होतें. तेथच्या राजास झामारिन असे म्हणतात. त्या ठिकाणचा व्यापार सुमारें सहाशे वर्षांपासून अरब मुसलमानांच्या ताब्यांत होता. गामानें झामारीनची मर्जी संपादन केली व परत जातेवेळीं झामारीनने पोर्तुगालच्या राजास एक पत्र दिलें, त्यांतील मजकूर असा: "आपल्या घराण्यांतील सरदार वास्को दि गामा हे आमच्या राज्यांत आल्यामुळें आम्हांस फार संतोष होत आहे. आमच्या राज्यांत दालचिनी लवग सुठ मिरीं आणि जवाहीर यांची समृद्धि असून त्याच्या बदली आपल्याकडून सोने चांदी पोवळीं इत्यादि जिन्नस आम्हांस मिळावे, अशी आमची इच्छा आहे !"

याप्रमाणे हिंदुस्तानांत जाण्याचा जलमार्ग पोर्तुगीज लोकांस सांपडल्यामुळे एकंदर जगाच्या इतिहासांत मोठी क्रांति घडून आली. युरोपांत पोर्तुगाल देशाचे महत्त्व वाढलें, व्हेनिस जिनोआ वगैरे राष्ट्रांचा व्यापार बसला व नौकानयनकलेंत प्रवीण असलेलीं राष्ट्रे उदयास आली.

१५०३ सालीं पोर्तुगालाहून अलबुकर्क हा हिंदुस्थानांत आला. वास्को दि गामा हा व्यापारवृद्धि हे ध्येय पुढें ठेऊन त्याप्रमाणें वागे; परंतु अलबुकर्क हा गामाच्या पुढें जाऊन त्याने राज्यविस्ताराची कल्पना डोळ्यांपुढें ठेवली. त्याने १५१० मध्यें गोवा घेतलें. १५१५ मध्यें तो गोवा येथें मरण पावला. १५२४ साली गामा तिसऱ्या खेपेस हिंदस्थानांत आला व १५२७ मध्यें कोचीन येथें

मरण पावला. १५०० पासून १६०० पर्यंत म्हणजे एक शतकापर्यंत पोर्तुगीज लोक हिंदुस्थानांत भरभराटीमध्ये होते. परतु पुढे त्यांच्या सत्तेस उतरती कळा लागली. कारण युरोपमध्ये पोर्तुगीज सत्ता स्पेन सत्तेच्या आधीन झाली, व पुढे १६४० मध्ये पोर्तुगाल जरी स्वतंत्र झाला तरी त्या सुमारास डच व इंग्रज यानी पोर्तुगीजाचा हिदुस्थानातील व्यापार काबीज केला होता. पोर्तुगीजाच्या -हासाची आणखीहि कारणे आहेत. त्यानी क्रूरपणाची अनेक कृत्ये केली. त्यांच्यामध्ये ऐषआराम बेसुमार वाढला. त्याच्या राज्यामध्ये धर्माचे प्राबल्य होऊन धर्मच्छल विशेष वाढला. तसेच युरोपियन पुरुष व एतद्देशीय स्त्रिया यांचे लग्नव्यवहार करून पोर्तुगीजाचा कांही एक फायदा न होता उलट तोटाच झाला. पोर्तुगीजामागून डच लोकाचे वर्चस्व हिदुस्थानात वाढले.

डच लोक इग्रजाप्रमाणे हिदुस्थानास येण्यास युरोपच्या उत्तरेच्या बाजूने मार्ग शोधण्याच्या मागे गुतले होते, परतु त्यात ते सर्वस्वी फसले. तथापि पोर्तुगीजांच्या शोधाचा पूर्ण फायदा घेण्यास ते मुळीच चुकले नाहीत. पोर्तुगीज लोकाच्या शभर वर्षांच्या व्यापाराने लिस्बन शहर फार भरभराटीस आले. हिदुस्थानातून लिस्बनास आणलेला माल इतर देशात नेऊन विकण्याकरिता पोर्तुगीज व्यापाऱ्यास डच व्यापाऱ्याची मदत घ्यावी लागली. डच गलबते लिस्बनहून सर्व प्रकारचा माल नेऊन युरोपच्या उत्तरेकडील भागास पुरवीत असत. पुढे पुढे डच लोकाचा मोर्चा हिदुस्थानाकडे फिरला. लिन्सकोटेन नावाचा एक डच व्यापारी लिस्बनमध्ये थोडा काळ राहून तेथून पोर्तुगीज लोकाबरोबर गोव्यास गेला. तेथ तेरा वर्षे राहून त्याने व्यापारासबधी पुष्कळ माहिती गोळा केली. सन १५९२त परत येऊन त्याने ती माहिती १५९६ त प्रसिद्ध केली. त्यानतर आम्स्टर्डॅमच्या व्यापाऱ्यानी एक सभा भरवून हिदुस्थानात एक व्यापारी सफर पाठविण्याचे ठरविले. त्याप्रमाणे कार्नेलियस हौटमन याच्या हाताखाली सन १५९५ त चार गलबते आफ्रिकेच्या रस्त्याने हिदुस्थानास आली, ती अडीच वर्षांनी परत युरोपात गेली. पुढे पाचसहा वर्षात डच लोकानी एकदर पधरा सफरी केल्या, व त्याच्या अनेक कपन्या निर्माण झाल्या. ह्या सर्व कपन्यास एक करून डच पार्लमेंटाने 'डच ईस्ट इडिया कपनी' नावाची एक मोठी कपनी सन १६०२ मध्ये स्थापिली.

सबध सतराव्या शतकामध्ये पूर्वेकडील व्यापार डच लोकांच्या ताब्यात होता. याचे कारण, त्यांचे समुद्रावरील वर्चस्व त्या शतकामध्ये अबाधित होते. डच लोकांचा उद्देश फक्त व्यापारवृद्धि हाच होता. पोर्तुगीज लोकाप्रमाणे आरबांचा व्यापार बुडवून खिस्ती धर्माची वृद्धि करावी व नवीन प्रदेश जिकून पोर्तुगीज राज्य वाढवावे असल्या तऱ्हेचा उद्देश डच लोकांनी आपल्यापुढे ठेविला नाहीं. कोणत्याही प्रदेशाच्या राजकीय अतर्व्यवस्थेत त्यांनी हात घातला नाहीं.

१६५२ मध्ये त्यांनी पहिली वखार मद्रासजवळ पालकोल्लू या ठिकाणीं घातली. पुढे सहा वर्षांनी १६५८ मध्ये पोर्तुगीजांचा सिलोनमधील जफनापट्टण हा किल्ला त्यांनी घेतला. मलबार किनाऱ्यावरील पोर्तुगीजांची सर्व ठाणी १६६४ त जिंकून १६६९ मध्ये सेंट थॉमी येथून त्यांची हकालपट्टी केली. अशा रीतीनें डच लोक हिंदुस्थानात सर्वसमर्थ होऊन बसले. परंतु हे त्यांचे वैभव विलयास नेणारी दुसरी सत्ता हळूहळू हिंदुस्थानात प्रबळ होत चालली होती. अर्थात् ती सत्ता इंग्रज लोकांची होय.

अंबोयाना येथे डच लोकांच्या हातून झालेली १६२३ मधील इंग्रजांची कत्तल ही हिंदुस्थानामध्ये ब्रिटिशांच्या सत्तेचा पाया बसविण्यास कारणीभूत झाली. डच लोकांच्या अकुंचित् व्यापारी धोरणामुळे त्या लोकांची सत्ता डळमळीत होऊ लागली. क्रूरपणामध्ये त्यांनी पोर्तुगीज लोकास सुद्धा मागे टाकले. व त्यामुळे त्यांच्याबद्दल एतद्देशीय लोकांमध्ये फारच अप्रीति उत्पन्न झाली. शिवाय इतर दर्यावर्दी राष्ट्रे पुढे सरसावली. डच राष्ट्रांत लोक फार थोडे असून त्यांच्या पूर्वेकडील राज्याचा पाया अगदीच अकुंचित होता, व अखेरीस ते इंग्लिशांशी टिकाव धरू शकले नाहीत. १७५८ मध्ये क्लैव्ह यानें चिनसुरा येथे डच लोकास पूर्ण पादाक्रांत केले. यापुढे हिंदुस्थानात डचांच्या ताब्यात असलेला असा मुलूख मुळीच राहिला नाही. डचांच्या मागून इंग्लिश व फ्रेंच यांच्यामध्ये हिंदुस्थानच्या व्यापारासंबधानें कलहास सुरवात झाली व शेवटी फ्रेंचांचा बीमोड होऊन इंग्रज हिंदुस्थानामध्ये अप्रतिहतपणे संचार करू लागले.

हिंदुस्थानामध्ये प्रथम इंग्रज लोक केव्हा आले हे पाहू जाता असे दिसते की, ९ व्या शतकात आलफ्रेड राजानें पाठविलेले प्रतिनिधि हे प्रथम येथे आले. त्यानंतर चारपाचशे वर्षांनी म्हणजे चवदाव्या शतकात सर जॉर्ज मंडेव्हिल हा इंग्रज हिंदुस्थानात आला. ऐतिहासिक दृष्ट्या या दोघा इंग्रजांचे आगमन वादग्रस्त आहे. मात्र इतके खरे की, मंडेव्हिल यानें हिंदुस्थानच्या प्रवासाविषयी लिहिलेले पुस्तक इ. स. १४९९ साली लंडन येथे छापले गेले व इंग्लंडच्या छापखान्यांत छापलेले असे हेच पहिले पुस्तक असलेले सांगतात. हे खरे असेल तर, इंग्रजांनी छापलेले सर्वांत पहिले पुस्तक हिंदुस्थानासंबंधी असावे हा योगायोग विलक्षण खरा ! वरील दोघा इंग्रजांचे आगमन खरे मानले तरी ते हिंदुस्थानांत उपरी होते. ते येऊन फार तर नुसता देश पाहून गेले असतील; पण आधुनिक काळांत हिंदुस्थानांत खरोखर आला व इकडे वस्ती करून राहिला असा पहिला इंग्रज म्हटला म्हणजे फादर टॉमस स्टीफन हा होय. सन १५७९ च्या आक्टोबरमध्ये स्टीफन हा खिस्ती धर्माचा प्रसार करून जमल्यास व्यापारहि करावा अशा हेतूनें गोव्यास आला व त्यापुढचे त्याचे सर्व आयुष्य हिंदुस्थानांतच गेलें. त्यानें विलायतेस हिंदुस्थानच्या लोकस्थितीची व व्यापाराची मनोरंजक

हकीकत लिहून पाठविली. साष्टी म्हणजे ठाणे या ठिकाणीं राहून हिंदु लोकांस उपदेश करून बाटवून खिस्ती धर्माचा प्रसार करण्याच्या खटपटीत त्याचीं पुष्कळ वर्षें गेलीं. स्टीफन साहेबाने 'खिस्तपुराण' नामक कोंकणी मराठी भाषेत पण रोमन लिपीने एक खिस्तवर्णनपर उत्कृष्ट ग्रंथ लिहिला. मराटी-कोंकणी भाषांचें व्याकरणहि पोर्तुगीज भाषेत त्याने लिहिलें. १५८३ सालीं राल्फ फिच्च नामक इंग्रज ग्रहस्थ खुष्कीच्या वाटेने इराणच्या आखातापर्यंत आल्यावर पोर्तुगीज लोकांनीं त्यास कैद करून गोव्यास पाठविले. हिंदुस्थानांतून विलायतेत परत गेल्यावर त्याने इकडच्या लोकांविषयीं व संपत्तीविषयी ज्या चित्तवेधक हकीगती इंग्रज लोकास सांगितल्या त्यामुळे हिंदुस्थानासंबंधाने तिकडील लोकांच्या मनांत औत्सुक्यकारक कल्पना उत्पन्न झाल्या. पुढे तीन वर्षांनीं १५८६ मध्ये टॉमस कॅव्हेंडिश नांवाचा इंग्रज पृथ्वीपर्यटन करीत करीत हिंदुस्थानांत आला होता. तो विलायतेस परत गेल्यावर त्याच्या मदतीनें लंडनच्या प्रमुख व्यापाऱ्यांनी अर्ज लिहून त्या वेळची इंग्रज राणी इलिझाबेथ इजकडे सादर केला; व त्यामुळे पूर्वेकडील देशांत व्यापारासाठी सफर करण्याची आपल्या प्रजाजनांस राणीने परवानगी दिली. पुढे लवकरच म्हणजे सन १६००सालीं ईस्ट इंडिया कंपनीची स्थापना झाली. यापूर्वीं एक वर्ष लंडनच्या व्यापाऱ्यांनीं मिलन हॉल नांवाच्या हुषार व साहसी इंग्रजास राणीच्या मार्फत अकबर बादशहाशी बोलणे करण्यास हिंदुस्थानांत पाठविलें होते. तो सन १६०२ साली विलायतेस परत गेला. तेव्हा त्याजकडून दिल्लीच्या बादशहाचे वैभव आणि हिंदुस्थानांतील सुधारणा व संपत्ति यांची बरीच कल्पना इंग्रजांना आली.

इलिझाबेथ राणीने अकबर बादशहास व इकडील इतर राजांस देण्या-करतां जे पत्र लिहिले होते ते वाचण्यासारखे असल्यामुळे त्यातील त्रोटक उतारे खालीं दिले आहेत.

" सर्वशक्तिमान् प्रभूने जगांत उत्तम वस्तु उत्पन्न करून सर्वत्र सु-व्यवस्था करून ठेविली आहे. तरी ते प्रभूच्या हुकमाने पृथ्वीवरील सर्व राष्ट्रांस मिळून ईश्वराच्या औदार्याचा फायदा सर्वांस सारखा प्राप्त व्हावा असा ईश्वरी संकेत दिसतो. यामुळे दूरदूरच्या देशांतहि व्यापार होतो आणि लोकांत स्नेहभाव वाढतो. परराष्ट्राचे लोक आपल्या देशांत गेले असतां आपण त्यांचा उत्तम आदरसत्कार करतां म्हणून आमच्या व्यापाऱ्यांस तुमच्या देशांत जाण्याची परवानगी देण्यास आम्हांस उमेद वाटते. त्यांचा योग्य परामर्ष आपण घेतला असतां ते वागणुकींत सभ्य व व्यवहारांत चोख आहेत असे आपल्या अनुभवास येईल व ते आपल्या देशांत आल्याबद्दल वाईट वाटण्याचें कारण उत्पन्न होणार नाहीं. यापूर्वीपासून स्पॅनिश व पोर्तुगीज व्यापारी इक-डचा माल आप या देशांत नेत आहेत; पण ते लोक व्यापाराच्या कामांत

आमच्या व्यापाऱ्यांना व इतर लोकांना नाहक जाच करितात. खरें पाहिलें तर ते हिंदुस्थानांत केवळ व्यापाराचे उद्देशाने गेले आहेत असे नाहीं. तिकडच्या सर्व देशांचे मालक व बादशहा आपणच आहोत असे ते लोक समजतात; व तिकडचे सर्व लोक आमची केवळ प्रजा आहे, असे इकडील लोकांस ते सांगत सुटले आहेत व लिहिण्यांतहि ते तसे उघड लिहितात. आमचे जे लोक व्यापाराच्या सौम्य उद्देशाने आपल्याकडे जात आहेत त्यांस आपण मेहेरबानीनें देशांत येऊं द्याल व व्यापाराचें दळणवळण आणि स्नेह वृद्धिगत कराल अशी आम्हांस आशा आहे. आमच्याकडून पत्र घेऊन जाणारे गृहस्थ आपल्याशी जे ठराव करतील ते आम्ही इमानानें पाळू व त्यांच्यावर आपण जे उपकार कराल त्यांची फेड आम्ही मोटया आनंदाने करू."

सन १६०९ साली कॅप्टन हॉकिन्स नांवाचा इंग्रज दिल्लीच्या बादशहाच्या भेटीस गेला. त्याला बादशहाने सुरत येथे इंग्रज कंपनीनें व्यापार करावा असा परवाना दिला. १६११ साली कारोमांडल किनाऱ्यावर कॅप्टन हिपॉन नामक इंग्रजाने मच्छलीपट्टणाजवळ पेट्टापुली येथे एक वखार घातली. हॉकिन्स याच्यानंतर अनेक इंग्रज व्यापारी मोगल दरबारांत आले होते. १६११ व १६१४ या सालीं पोर्तुगीज व इंग्रज यांच्या आरमारांचे मोठे सामने झाले, व त्यांत इंग्रजांस यश आले. १६१६ साली कॅप्टन किलींग याने कालिकत येथे जाऊन सामूरीशीं व्यापारी तह केला. १६१२ साली विलायतेत समाईक भांडवलाची पद्धती सुरू झाली. त्यायोगाने व्यापारास पुष्कळ भांडवल जमून बराच जोर आला. याच सुमारास कॅप्टन डाऊटन नावांचा इंग्रज व्यापारी सुरतेस आला. त्याने सुरतेच्या व्यापारी अधिकाऱ्यांच्या मदतीने बडोदे अमदाबाद वगैरे गुजराथेतील भागांत फिरून कापूस कपडा नीळ वगैरेचा व्यापार वाढविण्याची योजना केली. १६१४ साली इंग्लंडचा राजा जेम्स याजकडून सर टॉमस नांवाचा विद्वान् व तरतरीत असा वकील जहांगीर बादशहाकडे पाठविण्यांत आला, व त्याच्या मध्यस्थीने या दोन राजांचा तह ठरला. पण दरबारी लोकांच्या धूर्तपणामुळे तहावर बादशहाची सही झाली नाही. तथापि शहाजाद्याच्या मध्यस्थीने इंग्रजांस सुरतेस रहाण्याची, देशांत व्यापाराकरतां प्रवास करण्याची व मोंगल दरबाराबरोबर इंग्रज वकील ठेवण्याची परवानगी मिळाली. एक वर्षभर हिंदुस्थानांत राहिल्यावर सर टॉमस रो यास विलायतेस इतकें नक्की कळवितां आले की, "व्यापारासंबधानें आपल्या इच्छा सफल होण्यास अडचण नाही. बादशहाशी बरोबरीच्या नात्याने कायमचा तह होणें मात्र शक्य नाहीं. मोगलांस मदत करणे किंवा तटबंदी करून किनाऱ्याचें रक्षण करणें असले बेत निरुपयोगी आहेत. व्यापार व युद्ध या दोन गोष्टी परस्पर विरुद्ध होत. समुद्रावर शांतपणें व्यापार करून मिळेल तोच नफा

मिळविण्याचा आपण आपल्या मनांत हेतु ठेवला पाहिजे."

दोन वर्षे मोगल दरबारात राहिल्यावर सर टॉमस रो याने मोगल बादशहापासून जेम्स राजाला एक पत्र घेतले. त्यात इंग्रज व्यापाऱ्यांचा आपण चांगला परामर्ष घेऊ असे बादशहाने वचन दिले होते. सन १६१६ साली कॅप्टन कीलिंग याने दक्षिणहिंदुस्थानात क्रँगेनोर येथे वखार घालण्याचा प्रयत्न केला व झामोरिनच्या कृपेने क्रँगेनोरचा किल्ला इंग्रजास मिळणार होता. पण लवकरच त्यांच्या लोकांना तेथून कूच करावे लागले. व शेवटी त्यांनी कालिकत बंदरावर वखार घातली. याच साली टॉमस केरिज यास सुरतेच्या वखारीचा पहिला गव्हर्नर नेमण्यात आले. १६२७ साली इंग्रज व डच लोकांनी मिळून मुंबई बंदरात आपले ठाणे बसविण्याचा प्रयत्न केला होता पण तो फसला.

हिंदुस्थानात युरोपियन व्यापारी इतके लांब आले त्या अर्थी इकडे तसाच 'कांहीं तरी मोठा सोन्याचा गोळा वाढून ठेवलेला असला पाहिजे, अशी कल्पना होणे स्वाभाविक आहे व ही कल्पना कांहीं खोटी नाहीं. या व्यापाऱ्यात मुख्य इंग्रज व डच हे प्रॉटेस्टंट धर्माचे व पोर्तुगीज हे रोमन क्याथोलिक धर्माचे होते. व युरोपातील तट या वेळी धर्मामुळे पडलेले असल्यामळे हिंदुस्थानात इंग्रज व डच हे सहकारितेने वागत असून दोघेहि मिळून पोर्तुगीजाशी वैर करीत होते. १६१५ च्या सुमारास डच लोकांची इकडील व्यापारात ५१ जहाजे गुतलेली असून त्यांचें तेरा लक्ष पौंड (१ कोटी ३० लक्ष रुपये) भांडवल गुतले होते. याच साली इंग्रजांचाहि व्यापार इतका होता की, अवघ्या दोन जहाजातील मालावर त्यांना १ लक्ष ८० हजार इतकी जकात द्यावी लागली व १६१६ त त्यांच्या अवघ्या एका जहाजातील व्यापारी मालाची किंमत १४लक्ष रुपये करण्यात आली होती. इंग्रजांच्या पहिल्या सफरीस ६ लक्ष ८३ हजार रुपयांचे भांडवल उभारावे लागले. या सफरीत चार जहाजे व ४८० लोक होते. या सफरीत इंग्रज व्यापाऱ्यांना पुष्कळच फायदा झाला. ३० हजार रुपयास खरेदी केलेल्या लवंगासच ३ लक्ष ६० हजार रुपये इंग्लंडात आले. पहिल्या नऊ सफरीत ४६ लक्ष भांडवल गुतले होते व त्यावर दर शेकडा दोनशे रुपये नफा झाला! १६१२ त इंग्लंडात व्यापाराकरिता समाईक भांडवल उभारले गेले, तेव्हां १ कोटी ६२ लक्ष रुपये गोळा झाले व ते ९३४ लोकांनीच उभारले. शिवाजीच्या जन्माच्या आधी ६ वर्षे इंग्लिश व्यापारी कंपनीने पार्लमेंटपुढे १६०१ ते १६२१ पर्यंतच्या वीस वर्षांच्या व्यापाराचा आढावा मांडला. त्यावरून असे दिसते की, या मुदतीत ८६ गलबते बाहेर पाठविण्यांत आली. पैकी ३६ परत आली; ९ बुडाली; ५ खराब झाली; ११ शत्रूच्या हाती गेली; २५ हिंदुस्थानांत माल भरीत होती. तसेच या वीस वर्षांच्या अवधीत रोख रक्कम व विलायती व्यापारी माल मिळून ९३ लक्ष ३८ हजार रुपये इंग्लंड-

बाहेर पाठविण्यांत आले. पैकी ३६ गलबतांनी मिळून आणलेल्या मालाच्या खरेदीची किंमत ३७ लक्ष ५२ हजार रुपये असून, तो माल इंग्लंडांत विकला तेव्हां त्याची किमत २ कोटी ४६ हजार रुपये आली, अर्थात् ३७ लक्षांवर १ कोटी ५३ लक्ष फायदा झाला !

१६१८ चे सुमारास म्हणजे शिवाजीच्या जन्माच्या आधी ९ वर्षे इंग्रज व्यापाऱ्यांनी हिंदुस्थानांत व्यापाराचे बस्तान उत्तम बसविले होते इतकेच नाहीं तर, मोगलाईतील अव्यवस्था पाहून आपले व्यापारी धोरण जोराने अमलांत आणू असाहि त्याना आत्मप्रत्यय येत चालला होता. या साली सर थॉमस रो याने आपल्या वार्षिक रिपोर्टांत असे लिहिले होते:

" जरूर तेवढी फर्माने मिळाली आहेत व कांहीं मिळावयाची आहेत. बादशहाची मर्जी हाच केवळ कायदा असून सर्व दरबारी व्यवहार पैशावर चालतो. या लोकांशी गरीबीने वागून उपयोगी नाही. त्यांस आमचा कटाळा आहे. त्यांचीं बंदरे सधन होती, ती आम्ही भिकेस लावून त्यांचा सर्व व्यापार बुडविला आहे. आमची जरब त्यांजवर जितकी बसेल तितकें आपले काम होत जाईल. या लोकांस तरवारीच्या धारेखाली ठेविले पाहिजे. जर आमच्या मागण्या अधिकाऱ्यांनीं कबूल केल्या नाहीत तर बेलाशक एतद्देशीय व्यापाऱ्यांची गलबते पकडून आम्ही आपले काम भागवावे ! "

## प्रकरण तिसरें

# मराठे व इंग्रज–पूर्वरंग

मागील प्रकरणांत सांगितल्याप्रमाणे सतराव्या शतकाच्या मध्यभागाच्या सुमारास मराठे व इंग्रज दोघेहि आपापली चळवळ करू लागले असल्याकारणानें त्या उभयतांची गांठ कोठें तरी लवकरच पडणें अनिवार्य होतें. ही गांठ मात्र शांतपणे पडणें शक्य नव्हतें. मोगलांची व इंग्रजांची गांठ शांतपणे पडली याचें कारण, मोगल सत्ताधीश होते; त्यांच्यापासून इंग्रजांना व्यापाराचे परवाने व सवलती घ्यावयाच्या होत्या, व मोगलांनाहि इंग्रजांपासून चैनीचे विलायती पदार्थ आणि व्यापारी मालावरील जकातीचा वसूल मिळवावयाचा होता. इंग्रज मोगलाशीं हात बांधून नम्रतेनें वागत व मोगलहि आपण त्यांच्यावर उपकार करीत आहों अशा भावनेच्या आढ्यतेनें वागत. अर्थात् आढ्यता व नम्रता यांचा खटका उडण्याचें कारण नव्हतें. मराठ्याचें व इंग्रजांचें प्रत्यक्ष असें कांहींच नातें नव्हतें. पण मराठ्यानी मोगलांशी या वेळी उघड युद्ध आरंभिलें होतें, व युद्धांत तर ज्याला जसा लाग साधेल तसा तो उगवून घेत असतो. मराठ्यांच्या जवळ मोगलांशी उघड युद्ध करण्याइतकी जय्यत फौज नव्हती, आणि मोगल स्थूल व मिजासी असल्यामुळे चपळ व साध्या रहाणीच्या मराठ्यांना मोगलांवर सांपडेल तेथें छापे घालणें, रसद मारणें, खजिना लुटणें याच गोष्टी लष्करी दृष्टीनें शक्य व इष्ट होत्या. मोगलांनी मराठ्यांच्या राजकीय स्वातंत्र्यावर घातलेल्या दरोड्याच्या मानानें मराठ्यांनी मोगलांच्या खजिन्यावर घातलेले दरोडे कमीच निंद्य ठरतात; आणि वर सांगितल्याप्रमाणे मोगल व मराठे यांचें युद्धच जुंपलेलें असल्यामुळे मराठे आमच्यावर दरोडे घालतात हें मोगलानी म्हणणें नादानपणाचें होतें. युद्धात शत्रूच्या मर्मावर जोराचा घाव घालणें हीच नीति ठरते. तसेंच युध्यमानाच्या संगतीनें अयुध्यमानालाहि त्रास सोसावा लागावा यांत आश्चर्य नाही व दोषहि नाही. इंग्रज हे या युद्धांत सर्वस्वीं मोगलाचा आश्रय करून राहिलेले असल्यामुळे मराठ्यांच्या हल्ल्यांत मोगलांबरोबर तेहि क्वचित् चिरडून जाण्याचा संभव होता.

मराठ्यांचें आधिपत्य या वेळी शिवाजीकडे त्याच्या पराक्रमामुळे आलें होतें. निजामशाहीचा नाश होऊन शहाजी विजापूरकरांच्या नोकरीत शिरला व १६३८ च्या सुमारास मोठी फौज घेऊन दक्षिणहिंदुस्थानांत आपल्या बादशहाकरितां मुलुख जिंकण्यास गेला. तो जो तिकडे रमला तो रमलाच. पुढील जवळजवळ वीस वर्षें शहाजीनें कर्नाटकाकडे घालविली. तो मधूनमधून

इकडे येई; पण १६३६ नतर पुण्याच्या बाजूस शहाजी कायमचा असा कधीच राहिला नाहीं. शहाजीनें आपल्या जहागिरीप्रमाणेच आपली स्त्री जिजाबाई व आपला पुत्र शिवाजी यांचा त्याग करून, नवीन लग्न करून व नवीन जहागीर मिळवून अधिक ऐश्वर्यानें नादण्याचा जणू निश्चयच केला होता. शिवाजीलाहि बापाची अपत्यवत्सलता न लाभली तरी त्याची जहागीर मिळाली होती; व आपल्या तेजस्वी आईच्या आशीर्वादास स्वतःच्या उज्ज्वल महत्त्वाकांक्षेची जोड देऊन, बीजांतून वृक्ष उत्पन्न करावा त्याचप्रमाणे या लहानशा जहागिरीच्या तुकड्यातून प्रचड हिंदुपदपातशाही निर्माण करून त्याने आपल्या बापाला लाजविण्याची आकांक्षा धरली व ईश्वरकृपेनें ती तडीसहि गेली. पण शिवाजींचे समग्र वृत्त सागण्याचे हे स्थळ नसल्याने यापुढील त्याच्या चरित्र क्रमाचे आपणास अगदी उडतउडत पर्यालोचन करणे भाग आहे.

शिवाजी थोडासा मोठा झाल्याबरोबर त्याला आपल्या जहागिरीचा बदोबस्त करावा लागला, आणि तो करिताना जहागिरीच्या सरहद्दीवर असणाऱ्या पुड किल्लेदारांशी त्याला प्रथम झगडावें लागले. राज्यक्रातीच्या सधिप्रकाशाचा हा काळ असल्यामुळे या किल्लेदाराचे चांगलेच फावले होते. हे किल्ले कोणाच्याच ताब्यात राहिले नव्हते. त्यांच्यावर कोणाच मुसलमान पातशहाची फौज उरली नव्हती. यामुळे ज्याच्या हाती तो किल्ला सापडेल तो बळकावून व आसपासच्या मुलखावर धाड घालून ते किल्लेदार आपला गुजारा करीत व आपलें स्वातंत्र्य सभाळीत. अशा किल्लेदाराना जिकणें किवा त्याना वश करून घेणे या उद्योगानें शिवाजीला राजकारणाचे व युद्धकौशल्याचे जिवत शिक्षण मिळाले होते; आणि ह्या किल्लेदाराच्या चरित्रक्रमावरूनच स्वतःस किल्ले सपादण्याची शिवाजीस इच्छा झाली. आपल्या वयाच्या १९व्या वर्षी शिवाजीनें तोरणा किल्ला घेऊन स्वराज्यसमारंभाची मुहूर्तमेढ रोवली. किल्ले घेतल्याने व बाधल्यानें त्याचा आत्मप्रत्यय वाढला; व शहाजीनें कर्नाटकात विजापूरच्या बादशहाकडून जहागीर मिळविली, त्याचवर्षी इकडे शिवाजीनें घाटमाथ्यावरील किल्ल्यांच्या जोडीस विजयदुर्ग सुवर्णदुर्ग रत्नागिरी वगैरे कोकणांतील किल्ले जिकून बापाच्या नव्या जहागिरीहून मोठे व शिवाय स्वतत्र राज्य स्थापले. त्याचा दरारा चोहोकडे बसला. १६४८ त खुद्द विजापूरच्या बादशहाच्या नोकरींतले पांचसातशे पठाण शिवाजीकडे नोकरी मागावयास आले व ते त्याने आपले पदरी ठेवले. बादशहानें या कृत्यास बडखोरी ठरवून शहाजीच्या द्वारे शिवाजीला दाबांत ठेवण्याचा प्रयत्न केला; व तो फसल्यानंतर त्याच्यावर आपली फौज पाठविण्यास सुरुवात केली. तेव्हां शिवाजीनेंहि मोगलांची सरदारी कारणापुरती पतकरून त्याच्या व आपल्या बळावर विजापुरकरांशीं युद्ध आरंभिले. हे युद्ध १६५३ पासून १६६२ पर्यंत चालले. दरम्यान शिवाजीनें अफजुलखानास मारलें ( १६५९ ). कोकण जिकून मराठी

आरमाराचा पाया घातला; व कल्याणपासून गोव्यापर्यंत व भीमेपासून वारणे-पर्यंत म्हणजे सुमारें १५० मैल लांब व १०० मैल रुंद एवढा मुलूख त्याने आपल्या राज्यास जोडला. तेव्हां शिवाजी आपणास आटोपत नाही असे पाहून विजापूरच्या बादशहास शिवाजीशी शहाजीच्या मध्यस्थीने तह करावा लागला ( १६६२ ). या युद्धांतून मोकळें होतांच शिवाजीने मोगलावर आपला मोर्चा फिरविला. एका पातशाहीस जेरीस आणल्यावर दुसरीहि आपण जेरीस आणूं अशी उमेद शिवाजीस वाटू लागणे स्वाभाविकच होते. पण १६६१ साली मोगलाई फौजेने शिवाजीच्या ताब्यांतील कल्याण व भिवंडी घेऊन आपण होऊनच शिवाजीची कुरापत काढली होती. येथून त्याचे मोगलाशी जे युद्ध सुरू झाले ते १६७२–७३ पर्यंत राहूनराहून सुरूच होते.

असो. शिवाजीचा व इंग्रजांचा जो प्रथम संबंध आला तो विजापूरकर व दिल्लीकर पातशहा यांच्याशीं युद्ध करितांनाच आला. विजापूरकराशी युद्ध सुरू असतां शिवाजीनें राजापुरावर सन १६४८ त स्वारी केली. या स्वारीने इंग्रजांस शिवाजीची चांगलीच दहशत बसली. या वेळी राजापुरास इंग्रजाची वखार होती. व शिवाजीचा रोख जरी पातशाही मुलखावर होता तरी इंग्रजां-वरहि त्याचा डोळा होता, याचे कारण असे :

रांगणा येथे विजापुरच्या फौजेचा पराभव केल्यावर शिवाजी राजापुरास गेला. राजापुरास इंग्रजांची वखार असून तेथील इंग्रजाकडून पन्हाळयास वेढा घालणाऱ्या मुसलमानी फौजेला दारूगोळ्याची मदत झाली असा शिवाजीस संशय आला होता. म्हणून वखार लुटण्यापेक्षांहि आपल्या शत्रूस मदत करणाऱ्या इंग्र-जाचे पारिपत्य करावें असा शिवाजीचा हेतु होता. खुद्द राजापुरातून पैसा वसूल केल्यानतर त्याने इंग्रजांची वखार लुटली, व तेथील व्यापाऱ्यांस पकडून दोन वर्षेपर्यंत त्यांना एका डोंगरी किल्ल्यावर कैदेंत अडकवून ठेवलें. राजापुरच्या लुटीत दहा हजार होनांचे इंग्रज व्यापाऱ्यांचें नुकसान झाले, अशा सबबीवर त्यांनी राजापुरची वखार बंद केली. शिवाजीच्या तर्फे इंग्रजांची वखार लुटल्याची गोष्ट नाकबूल करण्यांत आली. कसेंहि असो. शिवाजीचा व इंग्रजांचा प्रथम संबंध आला तो हा असा आला. त्यामुळें शिवाजीची इंग्रजांस फार दहशत बसली. राजापुरची बातमी अर्थात् सुरतेस कळली. यामुळे शिवाजी सुरतेवरहि घाला घालितो की काय अशी भीति त्यांना पडली. "जेथे पहावे तेथें शिवाजी आहेच ! कसाहि प्रसंग आला तरी त्याला तो तयारच" अशा प्रकारचे उद्गार इंग्रजांच्या तोंडी सर्वदा असत. सुरतेवर शिवाजी स्वारी करील ही इंग्रजांची भीति पुढें दोन तीन वर्षांत अखेर खरी ठरलीच.

१६५६ सालीं शिद्दी याकुबखानानें इंग्रजांशीं असें बोलणे लावलें कीं, तुमची डच लोकांनी राजापुरांत वखार घालूं नये अशी इच्छा आहे व माझीहि

शिवाजीपासून उपसर्ग लागू नये अशी इच्छा आहे. याकरितां तुम्ही आम्ही मिळून दुतर्फी बचावाचा तह करूं. मी डच लोकांना राजापुरांत वखार घालू देत नाहीं, व तुम्हीहि मला शिवाजीविरुद्ध मदत करावी. पण सुरतेच्या गव्हर्नरानें या अटी मान्य केल्या नाहीत. अशा प्रकारचा तह झाल्याचें शिवाजीस कळलें तर तो लगेच आपल्यावर हत्यार उपशील व आमची धडगत लागणार नाहीं, असा पोक्त विचार करून इंग्रजांनी शिद्याच्या तहाचा नाद सोडविला, व त्याला अतस्थ पैसे भरून डच लोकांना राजापुरास वखार घालण्यास प्रतिबंध करण्याचे त्यापासून कबूल करून घेतलें.

राजापुरानंतर शिवाजीची व इंग्रजांची गांठ सुरतेस पडली. राजापुरास जसे विजापूरच्या बादशहाच्या अमलाखाली इंग्रज वखार घालून राहिले होते, तसेंच सुरतेस त्यांना मोगलांचा आश्रय होता. सुरत हे प्रथम इंग्रजांचें व्यापाराचें मुख्य बंदर असून तेथें पुष्कळ व्यापारी माल उतरला जाई व मोगलांस जकातीचें उत्पन्नहि पुष्कळ मिळे. शिवाजीला हें श्रीमतीचें माहेरघर लुटायला बरें वाटलें असल्यास नवल नाही. सन १६६३ च्या पूर्वींहि त्यानें सुरतेकडे एखादी स्वारी केली असावी असें दिसतें. सन १६६३ फेब्रुवारी ता० ४ च्या पत्रात इंग्रज वखारीच्या गव्हर्नरानें विलायतेस खालीलप्रमाणें मजकूर लिहून पाठविल्याचें आढळतें. "लॉयल मर्चंट व आफ्रिकन ही जहाजें विलायतेस २९ जानेवारीला निघाली. ती इतक्या उशिरां निघण्याचें कारण, शिवाजीनें सुरतेवर स्वारी करून गांव लुटला हें होय. त्यामुळें कामधंदा बरेच दिवस थांबला असून गलबतांच्या काफिल्यांतून माल उतरणें कठीण झालें होतें आमच्यापूर्वीच्या पत्रानंतर फिरून एक वेळ शिवाजी पुन्हा आल्याची बातमी उठली होती. या वेळेस मागच्या खेपेपेक्षांहि लोकांत गलबल फार झाली लोक गांव सोडून निघून गेले. त्यांनीं आपला पैसाअडका व व्यापाराचा माल किल्ल्यांत आणून ठेवला. कित्येकांनी तर तो किल्ल्याभोवतालच्या खंदकांतहि पुरून ठेवला होता, आणि मोठाली भांडीं नदींत टाकून दिली होती. शिवाजीनें कित्येकांचे हातपाय तोडल्याची वदंता उठल्यामुळें त्याच्या क्रूरपणास लोक इतके भिऊं लागले आहेत कीं, बादशहानें आपली फौज शहरच्या रक्षणास न पाठविली तर शिवाजी आल्याची नुसती हूल उठली तरी लोक गांव सोडून जातील."

सन १६६४ च्या जानेवारी महिन्यांत शिवाजीनें सुरतेवर स्वारी केली त्या वेळीं शहरच्या मोगल गव्हर्नरास रक्षणाच्या कामीं इंग्रजी तोफांची बरीच मदत झाली. वास्तविक शिवाजीची स्वारी सुरत येथील इंग्रज व डच व्यापाऱ्यांवर मुख्यतः नव्हती; तर मोगलांवर होती. तथापि गोऱ्या व्यापाऱ्यांनीं आपापल्या बचावाची तजवीज करून ठेविली होती; इतकेंच नव्हे तर, त्यांनीं मोगलानाहि

मदत दिली. वखारीचा बचाव केल्यामुळे कंपनीनें सुरत येथील प्रेसिडेंट सर जॉर्ज ऑक्सेंडेन यास सुवर्णपदक व दोनशें मोहरांची थैली बक्षीस दिली, आणि बादशहा औरंगजेब यानेहि कृतज्ञतापूर्वक सदर प्रेसिडेंट यास बहुमानाचा पोषाख देऊन सुरत येथील इंग्रज व्यापाऱ्यांना जकातीच्या कांहीं बाबी माफ केल्या.

पुढील साली शिवाजीनें ८५ लहान व ३ मोठी जहाजें घेऊन कारवारावर स्वारी केली. याहि ठिकाणीं इंग्रजांची वखार होती. कारवार हे ठिकाण मजबूत नसल्यामुळें लवकरच तह झाला व शिवाजीला कबूल केलेल्या खंडणीपैकी इंग्रज व्यापाऱ्यांनी आपल्या हिश्शाचे ११२ पौंड भरले.

सन १६७० साली शिवाजीनें सुरतेवर पुनः स्वारी केली. या वेळी त्याच्या १५,००० फौजेनें शहर ताब्यांत घेतले. कित्येक इंग्रज व्यापारी या वेळी प्राणास मुकले व कांहीं व्यापारी मालाची लूटहि झाली. डच व्यापाऱ्यांच्या वखारीला शिवाजीनें उपसर्ग दिला नाही. फ्रेंचांचीहि या ठिकाणी या वेळी वखार होती. तिचे शिवाजीपुढे कांही न चालतां तिला आपल्या हद्दींतून जाण्यास शिवाजीला बिनतक्रार वाट द्यावी लागली. या स्वारीत शिवाजीच्या हाती पुष्कळ माल व खजिना लागला.

यापुढील शिवाजीची व इंग्रजांची गांठ सन १६७३ साली हुबळी येथे पडली. येथेहि इंग्रजांची एक वखार होती व या स्वारीत इंग्रज व्यापाऱ्यांचे सुमारे पाऊण लाख रुपये नुकसान झाले असे इंग्रजांचे म्हणणे आहे. या नुकसानीबद्दल इंग्रज व्यापाऱ्यांनी शिवाजीकडे भरपाई करून मागितली. पण नुकसानी झाली असल्यास किरकोळ झाली असेल, सबब भरपाई करून मिळणार नाही. असा शिवाजीने जबाब दिला. येथेहि शिवाजीचा मुख्य उद्देश इंग्रज व्यापाऱ्यांस लुटण्याचा नव्हता, फक्त मोगलांवर स्वारी करण्याचा होता; तथापि त्या वेळीं शहरांत सर्व देशचे व्यापारी असल्यामुळे त्यांच्या मालाचीहि लूट झाली व इतरांबरोबर इंग्रज व्यापारीहि त्यांत सांपडले. राजापूर हुबळी या दोन व्यापाराच्या ठिकाणी झालेल्या नुकसानीची भरपाई करून मिळण्याबद्दल मुंबईचा डेप्युटी गव्हर्नर ऑनजियर याची शिवाजीकडे पुष्कळ दिवस मागणी होती. पण ती मागणी गैरवाजवी असल्याचे शिवाजीने केव्हांहि मान्य केलें नाही. तथापि शिवाजीस जजिरा येथें शिद्दयावर जलमार्गानें स्वारी करण्यास इंग्रजांची मदत मिळाली तर हवी होती. सबब "पूर्वी काय झाले असेल ते असेल; पण यापुढे इंग्रज व्यापाऱ्यांना आपणांकडून उपसर्ग लागणार नाही" असे शिवाजीने आश्वासन दिले, व फिरून राजापुरास जाऊन तुम्ही वखार घाला, माझी हरकत नाहीं, असें सांगितले. पण पूर्वीच्या अनुभवावरून विशेष प्रकारच्या खातरजमेशिवाय राजापुरास पुनः वखार उभारण्याचे त्यांना धैर्य होईना. शिद्दयाविरुद्ध शिवाजीस मदत करण्याचेंहि इंग्रजांस संकट वाटलें असावे. कारण, मुंबईहून

जंजिरा जवळ असल्यामुळें शिवाजीस मदत केली असतां शिद्द्याच्या आरमाराचा घाला मुंबईवर केव्हां पडेल याचा मेम नव्हता. म्हणून "आम्ही काय व्यापारी ! आम्हांला या युद्धाच्या भानगडी कशाला ? केवळ आपल्या बचावाशिवाय लढाईचे कटकटीत पडण्याची आमची इच्छा नाहीं " असे सांगून इंग्रज व्यापाऱ्यांनी वेळ मारून नेली. तथापि नुकसानीची भरपाई मिळण्याचा नाद मात्र इंग्रजांनीं सोडला नव्हता. १६७३ च्या मे महिन्यांत निकल्स नांवाचा इंग्रज व्यापाऱ्यांचा वकील सभाजीमार्फत शिवाजीच्या भेटीस गेला. पण या भेटींत कांही निष्पन्न झाले नाही.

१६७४ मध्ये मराठ्यांचे दहा हजार सैन्य साष्टीस आले, आणि वसई प्रांतांतून चौथ वसूल करण्यास त्याने आरंभ केला. यामुळे मुंबईच्या इंग्रजांस फार दहशत बसली. याचा परिणाम असा झाला की, शिवाजीस रायगड येथे राज्याभिषेक झाला त्या वेळी इंग्रज व्यापाऱ्यांतर्फे मुंबईहून हेनरी ऑक्सेडेन हा बरोबर दोन इंग्रज व्यापारी घेऊन शिवाजीचे अभिनंदन करून नजराणा देण्याकरितां गेला. या प्रसंगी शिवाजी व इंग्रज यांचा शांतपणाने निकट परिचय होऊन तहहि ठरला. ह्या तहावर ६ एप्रिल सन १६७४ या दिवशी सह्या झाल्या. तह २० कलमी असून त्यांत पुढील ४ मुख्य मुद्दे होते:—

( १ ) राजापूर येथे झालेली ऐन नुकसानी इंग्रजास शिवाजीने भरून द्यावी. राजापूर दाभोळ चौल व कल्याण येथे वखारी घालण्यास इंग्रज व्यापाऱ्यांना परवानगी मिळावी. शिवाजीच्या ताब्यांतील सर्व मुलखांत इंग्रजांनी व्यापार करावा. त्यांनी मालाची खरेदी विक्री स्वतःस व्यापारी दृष्टीने योग्य वाटेल त्या दराने करावी. दराच्या बाबतीत ते अमुकच असावे अशी सक्ती शिवाजीकडून इंग्रजास होऊ नये.

( २ ) शिवाजीच्या मुलखांत आणलेल्या मालावर इंग्रजांनी किमतीवर शेकडा २॥ टक्के जकात द्यावी.

( ३ ) इंग्रज व शिवाजी या उभयतांची नाणी परस्परांच्या मुलखांत मानली जावीं.

( ४ ) एकमेकांनी एकमेकांची घेतलेली जहाजे परत द्यावी.

राजापूर येथील वखारीच्या नुकसानीबद्दल वेगळा विशेष ठराव होता. नुकसानीची रक्कम १०,००० मोहरा, पण त्या इंग्रजांस प्रत्यक्ष न मिळतां अन्य रीतीने त्यांची पोंच व्हावी. ती अशी की, इंग्रजांनी शिवाजीपासून पुढील तीन वर्षांत दरसाल ५०००प्रमाणे १५,०००मोहरांच्या किमतीचा माल खरेदी करावा. त्यांपैकीं इंग्रजांनीं फक्त साडेसात हजार मोहरा नगद द्याव्या आणि बाकीच्या साडेसात हजार मोहरा राजापूर येथें फिरून वखार स्थापन होईल तेव्हां आयात मालावर इंग्रजांनी जी जकात द्यावयाची तींतून वळत्या करून

घ्याव्या. जिंकलेली जहाजे परत देण्याची अट शिवाजीनें मोठ्या कष्टानें मान्य केली. कारण लढाईत जिंकलेल्या लुटीवर राजाचा विशेष हक्क व प्रेम असतें. इंग्रजी टांकसाळेतील नाण्यासंबंधानेंहि शिवाजीनें एकदम मान्यता दिली नाही. या नाण्यांत खरोखर जितकें सोनें रुपें असेल तितकीच त्याची किमत धरावी, त्यावर लिहिलेली किमत धरू नये असें शिवाजीचें म्हणणें होतें. पण शेवटी या दोन्ही शर्तींविषयींचा आग्रह शिवाजीनें सोडला. तहांत लिहिल्याप्रमाणें राजापूर येथें फिरून इंग्रजांनी वखार घातली; पण पुढे ती फारशी किफायतशीर झाली नाही.

सन १६७८ साली ५७ जहाजांचें आरमार व चार हजार सैन्य घेऊन पनवेलीवर व शिद्दी कासीम याजवर हल्ला करण्याचा शिवाजीचा विचार होता. पण इंग्रजांनी मध्यें पडून शिद्दयाचें रक्षण केलें. आम्ही व्यापारी लोक, कोणाच्या भांडणांत कशाला पडा ? अशा त्रयस्थपणाच्या विचारानें राहण्याचें इंग्रजांनी योजिलें होतें, तथापि त्यांच्या हातून सर्वस्वी तसें घडत मात्र नसे. जंजिऱ्यापासून मुंबईपर्यंतच्या समुद्रकिनाऱ्यावर शिद्दी व मराठे या उभयतांच्या जहाजांची नेहमी युद्धें होत. मुंबई बंदर इंग्रजांचे ताब्यांत असल्यामुळें मराठ्याच्या मुलखावर स्वारी करून अथवा किनाऱ्यावरील प्रजेला त्रास देऊन शिद्दयाच्या आरमाराला मुंबई बंदरांत आश्रय घेतां येत असे. यामुळें इंग्रज शिद्दयाला आतून सामील आहेत असा संशय शिवाजीस वारंवार येई. एक वेळी तर शिद्दयाचा बंदोबस्त करा नाही तर तुम्हांस जड जाईल असा धमकीचा खडखडीत निरोप शिवाजीनें मुंबई येथील इंग्रज प्रेसिडेंटास पाठविला. तेव्हां इंग्रजांस आपला त्रयस्थपणा बाजूस सारून अगोदर शिद्दयाचा बंदोबस्त करावा लागला. शिद्दयाच्या त्रासामुळें मराठी सैन्याच्या मुंबईवर एकदोन स्वाऱ्या होण्याचा बेत आला होता, पण तो टळला. सन १६८० च्या एप्रिल महिन्यात शिवाजीच्या मुलखांत पकडलेले कित्येक हिंदु लोक शिद्दयानें मुंबई बंदरात विकावयास काढले, तेव्हा मुंबईतील इंग्रजांनी एकवीस हिंदु लोकांचा पत्ता लावून त्यांना गुलामगिरीच्या संकटांतून सोडविलें. सन १६७९ साली पश्चिमकिनाऱ्यावरील आरमार बरेंच कमी करण्याचें कंपनीच्या बोर्डानें ठरविलें. त्यामुळें मुंबईकरांस मराठ्यांची फार भीति वाटू लागली. पण शिवाजीच्या मरणानें त्यांची भीति लवकरच कमी झाली.

शिवाजी व इंग्रज यांच्या संबंधाविषयींची हकीकत अलीकडील इतिहाससंशोधक मंडळींनीं प्रसिद्ध केलेल्या कागदपत्रांतून फारशी उपलब्ध होत नाही. बखरींतून तर इंग्रजांचा नामनिर्देशहि फारसा आढळत नाहीं; मग कोणत्याहि व्यवहाराची कच्ची हकीकत सांपडणें अशक्यप्राय आहे. पण शिवाजीच्या वेळीं इकडे असणाऱ्या इंग्रज व्यापारी कंपनीचे सरकारी कागदपत्र त्यांच्या दप्तरांतून उप-

लब्ध होत असून पुष्कळसे छापलेहि गेलेले आहेत. त्यांच्या व इतर माहितीच्या आधाराने इंग्रज इतिहासकारांनीहि या विषयावर प्रबंध लिहिलेले आहेत. त्यांत मात्र माहिती बरीच मिळते. या माहितीवरून एकच निष्कर्ष निघतो व तो हा कीं, शिवाजीचा व इंग्रजांचा जेवढा संबंध आला तेवढ्यांत शिवाजीने इंग्रजांवर आपली छाप उत्तम रीतीने बसविली होती; व तेहि त्याच्याशी भिऊन अदबीने वागत. आतां, कित्येक ठिकाणीं इंग्रज ग्रंथकारांनी अशी विधाने केलेली आहेत कीं, "इंग्रजांपुढे शिवाजीचे कांही चालले नाही, त्यास त्यांच्यापुढे हारच खावी लागली." पण त्यांनीच दिलेल्या समग्र हकीकतीने या अनुमानाचे अनायासे खंडण होते. रा. सरदेसाई यांनी या विषयावरील इंग्रजी ग्रंथांचे परिश्रमपूर्वक पर्यालोचन करून आपल्या 'मराठी रियासती'च्या पुस्तकांत या मुद्द्यास कांहीं पाने दिली आहेत; त्यांतील कांहीं भाग प्रायः त्यांच्याच शब्दांनी खालीं देत आहोः—

"शिवाजीपासून बराच उपद्रव झाला असूनहि त्याजला सन्मानपुरःसर मोठेपणा देणे इंग्रज व्यापाऱ्यांस भाग होते. इंग्रजांस धान्यसामग्री व सर्पण ही शिवाजीच्या मुलखातून येत होती. म्हणून सुरतेस तो त्रास देत असतांच मुंबईचे इंग्रज व्यापारी त्याची मोठ्या आर्जवाने समजूत घालींत होते. सन १६७२ त कुलाबा जिल्ह्यांतील घोडबंदरची पोर्तुगीज वसाहत काबीज करण्याचा शिवाजीने प्रयत्न केला, तेव्हां तर मुंबईचे इंग्रज अगदीच घाबरून गेले, व त्याची मर्जी संपादून स्नेहाचा तह करण्याकरितां मिस्टर उस्टिक यास त्यांनी शिवाजीकडे पाठविले. हा तह करण्यात शिवाजीचाहि फायदाच होता. कारण, त्यांच्या व्यापारामुळे शिवाजीने जिंकलेल्या प्रदेशाची किंमत वाढू लागली होती; व इंग्रजांशी सख्य झाल्याने त्यांनी मोगल फौजेस शिवाजीवर आपल्या ठाण्यांतून येऊ दिले नसते. शिवाजी तह करण्यास कबूल झाला. उस्टिकने पूर्वीच्या नुकसानीबद्दल म्हणून ३२ हजार पॅगोडांची मागणी केली, ती मात्र शिवाजीने धुडकावून दिली. "तुम्हीं राजापुरास आपली वखार घालावी व जंजिऱ्याचे शिद्दीचा पाडाव करण्यास आपणास मदत करावी, म्हणजे इतःपर तुमच्या वाटेस न जातां तुमच्याशीं स्नेहसंबंध ठेवू," असे शिवाजीने इंग्रज वकिलास सांगितले. या दोनहि अटी इंग्रजांस कबूल झाल्या नाहींत. दुसऱ्यांदां सन १६७३ च्या मेमध्यें निकोल्स नामक वकील इंग्रजांकडून शिवाजीकडे आला. त्याने संभाजीचे मार्फत शिवाजीची भेट घेतली; परंतु त्याच्यापासून महत्त्वाची अशी कोणतीच गोष्ट घडून आली नाहीं.

"शिवाजीला जिकडे तिकडे विजय प्राप्त झाल्यामुळें त्याचीं कृत्यें सर्व मराठ्यांस आवडूं लागलीं, व त्यांच्या संमतीने सन १६७४ त त्यानें राज्यपदाचा यथाविधि स्वीकार केला. त्या समारंभास हेनरी आक्सेंडेन मुंबईचा डे. गव्हर्नर

हा हजर होता. ईस्ट इंडिया कंपनीच्यातर्फे दुसरे दोन इंग्रज व्यापारी बरोबर घेऊन तो समारंभास रायगडावर गेला होता. त्या वेळीं साधल्यास शिवाजीशीं तह करण्याचाहि आक्सेंडेनचा विचार होता. या कामासाठी हे कंपनीचे वकील सन १६७४ च्या एप्रिल महिन्याच्या अखेरीस मुंबईहून जहाजांत बसून निघाले, ते प्रथम चौलास जाऊन दुसरे दिवशी रोह्यास पोचले. रोह्याहून पालखी करून ते निजामपुरास आले. पांचवे दिवशी रायरी डोंगराच्या पायथ्याशी पाचाड म्हणून गांव आहे तेथे त्यांनी मुक्काम केला. शिवाजी प्रतापगडावर असल्यामुळे पाचाड येथे त्यांस कांहीं दिवस काढावे लागले. नारायणजी पंडित नांवाचा शिवाजीचा हुशार कामगार त्यांस पाचाड येथे भेटला. शिवाजीच्या उद्देशांची त्याने इंग्रज वकिलास चांगली ओळख करून दिली. जंजिऱ्याचे शिद्दीशीं तह करावा व त्यास बुडविण्याचा प्रयत्न शिवाजीने करू नये; तसेंच आपणास व्यापाराच्या सवलती देऊन उभयतांचा फायदा करून घ्यावा, असे इंग्रजी वकिलाचे मागणे होते. नारायणजीने वकिलास असा सल्ला दिला की, "शिद्दीविषयी शिवाजीशी बोलणे काढाल तर तुमचा सर्वच बेत फसेल. शिद्दीचा समूळ उच्छेद करण्याचा शिवाजीचा विचार असल्यामुळे तो तुमच्या बोलण्यास मान देणार नाही. तुमचे व्यापाराचे बोलणे वाजवी आहे; आपल्या राज्यांतील व्यापार वाढविण्याची शिवाजीचीहि फार इच्छा आहे. आजपर्यंत धामधुमीत काळ गेल्याने या गोष्टीकडे लक्ष देण्यास शिवाजीस फुरसत मिळाली नाहीं; परंतु आतां राज्याभिषेक झाल्यावर राज्यव्यवस्थेचेंच काम तो हातीं घेणार आहे." नारायणजीचा अधिकार व धूर्तता विशेष आहे असे इंग्रज वकिलास आढळून आले, आणि त्याने त्यास एक आंगठी नजर केली.

"ता. १९ मेच्या सुमारास शिवाजी रायगडास परत आल्यावर इंग्रज वकील किल्ल्यावर गेले. वाड्यापासून एक मैलावर वकिलांस राहण्यासाठी बंगला देण्यांत आला, व तेथे ते मोठ्या आनंदाने राहूं लागले. शिवाजी त्या वेळी फारच गडबडीत होता. तथापि वकील आल्यानंतर चार दिवसांनी नारायणजीच्या मार्फत त्यांची शिवाजीने भेट घेतली. व्यापारवृद्धीविषयी इंग्रजांचे म्हणणे शिवाजीस फारच पसंत पडले; व त्याजबद्दलची वाटाघाट करून तहाची कलमे ठरविण्याचे काम शिवाजीने पेशवा मोरोपंत पिंगळे याजकडे सोंपविले. पुढे शिवाजीस नजर करण्याकरितां ज्या जिनसा इंग्रज वकिलांनी आणल्या होत्या त्या कशा रीतीने द्याव्या हे दोन दिवसांनी त्यांनी नारायणजीस भेटून ठरविले; व मोरोपंत पेशव्याच्या मार्फत त्या जिनसा शिवाजीस देण्यांत आल्या. तसेंच तेथील मोठमोठ्या सर्व अधिकाऱ्यांस कांहीं तरी वस्तु नजर करणे चांगले असेंहि नारायणजीने त्यांस सांगितले. त्याप्रमाणे त्यांनीं बहुतेकांस पोषाख वगैरे दिले. शेवटी नारायणजीच्या मार्फत तहाविषयी शिवाजीचा अभिप्राय इंग्रज वकिलांस कळला.

अभिषेकाच्या दिवशीं झालेल्या मोठ्या दरबारास इंग्रजांचा एक मोठा वकील गेला होता. या दरबारचे चित्तवेधक वर्णन त्यानें लिहून ठेवलें आहे. अभिषेकानतर कांहीं दिवसांनी तह करून त्याजवर सर्व अधिकाऱ्यांच्या सह्या वगैरे झाल्यावर इंग्रज वकील परत निघाले. ते त्या वर्षाच्या नारळी पौर्णिमेच्या सुमारास मुंबईस पोचले.

"शिवाजीचे आरमार किती मोटे होते, याचा कारवारच्या इंग्रज व्यापाऱ्यांनी सन १६६५ त उल्लेख केला आहे. त्यावरून असे दिसते की, त्या वेळेस कमीत कमी ८५ तारवे (फ्रिगेट्स) व तीन जहाजे ( शिप्स ) शिवाजीपाशीं होतीं. कागदावरील अक्षरावरून पाहिले तर युरोपांतील बलिष्ठ राष्ट्रांस सुद्धां त्या वेळेस एवढ्या आरमाराची दहशत पडली होती. परतु शिवाजीची तारवे फार मोठी नसावी असा इंग्रजांचा अदाज आहे.

"पश्चिमकिनाऱ्यावर इंग्रज अगदी स्वस्थ न बसता साधेल तितका लाग साधीत होते. त्यांचे जंजिऱ्याच्या शिद्दीशी बरेच व्यवहार चालू होते. शिवाजीच्या मुलखावर स्वारी करण्यासाटी मुंबईच्या बदरांत आपले आरमार ठेवण्याची परवानगी हा शिद्दी इंग्रजापाशी वारवार मागे: परतु इंग्रजास शिवाजीची भाति असल्यामुळे त्यांच्याने शिद्दीस उघड आश्रय देववत नसे. आश्रय न द्यावा तर दुसरीकडून मोगल बादशहाची भीति इंग्रजास होती. सन १६७७ त शिद्दी सबूळ हा दांडगाईनें मुंबई बदरांत वरवा करून तेथून शिवाजीच्या कुर्ला वगैरेकडील मुलखात उपद्रव देऊ लागला. त्यानें एका ब्राह्मणास वश केले व त्याजला गलबते व पैसे देऊन शिवाजीचे प्रदेशातील कित्येक प्रमुख ब्राह्मणांस वश करून आपल्याकडे आणण्यासाटी पाटविले. पकडून आणलेल्या ब्राह्मणाचे शिद्दीने नाना तऱ्हेने हाल केले. हे शिवाजीस समजतांच त्याने शिद्दीस आश्रय दिल्याबद्दल इंग्रजांस अशी कांहीं जबरदस्त तबी दिली की, लगेच कपनीच्या प्रेसिडेंटानें शिवाजीच्या मुलखास उपद्रव देणाऱ्या ११ इसमांस पकडून तिघांस देहांत शिक्षा दिली, व बाकीच्यांस गुलाम करून आफ्रिकेच्या पश्चिमीकनाऱ्यावर सेंट हेलना येथे पाटविले. दुसऱ्या वर्षी पुनः असाच प्रकार होऊन शिद्दीने अनेक ब्राह्मणांचा छळ केला. या शिद्दीचा सर्व डोळा ब्राह्मणांवर असे. कारण, शिवाजीस ब्राह्मण चांगले साह्य करीत असत. पुढे दुसऱ्या कामामुळे शिद्दीचा सूड घेणें तसेच राहिले. सन १६८० च्या एप्रिल महिन्यांत शिद्दीने शिवाजीच्या मुलखांतून कांहीं लोक पकडून मुंबईत विक्रीस आणले. हे इंग्रजांस समजतांच त्यांनी २१ असामींस शिद्दीच्या हातून सोडवून स्वदेशीं पाठविले. तरी इंग्रज आपल्या बंदरांत शिद्दीस थारा देतात हे शिवाजीस खपेना व दोघांवरही चांगला दाब ठेवतां यावा म्हणून सन १६७९ (?) च्या भर पावसाळ्यांत शिवाजीने मुंबईच्या लगत्यास असलेले समुद्रांतील खांदेरी

बेट काबीज केले. तेव्हांपासून खादेरीहून त्यास शिद्दी व इंग्रज या दोघांवरही चांगला दाब ठेवतां येऊ लागला. शिवाजीनें खांदेरी घेतल्यामुळे इंग्रजांस फार वैषम्य वाटले. पोर्तुगीज लोकांनी मुंबईबरोबरच हीं बेटे आपल्यास दिली, असा इंग्रजांनी आपला हक्क दाखविला. हा हक्क वसईस पोर्तुगीज लोकांस समजतांच त्यानी इंग्रजास झिडकारून लावले, व स्वतः आपलाच हक्क ते सांगू लागले. पुढे इंग्रजानी शिद्दीशी सख्य करून खांदेरीस शिवाजीच्या आरमारावर स्वारी केली. शिवाजीच्या लोकानी इंग्रजांस शांतपणे बेटावर येऊ दिले, व मग त्या सर्वांचा शिरच्छेद केला ! नतर 'रिव्हेंज' नामक इंग्रजाचे पधरा तोफांचे जहाज व दोनशे लोक असलेली दुसरी गलबते खांदेरीजवळ मराठ्यास अडाविण्याकरितां आक्टोबर महिन्यात आली. कॅप्टन मिंचिन व केग्विन हे त्या जहाजांवर मुख्य होते. तेव्हां इंग्रज व मराठे यांची निकराची लढाई होऊन दोघांचीहि पुष्कळ खराबी झाली. तरी ज्यावर इंग्रजांचा पुष्कळ दिवसांचा डोळा होता ते खादेरी बेट इंग्रजास मिळाले नाही. या वेळी दौलतखान हा शिवाजीच्या आरमाराचा मुख्य होता.

खांदेरी व त्याच्या शेजारचे दुसरे लहान बेट उंदेरी ही दोन खडकाळ बेटे एकमेकांपासून पाऊण मैलाच्या अंतरावर असून मुंबईहून आगबोटीत बसून दक्षिणेस जाताना लागतात. त्याजवर वस्ती नव्हती; परतु त्यांतून इंग्रजांस सरपण मिळे, व मुंबई बंदरात येणाऱ्या सर्व जहाजांवर तेथून चागली देखरेख ठेवतां येई. ती बेटे काबीज करण्याकरितां इंग्रजांनी नाना तऱ्हा केल्या. शिवाजीशीं युद्ध करून ती परत घेण्याकरितां त्यांनी कोर्ट आफ डायरेक्टरकडे पुनःपुनः परवानगी मागितली. कोर्ट ऑफ डायरेक्टरांनी दर खेपेस इतकेंच लिहावे की, "खांदेरी-उंदेरीकरिता आम्हास लढाई कर्तव्य नाही, हे तुम्हास वारंवार कळविलेलेंच आहे. शिवाय अशा प्रकारचे युद्ध करण्याचा आपला बाणा नाही, व त्यांत आपला फायदाहि नाही, म्हणून लढाई करू नका, असे कठशोष करून आम्ही तुम्हांस सांगत आहो." या लिहिण्यावरून आपल्याविषयी एतद्देशीय लोकांचे मनावर झालेला परिणाम पाहून मुंबईकर इंग्रजास अत्यत दुःख झाले. त्यांनी खालीं लिहिल्याप्रमाणे येथील लोक आपल्यास हिणवितात असे विलायतेस लिहून पाठविले.

"तुमचे लोक ( इंग्रज ) इतकी बढाई कशास मारतात ? तुम्ही कोणते विजय संपादले आहेत ? तुमच्या तरवारीनें कोणते महत्कृत्य केलें आहे ? तुमचा हुकूम कोणीं मानिला आहे ? तुमच्यापाशीं आहे काय ? डच लोकांनी तर तुमच्यावर शह ठेवलाच ! पोर्तुगीज लोकांनीं कांही माणुसकीचीं कामें तरी केली आहेत; परंतु तुमची तर सर्व लोक टर उडवितात. मुंबई तरी तुम्ही जिंकून थोडीच घेतली ! व ती तरी राखण्याचें सामर्थ्य तुमच्यांत कोठे आहे ? असे

असून तुम्ही उगाचच लढाईचा डौल मारतां आणि आमच्या राजांची बरोबरी करतां ती काय म्हणून ?" परतु हे शब्द खरे करून दाखविण्यास मराठ्यांचा पुरस्कर्ता शिवाजी यापुढें वांचला नाही. तरी मरणापूर्वी इंग्रजांस त्याने आपल्या तत्राने वागण्यास लावले. खांदेरी घेण्याचा नाद इंग्रजांनी साफ सोडून दिला. त्यांचे आरमार खांदेरीकडे शिद्दीच्या मदतीस होते ते त्यानी परत बोलाविले व सन १६८० च्या मार्च महिन्यांत शिवाजीच्या वकिलाबरोबर त्यांनी तह केला. शिद्दीस मुंबई बंदरांत आश्रय द्यावयाचा नाही असे त्यांनी कबूल केले, व सन १६७४ तील तह पुनः कायम करण्यांत आला.

"शिवाजीचा दरारा इग्रजांस किती होता, याचा उल्लेख ईस्ट इंडिया कपनीच्या इतिहासात पदोपदी आढळतो. कोणी मराठा सरदार आला तरी शिवाजीच आला असे इग्रजांस वाटे. शिवाजी हे एक सामान्य नामच होऊन बसले होते ! सन१७०३साली इग्रज व्यापाऱ्यानी सुरतच्या डायरीत असे लिहून टेवले आहे की, " शिवाजी पुनः सुरतेवर येत आहे. त्याची फौज तर अगोदरपासूनच सुरतेच्या आसपास गोळीबार करीत आहे !" या भीतीने त्यांनी सुरतच्या टाण्याची विशेष मजबुती केली! त्या वेळेस कित्येक इग्रज कारकून मड-ळीस लष्करी काम सांगण्यात आले; व ते त्यांनीं केले नाही म्हणून कित्येकांस शिक्षाहि झाल्या. सारांश, हा सगळा प्रभाव शिवाजीच्या नांवाचा. बगाल्यांतील इग्रज व्यापाऱ्यास तर शिवाजी अमरच आहे असे वाटे. सन १६८० च्या एप्रिल महिन्यांत शिवाजी मरण पावला, ही बातमी मुबईच्या प्रेसिडेटाने कलकत्त्यास कळविली, त्या वेळेस कलकत्त्याहून जबाब आला तो असाः "शिवाजी इतक्या वेळां मेला आहे की, तो अजून अमरच आहे असे कित्येकांस वाटू लागले आहे. त्याची मरणाची वार्ता लोकास खरी न वाटण्याचे कारण असे की, आजपर्यंत त्यास जिकडे तिकडे विजयच येत गेले व त्याचप्रमाणे त्याच्या मागे हिमतीने काम चालविणारा मनुष्य कोणी नसल्यामुळे मराठ्यांच्या ताव-डीतून सुटल्याचा आम्हांस प्रत्यक्ष अनुभव येईल तेव्हांच शिवाजी खरोखर मेला असे आम्ही समजू !"

ज्या खांदेरी-उदेरीसंबंधानें शिवाजीचा व इग्रजांचा सबध आला त्याची थोडक्यांत हकीगत ही अशी आहे. उदेरीजवळचे खांदेरी बेट ही मुबई बंदरा-नजीक एक नाक्याची व माऱ्याची जागा आहे. यामुळे मराठे हबशी व इग्रज हे तिघेहि हें बेट आपल्या ताब्यांत ठेवण्याचा प्रयत्न करीत होते. आपल्या मृत्यूच्या आदल्याच वर्षी शिवाजीने हें खांदेरी बेट हस्तगत केलें होते. येथून खुद्द हबशाला—व इंग्रज हबशाला कुमक करितात किंवा आश्रय देतात असे वाटेल तेव्हां इंग्रजांना—शह देणे शिवाजीला सोईचें पडत असे. अर्थात् हबशी व इंग्रज यांची मराठ्यांविरुद्ध जूट झाली. १६७९ च्या आगष्टांत शिवाजीने

तीनशे शिपाई व तीनशें मजूर यांस बरोबर सामानसुमान व दारूगोळा देऊन खांदेरी बेटाची डागडुजी व तटबंदी करावयास पाठविले. असे पाहून मुंबईच्या गव्हर्नरानेंहि मालाच्या तीन जहाजात चाळीस गोरे खलाशी घालून शिवाजीच्या लोकांस प्रतिबंध करण्यास पाठविले. पण त्याचा कांही एक उपयोग झाला नाही. दहाबारा दिवस बेटाच्या आसपास फिरून ही जहाजे मुंबईस परत आली. तेव्हां १६ तोफांचें एक लढाऊ गलबत बरोबर देऊन फिरून तीच तुकडी मुंबईहून खांदेरीस रवाना करण्यात आली. तारीख १९ सप्टेंबर रोजी मराठ्यांनी या स्वारीपैकी एक लेफ्टेनेंट मारून सहा गोरे खलाशी कैद करून बेटावर नेले. याच सुमारास चौल येथे शिवाजीचे आरमार तयार होत होते असे पाहून मुंबईकरांनी दुसरी कित्येक जहाजे भाड्याने घेऊन एक मोठा काफिला तयार केला. त्यांत सुमारे २०० गोरे शिपाई होते. या दोन आरमाराची लढाई खांदेरीजवळ ता. १६ आक्टोबर सन १६७९ रोजी होऊन प्रथम इंग्रजी आरमाराचा मोड झाला. पण रिव्हेंज नामक त्यांच्या जहाजानें विशेष नेट धरल्यामुळे व मराठ्यांचे आरमार पांच तारवे बुडाल्यामुळे परत फिरले व नागोठणच्या खाडींत शिरले.

या सुमारास शिवाजीचे पाच हजार सैन्य कल्याणास आले, व ठाण्यावरून माहीम येथे जाऊन मुंबईवर हल्ला करण्याचा त्याचा विचार होता. पण ठाण्यावरून जाण्यास पोर्तुगीज सरकाराकडून त्यास परवानगी मिळेना. इकडे मुख्य आरमार परत गेले तरी त्याचे लहानसहान पडाव रात्रीच्या अंधारात इंग्रजी आरमाराचा डोळा चुकवून खांदेरी बेटावरील मराठ्यास शिधासामग्री नेऊन खुशाल पोचवीत. पुढे खांदेरीच्या किल्ल्यावर मराठ्यानी तोफा चढवून इंग्रजाच्या आरमारावर मारा सुरू केला, तेव्हा हे आरमार तेथून उठून नागोठणच्या खाडीच्या तोंडी जागा धरून राहिले. नोव्हेंबरांत हबशाचे आरमारहि सुरतेच्या अधिकाऱ्यांशी सलोखा करून व सामानसुमान घेऊन खांदेरीजवळ इंग्रजी आरमारास येऊन मिळाले. पण हबशी व इंग्रज या दोघांनाहि खांदेरी बेट आपणा एकट्यासच हवे असें वाटत असल्यामुळे दोघांनी मिळून बेटावर हल्ला करण्याची मसलत बरेच दिवस बनेचना. तेव्हा शिद्दी कासम हा एकटाच खांदेरी बेटावर तोफांचे गोळे टाकू लागला. पण त्याचा कांही उपयोग होत नाही असे पाहून त्याने आपले लोक समोरच्या उंदेरी बेटावर उतरवून ते बेट तो हाताखालीं घालून बसला.

इकडे शिवाजीने रायगडाहून मुंबईस इंग्रजांकडे वकील पाठवून तहाचे बोलणे सुरू केलें होते. "तुम्ही हबशाशी संगनमत करून वागतां ते खरें की खोटें हे खांदेरीप्रकरणावरून पहा," असे वकिलानें अंगी लावताच मुंबईच्या गव्हर्नराने आपले आरमार खांदेरीहून परत बोलाविले; आणि हबशाचे आरमार

मराठ्यांच्या मुलखावर हल्ला करणार नाही अशी हमी देईल तरच आम्ही त्यास मुंबई बंदरांत थारा देऊं, अशी इंग्रजांनी शिवाजीच्या वकिलाची खातरी केली.

१६८० साली शिवाजी वारला व संभाजी गादीवर बसला. या वेळी शिद्याच्या स्वाऱ्या पश्चिमकिनाऱ्यावर होत असल्यामुळे संभाजीने शिद्याशी एकदम युद्ध आरंभिले. शिद्याच्या आरमाराशी संभाजीच्या आरमाराची पहिली लढाई मुंबई व अलिबागच्या दरम्यान उंदेरी बेटाजवळ झाली. तींत शिद्याचा जय होऊन त्याने ७० मराठ्यांचीं डोकी तोडून मुंबईस आणली व ही डोकी भाल्यावर अडकवून त्यांची किनाऱ्यावर रांग लावून आपल्या विजयश्रीचे प्रदर्शन करण्याचा त्याचा विचार होता; पण मुंबई बेट प्रत्यक्ष इंग्रजांच्या ताब्यात असल्यामुळे त्यानी हे भयंकर प्रदर्शन करण्याची मनाई केली. याच सुमारास संभाजीने इंग्रजांशीहि युद्ध सुरू केले. कारण, वर सांगितलेल्या तहांतील शेवटच्या म्हणजे शिद्यासंबंधाच्या कलमाचा अमल इंग्रजांनी बरोबर केला नाही. १६८२ सालीं संभाजीने मुंबई बंदरांतील एलीफंटा बेटाची डागडुजी व तटबंदी सुरू केली. १६८३ साली मस्कत येथील आरबी चाचे लोकांनीं प्रेसिडेंट नावाचे इंग्रजांचे जहाज फोडून लुटले. हे आरब खलाशी संभाजीनेच पाठविले असे राजापूर येथील इंग्रजानी मुंबईस कळविले. त्यावरून मुंबईकरांनीं आपला वकील संभाजीकडे रायगडास पाठविला. परंतु ह्या आरबाची आपणास वार्ताहि नाही असे संभाजीने सप्रमाण दाखवून दिले.

सन १६८६ साली कंपनीचे मुख्य हपीस सुरतेहून मुंबईस येऊन दाखल झाले, व सुरत हे एक यापुढे दुय्यम प्रतीचे ठाणे होऊन राहिले. पण संभाजीचे लक्ष यापुढे मुंबईकडून उठून दक्षिणकोंकणप्रांती गोव्याकडे लागले; आणि पोर्तुगीज लोकांवर स्वारी करण्याच्या भरात इंग्रजांकडील त्याचा संबंध बराच कमी झाला.

राजारामाची बहुतेक कारकीर्द मोगलांशी दूरदेशी झगडण्यांत गेल्यामुळे त्याचा व इंग्रजांचा फारसा संबंध आला नाही; सन १७०३ साली फेब्रुआरी महिन्यांत मराठे सुरतेकडे गेले व त्यांनी सुरत शहरच्या आसपास दोन मैलांवरचीं खेडीपाडीं लुटून जाळपोळ केली; पण प्रत्यक्ष सुरतेत प्रवेश न करतां मराठी फौजा अखेर परत फिरल्या. सुरत लढविण्याची याहि वेळी कंपनीच्या अधिकाऱ्यांनी जय्यत तयारी केली होती. फिरून १७०६ सालीं अहमदाबादेजवळ मराठ्यांनी मोगलांचा पराभव केल्यावर सुरत व भडोच यांचे दरम्यान मराठी फौजा पसरल्या होत्या व त्यांनीं या दोन्ही शहरांतील लोकांकडून खंडणी वसूल करून घेतली.

याच सुमारास कान्होजी आंग्रे हा उदयास येऊं लागला असून कोंकणच्या किनाऱ्यावर त्याची आणि इंग्रजी व्यापाऱ्यांची गांठ पडू लागली होती.

कान्होजी हा स्वतःच्या हिमतीवर दर्यावर्दीपणाचा धंदा करीत असे, व थोड्याच काळांत इंग्रजांना तो आपल्या व्यापारास एक नवीन धोकाच उत्पन्न झाला असे वाटू लागले. त्याने खादेरी बेटाचा ताबा घेऊन त्यावर वस्ती करविली होती.

सन १७१८ सालीं दक्षिणकोकणांत सांवतवाडीकर देसायांनी सात हजार सैन्यानिशीं कारवारच्या इंग्रजी वखारीस दोन महिनेपर्यंत वेढा घातला; पण जलमार्गाने वखारवाल्यास कुमक पोंचण्याच्या सुमारास शाहूमहाराजांच्या सैन्याने सांवतवाडीच्या उत्तरेच्या मुलखावर स्वारी केल्यामुळे देसायास वेढा उठवून परत यावे लागले. देसायांनी इंग्रजाकडे एक ब्राह्मण वकील पाठविला, व त्याच्यामार्फत अखेर उभयतांमध्ये तह झाला.

कान्होजी आंग्रे हा शिवाजीच्या वेळी मराठी आरमारांतील केवळ एक खलाशी होता. तो आपल्या पराक्रमाने राजारामाच्या वेळीं त्याच आरमाराचा मुख्य सेनापति झाला. शाहूमहाराज दक्षिणेत आल्यामुळे मराठ्यांमध्ये आपआपसांत जो तटा माजला त्यात कान्होजीने प्रथम ताराबाईचा पक्ष धरला होता, व नतर तो शाहूच्या पक्षास मिळाला. या सुमारास त्याचे ताब्यांत सांवतवाडीपासून मुंबईपर्यंत बहुतेक सर्व किनारा होताच. पण शाहूकडून त्यास खांदेरी कुलाबा सुवर्णदुर्ग व विजयदुर्ग हे किल्ले, इतर तटबदी टाणी व सरखेल ही पदवी मिळाली. त्याने हबशाचा नक्षा उतरून टाकला, व कोकणकिनाऱ्यावर आढळणाऱ्या सर्व परदेशच्या जहाजांपासून तो चौथ वसूल करी व लूटहि मिळवी. त्याजवळ दहा मोठी लढाऊ गलबते १६ ते ३० पर्यंत तोफाची आणि ४ ते १० तोफा चढविलेली सुमारे ५० लहान गलबते असत. इंग्रजांच्या आरमारांत या सुमारास ( सन १७१६ ) एक गलबत ३२ तोफांचे, ४ गलबते २०–२८ तोफांची, व २० गलबते ५–१२ तोफांची असत, व या आरमाराचा सालीना खर्च ५ लक्ष रुपये असे. पोर्तुगीज व शिद्दी याचे वर्चस्व कमी झाल्यामुळे आतां दर्यावर इंग्रज व आंग्रे यांच्याच गांठी पडू लागल्या. १७१६ साली मलबार किनाऱ्यावर त्यांचा पहिला रणसग्राम झाला, त्यांत आंग्र्याचा मोड झाला. पुढील साली आंग्र्याने इंग्रजांचे 'सक्सेस' नांवाचे जहाज पकडले; तेव्हां रागाने इंग्रजी आरमारानें विजयदुर्गाच्या किल्ल्यास वेढा दिला. पण त्याच्यानें तो किल्ला घेववला नाही. ता० १८ एप्रिल १७१७ रोजीं झालेल्या लढाईत इंग्रजी आरमाराचा मोड होऊन त्यास वेढा उठवून परत फिरावे लागले. सन १७१८ च्या आक्टोबर महिन्यांत इंग्रजांनीं खांदेरी बेटावर हल्ला केला; पण येथेहि इंग्रजांचा मोड होऊन त्यांना परत फिरावें लागलें. अशा रीतीने इंग्रजांचे खांदेरी बेट घेण्याचे सर्व प्रयत्न फुकट गेले. इंग्रज व्यापाऱ्यांच्या गलबतांना त्रास देण्याचे काम आंग्र्यानें सरास सुरू ठेविलें होतें. 'तुम्ही व पोर्तुगीज या दोघांनाहि माझें कांहींएक वांकडें करतां आलें नाहीं.

उगीच माझे वाटेला जाऊं नका," असा त्यानें मुंबईकरांस निरोप पाठविला. त्याच्या ताब्यांत कित्येक युरोपियन कैदी बरेच दिवस होते. सन १७२० सालीं आंग्र्यानें शार्लट् नांवाचे इंग्रजांचें जहाज पकडून ते विजयदुर्गच्या बंदरांत नेऊन ठेवलें. त्यानें कोंकणकिनाऱ्याच्या सर्व तटबंदीच्या जागीं तोफांचे मोर्चे लावून ठेविले होते; आणि त्याच्या नोकरींत असलेले मराठे व युरोपियन गोलंदाज त्यांचा लांबवर मारा करीत. सन १७२२ सालीं पोर्तुगीज व इंग्रज यांनीं मिळून आंग्र्यावर कुलाबा येथे स्वारी केली; पण तींत त्यांचा मोड झाला. १७२४साली डच लोकांच्या सात जहाजांच्या काफिल्याने सुमारे ५० तोफांसह विजयदुर्गावर हल्ला केला; पण त्यांसहि यश आले नाहीं. १७२७ सालीं आंग्र्याने कपनीचें फिरून एक मोठें व व्यापारी मालानें भरलेले जहाज पकडलें. अशा रीतीने आंग्र्याचें आरमार दिवसेंदिवस वाढूं लागले होते. १७२९ सालीं त्यानें फिरून किंग वुइल्यम नांवाचे कपनीचे गलबत पकडले व कॅप्टन म्याकनील नामक अधिकाऱ्याला पायांत साखळदंड घालून पुष्कळ दिवस कैदेत ठेविलें, आणि अखेर ५०० रुपये खंडणी घेतल्यावर त्याची सुटका केली. पुढें सन १७३१ सालीं कानोजी आंग्रे हा मरण पावला. तेथपर्यंत त्याचें इंग्रजांना कोणत्याहि प्रकारें पारिपत्य करतां आले नाहीं. त्याच्या मरणानतर त्याचा थोरला मुलगा सखोजी याने १७३३ सालच्या जून महिन्यांत मुंबईच्या प्रेसिडेंटाकडे मित्रत्वाचा तह करण्याकरतां दोन वकील पाठविले; पण सखोजी हा लवकरच वारला व त्याच्या भावांमध्यें भांडणे लागून कानोजीचा दासीपुत्र मानाजी आंग्रे हाच पुढे सरसावला, व पोर्तुगीज लोकांच्या मदतीनें त्याने कुलाबा हस्तगत केला. पुढें बाजीराव पेशव्यांच्या मध्यस्थीनें शाहूमहाराजांशी सख्य करून त्यानें आपली सत्ता वाढविण्यास सुरवात केली. हें न खपून मुंबईच्या गव्हर्नरानें मानाजीविरुद्ध हबशास कुमक केली; तथापि मानाजीनें शत्रूचें आरमार हस्तगत करून हबशाचे कित्येक किल्लेहि घेतले. पेणच्या खाडीवर त्याने आपला अमल बसविला, व अशा रीतीनें मुंबईबंदरापर्यंत तो येऊन ठेपला.

पहिल्या बाजीरावाला जंजिऱ्याच्या हबशाचें सर्वतोपरि पारेपत्य करणें होतें यामुळें बाजीरावाला इंग्रजांची मदत घ्यावीशी वाटली. त्यानें राजापुरास वेढा दिला असतां शाहूमहाराजांच्या नांवें मुंबईच्या गव्हर्नरास पत्र पाठवून, तुमच्या आरमाराकडून आम्हांस उपसर्ग लागूं नये अशी विनंती केली होती. पुढें हबशी व पेशवे यांच्या दरम्यान मध्यस्थी करण्याचें कामहि इंग्रजांकडे आलें; परंतु पेशवे व आंग्रे यांचा स्नेहसबंध असल्यामुळें इंग्रज व पेशवे यांचा मनापासून स्नेह होणें शक्य नव्हतें. शिवाय हबशी व इंग्रज यांचा आंग्र्याविरुद्ध तह झाला. या तहांत असें ठरलें कीं, उभयतांनीं मिळून आंग्र्याचा पाडाव केल्यास इंग्रजांनीं खांदेरी बेट त्यावरील सर्व लष्करी सामग्रीसह व कुलाबा हीं मिळून शिवाय

पेणची खाडी व नागोठणची खाडी यांच्या दरम्यान वखार घालण्यास परवानगी मिळावी. उलट जमिनीवर जीं ठाणीं हस्तगत होतील, तीं हबशास मिळावीं; परंतु हबशाची सत्ता खालावलेली असल्यामुळे हबशाच्या मदतीचा इंग्रजांस फारसा उपयोग होईना, व इंग्रज कंपनीसही आरमाराचा खर्च अतिशय पडूं लागला. यामुळे या तहापासून कांहीएक निष्पन्न झालें नाहीं. मात्र शाहूराजाच्या मदतीने आंग्रयाची सत्ताच वाढू लागली; आणि मानाजी व संभाजी यांच्या घरगुती भांडणामुळे जर अडथळा आला नसता तर आंग्रयाने गोव्यापासून मुंबई-पर्यंत सर्व कोकणपट्टीच्या किनाऱ्यावर आपला ताबा बसविला असता.

परंतु पेशवाईतील गृहकलहाप्रमाणे आंग्रयाचा गृहकलहहि इंग्रजाच्या पथ्यावर पडला. मुंबईकर इंग्रजांनी कॅप्टन इंचबर्ड यास कुलाबा येथें मानाजी आंग्रयाकडे पाठविले, आणि त्याचे व संभाजींचे भांडण चेतविण्याकरितां पैसा व लष्करी सामानसुमान मानाजीस पुरविण्यास सांगितले. १७३८ सालच्या डिसेंबरांत कमोडोर बॅगवेन याची व संभाजी आंग्रयाच्या आरमाराची गांठ राजापुराच्या खाडींत पडली. पण संभाजींचे आरमार खाडीत पळून गेल्यामुळे वांचले. उलट याच महिन्यांत संभाजी आंग्रयाने इंग्रजांचे डार्बी नावाचे व्यापारी गलबत हस्तगत केले. तथापि १७३९ साली त्याने इंग्रजांशी तह करण्याचा प्रयत्न केला. मात्र तो असा होता की, सर्व प्रकारच्या व्यापारी इंग्रज गलबतांना आंग्रयाचे दस्कत ( परवाना ) घेऊन पश्चिमकिनाऱ्यावर व्यापार करावा, व आंग्रयाकडून त्यांना धक्का लागू नये म्हणून त्याला त्यांनीं सालीना २० लक्ष रुपये द्यावे. पण या अटी इंग्रजांनीं मान्य केल्या नाहींत. १७३९ च्या मार्च महिन्यांत कॅप्टन इंचबर्ड याने मानाजीचीं ८ लढाऊ गलबतें पकडलीं. पण लगेच नोव्हेंबरमध्ये मानाजीनें मुंबईजवळचे एलिफंटा बेट हस्तगत केले. अशा रीतीनें संभाजी व मानाजी हे आळीपाळीनें इंग्रजांशीं युद्ध व तह करीत असतां, नानासाहेब पेशवे व इंग्रज यांचा सलोखा होऊन कुलाबा दोघांच्याहि हातून जाण्याचा प्रसंग येऊन ठेपला, तेव्हां मात्र त्या दोघां भावांनीं तात्पुरतें सख्य करून तो प्रसंग टाळला.

वरील हकीगतीवरून सन १७३९ पर्यंत इंग्रजांचा आणि शिवाजी संभाजी व आंग्रे यांचा संबंध कसा काय आला हे लक्षांत येईल. पण मराठे व इंग्रज यांचा याहून निकट संबंध वसईच्या युद्धामुळे व तेव्हांपासून पुढे आला त्याची हकीकत पुढें दिली आहे.

सन १७३७ पर्यंत मराठ्यांची इंग्रजांस फारशी प्रत्यक्ष माहिती नव्हती. निदान मराठ्यांच्या उत्कर्षाचे त्यांना फारसे भय वाटलें नव्हते. पण येथपासून त्याना मराठ्यांची खरी भीति वाटूं लागली; आणि तिचे मुख्य कारण पेशव्यांनी पोर्तुगीज लोकांवर उपसलेली तरवार हे होय. सन १७३१ सालीं मराठ्यांनी ठाणें येथील पोर्तुगीज लोकांवर स्वारी केली; त्या वेळीं इंग्रजांचें व पोर्तुगीजांचें

बरें नसल्यामुळे मुबईकर इंग्रजांनी मराठ्यांस उत्तेजन दिलें होते; पण ही आपण चूक केली असें इंग्रजांस लवकरच वाटू लागले. सन १७३७ च्या एप्रिलमध्ये सुरत येथील एका इंग्रजानें बंगाल्यांतील आपल्या मित्रांना जें एक पत्र लिहिलें त्यांत त्याने मराठ्यांची ओळख बंगाल्यांतील आपल्या जातभाईंना प्रथम करून दिली. तो म्हणतो, "शाहूराजाच्या अमलाखालच्या मराठे नामक लोकांनी पोर्तुगीज लोकांवर इतकी सरशी केली आहे कीं, हळूहळू मुंबईबेटावर स्वारी करून ते लोक आम्हां इंग्रजांनाहि खास लवकरच शह देणार." या सालीं मराठ्यांनीं पोर्तुगीजांपासून ठाण्याचा किल्ला हस्तगत केला. तेव्हां ठाण्याहून खाडीने मराठे तसेच वांद्र्याकडे झुकतात कीं काय अशा भीतीनें इंग्रजांनी तिकडे सैन्य व दारूगोळा पाठविला. इकडे मराठ्यांशीं वरून ते गोडीने व स्नेहाने वागत, आणि मराठ्यांनीं ठाण्याचा किल्ला घेतला तो त्यांजपासून परत घेण्याकरतां पोर्तुगीज वसईहून स्वारी करण्यास निघणार तो ही बातमी इंग्रजांनी आपण होऊन मराठ्यांस कळविली व किल्ल्यांतील लोकास दारूगोळा पुरविला. यामुळे पोर्तुगीजांची स्वारी फसली व त्यांचा सरदार दॉन अतोनियो मारला गेला. यापूर्वी एके प्रसंगीं शिद्दी मुंबईवर स्वारी करून आला त्या वेळी इंग्रजांच्या हालचालीची बातमी पोर्तुगीजांनीं शिद्याला दिली होती, त्याचे हे आम्ही हल्ली उट्टे काढून घेतलें अशी सबब सांगून इंग्रजांनी आपल्या मनाचें समाधान करून घेतले. पण इतर युरोपियन इतिहासकारांच्या मते इंग्रजांनी त्या वेळीं ही चहाडी केली खरी !

ठाण्यानंतर मराठ्यांनी तारापूर हस्तगत केले व पुढे १७३९च्या फेब्रुवारी महिन्यांत वार्सोवा हे ठिकाण घेऊन वसईस वेढा घातला. या वेळीं आंतील पोर्तुगीज लोकांनी मुंबईच्या इंग्रजांकडे मोठ्या केविलवाणेपणाने मदत मागितली. पण इंग्रजानी दिसण्यांत सुरेख अशी कांही सबब सांगून कुमक करण्याचे टाळले. अखेर चिमणाजी आप्पा पेशवे यांस यश येऊन पोर्तुगीज शरण आले, आणि हल्ल्यांत गारद झालेल्या हजारो मराठ्यांच्या प्राणनाशानें एक प्रकारें झालेल्या नुकसानीचा मोबदला वसई हस्तगत झाल्यामुळे दुसऱ्या प्रकारानें त्यांस मिळाला.

वसईचा किल्लेदार जॉन पिंटो हा या सुमारास मुंबईच्या गव्हर्नरास लिहितो, " मराठ्यांच्या मनांत ठाण्यापेक्षां मुंबईच घेण्याचे अधिक आहे. त्यांनी ठाण्याचा किल्ला प्रथम घेतला याचें कारण, मुंबईच्या वाटेवरचे नाकेबंदीचे ते ठिकाण आहे म्हणून. आज तुमचा जसा मराठ्यांशी स्नेह आहे तसा आमचाहि होता; पण त्यांच्यावर विश्वास ठेवतां येत नाही. मुंबई बेटांतील संपत्ती हस्तगत करण्याची त्यांची फार इच्छा दिसते. आज ते तुमच्याशीं स्नेहभावाने वागतात याचे कारण, त्यांना पोर्तुगीज व इंग्रज या दोघांशी एकदम वैर करतां येत नाहीं हेंच होय. साष्टी बेटावर मराठ्यांचा पाय रुजला म्हणजे तुम्हां मुंबई-

करांचा नाश झालाच म्हणून समजा. तुम्हांकडून मराठ्यांना दारूगोळा पुरविला जातो हें किल्ल्यांत अलीकडे पडलेल्या गोळ्यांच्या दगडांवरील खुणांवरून उघड दिसतें. तुमचे तीन गोलंदाज मराठ्यांकडे गेले म्हणूनच मराठ्यांच्या तोफांची निशाणगिरी आम्हांला बाधली. ''

वसईच्या वेढ्याच्या वेळीं पोर्तुगीजांनीं इग्रजांकडे मदत मागितली होती. त्यांना मुंबईहून धान्य आणि दारूचीं ४०० पिपें आणि ५ हजार गोळे पाहिजे होते. मराठ्यांनीं वेढा फार बळकट बसविला असल्यामुळे इग्रजांना मदत देणें कठिण होतें. तथापि त्यांनीं थोडीबहुत मदत दिली. फौजेला पगार देण्याकरितां रोकड रक्कम पोर्तुगीजांनीं मागितली. पण ती देण्याचें मात्र इंग्रजांनी नाकारलें. फक्त १५ हजार रुपये खिस्ती देवळांतील रुप्याचीं भांडीं व पितळी तोफा यांचे गहाणावर दिले !

वसईसारखा बळकट किल्ला मराठ्यांनी घेतल्यामुळे ते मुबई बेटहि सहज घेतील असें इंग्रजांस वाटूं लागलें. मुंबईच्या जंजिऱ्याची ( किल्ल्याची ) उंची अवघी ११ फूट होती. यामुळें सभोवार खदक खणणे तरी जरूर होते. या कामाकरितां लागणारे तीस हजार रुपये शेंकडा एक टक्का अधिक जकात बसवून वसूल करावे, अशी मुंबईच्या देशी व्यापाऱ्यांनी लेखी संमति दिली. या लेखांत पुढील आशयाचीं वाक्यें आहेत. " इंग्रज कपनीच्या अंमलाखालीं आम्हांला फार सुख होतें, आमची मालमत्ता बिनधोक रहाते, आम्हांला आपल्या धर्मसमजुतीप्रमाणें निर्वेध वागतां येते, हे सुख आमच्या पुढील पिढ्यांना मिळावें अशी आमची इच्छा आहे. आम्हांस मुबई बेट सोडून सुखानें जाऊन रहाण्यास दुसरी जागा नाहीं; मराठ्यांच्या स्वाऱ्या जवळ येऊन पोंचल्या. करितां मुंबईच्या बचावासाठीं ही तीस हजारांची वर्गणी आम्ही खुषीने देतो." या लेखावर हिंदु पार्शी मुसलमान गुजराथी वगैरे अनेक जातींच्या व धर्मांच्या लोकांच्या सह्या आहेत !

वसई हातची गेल्यामुळें पोर्तुगोजांचा उत्तरकोंकणांतील मुख्य आधार तुटला. चौल व महाड (बंदर बाणकोट) हीं ठाणीं आपण होऊन सोडून देण्याचें त्यांनीं मनांत आणिलें, व चौल हें इंग्रजांस देऊं केलें. नंतर इंग्रजांच्या मध्यस्थीनें पोर्तुगीज व पेशवे यांच्या दरम्यान तहाची वाटाघाट सुरू झाली; आणि कॅप्टन इंचबर्ड यानें ता. १४ आक्टोबर १७४० या दिवशीं बाजीरावसाहेब पेशवे व गोवा येथील पोर्तुगीज व्हाइसराय यांचा तह ठरविला. पोर्तुगीज लोकांनीं चौल व महाडचे किल्ले पेशव्यांना द्यावे. तसेंच मराठ्यांनीं साष्टी येथून आपल्या फौजा परत न्याव्या आणि हें होईपर्यंत हे दोन्ही किल्ले इंग्रजांनीं आपल्या ताब्यांत तात्पुरते ठेवावे, " असें या तहानें ठरलें.

पोर्तुगीज लोक नामशेष झाल्यानें यापुढें इंग्रज व पेशवे यांचा प्रत्यक्ष संबंध अधिक आला. मराठ्यांची सत्ता त्यांना उघड दिसत होती व जाणवूंहि

लागली होती. यामुळें थेट सातारच्या दरबारीं आपला प्रवेश व्हावा अशी इच्छा इंग्रजांस सहजच उत्पन्न झाली. त्याप्रमाणें त्यांनीं १७३९ च्या मे महिन्यांत कॅप्टन वुइल्यम गार्डन नांवाच्या लष्करी अधिकाऱ्यास सातारा येथे शाहू-महाराजांच्या भेटीस पाठविलें. त्याला मुंबईसरकाराकडून अशी गुप्त इशारत देण्यांत आली होती की, त्याने वरकरणीं तर मराठ्यांशीं स्नेहभावाचें बोलणें बोलावें; पण आंतून शाहूच्या दरबारांत बाजीराव पेशव्याचें शत्रुत्व कोण कोण मनापासून करतात याची बारीक नजरेने टेहळणी करावी; पण शाहूपेक्षा बाजीराव हाच अधिक जोरदार व प्रबळ असल्यामुळे त्याच्याशींहि संधान ठेविल्याशिवाय गत्यंतर नाहीं हें ओळखून त्यांनीं याच वेळेस कॅप्टन इंचबर्ड यास स्नेभावाचे पत्र व नजराणे देऊन बाजीरावाकडेहि पाठविलें.

शाहूराजाकडे कॅप्टन गार्डन याजबरोबर नजराणे पाठवावे; पण थोड्या खर्चात पुष्कळ मिळणारे आरसे वगैरे पदार्थ पाठवावे, असा मुंबईबोर्डाने ठराव केला. गार्डनसाहेब ता. १२ मे रोजीं मुंबई सोडून निघाला. कॅप्टन गार्डन याजबरोबर शिद्यांकडील माहितगार माणूस कोणी भिकाजीपंत नांवाचा देण्यांत आला होता; व मुंबईच्या कौन्सिलाने गॉर्डनला खालीलप्रमाणें त्याच्या कामगिरीची समजूत दिली होतीः—

"सोबतचीं पत्रें व नजराणे नेहमीच्या शिरस्त्याप्रमाणे अदबशीर रीतीनें ज्यांचे त्यांस द्यावे. शाहूराजाच्या दरबारीं त्याचे मुख्य सल्लागार कोण, त्यांचे विचार काय आहेत आणि त्यांचे हिताहितसंबंध कसे काय गुंतलेले आहेत याची बारकाईने चौकशी करावी. बाजीरावाचे शत्रु दरबारीं पुष्कळ आहेत; समुळें योग्य प्रसंग पाहून त्याच्याविषयीं त्यांचे मनांत स्पर्धा व हेवा उत्पन्न करावा. तो आधीच प्रबळ असून पोर्तुगीजांवर जय मिळविल्यानें तो आणखी प्रबळ होणार; त्याच्या वर्चस्वाला आळा घालावयाचा तर हीच वेळ आहे, असें त्यांचे मनांत भरवून द्यावें. आपला कमकुवतपणा त्यांना फारसा दाखवू नये. बाजीरावास आम्ही भीत नाहीं; आमच्यावर त्यानें स्वारी केली तर आम्हास आपला बचाव करतां येईल असेच त्यांस भासवावें. आमचा मतलब मुख्य व्यापाराशी, आम्हांस कोणाचा मुलूख नको, आम्ही कोणाच्या धर्मात हात घालीत नाहीं. या देशांत खपून उरणारा तुमचाच माल आम्ही स्वदेशीं नेऊन विकून तुमचें काम करितों आणि त्याच्या बदला इकडे पैसा व माल आणतो व शिवाय जकातहि देतों. यामुळें आमचा धंदा मराठ्यांना सर्वस्वीं फायदेशीरच आहे असें त्यांस समजून सांगावे."

गॉर्डनसाहेब २३ मेचे सुमारास साताऱ्याजवळ आला. २५ तारखेस श्रीपतराव प्रतिनिधींचा कारकून अंताजीपंत यानें त्याचा सत्कार केला, व शाहू

सातार्‍यास नसल्यामुळें बरोबर चौकी देऊन त्यास त्यानें रहिमतपुरावरून शाहू-कडे पाठविलें. ता. ३ जून रोजीं श्रीपतराव प्रतिनिधीची व त्याची गांठ पडली. ७ तारखेस त्याला शाहूला भेटविण्यांत आले. इकडचे तिकडचे प्रश्न झाल्यावर शाहूराजानें गॉर्डनसाहेबास विचारले; "मराठ्यांची भीति इंग्रजांना वाटू लागली म्हणून मुंबईकरांनीं आपला वकील मजकडे पाठविण्याची तसदी घेतली कीं काय? " यावर "मराठ्यांची भीति नव्हे, पण केवळ त्यांचा स्नेह संपादण्याची इच्छा, हेच माझ्या वकिलातीचें खरे कारण होय." असें कॅप्टन गॉर्डन यानें शाहूस उत्तर दिलें. सुंदर आरसे चित्रविचित्र पक्षी वगैरे नजराणे पाहून शाहू खूष झाला व इंग्रजांशीं स्नेहभाव ठेवण्याचे त्याने आश्वासन दिलें. पण बाजीराव पेशवा प्रबल झाला असल्यामुळें शाहूराजाने आश्वासन दिले किंवा न दिले सारखेच असें गॉर्डनसाहेबानें आपल्या मनाशीं अनुमान केले. बाजीराव व चिमणाजी आप्पा इंग्रजांचे विरुद्ध आहेत असे समजल्यावर शाहू म्हणाला, "हे इंग्रज चांगले लोक आहेत. मीं त्यांना थारा दिला तर बाजीराव नको म्हणतो कीं काय ?" गॉर्डनसाहेबाने राणी विरुबाईलाहि पत्र व नजराणे पाठविले. त्याने बाजीरावाचा मुलगा नानासाहेब याचीहि गांठ घेतली. या वकिलातीचा खरा हेतु काय असे नानासाहेबाने त्याला खोदखोदून विचारलें व मनांतून तो इग्रजांस पाण्यात पाहतो, अशी गॉर्डन याची समजूत झाली. या सुमारास बाजीराव ब्र्‍हाणपुरास होता, व नादिरशहा दक्षिणेत मराठ्यांवर चाल करून येणार अशा बातम्या उठत होत्या. ता. २७ रोजीं झालेल्या भाषणांत शाहूने आंग्रयाला तुम्ही त्रास कां देतां, असे गॉर्डन यास विचारले, व दर्यावरील व्यापारास तो त्रास देतो, असे गॉर्डनने उत्तर केलें. ता. ३० जून रोजी गॉर्डन शाहूच्या छावणीतून निघाला, तो ता. १४ जुलैला मुबईस पोहोचला. " ठाणे व साष्टी घेतली ही गोष्ट शाहूस पसत होती; पण वसईवर स्वारी केली ही गोष्ट त्याला आवडली नाही. बाजीरावाचा हेतु मुबईवर स्वारी करण्याचा मात्र नाही व पेशव्याशिवाय बाकीच्यांचे मत इंग्रजांविषयी चांगले आहे. बाजीरावाच्या महत्त्वाकांक्षा वाढत आहेत. मोगलांच्या मुलखांतून पुष्कळ पैसा लुटून पदरी पुष्कळ सैन्य ठेवावें असे त्याचे मनांत आहे. शाहूराजाजवळ २६,००० फौज व बाजीरावाजवळ ४०,००० फौज असून शिवाय जास्ती फौज लागल्यास ती मराठ्यांना तेव्हांच जमवितां येते. बाजीराव आपले बेत नेहमी गुप्त ठेवतो. त्याच्या फौजेला पुढचा मुक्काम कोणच्या दिशेस व्हावयाचा हेंहि कित्येक वेळां कळत नाहीं. मात्र फौजेचा बाजीरावावर दृढ विश्वास आहे. तात्पर्य, बाजीराव प्रबळ असून दरबारचे इतर सातहि मंत्री विरुद्ध असले तरी त्याला आपल्या म्हणण्याप्रमाणें करतां येते. याकरितां बाजीराव न दुखविला जाईल म्हणून आम्हांस जपले पाहिजे. पुण्यांतील अंताजी

नाईक बेहेरे व्यापारी यांची इच्छा मुंबईस गुमास्ता ठेऊन व्यापार करण्याची आहे, तो बाजीरावाचे विश्वासांतला आहे. सबब त्याच्या म्हणण्याचा आपण विचार करावा," वगैरे हकीकत गॉर्डन याने मुंबईस कौन्सिलास कळविली.

ता. २० जुलै १७३९ च्या मुंबई कौन्सिलच्या मिनिट बुकांत खालील आशयाची नोंद केलेली आढळतेः—

" मराठ्यांना व्यापारापासून होणारा फायदा लक्षांत येतो; पण आमच्या मुबईबेटाकडे बाजीराव हेवेखोर दृष्टीने पहात असून आपल्या कह्यांत आम्हांस आणण्याविषयीं तो मनांतून सावध आहे. तथापि सर्व गोष्टींचा विचार करतां कॅप्टन इंचबर्ड याने बाजीरावाशीं ठरविलेला तह मान्य करावा. वसई घेतल्या-मुळे मराठे प्रबळ झाले असून त्यांशी हल्ली विरोध करण्यांत अर्थ नाहीं. दर्यावर आम्ही थोडेसे अधिक प्रबळ असलो तरी जमिनीवरील त्यांच्या फौजा फारच प्रबळ आहेत."

गॉर्डन परत गेला तेव्हां त्याजवळ शाहूराजाने मुबईच्या गव्हर्नरास पत्र दिले होते त्यांतील आशय असा होताः—

" कॅप्टन गॉर्डनबरोबर दिलेले पत्र पोहोचले व हकीकत समजली. माझा इंग्रजाशी स्नेह आहे तसाच आहे. तो तुटण्यास तुम्हांकडून कांही कारण घडलेले नाही व पुढेहि घडणार नाही. तुमच्या व्यापारावर माझी कृपादृष्टि राहील. नेहमीं पत्र वगैरे पाठवीत असावे व स्नेह वाढवावा."

शाहूने ह्याच वेळी बाजीरावास खालील आशयाचे पत्र लिहिले होतेः—

" इंग्रज पहिल्यापासून आमच्याशी इमानाने स्नेहसबंध राखीत आले आहेत. मुबईचा गव्हर्नर स्टीफन लॉ याने पाठविलेला गॉर्डन वकील मला भेटला. त्यांची आमच्याशी स्नेह ठेवण्याची इच्छा आहे. त्यांचे धोरण निव्वळ व्यापारी-पणाचे आहे व आम्हांशी ते निष्कपटपणाने वागत आले आहेत. ते वचनांत फेरबदल करित नाहीत. सबब तुम्ही त्यांच्याशी चांगला स्नेहसबंध ठेवावा."

शाहूकडून चिमाजी आप्पासहि अशाच अर्थाचे पत्र गेले होते. तारीख २६ जून सन १७३९ रोजी बाजीरावाने मुबईच्या गव्हर्नरास खालील आशयाचें पत्र पाठविले होतेंः—

" आपण स्नेहभावाचा पत्रव्यवहार शाहूमहाराजाशी असावा असे इच्छितां ते ठीकच आहे. आम्हांस विजय मिळाला याच तुम्हांस बरें वाटलें हें ऐकून समाधान झाले. तुमचा आमचा व्यापार वाढावा आणि राज्याचा व लोकांचा नफा व्हावा अशी आमचीहि पण इच्छा आहे."

चिमाजी आप्पाकडे याच वेळी इंचबर्डसाहेब वकील म्हणून गेला होता. उभयतांची भेट वसईस झाली. वसईच्या वेढ्याच्या प्रसंगीं इंग्रजांनी पोर्तुगी-जांस मदत केली यामुळें आम्हांस फार त्रास पडला, अशी चिमाजी आप्पानें

तक्रार केली. यावर इचबर्डसाहेब म्हणाला, " आतां तुम्ही वसईकर झालां; तुम्हांलाहि आम्ही स्नेभावानें मदत करूं. " " आम्ही आतां दमण चौल वगैरे ठाणी घेणार आणि आपले आरमार वाढविणार" असें चिमाजी आप्पा म्हणाला; ती संधी साधून, प्रबल आरमाराच्या योगानें पश्चिमकिनाऱ्यावरील चांचे लोकांचाहि नाश करितां येईल असें सुचवून, खुल्या व्यापारापासून होणाऱ्या फायद्याच्या विषयावर इचबर्डसाहेबांनीं चिमाजी आप्पास एक भले थोरलें व्याख्यान झोडलें! "तुमचा देश संपन्न व सुखी आहे, तुम्ही व्यापार वाढवा, हलकी जकात ठेवा, परकी लोकांची व्यापारी जहाजे हर ठिकाणीं बंदरांत घेत जा, त्यांच्या वखारी वगैरेंचें संरक्षण करा, म्हणजे तुमच्या देशाचा फायदा होईल. जगांतील सर्व देशांचे मोठ्या डोक्याचे व उदार मनाचे महत्त्वाकांक्षी लोक हाच राजमान्य मार्ग अनुसरतात," असें इचबर्डसाहेबांनीं चिमाजी आप्पास सांगितले. यांतील बराच भाग चिमाजी आप्पास पटला असावा असें दिसते. कारण, ता. १२ जुलै १७३९ रोजी पेशवे व इंग्रज यांचा व्यापारी तह ठरला, व त्याच्या योगानें इंग्रजांस पेशवाई मुलखांत व्यापार करण्याची परवानगी मिळाली.

मुंबई कौन्सिलाने कॅप्टन इचबर्ड यास चिमाजी आप्पाकडे पाठवितांना खालीलप्रमाणे आपले विचार आणि हेतु प्रकट केले होतेः—आमच्याशी स्नेह करावा अशी मराठ्यांची इच्छा असेल तर आमचीहि त्यांच्याशीं स्नेह करण्याचीच इच्छा आहे. पोर्तुगीजांनीं मराठ्यांवर हल्ले करूं नयेत अशी आम्ही खबरदारी घेऊं; याकरितां त्यांनी मुंबईच्या बाजूस घाटाकडे तटबंदी वगैरे करू नये; मुंबई ताब्यांत ठेवण्याचा आमचा हेतु आसपास चारहि बाजूंकडे खुला व्यापार फैलवावा हाच आहे; सबब खाड्यांवर बसविलेल्या जकातीच्या नाक्यांवर इंग्रजांना विशेष सवलत मिळावी. मराठ्यांच्या मुलखांत तयार होणारा कलाकौशल्याचा माल चांगला व योग्य किंमतीला मिळेल तर तो आम्ही अर्थात् घेऊं. आम्ही सैन्य व आरमार ठेवितो ते केवळ रक्षणाकरितां. म्हणून मराठे आमच्याशीं स्नेहभाव खात्रीने ठेवतील तर समुद्रकिनाऱ्यावरील त्यांच्या व्यापाऱ्यांस आम्ही धक्का लावणार नाहीं; उलट मदतच करूं. मात्र आंग्र्यांची आम्हांस भीति असल्यामुळें पेशव्यांनी माहीमच्या खाडींतून लढाऊ जहाजें पाठवूं नयेत. कारण, या सवलतीचा फायदा आंग्रे घेईल आणि आंग्र्यांचें आरमार कोणतें व पेशव्यांचे कोणते हे आम्हांला लवकर कळणार नाही. कर्जाऊ पैसे देण्याचा आम्हांस कंपनी-सरकारचा हुकूम नाहीं, आणि खंडणी म्हणून मराठे पैसे मागतील तर अलीकडे व्यापारांत तोटा आल्यामुळें पेशव्यांनीं ती मागूं नये असें सांगावें. शिद्दी व पोर्तुगीज यांना पूर्वीं आम्ही मदत केली खरी; पण ती त्यांचा पाडाव होण्याने आमच्या हितास बाध येणारा होता म्हणून. आतां पेशव्यांची व आमची चांगली दोस्ती झाली तर यापुढे आम्ही

तटस्थ राहूं. मानाजी आंग्र्याशीं आमचा हल्लीं तह आहे आणि शिद्दी हा मोग-
लांची प्रजा असल्यामुळे त्याजविरुद्ध आम्हांस तुम्हांला मदत करितां येणार
नाहीं. पण संभाजी आंग्रे आमचा दुस्मान असल्यामुळे त्याला मात्र तुमच्या-
करितां आम्ही होईल तितका त्रास देऊं."

चिमाजी आप्पा आजारी असल्याने कॅप्टन इंचबर्ड याच्याशी प्रत्यक्ष
बोलणेंचालणे करण्यांत राघोबादादा प्रमुख होता. कोंडाजी मानकर याच्या-
बरोबर इंचबर्ड याचे बोलणेंचालणे झालें. तहाचीं बोलणी तोंडाने बोलून
झाल्यावर मग ती लिहून काढण्यांत येऊन मुंबईस कौन्सिलाकडे पसतीस पाठ-
विण्यांत आली. इंचबर्ड यास तहाच्या अटी फारशा पसंत नव्हत्या. तो लिहितो
"एकंदरीने मराठे बोलतील एक व लिहितील एक ! पण तह करण्यास
हल्लींची संधी उत्तम आहे, करून घ्यावा ! "

सन १७५५ साली पेशव्यांनीं आंग्र्यांचा पाडाव करण्याकरितां इंग्रजांची
कुमक घेतली. इंग्रजाचा आंग्र्यावर त्यांच्या दर्यावर्दीपणाचे धम्यामुळे राग होताच.
व आंग्र्याविरुद्ध या वेळीं पेशवे उठले हें त्यांना चांगलेंच फावले. ता. २२
मार्च रोजीं कॅप्टन जेम्स याची पांच लढाऊ जहाजे व मराठ्यांची लहानमोठी
मिळून ६७ जहाजे यानीं सुवर्णदुर्गास वेढा दिला. वेढ्यांत लढण्याचे काम
मराठ्यांकडे व गोलंदाजीचे व निशाणबाजीचें काम इंग्रज खलाशांकडे होतें.
व अशा रीतीने आंग्र्याचा किल्ला घेऊन वीस वर्षांत इंग्रजांनीं हा पहिला जय
मिळविला ! नंतर इंग्रजानी बाणकोटचा किल्ला घेतला. त्याच साली एप्रिल
महिन्यांत नानासाहेब पेशव्यांच्या विनंतीवरून रत्नागिरीचा किल्ला सर करण्या-
च्या कामीं मुंबईकरांनी कॅ. जेम्स यास पुनः पाठविले होते.

पुढील साली कर्नल रॉबर्ट क्लाइव्ह व ॲडमिरल वॉट्सन यांचीं सरकारी
लढाऊ जहाजें मुंबईस आलीं व त्यांना लुटीची लालूच दाखवून त्यांच्या मदतीने
आंग्र्यावर इंग्रजांनी फिरून स्वारी केली. या स्वारींत मराठेहि सामील होते.
या खेपेस त्यांनी विजयदुर्गचा बळकट किल्ला हस्तगत केला. हा हल्ला करणारांत
कर्नल क्लाइव्ह हा स्वतः होता. किल्ल्यावर इंग्रज प्रथम चढले म्हणून इंग्रजांचे
निशाण त्यावर रोवण्यांत आले; पण पेशव्यांस तें मान्य नव्हते. इंग्रजांनीं विजय-
दुर्गच्या बदला बाणकोटचा किल्ला मराठ्यांस देऊ केला. पण मराठे तो घेईं-
नात. त्यांनी इंग्रजांस लिहिलें, "युरोपियन लोक प्रायः इमानी असतात म्हणून
आम्हीं तुम्हांशीं तह केला. असे असतां असा घोळ कां घालतां ? " यावर
गव्हर्नर बोरशेअर याने "ही अदलाबदल तुम्हांस आवडेल म्हणूनच सुचविली"
असें लिहिलें ! अखेर मुंबईहून वकील म्हणून स्पेन्सरसाहेबास पुण्यास नाना-
फडणविसाकडे पाठविण्यांत आले, व ता. १२ आक्टोबर सन १७५६ रोजीं
तह झाला; त्यांत असे ठरलें कीं, मराठ्यांना विजयदुर्ग किल्ला मिळावा, बाण

कोट इंग्रजाकडे रहावा, बाणकोटच्या खर्चाकरितां मराठ्यांनीं दहा गांवें इंग्रजांस तोडून द्यावीं व पेशवाई मुलखांत डच वगैरे इतर युरोपियन लोकांस व्यापार करण्याची मनाई करावी.

ता. २१ जुलै सन १७५६ रोजी नानासाहेब पेशवे यांनीं मुंबईकरांस खालील आशयाचे पत्र लिंहिले होतेः

"आम्हीं आंग्र्यांशीं युद्ध केले ते विजयदुर्गचा किल्ला घेण्याकरतां; तो आम्ही तुम्हांस कसा देऊ ? सर्व युरोपियन लोकांत इंग्रज हे आपला शब्द अधिक राखतात म्हणून विलायतेचा राजा व इंग्रज यांशी आम्ही स्नेह ठेविला. विजयदुर्ग हा आमचे राज्यांतील किल्ला आहे, तो घेण्याकरतां तर आम्हीं युद्ध केले. इंग्रज होऊन आपण आतां शब्द फिरवितां हे बरोबर नाही. सबब सरकारचे लोकांचे स्वाधीन किल्ला करावा.

यावर मुंबईच्या गव्हर्नराने नानासाहेब यांस खालील आशयाचे उत्तर पाठविलेः

"आम्ही किल्ला हाती ठेविला तो तहाची कलमे अमलांत येईपर्यंतच. डच लोकांचा व्यापार तुम्ही नांवाने बंद केला तरी अजून डच व्यापाऱ्यांचा माल तुमचे देशांत जातोच. तुमच्या आमच्यांत गैरसमज राहू नये म्हणून खुलाशाकरितां मी आपले लोक पुण्यास पाठवीत आहें."

पुण्यास पाठविलेला वकील जॉन स्पेन्सर याने खालील आशयाचा रिपोर्ट ता. ३१ आक्टोबर १७५६ रोजी मुंबई कौन्सिलकडे सादर केलाः

"नानासाहेब पेशवे यांच्या सल्ल्याने सलाबतजंग याने जवळचे फ्रेंच-लोक काढून लावले, ही गोष्ट अमृतराव पेशव्याचा कारभारी याजकडून मला कळली. नानासाहेब पेशव्याची मी मुलाखत घेतली त्या वेळीं जवळ राघोबा सदाशिवरावभाऊ व अमृतराव इतकीच मंडळी होती. नाना व सदोबा यांनी फ्रेंच व सलाबतजंग याचे दरम्यान घडलेली हकीकत मला सांगितली. फ्रेंच लोकांचे वजन यापुढे कर्नाटकांत वाढणार नाही व घेरिया किल्ल्याचे प्रकरण नीट संपले म्हणजे तुमच्यात व आमच्यांत वितुष्ट पडण्याचे कारण नाहीं, असे पेशवे म्हणाले. मद्रासेकडे महमदअल्लीखान याचा व इंग्रजांचा जसा स्नेह-संबंध आहे तसाच मुंबईच्या इंग्रजांचा व आमचा रहावा; व महमद अल्लीस ज्याप्रमाणे तोफखाना आणि फौज यांची मदत इंग्रजांकडून झाली तशीच आम्हालाहि व्हावी अशी इच्छा नानासाहेब यांनी प्रदर्शित केली. पण अनेक प्रकारच्या सबबी सांगून आम्हांला अशी मदत करतां येणार नाही असे मी सांगितले.

"इतका वेळ राघोबा कांहींच बोलला नव्हता; पण दिल्लीच्या स्वारींत इंग्रजांकडून तोफखान्याची व फौजेची मदत व्हावी अशी त्यानें फार इच्छा दर्शविली. पण फिरून मीं तोच जबाब दिला. घेरियाचा किल्ला ताब्यांत

घेण्यास पेशव्यांकडे गोविंद-शिवराम हा जात आहे तोहि बहुधा हेंच बोलणें काढील; पण मोंगलांचा मुलुख लुटण्यास मराठी फौजांना आमच्या फौजांनीं मदत केली तर कंपनीसरकारास बऱ्याच अडचणी उत्पन्न होतील. नानांचा चुलत बंधु सदाशिवरावभाऊ हा मुख्य कारभार पहात असतो. हा मोठा कर्ता व वाकबगार मनुष्य आहे; पण उतावळा व हावराहि आहे. पेशव्याच्या दरबारीं आम्हांस सदोबाच संभाळला पाहिजे."

सन १७५९ सालीं नानासाहेब पेशवे यांजकडे वुइल्यम ॲड्र्यू प्राइझ नांवाचा वकील मुबईच्या कौन्सिलाकडून पाठविण्यांत आला.त्याच्या कामगिरीची समजूत त्याला कौन्सिलनें दिली, तिचा आशय खालीं लिहिल्याप्रमाणे होता.

"हल्लीं पेशव्यांच्या दरबारी नानासाहेब व सदाशिवरावभाऊ यांजमध्ये दुफळी होऊन गोधळ माजला आहे. यामुळे दरबारचे पुष्कळ लोक कपनी-सरकारकडे वळण्याचा सभव आहे. तथापि कोणावर विश्वास टाकावा हे नीट पाहून तुम्ही वागा. शकराजीपत सदाशिवरावभाऊच्या पक्षास मिळाला आहे, तो तुम्हांस बरीच अंतःस्थ माहिती देईल. पण सुरतेकडे गुतलेला त्याचा ऐवज आमच्या मदतीने मिळेल अशी त्यास आशा असल्यामुळे तो कदाचित् खोटा स्नेहभावहि दाखवीत असेल. रामाजीपत याच्या सांगण्यावरून जजिरा व उदेरी घेण्यास आम्ही पेशव्यांस मदत केली नाहीं म्हणून त्याचा राग आहे. पण रामाजीपंत जजिऱ्यावर चालून जाईपर्यंत आम्हांस बातमी नव्हती, व अगदी आयत्या वेळी त्याने गगाधरपतांस मुबईस आमच्याकडे पाठविले. हबशांविरुद्ध जाणे आम्हास योग्य नव्हते, आणि रामाजीपत आमचा सल्ला आधीच विचारता तर तुम्हांस जजिरा घेणे दुष्कर आहे असे आम्ही त्यास वेळीच सांगितले असते. आमचा पेशा पडला व्यापारी. कोणीहि मुबईत बाजारास येऊन आमच्या वखारीतून माल घेऊन जावा, तसा हबशीहि माल नेतो, पण आम्ही कांही त्यास दारूगोळा विकला नाहीं. आम्ही मराठ्यांस कधी प्रतिबंध केला नाहीं. उलट माहीमच्या खाडीत ठाण्याहून हुकूम येईपर्यंत आमच्या फत्तेमाऱ्यांनाच कित्येक वेळा खोळबून रहावे लागले; व कित्येक वेळां मराठ्यांच्या चौक्यांवर आमच्या आरमाराच्या अधिकाऱ्यांना कसून झडती द्यावी लागली. या सर्व गोष्टी तुम्ही नानासाहेबांस नीट समजावून सांगा.

"नानासाहेब हल्ली फ्रेंचांशी पत्रव्यवहार करीत असतात, आणि ते जजिरा व उदेरी घेण्यास मदत करणार असे ऐकतो. पण हा अधमपणा व कृतघ्नपणा आहे, असे त्यांस तुम्ही सांगा. तसा जर विचार नसेल, तर सर्व आरमाराला तयार रहाण्यास हुकूम सुटले आहेत ते कां असे विचारा. तसेंच पावसाळा संपतांच दमाजी गायकवाड यास सुरतेवर चालून जाण्याचे हुकूम कां सुटले आहेत ? सुरतेच्या कारभारांत कपनीसरकारचा पुष्कळच हात गुंतलेला आहे,

हें पेशवे जाणतात. आम्हांस मोगलांकडून मिळालेली सनद आपण तुच्छ मानतों असें पेशवे दर्शवितात; पण स्वतः पेशवेहि मोंगलांकडून मिळालेल्या सनदांना महत्त्व देतात. सुरतेचा किल्ला मोगलांच्या हुकमानें व सनदेनें आमच्या ताब्यांत आहे. त्याला उपसर्ग करण्याचें पेशव्यांना काम नाहीं. सुरतेचा नबाब पेशव्यांच्या ऐवजाचा फडशा करीत नसेल तर आम्ही त्याजकडून करून देऊ. पण सुरतेवर फौजा आल्या तर आमच्याहि फौजा लढतील हे ध्यानांत ठेवावे. बाणकोटच्या अलीकडे मुंबईनजीक एखादा किल्ला—बाणकोटच्या ऐवजी—त्यांना हवा असेल तर त्याचा विचार करू. हबशाविरुद्ध पेशव्यांस मदत करणें हे आम्हांला किती अवघड आहे हें समजून सांगा. आम्हांस पेशव्यांशीं स्नेहभाव ठेवावयाचा आहे, पण अपमान किंवा नुकसान सोसावयास आम्ही तयार नाही.

तुमच्या मदतीस आम्ही टॉमस मॅस्टिन यास देऊन पुण्यास पाठवीत आहोंत. त्यास तुम्हांस वाटेल तर पुण्यास मागें ठेवा आणि नाना व सदोबा यांच्या वारवार गांठी घेण्याकरितां त्याला एक दुभाष्या नेमून द्या."

वुइल्यम प्राईज हा २४ आगष्ट रोजीं मुंबईहून निघाला. तो पुण्यास संगमावर ४ सप्टंबर रोजी येऊन पोहोंचला. पेशव्यांकडे निरोप पोहोंचल्यावर सदाशिवरावभाऊकडून बाबा चिटणवीस साहेबाच्या समाचारास गेला. त्याची सोमवार पेठेतील एका वजाऱ्याच्या घरी उतरण्याची व्यवस्था केली होती. तेथें नानासाहेब भाऊ राघोबा व विश्वासराव इतक्यांची व वकिलाची भेट झाली. नानासाहेब उठून गेल्यावर वकिलाशीं भाऊंचें बरेच बोलणे झाले. हबशाविरुद्ध इंग्रजाने मदत न केल्याबद्दल दरबारचे सर्व लोक रागांत होते.

ता. २४ रोजीं नानासाहेबांनीं वकिलाची फिरून गांठ घेतली. पण भेटींत निष्पन्न कांहींच झाले नाही. गोविंद शिवराम यानें वकिलाला बराच धाक घातला व इंग्रजांच्या व्यापारास हरकत करून त्यांच्या ठाण्यांचा वसूल बळजबरीनें घेणें पेशव्यांच्या हातचें आहे असे त्यांस भासविलें. यावर वकिलानेंहि त्यास सांगितलें कीं, "पेशव्यांचे शत्रु इंग्रजांशीं तह करण्यास एका पायावर तयार आहेत व पेशवे आमच्याशीं तह न करतील तर आम्ही त्यांस मिळू." पुढील भेटींत वकिलानें गोविंद शिवराम यास असे दर्शविले कीं, साष्टी विजयदुर्ग वगैरे किल्ले आम्हांस द्याल व सुरतेच्या वसुलाचा हक्क सोडाल तर कदाचित् जजिरा घेण्यास इंग्रज मदत करतील. पण ही गोष्ट गोविंद शिवराम यास मुळींच मानवली नाहीं. वकिलाची कारभाऱ्याशीं गुजराथसंबंधीं बरीच बोलणीं झालीं. ता. १३ आक्टोबर रोजीं भाऊ स्वारीस निघून डेरेदाखल झाला. पुढें ता. १६ रोजीं वकिलाने नानासाहेबांचीं पर्वती येथे गांठ घेतली. फिरून ता. २२ रोजी नानांची व वकिलाची गांठ पडली. पण जंजिऱ्याप्रकरणीं निकाल लागेना, तेव्हां नानासाहेबांनीं इंग्रज वकिलास घोडा व शिरपेच

देऊन त्याची रवानगी केली, व अशा रीतीने वकिलात फुकट जाऊन प्राईज साहेब २३ आक्टोबर रोजीं मुंबईस परत आला.

सन १७६७ सालीं इंग्रजांनीं टॉमस मॉस्टिन यास फिरून पेशव्यांकडे पाठविलें. या वेळीं पुण्यास थोरले माधवराव पेशवे गादीवर होते. मॉस्टिन याच्या कामगिरीची समज त्याला खालीलप्रमाणे दिली होतीः

"अद्यापि कित्येक बंदरांतून आमच्या मालास हरकत होऊन तो पडून राहतो. ही हरकत दूर होण्याकरितां माधवरावास मुंबईच्या गव्हर्नराने विनंति केल्यावरून येसाजीपंत याचे नांवे हरकत दूर करण्याचा हुकूमही सुटला होता. या हुकमाचा अंमल मागावयास मी मुंबईहून आलो आहे असे तुम्हीं पेशव्यास मुख्यतः भासवावे; पण वास्तविक याहून दुसरीं अधिक महत्त्वाचीं कामेंहि तुम्ही करण्याचीं आहेत. विजयदुर्ग किल्ला घेतला तेव्हां आंग्र्याचे मुलगे आमचे स्वाधीन झाले. आम्हांस शरण आले म्हणूनच आम्हीं त्यांस ठेवून घेतले. एरवीं असले बंदिवान ठेवून घेऊन रिकामा खर्च करतो कोण असे तुम्हीं पेशव्यांस सांगावें.

मराठ्यांचे वर्चस्व दिवसानुदिवस वाढत आहे ही गोष्ट मोठी अनिष्ट आहे व ती आमच्या लक्षांत आहे. मद्रास–बंगाल येथील आमच्या अधिकाऱ्यांच्या मनांत हेच शल्य आहे. पण हल्लीं निजाम अल्ली व हैदर अल्ली यांची दोस्ती झाल्यामुळे आम्हांस मराठ्यांशीं स्नेह करणे भाग आहे. मराठ्यांस वाटेल तर आम्ही बेदनूर व सौदा देऊं; मात्र त्याच्या मोबदला पेशव्यांनीं आम्हांस वसई व साष्टी द्यावी; तसेंच सुरतेवरील हक्क सोडावा. वाटेल तेथें आम्हांस वखारी घालूं द्याव्या. कर्नाटकांत मिरीं वेलदोडे व चंदन यांच्या व्यापाराचा कुलमक्ता आम्हांस द्यावा. आमचा मुख्य हेतु साष्टी हातीं ठेवण्याचा आहे. मराठ्यांशीं स्नेह करून त्यांची सत्ता वाढूं देणे हे आम्हांस अनिष्ट आहे; पण या वेळीं त्याशिवाय गत्यंतर नाहीं.

"माधवराव व रघुनाथराव यांच्यामधील भांडणामुळें माधवराव पेशव्यांचें मन व्यग्र असेल तर मग पेशव्यांचें मन सांभाळण्यास आम्हांस फारसें कारण आहे असें नाहीं. म्हणून दरबारचें रंगरूप पाहून पेशवे आम्हांस मिळूं-इच्छित असतील तर मद्रासेकडे कारण पडल्यास ते आम्हांस किती फौज पुरवूं शकतील असा सवाल तुम्हीं प्रथम टाकावा व ते जें उत्तर देतील त्यावरून तेथील स्थितीची खरी परीक्षा करावी.

"माधवराव व रघुनाथराव या दोघांहीकडून मुंबईच्या गव्हर्नराकडे नजराणे व दोस्तीचीं पत्रें घेऊन वेगळीं वेगळीं माणसें गेलीं होतीं. यावरून पेशव्यांना विशेषतः रघुनाथरावाला आमची मदत पाहिजे असें दिसतें. चुलत्यापुतण्यांचा मिलाफ झालेला वरून दिसतो तो खरा नाहीं; व आमचा हा तर्क खरा आहे

अशी तुम्ही आमची खातरजमा केल्यास आम्हांस फार आनंद होईल. या चुलत्यापुतण्यांचे भांडणाशिवाय असाच दुसरा एखादा मोठा गृहकलह असून त्यामुळे त्यांच्या मुलुखगिरीस व्यत्यय येण्यासारखा असल्यास तसेंहि कळवा. कदाचित् निजाम व हैदर यांजकडून वकील येऊन त्यांनी पेशव्यांची अनुकूलता सपादली असेल तर त्याचे परिणाम वाईट होतील, असे वाटेल त्या तऱ्हेने पेशव्याचे मनांत भरवा. सोबत नजराणे पाठविले आहेत, त्यांतील राघोबाचा नजराणा त्यांजकडे नाशिक येथे तुमचा मदतनीस चार्लस ब्रोम याजबरोबर पाठवावा, आणि नेहमीं पेशवे व राघोबा यांजकडूनच कांहीं बोलणे निघेल असे करावे. ”

मॉस्टिनसाहेब ता. १९ नव्हेंबर १७६७ रोजी मुंबईहून निघाला. पनवेलच्या खाडीत शिरल्यापासून पेशव्यांचा पाहुणा या नात्याने त्यास वागविण्यात आले. वेलापुरच्या किल्ल्याजवळ तोफांच्या सरबत्तीने त्याला सलामी देण्यांत आली व त्याच्या सन्मानार्थ शिंगहि फुकण्यांत आले. पनवेलीस दादोपत याने त्याची व्यवस्था ठेविली, व तेथून पुढे पेशव्याचे बिगारी देऊन सामानासुद्धां त्याला मजल दरमजल पुण्यांत पोचविण्यात आले. मॉस्टीनसाहेबाजवळ सामानसुमान बरेंच होते ते नेण्याला सुमारे ५० बिगारी लागत. पण ता. २९ रोजी मॉस्टिनसाहेब गणेशखिंड येथे येऊन पोहोचला, आणि माधवराव पेशव्याकडून रामाजीपत चिटणवीस हा येऊन भेटल्यावर शहरांत गोविंद शिवराम याच्या बगीच्यांत त्यास उतरविण्यांत आले. तेथें राहून पेशव्यांची गांठ आज पडेल उद्या पडेल अशी तो वाट पहात बसला. आणि ही गांठ अखेर ता. ३ डिसेंबर रोजीं शनवारवाड्यात दरबारचे दिवाणखान्यात पडली. पहिल्या भेटींत फक्त औपचारिक कुशलप्रश्नोत्तरें होऊन मॉस्टिनसाहेबानें पेशव्यांस नजराणे अर्पण केले.

मॉस्टीनसाहेबाने माधवरावास दिलेले नजराणे पुढीलप्रमाणे होतेः १ घोडा १ घड्याळ १ सोन्याची अत्तरदाणी १ वासाची कुपी २ शाली १ किनखापाचे फर्द १ शिकारी बदूक १ पिस्तुल जोडी १ पोषाख ४ वार हिरवी मखमल ६ वार गुलाबी मखमल २ घोडेस्वाराचे चाबूक ८ गुलाबी अत्तराच्या कुप्या ४ वार जरतारी कापड; याशिवाय नारायणराव पेशव्यास १ सोन्याची सांखळी १ पोषाख १ रुप्याची गाय २ शाली २ किनखापाचीं ठाणें आणि १ चाबूक.

इंग्रज वकिलाची गांठ पडावयाची ती शुभमुहूर्तावर पडावी म्हणून पहिल्या भेटीला उशीर लागला; पण पुढेहि पेशव्यांची गांठ लवकर पडावी व बोलणेंचालणें व्हावे याकरितां मॉस्टीनसाहेबाला गोविंद शिवराम व रामाजीपंत याजकडून बरीच मध्यस्थी करावी लागली. आज गांवांत लग्ने आहेत, आज

वाडयांत ब्राह्मणभोजनें आहेत अशा एक ना अनेक कारणांनीं फिरून ४–५ दिवसांत मॉस्टिनची व पेशव्यांची गांठ पडली नाही. ता. ६ रोजीं मॉस्टिन-साहेबाने मुंबईच्या गव्हर्नरास कच्च्या हकीकतीचे पत्र लिहिले त्यांत त्यानें खालील माहिती मिळवून दिली होतीः

"गोपिकाबाईच्या चिथावणीवरून राघोबाला समक्ष भेटीत कैद करण्याचा माधवरावाचा विचार होता. पण सखाराम बापूच्या मध्यस्थीने चुलत्या-पुतण्यांचा तूर्तातूर्त तह ठरला. पेशव्यांनी रघुनाथरावास नाशिकत्र्यंबकचे आसपास १३ लाखांचा मुलुख व कांही किल्ले द्यावे. पचवीस लाखांपर्यंत राघोबाच्या फौजेची थकलेली पगाराची बाकी देण्याबद्दल पेशव्यांनी जामिनकी द्यावी व राघोबाने कारभारांत ढवळाढवळ न करता गप्प बसावे. हा करार कायमचा टिकेल असे कोणासच वाटत नाही. पण तूर्त तरी अशा रीतीने तटा मिटणार. जाटाकडून महादजी शिंद्याचा पराभव झाल्यामुळे तुकोजी होळकर नारोशंकर शिवाजी विठ्ठल विंचुरकर हे हिंदुस्थानात शिंद्याच्या कुमकेस जाणार." याशिवाय कर्नाटकाच्या मोहिमेवर निघण्याच्या तयारीची हकीगत पत्रांत दिली आहे. तसेच "माधवराव पेशवे स्वतः कोकणात जंजिरा घेण्याचे इराद्याने जाणार आहेत; त्र्यंबकरावमामा याने काशी व प्रयाग येथे यात्रेस गेल्याचे प्रसगी तेथील इंग्रजांची भेट घेतली आणि इंग्रजमराठे व सुजाउद्दवला इतक्यांनी मिळून जाट व रोहिले यांचे पारिपत्य करण्याविषयी बोलणे केले, अशी येथें बातमी आहे. राजापूर येथे इंग्रजी फौजेचा पराभव होऊन एक अधिकारी व शेदीडशे लोक पडल्याची पुण्यास वदता आहे" वगैरे मजकूरहि या पत्रात होता. ता. ७ रोजी मॉस्टिनसाहेबाने नाना फडणविसाची गांठ घेतली, पेशव्यांची फिरून गांठ घाला म्हणून नानास विनती केली. आज काय तर पेशवे थेउरास देवदर्शनास जाणार, उद्यां तुकोजी होळकराची हिंदुस्तानाकडे रवानगी होणार, परवा गोविंद शिवराम याचे घरी लग्नाची मेजवानी व समाराधना आहे म्हणून पेशव्यांची गांठ पडत नाही, असे होतां होतां अखेर ता. ११ रोजी गाठ पडली. या प्रसंगी सखारामबापू मोरोबा फडणीस वगैरे मडळी हजर होती. या बैटकीत मुख्य कामाच्या बोलण्यास सुरवात झाली; त्यांत प्रथमच पेशव्यातर्फे मॉस्टिन यास असा सवाल विचारण्यांत आला की, एका इलाख्यांतील इंग्रजी अधिकाऱ्याने कबूल केलेल्या तहाच्या अटी इतर इलख्यांतील इंग्रज मानतात किंवा कसें? यावर मॉस्टीनसाहेबानें उत्तर केले की, "प्रत्येक इलाख्यांतील अधिकारी वेगळे आहेत; पण कंपनीच्या हिताची गोष्ट असल्यास ते एकमेकांचे म्हणणे ऐकतात!" अखेर कर्नाटकाहून मराठ्यांचे सरदार परत येईपर्यंत नक्की कांही बोलतां येत नाही असे ठरले. दुसरे दिवशी मॉस्टिनसाहेबाने गोविंद शिवराम याची गांठ घेतली व "निजाम किंवा हैदरअली यांशीं स्नेह केल्याने पेशव्यांचा

फायदा नाहीं; पण आम्ही इग्रज वचनाचे धड असल्यामुळे आमच्याशीं तह करण्यांत त्यांचा फायदा आहे." असें त्यानें शिवराम गोविंद यास सुचविलें. सखारामबापू हा दरबारांतील महत्त्वाचा मुत्सद्दी असल्यामुळें मॉस्टिनसाहेबानें त्याची गांठ घेण्याचा प्रयत्न केला: पण गांठ पडली नाही. इतक्यांत कर्नाटकांतील पत्रे येऊन मुंबईकरांनीं मॉस्टिन यास हुकूम पाठविला की, "कर्नाटकाच्या बाबतीत पेशवे गप्प बसतील,कोणताच पक्ष घेणार नाहीत, तरी त्यांत आमचा फायदा आहे. ते तटस्थ तरी राहतील अशी तजवीज तुम्ही करावी. पेशवे हैदरअल्ली किंवा निजाम यांस जाऊन मिळतील व आमचा स्नेह सोडतील तर वऱ्हाडप्रांतीं भोसले हे इग्रजांशीं स्नेह करूं पहातात तेव्हां आम्ही त्यांस मिळूं, असा त्यांस धाक घालावा." इतके झाल्यावर म्हणजे ता. १९ डिसेंबर रोजी मॉस्टिनसाहेबानें आपला असिस्टंट चार्लस ब्रोम यास नाशिक येथे राघोबाकडे पाठविले. "माधवराव व राघोबा यांच्यात खरें सख्य नाही. तरी राघोबास सांगावें कीं, आम्ही तुम्हांस मदत करूं; व असें सांगून राघोबाकडूनच बोलणे येईल असे करावें." अशी समज मॉस्टिन यानें ब्रोम यास दिली होती. याच दिवशीं सखारामबापूंच्या मध्यस्थीनें मॉस्टिनची व पेशव्यांची गांठ पडली, व अखेर बोलणें निघाले. चौल बंदरांत अडकवून धरलेले आमचे जहाज सोडावें, ही मॉस्टिनची विनंति पेशव्यांनी मान्य केली; पण इतर गोष्टींवर खुलासेवार बोलणें होईना. तथापि हैदरअल्ली व हबशी यांचेविरुद्ध इग्रजांनी पेशव्यांस मदत करावी असा एकंदरीने पेशव्यांचे मनांतील गुप्त आशय होता, असा मॉस्टिन यानें तर्क केला; पण अखेर निश्चित असे कांहीच ठरले नाही. दोन्ही पक्ष आपला दिल खुला न करतां दुसऱ्यानें आधी बोलावें अशा विचारानें टपून बसले होते. ता. ३० रोजी मराठ्यांनी अडकवून ठेवलेलें इंग्रजांचें जहाज सोडून देण्याचा माधवरावाचा हुकूम झाला. ता. १ जानेवारी रोजीं राघोबाचा वकील गोपाळपत चक्रदेव मॉस्टिनसाहेबाचे भेटीस गेला. त्यानें इंग्रज वकिलास सांगितलें कीं, राघोबास तहाच्या अटी मान्य नसून माधवरावांकडून यत्किंचितहि चूक झाली कीं सर्व तह उलथून पाडून अथवा ६ महिन्यांत पुरा बखेडा करून टाकण्याची त्याची इच्छा आहे. या सुमारास निजाम अली व हैदर अली यांचे वकील पुण्यास येऊन दाखल झाले.आणि पेशवे आपण होऊन बोलणें काढतील अशी वाट पहात पहात मॉस्टिनसाहेब कंटाळून गेला आणि मी होऊन तरी बोलणें काढूं का असें त्यानें मुंबई कौन्सिलास विचारलें. ता. ४ रोजीं हिंदुस्थानांतून महादजी शिंदे पुण्यास आले; त्यांची व माधवराव पेशवे यांची गांठ संगमावर पडली. ता. ५ रोजीं माधवराव पेशव्यानें मॉस्टिन यांस वाड्यांत भेटावयास बोलाविलें व जेवणास ठेवून घेतलें. जेवणापूर्वीं युरोप व हिंदुस्थान यासंबंधीं उभयतांचे दरम्यान बरींच प्रश्नोत्तरें झालीं. ता. १० चे सुमारास आपण

होऊन बोलणें काढण्यास मॉस्टिन याला मुंबईकडून नाइलाजानें परवानगी मिळाली. परंतु " या लोकांशीं बोलणेंचालणें करतांना जी सावधगिरी ठेवावयास पाहिजे ती सर्व जरूर ठेवा " असा इषारा देण्यांत आला होता.

इकडे ब्रोमसाहेबास नाशिक येथें राघोबाकडे पाठविण्यांत आलें होतें. त्यानें राघोबाची इंद्रगड येथें गांठ घेतली. सदर भेटींत राघोबानें इंग्रजांची मदत आपणास मिळते याबद्दल आनंद प्रदर्शित केला. राघोबाचें म्हणणें कीं, "नानासाहेब पेशव्याच्या मरणोत्तर माधवरावाला सर्वस्वी मीं मदत केली, त्याचा मानमरातब राखला, मुलुखगिऱ्या व स्वाऱ्या केल्या व माधवरावास पोटच्या मुलाप्रमाणें सांभाळलें. असें असतां माधवराव कृतघ्न बनला; माझा अपमान करूं लागला, माझे खेही सरदार फोडूं लागला व अखेर मला कैद करण्यापर्यंत पाळी आली. तेव्हां आतां मला इंग्रजांशिवाय कोणी आधार उरला नाहीं !" रघुनाथरावास इंग्रजांकडून मुख्यतः तोफा व दारूगोळा यांची मदत पाहिजे होती. स्वतः राघोबादादाजवळ या वेळीं शंसवाशें लहान तोफा होत्या. पण त्यांचे गाडे वगैरे सामान नादुरुस्त होतें. आनंदवल्ली येथेंहि थोडासा तोफखाना होता; परंतु इंग्रजांचे तोफखान्याचे मदतीशिवाय आपला निभाव लागणार नाहीं, असें राघोबास वाटत होतें. माधवरावाशीं तात्पुरता तह झाल्यापासून राघोबानें आपल्या पदरचे घोडेस्वार बरेच कमी केले होते. त्याजबरोबर फक्त दोन हजार घोडेस्वार होते, पण स्वारीवर निघण्याचा बेत झाल्यास आणखी वाटतील तितके घोडेस्वार नोकरीस ठेवतां येतील असा त्याला भरवसा होता. ब्रोमसाहेबाच्या व राघोबाच्या भेटीस वरीलप्रमाणें सामान्यपणें बोलणेंचालणें झालें. आपण दिलेल्या मदतीकरितां इंग्रजांना राघोबानें नक्त पैशाशिवाय विशेष कांहीं हक्क व देणग्या द्याव्या अशी मुंबईकरांची अपेक्षा असल्याचें ब्रोमनें बोलून दाखविलें. पण उभयपक्षीं निखालसपणें बोलणें बोलण्याची तयारी नसल्यामुळें ब्रोम हा नक्की कांहीं न करतां परत आला.

ता. २७ जानेवारी १७६८ रोजीं मॉस्टिन व माधवराव पेशवे यांची फिरून गांठ पडली; या वेळीं तहाच्या १४ कलमांचा कच्चा मसुदा झाला. पण पूर्वीं सन १७६१ सालीं झालेल्या तहाविरुद्ध इंग्रजांनीं आंग्र्यांच्या मुलांना आपल्या रक्षणाखालीं घेतलें हें बरें केलें नाहीं, उद्यां राघोबाचाहि प्रश्न असाच उपस्थित होणार वगैरे मुद्यांवर बोलणीं झालीं. याच सुमारास इंग्रजांस असें दिसून आलें कीं, निजाम अगर हैदर अल्ली यांचा मराठ्यांशीं मिलाफ होण्याचा संभव नसल्यानें आपणासहि मराठ्यांशीं तह करण्याचें तूर्त विशेष अगत्य नाहीं, व तसें त्यांनीं मॉस्टिन यास लिहून पाठविलें. तारीख १९ फेब्रुवारी रोजीं माधवराव पेशव्यानें मुंबईस इंग्रजांचें आरमार तयार होऊन कोणीकडे जाणार याविषयीं माहिती विचारली. हें आरमार वास्तविक दक्षिणकिनाऱ्याकडे हैदर

अलीवर स्वारी करण्याकरतां जात होतें; तथापि तें मालवण व रायरी इकडे जात आहे असें मॉस्टिन यानें भलतेच सांगितले. पण पुढे खरा प्रकार कळतांच पेशव्यांना फार आश्चर्य वाटले; व बेदनूर आणि सौदा हे किल्ले आमच्या रक्षणाखालीं असल्यामुळे ते इंग्रजांनीं घेऊ नये, एरवीं हैदरवर वाटेल तर त्यांनीं स्वारी करावी, असें पेशव्यांनीं मॉस्टिन यास सांगितले. पण किल्ले व मुलुख घेतल्याशिवाय हैदरचें पारिपत्य करतां येणार नाहीं, याकरतां इंग्रजांनीं व पेशव्यांनीं मिळूनच हैदरचे पारिपत्य करावें हे बरें; आणि याविषयी बोलणे करण्याकरतां माधवरावाने मुंबईस आपला वकील पाठवावा असे मॉस्टिन याने सुचविले. ही गोष्ट पेशव्यांनी कबूल केली; व अखेर एक घोडा व एक शिरपाव देऊन पेशव्यांनीं मॉस्टिन याची रवानगी केली. उलट इंग्रजांकडून माधवरावास एक चित्ता व एक सिंहीण नजर करण्यांत आली. मॉस्टिन व पेशवे यांचे दरम्यान कित्येक कलमें समक्ष निकालांत निघालीं व पेशव्यांचे हुकूम मॉस्टिनचे हातीं पडले. तीं कलमे येणेप्रमाणेः—

( १ ) तीन वर्षांपूर्वी इंग्रज व्यापाऱ्यांचें मराठ्यांकडून नुकसान झाल्याबाबद ३०,९१५ रुपये १२ आणे नुकसानी देण्यांत यावी.

( २ ) मुंबईचा नसरवानजी मोदी याचा तबेला घेतला तो परत द्यावा.

( ३ ) सात वर्षांपूर्वी वैरामजी होरमसजी याची दोनशे खंडोचा महागिरी मराठ्यांनीं धरून नेली तिच्याबद्दल दुसरी द्यावी.

( ४ ) रिचर्ड नावलंड नांवाच्या इंग्रजांचे गुलाम साष्टींत पळून गेले होते ते ठाणेदाराकडून परत देववावेत; तसेंच,

( ५ ) याच गृहस्थाचे २ गुलाम चौल येथें पळून गेले होते तेहि देववावे.

(६) मुंबई बेटाच्या हद्दींत इकडील कोळी लोकांनीं मासे मारण्याकरतां डांबे पुरले होते ते काढून टाकण्याकरतां करंजा येथील ठाणेदारास हुकूम व्हावा.

मराठ्यांच्या कारभारांत इंग्रजांना हात घालण्यास थोरल्या माधवरावसाहेबांच्या कारकीर्दींत संधि सांपडली नाहीं. माधवरावानें राघोबाचा पुरा मोड करून बरोबर फक्त हजारपांचशें मनुष्यें इतमामादाखल राहतील, जास्त फौज ठेवतां येणार नाहीं, इतक्या बेताची नेमणूक करून देऊन त्यास गोदातीरीं स्नानसंध्या करीत बसविलें होतें; व पूर्वीं सांगितल्याप्रमाणें राघोबाकडे इंग्रजांचीं कारस्थानें आंतून चालू होतीं; तरी माधवरावाच्या दराऱ्यामुळें त्यांना राघोबास उघडपणें मदत करून त्यास पुण्यास आणण्याची जोखीम अंगावर घेण्याची छाती होईना. शिवाय कर्नाटक प्रांतांतील बखेड्यामुळें माधवरावाशीं अगदींच तुटून किंवा शत्रुत्वानें वागणें फायद्याचें नाहीं हें त्यांस पक्के माहीत होतें, यामुळें आंतून धुमसणाऱ्या या कारस्थानाला प्रकट स्वरूप आलें नाहीं. परंतु माधवरावाच्या मरणानंतर पेशवाईची घडी बरीच बिघडली. कर्नाटकचें कारस्थान ढिलें पडलें, आणि

पुण्यास नाना फडणवीस यांचें तेज जरी दरबारीं अधिकाधिक पडूं लागलें होतें, व नाना इंग्रजांस जरी पूर्णपणे ओळखीत होते, तरी रघुनाथरावाविषयीं त्यांना जो अत्यंत तिरस्कार व द्वेष वाटत होता यामुळें, राघोबा नको, मग त्यापायीं काय वाटेल तें झालें तरी चालेल, असे नानांच्या मनाने घेतले होते. पण राघोबाच्या द्वेषामुळे नाना व त्याचे साहाय्यकर्ते सरदार यांना अशा रीतीनें किंचित् दृष्टिदोष झाला असतां पुण्यास राहिलेल्या आपल्या वकिलाच्या डोळ्यांनीं मुबईचे इंग्रज सर्व परिस्थिति उघड्या डोळ्यानीं सावधपणें टपून पहात बसले होते. इंग्रजांचा हेतु प्रत्यक्ष मित्रत्वाचा तह न करितां, मुंबई वसई व साष्टी या बाजूला जो मुलूख व जो इतर फायदा मिळेल तो कोणीकडून तरी मिळावा, व एवढ्याच दृष्टीने ते आपला वकील पुण्यास ठेवणार होते, हें माधवरावास दिसलें नसेल असे नाहीं; तथापि इकडे जंजिरा व इकडे कर्नाटक या दोन बाजूकडे इंग्रजांच्या कुमकेची पेशव्याना नेहमीं अपेक्षा होती. त्यामुळे या लोभाला गुंतून माधवरावाने इंग्रजांचा वकील पुण्याच्या दरबारीं ठेवण्याची परवानगी दिली असावी; व या परवानगीमुळेच पुढे नाना फडणविसाला इंग्रज वकील पुण्यास राहण्यास कांही हरकत घेता आली नसावी. कसेंही असलें तरी पुण्यास इंग्रजांचा वकील कायमचा राहिल्यामुळे एक प्रकारें इंग्रजांचे बोट पेशव्यांचे कारभारांत कायमचेच शिरल्यासारखे झाले; व या कारस्थानाच्या वृक्षाला नारायणराव पेशव्याच्या मरणानतर फळ आले. ज्या रात्रीं नारायणरावाचा खून झाला, त्या रात्रीं इंग्रजांचा वकील मॉस्टिन हा दादासाहेबांच्या भेटीस आला. दादासाहेब गादीवर बसले तर आपले आयतेच काम झाले असें त्यास वाटलें असावें. पण पुढें नारायणरावाच्या खुनाचा पत्तामुद्दा राघोबापर्यंत लागून बारभाईचें कारस्थान रचलें गेलें व दादासाहेबांस पुणें सोडावें लागून दूरदेशीं भटकणें प्राप्त झालें, तरी इंग्रजांना आपला हात पेशवाईत शिरण्याची निराशा वाटण्याचें कारण नव्हतें. कांकीं, राघोबानें आपणास गादी मिळावी या हेतूनें पेशवाईचे जितके शत्रु तितक्या सर्वांशीं सख्य करण्याचा प्रयत्न चालविला होता. इंग्रज हे अद्यापि पेशवाईचे प्रत्यक्ष शत्रु गणले गेले नव्हते; पण नाना फडणविसांच्या बाजूस राहून विशेष लभ्यांश होण्याची कांहीं आशा नसल्यामुळें रघुनाथरावाच्या पक्षास मिळून पेशवाईचे शत्रु बनण्यांतहि कांहीं विशेष तोटा नाहीं असें त्यांना वाटलें असल्यास तें योग्यच होतें. शिवाय आणखी असाहि एक श्लेष निघण्यासारखा होता कीं, दादासाहेब झाले तरी कोणी परके नव्हते, पेशवेच होते. गंगाबाईच्या पोटीं सवाईमाधवराव जन्मेपर्यंत राघोबा हा खराखुराच गादीचा मालक असून, कारभारी हेच बंडखोर असें हेदराप्रमाणें त्यांनाहि उघड म्हणतां आलें असतें. आणि सवाईमाधवराव जन्मल्यानंतरहि ते नारायणरावसाहेबांचे खरोखर पुत्र होत अशाविषयीं खुद्द पेशवाईतीलहि कित्येक लोकांना

संशय आला असतांना इंग्रजांसारख्या परकीयांनीं तो संशय आपल्या सोई-प्रमाणे खरा मानून चालण्यांत काय वावगे होते ? सर्व तऱ्हेने फायदाच होता.

शिंदे आणि होळकर यांची मध्यस्थी फुकट गेल्यावर दादासाहेबांना पेशव्यांच्या शत्रूशिवाय दुसरी गति नाही असे झाले. सुजा उद्दवला किंवा हैदर-अल्ली यांजकडे जावे तर दोहोंकडचा पल्ला फार लांब, याकरितां इंग्रज जवळच्या जवळ गुजराथेत होते त्यांजकडेच जावे असें दादासाहेबांस सहज वाटले असावे. शिवाय याच बाजूस बडोदा येथील गायकवाडांच्या वारसांमध्ये तंटा लागला असून त्यांपैकी फत्तेसिंग याने पुण्यास कारभाऱ्यांचा आश्रय केल्यामुळे व गोविंदराव हा दादासाहेबांच्या पक्षाचा पहिल्यापासून असल्यामुळे त्याला इंग्रजांबरोबर गोविंदराव गायकवाड याचीहि मदत होण्याचा संभव होता. त्याप्रमाणे दादासाहेबांनी गुजराथेकडेच आपला मोर्चा फिरविला.

प्रथम दादासाहेब आणि गोविंदराव गायकवाड व मानाजी फाकडे हे सर्व मिळून हरिपंत फडके यांशी लढत होते. शिंदे व होळकर यांच्या मध्यस्थीने काही वेळ लढाई थांबली. पण या मध्यस्थीचा फिरून कांही उपयोग न होऊन महीनदीच्या कांठीं लढाई होऊन दादासाहेबांचा पुरा मोड झाला, आणि त्यांच्या तोफा हत्ती निशाणे वगैरे सर्व हरिपंताच्या हाती लागली. तेव्हां दादासाहेब थोड्या फौजेनिशीं खंबायताकडे पळून गेले. इतक्यांत पटवर्धन मागे लागून येतात अशी खबर दादासाहेबास लागल्याने त्यांनी खंबायतच्या किल्ल्यात आश्रय घेण्याचा प्रयत्न केला; पण खंबायतच्या नबाबाने त्यांना आश्रय देण्याचे नाकारले. तेव्हां दादासाहेबांनीं निदानची म्हणून इतकी विनवणी केली कीं, जवळच सुरत येथे इंग्रज आहेत, तेथपर्यंत तरी मला सुखरूप पोहोचवा. ही विनंती मात्र नबाबाने मान्य केली व त्याने त्यांची रवानगी भावनगर येथे करून दिली. भावनगरच्या बंदरांत नबाबाची जहाजे होती. त्यांत बसून बरोबर शागिर्द-पेशा कारकून शिपाई गडीमाणूस वगैरे मिळून ७०० मनुष्ये घेऊन दादासाहेब सुरतेस सुखरूप जाऊन पोहोचले. महीच्या लढाईत वाताहात झाल्यावरहि त्याजपाशीं १०० घोडे व ७ हत्ती उरले होते; पण ते कोणीहि हवाली करून घेईना म्हणून मोकळे सोडून देऊन दादासाहेबांना सुरतेस जावे लागले !

यापूर्वी कांही दिवस दादासाहेब माळव्यांत पळून गेले होते. तेथून शिंदे-होळकरांच्या मध्यस्थीने परत येत असतां तापीनदीच्या जवळपास जेव्हां आले तेव्हाच त्यांनीं सुरतेच्या गव्हर्नरामार्फत इंग्रजांशी बोलणे सुरू केलें होते. तेव्हां इंग्रजांनी त्यांस सांगितलें कीं, " तूर्त फौजेच्या खर्चाकरतां पंधरा लक्षां-पासून वीस लक्षांपर्यंत रक्कम अगाऊ द्यावी आणि बारभाईंचे बंड मोडून तुमची पुण्यास स्थापना झाल्यावर साष्टी व वसई द्यावी; म्हणजे आम्ही तोफासुद्धां अडीच हजार पायदळ तुमचे मदतीस पाठवितों. " पण हें म्हणणें

दादासाहेबांस पटलें नाहीं. एक तर पंधरा लक्ष रुपयाची रक्कम त्यांजवळ रोकड नव्हती अगर मिळण्यासारखीहि नव्हती. शिवाय साष्टी व वसई देण्याचें कबूल करणें योग्य नाही असें वाटण्याइतका स्वाभिमान अशा स्थितींतहि त्याच्या अंगी उरला होता. सबब, "आज रोख रुपये नाहींत, आणि साष्टी वसईहि देत नाहीं, पण गुजराथेत तुम्हांला सोईचा असा ११ लक्ष रुपये उत्पन्नाचा मुलुख देऊं व याच्या मोबदला तुम्हीं मला १ हजार गोरे व २ हजार काळे शिपाई आणि १५ तोफा इतकी कुमक द्यावी," असें दादासाहेबांनीं इंग्रजाकडे सांगून पाठविलें. मुंबईसरकारास या शर्ती जवळजवळ पसंत होत्या. पण साष्टी एक वेळ न दिली तरी चालेल; पण गुजराथेतील मुलुख देणें तो निदान साडेअठरा ल॰ उत्पन्नाचा तरी असावा असें बोलणें इंग्रजांनीं लावलें.

या सुमारास पोर्तुगीज साष्टी घेण्याचा प्रयत्न करणार अशी बातमी असल्या-मुळे हें बोलणें तितकेंच राहिलें. साष्टी येथील किल्लेदाराने यापूर्वी मुंबईकराशीं फितुरीचें बोलणें चालू केलें होतें. २ लक्ष ६० हजार रुपये मला द्या, म्हणजे मी साष्टीचें ठाणें व किल्ला स्वाधीन करतों असें हा किल्लेदार म्हणत होता. मुंबईचा गव्हर्नर हॉर्नबी १ लक्ष रुपये देण्यास तयार झाला होता व अखेर १ लक्ष २० हजारांपर्यंत हा सौदा टरलाहि असता. पण इतर रीतीनें किल्ला मिळण्याचा संभव पुणें येथील दरबारच्या गोंधळामुळें दिसत असल्यानें लांच देऊन किल्ला घेण्याचा हा बेत इंग्रजांनीं सोडून दिला व पोर्तुगीजांच्या हालचालींची बातमी ही सहजच त्यांना सबब सांपडली. इकडे पोर्तुगीजांची बातमी पुण्यास कळल्या-मुळें किल्ल्याच्या रक्षणाकरतां आणखी पांचशें फौज किल्लेदाराच्या मदतीस पाठ-विण्याचें ठरलें. यामुळें किल्लेदारालाहि लांच खाऊन किल्ला इंग्रजांच्या स्वाधीन करण्याची संधि नाहींशी झाली. अखेर ता. ९ डिसेंबर सन १७७४ रोजीं इंग्रजांनीं साष्टी घेण्याचें ठरविलें. ६२० गोरे शिपाई, तोफखाना, २०० गोलं-दाज व १ हजार काळे शिपाई इतकें सैन्य जनरल रॉबर्ट गॉर्डन याचे ताब्यात देऊन रवाना करण्यांत आलें. जनरल गॉर्डन यानें जमिनीच्या बाजूनें आणि कॅप्टन वाट्सन यानें जलमार्गानें ठाण्यावर हल्ला चढवावा असें ठरलें. ता.२० डिसेंबर रोजीं किल्ल्याच्या भिंतींवर तोफेचे गोळे पडूं लागले. आठ दिवसांत भिंतींत खिंडारें पडलीं. पण खंदक बुजवून त्यावरून किल्ल्यांत प्रवेश करण्याच्या कामीं इंग्रज फौजेस फार श्रम पडले. २७ डिसेंबर रोजीं झालेला हल्ला मरा-ठ्यांनीं परतविला व त्यांत इंग्रजांचे शिपाई व अधिकारी मिळून १०० लोक पडले. पण दुसरे दिवशीं फिरून हल्ला चढवून इंग्रज फौजेनें किल्ला घेतला; व आंतील बऱ्याच शिपायांची कत्तल केली. इकडे व्हर्सोवा उरण ( करंजा ) वगैरे टाणीं घेण्याचाहि इंग्रजांनीं याच सुमारास प्रयत्न केला व डिसेंबरच्या अखेरीस ठाण्याचा किल्ला व आसपासचीं टाणीं मिळून सर्व साष्टी बेट इंग्र-

जांच्या हस्तगत होऊन मराठ्यांपुढें एक मोठाच प्रश्न येऊन पडला.

सन १७७५ च्या जानेवारीच्या ३ तारखेस राघोबा दहा हजार घोडेस्वार व ४०० पायदळ घेऊन बडोद्याच्या रोखाने निघाला. त्याचे पाठीवर हरिपंत फडके असून शिंदे व होळकर यांच्याशीं बोलणें करण्याकरतां सखारामबापू, नाना फडणवीस हेहि हरिपंताबरोबर होते. पण साष्टीकडील गडबड ऐकून व इंग्रज वसई घेतात की काय आणि घाटाकडेहि सैन्य पाठवितात की काय या भीतीनें उभयतां कारभारी पुरंदरास परत आले.

यानतर कांहीं दिवस शिंदे व होळकर यांचा नाद न सुटल्यामुळे राघोबा हरिपंताशी अर्धवट तहाची बोलणी बोलत होता. पण तो नाद शेवटी सुटला व ता. ६ मार्च सन १७७५ रोजी इंग्रजांशी राघोबाचा निश्चितपणे तह झाला. इंग्रजांनीं राघोबाला ५०० शे गोरे व १००० काळे शिपाई शिवाय गोलदाज इतके सैन्य एकदम द्यावें व जरूर पडेल तर सातआटशे गोरे व सतराशे काळे शिपाई व इतर लोक व कामाठी मिळून ३००० पर्यंत सैन्य मदतीस द्यावे. राघोबाने फौजेचा खर्च द्यावयाचा तो २५ शे लोकांकरितां म्हणजे सुमारे दीड लाखपर्यंत द्यावा; आणि फौजखर्चाच्या जामिनकीबद्दल अमोद हनसोट व्हरसाल व अकलेश्वर हे चार तालुके राघोबानें तूर्त इंग्रजांच्या स्वाधीन करावे. तसेच तहाचे एक मुख्य कलम असें होते की, वसई व त्याखालचा सव्वा एकोणीस लक्षांचा मुलुख–साष्टी व शेजारची बेटे जंबूसर व ओलपाड वगैरे–राघोबा गादीवर बसल्यास इंग्रजांस कायमचा सोडून द्यावा. शिवाय तूर्त देण्यास जवळ पैसा नसल्याने आपल्याजवळचे ६ लाखांहून अधिक किमतीचे जवाहीर राघोबानें इंग्रजांना गहाण लावून ताब्यांत देण्याचे ठरविले. तसेच बंगाल्यांतील मुलखावर व अर्काटच्या नबाबाच्या मुलखावर मराठ्यांनी स्वाऱ्या करू नयेत; खुद्द इंग्रज व्यापाऱ्यांचीं जहाजे, अथवा कंपनीसरकारचे निशाण धारण करणारी इतर जहाजे, मराठ्यांच्या मुलखांत फुटून किंवा इतर कारणाने किनाऱ्यास लागली असतां ती ज्याचीं त्यास परत देण्यांत यावी, असेहि इतर करार इंग्रजाचे राघोबाशीं ठरले होते. हा तह ठरल्यावर हरिपंताशी राघोबाचे बोलणे चाललें होतं ते अर्थातच विसकटलें व फिरून लढाईस सुरुवात झाली; आणि हरिपंतापुढे निभाव लागेना तेव्हां राघोबा सुरतेस पळून गेला.

दादासाहेब सुरतेस पोंचण्याच्या सुमारास इंग्रजांची पधराशें फौज त्याच्या मदतीकरतां तयार होऊन राहिली होती, व मद्रासेहून फौज आल्यावर तीत आणखीहि भर पडावयाची होती. राघोबाशीं तह होण्याचे पूर्वी मराठ्यांशीं इंग्रजांनीं आपण होऊन युद्ध सुरू केले, त्याला सर्वस्वी ईस्ट इंडिया कंपनीचे मुंबईचे अधिकारी कारणीभूत होत. कलकत्तेकर इंग्रजांनीं निदान या पहिल्या युद्धांत तरी मराठ्यांची दोस्ती तोडण्याचा अत्यंत तिटकारा दाखविला.

एकदां युद्ध सुरू झाल्यावर कंपनीसरकारच्या इभ्रतीखातर पुढें त्यांना मुंबई-करांच्या विरुद्ध, म्हणजे केवळ त्यांना अपयश येईल अशा प्रकारचें, वर्तन ठेवितां येईना; व ही गोष्ट मनुष्यस्वभावाला आणि राजनीतीला धरूनच होती. परंतु ही इभ्रत सांभाळून या युद्धाच्या कामी मोडता घालण्याचा प्रत्येक प्रसंग त्यांनी साधला. शेवटीं सालबाई येथें बरावाईट कसा कां होईना पण तह होऊन युद्धाची समाप्ति झाली, आणि मराठ्यांशी फिरून सख्य झाले याबद्दल कलकत्ते-कर इंग्रजांनीं मनापासून आनद व्यक्त केला, एवढेच नव्हे तर, झालेला हा तह इंग्लंडचा राजा व ब्रिटिश पार्लेमेट यांच्या अखत्यारीने झालेला आहे व तो जर तुम्ही कोणत्याहि कारणाने किवा सबबीने मोडाल तर आम्ही आपल्या वरिष्ठ अधिकाराचा सत्तीने अमल करून तुम्हांस गप्प बसवू, अशा स्पष्ट शब्दांनीं कलकत्तेकरांनीं मुबईकरांस ताकीद दिली. तरी मुंबईकर इग्रजांनी कलहाचे बी जें एकदां रुजत घातले, त्याचा अकुर दुर्दैवाने सर्वस्वी खुडून असा केव्हांच निघाला नाही. मुंबईकराचे धोरण कलकत्तेकराना पुढे २०।२५ वर्षांनीं चांगलेच पटलें, व मग स्वतः त्यांनींच जें युद्धाचे कोलीत हाती घेतले ते मराठशाहीची इमारत जळून ढासळून पडेपर्यंत हातांतून खाली ठेविले नाहीं. मुंबईकरांच्या भाडखोर धोरणाचा विजय उशिरां कां होईना, पण झाल्याशिवाय राहिला नाही.

स्वहिताच्या दृष्टीने मुबईकरांचे धोरण बरोबर होते. राघोबा व नाना फडणवीस याच्या भाडणाचा फायदा घेऊन, मुबईकर इग्रजांनी कुरापतीस सुरवात केली खरी; पण राघोबा हा स्वतः होऊन त्यांना चिथावणी देणारा साथीदार बनला. आमच्या भांडणांत तुम्ही पडा असे तो त्यांजकडे आपण होऊन जाऊन म्हणाला, व मला मदत केल्यास तुम्हांला मोठे बक्षीस देईन असें आमिषहि त्याने दाखविलें. अशा स्थितीत स्वहित साधण्याची आलेली महापर्वणी मुंबईकरानी लाथाडून कशी द्यावी ? ही सधि साधण्याचा मोह त्यांना सहजच अनिवार झाला. राघोबाच्या वतीने आपण युद्धांत पडूं कां इच्छितों याचीं कारणे तारीख ९ आक्टोबर सन १७७५ च्या खलित्यांत त्यांनीं कलकत्तेकरांस खालीलप्रमाणे सविस्तर कळविलीं होती. तीं वाचलीं म्हणजे मुबईकरांचे या बाबतींतले धोरण बरोबर लक्षांत येते.

"रघुनाथराव हाच गादीचा खरा वारस आहे. त्याचा पक्ष धरणारे असे खुद्द ब्राह्मण व मराठे सरदार कांहीं थोडेथोडके नाहीत. नागपूरकर भोसले व बडोदकर गायकवाड या घराण्यांपैकीं निदान एकेक प्रमुख सरदार तरी राघो-बाच्या पक्षाकडे होता. होळकर आणि शिंदे दोघांनी राघोबाचा पक्ष धरिला नव्हता हें खरें; तरी पण तो सर्वस्वीं सोडला होता हेंहि खरे नाहीं. आपल्या-वरचा खंडणीचा व हिशेब चुकते करण्याचा बोजा टाळण्याकरितां कां होईना; ते कोणत्याच पक्षास उघडपणे सर्वस्वीं सामील न होतां पेशव्यांच्या घराण्यांतील

हा पक्षभेद स्वतःस पुरवून पुरवून खात होते. निजाम व हैदर हे तर राजरोस-पणें एकदां एका पक्षास तर दुसऱ्यानदां दुसऱ्या पक्षास उचलून धरून आपला डाव साधीत होते. खुद्द रघुनाथरावाजवळ सैन्य बरेच होते—म्हणजे त्याच्या मदतीस थोडेसे सैन्य देऊनहि कार्यभाग साधण्यासारखा होता, आणि रघुनाथ-राव पेशव्यांच्या गादीवर बसल्यास त्याला पेशव्याच्या अखत्यारीने कोणासहि मुलुख वगैरे देऊन टाकता येण्यासारखा होता. ”

युद्धांत पडण्याची ही संधि साधण्यास मुंबईकरांना ही कारणे सहज पुरे वाटण्यासारखी होती. पण ही संधि व्यवहारदृष्ट्या साधण्याला योग्य अशी असली तरी या भांडणात पडण्यापासून मुंबईकरांना मिळवावयाचे असे काय होते हा प्रश्न शिल्लक उरतोच, व त्याचे सरळ उत्तर असे की, मुंबईकर युद्धात पडले ते राघो-बाच्या बाबतीत विशेष अन्याय झाला होता म्हणून नव्हे; तर स्वतः मुंबईकरांना कांहीं लभ्यांश साधावयाचा होता म्हणून; हा लभ्यांश असाः मुंबई येथे वखार स्थापण्यांत ईस्ट इंडिया कंपनीचा हेतु व्यापार करण्याचा होता. व्यापाराकरितांच त्यांनीं मुंबई बंदर मिळविलें, व हे बंदर सुरक्षित राखण्याकरिता मुंबई बेट संपादून त्याची तटबंदी वगैरे केली. पण मुंबई बंदरात आलेला कंपनीचा व्यापारी माल खुष्कीच्या बाजूने देशावर रवाना होण्यास टाणे-साष्टी हाच मुख्य मार्ग होता. यापुढे डोंगर व घांट लागतात व तेथून मराठ्यांचा मुलुख लागतो म्हणून इंग्र-जांनीं साष्टी घेतली. ती तर त्यांना हाती ठेवणे जरूर होतेच, परंतु मुंबईलगतचीं दुसरीं बेटें आणि वसई हीं देखील त्यांना आपल्या हातीं हवी होतीं. ही त्यांना देण्यास राघोबा खुषीने तयार झाला होता. पुढे वसईपासून सुरतेपर्यंतची टाणी हींहि त्यांना व्यापारी दृष्टीने महत्त्वाची होती, व तींहि राघोबा देण्यास तयार होता हीं सर्व बेटे व टाणी आपले हातीं आल्यास कंपनीचा मुंबईबंदरचा व्यापार बिन-धोक चालणार होता. यापूर्वीच दरसाल चवदा लक्षांचा लोकरीचा माल महा-राष्ट्रांत खपत होता. शिवाय गुजराथेतील उत्तम कपाशीचा मुलुख हाती आल्यास बंगाल व चीन इकडील व्यापार वाढण्यासारखा होता. ही सर्व कोंकण पट्टी हातीं आल्यास डच पोर्तुगीज व फ्रेंच या तिघांच्याहि हातांतून इकडील व्यापार काढून घेऊन एकट्या ईस्ट इंडिया कंपनीसच व्यापारी मक्तेदार बनवितां येण्यासारखे होते. आजपर्यंत मुंबईच्या वखारीचा कारभार कंपनीस आंतबट्ट्यांतच पडत होता. पण राघोबाने देऊं केलेला मुलुख मिळाल्यास दीड लक्ष पौंडांचा जो तोटा मुंबईखात्यास नियत असे, तो सर्व जाऊन उलट कंपनीला या खातीं दोन अडीच लक्ष पौंड नफा होण्याचा संभव होता. मुंबईबंदरची तटबंदी केल्यापासून त्याला लष्करी ठाण्याचे स्वरूप सहजच आले होते. मुंबईबंदर नवीन जहाजे बांधण्याच्या सोईचें होतें, आणि राघोबाकडून मिळणाऱ्या मुंबई-लगतच्या नवीन मुलुखांतून जहाजे बांधण्याजोगे लांकूड मुबलक मिळण्या-

सारखे होतें. या सर्व फायद्यांचा विचार करितां पेशव्यांचें भांडण लावून देऊन, 'देव आम्हांला नवस न करितां पावला,' असे जे उद्गार मुंबईकर इंग्रजांनी ह्या संबधात काढिले ते मनुष्यस्वभावाला धरूनच होते.

राघोबादादास पेशवाईतील कलिपुरुष म्हणतात. वास्तविक त्याच्या वेळच्या इतर लोकांपेक्षा खरोखर तोच मनानें अधिक नादान होता किंवा काय हे ठरविणे बरेच कठिण आहे. पण पेशवाईची सत्ता, पेशवाईचा दरारा व पेशवाईचे ऐश्वर्य याना विघातक असोच,निदान परिणामी तरी,त्याची एकंदर कृति झाली हे नाकबूल करिता येत नाही. अधिकाराच्या हव्यासानें महत्त्वाकांक्षेने किंवा प्रतिपक्षीयाचा सूड घेण्याच्या बुद्धीनें त्यानें फक्त शिंदे होळकर यासारख्या मराठेशाहीतील प्रबल सरदाराशी संधान बांधून किंवा त्यांचा आश्रयहि करून नाना फडणविसाशी कलह केला असता व वेळीं नानावर विजय मिळवून त्याला कारभारांतून काढून सर्व सत्ता आपल्या हातीं आणिली असती तरी त्यास दोष देता आला नसता. पण इंग्रजांचा म्हणजे सर्वस्वी परक्याचा आश्रय करून त्यांनें त्याना घरात घेतल्यामुळे जी विषवृक्षाची मुळी रुजली तिनें हळूहळू वळावून मराठेशाहीची भव्य इमारत जमीनदोस्त केली; व ज्याला ज्याला म्हणून त्या वृक्षाचे फळ खाण्याचा प्रसंग आला, त्याचा त्याचा स्वातंत्र्याच्या दृष्टीनें पाहता नाशच झाला. राघोबाच्या हातून हा जो गुन्हा घडला तो खरोखरच अक्षम्य होता. नाना फडणवीस हा राघोबापेक्षां कमी कारस्थानी किंवा कमी महत्त्वाकांक्षी होता असे नाही व त्याच्या कारकीर्दीत त्याला इंग्रजाची मदत घ्यावी लागली नाही असेंहि नाही. पण नानाच्या महत्त्वाकांक्षेचा कल पेशवाई सुदृढ व सबळ करण्याकडे होता; तर राघोबाच्या महत्त्वाकांक्षेचा कल इंग्रजाच्या आहारी जाऊन पेशवाई कमकुवत करण्याकडे होता. नानांनीं इंग्रजाची मदत घेतली ती प्रायः परकीय शत्रूशीं झगडण्याकरिता. राघोबानें घेतली ती मात्र स्वकीयाशींच झगडण्याकरिता. राघोबाला पाठीस घालणारा कोणीहि प्रबळ मराठा किंवा ब्राह्मण सरदार न मिळाल्यामुळे त्याला इंग्रजांकडे नाइलाजानें जावें लागले असेल. पण त्याचा पक्ष उचलणारा कोणीहि मातबर सरदार त्या वेळीं नव्हता या गोष्टीचाच अर्थ असा होतो कीं, त्या वेळच्या लोकमतानें त्याचा पक्ष अन्यायाचा व नानाचा पक्ष न्यायाचा होता, आणि या अन्यायांत इंग्रजांचा आश्रय करण्याच्या अपराधाने सहजच भर पडली. नाना व राघोबा यांच्याकडे इतिहासांत कोणी केव्हांहि पाहणार तो याच दृष्टीनें !

राघोबा हा शूर व तरवारबहाद्दर होता याविषयी कोणासहि शंका नाही. पण तरवारबहाद्दर हे प्रायः मुत्सद्दी नसतात; आणि राघोबांतहि तेच व्यंग होते. यामुळें स्वारीवर व मुलुखगिरीवर जाण्यास जरी तो योग्य असा वाटत होता तरी दौलतीचा कारभार करण्याला तो लायक होता असे कोणींच मानल्याचे दिसत

नाहीं. नानासाहेब पेशव्याच्या मरणापर्यंत राघोबाच्या अंगची कलहप्रियता दिसून येणे शक्य नव्हतें; पण माधवराव पेशवा गादीवर येतांच या कलहास सुरुवात झाली. एकाद्या पेशव्याच्या मरणोत्तर त्याची गादी त्याचा मुलगा अल्पवयी असला तरी त्याजकडे जावी, त्याचा भाऊ वयानें त्याच्याहून मोठा असला तरी त्याजकडे जाऊं नये हा वारसाईचा नियम शिष्टसंमत असा तेव्हाहि मानला जात होता, असेच दिसते. म्हणूनच नानासाहेब पेशव्याच्या मरणोत्तर पेशवाईचीं वस्त्रे माधवरावास मिळालीं, राघोबास मिळाली नाहींत; आणि म्हणूनच माधवरावाच्या मरणोत्तर, तो निपुत्रिक मेल्यामुळे, तीं वस्त्रे नारायणरावासच मिळणें जरूर होते व तशीं तीं मिळालीहि. दरम्यान एक वेळ बळजबरीने राघोबाने थोडा वेळपर्यंत हीं वस्त्रे स्वतःस मिळविली होती; पण तें कृत्य अर्थात् अन्यायाचे होतें; म्हणून लोकमताच्या जोरापुढे त्याचीं हीं वस्त्रे फार वेळ टिकलीं नाहींत. तात्पर्य,पेशवाईचीं वस्त्रे मिळविण्याची राघोबाची महत्त्वाकांक्षा केव्हांहि अन्यायाचीच होती; पण पेशवाईचा कारभारी होण्याच्या त्याच्या महत्त्वाकांक्षेविषयीं मात्र हेच विधान इतक्या जोराने करिता येत नाही. म्हणून माधवराव गादीवर बसल्यानतर त्याची आई गोपिकाबाई इच्या मत्सरबुद्धीच्या प्रभावामुळे राघोबाला कारभारी न नेमितां फडणवीस व पेठे यांना कारभारी नेमण्यांत आले. तेव्हां लोकमताची सहानुभूति त्याला अगदींच नव्हती असे नाही. तथापि हा कारभारीपणा हस्तगत करण्यास राघोबाला मोगलांची मदत मिळवावी लागली, आणि ती घेऊन त्याने खुद्द माधवरावास कैदेत ठेवून स्वतःकडे कारभार घेतला, व फडणविसांकडून फडणविशी काढून आपला हस्तक जो चिंतो विठ्ठल रायरीकर याजला दिली (सन १७६२); पण लवकरच (१७६३) मोगलांशीं तह होऊन माधवराव पेशवे फिरून गादीचे धनी झाले व फडणविशीची वस्त्रे रायरीकर यांजकडून काढून तीं फडणविसांकडे म्हणजे नाना व मोरोबा याना देण्यांत आलीं.

यानतर पांच वर्षेपर्यंत राघोबा व माधवराव यांचा भांडणतंटा फारसा झाला नाहीं. राघोबा स्वारीच्या वगैरे कामावर जाई; आणि पेशवे व कारभारी मिळून जी कामगिरी त्याला देत ती तो करी; पण मातृभक्त माधवरावाची आई गोपिकाबाई इची स्त्रीबुद्धि. माधवरावास स्वस्थ बसूं देत नव्हती हे जरी थोडेसें खरें असलें तरी, स्त्रैण राघोबाची बायको आनंदीबाई इची स्त्रीबुद्धि राघोबाला गप्प बसूं देत नव्हती, हें पुष्कळच खरें होते. कसेहि असो, राघोबाच्या असंतोषाचें पर्यवसान उघड उघड बंडांत झाले; आणि पांच वर्षांपूर्वीचें चक्र बरोबर उलटे फिरून माधवरावानें राघोबाचा पराभव करून त्यास पुण्यास शनिवारच्या वाड्यांत कैदेंत ठेविलें. माधवरावाचें व नाना फडणविसाचे मन पहिल्यापासूनच मिळालेले होतें आणि राघोबाचा गैरमुत्सद्दीपणा नानास प्रथमपासनच नावडता होता. यामळें राघोबाचा पाडाव करण्यांत माधवरावास नानाची

मदत असे व माधवराव मुलुखगिरीवर गेला असतां, राघोबाचा प्रत्यक्ष बंदोबस्त ठेवण्याचें काम नानाकडे ओघानेंच येत असे. यामुळें नाना व राघोबा यांची जी एकदां तेढ पडली ती पुढे केव्हांहि निघाली नाहीं.

शेवटीं माधवराव पेशवे मरावयास टेकले तेव्हां,त्यांनी राघोबास कैदेंतून मुक्त केले आणि नारायणराव यांचा हात त्याचे हातीं देऊन मनांतील सर्व द्वेष टाकून देण्याची व नारायणरावावर ममता करण्याची विनवणी केली. मरणाच्या दारी बसलेल्या मनुष्याची विनवणी कोणासहि मोडवत नाही; तथापि ही विनवणी मान्य केल्यामुळे स्वतःची महत्त्वाकांक्षा व आनदीबाईसारख्या जहाबाज बायकोची चिथावणी बाजूला ठेऊन राघोबा नारायणरावाशी प्रेमाने वागू लागला ही गोष्ट राघोबाच्या माणूसकीस भूषणभूत होती. कित्येक दिवसपर्यंत चुलत्यापुतण्यांची फक्त निद्रा मात्र पृथक् स्थळी होत असे; पण जेवणखाण, बसणेउठणे ही एकत्र होत. पण दुर्दैवाने हा स्नेह फार दिवस टिकला नाही. पेशवाईत एकट्या राघोबासच बदसल्लागारांनी वेढले होते असे नाहीं; तर नारायणरावांची अशीच गत झाली होती. नारायणराव जितका तापट तितकाच हलक्या कानाचा होता; व लोकांच्या चिथावणीवरून राघोबाविषयी मनांत किल्मिष आणून त्याने आपल्या चुलत्यास व चुलतीस कैदेत ठेविले. नाना फडणवीस व सखारामबापू हे या गोष्टीस विरुद्ध होते; पण त्यांचे या कामीं कांहींच चालले नाहीं. कसेहि असो, गृहकलह पुनः प्रदीप्त झाला खरा! राघोबाच्या पक्षपाती लोकांनीं पारडे फिरवून नारायणरावासच कैद करण्याचा बेत केला व अगदीं आयत्या वेळी आनंदीबाई, कांहीं गारदी, आणि धर्मच्छलामुळे नारायणरावाचा द्वेष करणारे कांही प्रभू लोक यांच्या मसलतीने धरण्याच्या कटास मारण्याच्या कटाचे स्वरूप येऊन नारायणरावाचा खून झाला ( ३० आगष्ट सन १७७३ ) ही गोष्ट प्रसिद्धच आहे.

गादीच्या अभिलाषामुळें प्रत्यक्ष पुतण्याचा खून केला असा आरोप येऊन कैदेत असतां राघोबाविषयीं निदान कांहीं लोकांच्या मनांत जी सहानुभूति होती तीहि आतां सर्व मावळली. शिवाय नारायणरावाची स्त्री गरोदर असल्यामुळे त्याचा वंश पुढें चालविण्याची आशा लोकांना वाटू लागली; आणि राघोबा हा अपराधी असून त्याचे पाय गादीस कधींहि न लागतील तर बरे असे सर्व लोकांस वाटू लागले. नारायणरावास मुलगा होण्याचा संभव आहे ही जाणीव मनांत येतांच, आपण खून करून झालें तरी काय मिळविलें असे आनंदीबाईस वाटूं लागलें, आणि प्रथम गरोदर गंगाबाई, पुढें ती प्रसूत झाल्यावर ती आणि तिचा मुलगा सवाईमाधवराव यांना मारून टाकण्याचे अनेक कट आनंदीबाईनें केले व ते उघडकीस आले. यामुळें राघोबाविषयींच्या लोकांच्या द्वेषाग्नींत भर पडली; आणि नारायणरावाच्या मरणोत्तर तेराव्या दिवशीं राघोबाविरुद्ध बारभाईंचा जो कट झाला, त्यास पुढें पुष्टीच येत गेली. कारभाऱ्यांनींहि गंगाबाईच्या नांवानें

सनदापत्रें देणें व नारायणरावाच्या नांवेच पूर्ववत् शिक्के करणें सुरू केले.

राघोबा स्वारीवर गेल्यामुळे बारभाईच्या कटास विशेष जोर आला. राघोबाच्या बरोबर गेलेल्या सरदारांतहि नानांनी फूट पाडली, व हे फितुरी सरदार कांहीं कांहीं निमित्त काढून परत पुण्यास आले. राघोबास बारभाईच्या कटाची बातमी लागताच त्यानें आपला मोर्चा फिरविला व स्वारीचें काम टाकून देऊन तो पुण्याकडे फौजेसह यावयास निघाला. राघोबा परत फिरला असें पाहून नानानें त्र्यंबकरावमामा पेठे व हरिपंत फडके यांचे हाताखालीं फौज देऊन त्यांना राघोबावर पाठविलें. उभयपक्षाची लढाई पंढरपुराजवळ कासेगांव येथें होऊन त्र्यंबकरावाच्या फौजेचा मोड झाला, व तो स्वतःहि मारला गेला. बारभाईच्या प्रयत्नास हा पहिल्याच घासाला मक्षिकापात झाला असें पाहून नाना फडणविसाची कंबर खचली तथापि हरिपंत फडके जिवंत आहे त्या अर्थी तो मसलत सर्वस्वी फसू देणार नाहीं, असा नाना व बापू या दोघानाहि भरंवसा होता तो लवकरच खराहि ठरला हरिपंतानें फौजेची फिरून जुळवाजुळव केली आणि साबाजी भोसले व निजाम अली यांची मदत घेऊन तो राघोबावर चालून गेला. ही नवी फौज येत असलेली पाहून राघोबानें पुण्याची वाट सोडिली, व ब्र्हाणपुराकडे तो पळत सुटला. इकडे तारीख १८ एप्रिल सन १७७४ रोजीं गंगाबाई प्रसूत होऊन तिला मुलगा झाला, त्यायोगानें बारभाईच्या प्रयत्नास अधिक तेज व बळ आलें. नवीन पेशव्याचें नाव 'सवाई माधवराव' असें ठेवून कारभाऱ्यांनीं त्याच्या नावानें राजरोस पेशवाईचा कारभार सुरू केला.

या वेळीं पुण्याच्या दरबारीं राघोबास मोरोबा फडणवीस, गायरीकर आणि पुरंदरे हे तीन सरदार अनुकूल होते. मोरोबाची मदत घेऊन राघोबानें गंगाबाई व सवाईमाधवराव यास पुरंदराखालीं व पुरंदरावरहि पकडण्याचा प्रयत्न केला, पण तो साध्य झाला नाहीं. राघोबा उत्तरहिंदुस्थानाकडे वळला असल्यामुळे शिंदे व होळकर या प्रमुख सरदारांची मदत नानास अत्यवश्य होती, व ती बहुधा मिळेल असा त्याचा अजमास होता. महादजी शिंद्यास माधवराव पेशव्याच्या कारकीर्दींत सरदारी मिळून तो माधवरावाच्या कृपेमुळे नांवारूपास आला, यामुळे तो माधवराच्या पक्षास अनुकूल व राघोबास प्रतिकूल होता. शिवाय, तुकोजी होळकर हा महादजीच्या सल्लामसलतीनें व त्याच्याशीच मिळून वागे.: अर्थात् महादजीची मदत मिळाली म्हणजे होळकरांचीहि मदत नानास आपोआप मिळणार होती. नानाच्या अपेक्षेप्रमाणे शिंदे व होळकर हे नानास मदत देण्यास तयार झाले खरे; पण राघोबाचा पाडाव करण्यास त्यांना मनांतून नानाइतकी उत्सुकता नव्हती. पेशवाईतील या भांडणाचा फायदा महादजी शिंद्यास स्वतःचे वजन वाढविण्यास सहज घेतां येण्यासारखा होता; शिवाय या

पूर्वीच्या चार सालांत शिंद्याच्या फौजेस खर्च झाला किती, त्यानें वसूल केला किती, आणि पुणे–दरबारचे देणे निघते किती याविषयी सरदार या नात्याने शिंदे व फडणवीस या नात्याने नाना याच्या दरम्यान पडलेला लढा पुरा उकललेला नव्हता. शिंद्याने थोडी शिथिलता दाखविल्यामुळे राघोबा नर्मदा उतरून इंदूरपर्यंत गेला. त्याच्या मागोमाग हरिपंत फडके हाहि फौजेसह माळव्यांत शिरला. पण शिंदेहोळकरांच्या मुलखांत त्याची अनुमति घेतल्याशिवाय हरिपंतास राघोबाचे पारिपत्य करणे शक्य नव्हते. हरिपंत माळव्यांत शिरणार असे पाहतांच महादजीने राजरोसपणे राघोबाशी मध्यस्थी करण्याचे राजकारण आपल्या हाती घेतले व कोणत्या अटींवर राघोबास घरी बसवावे याविषयी बोलणे सुरू केले. राघोबाने आपल्या अटी सांगण्यांत बरीच उडवाउडवी केली. प्रथम फौजेच्या खर्चाकरितां झालेले ५–७ लाख रुपयांचे कर्ज फडण्यास पैसे द्या, म्हणजे शिंद्याच्या मध्यस्थीने मी कायमचा तह करितो, अशी राघोबाने मागणी केली. पण हरिपंताकडून कर्जफेडीचे रुपये हाती येतांच तो अयोध्येचा नबाब सुजा उद्दौला याच्या आश्रयास पळून जाण्याचा बेत करू लागला. पण शिंद्याने या कामी त्यास प्रतिबंध केल्यामुळे तो दक्षिणेस येण्यास तयार झाला. बरोबर शिंदे व होळकर हेहि होते, अर्थात् मोंगल व भोसले यांच्या मदतीचे कारण न उरल्यामुळे हरिपंताने त्याना वऱ्हाडाच्या सरहद्दीजवळ रजा दिली.

राघोबा दक्षिणेत सुखाने येत नव्हता, हरप्रयत्नाने त्याची दिरंगाई चालू होती. शिंद्यालाहि ते एका अर्थाने इष्टच होते, कारण, कारभाऱ्याकडून त्याच्या अटी मान्य व्हावयाच्या तर त्या राघोबा पुण्यास पोचण्याच्या आधीच. यामुळे शिंद्याने आपला वकील पुरंदरास कारभाऱ्याकडे पाठवून राघोबाविषयी व स्वतः-विषयी सर्व कलमे स्पष्टपणे ठरवून घेतली. त्यात राघोबास दहा लक्षाची जहागीर, तीन किल्ले आणि स्वतः शिंद्यास खर्चाबद्दल एक लक्ष रुपये आणि शिंदखेड वगैरे कांही गावाचें इनाम वगैरे कलमे होती. ही कलमे उगवून घेऊन राघोबास स्वाधीन करण्याकरितां शिंद्याने कारभाऱ्यांसच हिंदुस्थानाकडे बोलाविले. कारभारी हे प्रकरण निकालात काढण्यास अगदी उतावळे झालेले असल्यामुळे, त्यांनी फिरून मोंगल व भोसले याना आपल्या मदतीस बोलावून खानदेशचा मार्ग धरिला. हे पाहून राघोबाने फिरून नव्या अटी घातल्या; व शिंद्याच्या शिथिलतेचा फायदा घेऊन राघोबाने झुकांडी देऊन फिरून उत्तरेकडे पळ काढला ! कारभाऱ्यांची निराशा झाली व आपल्याबरोबरची फौज हरिपंताच्या मदतीस पाठवून ते पुण्यास परत आले. राघोबाबरोबर आनंदीबाई होती, ती त्या वेळी गरोदर होती. तिला बरोबर घेऊन धांवपळ करणे फार अडचणीचे होते; यामुळे त्याने तिला धारच्या किल्ल्यांत ठेवून तिच्या संरक्षणाची तजवीज केली व हें झाल्यावर तो पळण्यास मोकळा झाला. धारेहून तो उजयनीस गेला, पण

हरिपंताच्या फौजा तेथेंहि आपला पाठलाग करीत आल्या असें पाहून तो एकदम पश्चिमेकडे वळून गुजराथेत शिरला व बडोदें येथे गेला. त्याच्या मागून हरिपंत व त्याच्या समागमें राघोबाशीं तहाचीं बोलणीं बोलत बोलत येणारे शिंदे आणि होळकर, अशी सर्व मराठे मंडळी हा पाठशिवणीचा खेळ खेळत होती ! बडोद्यास राहणे सुरक्षित नाहीं असे पाहून राघोबा अहमदाबादेकडे निघाला तेव्हा त्याचा पाठलाग हरिपंताने करून महीनदीच्या तीरावर गांठहि घातली, आणि आतां लढाई होणार इतक्यात शिंद्याने मध्ये पडून उभयतांमध्ये तहाचे बोलणे सुरू केले. या नदीच्या दोन्ही कांठांवर या दोन्ही सैन्यांचा तळ सतरा दिवस पडला होता. पण शेवटी वाटाघाटींतून निष्पन्न असे कांहींच झाले नाहीं.

पेशवाईच्या भांडणाचे मूळ जो राघोबा त्याची स्थिति तर खरोखरच अगदीं कींव येण्यासारखी होती. नारायणरावाच्या वधानंतर बारभाईंनी त्याला पिटाळून लावला. आपल्यास कोणीहि पाठीशी घालीत नाही असे पाहून त्याने इंग्रजाचा आश्रय करण्याचा विचार केला. धार येथे आपली सर्व चीजवस्त ठेऊन सहा लाख रुपये किंमतीचे जवाहीर घेऊन त्याने गुजराथेचा रस्ता धरिला. खंबायतावरून भावनगरास जाऊन तेथून जलमार्गाने तारीख २३ फेब्रुवारी सन १७७५ रोजी सुरतेस पोंचला. तेथे त्याचा आदरसत्कार इंग्रज अधिकाऱ्यांकडून करण्यांत आला; पण दादासाहेबांस पैशाची नड पडली असतां ती कांहीं इंग्रज भागवीनात. सुरतेस कर्ज काढावे असा त्यांनी विचार केला; पण त्यांना कोणीहि शेटसावकार कर्ज देईना. अशा स्थितींत आमच्याशीं तह करणार तर लवकर करा असा इंग्रजांनीं राघोबास तगादा लावला; व अशा शहाजोग धन्यास स्वतः जामीन राहून कर्ज देववावें तें बाजूसच राहून उलट तुमच्या जवळील सहा लक्षाचें जवाहीर तहाचा सचकार म्हणून आमचेजवळ ठेवाल तर आम्ही तह करूं असें ते म्हणूं लागले ! तेव्हां नाइलाज होऊन राघोबानें तह केला. तहाची मुख्य कलमें अशीं होतीं कीं, मराठ्यांशीं इंग्रजांचे झालेले पूर्वीचे तह राघोबाने मान्य करावे, इंग्रजांनीं राघोबास तूर्त पंधराशें पण पुढें लवकरच कमींत कमी पंचवीसशें फौज मदतीस द्यावी. या फौजेच्या खर्चाकरितां राघोबानें सर्व साष्टी बेट, तसेच साष्टीलगतचा मराठ्यांच्या ताब्यांत असलेला भाग आणि त्याचें उत्पन्न, जंबूसर व ओलपाड हे गुजराथेंतील दोन परगणे, कारंजा कान्हेरी वगैरे मुंबईलगतचीं बेटें बडोद्याच्या गायकवाडामार्फत भडोच शहर व परगणा यांत होत असलेला मराठ्यांचा वसूल, अंकलेश्वर उत्पन्नापैकीं सालीना पाऊण लक्ष रुपये, इंग्रजांनीं मदतीस दिलेल्या फौजेच्या खर्चाकरितां दरमहा दीड लक्ष रुपये व या रकमेच्या तारणादाखल गुजराथेंतील चार महालांचें तारण द्यावे. बंगाल व कर्नाटक इकडील इंग्रजांच्या जहागिरीवर मराठ्यांनीं पुढें केव्हांहि स्वारी करूं नये. कंपनीस देऊं केलेला वरील मुलुख तहाच्या तारखेपासून

इग्रजांच्या स्वाधीन करावा व राघोबानें पुण्यास दरबाराशीं स्वतंत्र तह केल्यानें जरी युद्धाचे कारण पडले नाही व इंग्रजांस फौजेची मदत करावी लागली नाहीं तरी इग्रजांनीं तहाप्रमाणें करावयाची ती मदत केली असें समजून सदर मुलुख त्यांना कायमचा देऊन टाकला असे समजले जावे !

येणेंप्रमाणे तह झाल्यावर मुंबईकरांनीं कर्नल कीटिंग यास राघोबाच्या मदतीस जाण्यास हुकूम केला. कीटिंग व राघोबा यांची सुरतेस फेब्रुवारीच्या अखेर गांठ पडली. लवकरच दारा येथे म्हणजे खंबायतपासून १९ मैलांवर राघोबाचे व इग्रजांचे सैन्य सुमारे पन्नास हजारांइतकें जमले. इकडे हरिपंत फडके याच्या हाताखालील फौज शिंदे व होळकर माळव्यांत परत गेल्यामुळे बरीच कमी झाली होती व बरेच दिवस पगार न मिळाल्यामुळे थोडीशी बेदीलहि झाली होती. अशा स्थितींत आरासगांवाजवळ उभय सैन्यांची गांठ पडून लढाई झाली; तीत हरिपंतांस हार खावी लागली. पण आरास येथील विजयाने निकाल असा कांहींच लागला नाही. कारण, पुढे पाऊसकाळ जवळ आला; यामुळे हरिपंताच्या फौजेच्या मागे न लागतां कीटिंग यास डभोई येथें पावसाळी छावणी करून रहावें लागले; पण पेशव्यांच्या सैन्यास मिळालेली ही अवधि राघोबास प्रतिकूल झाली. मुंबईकरांनीं राघोबाशीं केलेल्या तहाची हकीकत कलकत्त्यास गव्हर्नर जनरल वॉरन हेस्टिंग्ज यास समजतांच त्याने ताबडतोब तहास हरकत घेतली. सन १७७४ च्या रेग्युलेशन ॲक्टान्वये बंगाल्यांतील गव्हर्नरास हिंदुस्थानांतील मुख्य गव्हर्नराचे अधिकार मिळाले असून इतर इलख्यांतील गव्हर्नरांवर त्याचा अधिकार चालूं लागला होता. या गोष्टीस एकच वर्ष झालेलें असल्यामुळें पूर्वीच्या स्वतंत्र अधिकाराच्या संवयीनें मुंबईकरांनीं स्वतःच्या अखत्यारींत तह केला; कलकत्तेकर गव्हर्नराच्या संमतीची वाट पाहिली नाहीं. यामुळें पुण्याच्या दरबारास विनाकारण चिडविल्याचें पाप मात्र त्यांच्या माथीं आलें. कलकत्यास बातमी जाण्याचे पूर्वीच पेशव्यांच्या फौजेशीं तडकाफडकीनें युद्ध होऊन अनुकूल निकाल लागला असता व इंग्रजी फौजेनें राघोबास प्रत्यक्ष पुण्यास नेऊन गादीवरच बसविलें असतें तर कदाचित् गोष्ट वेगळी होती. मग कलकत्तेकरांनीं झालेल्या गोष्टीचा फायदा घेतला असता; पण एकंदरींत मराठी फौजेशीं लढण्याचा प्रसंग, सर्व मराठे सरदार पुण्याच्या दरबारास अनुकूल, स्वतः राघोबाजवळ सैन्य फारसें नाहीं, मुंबईकरांची सांपत्तिक स्थिति आधींच वाईट, आणि इतक्या सर्व प्रतिकूल गोष्टी अंगावर घेऊन युद्धांत पडावयाचें तें कोणाकरितां व कशाकरितां, तर सर्व जगानें ज्यावर प्रत्यक्ष आपल्या पुतण्याचा खून केल्याचा आरोप शाबीत धरला त्याला पुण्याची गादी मिळण्याकरितां ! वॉरन हेस्टिंग्ज हा कांहीं सत्याचा किंवा न्यायाचा पुतळा खचित नव्हता; तथापि राघोबाचा पक्ष मुंबई-

करांनी उचलला हे त्यालाहि अत्यंत विपरीत वाटले यांत शंका नाही. त्याने लढाईच्या बंदीचे हुकूम तावडतोब चोहोंकडे सोडून खुद्द आपला एक वकील तह करण्याकरिता पुण्याच्या दरबारी परस्पर पाठविला. यामुळे मुंबईकरांना तोंडात मारल्यासारखे झाले व राघोबास आतां काय सांगावे याची त्यांना लाज वाटू लागली. त्यांनी कर्नल कीटिंग याच्या विद्यमाने राघोबास असे कळविले की, "गोष्ट या थराला आली खरी: तथापि आमच्या हातीं जितके म्हणून आहे तितके करून तुम्हांस मदत देऊ व तुमचा पाठपुरावा करू, तह करणेंच भाग पडलें तर जेणेकरून तुमचे हित साधेल अशींच कलमें तहांत घालण्याचा प्रयत्न करू व निदान शेवटीं आमच्या मुलखांत अगदीं निर्भयपणे रहाण्यास तुम्हास चांगलीशी जागा तरी देऊ." हा निराशेचा निरोप ऐकून राघोबास काय वाटले असेल याची कोणासहि सहज कल्पना करिता येईल !

रा. राजवाडे यांनी मराठ्याच्या इतिहासाच्या साधनांचा बारावा खंड प्रसिद्ध केला आहे त्यांत रायरीकर याच्या दप्तरातील या वेळच्या सुमाराचीं अनेक पत्रे छापली आहेत. त्यांत कांहीं राघोबाने लिहिलेली व कांहीं इंग्रजांपाशी असलेल्या त्याच्या वकिलानें त्याला लिहिलेली आहेत. तीं वाचली म्हणजे इंग्रजांचे आश्रयास गेल्यापासून राघोबाची कशी बिकट स्थिति झाली होती, याचे उत्कृष्ट चित्र पहावयास मिळतें. कलकत्तेकर इंग्रजाच्या हुकमानें लढाई बंद झाली, हा राघोबाच्या कार्याला मोठाच धोका आला: पण मुंबईकरांनी त्यास प्रथम पुष्कळच धीर दिला. "इकडील कच्च्या हकीकतीचें पत्र लिहून टेलरसाहेबास मुद्दाम कलकत्त्यास रवाना केले आहे तो वीस दिवसांत जाऊन पोंचेल व गेल्यापासून दीड महिन्यात फिरून लढाई सुरू करण्याची परवानगी घेऊन पत्रे रवाना करील" असा त्यांनी राघोबास धीर दिला. राघोबास त्याचा वकील लिहितो. "जनरलानें श्रीमंतांचा हात धरिला आहे तो कदापि सोडणार नाही. श्रीमंताची बाजी सिद्धीस जाईल, फिकीर करू नये. मुंबईवाल्यास अभिमान पडला आहे. नवीन जनरल विलायतेहून रवाना झाला आहे तो महिना पंधरा दिवसांत मुंबईस पोंचेल. तेव्हां श्रीमंताकडून लाभ होणे तो नव्या जनरलास होईल, आपणास कांहीं नाहीं म्हणून दिलगीर आहे. सारांश, आपले काम विलायतेशिवाय होणार नाही." खुष्कीच्या वाटेनें कोणी शहाणा माणूस विलायतेस पाठविल्यास आठदहा महिन्यांत पक्का बंदोबस्त होऊन येईल अशी खोटीच आशा राघोबास दाखविण्यांत आली. गंगाबाई प्रसूत होऊन मूल झाले ते निवर्तले असून त्याच्या जागीं दुसरे बनावट मूल ठेवले; पांचजणी गरोदर बायका मुद्दाम जवळ ठेविल्या होत्या; अर्थात् राघोबाचा गादीवरील हक्क अधिकच दृढ झाला, अशी जी कांहीं मुंबईस पिकली होती, तिचा आधारहि इंग्रजांना राघोबाला द्यावयास सांपडला व इंग्रजांचे सोबतीचा गुण व्यर्थ होणार नाहीं असें त्यास वाटूं लागलें. पण दिवसें-

दिवस ही आशा कमी होऊ लागली. राघोबाजवळ स्वतःचा असा पैसाअडका काहीच राहिला नाही. असे असतां, गायकवाडाकडून जो वसूल मिळावयाचा त्याचाहि इंग्रज फडशा करून देईनात. केव्हां गोविंदराव यास तर केव्हा फत्तेसिंग यास अनुकूलता दाखवून आपल्या खर्चाचा पैसा मात्र ते उगवू लागले. गुजराथेत देऊ केलेल्या परगण्याच्या सनदा मध्यस्थाजवळ दिल्या त्या हाताखाली घालून बसले, पण राघोबाच्या खर्चाची मुळीच तरतूद करीनात. पदरच्या सैन्याच्या बळावर बडोदें शहर हस्तगत करण्याचा राघोबाने विचार केला होता; पण त्यास देखील आडवे आले. त्याच्याशीं कज्जा करावा तर पुढची मसलत बिघडते. पगार तुबले म्हणून सैन्यांतील कांहीं लोक उठून जाण्याच्याहि बेतास आले. कलकत्त्याहून आश्विनात लढाई फिरून सुरू करण्याचें पत्र येणार होतें; पण कार्तिक उलटण्याच्या बेतास आला तरी पत्राचा पत्ता नाही. कोठे तरी नर्मदातीरी सोईची जागा पाहून रहावे म्हटले तर कर्नल कीटिंग तेंहि करू देईना. मजल दरमजल सैन्यासह कूच करण्याचा आग्रह धरू लागला. " रेवातीरीं राहू देत नाहीत, असे अर्धोदकीं आलो आहों. जनरल अतस्थ त्यास काय लिहितात तेंहि पुरतें समजत नाहीं, परतु जनरल वगैरे कोशलदार आमचे हितावर आहेत हें जाणून कूच तरी करितो. पुढे ईश्वरसत्ता प्रमाण. " निम्मा मार्गशीर्ष गेला तरी कलकत्त्याहून पत्र येईना. "बंगालेवाले तुमचें न ऐकत तेव्हां मग काय कराल ? तुमच्या वचनावर आम्हीं फसावे कीं काय ?" असे राघोबाच्या वकिलानें मुंबईकरांस म्हणून पाहिले; पण त्यांचे म्हणणे एकच. "खामखा बंगालेवाले आमचें म्हणणे ऐकतील, फिकीर न करणें." पण ही सर्व आश्वासने लवकरच निष्फळ ठरली. फाल्गुनाच्या सुमारास बंगालेकरांनी पाठविलेला अप्टनसाहेब पुण्यास पोंचून बारभाईशी तह करून तो त्याने मुंबईकरांस कळविला. या तहांतील मुख्य कलम राघोबास बारभाईच्या स्वाधीन करण्याचे होते ! ही गोष्ट राघोबाला कळवितांना मुंबईकरांस काय वाटले असेल याची कल्पना वाचकांनींच करावी हे बरे. राघोबालाहि मुंबईकरांनी केवळ विश्वासघात केला असेंच वाटू लागले. " इंग्रजांचे घरीं आम्ही असतां बारभाईच्या स्वाधीन आम्हांस करून कैद करवितात ही गोष्ट त्यांचे अभिमानास उचित की काय ?" असे उद्गार त्याच्या तोंडून सहजच निघाले ! स्वतःच्या हातून होत नाहीं तर नाहीं, पण गप्प बसावयाला तरी काय घ्याल असे तो इंग्रजांना विचारूं लागला. वर्ष दोन वर्षें गुजराथेंतच काढू व आपल्या उद्योगाने काय मिळेल ते मिळवून खाऊं. भडोचच्याजवळ 'रणगड' येथें नर्मदातीरीं राहून वर्ष दोन वर्षें स्नानसंध्या करून घालवूं. दरम्यान विलायतेस व इकडेहि बारभाईच्या शत्रूंशीं काय राजकारण चालेल तें चालवून नशिबाची परीक्षा तरी पाहू, असाहो राघोबानें एक वेळ बेत केला. पण हेहि शक्य दिसेना; कारण कलकत्तेकरांच्या हुकमानें तह झाल्यावर गुजराथेंत राघोबाला सैन्यासह आपल्या आश्रयास किंवा आपल्या संमतीनें राहू

देण्यास मुंबईकरांस अधिकार काय ? व प्रत्यक्ष बोलणें निघालें तेव्हां मुंबईकरांनीं त्यास हेंच सांगितलें. तेव्हां राघोबानें कपाळास हात लावला ! "आंग्रजांप्रमाणें थोर बळकट नाही म्हणून त्यांचा पक्ष केला, शेवटीं आमचे नशिबानें घालविलें, येविशीं जनरलास काय शब्द ठेवावा ? दैव असेल तसें होईल." "सर्वांमध्ये श्रेष्ठ आंग्रेज त्यांस सामील करून शत्रूची पारपत्तेहि निम्मे झाली असतां फिरून हिसका बसला तेव्हां वैराग्यहि प्राप्त जाहलें." कोपरगांवास राहणें म्हणजे बारभाईच्या प्रत्यक्ष कैदेंतच राहण्यासारखें होतें, म्हणून कंपनीच्याच मुलखांत एकादें क्षेत्र पाहून तेथें रहावें असें राघोबाच्या मनांत होतें, पण तें कांहीं घडेना. एवढेंच नव्हे तर, राघोबाचें सहा लक्षांचें जवाहीर इंग्रजांकडे गहाण होतें तेंहि त्यांनी बारभाईच्या स्वाधीन करावें असेंहि अप्टन यानें पुण्याच्या दरबाराशीं कबूल केलें ! राघोबास ही अन्यायाची परमावधीच वाटली. राघोबा म्हणाला, "आमचें जवाहीर देणार हा अप्टण कोण ?" पण इंग्रजांनी बारभाईशीं तह केल्यावर वरील प्रश्न विचारणारा राघोबा तरी कोण हें कांहीं त्यानें स्वतःस विचारून पाहिलें नाही !

शके १६९८ च्या चैत्र वद्य चतुर्दशीच्या पत्रांत राघोबानें जीव तोडून पुढील उद्गार काढले आहेत: " मसलत सर्व प्रकारें बिघडली. सर्वसंकटप्राप्त्या एक इंग्रजांचे प्रतिकूळतेमुळें जाहली. आजपर्यंत ज्याचा हात इंग्रजांनीं धरिला तो सोडला नाहीं, ऐसा यांचा लौकिक ऐकत आलों. ऐसें असतां सांप्रत आम्हांस पटकी बसविली. केवळ विश्वासघात, मोठे दगाबाजहि बेइमानि होत गेले, त्यांच्या-नेंहि कोणाचा नसेल ऐसा ( दगा ) जाहला आहे." राघोबास कोठें जावें काय करावें हेंच सुचेना. मुक्काम हलवून कोठें जावें म्हटलें तर पगाराकरितां शिबंदीनें केवळ प्राणाशीं गांठ घातली. आहे तेथेंच रहावें म्हटलें तर ग्यांबियर व कीटिंग यांनीं येऊन राघोबास स्पष्टच सांगितलें की, " इतके तुम्ही एथें राहिलां त्यास शहरा आसपास तसदी फौजेची लागते. फडके वगैरे फौजा तुम्हांवर येणार, आम्हांस कुमक होणार नाहीं. व फौजसुद्धां तुम्हांस ठेवून घेतलें याची बदनामीहि आम्हांवर येईल यास्तव कूच करून जावें. हरकोठें दम खाऊन फौज जगवावी बचाव जे रीतीनें होईल तैसा करावा. आमचे भरशावर राहू नये. शहरांत येत असाल तरी दोनशे माणसांनिशीं यावें. जास्त आंत घेणार नाहीं. "

कर्नल अप्टन यानें पुण्यास जाऊन कारभाऱ्यांशीं तहाचें बोलणें परस्पर सुरू केलें. त्याला कारभाऱ्यांनीं प्रथम दाद दिली नाहीं; व मुंबईकरांनीं नसतें भांडण उकरून काढलें याच मुद्यावर विशेष भर देऊन, साष्टीसुद्धां घेतलेला सर्व मुलुख इंग्रजांनीं परत द्यावा व राघोबाचा पक्ष बिनशर्त सोडावा, असा त्यांनीं आग्रह धरिला. पण या गोष्टीस इंग्रजांचा वकील कबूल होईना. तहाचें बोलणें मोडल्यासारखेंच झालें, व तारीख ७ मार्च १७७६ रोजीं कलकत्तेकरांनीं मराठ्यांशीं फिरून युद्ध सुरू करण्यास मुंबईकरांस परवानगी देण्याचें ठरविलें. पण

याच्या आधी सुमारें सहा दिवस इकडे तहाचें बोलणें जुळून तारीख १ मार्च रोजीं पुरदर येथे तहावर सह्याहि झाल्या. या तहांतील मुख्य अटी अशा होत्या कीं, साष्टी बेट इग्रजांनीं घेतलें ते त्यांजकडेच रहावें व तें परत देण्यास कधींकाळीं ते कबूल झालेच तर त्यांना पेशव्यांनीं त्याच्या मोबदला तीन लक्षांचा मुलुख द्यावा. भडोच शहर व भोवतालचा मुलुख पेशव्यांचे ताब्यांत होता तो—म्हणजे सुमारे तीन लक्षांचा मुलुख—पेशव्यांनीं इग्रजांस द्यावा. इग्रजांनीं राघोबाचा पक्ष सोडून आपले सैन्य काढून न्यावें आणि राघोबानेहि आपल्या फौजेस फांटा देऊन महिना पचवीस हजार रुपये घेऊन गोदातीरीं कोपरगांवीं रहावें. सदर तहानें मराठ्यांचा सुमारे सहा लक्षांचा मुलुख इग्रजांकडे गेला; पण घरचें भांडण मिटण्यास व परक्यांचा हात आपल्या राजकारणांत घुसू पहात होता तो थांबण्यास आपण ही सालीना सहा लक्ष रुपयांची किमतच दिली असे समाधान मानून स्वस्थ बसण्यास ते तयार झाले होते. पण या तहाने इग्रजांचेहि व्हावें तसें समाधान झाले असें दिसत नाहीं. इग्रजांस सहा लक्षांच्या मुलुखापेक्षांहि मराठ्यांशी कज्जा करण्याचें मूळ जो राघोबा तो हातीं राहण्यांतच अधिक फायदा आहे असें बहुधा वाटत असावें. मात्र पुरदरच्या तहाप्रमाणे मिळणारा नवीन तीन लक्षांचा मुलुख घेण्यास ते तयार होते. हा मुलुखहि घ्यावा व राघोबादादास आश्रयहि द्यावा असा त्यांचा दुहेरी बेत होता. त्यांनीं राघोबास स्वाधीन न करितां त्यास दरमहा दहा हजार रुपये पेन्शन देऊन मुंबईत ठेवून घेतलें व आपली फौजहि युद्धाच्या तयारीनें गुजराथेत ठेविली. स्वतः गव्हर्नर जनरल वॉरन हेस्टिंग्ज याला पुरंदरचा तह पसत नव्हता, व मुबईकरांनीहि कलकत्तेकरांविरुद्ध इंग्लडास खुद्द राजाकडे अपिल करण्याचा सनदशीर चळवळीचा मार्ग राघोबास सुचवून खळबळ सुरू ठेविली होती. राघोबानें इंग्लडच्या राजास लिहिलेल्या पत्रांत पुढील आशयाचा मजकूर होता. “माझा पक्ष सत्पक्ष आहे अशी खात्री करून घेऊन मुबईकरांनीं मला मदत द्यावयाचे कबूल केलें. कर्नल कीटिंग याच्या शौर्यामुळें आम्हीं गुजराथेंत पांचसहा लढाया जिंकल्यादेखील व पावसाळा सपल्यानंतर आम्ही पुण्यावर चालून जाणार होतों. पण इतक्यांत कलकत्तेकरांनीं लढाई मना केली. इग्रजांची रीत सर्वत्र अशी आहे कीं, एखाद्या गव्हर्नरानें एखादें काम अंगीकारलें म्हणजे इतर गव्हर्नर मिळून त्यास मदत देतात व काम फत्ते करितात. प्रस्तुत गव्हर्नर हेस्टिंग्ज यास इकडील स्थिति बरोबर अजमावतां न आल्यामुळें त्यानें युद्ध मना केलें असावें. इंग्रजांची न्यायप्रियतेविषयींची कीर्ति जगाच्या या भागांत लोकप्रसिद्धच आहे, तरी माझ्याशीं मुंबईकरांनीं केलेला तह पार पाडण्यास त्यांजकडून मदतच झाली पाहिजे. माझ्याशीं असलेला आपला स्नेहभाव लक्षांत आणून मला पुण्यास राज्यावर नेऊन स्थापण्याकरितां मंबईकर व कलकत्तेकर इग्रजांनीं मला मदत द्यावी, असा हुकूम त्यांस सोडण्याची आपण कृपा करावी.”

पण या पत्राचा प्रत्यक्ष असा काहीच परिणाम झाला नाही. पुरंदरचा तह मोडून इंग्रजानी राघोबास फिरून आश्रय दिला असे पाहून पुण्याच्या दरबाराने आपला हात आखडला व राघोबासंबधी मुख्य अट अमलात येईपर्यंत गुजराथेतील तीन लाखाचा मुलूख इंग्रजास देण्याचे नाकारले. तात्पर्य, धड युद्ध नाही व धड तहहि नाही अशा स्थितीत सर्वच कुचंबत पडले. पण कलकत्त्याच्या कौंसिलने तह मंजूर केलेला असल्यामुळे, त्याना तो आता प्रत्यक्ष मोडतां येईना. पुरंदरच्या तहाची कलमे अमलांत यावी अशाविषयी नाना फडणवीस झटून खटपट करीत होता. आणि इकडे राघोबाही मुंबईकरानी सुरतेच्या तहाची कलमे अमलांत आणावी अशी तितक्याच जोराने खटपट करीत होता, व "त्याप्रमाणे तुम्हास वागावयाचे नसेल तर मला तुमच्या आश्रयाचीहि जरूर नाही, मी सुचेल तसा आपला मार्ग काढीन," असे राघोबाने त्याना निक्षून कळविले. मुंबईकराना एका अर्थाने ही फायद्याचीच गोष्ट झाली. कारण राघोबा आपल्या आश्रयास राहिल्यास त्याचा खर्च चालविणे त्यांना प्राप्त होते, तो त्याचा खर्चहि वाचला.

पुढील साली एक अगदी नवीनच गोष्ट उद्भवली. ती अशी की, फ्रेंचांनी आपला वकील सेंट ल्यूबिन याच्या विद्यमाने पुणे दरबाराशी बोलणेचालणे सुरू केले. इंग्रजांप्रमाणे फ्रेंचाचीहि इच्छा महाराष्ट्रात आपला व्यापार वाढवावा व पेशवाईराजकारणात आपला प्रवेश व्हावा अशी होती. इंग्रज व फ्रेंच यांचा वैराग्नि धुमसत असल्यामुळे तिकडे अमेरिकेत जशी फ्रेंचांनी इंग्रजांविरुद्ध अमेरिकन वसाहतवाल्यांना चिथावणी दिली होती, तशीच इकडे हिंदुस्थानांतहि इंग्रजाविरुद्ध पेशव्यांस मदत करण्याचा त्याचा इरादा होता. पेशव्यांनाहि फ्रेंचाना हाती धरणे हा इंग्रजाचा राघोबासंबधी शह उठण्यास काटशह असा वाटला. म्हणून सेंट ल्यूबिन यास जाणूनबुजून जितका अधिक मानमरातब देतां येईल तितका देऊन इंग्रजाच्या मनांत हेवा उत्पन्न करण्याचा त्यांनीं उद्योग चालविला. पेशव्यांचा फ्रेंचांशी या वेळी कायमचा तह होऊन जाता तर त्याचे परिणाम नक्की काय झाले असते याचा अंदाज करणें कठिण आहे. कदाचित् फ्रेंचांची मदत घेऊन पेशव्यांनीं आपलीं कवायती पलटणे तयार केलीं असतीं, व पेशव्यांच्या मदतीने फ्रेंचांनीं पुण्यास एखादी व्यापारी वखार स्थापून मुंबईच्या आसपास एखादे बंदरहि मिळविले असते. हा तह अर्थात् घडून आला नाहीं हे उघड आहे; पण नानाफडणवीस व सेंट ल्यूबिन यांचा तह झाला, अशा तेव्हां वदता उठल्या होत्या यांत शंका नाही. "नाना फडणविसाच्या घरीं एके दिवशी सेंट ल्यूबिन व इतर अनेक प्रमुख फ्रेंच लोक जमून व सर्वांच्या देखत ल्यूबिन याने बायबलच्या पुस्तकाची व नानांच्या गायीची शपथ घेऊन तह ठरविला; त्यांत पेशव्यांनीं फ्रेंचांना चौल बंदर द्यावें, व फ्रेंचांनीं

फौजेनिशीं इंग्रजांविरुद्ध लढण्यास मदत करावी अशीं कलमें होतीं, " अशा तपशीलवार बातम्याहि उठल्या होत्या. फ्रेंच वकील भेटावयास आल्यास त्याला आणण्याकरितां हत्ती पाठवून द्यावा व खुद्द नाना व सखारामबापू यांनी तंबूच्या कनातीबाहेर जाऊन सत्कारपूर्वक त्यास आंत घेऊन यावें; व तेंच इंग्रजांचा वकील आल्यास त्याला सामोरे जाण्यास एखाददुसरा दुय्यम सरदार पाठवावा हा पंक्तिप्रपंच इंग्रज वकिलाच्या लक्षात येऊन चुकला एवढेंच नव्हे, तर तो त्याच्या लक्षांत यावा, अशी नानाची मुद्दाम योजना असण्याचाहि बराच संभव आहे. पण निदान परिणामावरून पहातां तरी पेशवे व फ्रेंच यांचें सूत फारसें कधीं जमलेंच नाहीं.

फ्रेंचांचा पाय या वेळीं पुण्याच्या दरबारीं पुरा रुजता तर मराठे सर्व हिंदुस्तान पादाक्रांत करते, असें कित्येक इंग्रज ग्रंथकारांनीं लिहून ठेविलें आहे. पूर्वी जो प्रकार कारोमांडेलकिनाऱ्यावर घडून आला, म्हणजे इंग्रज व फ्रेंच यांची कलागत लागून इंग्रजांस आपला पाय काढून घ्यावा लागला, तोच फ्रेंचांच्या कारस्थानामुळें इकडेहि घडून येतो की काय व इंग्रजांस मुंबईप्रांत सोडून निघून जावें लागतें की काय अशी भीति त्या वेळीं मुंबईसरकारानें कागदोपत्रीं लिहून ठेविलेली आहे. पण फ्रेंचांचें पाऊल पुण्यास पुरें न रुजण्याचें कारण असें होतें की, इंग्रजांनीं सुमारें १०० वर्षें आधीं आपलें बस्तान मुंबईप्रांतीं पुरें बसविलें होतें, व समुद्रकिनाऱ्यावर सुरक्षितपणें पाऊल ठेवण्यास फ्रेंचांना फारशी जागाच नव्हती. नाना बहुधा हें जाणून होते, तथापि इंग्रजांना वचक बसावा व दहशत पडावी एवढ्याकरितांच त्यांनीं फ्रेंचांकडे वरकरणी अधिक ओढा दाखविला असावा. पोर्तुगीज व इंग्रज या दोन युरोपियन राष्ट्रांचा तरी त्यांस पुरा अनुभव होता; तेव्हां त्यांच्या भरतीस फ्रेंच हे आणखी एक तिसरें आले म्हणजे मराठेशाहीचा त्रास काहीं कमी होईल असें नाहीं; पण एकाची भीति दुसऱ्यास दाखविणें हें धोरण या वेळीं शहाणपणाचें म्हणून नानांनें अंगिकारिलें असावें. नानांनें एक वेळ तर "सगळ्याच युरोपियन लोकांना आपण पुण्यातून घालवून देणार आहों, व कोणी वकील म्हणून दरबारीं येण्याजाण्यास मनुष्य हवाच असेल तर एखादा कारकून ठेवावा म्हणजे बस्स झालें " असेंहि फर्माविल्याचें इंग्रजांच्या वकिलानें मुंबईस लिहून कळविलें होतें !

पण महाराष्ट्रांत शिरू पहाणाऱ्या युरोपियन लोकांत जशी परस्पर स्पर्धा होती, तशीच दुर्दैवानें पुण्यास एकाच दरबारच्या दोघां कारभाऱ्यांत होती. कारण, याच सुमारास पुण्यातील राघोबाच्या पक्षांतील लोकांनीं उचल करून राघोबास पुण्यास आणण्याविषयीं मुंबईकरांकडे बोलणें लावलें; व त्याचा फायदा मुंबईकरांनीं अर्थातच घेतला. या नवीन उद्योगांत सखारामबापू, मोरोबा फडणवीस, बजाबापुरंदरे व तुकोजी होळकर इतके असामी सामील

होते. या चारहि असाम्या ठळक, विशेषतः सखारामबापू हा मुख्य कारभारी, पुरंदरच्या तहावर त्याची सही पहिली व नंतर नानाची, अर्थात् सखारामबापूनें राघोबास पुण्याला आणण्याविषयीं बोलणें लावलें याचा अर्थ, खुद्द पुण्याच्या दरबारानें पुरंदरचा तह फिरविण्याचा उपक्रम व निमंत्रणहि केलें असेंच आम्हीं समजले पाहिजे, असा बहाणा मुंबईकरांनीं सुरू केला. तह मोडण्यास आणखी कारण हवेच असेल तर फ्रेंचांशीं पुणेंदरबारानें चालविलेलें कारस्थान हे उपयोगी पडण्यासारखे होतेंच. एका नानाशिवाय बहुतेक कारभारी राघोबास सामील असलेच पाहिजेत, असा मुंबईकरांनीं आपला सोयीचा ग्रह करून घेतला. विलायतेहून आलेल्या कागदपत्रांतूनहि राघोबाकडे कंपनीच्या मुख्य अधिकाऱ्यांची अनुकूलता असल्याचें दिसून आलें व विलायतेहून त्या सुमारास एक भारी इंग्रजी आरमार येणार होते, त्याचाहि आपल्या कारस्थानास या वेळीं उपयोग होण्यासारखा आहे, या सर्व गोष्टींचा विचार करून सखारामबापूशीं गुप्तपणें बोलणे सुरू करण्यास त्यांनीं आपल्या पुण्याच्या वकिलास लिहिले. एक गोष्ट मात्र त्यांच्या या बेतास आड येण्यासारखी या वेळी होती; ती अशी कीं, सवाई माधवराव हे नारायणराव पेशव्यांचे खरे औरस पुत्र व गादीचे खरे धनी याविषयीं महाराष्ट्रांत आतां कोणासहि शंका उरली नव्हती; व या मुद्द्यावर खुद्द राघोबाच्या पक्षपाती लोकांसहि कांहीच ठराव करतां येण्यासारखा नव्हता. यामुळे राघोबास पुण्यास नेल्यावर गादीवर बसविण्याच्या ऐवजी सवाई-माधवराव वयांत येईपर्यंत राघोबास मुख्य कारभारी नेमावे म्हणजे तें करावयाला व दाखवावयालाहि फार सोईचें होईल, असे जाणून तशा अर्थाची सूचना त्यांनीं आपल्या वकिलास केली. राघोबा पेशव्याच्या गादीवर बसला काय किंवा मुख्य कारभारी झाला काय इंग्रजांना फलश्रुति सारखीच होती. पेशवाईचा मालक अज्ञान असल्यामुळे अष्टाधिकार कारभाऱ्यासच असावयाचे. अर्थात् इंग्रजांस जो लाभ व्हावयाचा तो राघोबा गादीवर न बसतां कारभारी झाला तरी होणारच; मग धाधान्त अन्याय्य अशी बाजू उचलून धरून, म्हणजे राघोबास गादीवरच बसविण्याचा आग्रह धरून, त्यांनीं स्वतःचें काम विनाकारण अवघड तरी कां करून घ्यावें ?

पुरदरचा तह झाला असतांहि मुंबईकरांनीं उपस्थित केलेले हें कारस्थान कलकत्तेकरांनींहि उचलून धरिलें. त्या वेळीं कलकत्ता कौन्सिलांतील दोन सभासद फ्रान्सिस आणि व्हीलर यांनीं विरुद्ध मत दिले. तथापि वॉरन हेस्टिंग्ज याच्या मनाचा कल आतां बदलला असल्यामुळे मराठ्यांच्या या भांडणांत पडून पेशवाईशीं वैर करणे ही गोष्ट त्याला जी पूर्वीं अयोग्य व अन्यायाची वाटत होती, तीच आतां त्याला कंपनीच्या हिताच्या दृष्टीनें योग्य वाटूं लागली. या भांडणांत पडल्यापासून पुणेंदरबारांत आपलें वजन कायम प्रस्थापित होईल अशी

आशा त्यास उत्पन्न होऊन बिघाड करणे अन्यायाचे असलें तरी सोईचे असे दिसून आले; व पुरंदरच्या तहावर सही करणाऱ्या निदान एका प्रमुख कारभाऱ्यानें ज्या अर्थी तहाच्या अटी मोडण्याची सूचना आपण होऊन केली त्या अर्थी, त्या तहाविरुद्ध राघोबास पुण्याला घेऊन जाणे जरूर आहे असें त्याने मुंबईच्या गव्हरनरास कळविलें; व लगेच त्याच्या मदतीस दहा लक्ष रुपये द्यावे असे ठरवून कर्नल लेस्ली याच्या हाताखालीं सैन्य देऊन त्यास मुबईकडे पाठविण्यांत आले. दरम्यान नानाने फितुरी मोरोबा फडणविसास कैद करून त्यास किल्ल्यावर ठेविले; तथापि मुबईकरांनी काढलेल्या गुप्त बातमीवरून मराठेशाहीत कोणाचा पायपोस कोणाच्या पायी नाही असे त्यांना दिसून आले. म्हणून त्यांनी राघोबास पुण्यास नेण्याचा बेत कायम केला. कलकत्त्याहून येणाऱ्या फौजेची त्यांनीं वाट देखील पाहिली नाही, व तारीख २४ नोव्हेबर सन १७७८ रोजीं राघोबाशीं नवीन तह करून लगेच दुसरे दिवशी कर्नल एगर्टन याच्या हाताखाली पांचशे गोरे व दोन हजार काळे सैन्य देऊन मुबई बंदरांतून त्याची रवानगीहि केली. राजकारणी बोलणे चालणे निघेल ते करण्याकारितां जॉन कॉरनॉक व टॉमस मॉस्टीन या दोघा सिव्हिल अधिकाऱ्याना कर्नल एगर्टन याजबरोबर आपले मुखत्यार म्हणून दिले.

कर्नल एगर्टन याचे हे सैन्य पनवेलीस उतरून सुमारें पंचवीस दिवसांत घाटमाथ्यास खडाळ्यापर्यंत आले. इंग्रजांच्या हालचालीची बातमी नानास प्रत्यहीं कळत असल्यामुळें त्याने सर्व भिस्त शिंद्यावर टाकून व त्यास बऱ्हाणपूर देऊ करून फौजेनिशीं इंग्रजांवर जाण्यास रवाना केले. दसऱ्यानंतर शिंदे होळकर रास्ते प्रतिनिधी मिळून सुमारे चाळीस हजार फौज जमा झाली, व इंग्रजांशीं निकराची लढाई होण्याचा सभव असल्यामुळे तोफखान्याचा चागला बदोबस्त करून तो भिवराव पानसे याच्या हाताखाली देऊन पाठविला. इंग्रज फौज बेगुमानपणे पुढे येत आहे असें पाहून मराठा फौजेने कांहीसे मागे हटून तिला बरीच आंगावर घेतली; व जरूर पडल्यास तळेगांव जाळून चिंचवड व पुणे जाळण्याचाहि मराठा फौजेने बेत केला ! जानेवारीचे प्रारंभास कर्नल एगर्टन आजारी पडून सैन्याच्या आधिपत्याचा राजीनामा देऊन मुंबईस जाऊ लागला; परंतु खालीं कोंकणांतील वाटा मराठ्यांनीं बद केल्या आहेत असे पाहून तो फिरून तळेगांवापर्यंत आला. खडाळ्यास कर्नल के हा बाण लागून जखमी झाला व कार्ल्याच्या मुक्कामावर कॅप्टनस्टुअर्ट हा तोफेचा गोळा लागून मेला. मिस्टर मॉस्टीन यास दुखण्यानें गांठल्यानें तोहि मरण पावला. घांट चढून येतांच राघोबाच्या पक्षाचे मराठे सरदार येऊन आपणांस मिळणार अशी जी इंग्रजांना आशा होती ती व्यर्थ ठरली. पुढें जातां येत नाहीं व मागेंहि परततां येत नाहीं असें संकट पडल्यानें इंग्रजी फौज तळेगांवचा आश्रय करून राहिली; पण तळेगांव

बेचिराख झालेले असून आपणांस धान्य वैरण वगैरे कांहीं मिळणे शक्य नाहीं असे तिला आढळून आले. ही संधि साधून मराठा फौजेने दोन कोसांच्या अंतराने तिला गराडा दिला. अशा स्थितींत पुढे चालून पुण्यावर तर जातां येत नाहींच, पण मारामार करीत मागे परतल्यास कदाचित् तेवढाच मार्ग सुटकेचा आहे असे पाहून तारीख ९ जानेवारी रोजीं इंग्रजी फौज परत खंडाळ्याकडे जाऊं लागली. पण ही चाहूल मराठा फौजेस लागतांच तिने तोफांचा भडिमार सुरू केला. एका रात्रीत इंग्रजांचे चारपांचशे मनुष्य मारले गेले व पांच तोफा दोन गर्नाळा आणि दोन हजार बंदूका अशी लूट मराठ्याच्या हाती लागली. इंग्रजी फौज मोठ्या प्रयासाने हटत हटत कोस दीड कोस परत चालत जाऊन वडगांवांत शिरली, पण तेथेहि मराठ्यांच्या तोफांचा भडिमार सारखा सुरू होऊन स्वार व पायदळ दोन्ही प्रकारच्या फौजेनिशीं मराठ्यांनी हल्ला सुरू केला.

तारीख १४ रोजीं इंग्रजांनीं मिस्टर फार्मर नांवाच्या आपल्या वकिलास मराठ्यांच्या लष्करांत तहाचे बोलणे लाविण्याकरितां पाठविला. त्याला नाना फडणविसाने पहिलीच अट ही सांगितली की, राघोबास आधी आमच्या स्वाधीन करा. तह तुम्ही मोडलात तेव्हा पूर्वीचे सर्व तह आतां रद्द झाले. म्हणून साष्टी उरण जंबुसर वगैरे पेशवे व गायकवाड यांचे जे जे मुलुख तुम्ही पूर्वीं घेतले ते सर्व परत द्या, व पूर्वीं श्रीमंत नानासाहेब व माधवराव पेशवे यांचेबरोबर झालेल्या तहास अनुसरून मुलखाची सर्व आशा सोडा, व केवळ स्नेहभावाने राहण्यास तयार व्हा. या अटी फार फडक अशा वाटून इंग्रजांच्या वकिलानें शिंद्याकडे काकुळतीचे बोलणे सुरू केले; पण त्यानेहि काही दाद दिली नाही. या अटी मान्य करण्यापेक्षां होईल ते नुकसान सोसून घाट उतरण्याचा प्रयत्न करावा, ही कल्पना फिरून निघाली; पण ती कितपत शक्य आहे याविषयी इंग्रज अधिकाऱ्यांतच मतभेद पडला. फिरून शिंद्यांशीं बोलणे सुरू केले, व त्याला इंग्रज वकिलाने असेहि सांगून पाहिले की, "आज आम्ही निरुपायाने तह केला तर तो करण्यास आम्हांस पूर्ण अधिकार नाही. कलकत्तेकर कदाचित् तो तह मानणारहि नाहींत." यावर शिंद्याने त्याला उत्तर दिले कीं, "पुरंदरचा तह मोडण्यास जर मुंबईकर इंग्रजांना अधिकार पोचत होता तर नवीन तह करण्यासहि त्याना अधिकार पोचलाच पाहिजे. राघोबास आमच्या हवाली करण्याचे तुमच्या जिवावर येत असेल तर ते तुम्ही स्वतः करू नका; ते आम्ही पाहून घेऊ. पण नाना फडणविसांनी सांगितलेल्या बाकीच्या शर्ती तरी तुम्हांस मान्य केल्याच पाहिजेत; न कराल तर त्याचे परिणाम फार वाईट होतील. आम्ही तुमच्या फौजेस एक पाऊलहि पुढे जाऊं देणार नाहीं," तेव्हां शेवटी इंग्रजांना निरुपाय होऊन तह मान्य करावा लागला. सन १७६२ सालापासून साष्टीसुद्धां घेतलेला सर्व मुलुख परत देण्यास ते तयार झाले. व कलकत्तेकरांकडून कर्नल गाडर्ड हा नवीन फौज

घेऊन येत होता त्यास परत जाण्याविषयी लिहून धाडून राघोबास तुमच्या स्वाधीन करू, त्याचा शिद्यानी वाटेल तो बदोबस्त करावा; शिवाय राघोबापासून जे तहनामे वगैरे दस्तऐवज आम्हीं आजवर घेतले ते सर्व तुमच्या स्वाधीन करू" असेंहि त्यांनीं कबूल केले ! हा तह बरोबर पाळला जाईल याच्या खात्रीकरितां ले. स्टुअर्ट व मिस्टर फार्मर यांनी मराठ्यांकडे ओलीस रहावे असे ठरले. आणि तह घडवून आणण्यास शिद्याने मदत केली म्हणून त्यास भडोच व त्याच्या खर्चाकरितां चार लक्ष रुपये देण्याचे इंग्रजानी कबूल केले.

वरीलप्रमाणे तह ठरल्यावर, राघोबा बरोबर तीनशे स्वार हजारबाराशे गारदी व तोफा अशा सरजामानिशी शिद्याच्या गोटांत आला. राघोबाच्या गोटाभोवतीं शिद्याच्याच चौक्या पण त्या दूरवर ठेवण्यांत आल्या. राघोबा केवळ नजरकैदेत होता; तथापि त्याच्या बदोबस्ताचा सर्व हवाला शिद्याने आपल्याकडे घेतल्यामुळे शिंद्याला राघोबाची कैद दूरच्या नजरेखाली असली तरी डोळ्यात तेल घालून पक्की करावी लागली. राघोबाच्या इतर साथीदारांना ही सवलत अर्थात् देण्यांत आली नाहीं. चितो विठ्ठल रायरीकर व खरकासिग यांना साध्या कैद्यांप्रमाणेच ठेवण्यात आले. कारभाऱ्यानी राघोबाची भेट घेण्याचेहि टाळले. मात्र त्यांनी शिद्याच्या विद्यमाने त्याजकडून "यापुढे पेशवाईच्या गादीवर आपण कोणत्याहि प्रकारे हक्क सागणार नाही, " असे लेखी बेदावापत्र लिहून घेतले ! इतरांप्रमाणें सखारामबापूंचेहि या वेळी पारिपत्य व्हावयाचे; कारण, त्याच्या फितुरीचा लेखी पुरावा कारभाऱ्यानी हस्तगत केला होता. पण शिद्याने तूर्त ते प्रकरण तसेच दाबून ठेविले. इंग्रज निघून गेल्यानतर दादासाहेबांसुद्धा शिद्याच्या लष्कराचा तळ एक महिनाभर तळेगावीच पडला होता. अखेर राघोबाला झाशीस ठेवावे असे ठरले व त्याच्याकरिता दरसाल पाचसात लक्ष रुपये व त्याच्या बंदोबस्ताच्या खर्चाकरिता शिद्यास पाचचार लक्ष रुपये देण्याचे कारभाऱ्यानी कबूल केले. तेव्हां शिद्याने आपला सरदार हरी बाबाजी याच्या नजरकैदेखाली राघोबाला झांशीकडे रवाना केले. इतकी व्यवस्था झाल्यावर सखारामबापूला त्याच्या हातचे फितुरी लेख दाखविण्यात येऊन व मग शिद्याकडून कैद करविण्यांत येऊन सिंहगडावर ठेवण्यात आले.

मराठे व इंग्रज यांच्या सबधाच्या पूर्वरगाचे हे प्रकरण संपविण्यापूर्वी रघुनाथरावाचे कारस्थान उपस्थित केल्याबद्दल इंग्रजांस दोष देऊन पेशव्यांनी विलायतच्या बादशहास जे एक पत्र लिहिले होते, ते कठिण मुसलमानी शब्दां ऐवजीं मराठी शब्द घालून पुढे देतो. हे मूळ पत्र ऐतिहासिक-लेख-सग्रहांत प्रसिद्ध झालेले आहे. या पत्रांत मराठे व इंग्रज यांच्या सबधाच्या पूर्वरगांतील उत्क्रांतीचा पाढा नाना फडणविसांनीं वाचला आहे, तो मनोरंजक वाटतो.,

## सवाई माधवराव यांचें विलायतच्या बादशहास पत्र

"...मुदत एक गुजरली. आमेहेरबांनाकडून दोस्तीचे पत्र येऊन खुशाली मालूम होत नाहीं. त्यास दोस्तीचे व्यवहारांत ऐसें नसावे. हमेशा पत्र किताबतीचा सिलसिला जारी असावा हे योग्य आहे. दुनियेत उत्तम चीज मैत्रीखेरीज नाहीं. आम्हीं हेच चाहतो कीं, पेशजींचे कराराप्रमाणे उभयपक्षी चालून दोस्तीची वृद्धि रोज बरोज जादा होत असावी. पूर्वी आमच्या राज्यांत पोर्तुगीज व डच यांची सौदागिरी जारी होती. ते वक्तिं मुबई हे स्थान लहानशा वखारीप्रमाणे होते व इंग्रज थोडी जामियतेनिशी विलायतेहून मुबईस दळणवळण करीत होते. तेव्हां मुबईकर जनराल याणीं कैलासवासी बाजीरावसाहेब यांशी दोस्तीचा तह केला. त्या समयीं "टोपीवाल्यांत इंग्रजी बादशहा बहुत सुस्वभावाचे, सत्यवादी, व कौलकरारांत व इनसाफांत एकवचनी, कौलकरार पेमान झाल्यावर त्याचप्रमाणें अखेरपर्यंत चाल चालावी, असे या देशातले लोक ऐकत होते. त्याजवर मुद्देनजर देऊन मुंबईकरांचा तह मजूर करून त्यांशी कौलकरार अंमलांत आला आणि डच व पोर्तुगीज याना बदरांत व्यापार करू देण्याचे बद करून इग्रजांची सौदागिरी आपले राज्यांत जारी केली. त्याबरहुकूम वैकुंठवासी नानासाहेब याणीहि कराराप्रमाणे चालवीत असतां तुळाजी आगरे सरकारच्या कौलकराराप्रमाणें इंग्रजांशीं वर्तणूक न करीत व हमेश मुबईकरांशी तंटा व वैर करूं लागले. या बाबें सरकारातून हुकूमहि आंगरे मजकूर यास सादर जाला. परतु हुकुमास कबूल न झाले. सबब सरकारांतून रामाजी महादेव यांस आज्ञा फर्मावून विजयदुर्ग वगैरे आंगरे यांजकडील किल्ले येथें वेढा करविला. या दिवसांत इंग्रजी गलबत येऊन सुरतचा किल्ला घेतला. तेव्हां रामाजी महादेव याणी इंग्रजांची कुमक आणून विजयदुर्ग वगैरे ठिकाणें घेतली. चीजवस्त गुरूढोरसुद्धां इंग्रजानीं किल्ले सरकारांत द्यावे असा इंग्रजांशीं करार असतां बिलकूल चीजवस्त इंग्रजांनीं नेऊन किल्ले रिकामे सरकारांत हवाली केले. कराराप्रमाणे कुलमालियत यांजकडून येणे असतां मैत्रीवर नजर देऊन मालमालियतचा तगादा इंग्रजांस न केला. नंतर नानासाहेब कैलासवासी जालियावर माधरावसाहेब राज्याचे अधिकारी, ते गादीवर बसले. त्याणीं मागील कराररमदार इग्रजांशीं झाले व दोस्ती चालत आली त्याप्रमाणे चालविली. व विलायतेहून तामस् माष्टीन आसाहेबांचें पत्र घेऊन हुजूर आले. त्यांत मजकूर कीं, "माष्टीन यास हमेष हुजूर ठेवावे. इंग्रज कोणी बेअदाई करतील त्यांस तामस् माष्टीन ताकीद करतील; व उभयपक्षीं दोस्तींत कसूर येऊ नये." असें पत्र आणिलें. तेव्हां पूर्वी इंग्रजांशीं दोस्ती व कौलकरार चालत आले. त्यात आमेहेरबानांचे पत्र आले. तेव्हां बहुत खूष होऊन इंग्रजांचा वकील हुजूर ठेवावयाचा कायदा नसतां आपल्या पत्रावरून

माष्टीन यांस सन्मानाने पुण्यांत ठेविलें. मशारनिल्हे पांचसात वर्षे हुजूर होते. नंतर कांहीं एक दिवसां माधवरावसाहेब कैलासवासी झाले. तीर्थरूप नारायण· रावसाहेब राज्यास अधिकारी, सबब ते राज्य करूं लागले. त्याजवर रघुनाथराव भाऊबंद असतां त्यांणीं दगा दिला. लोकरीतीविरुद्ध हे गोष्ट त्यांजकडून अंमलांत आली. हे हिंदूंच्या धर्मांत बहुत नादुरुस्त. त्याचप्रमाणे मुसलमान व टोपीकर यांचेहि धर्मांत दुरुस्त नसेल असें जाणून दौलतेतील कारभारी व सर्व उमराव व सरदार व कामगार एकदिल होऊन रघुनाथराव यांचा अधिकार तहकूब करून त्यांस पदभ्रष्ट केलें. ते वख्तीं मैदान पाहून मुंबईकरानीं बदनजर धरून कौलकरार सर्व नाहींसे करून कारभारी मोहिमेवर गेले असे पाहून साष्टी घेतली. पुढें रघुनाथराव यास आश्रय दिला. पांच वर्षे युद्ध व स्वारी सुरू आहे, त्यास फरांशीस वगैरे टोपीवाले या दिवसांत सरकाराशी दोस्ती करण्यास वकील पाठवून बहुत उत्कंठित. परंतु दूरदृष्टीचे मार्ग पाहतां आमेहेरबां म्हणतील की "आम्हांस एक वेळ कुल इतल्ला करावयाचा होता, म्हणजे इग्रजी लोकांस ताकीद करून कौलकराराप्रमाणें वर्तवितो." असे दिलांत आणून व पहिले कौलकरारावर नजर देऊन हे पत्र आसाहेबांस पाठविले आहे. आ मेहेरबां म्हणतील कीं, "ममईवाले वगैरे यांजकडून बेअदबीची वर्तणूक काय झाली?" त्याची कची हकीकत आपणांस पूर्णपणें कळावी व खातरनशीन सर्व प्रकारें व्हावे सबब त्यांचे गैरचालीच्या वर्तणुकीची कलमें—बी तपशील—

१ नानासाहेब कैलासवासी झाल्यानंतर राज्याधिकारी माधवरावसाहेब व नारायणरावसाहेब. त्यास माधवरावसाहेब वैकुंठवासी जालियावर तीर्थरूप नारायणरावसाहेब दौलत करूं लागले. ते वख्तीं रघुनाथराव घरांतील भाऊबंद याणीं दगा करून आपण दौलत करावी हा इरादा केला. तीर्थरूप यांस फंद करून मारिले, ही गोष्ट हिंदूंचे धर्मांत बहुत अयोग्य व राज्याधिकारहि आमचा; रघुनाथराव यांस संबंध नाहीं. हे कारभारी व तमाम कारभार अमीर व उमराव व सरदार याणीं दिलांत आणोन रघुनाथराव यांस दौलतीखेरीज करावे असे मुकरर करून कारभारी तमाम सरजाम व फौजसुद्धां त्यांचे ताकुबावर गेले असता खालीं मैदान देखून व काबू वखत पाहून तामस माष्टीन पुण्यात होते त्याणीं ममईवाल्यांकडून सरकारचे मकान साष्टी वगैरे चार जजिरे घेतले. तेथ सरकारचा अंमल व सरंजाम रयतेची मालियत मुबलक होती, ते मुंबईकरांनीं आपले ताब्यांत घेतली. दूरदृष्टि न करितां कारारमदार कौलकरार सर्व तोडून हंगामा उभा केला. तामस माष्टीन आसाहेबांचे पत्र घेऊन हुजुरास रहावयास आले होते. त्यांत मजकूर कीं, "इग्रज कोणी बेअदबी करतील त्यांस ताकीद करून दोस्ती चालवावी." विजयदुर्गची मालियत आंगरे यांची क्रोडो रुपयांची करार सरकारांतून द्यावयाचा नसतां नेली. तें सर्व एकीकडे राहून माष्टीन मजकूरच खळ करणारे

होऊन बेअदबी करू लागले. तेव्हां बादशाही हुकूम व कौलकरार कोठे राहिले ?

१ साबिक बाजीरावसाहबांचे वेळेपासून पांचचार वेळां करारनामे इंग्रजांशी झाले. त्यांत करार की, सरकारच्या दुष्मनास व रियासतींतील अगर घरांतील कोणी आल्यास आश्रय न द्यावा व कुमक न करावी. त्याचप्रमाणे सरकारांत हवालीं करून द्यावे. ऐसा करार असतां रघुनाथराव यांस आश्रय देऊन व कुमक करून कर्नेल कीटण वगैरे इंग्रज जमावसुद्धां सरकार तालुका गुजराथप्रांती घेऊन करोडो रुपये जमेचा मुलुख खराब करून चाळीस पन्नास लाख रुपये वसूल घेतला. त्यांच्या मुकाबल्यास फौजा रवाना झाल्या, त्यांसहि करोडो रुपये खर्च झाला. कौलकरार मजबूत होते ते तोडिले. साष्टी घेतल्यावर मुबईकरांनी लिहून पाठविले कीं, पोर्तुगीज घेणार म्हणून आम्ही घेतली ! हे रहा कोण ?

१ कर्नेल कीटण याणी रघुनाथराव यांस नमूद करून गुजराथ प्राती हगामा सुरू केला. सबब त्याचे मुकाबल्यास सरकारची फौज व सरदार गेले. एक दोन लढाया झाल्या. त्या वेळीं जग सुरू होती तो इतक्यांत कलकत्तेकर जनरल व कौसल याणी पत्र पाठविले की, " इंग्रज कोणाचा मुलूख चहात नाहीत व हरकोणाची कुमक करून कजिया करावा हे इंग्रजांचे बादशहास व कपणीस मजूर नाही. मुबईवाले याणी दरम्यान हरकत आणिली आहे, त्यास लबाडीची हरकत न करावी, फौज माघारी न्यावी, या बाबे ताकीद पाठविली आहे. उभयपक्षी दोस्तीची वृद्धी व्हावी, याजकरितां एक मातबर मनुष्य रवाना करितो. सरकारचे सरदारांस व फौजेसही ताकीद व्हाही की, लढाई न करीत. " या मजकुराचे पत्र आले. कलकत्तेकर हे बादशहा व कपणीचे मुखत्यार, त्याचे लिहिणे रास्त व दुरुस्त व कायमीचे असे जाणोन दोस्तीवर नजर देऊन सरकारची फौज व सरदार यास माघारी येण्याविषयी हुकूम सादर झाला. त्याजवरून सरकारच्या फौजा माघाऱ्या आल्या. कर्नेल कीटण याणी खाली मैदान पाहून फौजेचा शह दूर गेला हे समजून व कलकत्तेकर याचे लिहिणे खातरेस न आणून रघुनाथराव यांस बरोबर घेऊन सरकारचे सरदार फत्तेसिगराव गायकवाड यांजवर मोहीम केली. त्यांजवळून मुबलक पैका घेतला. मुलूखहि ताब्यात आणिला. नतर कर्नेल जान हपटन कलकत्त्याहून हुजूर आले. त्याणी जाहीर केले की, "तमाम हिंदुस्थान व दक्षिणेची बदरे इंग्रजांची त्याजवर कौसल व कलकत्तेकर मुखत्यार आहेत. त्यांचा मुखत्यारनामा घेऊन आलो असो. आम्ही सलूख करू तो तमाम बदरास इंग्रजांस मजूर असे. " ते वखतीं सरकाचे मुत्सद्दी याणी जबाब दिला की, " मुबईकर सर्व फितुराची मुळी आहे. कलकत्तेकरांनी ताकीद दिली असतां कर्नेल कीटण याणी हगामा केला आहे, तेव्हां मुखत्यारी तुमची काय समजावी ? सबब मुबईकरांकडील कोणी मातबर आणवावा. मग मुलूख ठरविला जाईल. " याचा जबाब कर्नेल मशारनिल्हे याणी दिला की, "इंग्रजी कायदा मुखत्यार

असेल त्याणे मुकररर केले ते सर्वांस कबूल आहे. मुबईवाले यांचें काय सामर्थ्य कीं, कलकत्तेकर ठरावितील त्यास तफावत करितील ?" असे बोलोन मुखत्यारनामा कपणीचे मोहरेनिशी बजिन्नस दाखविला. अखेरीस सरकारचा व इंग्रजांचा उभयपक्षी करारनामा टरविला. त्याप्रमाणे कर्नेल मशारनिल्हे याणी कलकत्तेकर कोशल यांचे दसकतानिशीं व कपनीचे मोहरेनिशी करारनामा सरकारात दाखल केला. व सरकारचा करारनामा घेतला. कर्नेल जॉन हपटन याणी कुलइतल्ला मुबईकरास दिला. यावरून मुबईकर याणी आपले शहरात सलुखाची दौंडी देऊन हपटन यास जबाब पाठविला की करारनाम्याप्रमाणे आपण कबूल केला. कर्नेल कीटन यास मुबईकरांनी व हपटन याणी पत्रे पाठविली कीं, तुम्ही रघुनाथराव यांची सगत सोडून देणे. परतु कीटण मजकूर यार्णी दोन महिने टाळाटाळ केली अखेर आपण सुरतेस गेले. रघुनाथराव यासही आपणाजवळ बोलाविले. सरकारच्या फौजा हुजूर आल्यावर रघुनाथराव यास सुरतेहून खुसकीचे रहाने मुबईस रवाना केले. तेव्हां सरकारचे मकाणास त्यांणी इजा दिली. सबब सरकाराची फौज त्यांजवर रवाना केली. इतक्यांत मुबईकर याणी गलबते पाटवून रघुनाथराव यांस मुबईस घेऊन गेले. हे बादरहाची कैफीयत सरकारांतून कलकत्तेकरांस कलमी केली. त्यांणी जबाब पाठविला की, "मुबईवाले यास आम्ही ताकीद केली यानंतर रघुनाथराव यांस कंपणीचे तालुक्यांत मुबईकर आश्रय देणार नाहींत." असे असतां मुंबईकर याणीं कलकत्तेकर यांची ताकीद न मानून रघुनाथराव यांस आपले नजीक ठेऊन सरकारतालुक्यांत फिरून फर्दाफितुर सुरू केला. नवीन करार झाला त्याची ही अवहाल, तेव्हां सरळ चाल कायमची कोठे राहिली ?

१ कलकत्तेकर याणी लिहिले कीं, "इग्रज कोणाचा मुलुख चहात नाहीत व कोणाची कुमक करणे हेहि बादशहास व कपनीस मजूर नाही. मुबईवाले यांजकडे कोणे गोष्टीचा अखत्यार नाहीं. कपनीकडून मुखत्यार आम्ही आहों." असे लिहिणे त्याचे प्रमाण जाणोन व इग्रजी बादशहा इनसाफी त्यांचे येखत्यारी हेहि मुनसफ असतील असें दिलांत आणोन मुबईवाले याणीं बदमामली केली त्याचा इनसाफ कौंसिल व कलकत्तेकर यांजवर दिला असतां त्यांणीं इनसाफाची रवेश दर किनारा ठेऊन आपमतलबावर नजर देऊन साष्टी वगैरे जजीरे मुंबईकरांनीं घेतले ते माघारे सरकारांत देण्याविषयीं ताकीद न केली. तेव्हां मुखत्यारी व इनसाफाची रास्त कोठे राहिली ?

१ कोंकणप्रांतीं दर्या किनारा वगैरे तोतया पैदा होऊन हंगामा केला त्याचे पारिपत्यास सरकारांतून फौजा जाऊन तंबी केली. तोतया कांहीं जमावानिशीं साष्टीस पळून गेला. तेव्हां तेथील अमिलांनीं लोकांस जागा दिली. लाखोंची मालियत कोकणची गेली ते त्यांजपाशीं राहिली. तोतया गलबतांत बसून मुंबईस जात असतां राघोजी आंगरे याणीं कैद करून आणिला. त्यास मुंबईकरांनीं आंगरे

यांस कलमी केलें कीं, मुंबईस तोतया येत असतां तुम्हीं कैद करून नेला याची सबब काय ? तोतया आम्हांकडे पाठवून देणें. नाहींतर तुम्हांवर स्वारी करूं ! त्यास तहनामा झालियावर अशी चाल धरणे व फितुरियास जागा देऊन त्याची शिफारस करणें हे कोणते राज्यांतील चाल आहे ?

१ फरांचिसाचे बादशहाकडून वकील खुदबखुद हुजूर आले. बहुतेक मजकुराचे तह होते व कर्नेल हपटन यांचे मार्फत तहनामा इंग्रजांशी ठरावांत आला. त्यांतहि, फरांचीसाचे वकिलास न ठेवावे. त्याशी राजकारण न करावे, " असे कलमांत नसतां मैत्रीची पास मजूर करून फरांचीस यांचे वकिलास हुजूर न ठेवितां रुकसत दिली. सरकारांत दोस्तीची पास व परवरष याबरहुकूम मजूर आहे. आसाहेबी हेही दिलांत आणावे.

१ फत्तेसिगराव गाइकवाड सरकारचे सरदार यांजकडील चिखली वगैरे महाल इंग्रजानी ताब्यात घेतले. त्याविशी कर्नेल जान हपटन यांसीं जाबसाल झाला. त्याणी करार केला कीं, फत्तेसिगराव गाइकवाड यांचे पत्र आम्हांस यावें जे, "महाल मुलुख देण्याचा अखत्यार राव पतप्रधान यांचा. आमचा नाहीं." असे पत्र आणोन दिल्यानतर महाल स्वाधीन करूं. त्याप्रमाणें गाइकवाड यांचे पत्र आणून देविले असतां महाल स्वाधीन न केले. हे रास्त कामकारभार कीं काय ?

१ सरकारांतून तहनाम्याबरहुकूम अमलांत आले असता मुंबईवाले इंग्रज यांजकडून कारारनम्याप्रमाणें एकहि गोष्ट अमलांत न आली. उलट इंग्रजी फौज जमा करून रघुनाथराव यांस बरोबर घेऊन कोकण प्राती सरकारजिल्हेत आले. तेथून रघुनाथराव यांचे कपनीचे मोहरेनिशी तमाम सरदार व सरकारचे मुतसद्दी यांसीं पत्रे पाठविली कीं, " रघुनाथराव यांसीं दौलतीवर कायम करावे. हे सलाह कौंसल व कलकत्तेकर यांची व आमची सिलेट कमिटि यांची आहे. " ऐशीं पत्रे पाठविलीं तीं बजिन्नस सरकारांत आहेत. हे आशेची व राज्याची कोण जे ते चौकशी करावी.

१ कौलकरार सर्व एकीकडे करून रघुनाथराव यांस बरोबर घेऊन इंग्रज फौजेचा जमावसुद्धां मुबईहून कारनेक वगैरे नीट घांट चढून पुण्यानजिक तळेगांवावर चालून आले. सरकारचे कामगार व सरदार फौजेसह मुकाबल्यास तयार झाले. जिकडे इनसाफ तिकडे फत्ते, हे बहुमानाची गोष्ट झाली व प्रसिद्धींत आलें ते इंग्रजी लोकांनीं आसाहेबांस इतल्ला दिलीच असेल. ते वखतीं कारनेक वगैरे याणीं तह केला कीं, आम्ही कंपनीकडून तह व जंग करण्याचे मुखत्यार आहोंत व कंपणीची मोहोरहि आम्हांजवळ हजर आहे. तह करूं तो सर्वांस कबूल आहे. साष्टी व जंबूसर व गायकवाडांकडील महाल व भडोच येथील अंमल मुंबईकरांनीं कौलकराराखेरीज कबजा केला तो परत करवितों व रघुनाथराव यांस इलाखा राखणार नाहीं. कर्नेल हपटन याचे मार्फत तहनामा झाला त्याबरहुकूम मुंबई-

करांकडून अंमलांत न आलें, सबब तो तहनामा रद्द असे. पेशजीचे तहनाम्याप्रमाणें उभयपक्षीं अंमलांत यावे." असा करारनामा मोहरेनिशी करून साष्टी वगैरे जजिरे, जबूसर वगैरे महाल, भडोचचा अंमल स्वाधीन करण्याविषयी चार्लस इष्टुरी व फारमार ( हे ) दोघे ओलिस सरकारांत ठेविले. नतर सरकारांतून दस्तक व वाटेने संभाळून नेणारी फौजेची टोळी देऊन कारनेक वगैरे इंग्रजी जमाव मुबईस पोहचवून दिले. रघुनाथराव इंग्रजी जमावांतून निघून सरकारचे सरदारांकडे आले. ऐसे झाले असतां हल्लीं कराराप्रमाणे मुबईकर यांणीं अमलांत न आणले. ताजा करारनामा झाला हा सोडून कलकत्तेकरांस लिहून जमियत कुमकेस आणविली. कलकत्तेवाले याणींहि मुबईकरांचे लिहिण्यावर लसलीन नामे सरदार यास जमावसुद्धां रवाना केले पूर्वीपासून इंग्रजांनी दर्यांतून दळणवळण करावे, खुसकीतून यावयाचे नाहीं तेव्हां कलकत्तेकर यांस सरकारांतून लिहिले कीं, खुसकीतून जमाव रवाना करण्याचे कारण काय ? त्याचा जाब आला कीं, "मुबईकरांनीं फौज आणविली, सबब तिकडील बदराचे बदोबस्तास पाठविली !" वाटेत लसलीन मृत्यू पावले. कर्नेल गाडर मुखत्यार सरदार होऊन जमावासह सुरतेस आले. तेथून सरकारांत लिहिले की "कोणी मातबर सलुखास पाठवून द्या. मार्गप्रतीक्षा आहे. अगर ठिकाण मुकरर करावे, आपणच सलूख करावयास येतो." ऐशी पैमन वाजवी आली ते रास्त मानून सरकारांतून मातबर रवाना केले ते सुरतेस गेले. इतक्यांत रघुनाथराव याणीं सरकारचे सरदारांचे फौजेत दंगा करून फिरून सुरतेस गेले. नतर करनेल गाडर याचें बोलणें व नजर पहिली राहिली नाही ! जबाब दिगर, सवाल दिगर, करूं लागले. वकिलांस रुकसत केले. व कलकत्तेवाल्यांचीं पत्रे आलीं कीं स्नेह [ या पुढील एकदोन शब्द किंवा वाक्य नक्कलकाराकडून गळली असावीं. ]

१ कर्नेल गाडर फौज व सरजामसह सुरतेतून निघून हल्लीं गुजराथप्रांतीं जाऊन सरकार जिल्ह्यांत हगामा करून इतर ठिकाणांस इजा दिली. सबब सरकारांतून सरदार व फौजा मुकाबल्यास रवाना जाल्या. जग सुरू आहे. मुबईकर याणींहि कोकण प्रांतांत फिसाद उभा केला आहे त्याचे बदोबस्तास फौजा पाठविण्यांत आल्या. खुलासा को, हल्लीं दुतर्फा दुहेरी लढाई होत आहे. सरकारांतून कोणतीहि गोष्ट अव्वल कराराखेरीज जाहली नाही. मुबईकर व कलकत्तेकर यांस तहपत्राचा शिलशिला ज्याणीं ठेविला ( असे आम्ही आहो ). परंतु त्याजकडून जाब दिगर सवाल दिगर, लिहिणें (एक) आणि चाल एक ! मुंबईकर यांचें म्हणणें कीं कलकत्तेकर यांचे करणें मंजूर नाहीं ! कलकत्तेकर लिहितात जे, मुंबईकर चुकले त्यांचा तहनामा मंजूर नाहीं ! उभयपक्षीं एकमेकांवर घालवितात. कशास कांहीं मिळत नाहीं. कलकत्तेकर व मुंबईकर यांची आंतून करण्याची जात एक, तेव्हां समजावें तें काय ? राज्यांत मोठी गोष्ट कीं वचनाची कायमी. त्यांत तऱ्हतऱ्हेची

मर्जी झाल्यास व ठरलेली गोष्ट बातल होऊं लागल्यास लाचार ! कुलकैफियत आमेहेरबानांस ध्यानारूढ व्हावी म्हणोन तपशिले कलमी केले असे. याचा बदोबस्त करणे तसा करावा.

१ कलकत्तेकरानी जमियत मुबईकडे पाटविली तेव्हां लिहिले कीं, " फरांचिसांचे गडबडीकरिता बदोबस्तास रवाना केली. यांस दस्तक पाठवावे." येथून उत्तर गेले की, " सरकारखुसकीचे मुलखातून यावयाचा करार नाहीं." त्याचे उत्तर आले की, 'आम्ही माघारे नेऊ सकत नाही ! मुबईकर(आपणांस मुखत्यार ) म्हणवितात. मुबईकरांनी तह कारनेकानें केला तेव्हा गाडरास पत्र लिहून दिले कीं, 'माघारे जाणे.' व सरकारचेंहि लिहिले गेले. त्याचे उत्तर आले कीं, "आम्ही मबईकराचे ताबे नाही." त्यांजवर फौज पाटवावी तर स्नेहावर नजर दिली. ते सुरतेस गेले.

१ सदरहु कलमे सुमार नेमकी कलमी केली आहेत. त्याजवरून बदरवाले इग्रज यांची खेश व चाल सर्व ध्यानारूढ होईल. बगाला मुलूख नऊ कोटी रुपये जमेचा. सारांश, कलकत्तेकर यांचे ताब्यांत आहे. तिकडे सरकारच्या फौजा रवाना करून लुटालूट जाळपोळ केल्यास पैशाची आमद राहणार नाही. हे करण्यास एवढी मुष्कील नाहीं; परतु करारावर नजर देऊन आजपर्यंत हा ख्याल दिलांत न आणला. भोसल वगैरे फौजेस बगाल्यांत न जाण्याविशी इतके दिवस ताकीदक होत गेली. इग्रजांकडून जितकी जितकी बेअदबी झाली तितकाच मोबदला सरकारांतून अमलांत येत गेला. तमाम बदरवाले आमेहेरबांस गैरवाका काय इतल्ला करीत असतील ते करोत. त्याचा मुदरपणा व चांगुलपणा बारीकरीतीने नजरेत आणावा. आसाहेब सुज्ञ व सत्यभाषी व मार्मिक परीक्षा करणारे, न्यायास येईल ते घेणारे, दृढनिश्चयी जाणोन तमाम हिंदुस्तान वगैरे जागा प्रख्याति आहे. त्यांस दूरदृष्टीच्या मार्गानें कलकत्तेकर व मुंबईकर यांस पक्की ताकीद पाठवावी की कैलासवासी राव पतप्रधान यांचे कारकीर्दीत कौलकरार जाले आहेत त्याप्रमाणें अंमलांत आणावे. जाजती बेअदबी व बेअदाई न करावी ऐशा ताकिदा जागोजाग पाठवाव्या. अगर बदरवाले आपल्या हुकमांत नसल्यास व ताबेदारीखेरीज चाली चालत आल्या असल्यास आमेहेरबांचा विलाज काय आहे ? तसाच परत जबाब जलद पाठवावा. त्याप्रमाणें दुसरी तरतूद करण्यांत येईल. दौलत देणें हें बक्षिस खुदायतालची आहे. जिकडे इनसाफ व रास्ती तिकडेच खुदा; हेही तमाम धर्मांत महशूर व जाहीर आहे. ठसा यापुढे घडेल ते प्रसिद्धींत येईल. जबाबाची मार्गप्रतीक्षा असे. "

म्हणोन विलायतीच्या इंग्रजी पादशहास सरकारचे नांवें पत्र. बदकौली जागा जागा करून विश्वास कौलकरार देऊन कित्येकांच्या दौलता ( इंग्रजांनीं ) घेतल्या. नऊ दहा क्रोड रुपयांचा मुलूख घेऊन ऐवज घेतात. रास्ती दुरुस्ती खूब पहावी.

# प्रकरण चवथें.

# मराठे व इंग्रज—उत्तररंग.

वडगावचा अपमानास्पद तह मुंबईसरकारास अर्थातच आवडला नाहीं; व कलकत्तेकर इंग्रजहि त्याच मताचे होते. त्यांनीं तत्काळ कर्नल गॉडर्ड यांस फौजेसह पुण्यावर चालून जाण्याचा हुकूम केला; आणि पुरंदरचा तह फिरून कायम व्हावा, पेशव्यांनी फ्रेंचांना कोणत्याहि प्रकारचा थारा देऊ नये, या अटी कारभाऱ्यानीं कबूल केल्यास त्यांशी नवीन तह करण्याचा—नाहीतर युद्ध सुरू करण्याचा—पूर्ण अधिकार गॉडर्ड यास देण्यांत आला. कारभारी वडगांवचा तह रद्द करण्यास अर्थातच कबूल नव्हते. कर्नल गॉडर्ड बुंदेलखंडांतून प्रथम सुरतेस आला व तेथून डभोईस येऊन गायकवाड यांच्याशीं गुजराथेची वांटणी करण्याचा तह ठरवून अहमदाबादेवर चालून गेला. अहमदाबाद पेशव्यांच्या हातून सोडवून ती त्याला नवीन तहाप्रमाणे फत्तेसिंग गायकवाड याचे स्वाधीन करावयाची होती. गॉडर्ड याने वेढा घालून व हल्ला करून अहमदाबाद घेतली. इतक्यात शिंदे व होळकर चाळीस हजार फौजेनिशी आपल्यावर चाल करून येत आहेत अशी बातमी लागताच तो बडोद्यावर चाल करून निघाला. गॉडर्ड येतो असे पाहतांच शिंद्याने वडगांव येथे ओलीस घेतलेले गोरे अधिकारी मोकळे करून बरोबर आपला वकील देऊन त्यांना गॉडर्ड याजकडे रवाना केले. "राघोबाने ठरल्याप्रमाणे गादीवरील आपला हक्क सोडावा; तथापि त्याचा मुलगा बाजीराव यास पेशव्यांचा दिवाण नेमून सर्व कारभार आपले हाती देण्याचे ठरल्यास वडगांवच्या तहाची दुरुस्ती करण्याचा आपण विचार करू" असे शिंद्याने बोलणें लाविले. पण गॉडर्ड याने तें अमान्य केल्यामुळे उभयपक्षीं युद्धाचाच विचार ठरला. त्या वेळी मुंबईकर इंग्रजांच्या मते गॉडर्ड याने शिंदे व होळकर यांच्यावर चालून जाण्यापेक्षां आधीं वसईचा पक्का बंदोबस्त करणे हेच अधिक जरूरीचे होते. परंतु गॉडर्ड याने ती मसलत न ऐकतां कर्नल हार्टले याला त्याच्या हाताखालच्या मुंबईच्या सैन्यासह वसईवर रवाना केले व पावसाळा नजिक आल्यामुळे स्वतःच्या सैन्याचा बंदोबस्त करून तो छावणीस राहिला. पावसाळा जवळ आल्यामुळे लष्करी हालचाली विशेष होणे शक्य नाही असे जाणून होळकर व शिंदे हेहि आपापल्या मुलखाकडे रवाना झाले. या सुमारास हैदर अल्ली याने साठ हजार फौजेनिशीं कर्नाटकावर स्वारी केल्याची बातमी आली. म्हणून गॉडर्ड याला पुण्याकडील काम लवकर संप-

विण्याविषयीं कलकत्त्याहून लिहून आलें. डिसेंबरांत गॉडर्ड यानें वसई घेतली व त्याच दमाने पुण्यावर चालून जाण्याकरितां १७८१ च्या फेब्रुवारी महिन्यांत तो बोरघाटांत येऊन पोचला. पण पुढे चालून जाणे धोक्याचें आहे असें त्यास आढळून आलें. इकडे मुंबईकरांनींहि त्याला कल्याणास परत येऊन पावसाळयांत सैन्याची छावणी खुद्द मुंबईसच करावी असें आग्रहानें सुचविलें. म्हणून त्याने सैन्याचे तोंड फिरवून कल्याणची वाट धरली. परतु वाटेत मराठयांच्या फौजेने छापे घालघालून त्यास फार जेरीस आणलें. या कामगिरीत हरिपंत व परशुरामभाऊ हे प्रमुख होते. अशा रीतीनें पुण्यावरील इंग्रजांच्या स्वारीचें हें संकट टळलें. तोंडावर मराठयांचे मोठें सैन्य असतांहि गॉडर्ड घाटांपर्यंत आला असें पाहतांच पुण्यांतील लोकांची तारांबळ उडाली व आतां इंग्रज पुण्यावर खास चालून येतात असे वाटून लोक पुणें सोडून पळूनहि गेले ! पण वर सांगितल्याप्रमाणे गॉडर्ड यासच परत जावें लागले. तारीख १६, २६ व २९ मार्च, व फिरून २० व २३ एप्रिल रोजी उभयपक्षीं मोठया मारामाऱ्या होऊन इंग्रजी फौजेची बरीच नासाडी झाली. मुंबईहून रसद येण्याचा मार्ग फारच धोक्याचा झाला. तथापि हालअपेष्टा सोसूनहि गॉडर्ड याने अखेर पनवेल गाठली.

इकडे याच सुमारास हिंदुस्थानांत इंग्रज व शिंदे यांच्या लढाया सुरू होत्या. मार्च महिन्यांत कर्नल कॅमॅक व कर्नल मूर यांच्या व शिंद्यांच्या फौजेच्या बऱ्याच झटापटी झाल्या. या युद्धात इंग्रजांचीच थोडीबहुत सरशी झाली होती. तथापि शिंदे अद्यापि त्याच्या तोंडावर छावणी देऊन राहिलाच होता. पण इकडे हैदरानें उचल खाल्लयामुळे इंग्रज व मराठे यांचे युद्ध हळुहळु शिथिल होऊ लागलें होतें. सर्व हिंदुस्थानभर इंग्रजांशीं एकदम युद्ध चालू ठेवण्याचे निजाम अल्ली भोसले हैदर अल्ली व मराठे यांचे ठरले असतां निजाम अल्लीने कांहींच हालचाल केली नाहीं. भोसल्यांनीं बंगाल्यावर स्वारी करण्याचे मिष करून अखेर आपल्यापुरता सवता तह करून घेतला. राहतां हैदर व मराठे हेच झगडत राहिले होते. पैकीं मराठयांशीं पूर्वीं युद्धांत मोड होऊन व राघोबाचा पक्ष सोडून तह करावा लागल्यामुळे निम्मे अधिक भांडण निकालांत निघाले होतें. पण उत्तर हिंदुस्थानांत परत जातांना सन १७७९ च्या जून महिन्यांत राघोबा हा शिंद्यांचा सरदार हरि बाबाजी यास मारून व त्याचा गोट लुटून घेऊन सुरतेस गॉडर्ड यास जाऊन मिळाला व इंग्रजांनी त्यास दरमहा ५००० रुपयांची नेमणूक ठरवून आपल्या आश्रयास ठेवून घेतले होते. यामुळे गॉडर्ड याने पुण्यास कारभाऱ्यांशीं तहाचीं बोलणीं फेंटाळून लाविलीं, आणि साष्टी प्रांत व राघोबा हे आधीं आमच्या हवालीं करा, मग तहाचें बोलूं, असें त्यांनीं उत्तर दिल्यामुळें फिरून युद्ध सुरू झालें होते. पण वर वर्णन केल्याप्रमाणे कोणत्याच पक्षास निश्चयात्मक जय न मिळतां ते दिवसेंदिवस रेंगाळत जाऊन त्यास फांटे फुटू लागले

होते. अशा वेळीं हैदर अल्लीनें एकस्यानें उचल खाऊन इंग्रजांचा मोड करून अर्काट घेतले एवढेच नव्हे तर, "मद्रासकर इग्रजांची भीति न उरल्यामुळे आतां मी मोठी फौज घेऊन उलट मुबईकर इग्रजांविरुद्ध लढाईत तुम्हांस मदत करण्यास येणार आहें." असा निरोप त्याने पुण्यास कारभाऱ्यांकडे पाठविला होता!

ही सर्व स्थिति लक्षात घेतां मराठ्यांशी चाललेलें युद्ध थांबले, व राघोबाचा पक्ष सोडावा लागला तरी चालेल, पण या वेळी हैदर अल्लीला शिरजोर होऊं देतां कामा नये असा विचार करून, कलकत्तेकर मद्रासकर व मुबईकर अशा त्रिवर्गांनीं आपापल्या परीनें पुण्यास कारभाऱ्यांकडे निकडीचीं तहाची बोलणीं सुरू केलीं होतीं. नागपूरकर भोसलेहि इग्रजांशी सलोखा करून त्यांच्या बाजूनें तहाची मध्यस्थी करू लागला होता. कारभाऱ्यांशी तह करण्याच्या कामी महादजी शिंद्याइतका वजनदार सरदार दुसरा नाहीं; अशी आजपर्यंतच्या अनुभवावरून इग्रजाची खात्री झालेलीच होती. तेव्हां त्यांनीं इतर सर्व प्रयत्न सोडून देऊन शिंद्याशीच विशेष आस्थापूर्वक बोलणें सुरू केलें. अर्थात् शिंद्याच्या मुलखांत व माळवाप्रांतांत चालविलेली धामधूम बद करणे इंग्रजांस भाग पडले; आणि युद्ध थांबून तहाचे काम करण्यास शिंद्याला मोकळीक द्यावी असा हुकूम कर्नल मूर ह्यास कलकत्तेकरांनीं पाठविला.तेव्हां तो साहेब आपलें सैन्य घेऊन यमुना उतरून परत गेला. सन १७८१ च्या डिसेंबर महिन्यांत इग्रजांतर्फे मि. डेव्हिड अडरसन व महादजी शिंदे यांच्या विद्यमाने तहाची वाटाघाट सुरू झाली, व अखेर१७८२च्या मे महिन्याच्या १७ व्या तारखेस सालबाई येथे इग्रज व पेशवे यांच्या दरम्यान तह ठरला. इग्रजांनीं पुरदरच्या तहानतर मराठ्यांपासून घेतलेला सर्व मुलुख त्यांचा त्यांस परत द्यावा, उलट हैदरअल्ली यानें इग्रजापासून घेतलेला मुलुख त्यांस परत द्यावा, इग्रज आणि पोर्तुगीज याच्याखेरीज दुसऱ्या कोणत्याहि राष्ट्राच्या युरोपियन लोकात मराठ्यांनीं आपल्या मुलखात राहू देऊ नये, शिंद्याच्या कामगिरीबद्दल व तह पाळण्याच्या जामिनकीबद्दल त्याला भडोच देण्यांत यावे,इग्रजांनी राघोबाचा पक्ष कायमचा सोडावा व राघोबानें दरमहा फक्त २५ हजार रुपये नक्त नेमणूक घेऊन गोदातीरीं त्याच्या इच्छेस येईल त्या ठिकाणीं रहावें, अशी या तहाची मुख्य कलमें होतीं. या तहावर ता. २४ फेब्रुवारी सन १७८३ पर्यंत पेशव्यांची सही झाली नव्हती. पण दरम्यान हैदर अल्ली ता. ७ दिसेंबर १७७३ रोजी वारल्याची खबर आल्यामुळे याहून जास्ती ओढून धरणें बरें नव्हे असे त्यांना वाटले असल्यास नवल नाहीं. तारीख १० फेब्रुवारी सन १७८४ रोजीं पुण्यास सवाई माधवराव यांचे लग्न मोठ्या थाटानें झालें. त्या वेळीं श्रीमंत महाराज छत्रपतीसुद्धां मराठे दौलतींतील बहुतेक सर्व मातबर मंडळी पुण्यास जमली होती. या आनदोत्सवांत सालबाईच्या तहानें अर्थातच मोठी भर पडली.

सालबाईच्या तहानंतरहि राघोबा कारभाऱ्यांच्या स्वाधीन होण्यास प्रथम कबूल होईना. पण तहानतर त्यास आपल्या मुलखांत राहूं देणे किंवा नेमणूक चालविणें हें इंग्रजांस शक्य नव्हतें. आणि अखेर आपल्या राजकारणास इतक्या उपयोगीं पडलेल्या स्नेह्यासहि त्यांना सुरत सोडून जाण्याची नाजुक सूचना करावी लागली! "तुम्हांस कारभाऱ्यांचे मुलखांत रहावयाचे नसेल तर आपल्या मुलखांत आश्रय देण्यास मी तयार आहे" असे शिंद्यानें राघोबास लिहिले होते. पण शेवटी गोदावरीच्या तीरींच स्नानसंध्या करून राहण्याचे ठरवून, व परशुरामभाऊ हरिपंत फडके व तुकोजी होळकर यांजकडून वेगवेगळी लेखी आश्वासने व बेलभंडार घेऊन राघोबा तापीच्या कांठानें खानदेशांत आला व कोपरगांव येथें येऊन राहिला. पण इतक्या दगदगीने व अपमानाने मिळविलेली ही बैठी नेमणूक उपभोगण्यास तो फार दिवस जगला नाही. कोपरगांवी येऊन राहिल्यावर नोव्हेंबर महिन्यापासून त्याची प्रकृति बिघडली व तारीख ११ डिसेंबर सन १७८३ रोजी तो मरण पावला. या वेळी दत्तक पुत्र अमृतराय व १७७५ साली धार येथे जन्मलेला औरस पुत्र बाजीराव असे त्याचे दोन मुलगे हयात असून, चिमाजी अप्पा हा दुसरा औरस मुलगा चार महिन्यांच्या गर्भावस्थेंत होता.

यानतर दोन वर्षे कारभाऱ्यांना स्वस्थतेची गेली त्यांचा व इग्रजांचा बेबनाव होण्यास इग्रजांस फुरसतच नव्हती. कारण, हैदर अल्ली वारल्याबरोबर त्याचा मुलगा टिपू ह्याने इग्रजांशी आपल्या बापाचेच धोरण कायम ठेविले. प्रथम इग्रजांनी त्याची बरीच ठाणीं काबीज केली; परतु लवकरच एक लक्ष फौज व तोफखाना घेऊन टिपू इग्रजांवर चालून गेला व जानेवारी १७८४ पर्यंत त्याने इंग्रजांनीं जिंकून घेतलेला समुद्रकिनाऱ्यापर्यंतचा बहुतेक मुलख फिरून हस्तगत केला.

सालबाईच्या तहानतर तीन वर्षांनी इग्रजांचा विचार पेशव्यांच्या दरबारी कायमचा वकील ठेवण्याविषयी सुरू झाला. ही गोष्ट घडून आली तर ती शिंद्याच्या मध्यस्थीनेच घडून येईल, एरव्ही येणार नाहीं, असे इग्रजांस वाटत असल्यामुळे त्यांनी पुण्यास आपला वकील ठेवण्याविषयी प्रथम त्याच्याशीच बोलणे सुरू केले. पेशव्यांच्या दरबारचा भावी वकील मिस्टर चार्लस मॅलेट हा ता. १५ मार्च १७८५ रोजी सुरतेहून निघाला तो उज्जनग्वाल्हेरवरून आग्र्यास गेला व तेथून मथुरेस जाऊन त्याने शिंद्याची गांठ घेतली. याच ठिकाणी त्या वेळी मोगल बादशहा शहाअलम हाहि येऊन राहिला होता. त्याचीहि मॅलेट याने गांठ घेतली; परतु पोषाख व नजराणे यांच्या देवघेवींखेरीच मोगल बादशहाशी त्याला कांहीहि कर्तव्य नव्हते. कारण, सर्व बादशाही सत्ता त्या वेळीं शिंद्याच्या हातीं येऊन राहिली होती. शिंद्याशीं झालेल्या या भेटींत पुण्यास स्थापण्याच्या वकिलातीचे काम शेवटास गेलें नाही. इंग्रजांचा वकील ठेवावयाचा तो पुण्यास ठेवावा असें शिंद्याचें मत नव्हते.

मुंबईकरांना खुद्द पुण्यास इंग्रज वकील ठेवणें इष्ट होते. पण आपल्या दरबारीं कलकत्तेकरांचा वकील आधींच असल्यामुळे पुण्यास आणखी एक वकील ठेवून इंग्रजांशीं चालणारा व्यवहार दुतोंडी करावा ही गोष्ट शिंद्यास आवडणारी नव्हती. इंग्रजांचे पेशव्यांशीं अखेर कामकाज व्हावयाचें ते पुण्यास; असें असतां ज्यांच्या विद्यमाने ते ठरावयाचे तो मात्र पुण्यापासून शेकडो मैलांवर! इंग्रजांचा वकील पुण्यास न राहतां तो शिंद्याच्या दरबारीं रहावा ही गोष्ट पेशव्यांनाहि फारशी प्रिय असणें संभवत नाही. हा दुतर्फी कारभार शिंद्याने दिल्लीच्या बादशहाकडून पेशव्यांच्या नावाने याच सुमारास वकील उल्‌मुतलकीच्या सनदा घेतल्यामुळें अधिक गुतागुतीचा झाला. पुण्याचे दरबारीं इंग्रज वकील ठेवण्यास महादजी शिंदे प्रतिकूल असून त्याच्या दरबारी कलकत्तेकरांचा वकील असल्यामुळें महादजी-ला बिघडवून मुंबईकरांची सूचना अमलांत आणण्यास कलकत्तेकर कबूल नव्हते. नवीन मिळविलेल्या बादशाही सनदेच्या जोरावर बंगाल्यांत इंग्रजांच्या ताब्यांत असलेल्या बादशाही मुलखांत चौथाई वसूल करण्याचा हक्क शिंदा सांगू लागला होता. यामुळे पेशव्यांपेक्षां शिंद्याशींच इंग्रजांचें काम अधिक महत्त्वाचे होते. असो; मॅलेट व महादजी यांच्या भेटीत महादजीने मॅलेट यास वाटाण्याच्या अक्षता लाविल्या. "या बाबतीत पुण्याच्या कारभाऱ्यांचा विचार मला आधी घेतला पाहिजे; पुण्याच्या दरबारीं वकील ठेवण्याची योजना खुद्द पेशव्यांना प्रिय आहे किंवा नाहीं हे कळत नाही," वगैरे सबबी सांगून महादजीनें मॅलेटची रवानगी करून दिली. मॅलेट आग्र्यावरून कानपुरास येऊन तेथून कलकत्त्यास गव्हर्नर जनरलचे भेटीस गेला. नंतर कित्येक महिन्यांनी शिंद्याची कबुली मिळून मॅलेट यास गव्हर्नर जनरल याजकडून पुण्याच्या दरबारचा इंग्रज वकील म्हणून अधिकारपत्र मिळाले.

सालबाईच्या तहानंतर कांहीं वर्षे मराठे व इंग्रज यांची गट्टी होती. सन १७८६ साली पेशव्यांची टिपूवरील पहिली मोहीम झाली. या मोहिमेत त्यांस निजाम भोसले वगैरे सहाय होते. इंग्रजांनींहि या मोहिमेत सामील व्हावें अशाविषयीं नानाचा प्रयत्न होता. पण, टिपूशीं नुकताच तह ठरविण्यांत आल्यामुळे तो मोडून पदरी खोटेपणा घेण्यास आम्ही तयार नाही असें इंग्र-जांनी त्यास कळविले. मात्र आपलीं पांच पांच पलटणे पेशव्यांच्या व निजामाच्या सरहद्दीवर त्यांच्या मुलखाच्या संरक्षणार्थ पाठवूं असें इंग्रजांनी कबूल केले. ही मदत पेशव्यांनी नाकारली. तथापि, आपले व इंग्रजांचें सख्य आहे, निदान टिपूने इंग्रजांची मदत मिळण्याची आशा धरू नये, असे टिपूस भासविण्याकरितां नानाने पुण्याचा इंग्रज वकील सर चार्लस मॅलेट यास बदामी येथें आपल्या छावणींत आणून आपल्या स्वारीबरोबर त्यास चालविलें होते! ता. २० मे रोजीं मराठा फौजेनें बदामीच्या किल्ल्यावर हल्ला करून टिपूच्या सरदाराच्या हातून तो

काबीज केला. बदामी घेतल्याचे आधींच निजाम स्वारींतून परतला होता. नंतर नाना परशुरामभाऊ व भोसले हेहि परतले. मागें हरिपंत फडके यांनी ७५ हजार फौजेनिशीं स्वारीचें काम चालविलें. होळकरप्रभृति सरदार ४० हजार फौजेनिशीं सावनूर-हुबळीकडे होते. पण या एकंदर स्वारींत तरवारबहाद्दर टिपूनें आपलें लष्करी कौशल्य मराठ्यांच्या विशेष नजरेस आणलें. त्याने अनेक छापे घालून मराठ्यांस जेरीस आणिले; तसेंच एका छाप्यांत तर होळकराच्या सैन्याच्या बरोबर असलेल्या पेंढारानें लुटीला ही संधि बरी आहे असे पाहून मराठी सैन्याचेच गोट लुटले! शिवाय टिपूनें विश्वास दाखवून होळकरास तहाची हूल दाखवीत अनेक वेळां फसविले व अनेक ठाणी घेतली! १७८७ च्या एप्रिलात उभयपक्षी पक्का तह ठरून टिपूने मराठ्यांस ४८ लक्ष रुपये व कांही संस्थाने व किल्ले देऊं केले. पण मोहिमेचा खर्च सुमारे सव्वा कोटी रुपये झाला असल्यामुळे मराठ्यांचा एकदरीने तोटाच झाला. टिपूची सरशी झाली असतां त्याने तह करण्याचे कारण असे कीं, इग्रजहि आपणावर स्वारी करण्याच्या तयारीस लागले आहेत, अशी त्यास नक्की बातमी होती.

यानतर दोनच वर्षांनीं मराठ्यांनी व निजामाने मिळून टिपूवरील दुसरी मोहीम आरंभिली. मात्र या वेळीं त्यांस इग्रजांचे प्रत्यक्ष सहाय होते; किंबहुना ही मोहिम सुरू करण्यांत इग्रज पुढारी होते, आणि त्यानीच निजामास सामील करून घेतलें होते. पेशव्यांनीं जातीने स्वारीस निघावे असाहि म्यालेट वकिलानें आग्रह चालविला होता. पण अखेर परशुरामभाऊ जाण्यावरच काम भागले; व परस्पर मदत करून युद्ध जिंकून जो मुलुख काबीज केला जाईल तो इंग्रज पेशवे व निजाम या त्रिवर्गांनी सारखा वांटून घ्यावा असे ठरले. या त्रिकुटांतून मराठ्यांस फोडावे असा प्रयत्न टिपूने केला; पण तो साधला नाहीं. नानाने मात्र गोड बोलून टिपूकडून होईल तेवढी मागील तहांतील खंडणीची शिलकी रकम वसूल केली. १७९० चे मे-जून महिन्यांत मुंबईहून इग्रजांचीं पलटणें जयगडच्या खाडींतून सगमेश्वरावरून अंब्याघाटाने वर चढून तासगांवास येऊन दाखल झालीं. कॅपटन लिटल हा त्या अडीच हजार फौजेचा पुढारी होता. त्यासह परशुरामभाऊ आगष्टांत स्वारीवर निघाला. घटप्रभा नदी उतरून गेल्यावर पहिलाच रणसंग्राम धारवाडच्या वेढ्याचा झाला. इतरहि सरदार पाठविण्यांत आलेच होते. धारवाडच्या वेढ्यांत इग्रजांनीं मर्दुमकी व तोफांचा उत्कृष्ट मारा करून मराठ्यांकडून धन्यवाद घेतला. किल्ला लढविणार टिपूचा सरदार बद्रीजमाल यानें तर शौर्याची शर्थ केली. पण अखेर त्याचें कांहीं न चालतां, ५ एप्रिल १७९१ रोजीं सात महिने लढल्यानंतर त्यास किल्ला सोडावा लागला. धारवाड घेतल्यावर मराठे व इंग्रज श्रीरंगपट्टणाकडे चालून गेले. मे महिन्यांत दुसऱ्या बाजूनें हरिपंत फडके फौजेनिशीं येत होते, त्यांचें

व भाऊंचें सैन्य एकत्र झालें. तिकडून लॉर्ड कॉर्नवालिस हा निजामाचें सैन्य बरोबर घेऊन तिसऱ्या दिशेनें येत होताच. सर्वांनीं मिळून टिपूस जेरीस आणले व अखेर टिपूला तह करून श्रीरंगपट्टणचा वेढा उठवावा लागला. टिपूनें ३ कोटि रुपये खडणी व अर्धे राज्य देऊं केले. संयुक्तांना प्रत्येकीं ४० लक्ष उत्पन्नाचा मुलुख वांट्यास आला. मराठ्यांनीं वर्धा व कृष्णा यांतील प्रांत, शिवाय सोंडूर वगैरे घेतले; गुत्ती कडप्पा कोपळ वगैरे कृष्णा व तुंगभद्रा यांतील प्रांत निजामास देण्यांत आले; व इंग्रजांनीं डिंडिगल कुर्ग मलबार वगैरे प्रांत आपणाकडे ठेवले. इंग्रज व मराठे यांनीं सहकारितेनें केलेल्या स्वारीत परस्पर थोड्याबहुत कुरबुरीहि झाल्या; पण अखेर बिघाड न होता सर्व मसलत पार पडली. लॉर्ड कॉर्नवालिस यानें परशुरामभाऊस जातांना १७ तोफा नजर केल्या. परशुरामभाऊंची फौज परत येतांना वाटेत तिचे बरेच हाल झाले. इंग्रज फौज मलबार किनाऱ्यावरील बंदरांत जहाजावर बसून मुंबईकडे रवाना झाली.

टिपूवरील तिसऱ्या स्वारींत या सहकारितेचा योग फिरून आला नाहीं. दरम्यान सवाईमाधवराव निवर्तून बाजीराव गादीवर बसला असून तो दौलतराव शिंद्याच्या कच्छपीं सांपडला होता. १७९८ सालीं निजाम अल्लीनें इंग्रजाशीं नवा तह करून आपलीं कवाईती पलटणें मोडून इंग्रजांचें सहा हजार सैन्य व तोफखाना आपले पदरीं ठेवून त्याच्या खर्चाकरितां २४ लक्ष रुपये देण्याचें कबूल केले होते. चौथाई-सरदेशमुखीच्या वसुलीचा मराठ्यांचा तगादा चुकण्यास इंग्रजांशिवाय दुसरा कोणी उपयोगी पडणार नाहीं असें मनात आणून वरीलप्रमाणे इंग्रजांशीं स्नेह जोडण्याचें निजामानें ठरविलें. इंग्रजांचें मात्र आयतेंच काम झालें. फौजेचा खर्च निजाम देणार, फौज आपल्या हुकमतीखालीं राहणार, निजाम आपल्या शत्रूच्या मालिकेंतून कायमचा निघून जाणार, व निजाम स्नेही जोडल्यानें पेशव्यावरहि वचक बसणार! असा या व्यवस्थेपासून इंग्रजाचा सर्व बाजूंनीं फायदा होता. याच शर्तीं पेशव्यानेंहि कबूल कराव्या म्हणजे हेंहि बाहुलें आपल्या हातीं आलें असा इंग्रजांचा बेत होता; पण दौलतराव शिंद्यानें व नानानें हा तह करूं नका म्हणून बाजीरावास सल्ला दिला, म्हणून तो होण्याचा राहिला. तथापि टिपूविरुद्ध पुन्हा लढाई सुरू झाल्यास आपण मदत करूं असें बाजीरावानें इंग्रजांस वचन दिलें; व परशुरामभाऊंच्या हाताखालीं पूर्वीच्या मोहिमेप्रमाणें सैन्य देऊन इंग्रजांचे मदतीस पाठवावयाचें असें ठरलें. बरोबर रास्ते विंचूरकर वगैरे सरदार जावे असेंहि नानानें ठरविलें होतें. पण या बाबतींत दौलतराव शिंद्यानें आग्रह धरला कीं, टिपूवरील स्वारींत मराठ्यांनीं प्रत्यक्ष सामील होऊं नये. पेशव्याला टिपूनें शिंद्याचे विद्यमानें तेरा लक्ष रुपये दिल्याचा बोभाटा होता तो खराखोटा असला तरी स्वारीवर इंग्रजांच्या मदतीस सैन्य पाठविण्याच्या ऐन वेळीं बाजीरावानें मनाई करून मोडता घातला, याचें नानासहि मोठें गूढ पडलें. अखेर इंग्रजांना आपल्या

बळावर श्रीरंगपट्टणची मोहीम करावी लागली. टिपूशीं सख्य करून निजाम अल्लीवर स्वारी करण्याचा बाजीराव व दौलतराव शिंदे यांचा बेत होता. पण या श्रीरंगपट्टणच्या स्वारींत टिपूस अपयश येऊन तो मरणहि पावला, तेव्हां बाजीरावाचा हा बेत जागच्या जागींच राहिला. टिपूच्या मृत्यूची बातमी ऐकतांच बाजीरावानें आनंद प्रदर्शित केला, व लगेच पगडी फिरवून, आयत्या वेळीं इंग्रजांच्या मदतीस सैन्य पाठविण्याचे सर्व कारण नाना होय, असें इंग्रजांचे मनांत भरवून दिलें ! टिपूच्या मरणोत्तर म्हैसूरच्या मुलखाची वांटणी करण्याची वेळ आली तेव्हां इंग्रजांनी पेशव्यांस एक लहानसा हिस्सा देण्यास काढला; पण त्यास अशी शर्त घातली कीं, निजामाप्रमाणें पेशव्यांनींहि इंग्रजी फौज पदरीं बाळगण्याचा पूर्वीं रहित झालेला तह करावा. पण असा तह करणे हें घातक आहे असे नानाने मनाशी पक्के ठरविले असल्यामुळे तह नाकबूल करण्यास बाजीरावास नानाची मदतच मिळाली. अखेर तोहि हिस्सा निजाम व इंग्रज यांनीं आपापसांत वांटून घेतला; पण उभयतांत फिरून एक नवा तह होऊन १७९२ व १७९९ सालीं निजामाच्या वांट्यास आलेला टिपूचा सर्व मुलुख इंग्रजांना मिळाला व त्याच्या मोबदला इंग्रजांची आठ हजार फौज आत्मरक्षणार्थ निजामास आपल्या गळ्यांत बांधून घ्यावी लागली ! तात्पर्य, इंग्रज व मराठे यांच्या खऱ्या सहकारितेनें झालेली एकच मोठी म्हणजे टिपूवरील १७९१ ची मोहीम होय.

नानाला व बाजीरावाला इंग्रजांची पुढे लवकरच मदत घ्यावी लागली; पण ती खरी सहकारिता नसून, आपल्या घरच्या भांडणांत आपल्याच हातानें दुसऱ्यानदा तो इंग्रजांचा हात शिरकावून घेतला होता. फरक इतकाच कीं, राघोबानें हे अपयश प्रारंभींच आपल्या माथ्यावर घेतले होतें व त्याला सर्व जगाने त्या वेळीं नांवेहि ठेविलीं होतीं; पण पुढें काळच असा विपरीत आला कीं, राघोबाचा प्रतिस्पर्धी व मुत्सद्दी नाना फडणवीस यालाच स्वतः ती गोष्ट करावी लागली. नाना व महादजी यांची एका दृष्टीने परस्पर स्पर्धा असली तरी दोघेहि आपापल्या परीने दौलतीचे खांब होते. महादजीच्या मृत्यूमुळे नानाला आपला उजवा—म्हणजे हत्यार धरणारा—हातच तुटला असे वाटल्यास नवल नाहीं. आणि खरोखरच महादजीच्या मृत्यूपासून नानाचें उत्तरहिंदुस्थानांतील सर्व धोरण सपुष्टांत येऊन दिल्लीतून मराठ्यांचा पाय निघाल्यासारखाच झाला. तथापि महादजीच्या मृत्यूनंतर दुसऱ्याच वर्षी खर्ड्यांची लढाई जिंकून नानाने जगास असे दाखविलें कीं, दक्षिणेपुरतें कां होईना, पण मराठ्यांच्या अगचे तेज अद्यापि कायम आहे. खर्ड्यांची लढाई हा नानाच्या वैभवाचा कळसच झाला. पण त्याच्याच पुढच्या वर्षी सवाई माधवरावाला अपमृत्यु आला, व नानाच्या वैराचा गड्डा जो बाजीराव तोच गादीवर बसण्याचा प्रसंग आल्यानें सर्वच उलटेंसुलटें झालें. बाजीरावापासून नानाला

दोन प्रकारची भीति वाटत होती. एक तर आपल्या बापाचें वैर उगविण्याकरतां तो व्यक्तिशः आपणास जांच किंवा घात करील; व त्याहूनहि मोठें भय हे कीं, असला कंगाल बुद्धीचा कलिपुरुष पेशवाईच्या गादीवर बसल्यास गादीचे केव्हांच वाटोळे होईल ! या भीतीने नानानें ताबडतोब सर्व मोठे सरदार पुण्यास बोलावून घेतले, व बाजीराव गादीवर बसणे म्हणजे इंग्रजांचा हात दरबारच्या राजकारणांत फिरून शिरणे कसे आहे हे त्यांस सांगितले. परशुराम भाऊ पटवर्धन नानांस अनुकूल होतेच. पण बाहेरच्या मोठ्या सरदारांपैकीं होळकरांनीहि नानांचे धोरण पसंत केले, व शिंद्यांच्या कारभाऱ्यांत मतभेद होता तरी त्यांनी अखेर असे ठरविले कीं, दौलतराव शिंदे आपला धनी-अल्पवयी, तेव्हां होळकरासारखे वडील मराठे मुत्सद्दी काय करितील तें शिंद्यांनीहि मान्य करावे. असो. सर्वांचा मिळून असा बेत ठरला की, सवाई माधवरावसाहेबाच्या विधवा स्त्रीच्या मांडीवर दत्तक देऊन गादी चालवावी, आणि बाजीरावास आहे तसाच कैदेत राहू द्यावा. पण बाजीरावास ही बातमी लागतांच त्याने शिंद्याचा कारभारी बाळोबा तात्या यास वश करून घेऊन नानाचा बेत हाणून पाडण्याचा उद्योग आरंभिला. विकल्प सुरू झाल्यावर तिकडूनहि कारणे सुचू लागलीं. बाळाजी विश्वनाथाचा वंश हयात असतां परघराण्यातला मुलगा काय म्हणून दत्तक घ्यावयाचा हा प्रश्न पुष्कळांना विचार करण्यास योग्य असा वाटू लागला; व बाजीरावाने शिंद्यास चार लक्षांचा मुलुख व स्वतःस गादीवर बसविण्यास लागणारा सर्व खर्च देण्याचे आमिष लाविल्याने या प्रश्नास बरेच महत्त्व आले.

नानास ही बातमी लागतांच त्याने परशुरामभाऊस ताबडतोब पुण्यास बोलावून आणले; पण विचारांती उभयतांसहि असेच वाटले कीं, एवीतेवीं शिंदे आपल्या सैन्याच्या जोरावर बाजीरावास गादीवर बसविणारच, मग तीच गोष्ट आपण होऊन केल्यास शिंदे बाजूस पडतील, व बाजीराव कदाचित् उपकाराने मारला जाऊन आपल्या हाती येईल. त्याप्रमाणे परशुरामभाऊनीं शिवनेरीस जाऊन बाजीरावास बंधमुक्त केले ;व हा कांहीं कपटप्रयोग नाही, अशी परशुरामभाऊंकडून शपथपुरःसर खात्री करून घेतल्यावर बाजीराव चिमाजी अप्पासह पुण्यास आला. नानाची त्याची भेट होऊन वरपांगी तरी उभयपक्षीं दिलसफाई झाली, व शेवटी बाजीरावाने नानास असे लिहून दिले की, "झाल्या गोष्टी सर्वांनीं विसरून जाव्या, मी तुम्हांकडेसच कारभार ठेवून सर्व कांहीं तुमच्या सल्ल्याने करीन." तेव्हां बाजीरावास गादीवर बसविण्यांत आले. हें ऐकून बाळोबा तात्यास राग आला; आणि त्याच्या सल्ल्यावरून दौलतराव शिंदे गोदातीरावरून आपली सर्व फौज घेऊन पुण्यास येऊन राहिला. शिंद्याची फौज मोठी. तिच्यापुढें आपले चालणार नाहीं असे वाटून नाना मनांतून फार भ्याला; परशु-

रामभाऊनें त्याला पुष्कळ धीर दिला, आणि जरूर तर शिंद्याशी लढतां येईल, त्याची काय प्रतिष्ठा, अशी त्याची समजूत घालण्याचाहि प्रयत्न केला. पण बाळोबा तात्याची भीति व मनांतून बाजीरावाचा तो कोणत्या वेळी काय करील याविषयी अविश्वास, यामुळे आपण कारभार सोडून पुण्यांतून निघोन जावे, मागे काय व्हावयाचे असेल तें होईल, असे नानाने ठरविले. बाजीरावाने तर उघड विश्वासघात केला ! शिंद्याशीं प्रथम बोलणे लावून आयत्या वेळीं नानाची मदत घेतली व शिंद्यास तोंडघशी पाडले याबद्दल त्यास प्रायश्चित्त द्यावयाचे म्हणजे त्याला गादीवरून काढावयाचे—असे बाळोबा तात्यानें ठरविलें; आणि परशुरामभाऊहि कटांत सामील करून घेण्याचा घाट घातला. नाना परशुरामभाऊस गुतवून स्वतः पुण्यांतून निघून गेला, यामुळे परशुरामभाऊ उघडा पडल्यासारखा झाला; व एकट्याच्या हिमतीवर शिंद्याशीं वैर करण्यापेक्षां या नवीन कटांत सामील होणेच बरे असे त्याने आपल्या मनाशीं ठरविले. बाजीरावास पदच्युत करून चिमाजी अप्पास सवाई माधवरावाच्या विधवा स्त्रीचे मांडीवर दत्तक देऊन गादीवर बसवावे असा हा कट होता; व या नव्या पेशव्याला नानाच्या जागीं नवा कारभारी पाहिजे, तेव्हां परशुरामभाऊने कारभार करावा असे ठरले. पण परशुरामभाऊने नानास प्रथम विचारून त्याची समति घेतल्याशिवाय या कटास संमति दिली नाही. नाना भाऊ बाळोबा या सर्वांचा अशा रीतीने एकविचार झाल्यावर बाजीरावावर फिरून अर्थातच कारागृहवासाची पाळी आली !

नाना पुण्याहून प्रथम पुरदरास व नतर वाईस जाऊन राहिला. सातारच्या महाराजास बधमुक्त करून त्यांच्या नावाने फिरून राज्यकारभार सुरू केल्यास मराठे सरदाराना एकत्र करून सत्ता एकमुखी करतां येण्याचा सभव जाणून तसे करण्याचा त्याने प्रयत्नहि केला; पण तो साधला नाहीं. दरम्यान चिमाजी अप्पाचे दत्तविधान झाल्याने नाना स्वतः सातान्यास जाऊन त्याने नव्या पेशव्याकरता वस्त्रे मिळविलीं. पूर्वीं परशुरामभाऊने कारभार करावा असे टरले होते; पण नानानेच कारभार करावा व भाऊने सेनाधिपत्य स्वीकारावे असा नवा बूट निघून त्याप्रमाणे नानाने पुण्यास यावे अशीं बोलणीं सुरू झालीं. पण बाजीरावाप्रमाणे नानासहि कैदेत ठेवण्याचा शिंद्याचा बेत असल्याची गुणगुण लागल्यावरून नाना पुण्यास न येतां महाडाकडे निघून गेला व रायगड लढविण्याची त्याने तयारी केली. अशा रीतीने अकस्मितपणे नाना व बाजीराव हे समदुःखी होऊन दोघांना एकविचार करणे प्राप्त झाले. व बाळोबा कुजराच्या मध्यस्थीने त्यांचा पत्रव्यवहार सुरू झाला. तुकोजी होळकराच्या फौजेची मदत शिंद्याविरुद्ध नानाला मिळण्यासारखी होती. शिवाय बाळोबा तात्याचा प्रतिस्पर्धी रायाजी पाटील याच्या मार्फत नानानें शिंद्यास १० लक्षांचा मुलुख, अहमदनगरचा किल्ला, परशुरामभाऊची जहागीर व घाटग्यांची खपसूरत मलगी देऊं केली ! मानाजी फाकडे शिंद्याच्या

लष्करभरतीचें काम याच कटास अनुलक्षून करीत होता. बाजीरावाच्या कांहीं कृत्यामुळे हा कट मध्येच उघडकीस येऊन बाळोबा तात्याने बाजीरावाची उत्तर-हिंदुस्थानाकडे बंदोबस्ताने रवानगीहि केली. पण बाजीरावाने आपला रखवालदार घाटगे यास फितवून व त्यास शिंद्याची दिवाणगिरी व शिंद्यास दोन कोटी रुपये देण्याचे कबूल करून मध्येच मुक्काम करविला. इकडे नानाने रघूजी भोसले व निजाम यांसहि आपल्या पक्षाकडे वळविले. इतकी तयारी झाल्यावर नाना फौजेसह पुण्यास आला. त्याने बाजीरावास परत आणवून गादीवर बसविलें ( ४ डिसें. १७९६ ) व स्वतःकडे कारभार घेऊन शास्त्र्यांकडून चिमाजी अप्पाचें दत्तविधान अशास्त्र ठरवून तसे जाहीरहि केले !

पण इतकें होते तोच फिरून कारस्थानाने उलट खाल्ली ! तुकोजी होळकर मरण पावला व नानाने निजामास दिलेले वचन बाजीरावाने पाळण्याचे नाकारल्यामुळे तोहि नाराज झाला. स्वतः बाजीरावाने तर जमल्यास नाना व शिंदे या दोघांनाहि बाजूस सारून आपला कारभार आपण मनःपूत करण्याचे योजिले. पण त्यांतल्यात्यांत नानाविरुद्धच कारस्थान अधिक बळावून ता. ३१ डिसेंबर रोजी नाना शिंद्याच्या मुलाखतीस गेला असतां शिंद्याचा सेनापति मायकेल फिलोज याने नानास गोटांतच कैद केले, व सर्जेराव घाटग्याने आपले लोक शहरांत पाठवून त्यांजकडून नानाचा वाडा व त्याच्या पक्षाच्या लोकांचे वाडे लुटविले! पुण्यांत धरपकड रक्तपात यांशिवाय कित्येक दिवसपर्यंत दुसरी गोष्ट दिसत नव्हती व ऐकू येत नव्हती ! घरांतून बाहेर पडावयाचे तर मोठा जमाव करून हातांत ढाली घेऊन व पट्टे चढवून बाहेर पडावे लागत असे ! नानाची अहमदनगरच्या किल्ल्यांत रवानगी केल्यावर बाजीराव शिंद्याचें वर्चस्व कमी करण्याच्या उद्योगास लागला. हे पाहून शिंद्यानें आपल्या लष्करचा महिन्याचा खर्च वीस लक्ष होता त्यासबंधीं बाजीरावाच्या मागे पैशाकरितां लकडा लावला. पण बाजीराव इतके पैसे कोठून देणार ? तेव्हां कराराप्रमाणे घाटग्यास शिंद्याचा कारभारी नेमण्यांत येऊन त्याने वाटेल त्या रीतीने पैसे वसूल करावे अशी कबूली बाजीरावास देणें भाग पडलें. या वेळीं घाटग्याने पुण्यांत जो कहर केला, प्रतिष्ठित लोकांची जी अब्रू घेतली तिचें वर्णन आठवले म्हणजे अंगावर कांटाच उभा राहतो. या अत्याचारांच्या योगानें शिंदे पुण्यास अत्यंत अप्रिय झाला. या गोष्टीचा फायदा घेऊन अमृतरावाच्या सहायानें इंग्रज अधिकाऱ्याच्या हाताखालीं सैन्य तयार करून शिंद्यास कैद करावे असा बाजीरावानें बेत केला ; व त्याप्रमाणें त्यास दरबारला बोलावून जरबहि दाखविली; पण अखेर प्रत्यक्ष कैद करण्याचें धैर्य मात्र त्याला झाले नाही.

शिंदा आपण हिंदुस्थानास परत जातों असें सांगून दरबारांतून निघाला; पण त्यानें पुणें सोडलें नाहीं. तथापि सर्व बाजूनीं, विशेषतः गृहकलहानें, त्याची

इतकी हलाखी झाली होती कीं, अखेर त्यास इंग्रजांची मदत व मध्यस्थी यांची याचना करावी लागली. बाजीरावानें यापूर्वींच कर्नल पामर याच्यामार्फत शिंद्याशीं सलोख्याचे बोलणे लावले होतें, तेव्हां तें शिंद्याने झिडकारिलें. आतां त्याला स्वतः होऊन इंग्रजांची मदत मागणे प्राप्त झाले. आपली फौज घेऊन हिंदुस्थानास खरोखरच निघून जावे असे त्याच्या मनांत येऊं लागलें. पण पगार मिळाल्याशिवाय फौज कशी जाग्यावरून हलणार? शेवटीं नानाला बंधमुक्त केलें तर बराचसा पैसा मिळेल व बाजीरावालाहि थोडा वचक बसेल अशा हेतूनें त्याने नानाची सुटका करून त्याला पुण्यास आणले व त्याच्यापासून दहा लक्ष रुपये घेऊन तात्पुरती गरज भागविली. नानाच्या बंधमुक्ततेस इंग्रजांची मदत झाली, व तिचा फायदा त्यांनी ताबडतोब करून घेतला. मराठ्याशी सख्य करून टिपूचे पारिपत्य करावयाचे असे इंग्रजांनीं मनाशीं ठरविले होते. आणि या कामी शिंदा हिंदुस्थानांत जाऊन नाना एकटाच पुण्याच्या दरबारी राहील तर हे जुळून येईल असे पाहून त्यांनी बाजीरावाशी असे बोलणे लावले की, " शिंदा गेला तरी आम्ही तुम्हास आपली फौज रक्षणार्थ देऊ, काळजी नको." पण इंग्रज जसजसे शिंद्यास पुण्याहून घालविण्याचें बोलू लागले तसतसा बाजीरावास असा संशय येऊं लागला की, हे नानाचेच कांही कारस्थान नसेल कशावरून? शिंद्यास दूर करून इंग्रजांस घरी आणून घालण्याचा नानाचा हा बेत असावा. अशी कल्पना येतांच त्याच्या कारस्थानाचें चक्र उलटे फिरू लागले! शिंद्यास 'परत जा' म्हणण्याऐवजी ' रहा ' असेच तो आंतून सांगू लागला! इकडे नानाची खाजगी गांठ घेऊन, "तुम्ही मला बापासारखे आहां, तुम्ही सांगाल तितकेंच पाणी पिऊन मी राहीन " अशी त्याने पायावर हात मारून शपथ वाहिली आणि आपले पागोटे काढून नानाच्या पायावर ठेवून त्याने नानाला फिरून आपल्या हातीं कारभार घ्यावयास लाविले; आणि त्याच वेळी इकडे नानास फिरून कैद करण्याविषयी शिंद्याशी बोलणें सुरू केले!

नानाने वरपांगी कारभार हातीं घेतला, परंतु तो मनांतून उदासच होता. कोणाचाच विश्वास धरण्याची सोय नव्हती. मात्र इंग्रजांना या प्रसगीं आपली मदत अवश्य असल्यामुळे कोणावर कदाचित् विश्वास ठेवतां आलाच तर त्याच्यावर विश्वास ठेवावा, आणि कठिण प्रसगीं त्यांची मदत घ्यावी असे नानानें मनानें ठरविले होतें; पण अशा स्थितीत दोन वर्षे जाऊन अखेर नानास ता० १३ मार्च १८०० रोजी मरण आले. नानाच्या मृत्यूने बाजीराव किंवा शिंदा यांपैकीं कोणाचीहि स्थिति सुधारली नाही, उलट दोघांचाहि मुख्य आधार गेला. अखेर शिंद्याला आपला मुलुख सोडून पुण्यास राहणे अशक्य झालें. कारण, यशवतराव होळकराने अमीरखान पठाणाशीं सख्य करून शिंद्याचा मुलुख लुटण्याचा सपाटा चालविला होता; तेव्हां सन १८०० च्या नवंबरांत शिंद्याने पेशव्या-

पासून ४७ लक्ष रुपये घेऊन पुण्यास घाटग्याचे हाताखाली कांहीं फौज ठेवून उत्तरहिंदुस्थानचा मार्ग स्वीकारला.

नाना मरण पावला व शिंदा आपल्या मुलखास निघून गेला असे पाहून बाजीरावानें शांततेत दिवस घालवावे ते न घालवितां, पूर्वी रघुनाथरावाच्या पक्षाविरुद्ध असणाऱ्या सरदारांवर सूड उगविण्यास सुरवात केली.त्याने रास्त्यांस कैदेत टाकले, व विठोजी होळकरास हत्तीच्या पायीं ठार मारले,शिंदा उत्तरेकडे गेल्यामुळे यशवंतराव होळकराने त्याचशी थोडीशी झटपट करून फिरून दक्षिणेचा मार्ग सुधारला व विठोजीच्या खुनाचा सूड घेऊन पुणे जाळण्यापोळण्याना उद्देश जाहिर करीत तो खानदेशांत उतरला.फिरून शिंद्याच्या फौजेची आणि इंग्रजी फौजेची मदत मागणे बाजीरावास भाग पडले. पण इंग्रजांच्या शर्ती कठीण असल्यामुळे त्याला शिंद्याच्या फौजेवरच निभावून घ्यावे लागले. पटवर्धन वगैरे सरदारांची मदत या वेळी फार व्हावी; पण सरदारांना लुबाडण्याला त्याने रास्त्यांपासून सुरवात केली असल्यामुळे ते आपल्या ठिकाणीं उदासीन व साशंकवृत्तीने रहात असत. ता. २३ आक्टोबर रोजीं होळकर हडपसरनजीक सैन्यासह येऊन पोचला. शिंद्याचे सैन्य घोरपडीके नजीक येऊन उतरलेच होतें. उभयतांची २५ आक्टोबर रोजीं लढाई मोठी होऊन शिंद्याचा पराभव झाला, व त्याचा सर्व गोट लुटला गेला. तेव्हां बाजीराव ७००० सैन्यासह पळून जाऊन सिंहगडावर बसला व तेथून कर्नल क्लोज याच्या मार्फत त्याने इंग्रजाशी मदतीविषयीं बोलणे सुरू केले.

इंग्रज बाजीरावास मदत देण्यास केव्हांहि तयार होते. नाना फडणवीस जिवंत असतां पेशव्यांच्या ऐश्वर्याच्या ऐन भरांत ज्यांनीं रघुनाथरावास मदत देऊन मराठ्यांशी युद्धहि आरंभिले होते, ते आतां बाजीराव गादीनशीन असतां निराश्रित होऊन मदत मागूं लागला तर नानाच्या पश्चात् ती कां देणार नाहींत ? किंबहुना आपली मदत बाजीरावाने घ्यावी असा त्यांचा त्याच्या पाठीमागे पुष्कळ दिवसांपासून लकडा लागला होता. निजामाने घालून दिलेले उदाहरण सर्व राजेरजवाड्यांनी गिरवावे व आपणाकडून सैन्याची मदत घ्यावी असा लॉर्ड कॉर्नवालीस याचा अत्यंत कसून प्रयत्न सुद्धां होता. पण एकहि मराठा सरदार या प्रयत्नास अनुकूल नव्हता.महादजी शिंदे नाना फडणवीस व दौलतराव शिंदे या त्रिवर्गांनीं या मायावी मदतीचा इनकार करण्यास पेशव्यास सल्ला दिला होता. इतकेच नव्हे तर, खुद्द बाजीरावासहि इंग्रजांच्या या धोरणाचे खरे मर्म समजण्याइतकी अक्कल होती; व त्यानेंहि आजवर होतां होई तो या गोष्टीस विरोधच केला. फौज इंग्रजांची, ती ठेवून घ्यावयाची आपल्या राज्यांत, तिच्यावरचे अधिकारी असावयाचे इंग्रज, तिच्या खर्चाकरतां मुलुख तोडून द्यावयाचा; व आपल्यावर प्रसंग आला म्हणजे मात्र तिनें इंग्रजांच्या हुकमतीने आपले रक्षण करावयाचें, ही

व्यवस्था निजामाला सोईची असेल. कारण,तो अवघ्या दक्षिणेंत एकटा असून त्याला दुसरें कोणी सहाय नव्हते. तथापि महाराष्ट्रांत मराठ्यांना इंग्रजांच्या हुकमतीखाली वागणाऱ्या भाडोत्री सैन्याचे कारण कां पडावें ? पण ते अंतः-कलहामुळें पडले खरे ! पूर्वी चार वेळां झिडकारलेली गोष्ट बाजीरावास अखेर निरुपाय होऊन करावी लागली !

सवाई माधवरावाच्या मरणापासून पुण्याच्या दरबारांत चाललेला घोटाळा मालीटसाहेब जवळच संगमावर बसून स्वस्थचित्ताने पहात होता. शिंदे होळकर पटवर्धनादि सरदार, नाना परशुरामभाऊ आदिकरून मुत्सद्दी आणि त्या सर्वांचा मध्यमेरु बाजीराव या ग्रहोपग्रहांचे भ्रमण युतिग्रहण व युद्ध चालू असतांना इंग्रजांस भिण्याचे काहीच कारण नव्हते. आपल्या घरच्या भांडणांत इंग्रजांकडे वांकड्या नजरेने पाहण्याचे कोणास कारण नव्हते व सवडहि नव्हती. उलट वेळ-प्रसंगी त्रयस्थ या नात्याने इंग्रजांची शिष्टाई या सर्वांना उपयोगी पडे, व त्यांच्या लष्करी मदतीची गुप्त अपेक्षा सर्वांना असे. पेशव्यांच्या राजधानींत आज पांच-सहा वर्षे एकसारखी धामधूम माजून राहिली होती व शेकडो अनर्थ घडले पण संगमावरील इंग्रजांच्या वाटेस किंवा त्यांच्या आश्रयाने राहणाऱ्या लोकांच्या वाटेस कधीं कोणी गेल्याचा बोभाटा झाला नाहीं. संगमापासून तीन मैलांच्या अंतरावर शिंदे व होळकर यांच्या फौजेचे तुमल युद्ध झाले; पण ब्रिटिश रेसिडेंट कर्नल क्लोज हा संगमावर उच्च काठीला इंग्रजी निशाण लावून खुशाल बसला होता. कारण, निशाणाला दोघांकडूनहि सारखाच मान मिळणार अशी त्यास खात्री होती ! युद्धाच्या दुसऱ्या दिवशी यशवंतराव होळकराने कर्नल क्लोज यास आपल्या तंबूत बोलावून आणून शिंदे पेशवे व आपण स्वतः यांच्या दरम्यान मध्यस्थी करण्याची विनंति केली.

होळकर पुण्यावर चालून आला होता व त्याच्या फौजेस जयहि मिळाला होता. तरी त्याने फौजेला प्रथम पुण्यांत पायहि घालू दिला नाही. बाजीरावाशी त्यानें नम्रपणाचेंच वर्तन पत्रव्यवहारात ठेवलेले असून त्याने सिंहगडावरून पुण्यास परत यावे अशी विनवणी चालविली होती. बाजीरावाच्या मनाची भीति न गेल्या-मुळे तो प्रथम रायगडास निघून गेला; व तेथून महाडास जाऊन त्याने मुंबईस इंग्रजांना पत्रे पाठवून, जहाजे व माणसे पाठवून मला मुंबईस घेऊन जा अशी विनंति केली. इकडे बाजीराव पुण्यास येत नाहीं, असें पाहून होळकराने त्याला धरून आणण्यास कोकणांत सैन्य पाठविले. तेव्हां इंग्रजांच्या लव्याजम्याची वाट न पाहतां तो सुवर्णदुर्गावरून रेवदंड्यास गेला व तेथे इंग्रजांच्या जहाजांत बसून ता. ६ डिसेंबर रोजीं वसईस पोचला.

इकडे होळकराने पुण्यांत बरीच खंडणी वसूल केली व जुन्नराहून अमृत-रावास आणून गादीवर बसविले. तेव्हां नाना, बाजीराव याचा शत्रु चतुरसिंग भोसले

वावीकर यांनीं सातारकर महाराजांजवळ आपलें वजन खर्च करून अमृतरावास वस्त्रें देवविलीं. अमृतराव गादीवर बसतांच होळकराने पुण्यांतील रहिवाश्यांची केलेली दुर्दशा उघड्या डोळ्यांनीं पाहण्याचे काम या नव्या पेशव्याला प्रथम करावें लागले ! शहरची नाकेबंदी करकरून लोकांना छळण्यांत आले. पूर्वी लोक धोका दिसतांच दूर पळून जाऊन तरी आपले रक्षण करीत.

बाजीराव पुणे सोडून गेला असे पाहतांच रेसिडेंट कर्नल क्लोज हाहि वसईस गेला. होळकर त्यास रहा रहा म्हणत होता; पण होळकराशी तह करण्यापेक्षां या वेळी आपल्या हातीं सापडलेल्या पेशव्याशींच तह करणें अधिक सोईचें व फायद्याचे आहे असे पाहून तो तडक वसईस गेला. आणि त्याच्या विद्यमाने बाजीराव व इंग्रज यांचे दरम्यान तारीख ३१ डिसेंबर १८०२ रोजी तह ठरला. तहांतील मुख्य कलम पदरीं इंग्रजांचे सैन्य बाळगण्यासंबधाने होते हे सांगावयास नकोच ! तोफखान्यासुद्धां ६००० पायदळ इंग्रजांनीं निरंतर पुरवावे, व त्यानें पेशव्याच्या मुलखांतच राहावें. युद्धाचे वेळी एक हजार सैन्य बाजीरावाभोवतीं त्याच्या रक्षणाकरितां ठेवावें; खर्चाकरिता २६ लक्षांचा मुलुख इंग्रजांस तोडून मिळावा; पेशव्याने इतर कोणीहि युरोपियन आपल्या पदरी बाळगू नये; सुरतेवरील दावा पेशव्याने सोडावा; गायकवाड व निजाम याजवरील दावा इंग्रजांच्या मध्यस्थीनेच तोडून घ्यावा; इतर कोणाहि राजेरजवाड्यांशी युद्ध अगर तह किंवा दरबारी बोलणें इंग्रजांना न कळवितां परस्पर करू नये अशी कलमें या तहांत होती. " स्वातंत्र्याची किंमत देऊन आपल्या देहाचा बचाव बाजीरावाने विकत घेतला " असे ग्रँड डफ याने देखील या तहाचे निंदाव्यंजक उद्गारांनी वर्णन केले आहे ! या तहाचा शिंद्याला अर्थातच फार राग आला. बाजीरावाच्या रक्षणाकरिता शिंद्याने पुण्यास फौज धाडली; पण तह करण्यापूर्वी त्याने एका शब्दानेंहि शिंद्यास किंवा दुसरा हितचिंतक रघूजी भोसले यास विचारले नाहीं. या तहाने पेशवे हे इंग्रजांच्या हातचे बाहुलें बनले; शिंदे होळकर इत्यादिकांच्या व पेशव्यांच्या संबंधांची सर्व सूत्रे इंग्रजांच्या हाती गेली. धन्याचे धनीपण गमावल्याचे धन्याला दुःख झाले नाहीं इतके चाकराचे चाकरपण गमावल्याचे दुःख चाकराला झाले ! बाजीरावाने स्वतःबरोबर दुसऱ्यांचेहि स्वातंत्र्य गमावले. इंग्रजांनीं तरी हा तह करून घेण्याचे घाईंत इतरांकडे कोठें पाहिले? सालबाईच्या तहाची अमलबजावणी करण्याच्या कामी शिंदे हे जामीनदार होते. त्यांना इंग्रजांनीं हा नवा तह करितांना एका शब्दाने तरी कोठें विचारलें ? प्रसंग साधून सर्वांनींच जर स्वतंत्र वर्तन केले तर आपणासहि तसे करण्याचा हक्क कां नसावा असे म्हणून वसईच्या तहास मान्यता देण्याचे शिंद्याने साफ नाकारिलें. नागपूरकर भोसल्यांनींहि या कामी कानावर हात ठेवले.

तहावर सह्या होतांच बाजीरावास फिरून गादीवर बसविण्याचा उद्योग

आरंभणें इंग्रजांस प्राप्त झाले. त्यांनी हैदराबाद म्हैसूर वगैरेकडची फौज जनरल वेलस्ली याच्या हातीं जमविली, पटवर्धन गोखले निपाणीकर विंचूरकर इत्यादि मराठे सरदारहि आपली फौज घेऊन इंग्रजाच्या मदतीला आले. होळकराने गादीवर बसविल्याने औट घटकेचे राज्य झालेल्या अमृतरावाने पुणे शहर जाळून आपल्या निराशेचा सूड उगविण्याचा विचार केला होता. पण बाजीरावाच्या पक्षाची इंग्रजी व मराठी फौज पुण्यावर चालून येत आहे असे समजतांच तो पुणे सोडून गेला आणि होळकरहि वाटेत जाळपोळ लूट करीत व विध्वसाची चिराखदाने लावीत औरंगाबादेवरून माळव्याकडे परत गेला. अमृतरावाने नाशकापर्यंत तोच क्रम आक्रमिला; पण अखेर जनरल वेलस्लीसाहेबाशीं तह करून, आणि कांहीं दिवस त्याच्या सैन्यांत सामील राहून शेवटी आठ लक्षांची बैठी जहागीर पत्करून तो काशीस जाऊन राहिला. तारीख १३ मे १८०२ रोजी बाजीराव पुण्यास परत आला व फिरून गादीवर बसला.

शिंदे परत जाता जाता इंग्रजांचे पारिपत्य करण्याचा विचार करू लागला, व त्यास भोसल्यानेहि मदत देऊ केली. त्या दोघांनी मिळून होळकराकडे या आपल्या संघांत सामिल होण्याविषयी बोलणे लावले. होळकर या वेळी या मित्रसंघात स्वाभाविकपणे सामील होण्याचा संभव होता. पण होळकरास तेव्हां तशी बुद्धि झाली नाही! शिंदे व भोसले याची सैन्ये दोन्ही मिळून सुमारे एक लक्ष मोगलाईच्या सरहद्दीवर एकत्र झाली. इकडे इंग्रजांनी सर्व प्रांतांतून मिळून पन्नास हजार फौज गोळा केली. जनरल वेल्स्ली याने नगरचा किल्ला शिंद्याचे ताब्यांतून घेतला व नंतर तो उत्तरेकडे वळला. उभय सैन्यांची गाठ असईजवळ पडून मोठी लढाई होऊन तीत मराठ्यांचा पराजय झाला. तिकडे उत्तरहिंदुस्थानात जनरल लेक याने शिंद्याच्या मुलखावर स्वारी केली. त्याने अलीगडचा किल्ला काबीज करून तो दिल्लीकडे वळला. १८०३ साली दिल्ली घेऊन त्याने पातशहा शहाअलम यास आपल्या ताब्यांत घेतले. अखेर लासवारी येथील लढाईत मराठ्यांचा पराभव होऊन चंबळा नदीच्या उत्तरेचा शिंद्याचा सर्व मुलुख इंग्रजांचे हाती आला.

सन १८०३ च्या मे महिन्याच्या ३० व्या तारखेस पुणे येथील रेसिडेंट कर्नल क्लोज यास कलकत्त्याच्या व्हाइसरॉयाकडून जो खलिता आला त्यांत इंग्रजांच्या दृष्टीने मराठी राज्याच्या त्या वेळच्या स्थितीचे परीक्षण केलेले आहे. सदर खलित्यात व्हाइसरॉय लिहितो, ''म्हैसूरचे राज्य बुडाल्याने हिंदुस्थानांत आम्हांला आतां मराठ्यांशिवाय कोणीच प्रतिपक्षी राहिला नाही. मराठ्यांना जोपर्यंत कोणा एकाद्या युरोपियन राष्ट्राची मदत मिळणार नाहीं तोपर्यंत आम्हांस त्यांचे भय नाही. तथापि एकादा मध्यवर्ती कर्ता संस्थानिक इतर संस्थानांना मिळवून घेऊन संघ निर्माण करील तर मात्र भीति आहे. अशा संघाची देखील फारशी भीति

बाळगावयास पाहिजे असें नाहीं; पण हरप्रयत्नानें असा संघ न होऊं देण्याची आपणास खबरदारी घेतली पाहिजे. यास उत्तम उपाय म्हटला म्हणजे मराठ्यांत मुख्य गणलेल्या संस्थानांशीं आपला स्नेह असावा; पण तोहि असा कीं, आमचें वर्चस्व राहून आमच्या लष्करी सत्तेवर त्यांची सर्व भिस्त रहावी. बाजीरावाशीं वसईचा तह करण्याचा आमचा खरा हेतु हाच आहे. या तहाने पेशव्यास गादी मिळेल; पण आमचें वर्चस्व पुण्यास इतकें राहील कीं, इतर मराठे सरदारांच्या हितसंबंधाचें रक्षण त्यांना आमच्या द्वारें करून घ्यावें लागेल. पेशव्याला उपमर्द झाल्यासारखा वाटेल अशी गोष्ट विशेषतः अंतर्व्यवस्थेबंधानें—तुम्हीं करू नये. परंतु त्याची अशी समजूत घालून द्यावी कीं, तुमचेच प्रजाजन तुमचेच नोकर आणि तुमचेच मांडलिक यांनी जो बखेडा व जो उपमर्द केला त्याचे निवारण आम्ही केलें व शिंदे वऱ्हाडचे भोसले किंवा होळकर अथवा बेइमानी अमृतराव पेशवा यांच्या मदतीने तुम्हांला कधींहि शांतता मिळाली नसती किंवा सन्मान मिळाला नसता तो आम्हीं मिळवून दिला. आमच्या पंखाखालीं आल्याने निजामाचा किती फायदा झाला हेहि बाजीरावास समजावून द्या. वसईच्या तहाचा एक मुख्य हेतु असा आहे कीं, फ्रेंच लोकांचा पाय कोणत्याहि मराठी दौलतींत फिरून रुजूं नये. म्हणून ताबडतोब सर्व दरबारांतून फ्रेंच हुसकले जातील या उद्योगास लागा. सरंजामी फौज तहाप्रमाणे ठेवून बाकीची परत करा व या फौजेकरितां तोडून दिलेले मुलुख लवकर ताब्यांत घ्या. कारभाराच्या बाबतींत विचारलेला सल्ला खुशाल सांगत जा. तथापि पेशव्यांच्या कामांत फारशी ढवळाढवळ करू नका. तरी पण कांहीं थोडी ढवळाढवळ केल्याशिवाय चालणार नाहीं. कारण जहागिरदारांकरतां पेशव्याशीं मध्यस्थी करण्याचें आपण कबूल केले आहे. बाजीराव विश्वासू नाहीं व केवळ त्याच्याकडून जहागीरदारांचे हितसंरक्षण व्हावयाचे नाहीं; म्हणून कारभारांत ढवळाढवळ करतांना न्यायाच्या तत्त्वास अनुसरून तुम्ही ते करतां हें पेशव्याच्या निदर्शनास आणा. सरंजामी फौज याहून जास्त पुण्यास ठेवतां आली तर बरें; पण ती वाढवितांना पेशवा किंवा इतर मराठे सरदार यांच्या मनांत अंदेशा उत्पन्न न होईल अशी खबरदारी ठेवावी. आम्ही पेशव्याशी बोलतांना जे हेतु सांगतों त्यांहून आमचे अन्य हेतु आहेत असें त्यास तर न वाटावे. दौलतराव शिंदे सर्व सैन्य घेऊन पुण्यावर येऊं पाहतो त्याला सामोपचाराने आम्ही निवृत्त करू पाहतों. भोसले होळकर यांचे साहाय्य मिळाल्याशिवाय युद्धास उभें राहण्याची शिंद्याची सहसा छाती होणार नाही. इंग्रजांच्या नांवाच्या दराऱ्यानेच मराठे दरबारांचा संघ होण्याचा थांबेल. पण असा संघ होण्याच्या बाजारगप्पा मात्र फार आहेत. कदाचित् आम्हांला भिवविण्याकरतांहि त्या उठविल्या जात असतील. तरी अशा बाजारगप्पांस प्रतिबंध करावा. आम्ही भ्यालो असे दाखविलें तर संघ एरवीं व्हायचा नसेल तर होईल; आणि मराठे ते धाडस करू पाहतील. आम्ही

शिंदे भोसले यांस परस्पर बजावीत आहो. शिंदे व होळकर यांचा बेबनाव राहि-ल्यास मग आम्हांस कांहींच काळजी नाही. तरी या दोघांचा मिलाफ होऊन होळकर हा पेशवे किंवा निजाम यांच्या विरुद्ध उठतो की काय हें पहावयाचे आहे. पेशव्याने देऊ केलेल्या मुलखाऐवजी अधिक सोयीचा असा मुलुख कोकणांत किंवा बुंदेलखंडांत मिळवितां येईल की नाहीं हें आम्ही पाहतों; दरम्यान देऊ केलेला मुलुख लवकर ताब्यांत घ्या व पेशव्यांनीं उशीर केल्यास त्याबद्दल नुकसानभरपाई देखील मागा."

यानतर तीनच दिवसांनीं व्हाइसरॉयसाहेबानें शिंद्याच्या दरबारचा रेसिडेंट कर्नल कॉलिन्स यास खलिता लिहिला, त्याचा आशय खालीं लिहिल्याप्रमाणेः—

"शिंद्याला नर्मदा उतरून उत्तरेकडे येण्यास तुम्ही सांगा व कसेंहि करून त्याचे मन वळवा. त्याला समजून सांगण्याच्या गोष्टी अशाः—शिंदा हा मराठी साम्राज्यांतला मांडलीक आहे. होळकरापासून पेशव्याचा बचाव त्याने पूर्वींच करावयास पाहिजे होता. पण आतां त्यास पुण्यास जाण्याचे कारण उरलेले नाहीं. वसईचा तह मान्य असल्याचे शिंद्याने तुम्हांस पूर्वीं सांगितले आहे; पण हल्लींचा त्याचा विचार वेगळा दिसतो. वसईच्या तहाचा हेतु कोणाचे स्वातंत्र्य हिरावून घेण्याचा नसून सर्वांचे न्याय्य हक्क राखण्याचा आहे; कोणाच्या कारभारात हात घालण्याचा नाही. पेशव्याचा हुकूम इतर दरबारांनीं मानावा एवढाच आमचा हेतु आहे, व मांड-लिक या नात्यानें शिंद्याचाहि हेतु तसाच असणार. शिंद्याला पुण्याच्या दरबारीं आपले वर्चस्व कमी झालें असे वाटेल; पण त्यास असे समजवावे की, हे वर्चस्व वास्तविक वसईच्या तहाने कमी न होतां होळकराच्या फौजेने पुण्यास त्याच्यावर जो विजय मिळविला व अखेर शिंद्याला इंग्रजांना मध्ये पडण्यास विनवावे लागले तेव्हांच नष्ट झाले. पेशव्यांस शिंद्याला विचारल्याशिवाय इंग्रजांशीं तह करतां येत नाही अशी शिंद्याची समजूत असेल तर ती खोडून काढा. सालबाईच्या तहांत महादजी शिंद्याची मध्यस्थी व जामिनकी इंग्रजांनीं मान्य केली होती; पण ती वंश-परपरागत मानणेची नाहीं. तो काळ गेला! तो माणूस गेला! आतां त्याचे काय? एवढेच नव्हे, तर मराठेशाहीचें मुख म्हणून पेशव्यांनी स्वतंत्र रीतीने केलेले तह त्यांच्या मांडलिकांवरहि बंधनकारक झाले पाहिजेत. मराठेशाहीची जुनी घटना आता राहिली नाहीं. महादजी व दौलतराव यांनीं शेजारच्या संस्थानिकांशीं स्वतंत्र रीतीने युद्ध व तह केले तरी त्यांनीं पेशव्याच्या गादीचा अधिकार नाम-जूर केला नव्हता. वऱ्हाडच्या भोसल्याविषयीं कदाचित् असे म्हणतां येणार नाहीं. कारण, भोसला हा शाहूराजाचा अधिकार आपणास मिळाला असे म्हणत असतो. पण शाहूराजाच्या प्रतिनिधित्वाची परंपरा पेशवे चालवीत असतां पेश-व्याचें स्वातंत्र्य कमी करण्याचा अधिकार भोसल्यास नाहीं. पेशवे हे भोसल्याचे वरिष्ठ मानले किंवा भोसले स्वतंत्र मानले तरी तुम्हीं अमुक तह असा कां केला

असे विचारण्याचा अधिकार भोसल्यास पोंचत नाहीं. तीच गोष्ट शिंद्याचीहि समजावी. तथापि पेशवे किंवा होळकर यांच्याशीं शिंद्याचे जर कांहीं गुंतागुतीचे हितसबंध असतील तर ते त्यानें आम्हांस सांगावे; म्हणजे आम्ही मध्यस्थी करण्यास तयार आहोत ! ”

याच दिवशी व्हाइसरॉय वेलस्लीसाहेब यानें खुद्द दौलतराव शिंद्यास एक पत्र लिहिले, त्यांत असे स्पष्ट कळविले की, “तुमच्याशीं स्नेहभाव राखण्याची आमची पूर्ण इच्छा आहे; पण झालेल्या व्यवस्थेत फेरबदल करू पहाल तर ते मात्र आम्हांस खपणार नाही व त्याचा आम्ही बराबर प्रतिकार करू. ”

शिंदे व भोसले यांनी उघड्या मैदानांत लढाया देऊन आपला पराभव करून घेतला ही गोष्ट होळकरास पसत पडली नाहीं.त्याच्या मते गनिमी काव्याची लढाई उभयतानी आरंभिली असती तर तिचा शेवट असा झाला नसता. पण त्याच्या शहाणपणाचा उपयोग मराठ्यांच्या कार्यास झाला नाही. कारण, शिंदे व भोसले लढत असतां होळकर स्वतः नामानिराळा राहिला, एवढेच नव्हे तर, त्याने स्वकीयाच्या मुलखांतच नासधूस चालविली होती. शिंद्याचा पराभव होऊन त्याचा आपला दर्जा सारखा व्हावा व तसे झाले म्हणजे आपले वर्चस्व वाढेल, अशी त्याला आशा होती;पण ती व्यर्थ गेली.शिंद्याचा पराभव होऊन त्याने इंग्रजांशी तह केल्यानंतर होळकराला इंग्रजांविरुद्ध उठण्याची स्फूर्ति झाली व झालेला तह मोडावा असा सल्ला तो शिंद्यास देऊ लागला. शिवाय रजपूत रोहिले शीख वगैरेची मदत मिळविण्याचा प्रयत्न तो एकसारखा करू लागला.पण शिंद्याचा फार थोडक्या वेळांत सर्वत्र पराभव केल्याने इंग्रजांना लढण्यास उत्तेजन आलें होते, व होळकराने युद्ध सुरू केल्यास ते त्यांच्या पथ्यावरच पडण्यासारखे होते.होळकराच्या मागण्याहि भारी होत्या. अखेर १८०४ मध्ये युद्धास सुरवात होऊन प्रथम होळकराने इंग्रजास पुष्कळ जेरीस आणिले, व त्यांच्या बऱ्याचशा तोफाहि काबीज केल्या; तरी शेवटी दीग येथे होळकराच्या फौजेचा पराभव झाला.दक्षिणेतील त्याच्या ताब्यांतले बहुतेक किल्ले इंग्रजांनीं हस्तगत करून घेतले.माळव्यांतील किल्ले व इंदूर शहर हीं सुद्धां त्याच्या हातून गेलीं. भरतपुरास वेढा घालून इंग्रजांनीं तो किल्ला घेतल्याने आतां होळकरास त्या प्रांती कांहीच आश्रय उरला नाही. तेव्हां तो पंजाबाकडे निघून गेला. इतक्या उशीरानंतर होळकराशी सहकारिता करावी असे शिंद्याच्या मनांत आले! कारण, गोहदच्या राण्याचे स्वातंत्र्य कबूल करण्यास इंग्रज त्याला भाग पाडीत होते, ते त्यास कबूल नव्हते; पण आतां तो तरी काय करितो? अखेर शिंदे व होळकर या उभयतांशीं मिळून इंग्रजांनीं तहाची वाटाघाट सुरू केली. कंपनीसरकारला या वेळी फार कर्ज झाले असून लॉर्ड वेलस्लीचें लष्करी धोरण विलायतेत नापसत ठरले होते. लॉर्ड कॉर्नवालीस याची पुन्हां गव्हर्नर जनरलच्या जागीं नेमणूक होतांच त्याने तहाचे काम

नेटास लावलें. अखेर १८०५ सालाच्या सुमारास शिंदे होळकर भोसले आणि गायकवाड या सर्वांशीं तह होऊन मराठामित्रसंघ कायमचा नष्ट झाला, आणि मोठें युद्ध थांबलें.

सालबाईच्या तहामुळें मराठ्यांच्या सत्तेच्या नाशाचा पहिला हप्ता इंग्रजांच्या हातीं पडला; व हल्लींच्या या तहांनीं दुसरा हप्ता त्यांच्या पदरांत पडला. इंग्रजांशीं युद्ध करण्याची खरी कुवत यापुढे कोणाच मराठ्या राजेरजवाड्यांत राहिली नाहीं. मात्र या स्थित्यंतराबद्दलचा राग कोणाच्याहि मनांतून गेला नव्हता; पण एकजुटीनें वागण्याचे धोरणच नव्हे, पण इच्छाहि नष्ट झाल्यावर इंग्रजांवर रागावण्यापेक्षां त्यांनीं स्वतःवरच रागावणे अधिक योग्य होतें! इंग्रजांचे भाग्य मात्र थोर होते यांत शंका नाहीं. विलायतेतील लोकांना भय वाटण्याइतक्या त्वरेनें नको इतका मुलुख त्यांच्या हिंदुस्थानांतील नोकरांनी आपल्या हिंमतीवर व जबाबदारीवर अवघ्या चारपांच वर्षांत मिळवून ठेविला! उलटपक्षी,शिंदे होळकर व भोसले यांच्या हातीं, खर्चवेंच जातां सालीना साठ लक्षहि उत्पन्न कदाचित् येणार नाहीं, इतका थोडा मुलुख राहिला! मुलुख कमी झाल्याबरोबर प्रत्येकास आपल्या पदरचे सैन्यहि कमी करावे लागले. एकट्या होळकरास २० हजार स्वार कमी करण्याचा प्रसंग आला. त्यांचा पगार देणे शिल्लक असल्यामुळे त्यांनी होळकराच्या दाराशी धरणें घेतले. बरें, पगार मिळाल्यावर तरी ते एकदम पोटाचा दुसरा उद्योग काय करणार? लष्करी नोकरीची सवय; शेतवाडी करणे विसरलेले; व कित्येकांना तर शेतीवाडीहि नाहीं! हत्यारें काढून घेण्याचा कायदा अद्यापि व्हावयाचा होता. शिंद्यानें मात्र आपल्या पदरचे लोक तितके कमी केले नाहींत; पण खडी फौज ठेवून तिचा तनखा चालविण्याइतका संस्थानचा वसूल येत नसल्यामुळें, कांही ना कांही कामगिरी काढून फौजेला तिजवर पाठवावयाचे व तिच्या लुटालुटीकडे दुर्लक्ष करावयाचें हा मार्ग अखेर शिंद्यास स्वीकारावा लागला. ज्या संस्थानिकांच्या रक्षणाची हमी इंग्रजांनी घेतलेली नव्हती त्यांच्याशी कलागती करणे व जुने दावे उगवून घेणें हे एक काम शिल्लक होते. पण ते तरी कितीसे पुरणार? अर्थात् बेकार झालेल्या शिपायांची गर्दी माजून पूर्वापार लष्कराबरोबर फिरणाऱ्या पोटभरू पेंढारांत आणखी भर पडली. पूर्वी निरनिराळ्या मराठे सरदारांच्या सैन्याचें नांव सांगणाऱ्या शिंदेशाही होळकरी वगैरे पेंढारास आतां दुसऱ्यांच्या नांवाचे पांघरूण मिळेनासें झाल्याने ते स्वतःचे नांव चालवूनच उदरनिर्वाह करू लागले! त्यांना कोणतेच बंधन न उरून जणु काय दाही दिशा मोकळ्या झाल्या! पण वर चंबळानदीपासून खाली कृष्णानदीपर्यंतच त्यांचा व्याप मुख्यतः होता. या पेंढाऱ्यांनी सुखवस्तु शांतताप्रिय लोकांना पुष्कळ त्रास दिलाच; पण त्यांचे पारिपत्य व त्यांचा बीमोड करण्यास इंग्रजांनाहि फार श्रम पडले! केव्हां पेंढाऱ्यांचें सैन्य वीसपंचवीस हजारांइतकें एकत्र जमे, तर केव्हां ते शेपन्नासांच्या

मेळ्यांनींहि लांबलांब स्वाऱ्या करीत ! पेंढाऱ्यांत मुसलमानाचा भरणा फार, व त्यांचे बहुतेक पुढारी मुसलमानच होते. मराठ्यांना वंशपरंपरेच्या जमिनी थोड्या-बहुत होत्या; शिवाय ते मुसलमनांइतके निसुग बनले नव्हते. प्रतिष्ठेची चाड त्यांना थोडीशी होती. पेंढाऱ्यांत दरहजारीं सुमारें ४०० घोडेस्वार असत व ६०।६५ लोकांजवळ बंदुका असत. बाकीच्यांजवळ फार तर भाला किंवा विळ्याकोयत्या-पासून हातीं येईल ते हत्यार असे ! असल्या लोकांनीं ब्रिटिश सत्तेस न जुमानता दहा वर्षेपर्यंत शेकडो मैलांच्या टापूत खुशाल राज्य केले ! पण ते राज्य अर्थात् पाठीवरील बिन्हाडापेक्षां फारसे मोठें नव्हतें. मराठेशाहींतील लष्करी पेषाच्या स्वच्छ निर्मळ नद्या कोरड्या पडल्या व पेंढारी पेषाचे हे दुर्गंधी नाले मात्र वाहात राहिले ! त्यांनीं कोणताच गुन्हा करण्याचे बाकी ठेविले नव्हते. पण पेंढाऱ्यांच्या चरित्राशीं आपणास या ठिकाणीं कांही कर्तव्य नाहीं.

ही सर्व धादल उत्तरहिंदुस्थानांत चालू असता बाजीरावास जी स्वस्थता लाभली व इंग्रजाच्या मदतीमुळे जे वजन लाभले त्याचा उपयोग त्याने आपल्या शत्रूंवर सूड घेण्यांत केला. लोक बाजीरावापेक्षां त्याच्या रक्षणार्थ खड्या असणाऱ्या इंग्रजांच्या सहा हजार फौजेस भीत. १८०४ च्या भयंकर दुष्काळाने महाराष्ट्रात हाहाःकार झाला असून मनुष्यकृत संकटांमध्यें सृष्टिदेवतेच्या रोषाची भर पडली. पुष्कळ मराठे पुणें सोडून उत्तरहिंदुस्थानांत शिंद्याच्या आश्रयाने वसाहती करण्यास गेले. शत्रुपक्षीय सरदारांच्या जहागिरी तर त्याने जप्त केल्याच; पण स्वतःशीं सरळ असणाऱ्या सरदारांच्या घराण्यांच्या कारभारांत व गृहकलहांत विनाकारण हात घालून एकास पळ व दुसऱ्यास पकड असे म्हणून तो कलहाचीं कारस्थानें बसल्या बसल्या रचू लागला. ही ढवळाढवळ करून पदरच्या लोकांस त्रास देण्याची बाजीरावाची सवय दृष्टोत्पत्तीस येतांच इंग्रजांनीं त्याला प्रतिबंध केला असता तर लोक अधिक सुखांत राहते, किंबहुना बाजीरावाचे राज्यहि अधिक दिवस टिकतें असे ग्रँट डफच म्हणतो. पण राजकारणांत 'फळ पिकल्याशिवाय तोडूं नये व गळू पिकल्याशिवाय फोडूं नये' या नीतीचा अवलंब इंग्रज प्रथमपासूनच करीत आलेले आहेत. इकडे सरदारांच्या जहागिरी जप्त करीत असतां बाजीरावाने ब्रिटिश रेसिडेंटाशीं असे मिठ्ठास धोरण ठेवले होते कीं विचारू नये! बाजीरावाचा मित्रयोग चांगला होता; पण त्याच्या मित्रमंडळांत नादान असामीच पुष्कळ होते; हरिदास हुजरे पाणके वगैरे सर्वांचा संग्रह त्यानें आपल्या मित्रमंडळांत केला होता. त्यांनीं खुषमस्करी करावी, लोकांना लुबाडावें, व फावल्या वेळीं सरकारदरबारच्या कामीं ढवळाढवळ करावी. त्याच्या कारकीर्दींत कर्नल क्लोज, हेनरी रसेल व अल्फिन्स्टन असे तीन रेसिडेंट झाले. या तिघांनाहि त्यानें आपल्या गोडबोलेपणाने वश करून घेतलें होते. रेसिडेन्सीचे जितके हेर पेशव्याच्या दरबारीं तितकेच बाजीरावाचे रेसिडेन्सींत असत ! अर्थात् प्रत्येकाचीं खलबतें दुसऱ्यास कळत.

पण पेशव्याच्या बातम्यांचा उपयोग करून घेण्याची जी अक्कल व जो निःस्वार्थीपणा रेसिडेंटांत होता तितका बेटावरील बातम्यांचा उपयोग करून घेण्यांत बाजीरावाच्या अंगीं नव्हता. इंग्रजांच्या मदतीनें त्याने जहागीरदारांवर वचक बसविला;पण राज्य राखण्याच्या कामीं उपयोगी असे जहागीरदार त्याने कायमचे दुखविले;एवढेच नव्हे तर,आपल्या पदरीं सरंजामदार असा एकहि ठेवावयाचा नाहीं, स्वतंत्र पगारी पायदळफौज नवी ठेवावयाची व तिच्यावर इंग्रज अधिकारी नेमावयाचे असा त्यानें बेत केला. इंग्रजांच्या हे आयते पथ्यावरच पडले. सरदारांच्या जहागिरी बुडविण्यास बाजीरावाला अडथळा करून इकडे इंग्रजांनी त्यांच्यावर तर उपकाराचे ओझे करून ठेवलेच; पण इकडे त्याचा व त्याच्या सरदारांचा संबंध कायमचा तोडून त्याला पुरता इंग्रजावलंबी करण्यात त्यांनीं आणखी एक मजल मारली. बाजीरावाच्या नव्या फौजेवर कॅप्टन जॉन फोर्ड साहेबाची नेमणूक करण्यात आली;आणि फौजेत लोक भरले तेहि परदेशी, मराठे नव्हत. हा इंग्रज सरदार व ही फौज यांनी नोकरीत शिरतांना बाजीरावाशीं इमानाची शपथ घेतली; पण तिला एक लहानसे पिल्लूं जोडले. ते असे कीं, 'आम्ही बाजीरावाशीं इमानानें राहूं पण बाजीराव स्वतः इंग्रजांशीं इमानाने वागेल तोवर !' अशा शपथेच्या इमानावर भिस्त ठेवून पदरीं पगारी सैन्य ठेवणाऱ्या शहाण्या राज्यकर्त्यांचे उदाहरण महाराष्ट्राबाहेर जगांत इतर कोठे आढळेल किंवा नाहीं याची शंकाच आहे ! या नव्या फौजेची छावणी पुण्याच्या वायव्येस चार मैलांवर करण्यांत आली.

बाजीरावाइतकी स्वस्थता पूर्वी दुसऱ्या कोणत्याहि पेशव्यास मिळाली नाहीं; पण या स्वस्थतेचा उपयोग राज्याची सुव्यवस्था करण्याकडे त्याच्या हातून मुळींच झाला नाहीं असें म्हणण्यास हरकत नाहीं. रिकामपणचे सर्व चाळे त्याला सुचूं लागले. स्वतः राज्यकारभाराकडे पहावयाचें नाही; व जे पहात असतील त्यांना स्वस्थ बसूं द्यावयाचे नाही. मक्त्याने मामलती द्याव्या, येईल त्या वसुलापैकीं पुष्कळसा खाजगीकडे ठेवावा; आणि दरबारी व खाजगी पैशाचा उपयोग जितका नैतिक अनाचाराकडे तितकाच धार्मिक अत्याचाराकडे करावा असा त्याचा क्रम असे. पदरच्या सरदारांच्या छळांत त्याची बुद्धि बरीच खर्ची पडत असे; व उरलेली बुद्धि त्याच्या बदसल्लागारांनीं आपल्या ताब्यांत घेतलेली असून दरबारच्या कामकाजांत ते खेळखंडोबे करीत. अखेर या खेळखंडोब्यांतूनच त्याचें राज्य गमावण्यास निमित्त निघालें !

अल्पिष्टनसाहेबानें बेटावर बसून पुण्याचे व महाराष्ट्राचे लोक बाजीरावावर मनापासून नाराज आहेत हें हेरून ठेवले होतें. पण त्यांच्या नाराजीकरितां बाजीरावास गादीवरून काढावें व प्रजेचें कल्याण करावें असें त्याच्या मनांत येणें शक्य नव्हतें, किंवा तसें त्याच्या मनांत आलें असतें तरी इंग्रजांचे

व बाजीरावाचे संबंध लक्षांत घेतां केवळ लोकांना अप्रिय या आरोपावरून इंग्रजांना त्यास पदच्युत करितां येणे शक्य नव्हते. बाजीरावास गादीवर बसविण्याप्रमाणे त्याला गादीवर टिकवून धरणे याहि गोष्टीला इंग्रज सरकार बांधले गेले होते. त्यांचा तह बाजीरावाशीं होता; बाजीरावाच्या प्रजेशी नव्हता. अशा मनुष्याच्या हातून इंग्रजांना पेशवाईचे राज्य खालसा करावयास मिळण्यास एकच मार्ग होता. तो हाच की, प्रजेशीं बेमानी करितां करितां बाजीरावाने चुकून ती इंग्रजांशीहि करावी. इंग्रजांनीं बाजीरावास स्वैर वर्तनाचा वर दिला होता; पण ते स्वैर वर्तन इतरांशी असेपर्यंत! त्याने आपला वरबलिष्ठ हात इंग्रजांच्या डोक्यावर ठेवण्याचा प्रयत्न करितांच त्यांनीं त्याला घेरला व पालथा घातला !

या कामी त्यांना बाजीरावाच्याच एका हस्तकाचे नकळत साहाय्य झाले. बाजीरावास पुष्कळ कुटिल मंत्री होते. पण त्या सर्वांत त्र्यंबकजी डेंगळा हा श्रेष्ठ होता. वास्तविक त्र्यंबकजी हा अत्यंत शूर धाडसी हजरजबाबी कल्पक व कर्ता असा पुरुष होता. इंग्रजांच्या वैराचा स्पर्श त्याला लागला नसता किंवा नाना फडणविसासारख्या मुत्सद्द्याच्या पदरी तो असता तर इतिहासांत त्याचे नांव झाले असते. पेशवाईच्या गादीची इतकी हलाखी झाली हे त्याला पाहवत नसे; या सर्वाला कारण इंग्रज असे त्याच्या मनाने घेतले होते. पूर्वी शिंदे-होळकरांनी मराठेशाही इंग्रजांच्या पाशातून काढून स्वतंत्र करण्याची जी महत्त्वाकांक्षा धरली होती तीच त्र्यंबकजीच्या मनांत होती. त्याला स्वतःचे राज्य नसल्याने मोठे नांव नव्हते; तथापि त्याच्या मनाचा व्याप शिंदेहोळकरांइतका मोठा होता. पण इंग्रजांच्या पाशांत इतके गुरफटून गेल्यानंतर, त्यातूनहि पेशवाईचा धनी जातीने इतका भित्रा व नादान असतां, आणि पदरच्या सर्व सरदारांचीं मने नाखुष असतां, इंग्रजांना महाराष्ट्रांतून घालवून देणे खरोखर कितपत शक्य आहे याचा विचार त्याने केला नाहीं. प्रयत्न केल्यास शिंदे होळकर भोसले फिरून सामील होतील, अशी आशा त्याला वाटत होती. पण त्याची मिजास जरी पातशहाची होती तरी नांदणूक कैकाड्याची होती ! आधीं कुळ थोर नाहीं, त्यांतून स्वभाव तापट कडक; न्यायान्यायाची क्षिती नाही; काय करावे काय न करावे याचा विवेक नाही; दरबारी हलकटपणाचे पुट अंगावर पुरे चढलेले, यामुळें ब्राह्मण किंवा मराठे सरदार लोकांत मान नाहीं; असा प्रकार त्र्यंबकजीचा असल्यामुळे त्याच्या महत्त्वाकांक्षेस ऐश्वर्य मुळींच नव्हते. खुषमस्कऱ्या किंवा अंतरगांतला सल्लागार म्हणजे नर्मसचिव या नात्याने बाजीरावाच्या मनावर मात्र त्यानें चांगलाच पगडा बसविला होता. तथापि त्र्यंबकजीच्याहि धाडसाला 'डाक' घालील असा बाजीरावाचा नादानपणा असल्यामुळे त्या दोघांच्या जोडीपासून परस्परांचा नाश तर झालाच, पण शिवाजीमहाराजांनीं स्थापन केलेल्या मराठेशाहीचाहि झाला !

त्र्यबकजीच्या कारणानें इंग्रजांची व बाजीरावाची धुसपुस बरेच दिवस चालू होती. त्र्यबकजी आपला पक्का द्वेष करितो हे इंग्रज रेसिडेंटास पूर्णपणें अवगत होतें. तथापि उघडपणे तसा दोषारोप करण्याची त्याची छाती नव्हती. नुसत्या द्वेषाचा पुरावा तरी काय मिळणार? याकरितां इंग्रज त्र्यबकजीच्या नाशाची संधि मिळण्याची वाट पहात स्वस्थ बसले होते, व ती संधि गायकवाडी प्रकरणामुळे त्यांना अभावितपणे आली.

गायकवाड व पेशवे यांच्यामध्यें गुजराथच्या खंडणीसंबधाने बरेच दिवस तंटा चालू होता. पेशव्यांनी गायकवाडावर पुष्कळ बाकी काढली होती; उलट पेशव्यांकडून आपल्या कांही रकमा येणे आहेत असे गायकवाडाचे म्हणणे होते. पेशव्यांनीं निकड लाविल्यामुळे इंग्रजाच्या विद्यमाने गंगाधरशास्त्री पटवर्धन नांवाचा एक प्रमुख मुत्सद्दी पुण्यास १८१४ त आला. शास्त्री हा बडोद्यास दिवाण झाला असला तरी कारकुनी फडांत वाढलेला. तेव्हां असला मनुष्य वकील म्हणून बरोबरीच्या नात्याने बोलणे करण्यास आलेला बाजीरावास खपले नाही. खुद्द एल्फिन्स्टन साहेबाने या शास्त्र्याचें वर्णन एके ठिकाणीं मोठें गमतीचे दिले आहे ते असेः " गंगाधरशास्त्री हा मोठा धूर्त व बुद्धिवान् आहे. त्याने बडोदें संस्थानची व्यवस्था उत्तम ठेविली आहे. येथे पुण्यास तो पुष्कळ खर्च करून मोठ्या मिजाशींत रहातो व आपली स्वारी अशा झोकांत काढतो कीं, सर्व शहर त्याच्याकडे पहात रहाते! तो जुन्या पद्धतीचा विद्वान् शास्त्री असला तरी थेट इंग्रज असल्याप्रमाणे राहण्याची ऐट करितो. तुरतुर चालतो, तडतड बोलतो, वाटेल त्याला उलट उत्तर देतो. पेशवा व त्याचे कारभारी यांना 'मूर्ख' म्हणतो, 'डॅम रॅस्कल' हा शब्द त्याच्या तोंडी फार आहे, बोलतांना मधूनमधून इंग्रजी शब्द खूप घुसडून देतो!" असला मनुष्य गायकवाडाच्या वतीने भांडण्याला इंग्रजांच्या वशिल्याने आल्यास बाजीरावाच्या दरबारी अप्रिय व्हावा हे साहजिकच आहे. गंगाधरशास्त्र्याचा मुक्काम पुण्यास एक वर्ष पडला होता; परंतु स्वभाव भानगडीखोर व बाजीराव किचकट—कोणतीहि गोष्ट निकालात न काढणारा—यामुळे हिशेब देतां घेतां व बोलणेचालणे होतां होतां एक वर्ष लोटले. पुढे १८१५ सालीं बाजीराव पंढरपुरास गेला. त्याच्याबरोबर गंगाधरशास्त्रीहि गेला. तेथे ता० १४ जुलै रोजीं रात्रीं विठोबाच्या देवळाच्या महाद्वाराच्या रस्त्यावर त्याचा खून झाला! आपल्या मध्यस्थीने आलेल्या वकिलाचा खून झाला या गोष्टीचा इंग्रजांस सहजच मोठा राग आला; व त्र्यबकजीवर वहीम घेऊन, त्यास आपल्या स्वाधीन करा असा रेसिडेंट अल्फिंस्टन याने बाजीरावाच्या मागे एकसारखा तगादा लाविला.

कोणत्याहि राज्यांत झालें तरी सर्वच खून सांपडतात व गुन्हेगारांस शिक्षा झाल्याशिवाय रहात नाहींत असें नाहीं. हल्लीं खुद्द कलकत्त्यांत अशी स्थिति

आहे, आणि थोडे दिवसापूर्वी या राजधानीच्या शहरीं भर दिवसा नाकेबंदी करून घस्त घालावी लागल्याचें वर्तमानपत्रांच्या वाचकांस माहीतच आहे. गगाधर-शास्त्र्याच्या खुनाची गोष्ट कदाचित् तशांतलीच असूं शकेल. तथापि, शास्त्री हा दरबारी वकील असल्यामुळे त्याच्या खुनास राजकीय महत्त्व आले होतें. शिवाय खुनाचे वेळीं बाजीराव पढरपुरांतच होता; व बाजीरावाचा हस्तक त्र्यबकजी हाहि पंढरपुरांतच होता; इतकेच नव्हे तर, खुनापूर्वी त्याच्याचकडून आग्रहाचीं बोलावणीं गेल्यामुळे शास्त्री विठोबाच्या देवळांत गेला होता. त्र्यंबकजी इग्रजांचा द्वेष करी, व शास्त्री हा इंग्रजाच्या वशिल्याचा चढेल डोईजड मुत्सद्दी; अर्थात् या खुनाचा वहीम त्र्यबकजीवर व त्याच्या द्वारे खुद्द बाजीरावावर जावा हे स्वाभाविक आहे. पण इग्रजांनी वरपांगीं बोलण्यांत तरी बाजीरावापर्यंत खुनाची जबाबदारी न भिडवितां त्र्यबकजीवर वहीम घेऊनच ते स्तब्ध बसले, व बाजीराव त्र्यंबकजीस तावडतोब इग्रजांच्या स्वाधीन करता तर निदान बाजी-रावापुरते तरी त्याचें मन या बाबतींत निर्मळ झाले असते.

असो; पण या खुनाच्या प्रकरणास दुसरीहि एक बाजू आहे. शास्त्री हा पेशवे व गायकवाड यांच्या वादांत गायकवाडांतर्फे इंग्रजांच्या उत्तेजनामुळें पुण्यास आला होता. तरी पण त्याला स्वतःला शत्रु नव्हते असे नाहीं. शास्त्री हा गर्विष्ट व महत्त्वाकांक्षी होता. गायकवाडांचा पक्ष खरा ठरविण्यानें त्याचें समाधान होणारे नव्हते, तर पुण्यास पेशव्यांच्या दरबारीं कारभारी व्हावे अशी इच्छा त्याला उत्पन्न झाली होती. याविषयीं बखरकार लिहितो, "पुढें बडोद्याहून गगाधरशास्त्री येथे आला त्यामुळे कलहास आरंभ झाला. दोचहूं महिन्यानीं येथील प्रभूचे कारभारी सदाशिव माणकेश्वर व जळचराकडील मोधीशेट या उभयतांला काढून आपण कारभार करावा असें शास्त्री याचे मनांत आले. तेव्हां मोधी यांणीं प्राण दिला. प्रभू यासी बहुत अवघड पडलें." ( राजवाडे खंड ४ ). दुसरें असें कीं, शास्त्री हा आपलें स्वतःचेंहि एक भांडण घेऊन पुण्यास आला होता. आणि बडोदे येथील प्रतिपक्षी यांनीं पढरपुरास त्याचा खून करण्याची संधि साधली असे मानण्यास खुद्द बडोदे येथील पटवर्धनी दप्तरांतील कागदोपत्रीं बराचसा पुरावा मिळत असल्याचे सांगतात. कांहीं वर्षांमागे केसरीचे एका अंकांत यासंबधाने एक पत्रव्यवहार देखील प्रसिद्ध झाला आहे; व त्या वेळींहि आम्हींच केसरीचे संपादक असल्यामुळे ते पत्र शास्त्रीपटवर्धनांचें दप्तर चाळ-लेल्या एका पदवीधराकडून आलेलें होते असे आम्हांस खात्रीलायक सांगतां येते. अल्पिष्टनसाहेबाच्या पत्रावरूनाहि असे दिसते कीं, या खुनापूर्वी त्र्यंबकजी व शास्त्री यांची चांगलीच मैत्री जमली होती. किंबहुना शास्त्र्यास खाजगी रीतीनें वश करून घेऊन, व त्यास पेशवाईचा कारभार देण्याचें आमिषहि दाखवून, हिशे-बाच्या रुजवातींत शास्त्र्यानें गायकवाडाशीं बेमानी करून पेशव्यांचा फायदा

करून द्यावा अशा खटपटी सुरू होत्या. बाजीरावसाहेबांची मेहुणी शास्त्र्यास द्यावी व हे लग्न लवकरच नाशकास व्हावे असेहि ठरलें होतें. शास्त्र्याची ही एकंदर वर्तणूक स्वतः अल्पिष्टनास आवडली नाही; व गायकवाडांचा वकील म्हणून येऊन पुढे पेशव्यांचा कारभारी होणे हें सर्वस्वीं अप्रशस्त आहे असे साहेबाला शास्त्र्यास निक्षून सांगावे लागले. शेवटीं शास्त्र्याने लग्न करण्याचे नाकारले. याहून त्र्यबकजी व शास्त्री यांच्या दरम्यान वैर उत्पन्न होण्यास दुसरे कांहींच समर्पक कारण दाखविण्यांत आलेले नाही. उलट गोविंदराव बडोजी वगैरे शास्त्र्याचे शत्रु पुण्यांत आले, पुण्याहून पढरपुरास गेले आणि शास्त्र्याला मारण्याच्या कटाची आवाई असल्यामुळे शास्त्र्याच्या सरक्षणार्थ पेशव्यांनी पहारे वगैरे अधिक दिले होते ही गोष्ट महशूर होती. अल्पिष्टनसाहेबाच्या मते खुनाच्या कटाची ही बातमी त्र्यबकजीने मुद्दाम उठविली असून पेशव्यांचा तिच्यावर विश्वास नसताहि ते ती उगीच वरपांगी खरी मानल्याचें दाखवीत. पण याला फारसा पुरावा नाही.

शास्त्र्याचा पक्षपाती व पाठीराखा बापू मैराळ याने खुनानतर ताबडतोब अल्पिष्टनसाहेबाकडे जी हकीकत लिहून पाठविली तींत पुढील मजकूर आहेः " खुनाचे दुसरे दिवशी शास्त्री याचे कारकून त्र्यबकजीकडे जाऊन म्हणाले, " आपण शास्त्री याचे स्नेही व पेशव्यांचे कारभारी, तेव्हां आपण खुनाचा शोध लावण्याची खटपट करावी." तेव्हां त्र्यबकजी म्हणाला, " मी ते करतोच आहे. पण वहीम कोणाचा म्हणून घ्यावा ? सुगावा लागत नाही." कारकून म्हणाले, " शास्त्री यांचे शत्रु कोण आहेत हे आपणास माहीतच आहे. ते कर्नाटकचे लोक होते असे वाटते." त्र्यबकजी म्हणाला " होणार टळत नसते. तो परभू सीताराम एक आहे; गायकवाडापैकी कान्होजी गायकवाड तुम्हीं कर्नाटकांत ठेवला आहे. पण अमक्याचा म्हणून वहीम कसा घ्यावा ? तथापि मी शक्य ती खटपट करितो." बापू मैराळ याची ही हकीकत खाजगी रीतीने रेसिडेन्सीने अल्पिष्टनसाहेबाकडे मुद्दाम लिहून पाठविलेली आहे; तथापि तींत लिहिणाराने त्र्यबकजीने हा खून करविला असे कोठेहि ध्वनित केलेले नाही. बडोद्याकडील बडोजी व भगवतराव या नांवाच्या इसमांवर शास्त्रीपक्षाचा वहीम असून हीं माणसें कैद केलीं गेलीं नाहींत; शिवाय साहेबाच्या मते खुद्द पंढरपुरास या खुनाची चौकशी व्हावी तशी झाली नाही म्हणून त्र्यबकजीचेंच अग या खुनांत असावे असें त्याच्या मनाने घेतले; व पुढील सर्व कारवाईची उभारणी या पायावर झाली. बखरकार लिहितो, "जळचर याणें प्रभूवर निमित्य घेतले कीं, शास्त्री यासी दगा आपलेकडील माणसांनीं केला. त्यास आमचे स्वाधीन तीं माणसें करावीं. तेव्हां बहुत सकटेंकरून त्र्यंबकजी डेगळा यास स्वाधीन केले." गंगाधरशास्त्री याचे खुनासंबंधाची जी दुसरी बाजू म्हणून वर दर्शविली ती खरी आहे असे मानल्यास त्र्यंबकजीला इंग्रजांच-

स्वाधीन करण्यास बाजीरावास संकट कां वाटावें याची कल्पना करितां येते. त्र्यंबकजी इंग्रजांचा द्वेष करी हे अल्पिष्टनसाहेबास मनांतून जाचत होते. पण केवळ या सबबीवर त्र्यंबकजीला आपल्या स्वाधीन करा असे बाजीराव यास त्याला म्हणतां आले नसते, व बाजीरावानेहि त्यास स्वाधीन करण्याचे सरळ नाकारलें असतें. पण खुनाचा आरोप हा केव्हाहि राजकीय प्रतिपक्षावर आग पाखडण्यास एक उत्तम साधन असते, आणि कर्मधर्मसंयोगाने आयता खून झाला म्हणजे प्रतिपक्षाविरुद्ध त्याचा फायदा करून घेण्यास शहाणे मुत्सद्दी कधींहि सोडीत नाहींत हा सर्व देशांतील व सर्व काळांतील प्रसिद्ध अनुभव आहे. त्याचप्रमाणे याहि बाबतींत घडले असावे असे वाटते. कारण, शास्त्री याच्या जवळच्या माणसांनी त्र्यबकजीवर वहीम घेतल्याचा पुरावा मिळत नाही. हा वहीम अल्पिष्टनसाहेबाचा; आणि त्यास अनुसरूनच इंग्रजांनीं बाजीरावास कात्रीत धरले.

पुण्याच्या लोकांच्या मताप्रमाणेहि बाजीरावाचा भरवसा त्र्यंबकजीवर फार होता. त्याला बाजीरावाने इंग्रजांच्या स्वाधीन मोठ्या कष्टाने केला; व पुढे जेव्हां इंग्रजांच्या कैदेतून पळून जाण्याचे अचाट कृत्य त्याने केले तेव्हां तर, हा पराक्रमी पुरुष आपली इंग्रजांच्या हातून खास सुटका करील असे बाजीरावास वाटू लागून त्याने त्र्यबकजीस गुप्त मदत करण्यास व पुरदर सिंहगड रायगड वगैरे किल्ल्यांवर लढाऊ सामान भरून ठेवण्यास सुरुवात केली ! अर्थात् ही तयारी पाहून इंग्रजांना आधींच असलेला संशय दुणावला. त्र्यबकजी श्रीमताना फुलगांवी गुप्तपणे भेटतो, व पुण्याच्या आसपास पेंढार म्हणून ज्या स्वाराच्या टोळ्या फिरतात त्या वास्तविक त्र्यबकजीच्या पदरच्या स्वारांच्या टोळ्या आहेत असे इंग्रज लोकात बोलू लागले. " पेंढाऱ्याविषयी श्रीमतांची नाखुषी नाही " असा इंग्रजांचा आरोप व लोकांचाहि विश्वास होता. बाजीरावाचा आश्रय असल्यामुळें त्र्यबकजी आला गेला तरी लोकहि वर्दी देत नाहीत, त्याच्या हालचाली छपवितात, अर्थात् बाजीरावावर शस्त्र उगारल्याखेरीज त्र्यंबकजी हाती लागणे शक्य नाहीं असें इंग्रजांस वाटले. सन १८१७ च्या मे महिन्याचे सुमारास अल्पिष्टनाने जनरल स्मिथसाहेबास पुण्यास आणविले व बाजीरावास चिटी पाठविली की, " एक महिन्याच्या आंत त्र्यबकजी स्वाधीन करा, व त्याच्या जामिनकीकरितां रायगड सिंहगड व पुरंदर हे किल्ले आमच्या स्वाधीन ताबडतोब करा; नाही तर फौजेची तबी होईल." बाजीराव अगोदर बुचकळ्यांत पडला होताच, त्यांत पदरच्या माणसांनीं त्याला अधिकच बुचकळ्यांत पाडलें. टोलवाटोलवी कालहरण या शस्त्रांवर बाजीरावाची मुख्य भिस्त होती; व त्याच्या पदरचे कारकून प्रभाकरपंत जोशी व बापू कवडीकर यांनीं अल्पिष्टनसाहेबाकडे जाऊन येऊन "साहेबानें दोन दिवसांची मुदत विचाराकरितां दिली आहे " असे बाजीरावास गैरसमजाने किंवा लबाडीनें म्हणा सांगितलें खरें. इकडे अल्पिष्टनानें ता ७ मेच्या

पहाटेपर्यंत बाजीरावाच्या उत्तराची वाट पाहिली व ता. ८ रोजीं उजाडतां पुणे शहराबाहेर दोन मैलांवर चौफेर सैन्याचा वेढा देऊन नाकेबदी केली. तेव्हां बाजीरावास कांहीं तरी निकाल करणे भाग पडले, व त्र्यंबकजीला धरून देण्याबद्दल जाहीरनामे काढून तीनहि किल्ले स्वाधीन केल्याच्या चिठ्या त्याने इंग्रजांकडे पाठविल्या. तेव्हां स्मिथसाहेबाने वेढा उठविला आणि अल्पिष्टन संगमावर आपल्या ठिकाणीं परत गेला.

हे सर्व झाले तरी मनांतून बाजीरावास समाधान नव्हतें. पुण्यांतून बाहेर पडावें असे त्याला वाटे व वाड्याजवळ फौजा नेहमीं तयार ठेवलेल्या असत. बदसल्लागार सांगत कीं, शिंदे होळकर भोसले अमीरखान वगैरेंच्या साहाय्याने सरकारी फौज इंग्रजास हुसकून लावूं शकेल, व हे भोळ्या बाजीरावास खरे वाटे. पण पर्जन्यकाळ जवळ आल्यामुळे परमुलखातल्या फौजा येऊन मिळणार कशा ? याकरिता तूर्त बाहेरून तह करावा व आंतून फौज जमविण्याचे प्रयत्न चालू ठेवावे, असा बाजीरावानें विचार केला. मोर दीक्षिताच्या विद्यमाने तह ठरला. त्यात पूर्वी वसई व नंतर पुणें येथे झालेला तह कायम करण्यांत येऊन शिवाय असेंहि ठरले की, सरदार व दौलतराव यांजकडील अकबरनवीस वकील कारकून वगैरे कोणीहि बाजीरावाने आपले दरबारीं ठेवू नये, सवालजबाब करणे तो इंग्रजी वकिलाचे मार्फतीने करावा, इंग्रजाशीं स्नेहानें वागणाऱ्या करवीरकर सावतवाडीकर वगैरेंवर बाजीरावानें कांहीं दावा सांगू नये, शिंदे होळकर वगैरे सरदारांचा जो मुलुख नर्मदा व तुंगभद्रा या नद्यांच्या दरम्यान असेल त्यावर बाजीरावाने हक्क सांगू नये, बाजीरावाने इंग्रजांचे पांच हजार स्वार तीन हजार पायदळ तोफखाना व सामान याचा खर्च चालवून तें नेहमीं आपलेपाशीं ठेवावे, आणि खर्चाकरितां तोडून दिलेल्या ३४ लक्षांच्या मुलुखावर व त्यांतील किल्ल्यांवर पेशवेसरकारचा कांहीं हक्क चालूं नये, अहमदनगरच्या किल्ल्याच्या रेवणीच्या बाहेरची चौफेर चार हजार हात जमीन पेशव्यानीं इंग्रजांस कायमची द्यावी, इंग्रजी लष्कराच्या छावणीलगतचीं कुरणें कहीकरितां लावून द्यावीं, तैनाती फौजेशिवाय इंग्रजानीं वाटेल तितकी फौज पेशव्याच्या राज्यांत आपल्या खर्चाने ठेवावी, त्यास हरकत होऊं नये. उत्तरहिंदुस्थानांत असलेल्या मुलुखांतील पेशव्यांचा 'दावा व हुकमत' त्यांनीं इंग्रजांच्या स्वाधीन करावी. तसेंच तहाच्या भरंवशाकरिता त्र्यंबकजी डेंगळ्याचीं मुलेंमाणसें इंग्रजांच्या स्वाधीन करावीं.

वरील तहानें बाजीरावाचे हातपाय पुरे बांधले गेले. तथापि ते सोडून घेण्याची त्याची इच्छा नष्ट झाली नव्हती. बाजीराव कोणाच्या जोरावर इंग्रजांशीं लढणार होता कोणास ठाऊक! पण लढण्याचा त्याचा इरादा होता यांत शंका नाहीं. वरील तह ठरल्यावर पुरंदर सिंहगड रायगड हे किल्ले बाजीरावास परत मिळाले. तेव्हां त्यानें आपलें जवाहीर पैकाअडका व चीजवस्त सिंहगडावर आणि आपली

थोरली स्त्री व घरचे देव वगैरे रायगडावर पाठविले, आणि स्वतः स्वारी प्रथम पंढरपुरास व नंतर अधिक श्रावणमासाचे निमित्ताने माहुलीस जाऊन राहिली. तेथूनच पुढील युद्धाची मसलत व जमवाजमव सुरू झाली.

इकडे पेंढाऱ्यांची धामधूम सुरूच होती; तिचा बंदोबस्त करण्याकरितां म्हणून जनरल मालकम हैदराबादेहून पुण्यास १८१७च्या आगष्ट महिन्यांत आला. पेशवे पुण्यास येत नाहीत असे पाहून तो स्वतः जाबसाल करण्याकरितां माहुलीस गेला; व पेंढाऱ्यांचे बंदोबस्तास इंग्रजी फौज जात आहे तिच्या मदतीस तुमचीहि फौज द्या, अशी त्याने मागणी केली. बाजीरावास फौज जमवावयाची होती. तिला हे आयतेच एक कारण मिळाले व त्याचा फायदा घेऊन तो उघडपणे फौज ठेवू लागला. या नव्या राजकारणांत सातारकर महाराज सामील व्हावे अशी बाजीरावाची इच्छा होती. कारण, त्यांचे नांव सामील असल्याने सर्व सरदार लोकांची जशी मदत होईल तशी नुसत्या बाजीरावाच्या नांवाने युद्ध सुरू झाल्यास होणे शक्य नव्हते. साताऱ्च्या दरबारी याविषयीं दुमत होते. तथापि अखेर बाजीरावाची मसलत सिद्धीस जाऊन महाराजांचे कबिले वांसोटा किल्ल्यावर रहावे व महाराजांनीं बाजीरावाच्या समागमे रहावे असा बेत ठरला. भाद्रपदमासी पेशवे पुण्यास परत आले, व त्यांनी आपले दोन हजार स्वार विंचुरकरांबरोबर स्मिथसाहेबाच्या मदतीस देऊन उत्तरहिंदुस्थानाकडे रवाना केले. जवळचे इतके स्वार दूर जाणार खरे, पण त्याबरोबर इंग्रजी सैन्यहि दूर जाणार होते, शिवाय तह पाळण्यास बाजीराव मनापासून तयार होता असेंहि दिसून येणार होते. बाहेरून मोर दीक्षित व फोर्डसाहेब याच्या मार्फत इंग्रजांशी सफाईची बोलणी चालत; पण आंतून बापू गोखल्याच्या विद्यमाने बिघाड करण्याची तयारी सुरू होती. सर्व सरदारांस 'समतांत घेण्याची' खटपट सुरू झाली. एक कोट रुपये खर्चून लष्करी सरजाम सिद्ध करण्याचे ठरले. धुळपांच्या विद्यमाने आरमाराच्या डागडुजीच्या कामास सुरुवात झाली. किल्ल्यावर गल्ल्याची व शिबंदीची भरती होऊ लागली. पेशवाईतील कित्येक मुत्सद्द्यांना इंग्रजांशीं या वेळी बिघाड करणें पसत नव्हतें. स्वपक्षाचे बलाबल त्यांना बाजीरावापेक्षां अधिक समजत असावे. कसेहि असो; या वेळी बाजीरावाला बुद्धि फारशी चांगली आठवलेली नाहीं असे त्यांना मनोदेवता सांगू लागली. बाजीरावाचे खासगी अनाचार जोराने सुरू होते. "माहुलीच्या वाड्यात एका आवडत्या स्त्रीस पुरुषाचा पोषाख व जवाहीर घालून गादीवर बसवून स्वतः खिजमतगार होऊन तिच्यावर चवरी वारण्याचा आंवटशोकी खेळ श्रीमंत खेळले," अशी वदंता पुण्यांत आली होती! तेव्हां "श्रीमंतांचे दुर्दैव उभें राहिले यामुळें जे आचार कोणी केले नसतील तसे करू लागले" असे लोक सहजच बोलू लागले. इंग्रजांशी निर्वाणीचा सामना करून राज्य गमविण्याचा प्रसंग, अशा वेळीं केवळ एका बापू गोखल्याचे हिंमतीवर भिस्त टाकून श्रीमंत

बसले ! पण असल्या महत्प्रसंगाला अवश्य असणारा उद्योग आवेश आणि गांभीर्य हीं त्यांच्या अंगीं नव्हती हें लोकांस उघड दिसत होतें.

इंग्रजांशीं बिघाड करण्याच्या कामीं शिंदे आपणास मदत करतील असे पेशव्यास वाटत होतें; पण तो भ्रम होता. शिंदे एक तर तहानें पूर्वींच बांधले गेले होते व बिघाड झाल्यास पहिलाच तडाका त्यांच्यावर बसण्याचा संभव होता. शिवाय पधरा वर्षांपूर्वीं शिंदे पुण्यास घालमेल करून जे पुण्याहून उत्तरहिंदुस्थानांत निघून गेले तेव्हांपासून ते पेशव्याशीं तुटूनच वागत होते. बाजीरावाचें व शिंद्याचें प्रेम राहण्याला कांहींच कारण नव्हतें; व सर्व मराठ्यांनी मिळून इंग्रजांस जेर करण्याची कल्पना १८१२ साली जी जिरली ती कायमचीच जिरली. बाजीराव उचल करणार असे पाहून पेंढाऱ्यांच्या पारिपत्याच्या निमित्ताने इंग्रजांनीं शिंद्याशीं तारीख ५ नोवेंबर सन १८१७ रोजीं एक नवीन बारा कलमी तह करून घेतला. होळकर व भोसले यांच्याकडे वळणें बांधण्यांत आली; पण त्यांचा तादृश उपयोग झाला नाही. इंग्रजांच्या फौजेत फितुरी करण्याचाहि प्रयत्न झाला असावा असें दिसतें. एक बखरकार लिहितो ' विनायक श्रौती वामनभट कर्वे व शंकराचार्य स्वामी (?) असे इंग्रजी पलटणांत फितूर करावयाची मसलत श्रीमंतांस देऊन त्याजपासून ऐवज घेऊन फितूर करावयास गेले.' पण या वेळीं फितुरीच्या सबबीवर बाजीरावापासून किती लोकानी किती पैसे उपटले असतील कोणास ठाऊक ! सोंडूरकर यशवंतराव घोरपडे यानें या मसलतीकरिता पन्नास हजार रुपये घेतले व मसलत गुप्त ठेवण्याची शपथ घेतली; पण आंतून तो सर्व बातमी अल्फिष्टनसाहेबास देत असे, असें ग्रँट डफनें लिहून ठेवलें आहे. आपल्या हेतूच्या सिद्ध्यर्थ अल्फिष्टनसाहेबास मेजवानीस बोलावून त्याचा खून करावा किंवा त्र्यंबकजीच्या पदरच्या रामोशांकडून परस्पर एखाद्या रात्रीं बेटावर हें कृत्य करवावें असा बाजीरावाचा बेत होता, पण बापू गोखले यानें या असुरी कृत्यास विरोध केला म्हणून तें घडून आलें नाहीं, असाहि एक प्रवाद आहे. बाजीरावाचा इंग्रजांच्या फौजेंत फितूर करण्याचा प्रयत्न होता; पण इकडे त्याच्या स्वतःच्या पदरच्या लोकांत किती फितूर पसरला होता याची मात्र त्याला कल्पना नव्हती ! पेशव्याच्या वाड्यांतली गुप्त म्हणून केलेली मसलत खडान्खडा बेटावर नित्य जात असे. ज्यानी बोलूनचालून उघडपणे इंग्रजाची नोकरी पतकरली होती असे बाळाजीपंत नातूसारखे लोक तर बाजीरावाला विरुद्ध होतेच; पण बाजीरावावर नाखुष असणारे किंवा लाचामुळें वश झालेले इतर कित्येक लोक, पेशव्याची नोकरी करून त्याचा पगार खात असतां, आंतून इंग्रजांस सामील होते. लोक आपल्यावर नाराज आहेत हें बाजीरावास माहीत असल्यामुळें पूर्वीं जप्त केलेल्या कित्येक जहागिरी त्यानें या वेळीं सोडल्या; व सर्व अखत्यारी बापू गोखले यास लेखी देऊन आपल्यावर बेभरंवसा करणाऱ्या

सरदार लोकांना इमानाचे अप्रत्यक्ष आश्वासन दिले. परतु पटवर्धनादि वजनदार सरदारांचा रोष त्याला केव्हांहि काढून टाकता आला नाहीं. उलट बाजीरावाने जप्त केलेल्या जहागिरी ज्यांच्या त्यास परत देण्याचा वेळोवेळीं आग्रह धरून अल्पिष्टनसाहेबाने मात्र पटवर्धनादि बरेच सरदार यापूर्वीच आपले स्नेहांकित व ऋणी करून ठेवले होते.

बाजीराव व अल्पिष्टनसाहेब यांच्या भेटी वारवार होत असत, व हे दोघेहि गोड बोलणारे असल्यामुळे उभयपक्षी सफाईची व भरवशाचीं बोलणीं कशी होत असतील याची कोणासहि कल्पना करिता येते. उभयतांची शेवटची मुलाखत तारीख १४ आक्टोबर १८१७ रोजीं झाली व तीत बाजीरावाने दसरा होतांच पेढाऱ्यांवरील मोहिमेत इग्रजी सैन्यास मदत करण्याकरितां आपले सैन्य पाठवितो असे कबूल केले.दसऱ्याचे दिवशी बाजीराव व अल्पिष्टनसाहेब नेहमीच्या शिरस्त्याप्रमाणे शिलगणास जाऊन फौजेची सलामी घेण्यास एकत्र उभे राहिले! पण नारोपत आपटे याच्या स्वारांनी थोडीशी गुर्मी दाखविली व अखेर उभयता खाशांची व्हावी तशी रीतसर सलामी न होतां बाजीराव परस्पर निघून शहरांत आला म्हणतात. येथून बिघाड होण्यास सर्रास सुरुवात झाली. तारीख २५ आक्टोबरापासून बाहेरून चोहोकडून स्वार शिपाई पुण्यात गोळा होऊ लागले. इग्रजी छावणीच्या आसपास पेशव्यांच्या फौजेच्या तुकड्या तळ देऊन राहू लागल्या. तेव्हां बेटावरील इग्रजांनी आपल्या मडमा वगैरे दापोडीस पाठविल्या व मुबईहून गोऱ्या पलटणीस येण्यास निकड केली, त्याप्रमाणे ती आल्यावर तिचा मुक्काम गारपिरावर न करवितां लांब खडकीवर करविला. आश्विन वद्य ८ रोजीं विश्रामसिंग नाईक याने गणेशखिडीनजीक दिवसा ले. शॉ नामक गोऱ्या अमलदारास भाल्याने भोसकले. गारपिरावरची छावणी मोडून खडकीस इग्रजी फौज जातांच मराठी फौजेने गोट लुटला. आधी आगळीक दुसऱ्याकडून झाली असे ठरण्याकरितां उभयपक्षी बरेच प्रयत्न झाले. पण अखेर तारीख ५ रोजीं लढाईस तोड लागले. बाजीराव निघून पर्वतीकडे गेला व अल्पिष्टन यानेहि सगमावरील वकिलातीच्या इमारतीचे रक्षण होणे अशक्य असे समजून सर्व माणसें काढून खडकीस नेलीं. शहरांत सर्वत्र हालचाल सुरू झाली. आणि चतुःशृंगीच्या डोंगरापासून भांबुर्ड्यापर्यंत घोड्यांच्या टापा व तोफांच्या रणगाड्यांचा करकर आवाज याशिवाय कांहीं ऐकू येईनासे झाले! पहिल्या दिवसाच्या हल्ल्यांत पेशव्यांच्या घोडेस्वारांची सरशी झाली. परतु पायदळाची कुमक वेळेवर न झाल्याने अखेर त्यांचा मोड झाला. नतर बापू गोखले याने स्वतः फेरहल्ला केला; पण त्यासहि माघारे परतावें लागले. दुसरे दिवशीं मराठी सैन्याची फळी फुटून बराच नाश झाला व खडकीची लढाई इंग्रजांनीं जिंकली. नारोपंत आपटे माधवराव रास्ते आबा पुरदरे पटवर्धन यांजकडील कांहीं सरदार वगैरे बापू गोखल्यांच्या मदतीस होते.

पण इंग्रजांकडील तोफांचा मारा भारी होऊन मराठी फौजेस निरुपायानें मागे हटावें लागले. पेशव्याकडील मोर दीक्षित वगैरे कांहीं मातबर माणसें पडलीं. पेशव्याच्या लोकांनी सगमावरील बगला जाळला व लूटहि केली; पण मुख्य लढाईत ते हरल्याने व घोडीं वगैरेची फार खराबी झाल्याने अधिक नुकसान त्यांचेंच झाले. बाजीराव २००० स्वारांनिशीं पर्वतीस होता. तेथील देवळाच्या गच्ची-वरून त्याने खडकीची लढाई पाहिली; पण लढाई सपण्याचे पूर्वी रग सुमार दिसू लागतांच त्याने स्वारांनिशी सासवडाकडे पळ काढला. लढाईचे आधी पर्वतीकडे जाण्याकरतां शुक्रवारचे वाड्यांतून तो निघाला तेव्हांच त्याच्या जरी-पटक्याची काठी मोडली होती ! अखेर या मोडक्या काठीने आपला गुण दाखविला. बाजीरावाने शुक्रवारच्या वाड्यांतून एकदां जो पाय काढला तो शेवटचाच ठरला. त्याला पुणे फिरून दृष्टीस पडलें नाहीं !

खडकीच्या लढाईत इग्रजी फौजेची सरशी झाली तरी ती खडकीच्या खड-कीसच दबा धरून होती. अल्पिष्टनसाहेब हा जनरल स्मिथसाहेबाची वाट पहात होता. बिघाडाचा रग दिसतांच उभयतांनीं असा सकेत ठरविला होता कीं, ज्या दिवशीं पुण्याकडची डांक चुकेल, येणार नाहीं, त्या दिवशी पुण्यास लढाई सुरू झाली असे समजून स्मिथसाहेबाने घोडनदीहून आपली फौज घेऊन ताबडतोब पुण्यावर यावें. तारीख ५ नवबरची डांक चुकतांच स्मिथसाहेब ठरल्याप्रमाणे फौज घेऊन निघाला. वाटेत त्याला मराठे स्वारांच्या टोळ्यांनी बराच त्रास दिला. पण तारीख १३ रोजीं तो पुण्यास येऊन पोचला. ता. १५।१६ रोजीं त्याच्या सैन्याची व मराठे सैन्याची घोरपडीचे बाजूस लढाई झाली. तारीख १६ रोजीं रात्रीं पेशव्यांचें उरलेले सैन्य मागे हटले व त्याने बापू गोखले वगैरे सरदारासह सासवडची वाट धरली. तारीख १७ रोजी अल्पिष्टन व स्मिथ हे उभयतां बरोबर बाळाजीपंत नातुप्रभृति लोक घेऊन पुणे शहरांत शिरले व त्याच दिवशी (सोमवार कार्तिक शुद्ध ९ ) तिसरे प्रहरीं शनवारचे वाड्यावर इंग्रजांचे निशाण फडकू लागून जणु काय तें मराठेशाहीची इतिश्री झाल्याचे जाहीर करू लागलें !

बाजीराव पळून गेल्यावर मागे पुणें मोकळे पडले ! खासा धनी आणि त्याजबरोबरचे सर्व मुख्य सरदार हे देशोधडीस लागल्यावर पुण्याचा बचाव कोण करणार ? बाजीराव पुण्याच्या लोकांना प्रिय असता तर त्याच्याकरितां, निदान त्याचे नांव घेऊन पुणें लढविण्याकरतां, मागें लोकांनी कांहीं प्रयत्न केला असता. पण बाजीरावाने आपलें स्वतःचे बलाबल पाहिलें कधीं ? त्याने कोणास तरी खुष ठेवलें होते काय ? पदरीं सैन्य व बाजारबुणगें पुष्कळ होतें, व बापूगोखल्यासारखा शूर शिपाईहि होता. पण सर्व सैन्य बिनकवाइती ! शिस्त नाहीं, सामान नाहीं, हुकमत नाहीं, धोरण नाहीं, लोकांचे पाठबळ नाहीं; फक्त कावेबाजी व कज्जे-दलाली मात्र भरपूर होती ! असो; खडकीची लढाई संपण्यापूर्वीच बाजीरावाने

पळ काढण्यास सुरुवात केली होती;व ही लढाई संपल्यावर पुरंदरे गोखले वगैरे सरदार त्यास जाऊन मिळाले; त्यांना बाजीरावाचा नक्की पत्ताहि प्रथम कळेना इतका बाजीराव झुकांडीबहाद्दर! शेवटी त्याचा शोध काढीत काढीत सरदारांनीं त्यास सासवडास गांठले, तेथें सर्व जमून प्रथम जेजूरीस व नंतर माहुलीस गेले. नंतर सहा महिनेपर्यंत बाजीराव पुढे व इंग्रजी सैन्य मागे असा पळ चालू होता. मागे पुण्यास काय वर्तमान घडले, हे बखरकाराच्या त्रुटक पण ओजस्वी अशा भाषेतच पुढे देतो.

शके १७३९ च्या अश्विन वद्य ११ पासून पौष अखेरपर्यंत पुण्यास नुसती धामधूम चालू होती. बाजीराव पळून गेल्यावर शहरची नाकेबंदी झाली. पण नाकेबंदी केल्याने लोकांचे संरक्षण होतेच असे नाही.पेशव्याच्या कित्येक वाड्यांवर देवडीवरील पहारेकऱ्याशिवाय दुसरे कोणीहि उरले नाही. बाळाजीपंत नातूने या पहारेवाल्यांसहि काढून लाविले व सांगितले की, 'तुमचा धनी परत आल्यावर तुम्ही या,तोंपर्यंत येथे काम नाही-'तेव्हां ते लोक आपले सामानसुमान व हत्यारे घेऊन घरोघर निघून गेले. त्यांतूनहि कित्येक मुडी देऊन राहिले त्याजकडे वाड्यांच्या बंदोबस्ताचे काम सांगण्यात आले. पुण्यास रोज अवशी तोफ होऊन नाकेबंदी करण्याची चाल असे.पहिल्या दिवशी नेहमीप्रमाणे तोफ सोडण्याचा हुकुम झाला. पण गोलदाजाजवळ दारू नाहीं व दारू ठासावयास गज नाही अशी स्थिति आढळली ! पण दुसरे दिवसापासून दारूची व्यवस्था होऊन तोफ सोडण्याचा प्रघात सुरू झाला. मात्र कत्तलच्या रात्रीं एक दिवस तोफ सोडण्यांत न येतां खेळे यांस डोले काढून शहरांत खेळण्यास व मिरविण्यास मोकळीक देण्यांत आली. " साहेब याने आपले लोकांस ताकीद करविली कीं, आपले माणसांनीं त्यांशीं बोलू नये, जशी चाल आहे त्याप्रमाणे करावे."पूर्वी बेटावर लूट होऊन चीजवस्त लुटली गेली होती ती ज्याने त्याने परत आणून द्यावी अशी दवंडी पिटली गेली; तेव्हां जकाते यांच्या हवेलीजवळ लुटीत नेलेल्या व परत आणून दिलेल्या मालाच्या राशी पडल्या! राज्यक्रांतीच्या वेळी चोरट्याना फावतच असतें. लोकांनीं स्वस्थ रहावे, दगाधोपा करू नये, व्यापारउदीम चालवावा, नवीन करपट्टी वगैरे कांही बसविली जाणार नाहीं, अशा अर्थाचा जाहीरनामा साहेबानें कोतवालचावडीच्या झेंड्याला बांधला. पण व्यापारउदीम कोणाला रुचणार ? आहे ते राखले कसे जाते याचीच ज्याला त्याला फिकीर पडलेली! पुण्यास दरोडे पडू लागले. कोणी बाहेर एकटादुकटा पडला तर त्याला कोणीहि लुबाडून घ्यावें असे झालें ! गुन्हेगारांना जरब बसावी म्हणून मुद्देमालासह पकडलेल्या कांहीं चोरट्यांना फांशींहि देण्यांत आले ! पण त्याने काम भागले नाही. तेव्हां सर्व लोक मिळून अल्पिष्टनसाहेबाकडे" कोणी साखर कोणी बदाम अशी नजर घेऊन गेले." हरेश्वरभाई पुढारी होता. तेव्हां साहेबांनीं सर्वांस सांगितलें कीं, खुशी करून

राहावे,तुमचे धनी लवकर येतील, आम्ही तुमचे धन्यास आणावयास जातों." हरेश्वरभाईस व बाळाजीपंत नातूस नवीन लोक नोकरीस ठेवून शहरचा बंदोबस्त करावयास सांगण्यांत आला.साहेबाने तरी चोरट्यांना अशा वेळी कोठवर पुरें पडावें ? अर्थात् बखरकारानें खालीं वर्णन केल्याप्रमाणें प्रकारहि होत."साहेब याजकडे सांगावयास गेलें तेव्हां त्याने उत्तर केले, उसकू ल्याव हम फांशी देवेंगा." पण चोर आधीं पकडला जाणार आणि मग फांशी जाणार ! व्यापारी म्हणाले, " साहेब वो कसे सांपडेगे ? तेव्हां साहेब म्हणाला "तो हम क्या करे ? चोर उपर हम जाते नहीं !" हे उत्तर ऐकून व्यापारी रडत माघारे आले व खाजगी पगारी पहारेवाले ठेवून आपापला बंदोबस्त करूं लागले.

अल्पिष्टनसाहेब बेट सोडून गारपिरावर छावणी देऊन राहिला होता व तेथून त्याचा कारभार चाले. त्याच्याहि छावणीवर दगड येत व शेंपांचशे रामोशी जमून अडप झडप मिळेल ती लूट नेत, यामुळें रात्रभर गस्त ठेवावी लागे. शेवटी अर्जुना नाईक रामोशी यानें शहरावर दरोडा न पडूं देण्याची हमी घेतली तेव्हां त्यास पागोटें बांधण्यांत आलें !

कार्तिक वद्य ३ पासून पुण्यास बाजीरावासबधाने दिवसांतून दहा बातम्या पसरण्यास सुरुवात झाली.अर्थात् या बातम्यांना आगापिछा कांहीं नसे; व बातम्याहि इतक्या परस्परविरुद्ध असत कीं, एकीचा मेळ दुसरीशीं घालणे अशक्य असे. बातम्या उठविणारे व ऐकून विश्वास ठेवणारे दोघेहि बहाद्दर असल्यामुळे लोकांना काय बोलावें याला ताळतंत्र राहिला नाही. बाजीराव जिंको किंवा हरो पण पुण्यास परत येणार एवढा मात्र पुण्याच्या लोकांना दृढ भरंवसा वाटत असे. बाजीराव उत्तरहिंदुस्थानांत जाऊन पोचल्यास त्याला शिंदेहोळकरांची मदत खास मिळणार याविषयीं लोकांस शंका वाटत नव्हती. फिरंगी यांची जेरी व श्रीमंताची जबरी अखेर होणार अशी लोकांतून पोटांत आशा होती; पण अखेर ती व्यर्थ ठरली.दिवसभर कानोसा घेत, चोरून बातम्या सांगाव्या व ऐकाव्या,आणि अखेर रात्रीं नाकेबंदीची तोफ ऐकून निराशा होऊन निजावें असा क्रम कित्येक दिवस चालला होता ! पुण्यांत बाहेरून शिंदे होळकर भोसले यांजकडून येणाऱ्या डांकेवर नजर ठेवण्यांत आली असून ही डांक इंग्रजांचे स्वाधीन करून ती त्यांनीं पाहिल्यावर परत न्यावी असा बंदोबस्त झाला होता. बाजीराव येणार—आला अशा हुली उठून लोकांत वारंवार चलबिचल होई यामुळें इंग्रजांना वारंवार शहरांतून ठिकठिकाणीं नाकेबंदी करावी लागून शनवारवाड्यावर तोफाहि चढविण्यांत आल्या. सरकारी भगवे झेंडे व निशाणें चावड्यांवरून व पेठेतून शिल्लक होतीं तींहि काढून व काठ्या उपटून टाकण्यांत आल्या व त्यांच्याजवळ असलेलीं इंग्रजांचीं निशाणें मात्र शिल्लक ठेवण्यांत आलीं.भगवीं निशाणें प्रथम शिल्लक उरूं देण्याचें कारण काय असावें ? बाजरिाव आपण होऊन सुखासमाधानानें ताबड-

तोच स्वाधीन झाल्यास त्यास फिरून पुण्यास आणून अधिक बंदोबस्तांत कां होईना पण गादीवर ठेवावे असे अल्फिष्टनसाहेबास वाटले असेल काय?

ता. २२ नोव्हेंबर रोजीं जनरल स्मिथ याने बाजीरावाच्या पाठलागास सुरवात केली. पुणे स्थिरस्थावर केल्यावर महाराष्ट्रांतील सर्व सरदारजहागिरदारांस उद्देशून अल्फिष्टनसाहेबाने ता. ११ फेब्रुवारी १८१८ रोजीं जाहीरनामा काढून असे फर्माविले कीं "कांही कारण किंवा जाबसालाची तक्रार नसतां पेशव्यांनीं इंग्रजांशी बिघाड केला; परतु त्याकरितां इंग्रज इतरांचे नुकसान करूं इच्छित नाहींत; सर्वांनीं आपापल्या ठिकाणीं स्वस्थ राहावे म्हणजे लढाईपूर्वी होते तसे सर्वांचे चालविले जाईल." या जाहीरनाम्यामुळें बाजीरावास कोठेंहि फारसा थारा मिळाला नाही. सिंहगड रायगड लढले; सासवडासहि चकमक झाली. इंग्रजांना लहानमोठ्या बऱ्याच गढ्या लढूनच घ्याव्या लागल्या; पण बाजीरावाकरितां किंवा पेशवाईकारितां कोणींहि सरदार जहागिरदार वगैरेंनीं जमावाची उचल केली नाहीं.

बाजीराव सासवडाहून निघाला तो माहुलीस गेला व तेथे त्याने वासोट्याहून कबिल्यासुद्धां सातारकर महाराजांस आपल्या लष्करांत आणविण्याची व्यवस्था करून त्यांची वाट न पाहतांच पळ काढण्यास सुरुवात केली. माहुलीहून पंढरपूर, तेथून जुन्नर, तेथून ब्राह्मणवाड्यास आल्यावर थोडा मुक्काम झाला व या ठिकाणीं त्र्यंबकजी डेंगळा पेशव्यांस उघडपणे येऊन मिळाला. त्याच्या रामोशी वगैरे लोकांनीं सभोवतालच्या डोंगरांतल्या सर्व खिंडी अडवून ठेवल्या होत्या. पढरपुराहून निघाल्यावर सातारकर महाराज पेशव्यांस येऊन मिळाले. इतक्यांत जनरल स्मिथ सगमनेरपाशीं आला, तेव्हां बाजीराव दक्षिण दिशेनें निघाला; यावरून बाजीराव पुण्यावर चालून येतो अशी बातमी उठली; ती ऐकतांच पुण्याचे बाजूस कर्नल बर नांवाचा सरदार होता, त्याने घोडनदीहून लष्कर बोलावलें. त्याची व मराठी फौजेची कोरेगांव मुक्कामी ता. १ जानेवारी सन १८१८ रोजीं मोठीच लढाई झाली. तींत इंग्रजांचा बराच नाश झाला व त्यांच्या फौजेचा मोड होऊन तिला परत घोडनदीकडे जावे लागले. कोरेगांवच्या लढाईत गोखले व त्र्यंबकजी यांनीं बरीच मर्दुमकी गाजविली. पण मराठी फौजेला याहून अधिक कांहीं करितां येणे शक्य नव्हतें. कारण, स्मिथसाहेब पाठीवर होताच. बाजीराव भीमानदीपलीकडे दोन मैलांवरील टेकाडावरून लढाई पाहत होता. सातारकर महाराजहि समागमेंच होते. त्यांना या वेळीं आपल्या अबदागिरीला रजा देऊन ऊन खावे लागलें. कारण, न जाणों, इंग्रज गोलंदाज अबदागिरीचा नेम धरून कदाचित् गोळा मारावयाचे!

कोरेगांवाहून बाजीराव निघाला तो सालप्याचे घाटाने वर चढून कर्नाटकांत शिरून त्यानें थेट घटप्रभा नदी गांठली. पण मद्रासेकडून जनरल मनरो

येत आहे असे कळल्यावरून तोंड फिरवून कृष्णापार होऊन फिरून सालप्याचे घाटाने वर चढून सोलापुराकडे वळला. इकडे जनरल स्मिथ याने ता. १० फेब्रुवारी रोजी सातार्‍याचा किल्ला घेतला. त्यावर प्रथम इंग्रजांचे व त्यानंतर महाराजांचे निशाण लावण्यांत आले. कारण, महाराज हे कांही दिवस पेशव्यांच्या समागमे असले तरी इंग्रजांचे शत्रु गणले गेले नव्हते. दरम्यान कलकत्त्याहून बाजीरावाची सर्व व्यवस्था करण्याची कुलमुखत्यारी अल्पिष्टनसाहेबाकडे आल्यावरून त्याने जाहीरनामा काढला की, "पेशव्यास फिरून गादीवर बसविण्यांत येणार नाही; त्याचे राज्य खालसा केले जाईल, मात्र सातारकर महाराजास लहानसा मुलुख स्वतंत्रपणे तोडून दिला जाऊन त्यांचे पद कायम करण्यात येईल."

सोलापुराहून पंढरपुराकडे येत असतां वाटेत अष्टीच्या मुक्कामी जनरल स्मिथ याने पेशव्यास अवचित गांठले. बापू गोखल्यानेहि काय होणार तो सोक्षमोक्ष याच ठिकाणीं होवो अशा निश्चयाने त्यास तोंड दिले. उभयपक्षीं मातबर लढाई ( ता. २० फेब्रुवारी १८१८ ) होऊन बापू गोखल्याने शौर्याची शर्थ केली व लढतां लढतां धारातीर्थी देह ठेविला. गोविंदराव घोरपडे वगैरे सरदारहि या लढाईत पडले. पेशवे व सातारकर महाराज यांचीहि सगत येथेच सुटली. सातारच्या मुत्सद्याना बाजीराव याने महाराजाशी ठेवलेली वागणूक पसत नव्हती. युद्ध सुरू होण्यापूर्वी दोनतीन वर्षांपासून इंग्रजाचे त्यांच्याशी गुप्त खलबत चालूच होते; ते अष्टीच्या लढाईच्या सुमारास फळास आले. महाराज धांवपळीला कटाळून गेले होते, आणि इंग्रजांचा व सातारच्या मुत्सद्यांचा प्रेष त्यांच्यापर्यंत पोचला होता. यामुळे लढाई मोडतांच ते आपली मातोश्री व बंधु यांसह जागच्या जागींच स्वाधीन झाले. स्मिथसाहेबाने त्यांस अल्पिष्टनसाहेबाच्या हवाली करून बाजीरावाच्या पाठलागास पुनःसुरुवात केली.अष्टीच्या छाप्यांत बाजीरावाची फार धांदल झाली व पालखीमेण्यांत बसून पळण्याचे सोडून त्याला घोड्यावर स्वार होऊन पळावे लागलें! लढाई सपण्यापूर्वीच बाजीराव बापू गोखल्यास सोडून निघाला तो गोदातटाकीं कोपरगांवीं जाऊन थांबला. होळकराकडील रामदीन नांवाचा सरदार बरेच दिवस पेशव्याच्या मदतीस येणार येणार म्हणून वदंता होती तो अखेर कोपरगांवीं येऊन त्यास मिळाला. पटवर्धन सरदारांनीं यापुढे बाजीरावाबरोबर पळत न जातां परत फिरावयाचें असे ठरवून, त्यांनी येथेच रजा घेतली; आणि बाजीरावानेहि कांही दक्षिणी व परदेशी (उत्तरहिंदुस्थानी) सैन्यासह उत्तरहिंदुस्थानची वाट धरली. नागपूरकर भोसल्याच्या मदतीची त्यास पूर्वी बरीच आशा होती. परतु डिसेंबर महिन्यांत अप्पासाहेब भोसल्याचा पराभव होऊन इंग्रजांनीं सिताबर्डीचा किल्ला घेतला होता;यामुळे नागपूर प्रांताकडे जाऊन कांहीं उपयोग नव्हता. तथापि गणपतराव भोसल्याचे मदतीने चांद्या (चंद्रपूर) कडे जाण्याच्या हेतूने बाजीराव वर्धानदीपर्यंत गेलाहि. पण इंग्रजांचें

सैन्य तेथेंहि सामोरें आल्यामुळें तो वर्धानदीच्या पश्चिमेस पांढरकवड्यास आणि तेथून शेवणीस गेला. त्याचा भाऊ चिमाजी अप्पा देसाई निपाणकर, नारोपत आपटे वगैरे सरदार येथून दक्षिणेकडे परत फिरले व लवकरच जनरल स्मिथ याच्या स्वाधीन झाले. शेवणीहून बाजीराव उत्तरेकडे वळून ता. ५ मे रोजीं तापीपार झाला. येथून पुढें नर्मदा उतरून शिंद्याच्या मुलखांत जाऊन त्याची मदत मिळविण्याचा बाजीरावाचा विचार होता. पण तिकडे जनरल मालकम याची फौज तोंडावर आहे असें समजतांच बाजीराव हताश झाला व अशीरगडाजवळ धोलकोट येथे मुक्काम करून बसला. येथून ता. १६ मे रोजी त्याने आपला वकील महू येथील छावणीत जनरल मालकम याजकडे रवाना केला. बाजीराव अगदीं जेर झाला होता, त्याचे बहुतेक आश्रित त्याला सोडून गेले होते, परक्यांकडून त्याला मदत मिळण्याची आतां आशा नव्हती, जवळच्या सैन्यांत अरब धुरभय्ये असे आडदांड शिपाई उरले असून पगार तुंबल्यामुळे ते बडखोर बनण्याच्या बेतांत आले होते, व शेवटीं तर त्यांनीं त्याला जवळजवळ कैदेत ठेवले होते. त्यामुळे बाजीरावास शरण जाण्याशिवाय मार्ग नव्हता. जनरल मालकम याने त्यास आपल्या जबाबदारीवर सालिना आठ लक्षांची जहागीर देण्याचे आणि त्याच्या पक्षाच्या सरदारांना तोशीस लागू न देण्याचे कबूल केले. तेव्हां बाजीराव त्याच्या छावणींत जाऊन राहिला. या शर्ती फारच सढळ हाताच्या आहेत असे लॉर्ड हेस्टिंग्ज यास प्रथम वाटले; परतु अखेर त्याने त्या मजूर केल्या. " मी दक्षिणेस कधींहि परत जाणार नाहीं व मी किंवा माझे वारस पेशवाईच्या गादीवर किंवा मुलखावर हक्क सांगणार नाहींत" अशी त्याने कबुली दिली होती. त्याप्रमाणे त्यास गगाकांठी राहण्याची परवानगी देण्यांत आली; व बऱ्याच चौकशी अतीं कानपुराजवळ बिठूर ऊर्फ ब्रह्मावर्त हे क्षेत्र बाजीरावाने पसत केल्यावरून तिकडे त्याची रवानगी करण्यांत आली.

ब्रह्मावर्त येथे बाजीरावास आठ लक्षांची नक्त नेमणूक असून त्याचा लहानसा मुलुख त्याला राज्यादाखल देण्यांत आला होता. हे राज्य सुमारे सहा चौरस मैलांचे होते. त्याचेजवळ एक स्वतत्र रेसिडेंट ठेविला होता. या राज्यांत सुमारे दहापधरा हजार मनुष्य असे. ही बाजीरावाची प्रजा ! बाजीरावास मराठी पदवी महाराज किंवा श्रीमत अशी असून इग्रज 'हिज हायनेस' या नांवाने उल्लेखीत. ब्रह्मावर्तास बाजीराव व इग्रज यांचे सबध स्नेहभावाचे असत. एके प्रसगीं बाजीरावाने ६ लक्ष रुपयांची देणगी व एकदां एक हजार स्वार व पायदळ इग्रजांच्या मदतीस दिले होते. ब्रह्मावर्तास बाजीरावाला आपली धर्मकृत्याची हौस पुरविण्यास वाटेल तितका वेळ मिळाला ! तसेच पुण्याच्या वाड्यांतील त्याचे इतर खेळहि तेथे चालू होते. ब्रह्मावर्तास बाजी-

रावानें आणखी पांच लग्ने केलीं. तेथें त्यास दोन मुली झाल्या. पैकीं गेल्या वर्षीं निवर्तलेल्या बयाबाईसाहेब आपटे यांचा जन्म बाजीरावाच्या ७२ व्या वर्षीं झाला. बाजीराव १८५१ सालीं वारला तेव्हां त्याचें वय ७६ वर्षांचें होते. बाजीरावानें लग्नें जशीं पुष्कळ केलीं तसे दत्तक मुलगेहि पुष्कळ घेतले ! थोरला मुलगा धोंडोपंत ऊर्फ नानासाहेब हा बाजीरावाच्या मृत्यूपर्यंत इंग्रजांशीं अत्यंत स्नेहाने वागत असे. बाजीरावाच्या मृत्यूनंतर त्याची आठ लक्षांची जहागीर इंग्रजांनीं खालसा केली. व नानासाहेबास फक्त पोटगी ठेवली. तरी १८५७ पर्यंत नानासाहेबाने इंग्रजांशीं वागण्याचे आपले धोरण फारसें बदलले नाही. कानपूर हे ब्रह्मावर्ताजवळ असल्याने नानासाहेबाचा मुक्काम कानपुरासच पुष्कळ दिवस असे. तेथे मुलकी आणि लष्करी गोऱ्या अधिकाऱ्यांचा आणि नानासाहेबाचा स्नेह दाट जमून तो नेहमी त्यांना भेटी व मेजवान्या देई आणि करमणुकीकरितां नाच वगैरे करीत असे. १८५७ साली देखील आपला भाऊ व पुतण्या यांच्या आग्रहातिशयाने, एवढेच नव्हे तर, बंडवाल्यांनीं " आमचे पुढारी व्हा नाहीं तर तुम्हांस ठार मारतों" अशी धमकी दिल्याने तो नाखुषीनें बंडांत सामील झाला. लोकांनीं त्याला बंडांत ओढून नेले व कानपूर येथील कत्तली वगैरेंचे प्रसंग त्याच्या नांवावर त्याच्या हुकमाविरुद्ध इतरांनीं केले ! ब्रह्मावर्त येथील लोकमताप्रमाणे पाहिले तर धाडसाचा किंवा शौर्याचाहि आरोप नानासाहेबावर अकारण लादला गेला होता. नानासाहेबाचा अंत शेवटीं कसा झाला हे कोणासच नक्की सांगतां येत नाहीं.

# प्रकरण पांचवें

# मराठा राजमंडळ व इंग्रज

## सातारकर भोसले व इंग्रज

मागील दोन प्रकरणात शिवाजी संभाजी राजाराम आणि शाहू येथपर्यंत ते छत्रपति व बाळाजी विश्वनाथापासून दुसऱ्या बाजीरावापर्यंत होऊन गेलेले पेशवे यांचा इंग्रजांशी जो संबंध आला त्याची हकीकत आम्ही दिली आहे: व अशा रीतीने मुख्य कथासूत्र संपते. तथापि पेशव्याप्रमाणेच इतरांचा इंग्रजांशीं संबंध केव्हां कसा आला याचीहि माहिती देणे जरूर आहे. याकरिता सातारा कोल्हापूर नागपूर व सावंतवाडी येथील भोसले (छत्रपति व सरदार) तसेच शिंदेहोळकरादि मराठेशाहीतील सरदार यांच्या घराण्यांचा स्वतंत्रपणे किंवा पेशव्याच्या द्वारे इंग्रजांशीं जो संबंध आला त्याचा वृत्तान्त थोडक्यांत खाली दिला आहे. मराठेशाहीचा इतिहास एकट्या पेशव्यांनी केलेला नसून उपरिनिर्दिष्ट सर्वांनी मिळून तो केलेला आहे, हे ध्यानात ठेवणे जरूर आहे.

सातारच्या भोसले घराण्यास मराठी दौलतींत अर्थातच मुख्य मान होता. या घराण्याचे पहिले पहिले पुरुष शिवाजी संभाजी व राजाराम यांचा इतिहास प्रसिद्धच आहे. त्यांच्या कारकीर्दीत त्यांचा व इंग्रजांचा जो संबंध आला त्याची माहिती पूर्वीं दिलीच आहे.शाहूमहाराजाचा व इंग्रजांचा जो संबंध आला त्यात इंग्रज हे अर्जदार होते. त्यांना शाहूपासून व्यापारास परवानगी व सवलती हव्या होत्या व शाहूकडे नजराणे देऊन वकील पाठवून त्या मिळविण्याचा त्यांनी प्रयत्न केला. पण शाहूकडे राजकारणातली अखत्यारी फारशी नसून कारभाराची सर्व जबाबदारी पेशव्यांकडेच होती. हे इंग्रजांनी तेव्हांच ताडले, व राजकारणाचा सर्व संबंध पेशव्यांशी सुरू केला. शाहूच्या कारकीर्दींत बाळाजी विश्वनाथ व बाजीराव हे पेशवे होऊन जाऊन नानासाहेब पेशव्यांची कारकीर्द जवळजवळ निम्मी झाली होती. शाहूच्या मरणोत्तर सातारकर महाराज केवळ निर्माल्यवत् झाले. अर्थात् यापुढे तर त्यांच्याशी इंग्रजांस काहींच कर्तव्य उरले नाहीं. इंग्रजांचा व त्यांचा संबंध पुढे बाजीरावाच्या कारकीर्दीचे अखेरीस आला. त्याचे कारण, महाराजांचा बंदिवास स्वतः त्यांना व त्यांच्या हितचिंतकांना दुःसह होऊन त्यांतून इंग्रजांच्या मदतीने सुटका करून घेण्याचा त्यांनी प्रयत्न सुरू केला.

सातारकर महाराज निर्माल्यवत् झाले होते तरी बाह्यतः त्यांचा इतमाम गादीच्या धन्यासारखा होता. साताऱ्याच्या छोट्या राज्याच्या हद्दींत सर्व अधिकार व अखत्यारी महाराजांची होती. पेशव्यांची डोईबदल झाल्यास नव्या पेशव्यांस अधिकाराचीं वस्त्रे त्यांजकडून मिळत. अशीं वस्त्रे घेतल्याशिवाय पेशव्याच्या अधिकारास तात्त्विक दृष्ट्या कायदेशीरपणा येत नसे. दुसऱ्या बाजीरावास इंग्रजांनीं गादीवर बसविले तथापि वस्त्रे सातारकर महाराजांकडून घ्यावीं लागली. पेशवे पुण्यास राजे असले तरी साताऱ्याच्या हद्दीत गेले म्हणजे ते नोकरच ठरत, व आपले नोकराचे नाते स्मरून ते मर्यादेनेच वागत. फौजसुद्धां पेशवे साताऱ्यास आले तरी साताऱ्याच्या हद्दींत त्यांची नौबद वाजण्याची बंद होऊन ते हत्तीवरून किंवा पालखीतून उतरून पायी चालत व रुमालाने हात बांधून ते महाराजांच्या दर्शनास जात व त्यांजपुढे साध्या बैठकीवर बसत! भेटीचे वेळीं ते महाराजांस रीतीप्रमाणें नजर करीत, व पायावर मस्तक ठेवून प्रणाम करीत. तसेच आपल्या हातांत मोर्चेल घेऊन ती वारीत. महाराजांमागे खवासखान्यांतहि बसत.

१८०९ च्या सुमारास पेशव्यांच्या हातून महाराजांची सुटका करून घेण्याचे कारस्थान सुरू झाले. चतुरसिंग भोसले (वावीकर) हा या कारस्थानाचा पुढारी असून सातारकर महाराजांच्या सुटकेकरितां त्याने बंड केले. तेव्हां बाजीरावाने त्याला बायकांमुलांसह पुण्यांस कैदेत ठेवले. तेथून त्यास प्रथम मालेगांवास व नंतर कांगोरीच्या किल्ल्यांत ठेवण्यांत आले. त्याजवर देखरेख त्र्यंबकजी डेंगळ्याकडे सांगण्यांत आली होती. चतुरसिंग कांगोरीच्या किल्ल्यांत १८१८ साली मृत्यु पावला. चतुरसिंगाबरोबर महाराजांच्या इतर कित्येक हितचिंतकासहि बाजीरावाने कैदेत ठेवले होते. चतुरसिंगाच्या बंडापासून सातारकर महाराजाची कैद अधिकच सक्त झाली. महाराज प्रतापसिंह हा धीमा व शांत स्वभावाचा होता. तथापि त्याची आई हुषार व महत्त्वाकांक्षी असून आपल्या मुलाच्या सुटकेचा प्रयत्न तिनें इंग्रजांकडे गुप्तपणे आपले वकील पाठवून सुरू केला होता. इंग्रजांस हे निमित्त बाजीरावाविरुद्ध बरे मिळाल्याने त्यांनीं या वकिलांच्या हकीकती ऐकून घ्याव्या, महाराजांच्या आईकडे सहानुभूतिपूर्ण निरोप पाठवावे, त्यांना धीर धरून रहा असे सांगावे, असा परिपाठ ठेविला होता. पण बाजीरावाच्या या कारभारांत आपणांस प्रत्यक्ष हात घालण्याचा अधिकार नाहीं हे ते जाणून असल्यामुळे या कामीं ते बाजीरावास उघडपणे काहींहि बोलत नसत. पण पुढेमागे बाजीरावाशी लढाई खास होणार असा अंदमास अल्फिष्टनसाहेबास असल्यामुळें या लढाईच्या प्रसंगी महाराजांनीं येऊन इंग्रजांस मिळावें असा संकेत त्यानें महाराजांच्या वकिलांस सांगून ठेवला होता. म्हणून बाजीरावास या गोष्टीची बातमी लागतांच त्यानें महाराजांवर अधिकच कडक पहारा ठेविला.

१८१७साली लढाईचे तोंड लागण्याच्या आधीं बाजीरावाने महाराजां आपले ताब्यांतून न जाऊं देण्याकरतां त्यांस आश्वासनपूर्वक असा निरो पाठविला कीं, " मी तुमचा केवळ नोकर आहे, दौलत सर्व तुमची आहे, द तुम्हांकडेच चालविण्यास मिळेल, " व महाराजांस कबिल्यासुद्धां साताऱ्याहू काढून वासोटा किल्लयावर नेऊन ठेवले. तेथून पुढे त्यांस बाजीरावाने आपल्य लष्करांत नेले व अष्टीच्या लढाईपर्यंत आपल्या तळात आपणाबरोबर फिरविले अष्टीच्या लढाईत पूर्वी इंग्रजांशीं ठरलेला संकेत अमलांत आणण्याची सं मिळाली व ती महाराजांच्या मंडळीने घेतली. दौलतीचा धनी हातीं लागल्या इंग्रजांस अर्थातच मोठा लाभ झाला. " पेशवे पुंड बंडखोर होते ते गेले, प खरी दौलत मागे शिल्लक राहिली.यास्तव सर्व मराठे सरदारानी आम्हांस शर येऊन आपापल्या घरीं जावे. आम्ही मराठी दौलत पूर्वीप्रमाणेच चालविणा आहो, गेले ते राज्य पेशव्यांचे,महाराजांचे राज्य अबाधितच आहे " असा जाहि रनामा इंग्रजांनीं काढला. नंतर प्रतापसिंहमहाराजास सातारच्या गादीवर नेऊ बसविले आणि त्यांस एक लहानसा मुलूख त्यांचे स्वतंत्र राज्य म्हणून तोडून दि व ग्रॅंट डफ यास रेसिडेंट नेमिले. सातारकर महाराजांचे हे नवे राज्य यापुढे फ ३० वर्षे टिकले. १८३९ सालीं प्रतापसिंहमहाराजांवर इंग्रजाविरुद्ध बंड केल्याच आरोप आणण्यांत येऊन त्यांची रवानगी श्रीक्षेत्र काशी येथे करण्यांत आल दक्षिणेतील राजेरजवाड्यांना इंग्रजांच्या उपदेशाने उत्तरहिंदुस्थानातील क्षेत्रवा विशेष पसंत पडत असावा ! बाजीरावाने ब्रह्मावर्तास मुक्काम केला; तर त्याचे ध काशीस जाऊन राहिले. प्रतापसिंहमहाराजांच्या बंडासंबधाने सातारचा बखरक लिहितोः " शके १७६१ या साली इंग्रजी सरकारचा आणि प्रतापसिंहमहारा छत्रपति सरकारचा बिघाड होऊन तेव्हां पुण्याहून इंग्रजाची पलटणे चाल आली. ते समयी रात्रीं प्रतापसिंहमहाराज छत्रपति याजपाशी बळवतराव रा भोसले सेनापति हे फौजेचे मुखत्यार सन्निध होते. त्यानी विचार मनात आणिल कीं, एक पलटणाबरोबर लढाई करून आपली शिपाईगिरीची शर्थ करू दाखवावी. ते समयीं महाराज छत्रपति यानी सेनापतीचे हातास धरून बसवि ते दिवस उगवेपर्यंत त्यास बाहेर जाऊ दिले नाहीं." याच बखरकाराच्या म " इंग्रजी सरकारांत रुपयाच्या सोळा साक्षी देऊन बाळाजी नारायण ना यांनी राज्यांतून श्रीकाशी दाखविली. "प्रतापसिंह श्रीक्षेत्र काशी येथे शके १७६ सालीं वारले.प्रतापसिंह काशीस गेल्यावर मागे दत्तकपुत्र शहाजी राजे या सातारच्या गादीवर बसविण्यांत आले.पण त्यासहि औरस संतति नसल्याने त्य वेंकोजीस दत्तक घेतले, व त्यास रेसिडेंटाने गादीवरहि बसविले; परंतु मागाह दत्तविधानास परवानगी नाहीं या सबबीवर सन १८४८ त सातारचे रा खालसा करण्यांत आलें !

# कोल्हापूरकर भोसले व इंग्रज

मराठेशाहीची गादी शिवाजीमहाराजांच्या व संभाजीच्या कारकीर्दीत रायगडास होती त्या वेळी कोल्हापुराजवळचा पन्हाळा आणि सातारचा अजिमतारा हे केवळ किल्ल्यात मोडत. सातारा येथे मराठेशाहीची स्थापना १६९८ सालीं,म्हणजे संभाजीच्या वधानंतर स्वातंत्र्यार्थ आठ वर्षे मोगलांशी युद्ध होऊन जिंजीहून राजाराम परत आल्यावर, झाली. सर्व सरदारांची राजधानी बदलण्यास संमति होती. पन्हाळ्यापेक्षा सातारा हे मध्यवस्तीचें ठिकाण असून तेथून सर्व मुलखाची पहाणी नीट करतां येण्यासारखी होती.

राजारामाच्या मृत्यूनंतर सात वर्षांनी शाहू दिल्लीहून परत आल्यावर सातारच्या गादीबद्दल ताराबाई व शाहू यांच्या दरम्यान तंटा सुरू झाला. १७०७ सालीं खेड येथील लढाई झाली. नंतर पुढच्या सालीं शाहू साताऱ्यास येऊन गादीवर बसला.या सुमारास ताराबाईने कोल्हापुरास स्वतंत्र गादी स्थापण्याचें ठरविलें व नवीन अष्टप्रधान निर्माण केले. स्वतः कोल्हापुरकर भोसले व सातारकर भोंसल्यातर्फे पेशवे यांचा बेबनाव येथपासून सातारच्या गादीच्या अंतापर्यंत टिकला.आज देखील तंजावर येथील उत्पन्नाच्या वारशाच्या बाबतीत कोल्हापूरकर महाराज व सातारकर महाराज हे वादी प्रतिवादी आहेत ! नानासाहेब पेशव्याच्या कारकीर्दीत शाहूमहाराजाच्या मृत्यूच्या वेळीं कोल्हापूरचा व सातारचा सलोखा होण्याचा प्रयत्न झाला. पण तो फुकट गेला, व पानिपतच्या लढाईत पेशव्याचा नाश झालेला ऐकून समाधान पावल्यावर ताराबाई वारली ! पेशव्यांचे जे शत्रु ते करवीरकरांचे मित्र व करवीरकरांचे जे शत्रु ते पेशव्यांचे मित्र असा प्रकार सुरू होता. निजाम पेशव्याचा वैरी तर तो करवीरकरांचा मित्र. या रागावर थोरल्या माधवरावाने कोल्हापूरपैकी कांहीं मुलुख काबीज करून तो पटवर्धनांस जहागीर म्हणून दिला व पटवर्धन हे पेशव्यांचे करवीरकरांवरचे पहारेवाले होऊन बसले. पुढे रघुनाथरावाच्या भांडणात करवीरकरांनीं त्याचा पक्ष स्वीकारून हे गमावलेले परगणे परत घेतले. पण महादजी शिंद्याच्या फौजेने ते फिरून जिंकून घेतले. सवाईमाधवरावाच्या कारकीर्दीत तोतयाचे बंड माजले तेव्हां त्यास कोल्हापूरदरबारचा पाठिंबा होताच.पुढे बाजीरावाच्या कारकीर्दीच्यातोंडीं नानाफडणविसाच्या सूचनेवरून करवीरकरानी परशुरामभाऊ पटवर्धनाच्या जहागिरीवर हल्ला केला. तसेंच साताऱ्यास चतुरसिंगाचे बंड झाले तेव्हां त्यास करवीरकरांकडून पेशव्यांविरुद्ध मदत मिळाली.पट्टणकुडीच्या लढाईत चतुरसिंग आणि करवीरकर यांच्या सैन्याने परशुरामभाऊचा पराभव करून त्यास ठार मारले. तेव्हां नाना फडणविसाने विंचुरकर प्रतिनिधी व मेजर ब्राऊनरिग यांच्या हाताखालच्या शिंद्याच्या फौजा कोल्हापुरास पाठवून शहरास वेढा घातला, हा वेढा बरेच दिवस चालू

होता. पण अखेर पेशव्यांच्या फौजा वेढा उठवून परत गेल्या.

इंग्रज व करवीरकर यांचा संबंध प्रथम १७६५ चे सुमारास आला. मालवणचा किल्ला करवीरकरांच्या राज्यांत होता व तेथील दर्यावर्दी लोक इंग्रजांच्या जहाजांस बराच त्रास देत. १७६५ साली मुंबई येथील आरमारापैकीं मेजर गॉर्डन व कॅप्टन वॉटसन यांच्या हाताखालील फौजेने मालवणचा किल्ला सर केला व तो आपल्या ताब्यांत ठेवण्याच्या इराद्याने इंग्रजांनी त्यास 'फोर्ट आगस्टस' असे नांवहि दिले. पुढे तो किल्ला स्वतःस विशेष उपयोगी नाहीं असे पाहून त्याची तटबंदी वगैरे पाडण्याचा त्यांनी विचार केला; पण अखेर तोहि बेत रहित करून करवीरकरांकडून सव्वातीन लक्ष रुपये रोख घेऊन त्यांनी तो करवीरकरांस परत दिला. १८११ सालीं इंग्रजांनी करवीरकरांशी खासगी तहाची वाटाघाट सुरू केली तेव्हां बाजीरावाने या स्वतंत्र तहास हरकत घेतली. पण ती न जुमानतां अल्फिन्स्टनाने हा तह घडवून आणला. या तहाने पेशव्यांस चिकोडी व मनोळी हे प्रांत परत देण्यांत आले. करवीरकरांनी इंग्रजांस मालवणचा किल्ला व त्याखालचा मुलुख दिला. चांचे लोकांना बंदरांत आश्रय मिळू नये, शत्रूंची लढाऊ जहाजे बंदरात येऊ देऊ नयेत, स्वतः करवीरकरांनी लढाऊ जहाजे ठेवू नयेत, तीं सांपडल्यास इंग्रजांनीं जप्त करावीं, इंग्रजांची जहाजे फुटून किनाऱ्यास लागल्यास तीं इंग्रजांस परत देण्यात यावीं आणि इंग्रज सरकारच्या संमतीशिवाय कोणाशी लढाई वगैरे करू नये अशा इतर शर्तीहि करवीरकरांनीं इंग्रजांशी कबूल केल्या. उलट करवीरकरांवरचे जुने दावे इंग्रजांनी बहाल केले व परशत्रूपासून करवीरकरांचे रक्षण करण्याचा मक्ता आपणाकडे घेतला.

शाहूशीं वाद उपस्थित झाल्यावर ताराबाईकडे फार थोडा मुलुख राहिला. करवीरकर महाराजांनी किंवा त्यांच्या प्रधानांनीं पुढे दुसरा मुलुख आपल्या राज्यास जोडला नाहीं. त्यांच्या स्वाऱ्या व हालचाली नेहमी कोल्हापूरच्या आसपास पटवर्धनांच्या जहागिरीवर होत. त्यांच्या पदरी फौजहि फार थोडी होती. पेशव्यांच्या ७५ वर्षांच्या कारकीर्दींत करवीरचे राज्य केव्हां तरीं बुडावयाचेच, पण ते सुदैवाने वांचले; व बाजीरावाच्या कारकीर्दीपासून त्यास इंग्रजांशिवाय इतर कोणाची धास्ती राहिली नाहीं. इंग्रजांशी लढण्याचे कोल्हापूरदरबारास केव्हांच फारसे कारण पडले नाहीं, व स्वतःचा कमकुवतपणा पाहून त्यांनी इंग्रजांशीं पहिल्याच संधीस तह करून घेतला. सन १८१७-१८ साली पेशव्याशीं झालेल्या युद्धांत करवीरकरांनीं इंग्रजांचाच पक्ष स्वीकारला होता. या लढाईनंतर झालेल्या नव्या तहांत इंग्रजांनीं करवीरकरांस चिकोडी व मनोळी हे तीन लक्षांचे तालुके परत देवविले. १८२२ सालीं अल्फिन्स्टनसाहेब कोल्हापुरास गेला होता. १८२५ सालीं करवीर महाराजांनीं जहागिरदाराशीं वैर करून कागल घेऊन लुटलें तेव्हां वेबरसाहेब धारवाडाहून ६ हजार फौज घेऊन कोल्हापुरावर आला असतां

महाराज शरण येऊन त्यांनीं हल्ला करण्याच्या ऐवजी गांवाबाहेर लढाईकरितां काढलेल्या तोफांनींच वेबरसाहेबांस सलामी दिली व नवा तह केला ! त्यांत इंग्रजांच्या परवानगीशिवाय पदरीं फौज ठेवूं नये, इंग्रजांच्या सल्ल्याप्रमाणे राज्याचा कारभार करावा, इंग्रज ठरवितील ते पदरच्या जहागिरदारांचे झालेले नुकसान भरून द्यायें असे ठरले. याकरितां चिकोडी व मनोळी हे तालुके इंग्रजांकडे लावून देण्यांत आले. नतर मालवणच्या किल्ल्यांतील तोफा महाराजांनीं कोल्हापुरास आणविल्या व ते आपल्या रयतेसहि त्रास देऊ लागले. असे पाहून फिरून एक वेळ बेळगांवाहून इंग्रजांनीं एक पलटण करवीरास पाठविली. सन १८२७ सालीं ही फौज कोल्हापुरावर आली. तेव्हां पुनः नवा तह झाला; त्यात पागा सरजाम पायदळ मिळून एकदर १२०० पेक्षा जास्त फौज करवीरकरांनी पदरी बाळगूं नये, व तोफा कोठेहि हलवूं नयेत असे ठरले; तसेच ज्या मनोळी चिकोडी तालुक्यांची रुखरुख मनांत ठेवून महाराज असतुष्ट होते ते तालुकेहि त्यांना कायमचे इंग्रजांस द्यावे लागले ! पन्हाळगडावर करवीरकरांच्या खर्चाने इंग्रजी लष्कर ठेवूं द्यावें व इंग्रजांच्या परवानगीवांचून कारभारी दिवाण नेमूं नये अशीहि कलमे या तहांत होतीं.

---

## नागपूरकर भोसले व इंग्रज

नागपूरकर भोसल्यांचा मूळ पुरुष परसोजी हा सताजी घोरपड्याच्या हाताखालीं एक छोटासा सरदार होता. त्याचा जन्म सातान्यानजीक देऊर येथे झालेला असून तो त्या गांवच्या वतनदारांपैकीं एक होता. पुण्याजवळील हिंगणबरडी हे नागपूरकर भोसल्यांचे मूळ गांव असेहि कोणी म्हणतात. सताजीपूर्वीहि शिवाजीच्या हाताखालीं परसोजीने शिपाईगिरी केली होती. हे भोसले शिवाजीच्या भोसले घराण्यापैकीच असून महत्त्वाकांक्षी होते पेशवाईचे पद बाजीरावास मिळूं नये असे दाभाड्यांप्रमाणे या भोसल्यांचेहि मत होते. परसोजीचा मुलगा कान्होजी यास 'सेनासाहेब सुभे'ही पदवी शाहूकडून देण्यांत आली होती. पुढे कांहीं हुकूम अमान्य केल्यामुळे कान्होजीस सातारा येथे कैदेत ठेवण्यांत आले, व त्याचा पुतण्या रघोजी यास ते पद देण्यांत आले. यापूर्वी रघोजी हा कान्होजीच्या हाताखालीं शिपाईगिरी करीत असे. तसेच गोंडवणप्रांतांतील एका बाटलेल्या मुसलमान संस्थानिकाच्या पदरीहि त्याने नोकरी केली होती. रघोजी हा केवळ साधा शिपाई होता, तथापि त्याची बुद्धि तीव्र असून तो धाडसी व तरतरीत असे. रघूजी हा शिकार फार चांगली करी, व छत्रपति शाहूस शिकारीचा नाद असल्यामुळे शाहूची मर्जी रघूजीवर फार बसली. या गोष्टीचा त्याने फायदा करून घेतला. विशेषतः तो भोसले घराण्यांतला असल्यामुळे त्याची मान्यता वाढवावी म्हणून शाहूनें शिरके

घराण्यांतील एका मुलीशीं, म्हणजे आपल्या प्रत्यक्ष मेहुणीशीं, त्याचें लग्न करून दिलें. पुढे रघूजीला शाहूनें वऱ्हाडची सनद दिली व त्याच्या मोबदला रघूजीनें, " पदरी पांच हजार स्वार ठेवून साताराच्या गादीची नोकरी करीन, सालीना नऊ लक्षांचा वसूल देईन" वगैरे करार केला होता. तसेंच प्रसंगविशेषीं १० हजारपर्यंत फौज वाढवून कारण पडेल तेथें पेशव्याबरोबर स्वारीस जाण्याचाहि त्याचा करार होता.

कान्होजी भोसल्याच्या वेळेपासून गोंडवणाचा बराच भाग काबीज करून कटकप्रांतांत स्वाऱ्या करण्यास भोसल्यांनी सुरुवात केली होती, तोच क्रम पुढे रघूजीनें चालविला व वाढविलाहि. १७३८ च्या सुमारास रघूजीनें कटक लुटून उत्तरेस अलाहाबादपर्यंत स्वारी केली व तेथील सुभेदार सुजाखान याचा पराभव करून त्यास ठार मारून तेथून फार मोठी लूट घेऊन तो परत आला. या स्वारीस बाजीरावाची किंवा शाहूची संमति नव्हती, व हुकूम तोडण्याच्या भोसल्यांच्या प्रवृत्तीचेंच तें एक चिन्ह असें समजून बाजीरावानें आवजी कवडे नांवाच्या सरदारास वऱ्हाडावर स्वारी करण्याकरितां पाठविलें. पण त्याचा रघूजीनें पराभव केला. हें ऐकून स्वतः बाजीरावच त्याच्या पारिपत्यास जाणार होता; परंतु इतक्यांत नादिरशाहाच्या स्वारीची बातमी आल्यामुळें बाजीरावास तो बेत सोडून द्यावा लागला. बाजीरावाचें म्हणणें असें कीं, नर्मदेच्या उत्तरेस स्वाऱ्या करून खंडण्या घेणें ही गोष्ट रघूजीच्या अधिकारांतली नव्हती, व करारा-प्रमाणें शाहूच्या व पेशव्याच्या हुकुमाशिवाय त्यानें मुलुखगिरीवर जातां कामा नये. याच्या उलट रघूजी भोसल्याचें म्हणणें असें होतें कीं, पेशव्याचें पद केव्हांहि ब्राह्मणास मिळतांच कामा नये; व जमल्यास आपण भोसले घराण्या-पैकीं असल्यामुळें बाजीरावाकडून पेशवाईचें पद आपल्याकडे घ्यावें, इतकेंच नव्हे तर, शाहू निपुत्रिक असल्यामुळें त्याच्या मरणोत्तर आपणच साताराच्या गादीवर बसावें, असाहि रघूजीचा विचार होता असें म्हणतात.

हें भांडण विकोपास जाऊन पेशवे व भोसले यांजमध्यें लढाईच व्हावयाची. पण दिल्लीच्या मोठ्या राजकारणामुळें बाजीरावानें हें घरचें भांडण मिटविलें व समक्ष भेटींत उभयतांचा समेट झाला. कित्येकांचा असा तर्क आहे कीं, रघूजी भोसल्याची जबरदस्त महत्त्वाकांक्षा जाणून बाजीरावानें त्यास पूर्वकिनाऱ्यानें वर बंगाल्यापासून खालीं कर्नाटकापर्यंत मुलुखगिरी करण्याची कल्पना सुचवून देऊन आपला एक प्रतिस्पर्धी कमी केला; व भोसल्याच्या यापुढील स्वाऱ्याहि याच दिशेनें झाल्या. १७४० सालीं कर्नाटकावर मराठ्यांच्या फौजा गेल्या त्यांचें आधिपत्य रघूजी भोसल्याकडेच होतें. हें सैन्य कमींत कमी ५० हजार असावें. त्यानें कर्नाटकाचा नबाब दोस्त अल्ली याचा पराभव करून त्यास ठार मारलें, व दिवाण मीर असद यास कैद केलें. या विजयामुळें दक्षिण हिंदुस्थानच्या लोकांना व फ्रेंचांनाहि मराठ्यांविषयीं दहशत बसली. याच दिवाणानें पुढे नबाब सफदर

अलीशीं मराठ्यांचा तह करून दिला. त्यांत असे ठरलें कीं, नबाबानें मराठ्यांस एक कोट रुपये हप्तेबंदीने द्यावे; सफदर अलीचा प्रतिस्पर्धी चंदासाहेब यास हांकून देण्यासाठी नबाबाने मराठी फौजेचे साहाय्य घ्यावे;आणि पूर्वकिनाऱ्यावरील ज्या हिंदु राजाचे जे मुलुख सन १७३६ नतर फ्रेंच वगैरे इतर कोणी बळकावले असतील ते त्यांचे त्यांस परत द्यावे. यानतर रघूजीने फ्रेंचांच्या मागे टुमणें लावले. कारण, त्रिचनापल्ली आपल्या हातीं घ्यावी असा त्याचा बेत होता.

रघूजीने पांदिचरीच्या फ्रेंच गव्हर्नरास पत्र लिहिले की,"आमच्या महाराजांनीं तुम्हास पांदिचरी येथे राहण्याची परवानगी दिली त्यास ४० वर्षे होऊन गेलीं. तुम्ही आमच्या दोस्तीस पात्र असून आपले करार पाळाल अशी आमची खात्री होती म्हणूनच त्यांनी तुम्हास हा मुलुख राहाण्यास दिला हे उघड आहे. त्याबद्दल दरसाल खंडणी देण्याचे तुम्ही कबूल केले असून अजून कांहींच भरणा केला नाही. हल्लीं जिंजी व त्रिचनापल्ली हे किल्ले घेऊन त्यांचा बंदोबस्त करून किनाऱ्यावरील युरोपियन लोकांची खंडणी वसूल करण्याचा आम्हांला हुकूम झाला आहे. आम्ही तुम्हांवर मेहरबानगी करतो आणि तुम्ही मात्र आमच्या विरुद्ध वागतां.तरी ही खंडणी व चंदासाहेबाच्या मुलामाणसांसह त्याची पांदिचरीस असलेली सर्व दौलत स्वाधीन करून घेण्याकरता स्वार पाठविले आहेत. वसईची काय स्थिति झाली हे तुम्हीं ऐकलेंच असेल. थोड्याच दिवसांत आमचे आरमारहि इकडे दाखल होणार आहे. म्हणून निकाल सत्वर करावा."या पत्रास पांदिचरीचा गव्हर्नर ड्यूमा यानें पुढीलप्रमाणें जबाब पाठविलाः—"फ्रेंच राष्ट्रावर आजवर कोणीच कधीं खंडणी बसविलेली नाहीं. मीं खंडणी देण्याचे कबूल केले असे माझे धनी फ्रान्सचे राजे यांस कळेल तर ते माझे डोकेंच उडवतील! इकडील राजांनीं आम्हांस समुद्रकांठच्या वाळूवर किल्ला व शहर बांधण्याची परवानगी दिली. तेव्हां तेथील लोकांचा धर्म व देवालयें यांस कोणताहि उपद्रव देऊ नये एवढीच काय ती अट आम्हीं कबूल केली होती आणि ही अट आम्ही मनोभावाने पाळली आहे.त्यासाठीं आपली फौज इकडे येण्याचें कांहीं कारण नाही. तुमची मागणी कबूल न केल्यास तुम्ही फौजेसह पांदिचरीवर येणार असे लिहितां; तरी तुमचा येथे योग्य सत्कार करण्याची आमची संपूर्ण तयारी आहे. वसईचा प्रकार काय झाला तो आम्ही ओळखून आहों. मात्र वसईचा बचाव फ्रेंच लोक करीत नव्हते एवढे आपण लक्षांत ठेवावे." अखेर पांदिचरीवर हल्ला न करतां मराठ्यांची फौज परत आली.

सन १७४० मध्ये बाजीराव वारल्यावर पेशवाईचीं वस्त्रे नानासाहेबास मिळालीं;परंतु तीं न मिळण्याचा प्रयत्न रघूजीनें केला. कर्नाटकांतून लवकर परत येण्यास त्याला तेंहि एक कारण झाले. बाजीराव व बाबूजी नाइक काळे बारामतीकर यांचें, बाजीरावानें कर्जाऊ घेतलेल्या रकमेवरून, वैमनस्य आलें होतें. तेव्हां

त्यासच पुढें करून व शाहूस मोठा जबर लांच देण्याचाहि प्रयत्न करून पेशवाईचीं वस्त्रें नाइकास देण्याचा प्रयत्न रघूजीनें केला; पण तो फसला. तेव्हां रघूजी हा नाइकास बरोबर घेऊन फिरून कर्नाटकांत गेला. तंजावरच्या मराठ्यांकडून रघूजीस मदत मिळून त्यानें सन १७४१ मध्ये त्रिचनापल्ली घेऊन मुरारराव घोरपड्यास त्रिचनापल्लीचा किल्लेदार नेमले, आणि चंदासाहेबास पकडून साताऱ्यास आणून नजरकैदेत ठेवले.

रघूजी कर्नाटकांत असतां इकडे मुर्शीद कुलीखान याचा दिवाण मीर हबीब यानें रघूजीचा दिवाण भास्करपंत यास कटकप्रांतावर स्वारी करण्यास निमंत्रण केले,व ते भास्करपंतानें मान्य केले.या सुमारास याच कामाकरितां नानासाहेब हाहि हिंदुस्थानांत स्वारी करण्याकरितां निघाला आणि त्याने नर्मदातीरीं गढ व मंडळ घेतले. अलाहाबादेवर स्वारी करण्याचा त्याचा विचार होता; परंतु रघूजीने मुद्दाम माळव्यांत फिसालत केल्यामुळे पेशव्यास पूर्वेकडील मोहीम टाकून पश्चिमेकडे वळावे लागले;व प्रथम माळव्यातील बंदोबस्त केल्यावर तो अलाहाबादेवरून मुर्शिदाबादेपर्यंत आला. इकडे रघूजीहि कटवा व बरद्वान येथपर्यंत आला; पण त्यापूर्वीच पेशव्याने नबाब अलीवर्दीखान याजकडून खंडणी घेऊन हिशेब पुरा केला होता, म्हणून रघूजी परतला. माळव्यातील फिसालत रघूजीनें केली हे लक्षांत ठेवून पेशवे याने रघूजीवर हल्ला करून त्याचा पराभव केला. नंतर पेशव्याशीं तह करून रघूजी थेट साताऱ्याकडे निघाला. रघूजी भोसल्याला दमाजी गायकवाड व यमाजी शिवदेव येऊन मिळणार असल्यामुळे पेशव्याने भांडणांत थोडो माघार घेतली, व बंगालची खंडणी वसूल करण्याचा हक्क त्याने रघूजीस दिला. अशा रीतीनें दोघांनीं आपापसांत सख्य करून हिंदुस्थानचे दोन भाग खंडण्या वसूल करण्याकरितां एकमेकांत वाटून घेतले. या तहाने रघूजी भोसल्यास लखनौ पाटणा बहार दक्षिणबंगाल आणि वऱ्हाड ते कर्नाटकपर्यंतचा मुलुख या प्रांतांत वर्चस्व प्राप्त झाले. नंतर लवकरच रघूजीचा दिवाण भास्करपंत यानें वीस हजार स्वार घेऊन बंगाल्यावर स्वारी केली. परंतु अलीवर्दीखानाने तहाचे मिष करून भास्करपंतास जाफतीस बोलावून तो व त्याच्याबरोबरचे वीस लोक विश्वासघाताने ठार मारिले. पुढे रघूजीने स्वतः ओरिसा प्रांतावर स्वारी केली; परंतु गोंडवण प्रांतांत वलीशहा आणि नीलकंठशहा यांचें बंड झाल्यामुळे त्यास परत यावे लागले. त्याने देवगड व चांदा घेऊन तीं आपल्या राज्यास जोडलीं.

सन १७४९ मध्यें हैद्राबादचा सुभेदार नासिरजंग यानें रघूजी भोसल्यांस आपल्या मदतीस फौज घेऊन बोलावलें, व त्याकरितां त्याला बक्षिसादाखल कांहीं मुलुखहि तोडून देण्याचें कबूल केले. रघूजीनें ही कामगिरी आपला मुलगा जानोजी याजवर सोंपवून त्यास दहा हजार फौज देऊन कर्नाटकांत नासिर-

जंगाच्या मदतीस पाठविले. इतक्यांत शाहूराजा मरणोन्मुख झाल्यामुळे त्यानें पेशवे यशवतराव दाभाडे व रघूजी भोसले वगैरे सर्व पक्षांचे सरदार आपल्या सन्निध बोलावले. भटांच्या घराण्यातील पेशवाई काढून ती आपल्याकडे घेण्याला रघूजीला ती एक चागली सधि होती. परतु त्याच्याजवळ फौज थोडी असल्याने आणि आपल्या सलोख्याच्या धोरणाने नानासाहेब पेशव्याने त्यास वश करून घेतल्यामुळे तो प्रसग टळला. शाहूने नानासाहेब पेशव्याच्या नावे राज्यकारभाराची निरतरची सनद दिली, त्यास रघूजीने हरकत घेतली नाही. पण रामराजा हा गोंधळ्याचा मुलगा असून त्याचा खोटाच वारसा सातारच्या गादीवर प्रस्थापित केला जात आहे अशी जी गुप्त बातमी त्या वेळी पसरली होती तिजमुळे रघूजी बिथरला, व खुद्द ताराबाईने आपल्या जातीच्या लोकांदेखत रामराजास आपल्या ताटात जेवावयास घेऊन " अन्न शपथ हा माझाच नातु खरा" असे सांगितले तेव्हां त्याचे समाधान झाले. नतर पेशव्याच्या मागून रघूजी इतर जहागीरदाराबरोबर पुण्यास गेला व त्याच्या समतीने पेशव्याने पुणे ही मराठेशाहीची राजधानी केली. रघूजीने जाण्यापूर्वी गोंडवळ वऱ्हाड व बगाल या प्रांतांच्या नव्या सनदा सातारकर महाराजांकडून घेतल्या. या सनदांच्या जोरावर त्याने वरील प्रांतांत स्वामित्व प्रस्थापित तर केलेच; पण निजामासहि बराच उपद्रव दिला. त्याने आपला मुलगा जानोजी हा नासिरजंगाकडून परत आल्यावर त्यास कटक प्रांतांत पाठविले व जानोजीने अलीवर्दीखानास तबी देऊन आपला हस्तक मीर हबीब याच्या नावे बालासोरपर्यंतच्या सर्व मुलखाच्या जहागिरीची सनद मिळविली. बगाल व बहार प्रातांच्या चौथाईबद्दल बारा लक्षांची सालीना खंडणी भोसल्याने ठरवून घेतली. लवकरच पेशवे व निजाम यांच्यामध्ये युद्ध सुरू झालेले पाहून रघूजीने गाविलगड नरनाळा माणिकदुर्ग वगैरे ठाणीं व मुलुख घेतला, आणि निजाम पुण्यावर चाल करून गेला असे पाहून त्याने गोदावरी व पैनगगा यांजमधील मुलुख उध्वस्त करून मोगलांची ठाणीं हुसकून देऊन तेथे आपलीं ठाणीं बसविली.

१७५३ साली रघूजी हा वारला. त्यास चार मुलगे होते. पैकीं वडील जानोजी व साबाजी हे धाकट्या बायकोचे व मुधाजी आणि बिंबाजी हे वयाने लहान पण मोठ्या बायकोचे होते. पैकीं जानोजीस त्यानें आपल्यामागें भोसल्याच्या गादीवर बसविण्याचे ठरविले. पण मुधाजीचा व जानोजीचा तटा सुरू झाला. जानोजीने पुण्यास येऊन आपल्या वडिलाप्रमाणेच पेशव्यास करार लिहून देऊन 'सेनासाहेब सुभे' हें पद मिळविले. पण वऱ्हाडास परत जातांना त्यानें मोंगलांच्या मुलखाबरोबर पेशव्यांचा मुलुखहि लुटला ! अर्थात् जानोजीचें व पेशव्यांचें वांकडे आलें. पुढें निजामशाहींतील भांडणांत जानोजी पडला तेव्हां त्याला पराभव पावून माघार घ्यावी लागली. पानपतच्या लढाईत जानोजी नव्हता. परंतु पान

पतच्या अडचणीच्या प्रसंगाचे वर्तमान दक्षिणेत आल्यावर नानासाहेब पेशवा स्वतः फौज घेऊन उत्तरहिंदुस्थानांत निघाला, तेव्हां जानोजी भोसले हा १० हजार फौज घेऊन पेशव्यास येऊन मिळाला. पण नर्मदामुक्कामींच पानपतची सर्व बातमी कळल्यामुळे पेशव्यास परत यावे लागले. थोरल्या माधवरावाच्या कारकीर्दींत जानोजी भोसल्यानें रघुनाथरावाचा पक्ष स्वीकारला व तो पुण्यावर चालून येऊं लागला. परंतु माधवरावाने आपल्या चुलत्याच्या स्वाधीन होऊन हे भाडण त्या वेळी मिटविले. १७६६ सालीं पेशवे व नागपूरकर भोसले यांच्यांतील वितुष्ट इतके वाढले कीं, माधवरावाने जानोजीविरुद्ध निजाम अलीशीं स्नेहाचा तह करून पेशवे आणि निजाम यांच्या सयुक्त फौजेसह वऱ्हाडवर स्वारी केली. तेव्हां जानोजीचा निरुपाय होऊन त्यास उभयताशीं तह करण्याकरितां आपला बराचसा मुलुख गमवावा लागला. भोसल्याकडून घेतलेल्या मुलुखापैकीं सुमारे १५ लक्षांचा मुलुख पेशव्यांनीं निजामाचा स्नेह सपादण्याकरिता त्यास दिला. या स्वारींत नागपूरकर भोसल्याचा सुमारे २५ लक्षांचा मुलुख एकदम कमी झाला.

माधवराव व जानोजी यांचे वैर जवळजवळ आमरण टिकले. १७६८ त राघोबाने फिरून उचल खाल्ली आणि फिरून जानोजीनें राघोबाचा पक्ष उघडपणें स्वीकारून, माधवराव पुनः आपल्यावर स्वारी करील या भयाने त्याने कलकत्तेकर इंग्रजांचे साहाय्य मिळविण्याची खटपट सुरू केली. लवकरच मराठे व निजाम या दोघानींहि नागपुरावर स्वारी केली. प्रथम ते वऱ्हाडांत शिरले तेव्हां जानोजी व मुधाजी यानीं आपले कबिले गाविलगडास ठेवून पेशव्याशी गनिमी काव्याने लढण्याचा विचार केला. माधवरावाने नागपूर शहर घेऊन लुटलें व चंद्रपुरास (चांद्यास) वेढा घातला. असे पाहून जानोजीनेहि उलट पेशव्याच्या मुलुखावर स्वारी करण्याचे ठरविलें व अहमदनगरावरून तो पुण्याकडे निघाला. भोसले पुण्यावर येतात अशी बातमी येतांच पुण्यांतील लोकांनी आपली मालमत्ता घेऊन पुण्याबाहेर पळ काढला! जानोजीने पुण्याच्या आसपास बरीच लूट केली, असें पाहून पेशव्यानें चांद्याचा वेढा उठवून तो पुण्याकडे परत फिरला. अशा रीतीने भोसले व पेशवे या दोघांनीं एकमेकाच्या राजधान्या लुटल्या आणि पुष्कळ खराबी करून घेतली; पण प्रत्यक्ष लढाईचे तोंड न लागल्यामुळें विजय असा कोणासच मिळाला नाही. तेव्हां दोघेहि कटाळून तहास प्रवृत्त झाले, आणि १७६९ च्या मार्चमध्ये भीमेच्या कांठीं कणकापूर येथे पेशव्यांना अनुकूल असा तह झाला. या तहांत असे ठरले कीं, भोसल्याने पेशव्यांच्या मुलुखांत घासदाणा वसूल करू नये व निजामाच्या मुलुखांतील घासदाण्याबद्दल नक्त नेमणूक ठरवून घ्यावी; पेशव्याच्या हुकमाशिवाय भोसल्यानें आपली फौज वाढवूं नये अथवा कमी करूं नये, व तसेच ठरलेल्या फौजेनिशीं पेशवे सांगतील तेथे हजर राहावे; दिल्लीचा बादशहा निजाम इंग्रज रोहिले आणि अयोध्येचा नवाब

यांपैकीं कोणाशींहि स्वतत्र रीतीनें राजकीय पत्रव्यवहार करूं नये; पेशव्यांस पांच हप्त्यांनीं मिळून ५ लक्ष रुपये खंडणी द्यावी. उलटपक्षीं पेशव्यांनीं असा करार केला कीं, पेशव्याच्या फौजेने हिंदुस्थानांत जातांना भोसल्याच्या मुलुखास उपद्रव देऊं नये. भोसल्यावर स्वारी झाल्यास पेशव्यांनी आपली फौज पाठवून त्यास मदत द्यावी, व दरबारची चाकरी नसेल तेव्हां भोसल्याच्या फौजेस बगाल्याकडे इंग्रजांवर स्वारी करण्यास परवानगी द्यावी. अशा रीतीनें माधवरावानें भोसल्याशीं निम्मे धन्याचे व निम्मे स्नेह्याचे नातें राखून तह केला.

माधवरावाच्या मरणानंतर जशीं पुण्यास तशींच नागपुरासहि भांडणे सुरू झालीं. माधवरावाच्या मरणापूर्वीं जानोजीनें पेशव्याच्या परवानगीनें आपला भाऊ मुधाजी याचा मुलगा रघूजी हा दत्तक घेऊन मुधाजीस त्याचा पालनकर्ता नेमले. जानोजी १७७३ त वारल्यावर मुलाचे पालन कोणीं करावे-अर्थात् रीजन्सीचा अधिकार कोणीं गाजवावा याविषयीं भांडण सुरू झाले; व ते तोडण्याकरिता पुण्यास आले. मुधाजी हा रघुनाथरावाच्या पक्षाचा व साबाजी नारायणरावाच्या पक्षाचा होता. पुण्यास कोणाच्याच मनासारखा निकाल होईना तेव्हां भोसल्यांत युद्ध सुरू झाले आणि या युद्धांत पेशवे निजाम एलिचपुरचा नबाब वगैरे मंडळी सामील झाली. पुढे लवकरच नारायणरावाचा वध झाला. या प्रकरणांत भोसल्यांचा संबंध अंतःस्थ व दूरचा होता म्हणतात. राघोबाच्या भांडणांत साबाजीनें नाना फडणविसाच्या पक्षास फौज घेऊन मदत केली, व सवाई माधवराव पेशव्यास साताऱ्याहून वस्त्रे येतांच नाना फडणविसाने धाकट्या रघूजीचे 'सेनासाहेब सुभे' हें पद काढून घेऊन ते साबाजीस दिलें. पण पुढे लवकरच मुधाजीने साबाजीशीं युद्ध आरंभून त्याला आपल्या हाताने गोळी घालून ठार मारले व धाकट्या रघूजीच्या पालनकर्तेपणाचा हक्क परत मिळविला. पण मुधाजीला निजामानें स्वस्थ बसूं दिलें नाहीं. त्याने इब्राहीम बेग (धौशा) यास मुधाजीवर पाठविले; तेव्हां मुधाजी शरण येऊन त्याने आपले अनेक किल्ले देऊन व गोंडवणचा बंदोबस्त राखण्याचे कबूल करून निजामाशीं तह केला. तसेच पुणे-दरबाराशीं बोलणें लावून व दहा लक्षांचा रोखा लिहून देऊन आपले कारभारीपण कायम करून घेतलें आणि कलकत्त्यास इंग्रजाच्या दरबारींहि आपला वकील ठेवला.

पुढें मराठ्यांचें व इंग्रजांचें युद्ध सुरू झाले. तेव्हां इंग्रजांनीं मुधाजीस आपणाकडे वळवून घेण्याची खटपट केली. पूर्वीं निजामाचा दिवाण विठ्ठल सुंदर यानें मुधाजीस मराठेशाहीचा राजा करण्याचें आमिष दाखवून आपल्या पक्षाकडे ओढण्याचा जो प्रयत्न केला होता तोच हेस्टिंग्ज यानें आतां केला. वास्तविक नागपूरकर भोसल्यांचा साताऱ्याच्या गादीवर कोणत्याहि प्रकारचा हक्क नाहीं हें पूर्वींच ठरून गेलें होतें; पण हेस्टिंग्ज याच्या हातीं पुणेंदरबाराविरुद्ध आयतें एक बाहुले मिळालें तें त्यानें कां सोडावे ? मुधाजीस खरें इंगित माहीत होतें म्हणून त्यानें

स्वतःस साताऱ्च्या गादीवर बसविण्याचा इंग्रजाचा वर न घेतां साताऱ्यास कैदेंत असलेल्या महाराजांचें प्रतिनिधित्व आपल्यास मिळाले असतां पुरे, असें जाणून इंग्रजांशीं तह करण्याचे लांबणीवर टाकले. पुरंदरच्या तहानतर इंग्रजांनीं मराठ्यांची फिरून कुरापत काढली, तेव्हां सर्व मराठे इंग्रजांविरुद्ध झाले. त्याबरोबर मुधाजीसहि कटकप्रांतांत इंग्रजांविरुद्ध सैन्य पाठविण्याचा बहाणा करावा लागला. पण त्याचे लक्ष आंतून इंग्रजांकडे होतें. इंग्रजांनीं त्यास सोळा लक्ष रुपये अंतःस्थ देऊहि केले. मुधाजीने पन्नास लक्षाची मागणी केली, परंतु त्याहून थोडे रकमेवर हा सौदा ठरून मराठासघांतून हेस्टिंग्जने नागपूरकर भोसल्यास फोडून आपणाकडे घेतले. त्या वेळी भोसल्याच्या पदरी तीस हजार स्वार असून पुणे-दरबारच्या धोरणाने मुधाजी बंगाल्यावर स्वारी करता तर त्याला थेट कलकत्त्यापर्यंत जातां आले असते. नाना फडणविसास मुधाजीच्या फितुराची बातमी समजतांच त्याने मुधाजीचा सूड घेण्याचा निश्चय जाहीर केला. तें कानी येतांच मुधोजीनेहि आपले धोरण बदलून "फक्त हैदराविरुद्ध मदत करण्यास मी तुम्हांस बांधला गेलो आहे, मराठ्यांविरुद्ध नाही. मात्र वाटेल तर तुमचा व मराठ्यांचा तह होण्याकरितां मी मध्यस्थी करतो" असे बोलणे इंग्रजांशीं सुरू केलें; पण अखेर सालबाईचा तह भोसल्याच्या मध्यस्थीशिवायच झाला. नंतर नानाचें वजन फारच वाढले आणि इंग्रजहि त्याची मदत चाहू लागले, असे पाहून मुधाजीने पुणे-दरबाराशी स्नेह वाढविण्याचा प्रयत्न सुरू केला. टिपूवरील मोहिमेत तो स्वतः फौज घेऊन हरिपंत फडक्याच्या मदतीस गेला होता; पण मराठ्यांनीं बदामी घेतल्यावर आपला मुलगा व फौज मागे ठेवून तो नागपुरास परत गेला.

मुधाजी सन १७८८ साली मरण पावला. मुधाजीस रघूजीशिवाय खंडोजी आणि वेंकाजी ऊर्फ मन्याबापू असे मुलगे होते. खंडोजीकडे भोसल्याच्या जहागिरीचा उत्तर भाग आणि वेंकाजीकडे दक्षिण भाग होता. टिपूवर मोहीम निघाली तेव्हां पेशव्यांनीं रघूजीस आपली फौज घेऊन मदतीस बोलावलें व त्याप्रमाणे तो आलाहि; पण खुद्द पेशवे जातीने ज्या मोहिमेवर सेनापति म्हणून निघतात त्याच मोहिमेत व फक्त पेशव्यांचेच हाताखालीं आपण सरदार म्हणून नोकरी करू, इतरांचे हाताखालीं करणार नाहीं असें रघूजीने सांगितले. शेवटीं फौजेच्या खर्चाकरितां दहा लक्ष रुपये देण्याचे कबूल केल्यावर पेशव्याकडून रघूजीस नोकरीची माफी मिळाली. लवकरच खंडोजी हा वारला. तेव्हां रघूजीने वेंकाजीस चांदा व छत्तिसगड यांची जहागीर दिली. यापुढे आठदहा वर्षें भोसल्यांचा पेशव्यांच्या कारभारांत फारसा संबंध आला नाही, तो फिरून बाजीरावास गादीवर बसविण्याच्या कारस्थानाच्या वेळीं आला. या वेळीं नाना फडणविसांनीं जो मोठा व्यूह रचला त्यांत त्यांनीं रघूजीस पंधरा लक्ष रुपये, मंडला प्रांत व चुरियागड हा किल्ला देण्याचें कबूल करून त्याला आपल्या पक्षाकडे घेतले. याच

वेळीं संधि साधून पेशव्यांची नोकरी करण्याच्या बाबतींत रघूजीनें आणखीहि कांही सवलती मिळविल्या. सन १८०१–१८०२च्या शिंदेहोळकरांच्या भांडणांत रघूजीने शिंद्याचा पक्ष स्वीकारून आणीबाणीच्या वेळीं त्याची फौज नर्मदापार करून देण्यास पुष्कळ मदत केली. पुढे वसईचा तह झाल्यावर फिरून लवकरच तो मोडावा असें बाजीरावाच्या मनांत येऊं लागलें. शिवाय या तहाची गोष्ट त्यानें शिंदे भोसले वगैरेंना कळविली नव्हती. म्हणून ती कळविण्याकरितां पेशव्याने नारायणराव वैद्य नांवाचा गृहस्थ रघूजीकडे पाठविला, व फौज घेऊन पुण्याकडे येऊन होळकराचे पारिपत्य करण्याविषयीं त्यास विनति केली. दौलतराव शिंद्याप्रमाणे रघूजी भोसल्यासहि वसईचा तह सर्वथैव अमान्य होता. लवकरच शिंद्याचा कारभारी यादवराव भास्कर हा रघूजीकडे गेला, व दोघांनीं मिळून हा तह हाणून पाडण्याचा निश्चय केला. असईच्या लढाईंत रघूजी स्वतः फौज घेऊन शिंद्यास येऊन मिळाला होता; परतु युद्धास सुरुवात होतांच तो निघून गेला. ता. ३१ आक्टोबर सन १८०३ रोजीं रघूजीने इंग्रजांच्या रसदीवर आपल्या पांच हजार घोडेस्वारांकडून हल्ला करविला; पण तो निष्फळ झाला. रघूजी युद्धांत सामील झाल्यामुळे इंग्रजांनीं बंगाल्याकडून कटक प्रांतावर स्वारी केली. तेव्हां रघूजी आपल्या मुलखाकडे परत फिरला. डिसेंबरांत तहाचे बोलणे सुरू झाले; व शेवटीं असे ठरले कीं, रघूजीने इंग्रजांस कटक व बालासोर हे परगणे, तसेच वर्धा नदीच्या पश्चिमेकडील आणि नरनाळा गाविलगड यांच्या दक्षिणेकडील मुलुख तोडून द्यावा; मात्र हे दोन किल्ले आणि आसपासचा चार लक्षांचा मुलुख त्याजकडे रहावा. निजामावरील सर्व दावे सोडून द्यावे; निजाम व पेशवे यांच्याशी असलेल्या भोसल्याच्या वादांत इंग्रजाची मध्यस्थी मान्य करावी व परस्पर दरबारीं वकील ठेवावे. या तहास देवगांवचा तह म्हणतात. शेवटल्या कलमाप्रमाणे माऊंट स्टुअर्ट एल्फिन्स्टन याची नागपुरास रेसिडेंट म्हणून नेमणूक करण्यांत आली. हा तह रघूजीस मनातून मान्य नव्हता; पण सर्व बाजूंनीं त्यास कमकुवतपणा आल्यामुळे त्याचे कांही चालेना. भोसल्याची फौज शिंदे-होळकरांच्या फौजेपेक्षां कमी प्रतीची होती. यामुळे अमीरखानाच्या पेंढाऱ्यांनीं १८०९ सालीं वऱ्हाडास म्हणजे रघूजीच्या मुलखास जो उपद्रव दिला त्याचा प्रतिकार करण्याच्या कामीं त्याला इंग्रजांची मदत घ्यावी लागली. १८१४ च्या सुमारास इंग्रजांनीं रघूजीकडे फिरून एक नवा तह करण्याचे बोलणें लावले. त्याचा उद्देश असा होता कीं, इंग्रजांवर कोणी उठल्यास त्याच्या संरक्षणास भोसल्यांनीं मदत करावी; पण रघूजीने ही सूचना मान्य केली नाहीं.

१८१६ सालच्या मार्च महिन्यांत रघूजी वारला; आणि त्याच्या मागून त्याचा मुलगा परसोजी हा सेनासाहेब सुभे झाला. पण तो अर्धवट असून त्याचा

चुलतभाऊ मुधाजी ऊर्फ अप्पासाहेब (वेंकाजीचा मुलगा) हा कारभार पाहूं लागला. अप्पासाहेब १८०३ सालच्या युद्धांत सामील असून अरगांवच्या लढाईत मराठी सैन्याचें आधिपत्य त्याच्याकडे होतें. परतु इंग्रजांचा स्नेह संपादून आपला अधिकार कायम करण्याकरितां त्याने स्वतः इंग्रजांशीं बोलणें लावून रघूजीने पूर्वी अमान्य केलेला तह मान्य करण्याचें कबूल केले. त्या तहाने असें ठरलें की, एक हजार घोडेस्वार व सहा हजार पायदळ यांच्या खर्चास मदत म्हणून भोसल्यांनीं इंग्रजांस दरसाल ७॥ लक्ष रुपये द्यावे. शिवाय इंग्रजांचे तीन हजार घोडेस्वार व २ हजार पायदळ भोसल्यांनीं आपल्या तैनातीस ठेवावे. पण इतके करूनहि पेशव्यांच्या मदतीने इंग्रजांची खोड मोडण्याची त्याच्या मनांतील खुमखुम गेली नव्हती. १८१७ साली परसोजीचा खून झाला तो अप्पासाहेबानेंच करविला असा अपवाद आहे. परसोजीमागून नागपूरची सरदारी अप्पासाहेबास मिळाली. येथून पुढे त्याचा व बाजीरावाचा पत्रव्यवहार गुप्त रीतीने बरेच दिवस चालू होता. बाजीरावाचें व इंग्रजाचें वैमनस्य उघड पडण्याच्या सुमारास अप्पासाहेबाने आपली फौज वाढविण्यास सुरुवात केली. ता. २४ नोव्हेंबर १८१७ रोजीं बाजीरावाने पाठविलेला जरीपटका व सेनापति हे पद यांचा अप्पासाहेबानें उघड स्वीकार केला. लवकरच भोसले व इंग्रज यांजमध्ये उघड युद्ध सुरू होऊन सीताबर्डी येथे लढाई झाली व डिसेंबर ता. १५ रोजी अप्पासाहेब इंग्रजांस शरण आला. तेव्हां इंग्रजांनी फिरून त्यास गादीवर बसविले; पण त्याचा २४ लक्षांचा मुलुख ताब्यांत घेऊन सर्व लष्कर आपलेकडे ठेवले. दुर्दैवाने अप्पासाहेबाच्या फितुरीचा फिरून संशय वाटून रेसिडेंट जेंकिन्ससाहेब यानें त्यास कैदेत ठेवले. बाजीराव पळ काढीत असतां तो चांद्याकडे वळला त्या वेळीं बाजीरावास मदत देण्याचा व गोंड लोकाकडून बंड करविण्याचा अप्पासाहेबाने प्रयत्न केला असा त्याजवर आरोप होता, आणि म्हणून अप्पासाहेबास पकडून अलाहाबादच्या किल्ल्यांत कैदेंत ठेवण्यांत आले होते; परतु आपल्या पहारेवाल्यास वश करून घेऊन त्याने त्याचा पोषाख मिळविला व तो मे महिन्यांत कैदेतून निसटून जाऊन महादेवाच्या डोंगरांत आश्रय धरून राहिला. या ठिकाणी पेंढाऱ्यांचा एक सरदार त्याला येऊन मिळाला व त्यांनी आसपास पुष्कळच धामधूम माजविली. मागे (दुसऱ्या) रघूजीच्या विधवेने दत्तक घेतला व त्याच्या नांवाने रीजन्सीचा कारभार चालू झाला. इंग्रजांनीं अप्पासाहेबावर फौज पाठविली; परतु तिला चुकवून अप्पासाहेब निसटून अशिरगडावर गेला आणि तो किल्ला बळकावून बसला. किल्ल्यास जनरल डव्हटन व मालकमसाहेब या उभयतांच्या फौजांनीं मिळून वेढा घातला. परतु अप्पासाहेबाने वीस दिवस किल्ला लढविला ! अखेर इंग्रजांनीं ता. ९ एप्रिल सन १८१९ रोजीं किल्ला सर केला; पण अखेर अप्पासाहेब तेथूनहि निसटून शीखराजांच्या आश्रयास जाऊन राहिला. १८५७ च्या बंडापूर्वी लॉर्ड डलहौसी

याच्या कारकीर्दींत जीं नेटिव्ह संस्थाने ब्रिटिश राज्यलोभाच्या पुरांत वाहून गेलीं, त्यांत नागपूरचे राज्यहि १८५३ मध्ये नष्ट झाले.

---

## सावंतवाडीकर भोसले व इंग्रज

सावंतवाडीचे सावत हे प्रसिद्ध भोसले घराण्यातीलच आहेत. त्यांस सावत असे म्हणतात, व त्यांच्यावरून सावतवाडी हे नांव पडले आहे. या सावंतांचा मूळ पुरुष विजयनगरच्या राज्याच्या वेळीं प्रसिद्धीस आला. सोळाव्या शतकाच्या सुमारास गोवे—सावंतवाडी हा प्रांत विजापूरच्या पातशाहीच्या सत्तेखालीं गेला, तेव्हां सावत हे विजापूरकरांच्या आश्रयाने राहू लागले. शिवाजीने कोकणप्रात जिंकला तेव्हां लखम सावंत याने तो प्रांत शिवाजीच्या हातून सोडवण्यास बादशहाची परवानगी घेतली; पण शिवाजीने त्याचा पराभव करून कुडाळ प्रांतांत शिरून ठाणीं व किल्ले घेऊन लखम सावतास जेरीस आणले, तेव्हां तो पोर्तुगीजांच्या आश्रयास गेला. पुढे शिवाजीने पोर्तुगीज लोकांवरहि स्वारी करून फोंडा किल्ला घेतला. तेव्हां पोर्तुगीज लोक शरण येऊन त्यांनीं शिवाजीस तोफांचा नजराणा पाठविला. सावत निराश्रय होऊन त्याने शिवाजीशी १६५९ सालीं तह केला. त्यांत सावताने असे कबूल केले कीं, "कुडाळ प्रांताच्या वसुलांतून सहा हजार होन घेऊन पदरी फौज ठेवून पडेल तेव्हां शिवाजीची नोकरी करीन." शिवाजीने सावतास या प्रांताची देसगत बहाल करून 'सावतबहाद्दर' हा किताब दिला. पण लखम सावत फिरून विजापुरकरास जाऊन मिळालाच. त्याने १६६४ त शिवाजीचीं ठाणीं बादशहास देऊन मालवण गांव इनाम करून घेतला व शिवाय आणखीहि कांही हक्क घेतले. रांगणा किल्ल्यावर विजापूरच्या फौजेने हल्ला केला तेव्हां लखम सावत हा तींत सामील होता. पुढे कुडाळ येथे शिवाजीच्या व विजापूरच्या फौजांची लढाई झाली, त्यांत लखम सावताने फार शौर्य दाखविले.

सावंत व इंग्रज यांचा संबध प्रथम सन १६७४ सालीं आला. सावत हे कोकणपट्टीवर दर्यावर्दीपणा करीत; व या सालीं ते एक गलबत पकडून लुटीत असतां एका इंग्रज व्यापारी गलबताशीं त्यांची लढाई झाली. या लढाईसंबधाने फायर नांवाच्या इंग्रजानें खालीलप्रमाणे लिहिले आहे: "यांच्यांनी आमच्यावर दारूगोळा बराच उडविला, गोफणीने दगड मारिले व भालेहि फेंकले. त्यांचे गलबत आमच्या गलबताच्या दसपट मोठे होते. त्यांची तयारी कडेकोट होती. वल्हीं मारणारांखेरीज सुमारे ६० लढाऊ लोक होते." लखम सावंत १६७५ त वारला. त्याने आपल्या नांवाचें नाणें पाडलें होते. शिवाजीचे मरणोत्तर मोंगलांनीं कोकणावर स्वारी केली. शिवाय सावंताचा विजापूरचा आश्रय जाऊन कुडाळचे मूळचे मालक प्रभू हेहि त्यावर उठले; तेव्हां खेम सावंत यानें १६८९ सालीं

औरंगजेब बादशहाकडून देशमुखीची व मनसबदारीची सनद मिळविली. नंतर आंग्रे हे प्रबळ झाले. त्यांची व सावंतांची अनेक युद्धे झाली. सन १६९७ त प्रभू घराण्याचा शेवट होऊन सावंतांनी कुडाळप्रांत हस्तगत केला. आंग्र्या प्रमाणे पोर्तुगीजांशींहि सावंतांच्या बऱ्याच लढाया झाल्या. १७०७ सालीं औरंगजेब मेल्यावर त्याचा मुलगा मो-अजीम याने सावतांची दिल्लीच्या गादीसंबंधाच्या भांडणांत कुमक घेतली होती. पण मोगलांचा इकडचा अंमल लवकरच संपल्यामुळे सावतांनीं मराठ्यांची कांस धरली. खेम सावत हा प्रथम शाहूच्या विरुद्ध ताराबाईस जाऊन मिळाला; व १७०८ सालीं त्याने ताराबाईकडून कुडाळ परगणा मिळविला. पुढे शाहूचा विजय होऊन ताराबाई कोल्हापुराकडे निघून गेली तेव्हां खेम सावत शाहूस मिळून त्याने निम्मा साळशी महाल इनाम करून घेतला. या कारणाने सावताची व कोल्हापुरकरांची युद्धे सुरू झालीं. १७२० सालीं सावताने आंग्र्याविरुद्ध इंग्रजांशी तह केला. सन १७३० च्या दुसऱ्या तहांत असें ठरलें की, इंग्रजांनी सावतास तोफा पुरवाव्या व समाइक फौजेंन जिकलेले किल्लेकोट सावताना मिळावे. एतद्देशीय संस्थानिकाशी इंग्रजांचे जे तह झाले त्या सर्वांत सावतांचा हा तह पहिला असे म्हणतात.

फोंड सावत याने बरेच नवीन किल्ले बांधले. त्याचा मुलगा रामचंद्र व जयराम सावत हे बरेच प्रसिद्धीस आले. १७३८ सालीं सावतांनी पोर्तुगीजांचा पराभव करून बऱ्याच तोफा व निशाणे मिळविलीं. १७३९ सालीं पेशव्यांनी वसई घेतली, त्यांत सावतांनींहि थोडीबहुत मदत केली. पुढे १७४० त त्याचा व पोर्तुगीजांचा तह झाला त्यांत सावतास पोर्तुगीजांकडून २५ हजार रु. खंडणी मिळाली. १७४९ साली सावत व मराठा सरदार भगवतराव पंडित यानी आंग्र्यावर स्वारी करून त्याचा बराच मुलुख घेतला. पुढच्या वर्षीं त्यांची व आंग्र्यांची बरींच युद्धें झालीं. त्यांत सावतांची बरीच कीर्ति झाली. १७५२ साली सावत घराण्यामध्ये गृहकलह सुरू झाला, तेव्हां पेशवे मध्यें पडून त्यांनी तो तोडला. या कलहामुळे सावतांपैकीं एकाने पोर्तुगीजांचा आश्रय केला. या योगाने भांडणाचे मूळ शिल्लक राहिले. १७५६ सालीं प्रभू घराण्यापैकीं एकानें कुडाळप्रांत परत मिळविण्याकरितां पेशव्यांची मदत घेतली. १७६२ त जिवबादादा बक्षी केरकर (हा मूळचा सावतवाडीचा राहणारा होता) हा शिंद्याच्या दरबारात मोठा मानकरी व सरदार बनला होता त्याच्या मध्यस्थीने जयाप्पा शिंद्याची मुलगी व खेम सावत याचे लग्न घडून आले. अशा रीतीनें जिवबादादाने आपल्या मूळच्या यजमानाचे उपकार फेडले व शिंदे आणि सावंत यांची सोयरीक झाली. पुढें सावंतवाडीकरांच्या चांचेगिरीमुळे इंग्रजांचा व त्यांचा बेबनाव होऊ लागला. १७६५ साली इंग्रज आणि सावत यांचा लढाईनंतर तह होऊन त्यांत असें ठरलें कीं, सिंधुदुर्गाचा तनखा इंग्रजांस मिळतो तो सावतांनीं घ्यावा,

युद्धखर्चाबद्दल इंग्रजांस सावतांनीं १ लक्ष रुपये, कांहीं मुलुख व भरतगड किल्ला द्यावा, सावतांनीं पदरीं आरमार ठेवूं नये, आणि युरोपियन लोक चाकरीस ठेवू नयेत; उलट इंग्रजांनीं सावतास दारूगोळा वगैरे लढाईचा सरंजाम माफक किंमतीने विकावा. पण ह्या तह न पाळला गेल्यामुळे पुढें सावतास अधिक कडक अशा अटींचा तह मान्य करावा लागला. १७८४ सालीं जिवबादादा याने शहालम बादशहाकडून सावंतास राजेबहादूर हा किताब व मोर्चेलांचा बहुमान मिळवून दिला. सावत हे शिंद्याशी नाते जोडल्यामुळे सातारकर भोसल्याचे ऋणानुबंधी झाले; म्हणून कोल्हापूरकरानीं १७८७ सालीं सावतांशी लढाई सुरू केली. तेव्हां सावतांना शेजारच्या पोर्तुगीजांचे साहाय्य घेणे भाग पडले. या युद्धांत कोल्हापूरकरांनीं सावताची कित्येक ठाणीं घेतलीं ती त्यांस परत मिळवून देण्याबद्दल शिंद्यामार्फत पुण्याच्या दरबारीं खटपट सुरू झाली, व शेवटीं परशुरामभाऊनें करवीरकरांवर स्वारी केल्यानतर कोल्हापूरकरांनीं तीं ठाणीं सावंतास परत दिली. पुढे पोर्तुगीजांनी कुरापत काढून व सावतांशी युद्ध करून त्याचीं कांही ठाणीं घेतलीं; पण लवकरच सावताने पोर्तुगीजाचा पराभव करून सर्व फोंडा महाल परत मिळविला.

१७९६ साली जिवबादादा बक्षी वारल्यामुळे सावतांचा मोठा आश्रय गेला. स्वतः खेम सावत हाहि १८०३ सालीं वारला. हा राजा विद्येचा भोक्ता म्हणून फार प्रसिद्ध होता. याने साधुसतास धर्मादायहि पुष्कळ केला होता. त्याच्या मागें त्याच्या चार बायका होत्या. त्यांनीं पुढे राज्यकारभार चालविला. त्यांना पुष्कळ शत्रु असून गृहकलहामुळे त्यांच्या कारकीर्दीत फार उलाढाली झाल्या, त्या सविस्तर देत बसण्याचे कारण नाहीं. या कलहामुळे सावतांची सांपत्तिक स्थिति अतिशय खालावली; पोर्तुगीज करवीरकर यांनीं तर त्यांची फार पाठ पुरविली. १८०५ त थोरली स्त्री लक्ष्मीबाई इने भाऊसाहेबास दत्तक घेऊन गादीस धनी केला पण एकी झाली नाहीं. १८०८ सालीं भाऊ-साहेबाचा खून झाला. लक्ष्मीबाईहि १८०८ सालीं वारली. नतर खेम सावं-ताची दुसरी बायको दुर्गाबाई इने राज्यकारभार हातीं घेतला. ही बाई कार-स्थानी हुषार दक्ष न्यायी व स्वाभिमानी असल्याची प्रसिद्धि आहे. तिने गृह-कलह मिटविण्याकरितां फोंड सावत यास गादीवर बसविले.

१८१२ सालीं इंग्रजांनीं सावंतवाडीच्या आसपास होणारी चांचेगिरी बद करण्याच्या निमित्ताने सावंतवाडीकरांमागे टुमणे लावलें. तेव्हां मडुरे येथे तह होऊन असे ठरले कीं, सावतांनीं आपलीं सर्व जहाजे वेंगुर्ल्याचा कोट व बातेऱ्याचीं ठिकाणे इंग्रजांच्या स्वाधीन करावीं; इंग्रजांनीं तपासून परवाना दिल्याशिवाय कोणतेहि जहाज बदराबाहेर सोडू नये, व बदोबस्ताकरितां इंग्र-जांचे सैन्य मुलखांत राहू द्यावे. याच सालीं फोंड सावंत हा मरण पावला. त्याचा

मुलगा बापूसाहेब यास दुर्गाबाईनें गादीवर बसविले. १८१३सालीं इंग्रजांनीं कोल्हापुरकरांचा पक्ष धरून आपली फौज पाठवून भरतगड किल्ला सावंताकडून कोल्हापुरकरांस देण्यास भाग पाडलें.आणि वेगुर्ल्याचा किल्ला आपणाकडे घेतला. नंतर फिरून सैन्य पाठवून इतर कित्येक मुलुख मोबदला करून आपणास इवा तो सक्तीनें त्यांनीं आपल्या ताब्यांत घेतला.१८१९सालीं रेडीनिवती व बांदे येथील किल्लेही इग्रजांनीं आपल्याकडे घेतले. दुर्गाबाईहि या सालीं वारली.तिच्यामागून खेम सावताच्या उरलेल्या दोन बायका कारभार पाहू लागल्या. परतु पुरुष कारभारी कोण नेमावे हे ठरविण्याचा अधिकार आपला राहील असें सांगून इग्रजांनीं कॅप्टन हचिनसन यास सावतवाडीस रेसिडेट म्हणून नेमलें. १८२२ सालापासून हे काम रत्नागिरीच्या कलेक्टराकडे सोंपविण्यांत आले. यापुढें कोल्हापूरकरांनी घाटाखालील गांवांत वसूल मागू नये व त्याबद्दल वाडीकरांनीं कोल्हापूरकरांना सालिना७८२४रुपये देत जावे असा इग्रजांनीं उभयतांमध्ये ठराव केला. १८२३ पासून बापूसाहेब स्वतंत्र रीतीने कारभार पाहू लागले. १८३० सालीं वाडीकरांविरुद्ध बड झाल्यामुळे सावतास इग्रजांची फौज आणवावी लागली. १८३२ त इग्रजसरकारानें सस्थानचे कर्जवाम कमी होण्याकरतां जमाखर्च ठरवून दिला. १८३५ त वाडीसंस्थानांत फिरून एक बड झाले, तें ब्रिटिश फौज येऊन तिनें मोडले.१८३६त सावताकडून इग्रजांनीं जकाती घेतल्या. १८३८ त राजाच्या नालायखीमुळें इग्रज सरकाराकडून पोलिटिकल सुपारिटेंडेंट नेमण्यांत आला. पुढे कित्येक वर्षे सावंतवाडीस एकसारखीं बडे होत होती. सावतवाडी प्रांत बडे करण्यास फार सोईचा असून लोकहि रगेल होते. गोव्याच्या सरहद्दीकडून त्यांस दारूगोळा मिळे. १८४७ त उरलेल्या बडखोरांस माफी होऊन सस्थानांत येण्याची मोकळीक मिळाली. तेव्हां ते येऊन लष्करांत नोकऱ्या पतकरून राहिले.सस्थानचा युवराजहि या बडांत सामील झाला होता.

---

## शिंदे व इंग्रज

शिंद्यांचा मूळ पुरुष राणोजी हा कण्हेरखेडचा पाटील. बाळाजी विश्वनाथ पेशव्याच्या पदरीं तो नोकरीस असतां मुख्य हुजऱ्याचे काम त्याला मिळालें. बाजीरावानें एक दिवस आपले जोडे उराशीं घेऊन निजलेला असा राणोजीस पाहून व त्यावर कृपावत होऊन त्याला पागेचे काम सांगितलें. तेथून आपल्या पराक्रमाने राणोजी इतक्या योग्यतेस चढला कीं,मराठ्यांच्या मुख्य सरदारांपैकीं तो होऊन बसला एवढेच नव्हे,तर महमदशहा पातशहाजवळ बाजीरावाचा जामीन पटविण्याचा प्रसंग आला तेव्हां राणोजीची सही जामीनकदब्यावर घेतली गेली! राणोजी माळव्यांत नोकरीवर असतांच वारला. त्याचे मुलग्यांपैकीं जयाप्पा व

दत्ताजी हे दोघेहि शूर शिपाई असून त्यांनी सरकारचाकरी उत्तम केली. राणोजीच्या रजपूत राणीपासून त्याला महादजी व तुकोजी असे दोन मुलगे झाले.जयाप्पाचा खून होऊन दत्ताजी दिल्लीकडे लढाईत पडला. राणोजीच्या मागून जयाप्पाचा मुलगा जनकोजी सरदार झाला. तोहि अत्यंत शूर असून पानिपतच्या युद्धांत मरण पावला. पानिपतच्या युद्धांतून परत आल्यानंतर महादजीकडे पेशव्यांच्या हुजरातपथकाचे काम देण्यांत आले.शिवाय त्याच्याजवळ स्वतंत्र अशी फौजहि बरीच होती. अबदाली काबुलास परत गेला असे समजताच मराठे पुनः उत्तरहिंदुस्थानभर पसरले.त्या वेळी महादजी हा विसाजी कृष्ण बिनीवाले याच्या हाताखाली सरदारीचे काम करीत होता. पण लवकरच महादजीने स्वतंत्रपणे मुलुख व खंडण्या मिळविण्याचा क्रम सुरू केला, व त्यांत त्याला फार यश आले. नानासाहेब पेशव्याच्या मृत्यूपासून महादजीस पेशव्यांच्या दरबारात सर्व सरदारांवर वर्चस्व मिळाले. त्याचा व नाना फडणविसाचा उत्कर्ष समकालीन होता. इंग्रजांशीं पेशव्याचे जे युद्ध झाले त्यात पेशव्यांची मुख्य भिस्त शिंद्यावर होती.वडगांवास पराभव करून इंग्रजाकडून पेशव्याना अनुकूल असा तह त्यानेंच करून घेतला; व पुढे सालबाईच्या तहाच्या वेळीं इंग्रज व पेशवे याच्या दरम्यान मध्यस्थी करून उभयतांना तह पाळण्याच्या कामीं,स्वतंत्र संस्थानिक या नात्याने, जामीनहि तोच पटला.दिल्ली काबीज करून पातशहा शहाअलम यास आपल्या ताब्यांत घेतल्यावर त्याने पातशहाकडून पेशव्यांच्या नांवे वकील मुतलकीची सनद घेतली.

उत्तरहिंदुस्थानांत शिंदे व इंग्रज हे दोघेहि वावरत असल्यामुळे त्याचे परस्पर वैमनस्य अर्थातच पडले. दिल्ली व दिल्लीचा पातशहा स्वाधीन करून घेण्याची दोघांचीहि खटपट सुरू होती, आणि महादजीच्या मरणापर्यंत इंग्रजांचा हा डाव साधला नाहीं. पण सन १७९४सालीं तो मृत्यु पावताच इंग्रजाचा हात चालूं लागला.इंग्रजांच्या बरोबरीने त्याने पराक्रम शहाणपण मुत्सद्देगिरी ही दाखविलीं. पण त्याच्यामागून शिंद्याच्या गादीवर बसलेल्या पुरुषाच्या कारकीर्दीत शिंद्याचा इंग्रजांनीं पूर्ण पराभव करून त्याचा उत्तरेकडील मुलुख काबीज केला. महादजीने मध्य हिंदुस्थानांत जो मुलुख मिळविला होता तितकाच त्याच्या हातीं राहिला. एकाच वर्षांत(१८०३)अलिगड,दिल्ली,आसई,आग्रा, लासवारी,आरगांव इतक्या ठिकाणीं शिंद्याच्या फौजेचा पुरा मोड होऊन महादजीच्या वेळचे सर्व लष्करी वैभव नामशेष झाले,व त्या सालच्या डिसेंबरांत सरजी अजनगांव येथील तहाने शिंद्याला यमुना व गंगा यांच्यामधील मुलुख, जयपूर जोधपूर व गोहद यांच्या उत्तरेचा मुलुख, भडोच व अहमदनगर या किल्ल्यांसह ते परगणे, अजिंठा घाट व गोदावरी यांच्या दरम्यानचा मुलुख, तसेच मोगल पेशवे निजाम व गायकवाड या सर्वांवरील हक्क व दावे सोडून द्यावे लागले, आणि

हल्लीं इंग्रजांच्या पक्षाचे पण पूर्वी शिंद्याच्या अंमलाखाली असलेले सर्व राजेरजवाडे यांचे स्वातंत्र्य त्याला मान्य करावे लागले. पुढील साली ब-हाणपूर येथील तहानें इंग्रजांची ६ हजार फौज आपल्या खर्चाने ठेवण्याचेहि दौलतरावाला कबूल करावे लागले. यापुढील सालीं मार्क्विस ऑफ वेलस्ली याच्याकडून शिंद्यानें अलाहाबाद येथील तहाने सरजी–अजनगावच्या तहाची थोडीशी दुरुस्ती करून घेतली व धोलपूर बारी आणि राजखेडा वगैरे परगणे देऊन त्यांच्या मोबदला ग्वाल्हेर व गोहद हीं आपणाकडे घेतली. याच वेळीं चंबळा नदी ही शिंद्याच्या मुलखाची उत्तर सरहद्द ठरली. तसेंच उदेपूर जोधपूर कोटा वगैरे संस्थानांशीं शिंद्यास वगळून आपण स्वतंत्र तह करणार नाहीं असें इंग्रजांनींहि कबूल केलें. याशिवाय लक्षात ठेवण्याची गोष्ट ही कीं, शिंद्याने इंग्रजांकडून स्वतःकरता व आपल्या मुलीकरतां चार लक्षाची जहागीर घेऊन तो इंग्रजांचा पगारी सरदारहि बनला. १८१७ सालीं शिंदे बाजीरावास मदत करण्याचा संभव आहे असें जाणून इंग्रजांनीं आपल्या फौजा त्याच्या मुलखाकडे रवाना केल्या; तेव्हां त्याने इंग्रजांशीं तह करून असें कबूल केलें कीं, मी आपल्या फौजा तुम्ही सांगाल त्या ठिकाणी छावण्या करून ठेवीन, व तुमच्या हुकुमाशिवाय त्या तेथून हलविणार नाहीं. तसेंच मराठ्यांशीं इंग्रजाचें युद्ध सुरू असतां आपल्या मुलखात इंग्रजाच्या फौजेस किंवा कहीस प्रतिबंध करणार नाही अशी खातरजमा होण्याकरता अशीरगड किल्ला व रजपूत संस्थानिकांकडून येणाऱ्या खंडण्यांचा तीन सालचा वसूल जमानतीदाखल त्यानें इंग्रजांस दिला.

दौलतराव शिंदे सन १८२७च्या मार्च महिन्यात वारला. त्याच्या अमदानींत जवळजवळ पेशवाईबरोबर शिंदेशाहीहि नष्ट होण्याच्या बेतात आली होती. पण सुदैवानें शिंदेशाही बचावून दीड कोटीचें हे मराठी राज्य उत्तरहिंदुस्थानांत शिल्लक राहिलें. महादजीनें जितका मुलुख मिळविला त्यातील बहुतेक पुढल्याच पिढींत दौलतरावाने गमाविला. दौलतरावाच्या पश्चात् दक्षिणेतील मराठ्यांपैकीं एक अल्पवयी मुलगा त्याची बायको बायजाबाई इच्या मांडीवर दत्तक देण्यांत येऊन या पुढील बहुतेक कारभार ब्रिटिश रेसिडेंटाच्या विद्यमाने चालू लागला. सन १८३७सालीं शिंद्याच्या सैन्याची इंग्रजांनी पुनर्रचना करून त्यावर युरोपियन अधिकारी नेमले. जनकोजी शिंद्याच्या कारकीर्दीत नेपाळ व अफगाणिस्थान येथील, आणि पुढें १८५७सालीं ब्रह्मावर्ताहून पेशव्याकडील, वकील इंग्रजांविरुद्ध युद्धास उभे राहण्याला शिंद्याला प्रवृत्त करण्याकरता आले होते. पण शिंद्याने उचल केली नाहीं. दरम्यान १८४४सालीं महाराजपूर येथे शिंद्याच्या बिथरलेल्या फौजेनें इंग्रजांशीं दोन हात केले व या लढाईत इंग्रजांची खराबीहि बरीच झाली; परंतु अखेर शिंद्याच्या फौजेचा पराभव झाला व या उचलीचे प्रायश्चित्त म्हणून शिंद्याला १८ लक्षांचा मुलुख फौजेच्या खर्चाकरतां तोडून

द्यावा लागून आपली फौज थोडीबहुत कमी करावी लागली. त्यानतर १८५७ सालींहि शिंद्यांच्या फौजेपैकीं कांहीं लोकांनीं बड करून शिंद्याला या बंडांत पुढाकार घेण्यास विनति केली होती. ही संधि,कर्नल मॅलेसन म्हणतो त्याप्रमाणे, अशी होती कीं, महादजी शिंदा जिवत असता तर त्यानें तिचा फायदा घेऊन इंग्रजी राज्य खास बुडविलें असते; व दौलतराव शिंदा इतका बांधला गेला होता तरी तो सामील झाल्याशिवाय राहिला नसता व जयाजीराव शिंद्यानेंहि मनांत आणले असतें तर पेशवे झांशीकरीणबाई व इग्रजांचें बडखोर सैन्य यांनीं मिळून उत्तरहिंदुस्थानांतून इग्रजांचा अमल नाहींसा करून टाकिला असता, पण जयाजीरावाने इंग्रजाची बाजू राखिली. या इमानाचें बक्षीस म्हणून शिंद्यांस इग्रजांनीं तीन लक्षांचा मुलुख दिला, दत्तक घेण्याची परवानगी दिली, तीन हजार पायदळाऐवजीं पांच हजार ठेवण्याची आणि बत्तीस तोफांऐवजीं छत्तीस तोफांची परवानगी दिली;बंडांत सामील झालेल्या शिंद्यांच्या फौजेच्या जागी इंग्रजांनीं आपल्या अमलदाराच्या हाताखालची फौज ठेविली. अशा रीतीने शिंदे व इग्रज याच्या प्रत्यक्ष सबधाचा इतिहास ८०–८५ वर्षांचा आहे.

---

## होळकर व इंग्रज

शिंद्याचा मूळ पुरुष जसा हुजऱ्या होता तसाच होळकरांचा मूळ पुरुष मल्हारराव हा मेंढ्या राखणारा व कांबळीं विणणारा धनगर होता! एकदा आपल्या गांवीं असतां गुजराथेकडे फौज जात आहे असे पाहून तीत तो शिपाई म्हणून दाखल झाला, व लगेच लढाईत पराक्रम करून दाखविल्याबद्दल पचवीस स्वारांची मनसबदारी कठाजी कदम या सरदाराच्या हाताखाली त्याला मिळाली. नतर पेशवे माळव्याकडे जात असता शत्रुपक्षाच्या बाजूस असलेल्या मल्हाररावाचे शौर्य त्यांच्या दृष्टीस पडल्यावरून बाजीराव पेशव्याने त्याला कठाजीकडून आपल्या नोकरीस मागून घेऊन १७२४ साली त्यास५००स्वाराची मनसबदारी बहाल केली. राणोजी शिंद्याप्रमाणे मल्हारराव होळकराचा उत्कर्षहि तावडतोब झाला. १७२८ सालीं बारा व १७३१ साली आणखी वीस परगणे मिळून बत्तीस परगणे बाजीरावाने मल्हाररावाच्या अमलाखालीं देऊन माळव्याच्या सुभेदारीची स्वदस्तुरची सनदहि दिली.

लौकरच इदूर व त्याखालचा मुलुख मल्हाररावास कायमचा देण्यांत आला व १७३५ साली नर्मदेच्या उत्तरेकडे असणाऱ्या सर्व मराठी फौजेचे आधिपत्य त्याजकडे सोपविण्यांत आले. निजाम आणि वसईचे पोर्तुगीज वगैरेंच्या विरुद्ध झालेल्या लढायांत मल्हारराव हा प्रमुख होता. १७५१सालीं मल्हाररावानें रोहिल्यांविरुद्ध अयोध्येच्या नबाबास मदत केली.पानपतच्या लढाईत मल्हारराव हजर

असून मैदानांत उभी लढाई न देतां अबदालीशी गनिमी काव्याने लढावे असा त्याने सदाशिवरावभाऊस सल्ला दिला होता; पण तो नाकारण्यांत आला. पानपतचा पराजय झाल्यावर उरलेली कांहीं थोडी फौज घेऊन मल्हारराव दक्षिणेत परत आला व सन १७६५ सालीं वारला. त्याच्या मरणसमयीं त्याच्या राज्याचे उत्पन्न ७५ लक्ष होते. मल्हाररावाच्या पश्चात् त्याची सून अहल्याबाई व तुकोजी होळकर या उभयतांनीं मिळून सुमारें ३० वर्षें दौलतीचा कारभार केला. परराज्यांशी संबध कसे ठेवावयाचे हे बहुधा अहल्याबाईच ठरवी. तुकोजी होळकर हा गुजराथ म्हैसूर वगैरेकडील मराठ्यांच्या स्वारींत सामील झाला होता.

१७९५ सालीं अहल्याबाई व १७९७ साली तुकोजी होळकर वारल्यानतर शिंदे व होळकर यांचा बेबनाव झाला, आणि बाजीरावाच्या कारस्थानी स्वभावामुळे शिंद्याप्रमाणें होळकराचेहि पुण्याशी मित्रत्वाचे नाते सपले. यशवतराव होळकराने १७९८ सालीं स्वपराक्रमाने आपल्या बापाची गादी हस्तगत केली. इग्रजाचा व तुकोजी होळकराचा संबध शत्रु म्हणून बोरघाटाकडील युद्धांत प्रथम आला, व त्यानतर तशाच नात्याने होळकर यांचा सबध वसईच्या तहानतर आला. पुढे १८०२ सालीं वसईच्या तहाच्या पायीं शिंदे आणि इग्रज यांचे युद्ध जुपलें त्या वेळीं यशवतराव होळकर हा तटस्थ राहिला. पण शिंद्याचा पुरा पराभव झाल्यानतर स्वतः यशवतरावानेच इग्रजांशीं युद्ध आरभले. कर्नल मॉनसन याचा पराभव करून इग्रजांच्या मुलखावर त्याने स्वारीहि केली. पण फत्तेगड डीग भरतपूर येथे पराभव झाल्यामुळे त्याला अखेर इग्रजांशी तह करावा लागला. परतु त्याचा फारसा मुलुख गेला नाहीं. इदुरास परत आल्यावर त्याने आपले सैन्य कमी करून राज्यव्यवस्था सुधारण्यास प्रारंभ केला, व थोडीच पण उत्तम कवाइती फौज ठेवावी, स्वतःचे तोफांचे कारखाने काढावे अशा विचारात असतां वेड लागून तो १८११ सालीं मरण पावला. यशवतराव होळकराच्या मार्गे इदुरास पुरी बेबदशाही माजली आणि अनेक क्रांत्या घडून आल्या. १८१७ साली होळकरी फौजेनें इग्रजांशीं युद्ध आरभले; पण महीदरपूर येथे तिचा पराभव होऊन मंडलेश्वर येथील तहानें होळकराचा पुष्कळसा मुलुख ब्रिटिश सरकारच्या स्वाधीन झाला. या वेळचा गादीचा मालक मल्हारराव अवघा सोळा वर्षांचा होता. त्याला आपल्या रक्षणाखालीं घेऊन इग्रजांनीं इंदूरचा दिवाण तात्या जोग याच्या हातून दरबारच्या पदरचे बरेच सैन्य कमी केलें. १८२१ व १८२२ सालीं इदूरसस्थानांत दगेधोपे झाले ते इग्रजांची मदत घेऊनच मोडण्यांत आले. मल्हाररावाच्या कारकीर्दीत इग्रज सरकारनें आपल्या अफूचे उत्पन्न प्रथम वाढविले. मल्हारराव हा १८३३ सालीं वारला. त्याच्या पश्चात् हरिराव होळकर हा गादीवर बसला; पण त्याच्या

कारकीर्दीत राज्यांत अत्यंत अव्यवस्था माजल्यामुळें इंग्रज सरकारने राज्याच्या अंतर्व्यवस्थेत हात घालण्यास सुरुवात केली. त्याच्या मागून १८४८ त खंडेराव व लगेच तीन महिन्यांनंतर तुकोजी होळकर हा गादीवर बसला. त्याच्या कारकीर्दीत होळकरशाहींतील सैन्याने सन १८५७ सालीं बंड केलें; परंतु तुकोजीरावाचा त्यांत कांही संबंध नव्हता.

## गायकवाड व इंग्रज

सर्व मराठे सरदारापैकी गायकवाडांचे सूत इंग्रजांशीं आधीं जमलें, आणि मराठ्यांशीं दावा सर्वांच्या आधी त्यांचाच सुरू झाला. त्याला एक कारण असे दिसते की, गुजराथेच्या बाजूस इंग्रजांचे ठाणे प्रथमपासून पडलेलें असून त्यांतल्या त्यांत मराठ्यांचे या प्रांताकडे दुर्लक्ष्य होते.

गुजराथेत मोगलांपूर्वी हिंदुराज्य होते. पुढे मोगलांनीं गुजराथ जिंकली व अहमदाबाद येथे लष्करी ठाणे बसविले. सन १६६४, १६६६ व १६७० या साली शिवाजीने गुजराथेत स्वाऱ्या केल्या. तेव्हांपासून मराठ्यांचे पाऊल गुजराथेंत पडले. १७०५ साली धनाजी जाधव याच्या हाताखालच्या मराठ्यांनीं गुजराथेवर स्वारी करून मुसलमान सुभेदाराचा पराभव केला. मुसलमान लोकांचा अमल गुजराथच्या लोकांना अप्रिय झाला होता व मराठे गुजराथेत शिरतांच मुसलमानी अमलास त्रासून गेलेले लोक त्यांस मिळाले. अठराव्या शतकाच्या प्रारंभीं मराठ्याचा सेनापति खंडेराव दाभाडे हा गुजराथ व काठेवाड या प्रांतांत खंडणी गोळा करीत असे. सन १७१८ सालीं मोगल बादशहाकडून शाहूस ज्या सनदा मिळाल्या त्यांत गुजराथ प्रांतामध्यें चौथाई वसूल करण्याची सनद नव्हती; परंतु सेनापतींनीं खंडणी वसूल करण्याची पूर्वींची वहिवाट चालूच ठेविली. तथापि दाभाडे हे शाहूस बरोबर वसूल देत नसत, यामुळे शाहूने आनंदराव पवार यास या वसुलाकरिता कायमचे ठेविलें. या सुमारास दाभाड्यांच्या सैन्यातील एक शिपाई दमाजी गायकवाड याने पराक्रम करून शाहूकडून समशेरबहादूर हा किताब व दुय्यम सेनापतीची जागा मिळविली. पुढे सन १७२१ मध्ये दमाजी मरण पावल्यावर त्याचा पुतण्या पिलाजी यास गायकवाडी सरदारी मिळाली. धारच्या पवाराशीं बेबनाव असल्याने पिलाजीने सोनागड किल्ला हे आपले ठाणे केले, व तेथेच गायकवाडी राजधानी १७६६ पर्यंत होती. या सुमारास गुजराथेंतील मोगलांचा अमल कायमचा नाहींसा झाला. गुजराथेंतील स्वाऱ्या करण्याचे काम उदाजी पवार कंठाजी कदम व पिलाजी गायकवाड यांजकडे होतें; आणि अखेर हा मुलुख सर्वस्वीं आपल्या ताब्यांत कोणीं ठेवावा याविषयीं त्यांच्यामध्यें एकसारखी चढाओढ चालू झालेली होती. १७२३ सालीं

पिलाजीने सुरत घेऊन अहमदाबादेसहि आपला गुमास्ता नेमला. चौथाईच्या वांटणीवरून तंटा होऊन कदम आणि गायकवाड यांची खंबायत येथे लढाई झाली व तींत पिलाजीचा पराभव झाला. पण अखेर उत्तरगुजराथेतील खंडणी कदमांनीं गोळा करावी व दक्षिणगुजराथेतील खंडणी गायकवाड यांनीं गोळा करावी असा तह ठरला. फिरून या दोघात तटा उपस्थित झाला; पण १७२६ मध्ये दाभाड्याचा प्रतिस्पर्धी बाजीराव पेशवा याच्याशी दोघांचेहि वैमनस्य आल्यामुळे दोघेहि एक झाले. पुढे दभई येथील लढाईत बाजीरावाने दाभाडे व पिलाजी यांचा पराभव केला; परतु दाभाड्याच्या मुलाकडे बापाचा अधिकार ठेवून शाहूने पिलाजीस त्याचा मुतालिक नेमले आणि सेनाखासखेल ही पदवी दिली. तसेच पिलाजीनेहि गुजराथेतील चौथाईचा निम्मा वसूल पेशव्यामार्फत शाहूकडे पाठवू व गुजराथेतील किरकोळ राजेरजवाड्यांकडून घेतलेल्या खंडण्यांचा योग्य वसूल देऊ असे कबूल केले. सन १७३१ साली पिलाजीचा खून झाला. त्याच्यामागून दमाजी गायकवाड सरदारकी करूं लागला. १७३४ साली बडोदे गायकवाडांच्या हातीं आले. ते आजवर त्यांचेचकडे आहे. पुढे गुजराथेत होळकरांच्या साहाय्यानें कदम स्वाऱ्या करूं लागला; पण दमाजीचें लक्ष वर रजपुतान्याकडे विशेष लागले होते.

१७४२ त दमाजीने माळव्यांत लूट केली ती रघूजी भोसल्याच्या चिथावणीने केली, अशी नानासाहेब पेशव्यास शंका आल्यामुळे त्याचें व गायकवाड याचे वांकडे आले. १७४४ सालीं गायकवाडांच्या घरांत भांडणें सुरू झालीं. १७५० सालीं दमाजी हा ताराबाईच्या पक्षास जाऊन मिळाला. सातारच्या महाराजांस पेशव्यांच्या बंदींतून सोडवून सर्व मराठी राज्यास पेशव्यांच्या वर्चस्वांतून मुक्त करण्याचे ताराबाईने योजले होतें व दमाजीहि याच मताचा होता. ताराबाईने रामराजास पकडून सातारच्या किल्ल्यांत कैदेत ठेविले, तेव्हां दमाजी तिच्या मदतीस गेला. परतु पेशव्यांनीं त्यास पकडून पुण्यास कैदेत ठेविलें. दमाजीचा भाऊ खंडेराव हा पेशव्यांच्या पक्षास मिळाला; पण दमाजीने कैदेतूनच कारस्थान करून १७३१ पासून थकलेल्या वसुलाची तोड १५ लाखांवर करून घेऊन आपली मुक्तता केली. याच वेळी गायकवाडानें १० हजार स्वार पदरीं बाळगून कामकाज पडेल तेव्हां पेशव्यास मदत करावी, वार्षिक खंडणी ५ लक्ष २५ हजार रुपये द्यावी, दाभाड्याच्या कुटुंबाच्या पोषणाकरतां रक्कम ठरवून द्यावी, व यापुढे गायकवाड जे मुलुख जिंकतील किंवा खंडण्या वसूल करतील त्यांतील निम्मा हिस्सा पेशव्यांस द्यावा व याच्या मोबदला पेशव्यांनीं गायकवाडास अहमदाबाद जिंकून गुजराथेतून मोगलांचा अमल नाहींसा करण्यास मदत करावी असेंहि ठरले. याच वेळेपासून गायकवाडास डोईबदल होण्याचे वेळीं नवी सनद नजराणा घेऊन द्यावी असा प्रघात पेशव्यांनीं पाडला. याप्रमाणें गायकवाड परा-

धीन झाला; तथापि त्याच्या मनांतील अढी गेली नाहीं. यापुढें गायकवाडी घराण्यांत उघडपणें तट पडून दमाजी व फत्तेसिंग हे रघुनाथरावाच्या द्वारें इग्रजांस मिळाले. १७५३ सालीं अहमदाबादेस वेढा पडला त्या वेळीं दमाजीनें रघुनाथरावास साहाय्य केलें.

पानिपतच्या लढाईत दमाजी सामील असून त्यानें मोठे शौर्य गाजविलें व मराठी फौजेचा मोड झाल्यावर तो परत निघून आला. थोरले माधवराव पेशव्यांच्या कारकीर्दीत रघुनाथराव माधवरावाशीं भांडून निघाला त्या वेळी दमाजीनें त्यास साहाय्य करून घोडनदीजवळ पेशव्यांच्या फौजेचा पराभवहि केला. मध्यतरीं गुजराथची वांटणी गायकवाडास जास्त फायदेशीर झाली म्हणून पेशव्यांनीं त्याजकडून २ लक्ष ५४ हजार रुपयांचे महाल काढून घेतले होते. १७६८ सालीं दमाजीने आपला मुलगा गोविंदराव यास रघुनाथरावाच्या मदतीस पाठविले; पण पराभव पावून त्यास रघुनाथरावाबरोबर पुण्यास येऊन कैदेत पडावें लागले. शेवटी तह ठरला, त्यांत गायकवाडाने २३ लक्ष रुपये दंड व १६ लक्ष रुपये थकलेली वसूल बाकी पेशव्यास दिली; तेव्हां पूर्वी काढून घेतलेले महाल गायकवाडास परत देण्यांत आले; पण वार्षिक खंडणी ७ लक्ष ७९ हजार द्यावी व ४००० फौज घेऊन पेशव्याजवळ गायकवाडाने प्रत्यक्ष नोकरींत रहावे असे ठरलें.

पुढें लवकरच दमाजी किमयेचा प्रयोग करीत असतां अपघातानें मेला. तेव्हां त्याचा धाकटा मुलगा फत्तेसिग याने येऊन बडोदे बळकाविले. इकडे पुण्यास थोरला भाऊ गोविंदराव होता त्याने पेशव्यांकडून आपला वारसा मजूर करून घेतला व पेशव्यास ५०॥ लाख रुपये देऊ केले; पण १७७१ त फत्तेसिंगाने पुण्यास जाऊन त्याच शर्तीवर आपला मधला भाऊ सयाजीराव याच्या नांवे "सेनाखासखेल" हे पद व सरदारी घेऊन स्वतःकडे मुतालिकी घेतली. १७७२ त फत्तेसिंग गुजराथेंत परत गेल्यावर त्यानें इग्रजांची मदत मिळविण्याची खटपट सुरू करून सुरतेचा महाल त्यांना देऊ केला. सन १७७५ मध्यें पुण्यास भांडण होऊन राघोबा बडोद्यास येऊन गोविंदरावास मिळाला. तेव्हां फत्तेसिगाने नाना फडणविसाकडे मदत मागितली. सुरतेच्या तहाने वसई साष्टी व सुरतेच्या आसपासचा मुलुख इग्रजांस देण्याचें राघोबाने कबूल केले. त्याबरोबर भडोच येथील गायकवाडाचा हिस्सा गोविंदरावाकडून इग्रजांस देवविण्याचेहि त्यानें कबूल केले. सुरत भडोच आणि खबायत हीं तीन बंदरे व्यापाराच्या उपयोगीं म्हणून इग्रजांना त्यांचा फार लोभ वाटे, व केवळ ही बंदरें तसेच साष्टी वसई हीं आपल्या हातीं यावीं एवढ्याचकरितां ते पेशव्यांच्या व गायकवाडांच्या भांडणांत पडले. पुढे गोविंदरावास इग्रजांनीं हातीं धरल्यामुळें फत्तेसिंग नाना फडणविसाच्या पक्षाला गेला. त्याने शिंदे होळकर यांच्या फौजेनें

व हरिपंत फडक्यानें गोविंदरावास बडोद्याचा वेढा उठविणे भाग पाडून राघोबाचा पराभव केला. पुढील वर्षी फत्तेसिंगाने पुनः बाजू बदलली, व रघुनाथरावाला ३००० स्वारांनिशीं मदत करावी आणि इंग्रजांस भडोच चिखली वगैरे परगणे द्यावे असे कबूल करून गोविंदरावाचा पक्ष सोडण्यास इंग्रजांचे मन वळविलें. सन १७७८ त पेशव्यांनीं फत्तेसिंगाला "सेनाखासखेल"ची पदवी दिली. पण त्यास भडोचच्या वसुलाचा वांटा मिळाला नाही. सन १७८० त फत्तेसिंगाने फिरून इंग्रजांशीं तह केला व इंग्रजांनीहि फत्तेसिंगास अहमदाबाद जिंकून दिली. या स्वारींत फत्तेसिंगाने इंग्रजांस पुष्कळ मदत केली. याच सालीं इंग्रजांनी बडोदे येथे कॅप्टन अर्ले या नावाच्या गृहस्थास आपला पहिला रेसिडेंट नेमिले. पण १७८२ साली सालबाईचा तह झाला तेव्हा इंग्रजांनी फत्तेसिंगास सोडून दिले, व त्याच्याशीं झालेला तह त्यांना रद्द करावा लागून अहमदाबाद पेशव्यास परत द्यावे लागले. पेशव्यांनीं फत्तेसिंगाला खंडणीची बाकी माफ केली; परतु गायकवाडानें पेशव्यांच्या पदरीं स्वतः हजर राहून लष्करी नोकरी करणे फिरून प्राप्त झाले.

१७८९सालीं फत्तेसिंग अपघाताने मेला तेव्हां पुणे दरबारनें त्याचा धाकटा भाऊ मानाजी याचा हक्क मान्य करून त्याला सयाजीचा कारभारी नेमले, आणि याबद्दल त्याने पेशव्यास नवीजुनी खंडणी म्हणून ६० लक्ष रुपये चार हप्त्यांनी देण्याचे कबूल केले. १७९३सालीं मानाजी वारला; तेव्हां गोविंदराव आपल्यास सरदारी मिळण्याबद्दल फिरून पेशव्यांचे मागे लागला; पण पेशव्यांनी घातलेल्या शर्ती फारच कठिण होत्या. पूर्वीची वीस लक्ष बाकी, ५६ लक्ष नजराणा व लष्करी नोकरीबद्दलची बाकी ४३ लक्ष; इतके पैसे देऊन शिवाय तापीच्या दक्षिणेचा मुलुख व सुरतबंदरावरील जकातीचा हिस्सा त्याने पेशव्यास द्यावा असे ठरलें. पण सालबाईच्या तहाची सबब सांगून इंग्रजांनीं तापीच्या दक्षिणेचा मुलुख पेशव्यांना देण्यास हरकत केली. यापुढील गायकवाडीचा इतिहास अतिशय अंदाधुंदीचा आहे. सन १७९७ सालीं गोविंदरावाने पेशव्यास ७८ लक्ष रुपये देऊन ६० लक्षांची सूट घेतली, तरी पेशव्याचे ४० लक्षांचे देणे शिल्लकच होतें. बाजीरावाच्या कारकीर्दींत गोविंदरावाचें पेशव्याच्या गुमास्त्याशीं वांकडे येऊन लढाई सुरू झाली व गोविंदरावाने सन१८००साली इंग्रजापाशीं मदत मागितली. या वेळी गायकवाडाचे सर्व महाल सावकारांकडे गहाण पडले. परगण्यांचे मामलेदार वसूल खाऊन बसूं लागले, मांडलिकांनीं खंडण्या बुडविल्या, व सैन्यांत अरब वगैरे जरबी लोकाचे वर्चस्व झालें. या भाडोत्री सैन्याचा सालीना खर्च ३०–३५ लक्ष रुपये असे. त्यापैकीं बराच पैसा अरब, बगदादी अबिसिनीयन मुसलमान व पठाण वगैरे लोकांच्या पदरीं पडे. या भाडोत्री लोकांतहि पक्षभेद असत; परतु कोणत्याना कोणत्या तरी एका पक्षाची जामि-

नकी असल्याशिवाय बडोदेसरकार आपलीं वचनें पाळील अशी प्रजेला खात्री वाटत नसे. या जामिनकीलाच " बहानदरी " पद्धत म्हणत.

लवकरच गायकवाडींतील दोन पक्षांनीं इंग्रजांस पंच नेमले. पण इंग्रजांना ही पंचायत बरोबर सैन्य घेऊन करावी लागली. मेजर वॉकर हा १८०२ सालीं बडोद्यास येऊन त्याने गायकवाडी जहागीरदारांशीं युद्ध सुरू केले. नंतर गायकवाडाशीं तह होऊन त्याने इंग्रजांस ८४ परगणे सुरतमधील चौथाई व लढाईचा खर्च द्यावा आणि भाडोत्री शिपाई काढून टाकून इंग्रजांचे २००० शिपाई व तोफखाना आपल्या पदरीं ठेवावा व त्याकरतां दरमहा ६५०४० रुपये उत्पन्नाचे प्रांत इंग्रजांच्या स्वाधीन करावे असे ठरले. पुढे गायकवाडाच्या हातून इंग्रजांस ठरलेले पैसे देववेना म्हणून १८०३ साली धोडका नडियाद विजापूर वगैरे प्रांत गायकवाडाने इंग्रजांस दिले व ते त्यांनी घेतले. पूर्वी गोविंदरावाकडून पेशवे गायकवाडी मुलुख तोडून घेत होते, तेव्हां इंग्रजांनीं त्यास हरकत केली; पण हल्लीं इंग्रजांनीं स्वतःच गायकवाडी राज्याचे तुकडे पाडून आपणाकडे मुलुख तोडून घेतला! दुसऱ्या बाजीरावाच्या कारकीर्दींत पेशव्यांचा गायकवाडाशीं वाद व इंग्रजांशी भाडण झालें त्याचे हे एक कारण होते. वरील तहामुळे गायकवाडाच्या राज्याच्या वाटेल त्या कारभारांत आपणास हात घालण्याचा अधिकार मिळाला अशी इंग्रजानीं आपली समजूत करून घेतली; व सुराज्यव्यवस्था झाल्यावरहि ते कारभारांत ढवळाढवळ करू लागले. तेव्हां बडोद्याचे राज्यकर्ते व इंग्रज यांच्यामध्ये स्नेहभावाऐवजी विरोध उत्पन्न झाला. गादीची वारसाई ठरविण्याची व पेशव्यांशीं बोलणेचालणे करण्याची सर्व जबाबदारी इंग्रजांनी पत्करली, तसेच पुढें काठेवाडांतील संस्थानिकांवर गायकवाडांचे जे हक्क होते त्यांतहि ब्रिटिश रेसिडेंट हात घालू लागला. अखेर १८०५ च्या तहाने या ढवळाढवळीच्या कारभारांस कायदेशीर स्वरूप प्राप्त झाले!

१८१२ सालीं इंग्रजांनी गायकवाडास स्वतःच्या व इतराच्या कर्जांतून कर्जफेडीने मुक्त केले होतें. याच सुमारास बडोद्यास फिरून दोन पक्ष निर्माण झाले. एक पक्ष इंग्रजांना अनुकूल व दुसरा गादीचा धनी आनंदराव गायकवाड होता याला अनुकूल. आनंदराव आणि पेशवे यांचा मनांतून स्नेह होता. पण गंगाधरशास्त्रीप्रमुख मंडळी त्यांच्या पत्रव्यवहाराच्या आड येत. पेशव्यांचा गायकवाडीवर जो अधिकार तो इंग्रज बळकावून बसले हें वैषम्य बाजीरावाच्या मनांत होते. अहमदाबादच्या इजाऱ्याची मुदत संपली होती व ती फिरून गायकवाडास देणें न देणें पेशव्याचे हातीं होतें, आणि या साधनाने बडोद्यास आपलें वर्चस्व स्थापण्याचें पेशव्यांच्या मनांत होतें. हा इजारा मिळवावा म्हणून गंगाधरशास्त्री पुण्यास १८१४ सालीं गेला. शिवाय पेशवे व गायकवाड यांच्या दरम्यान २ कोटी ६१ लक्ष रुपयांच्या हिशेबाचा वाद शिल्लक होता. या बाबतींत

पुण्यास बरेच दिवस बोलणें चालून तडजोड निघण्याचा संभवहि दिसत होता,पण १८१५त गंगाधरशास्त्र्याचा खून होऊन ते प्रकरण तसेंच राहिलें;तथापि पुढे याचा वचपा इंग्रजांनीं बाजीरावावर पुरा उगवला व १८१७च्या मे महिन्यांत पुण्यास वेढा घालून जो तह त्यांनी त्याच्याकडून करवून घेतला त्यांत गायकवाडावरील आपले दावे पेशव्याने सोडले असे लिहून घेतले. या रीतीनें इंग्रजांना काठेवाडांतील खडणी व पेशव्यांचे सर्व हक्क मिळाले. गायकवाड हे पेशव्यापासून स्वतंत्र झाले पण पेशवे जाऊन इंग्रज त्याचे धनी झाले इतकेंच काय ते ! तात्पर्य, गंगाधरशास्त्री प्राणास मुकला खरा, पण त्यानें आपले प्राण देऊन इंग्रजांचा व गायकवाडाचा चांगलाच फायदा करून दिला. तहानें गायकवाडाकडून पेशव्यास सालिना ४॥ लक्ष रुपये कायमचे मिळावयाचे होते; पण गायकवाडास मिळालेला अहमदाबादचा इजारा त्यांनी त्याकडून आपणाकडे घेतला, व पुढील सालीं पेशवाई नष्ट झाल्यामुळे हे त्यांचे ४॥ लक्ष रुपयेहि देण्याचे वांचले ! पुढे इंग्रज व गायकवाड हे दोघेच दोघे राहिल्यावर इंग्रजांचा पक्ष पूर्वींहूनहि वरचढ कसा झाला याचा वृत्तांत सांगत बसण्याची येथे गरज नाहीं.

---

## आंग्रे व इंग्रज

कुलाब्याचे आंग्रे हे मूळ आंगरवाडी नांवाच्या गांवचे रहाणारे. यांचा मूळ पुरुष तुकोजी सखपाळ हा असून त्यानें शहाजी भोसले याला मोंगलांविरुद्ध कोंकणांत युद्ध करण्यास मदत केली होती. शहाजीनंतर तुकोजीनें शिवाजीच्या पदरीं नोकरी धरली तेव्हां शिवाजीने त्यास आपल्या आरमारांत एका मोठ्या जागेवर नेमलें. तुकोजीचा मुलगा कान्होजी याची १६९० साली राजारामाच्या आरमारांत दुय्यम सेनापतीच्या जागीं नेमणूक झाल्याचें आढळतें. मुख्य आरमारी सेनापति सिधोजी गुजर हा वारल्यानंतर कान्होजीला सन १६९८ सालीं ही जागा मिळाली. धाडसी दर्यावर्दी म्हणून कान्होजीची फार कीर्ति आहे. त्यानें मुंबईपासून खालीं सर्व अरबी समुद्राच्या किनाऱ्यावर मोठी दहशत बसविलीअसून तडाक्यांत सांपडलेल्या वाटेल त्या युरोपियन राष्ट्राच्या गलबतावर तो बेधडक हल्ला करी. कुलाबा सुवर्णदुर्ग विजयदुर्ग या ठिकाणीं त्याचीं बळकट ठाणीं होतीं. युरोपियन लोकांचा हिंदुस्थानाशीं दळणवळणाचा मुख्य मार्ग समुद्रकिनारा असल्यामुळे सर्व मराठ्यांत आधीं जर युरोपियनांची कोणाशीं गांठ पडली असेल तर ती आंग्र्यांशींच असावी .कान्होजीला कोंकणपट्टीवर इंग्रज व पोर्तुगीज यांच्या तोडीचा शत्रु म्हटला म्हणजे जंजिऱ्याचे शिद्दी होत. १६९९ सालीं पोर्तुगीज व शिद्दी एक होऊन त्यांनीं आंग्र्यांशीं युद्ध आरंभिलें; पण कान्होजीनें त्यांचा पराभव करून सागरगड घेतला;आणि शेवटीं तह झाला त्यांत असें ठरलें कीं, कुलाबा

खांदेरी सागरगड या ठाण्यांचा कांहीं वसूल आणि राजकोट व चौल येथील सर्व वसूल आंग्रयास मिळावा. १७०५ ते १७१० यांच्या दरम्यान आंग्रयांची सत्ता इतकी वाढली कीं, इंग्रज लोकांच्या कागदपत्रांतून कान्होजीला गुण-सादृश्यामुळें ' शिवाजी ' हें नांव दिलेलें आढळतें ! शाहू व ताराबाई यांचें भांडण सुरू झालें तेव्हां कान्होजीनें ताराबाईचा पक्ष धरला; व तिनें त्याला मुंबई ते सावंतवाडीपर्यंतचा समुद्रकिनारा राजमाचीचा किल्ला व कल्याण भिवंडी पर-गणा इतक्याचे अधिकारपत्र दिलें.तेव्हां शाहूनें आपला पेशवा बहिरोपंत पिंगळे यास आंग्रयावर पाठविले;परंतु आंग्याने त्याचा पराभव करून त्यास कैद केलें व साताऱ्यावर चालून जाण्याचीहि त्याने तयारी केली. तेव्हां शाहूने बाळाजी विश्वनाथास आंग्रयावर पाठविले. पुढे उभयतांचा तह होऊन आंग्रयांना खांदेरी-पासून देवगडपर्यंतच्या मुलखाचे आणि दहा कोकणी किल्ल्यांचें अधिकारपत्र आरमाराच्या मुख्य सेनापतीची जागा आणि सरखेल ही पदवी शाहूकडून देण्यांत आली. यांतील कांहीं किल्ले शिद्द्याच्या हातीं होते,ते त्याने युद्ध करून त्याजपासून घेतले. १७२० च्या सुमारास कोंकणांतील मोंगलांची सत्ता नष्टप्राय होऊन मराठ्यांची सत्ता वाढूं लागली.कान्होजीने आपल्या पदरीं मोठें आरमार व त्यावर मराठ्यांबरोबर डच पोर्तुगीज आणि अरब निग्रो मुसलमान वगैरे अनेक परजातींचे लोकहि ठेवले होते. तेथून पुढें कांहीं दिवस आंग्रयाला युरोपियन लोकांशीं लढावें लागले.समुद्रकिनारा मोकळा असला तरी बंदरांत जहाज आण-ण्याला हल्लींप्रमाणें तेव्हाहि परवाना लागे, व हा परवाना ज्याजवळ नसेल अशा युरोपियन गलबतावर हल्ला करण्याचा त्याला कायदेशीर अधिकारच होता.कारण, तो आरमारी सरदार असून शिवाय बंदरकिनाऱ्याचे परवाने देण्याचा मक्ता त्याकडे होता व त्याकरतां तो छत्रपतीच्या खजिन्यांत दरसाल पेष्कश भरीत असे.

१७१७ साली इंग्रजांनीं विजयदुर्गचा किल्ला घेण्याचा प्रयत्न केला, तो फसून इंग्रजांचें सक्सेस नांवाचे गलबत कान्होजीनें धरले. १७१८ सालीं इंग्र-जांनीं कान्होजीच्या ताब्यांतील खांदेरी बेटावर हल्ला केला, पण तेथेंहि कान्होजीनें त्यांस पिटाळून लावून त्यांचा फार नाश केला. १७२० सालीं कान्होजीने इंग्र-जांचें आणखी एक गलबत धरले,तेव्हां इंग्रज व पोर्तुगीज दोघांनीं मिळून विजय-दुर्गच्या खाडींत शिरून त्याचीं सोळा गलबतें जाळलीं; पण त्यांना किल्ला घेतां आला नाहीं. १७२२ सालीं कुलाब्यांतील आंग्रयाच्या ठाणेदारानें इंग्रज-पोर्तु-गीजांचा पराभव केला.१७२४त डच लोकांनीं सात मोठया जहाजांचा काफिला घेऊन विजयदुर्गावर हल्ला केला तोहि त्यानें परतविला. १७२७–२८ या दोन्ही सालीं त्यानें युरोपियनांचीं बरींच जहाजें पकडली; व इंग्रजांच्या मॅकनील नांवा-च्या कप्तानास बेदम मारून पायांत साखळदंड घालून किल्ल्यावर टाकलें.१७३० सालीं त्याच्याविरुद्ध इंग्रजांनीं वाडीकर फोंड सावंत याच्याशीं तह करून मदत

घेतली. १७३१ सालीं कान्होजी वारला. त्याला चार मुलगे होते; त्यांच्यामध्यें भांडण सुरू झालें. सखोजी हा कुलाब्यास असे व तो पेशव्याशीं मिळून होता. त्यानें व पेशव्याने मिळून मोगल सरदार गाजीखान याचा पराभव करून चौल घेतलें; तसेंच अंजनवेल येथील लढाईंतहि सखोजीनें पेशव्यास मदत केली. सखोजी हा १७३३ सालीं वारला. सखोजीच्या मरणानंतर त्याचे भाऊ मानाजी व संभाजी यांच्यांत तंटे लागून मानाजीने पोर्तुगीजांच्या मदतीनें कुलाबा घेतला. त्याच्या विरुद्ध शिद्दी व इंग्रज यांनीं एकी करून त्याचा सर्व मुलुख घेण्याचें ठरविलें; पण त्याचा कांहीं परिणाम झाला नाहीं. पुढें संभाजी हा फार प्रबळ होऊन त्यानें अलीबागेवर स्वारी केली, तेव्हां मानाजीला इंग्रज व पेशवे या दोघांचीहि मदत घ्यावी लागली. संभाजी हा इतका प्रबळ झाला होता कीं, इंग्रजांनीं गलबतांना आपल्याकडून परवाने घ्यावे व सालीना २० लक्ष रुपये खंडणी द्यावी अशी त्यानें मागणी केली होती ! इंग्रजांनीं अर्थातच ही मागणी मान्य केली नाहीं.

१७४० सालीं संभाजी अनावर झाला असें पाहून मानाजीनें बाळाजी बाजीराव याची मदत मागितली, ती त्यानें दिली; पण स्वतः पेशवे हेच कुलाबा हस्तगत करण्याच्या विचारांत आहेत अशा संशयाने मानाजीनें संभाजीशीं कसा तरी तह उरकून घेतला. १७४८ त संभाजी वारला. त्याच्या मागून येणारा तुळाजी हाहि संभाजीप्रमाणेंच इंग्रजांचा कट्टा शत्रु होता. तुळाजीच्या वेळीं इंग्रजांना कोंकणपट्टीवर आपल्या जहाजांचें संरक्षण करण्याकरितां सालिना पांच लक्ष रुपये खर्च येत असे. तुळाजीने मोठमोठीं जहाजें बांधविलीं व सर्व दक्षिणसमुद्रांतील व्यापार स्वतः आडवून बसण्याचा त्याचा विचार होता. १७५५ सालीं पेशवे व इंग्रज दोघांनीं मिळून तुळाजीवर स्वारी करण्याचें ठरविलें. मराठ्यांनीं खुष्कीच्या मार्गानें व इंग्रजी आरमारानें पाण्याकडून विजयदुर्गच्या किल्ल्यावर हल्ला केला व अशा रीतीनें दोघांनीं मिळून तो किल्ला घेतला. या स्वारींत ॲडमिरल वॉटसन याच्याबरोबर कर्नल क्लाइव्ह हाहि होता. किल्ल्यांत आठ इंग्रज व तीन डच कैदी होते त्यांस सोडविण्यांत आले व पेशवे आणि इंग्रज यांनीं मिळून किल्ल्यांतून साडेबारा लक्ष रुपयांची लूट नेली. स्वतः तुळाजी आंग्र्यास मरणापर्यंत कैदी होऊन राहावें लागलें. पूर्वीच्या कराराप्रमाणें विजयदुर्गचा किल्ला पेशव्यास मिळाला व त्याच्या मोबदला बाणकोट आणि दासगांव हीं इंग्रजांस मिळालीं. विजयदुर्गास पेशव्यांनीं आपला आरमारी सुभा स्थापन करून त्यावर आनंदराव धुळप यास सुभेदार नेमले.

मानाजी आंग्रे हा इकडे घाटावर येऊन पेशव्यास मदत करीत होता तो विजयदुर्ग घेतल्यावर परत गेला. सन १७५९ मध्यें मानाजी वारल्यावर त्याचा दासीपुत्र रघोजी याला पेशव्याच्या मदतीनें प्रथमच शिद्द्याशीं लढावें लागलें. त्यानें उंदेरी बेट शिद्द्याकडून घेऊन पेशव्यांस दिलें. रघूजीनें अलीबागेस राहून आपल्या मुलखाची नीट व्यवस्था केली व चौल इत्यादि ठिकाणीं मिठागरें वगैरे

काढून आपले उत्पन्न वाढविले. तो पेशव्यास दरसाल २ लक्ष रुपये खंडणी देत असे व अलीबागच्या सरंजामाच्या मोबदला पदरीं फौज ठेवून तो पेशव्याची नोकरी करी. रघूजी १७९३ सालीं वारला, तेव्हां फिरून त्याच्या पश्चात् भांडणें सुरू झालीं. मानाजीचा पक्ष पेशव्यांनीं घेतल्यामुळें प्रतिपक्षी जयसिंग याने शिंद्याच्या दरबारी मदत मिळण्याविषयीं बोलणे लावले. शिंद्याकडील सरदार बाबूराव हा अलीबागेस आला; पण अखेर त्यानें उभय पक्षांच्या हक्कदारांना कैदेत टाकून स्वतःच अलीबाग बळकावली ! या सर्व प्रकरणांत जयसिंगाची बायको सोनकुवराबाई हिने अनेक वर्षे प्रत्यक्ष लढाया करून व किल्ले लढवून अतिशय शौर्य दाखविले. १८१३ सालीं बाबूराव मेल्यावर मानाजी ( दुसरा ) याला आपलें डोके वर काढतां आले व पेशव्यास १० हजारांचा मुलुख व खांदेरी बेट देऊन त्याने अलीबाग परत मिळविली. मानाजी १८१७ सालीं वारला. या दोन पिढ्यांतल्या भांडणामुळे अत्यत नुकसान होऊन आंग्र्यांची तीस पसतीस लक्षांची दौलत तीन लक्षांवर आली ! मानाजीच्या पश्चात् त्याचा अल्पवयी मुलगा रघोजी हा गादीवर बसला. त्याचा कारभार बिवलकर यांजकडे होंता. पेशवाईची समाप्ति झाल्यानतर १८२२ साली इग्रज सरकार व आंग्रे यांचा तह होऊन आंग्र्यांनीं इंग्रजांची अधिराजसत्ता कबूल केली. तेव्हांपासून आंग्र्यांच्या गादीचा वारसा ठरविण्याचा अधिकार इग्रजांकडे गेला. १८३८ साली रघूजी वारला. पुढे दोन वर्षांनी त्याचा मुलगा दुसरा कान्होजी हाहि वारल्यामुळे आंग्रे घराण्याची औरस संतति नष्ट झाली. तेव्हा रघूजीच्या बायकोने दत्तकाची परवानगी मागितली. परंतु हा सोयीचा मुलुख खालसा करण्यास ही चांगली संधि आहे असे पाहून ती दवडावयाची नाहीं अशा निश्चयाने इंग्रजसरकारने दत्तकाची परवानगी अर्थातच नाकारली व अलीबाग संस्थान खालसा केलें !

---

## पटवर्धन व इंग्रज

पेशवाईत नांवारूपास आलेल्या ब्राह्मण सरदारांत पटवर्धन हे प्रमुख होत. त्यांचा मूळ पुरुष हरभट पटवर्धन हा मूळचा उत्तम वैदिक ब्राह्मण प्रथम इचलकरंजीकर घोरपडे यांचेजवळ आश्रित व उपाध्या म्हणून होता. तो १७१६ सालीं पुण्यास बाळाजी विश्वनाथ पेशवे याच्या आश्रयास राहिला. भटजीला सात मुलगे होते. त्यांपैकीं तिघेचवघे कारकुनी पेषाकडे वळले. १७३० सालीं गोविंद हरि हा बाजीरावाच्या कारकीर्दीत कदम याच्या पागेचा फडणवीस झाला. नानासाहेब पेशव्याच्या कारकीर्दीत गोविंद हरि हा फडणविसाचा सरदार झाला. त्याचे उदाहरण पाहून त्याचा धाकटा भाऊ रामचंद्रराव हाहि लष्करी नोकरींत शिरला. १७३९ सालीं शिद्द्यांशीं व पोर्तुगीजांशीं झालेल्या लढाईत रामचंद्र हरीनें मोठी

कीर्ति मिळविली. १७४५साली दमाजी गायकवाड ताराबाईचा पक्ष घेऊन पेशव्याविरुद्ध उठला तेव्हां त्याजविरुद्ध पाठविलेल्या फौजेत गोविंद हरि व त्याचा मुलगा गोपाळराव असून ह्यांनी मर्दुमकी करून दमाजीस कैद करून पुण्यास आणले येथपासून पुढें पटवर्धन सरदार हे पेशव्याच्या मदतनिसांत अग्रगण्य होऊन बसले. यानंतर झालेल्या बहुतेक मोठमोठया मोहिमात पटवर्धन घराण्यापैकी कोणी ना कोणी तरी पुरुष असेच. १७६० साली गोपाळरावाने दौलताबादेचा किल्ला निजामापासून लढून घेतला. थोरल्या माधवरावाच्या कारकीर्दींत ( १७६४ मध्ये ) गोविंद हरि परशुराम रामचद्र व नीळकंठ त्र्यंबक या त्रिवर्गांस मिळून चोवीस लक्षांचा सरंजाम देण्यांत आला, व त्यास आठ हजार स्वारांची सरदारी मिळाली.पटवर्धनांस दिलेली जहागीर बरीचशी कोल्हापूरच्या हद्दीवर असल्यामुळे करवीरकरांचा बदोबस्त पेशव्यांना उत्तम रीतीचा करता आला. जहागिरीचे मुख्य ठिकाण मिरज हे करण्यांत आले. निजाम हैदर टिपू नागपूरकर भोसले व इग्रज यांशीं झालेल्या युद्धांत पटवर्धन सरदारांनी मोठमोठे पराक्रम करून फार कीर्ति मिळविली. त्यांतल्यात्यांत गोपाळराव, रामचद्रराव, परशुराम भाऊ, कोन्हेरराव, चिंतामणराव वगैरे सरदार विशेष नामांकित होते.

पटवर्धन व इग्रज यांचा सबंध प्रथमतः जनरल गॉडर्ड याच्याशी झालेल्या युद्धप्रसगांत आला. नतर टिपूवरील स्वारीत जनरल वेलस्ली व परशुराम भाऊ याचा सबध अत्यत निकट येऊन परशुरामभाऊबद्दल इग्रजांच्या मनांत अतिशय आदर उत्पन्न झाला.दुसरा बाजीराव गादीवर आल्यानतर,नाना फडणविसाचे मित्र व रघुनाथरावाचे शत्रु म्हणून बाजीरावाने सर्व पटवर्धनांवर हत्यार उचलले व त्यांच्या जहागिरी जप्त करण्याचा घाट घातला. पण पटवर्धनाविषयी इग्रजाच्या मनांत जी आदरबुद्धि वसत होती तिजमुळे अल्पिष्टनसाहेबाने मध्यस्थी करून पटवर्धनांच्या जहागिरी राखल्या. तथापि बाजीराव व पटवर्धन सरदार यांचा बेबनाव अखेरपर्यंत टिकला. १८१७ सालीं बाजीरावाने इंग्रजांशी लढाई सुरू केली त्यावेळी पटवर्धन सरदार नांवाला बाजीरावाच्या बाजूस होते;परंतु बाजीरावाने पळण्यास सुरुवात केल्यानतर इंग्रजांनीं स्वतः पेशवेपद धारण करून मराठी राज्य चालवूं असा बहाणा केल्यामुळे,तसेच अल्पिष्टनसाहेबाने पटवर्धनांच्या जहागिरी प्रयासाने वांचविल्या याविषयीच्या कृतज्ञताबुद्धीमुळे, पटवर्धन हे लवकरच फौजा घेऊन परत आपापल्या गांवीं गेले. बाजीरावशाहीच्या अखेरीस सांगलीकर चिंतामणराव अप्पासाहेब हा एकटाच प्रमुख पटवर्धन सरदार बाजीरावाच्या पळांत उत्तर हिंदुस्थानपर्यंत गेला होता. पण तोहि बाजीराव स्वाधीन होण्यापूर्वींच परतला. चिंतामणराव अप्पासाहेब यांचें इग्रजांजवळ पुष्कळ वजन होते, यामुळें त्याला आपल्या हयातीपर्यंत स्वाभिमानी रीतीनें सरदारकी चालविता आली. बाजीरावाच्या कारकीर्दींत पटवर्धनांची जहागीर सरकारजमा होण्याची

ांचली तरी पटवर्धन घराण्यांतील पांचसात शाखांनीं आपल्या सरंजामाच्या ांटण्या करून मागितल्या व याला बाजीराव आणि इंग्रज यांनीं आपली ंमति दिली. यामुळें जहागिरीच्या चिरफळ्या पडून प्रत्येक घराणे कमकु- त झालें. अखेर पेशवाई नष्ट झाल्यानंतर इंग्रजांनीं प्रत्येक घराण्याशीं ामवेगळे तह केले. सरजामी फौज ठेवून प्रत्यक्ष नोकरी करण्याची माफी देली व प्रत्येकाच्या जहागिरींतला बराचसा मुलुख स्वतःकडे तोडून घेतला. ाटवर्धनांच्या उत्कर्षाचा काळ सुमारे साठ वर्षांचा होता; पण बाजीरावाच्या ारामुळें व इंग्रजांच्या स्नेहामुळे मराठेशाही नष्ट होण्यास पटवर्धन घराण्या- ड्डून फारसा प्रतिबध झाला नाही.

पेशवाई नष्ट झाल्यावर पटवर्धनांचें तेजहि नष्ट झालें. तथापि त्यांतल्या- यांत सांगलीकर थोरले अप्पासाहेब मिरजकर, थोरले बाळासाहेब व तात्या- ाहेब, मळेकर अण्णासाहेब वगैरे सस्थानिक प्रसिद्ध आहेत. पटवर्धनांत जों- ार्यंत सरंजामाच्या वांटण्या झाल्या नव्हत्या तोपर्यंत त्यांच्या हातीं आपल्या जहागिरीच्या प्रातांतील सर्व मुलकी फौजदारी अधिकार होते. पुढे वांटण्या ाल्यावर फक्त वडील घराण्याकडे हे अधिकार राहिले. पण सरंजामी मुलुख ्ग्रजांकडे तोडून देऊन नोकरीची माफी मिळविल्यामुळे जे पटवर्धन सरदार ूर्वीं हजारों फौजा पदरीं बाळगून असत त्यांच्या पागा रोडावल्या. पूर्वीच्या ांवलौकिकाचें मुख्य उगमस्थान जी लष्करी नोकरी ती गेल्यामुळे पटवर्ध- ांचे वैभव आणि त्यांचा व्यवसाय ही दोन्ही जाऊन वेळेचे काय करावे हे ्यांस सुचेनासे होऊन ते लहरी व मिजासी बनले. १८५७ सालच्या बडांत ामील असल्याच्या आरोपावरून जमखंडीकर अप्पासाहेब यांस काही दिवस प्रतिबंध झाला होता; व थोरले बाळासाहेब मिरजकर यांच्यावर इंग्रजांची करडी नजर झाली होती. पेशवाई परत आणतां येत नाहीं आणि इंग्रजांची नोकरी तर मोकळ्या मनाने करवत नाहीं या कुचंबणुकींत पटवर्धन संस्था- निकांचीं बरींच वर्षे गेलीं !

## पूर्वार्ध समाप्त



महादजी शिंदे.



नाना फडणविसांची कैद.

# मराठे व इंग्रज

( मराठेशाहीचें शतसांवत्सरिक वाङ्मयश्राद्ध )

## उत्तरार्ध

## विवेचन

## प्रकरण पाहिलें.

# मराठे व इंग्रज यांचा समकालीन उत्कर्षापकर्ष

मराठे व इंग्रज यांच्या परस्पर संबंधाच्या कालावधीचे पुढीलप्रमाणे चार विभाग करितां येतील.

१–१६४८ ते १७६१ या कालावधीत इंग्रजांचा व मराठ्यांचा निकट परिचय झाला व इंग्रज मराठ्यांशीं नमून वागत असून त्यांच्याशीं स्नेह जोडू पहात होते.

२–१७६१ ते १७८६ या कालावधींत इंग्रजांचें बस्तान इतर प्रांतांत पुष्कळ बसले असल्यामुळे त्यांना आत्मसामर्थ्याचा विश्वास वाटूं लागला व मराठ्याशीं कलागत करून आपली शक्ति अजमावयाचा त्यानी प्रयत्न केला; पण त्यांचा पराभव होऊन तो फसला.

३–१७८६ ते १८०० या कालांत मराठे व इंग्रज हे परस्परांस तुल्यबल असे लेखून परस्परांशी बरोबरीच्या नात्याने व सहकारितेने वागूं लागले.

४–१८०० ते १८१८ या कालांत मराठे कमकुवत होऊन इंग्रजांचा पक्ष वरचढ झाला व अखेर मराठ्यांचा पराभव होऊन इंग्रजांचें वर्चस्व सर्व मराठ्यांवर प्रस्थापित झाले.

पहिल्या कालावधीत इंग्रजांनीं आपला व्यापारी पेषा पुरा राखला होता. मराठे म्हणजे छत्रपति व त्यांचे पेशवे वगैरेंकडे आपले वकील पाठवावे, नजराणे द्यावे, व्यापारी सवलती मिळवाव्या, जकातीची माफी करवावी, रंगीबेरंगी मनोवेधक किंवा उपयुक्त माल विकून गिऱ्हाईक जोडावे, व स्वस्थपणे व्यापार करण्यास परवानगी द्या म्हणजे झाले—आम्हांस कोणाच्या भांडणांत पडावयाचे नाहीं किंवा आम्हांला मुलूख मिळविण्याची अपेक्षा नाहीं—असें भासवावें असें त्यांचें धोरण होते. १७७० च्या सुमारास त्यांच्या ताब्यांत बहुतेक बंगालप्रांत आला असून ते दिल्लीच्या बादशहांचे दिवाण बनले होते. दक्षिणेकडे फ्रेंचांचा मोड होऊन त्यांचें तिकडचें राज्य निर्मक्षिक झालें होतें. निजामास त्यांनीं पुरें स्नेहांकित केलें होतें. येऊन जाऊन दक्षिणेंत हैदर नाईक व वर मराठे येवढेच काय ते शत्रू त्यांना उरले होते. पैकीं हैदराविरुद्ध त्यांचे केव्हांच कांहीं चाललें नाहीं. मराठ्यांच्या विरुद्धहि त्यांचें बरेच दिवस कांहीं चाललें नसते. पण राघोबाच्या कलहामुळें त्यांचा हात पेशव्यांच्या राजकारणांत अदमासाच्या आधीं शिरला. त्यांनीं साष्टी घेतली ती मराठ्यांस एकदम परत घेतां आली नाहीं असें पाहून त्यांनीं राघोबाचा पक्ष घेऊन मराठ्यांशीं लढाई आरंभिली; व अखेर साष्टी

जरी त्यांच्या हातींच राहिली तरी वडगांवच्या लढाईत पराभव झाल्याने त्यांना मराठ्यांशीं तह करून व राघोबास पेशव्यांच्या स्वाधीन करून आपला पक्ष अद्यापि कमी आहे अशी कबुली द्यावी लागली. १७८६ ते १८०२ या कालवर्षीत इंग्रज व मराठे या दोघांचीहि एकसारखी चढती कमान होती.ते तुल्यबल असल्यानें दोघांमध्यें सहकारिता शक्य होती,व दोघांनी मिळून दोघांनाहि समान असा शत्रु जो टिपू सुलतान त्याचा परस्परांच्या मदतीनें निःपात केला. सवाई माधवरावांच्या कारकीर्दींत मराठ्यांच्या उत्कर्षाचा कळस झाला. दक्षिणेंत त्यांनीं निजामाचा पुरा मोड केला, व निजाम हा इंग्रजांचा दोस्त होता तरी पेशव्यांच्या दराऱ्यामुळें त्यांना त्याचा पक्ष उचलून त्यास मदत करितां आली नाहीं. इंग्रजांनाहि टिपूचा नाश झाल्यामुळे तुंगभद्रेपासून खालीं सर्व दक्षिणहिंदुस्थानांत निष्कंटक राज्य करावयास सांपडले. उत्तरहिंदुस्थानांत उभयतांची समसमान वांटणी होती. नर्मदेपासून यमुनेपर्यंत शिंद्यांनीं मुलूख आक्रमिलेला असून यमुनेपासून वर सर्व राज्य इंग्रजांचेच होते असे म्हणण्यास हरकत नाहीं. भांडणाचें एक मूळ म्हणजे दिल्ली ही राहिली होती. पण दिल्लीची सत्ता शिंद्यांच्या हातीं व दिल्लीची मत्ता—अर्थात् बादशहाच्या राज्यांतील वसूल—इंग्रजांच्या हातीं अशी वांटणी झाली होती. तात्पर्य, नाना फडणवीस व महादजी शिंदे यांच्या मरणापर्यंत पंचवीस वर्षांच्या काळांत मराठे व इंग्रज हे तुल्यबल असल्याकारणानें वरून सहकारी स्नेही, पण आंतून चुरशीने एकमेकांचा पाडाव करण्याची संधि पहात टपून बसलेले शत्रु असे होते. मुत्सद्दी नाना व तलवारबहाद्दर महादजी यांच्या मरणाबरोबर सर्व पारडें एकदम फिरलें.बाजीराव हा जात्या कमकुवत व मूर्ख असून शिवाय इंग्रजांच्या उपकाराने मारला गेलेला होता. येऊन जाऊन इंग्रजांना प्रबळ प्रतिस्पर्धी काय ते शिंदे व होळकर. पण या उभयतांनी कजा आरंभला व त्यांचें शौर्य अंतःकलहाग्नींत दग्ध होऊन गेलें. यामुळे १८०३-४ च्या सुमारास या दोघांशीं एकएकटें लढून त्यांचा पराभव करून निर्वीरमुर्वीतलं असा सिंहनाद हिंदुस्थानच्या छातीवर उभे राहून व दंड थोपटून इंग्रजांना करितां आला.

इंग्रज व मराठे यांचा उत्कर्ष बराच काळपर्यंत एकसमयावच्छेदेंकरून समांतर असा हिंदुस्थानच्या निरनिराळ्या भागांत होत होता.पण ज्या काळांत मराठ्यांच्या सत्तेचा चढ होऊन उतारहि झाला त्या काळांत इंग्रजांच्या सत्तेचा चढ मात्र एकसारखा होतच होता. त्यांच्या सत्तेचा उत्कर्ष सावकाश संथपणें पायरीपायरीने होतच होता; व तिनें माघार अशी सहसा खाल्ली नाहीं. इंग्रजांनींहि कित्येक लढायांत माघार खाल्ली; तसेच मराठ्यांशीं झालेल्या पहिल्या युद्धाच्या प्रकरणाप्रमाणे इतर कित्येक प्रकरणांत त्यांच्या धोरणाची थोडीबहुत पीछेहाट झाली. पण भरतीच्या वेळीं समुद्राच्या लाटा किनाऱ्यावर फुटून परत

येतातशा दिसल्या तरी एकंदरीनें पाण्याची प्रगतिच असते; त्याचप्रमाणें लढाईत तात्पुरता पराभव किंवा राजकारणांत तात्पुरती पीछेहाट झाली असली तरी एकंदरीनें इंग्रजांच्या सत्तेला व ऐश्वर्याला भरतीच भरत होती. मराठे व इंग्रज यांच्या सत्तेच्या अस्तोदयाची तुलना लक्षांत येण्याकरितां आपण सन १६०० पासून सन १८१८ पर्यंतची जंत्री हातीं घेऊन थोडेंसें पर्यालोचन करूं. जी गोष्ट नुसत्या तारखांनीं लक्षांत येत नाहीं ती मराठे व इंग्रज अशा अन्योन्यसापेक्ष भाषेनें बोलल्यास कदाचित् अधिक लक्षांत येईल.

इंग्लडांत ज्या वेळीं हिंदुस्थानच्या संपत्तिमत्तेविषयीं आश्चर्यपूर्ण चर्चा होऊन व्यापारी कंपनी बनवून व्यापार करण्यास निघण्याचा इंग्रजांचा बेत चालू होता त्या वेळी इकडे हिंदुस्थानांत मोगलांचा अंमल दक्षिणेखेरीज बहुतेक सर्व हिंदुस्थानांत बसला होता. दक्षिणेंत मोगलांचा अंमल नव्हता तरी इतर मुसलमानांचा होता. तालीकोटची लढाई होऊन हिंदुपदपातशाही नामशेष झाली होती; व अहमदनगरची निजामशाही, विजापुरची आदिलशाही, गोवळकोड्याची कुतुबशाही हीं तीन मुसलमानी राज्यें ( ब्राह्मणी राज्यापासून उत्पन्न झालेलीं ) जिवत असून त्यांनीं सर्व महाराष्ट्र आक्रमिला होता, व मोंगलांच्या सत्तेस थोपवून धरले होतें. या वेळीं मराठ्यांची स्थिति चमत्कारिक होती. त्यांनीं या तीनहि मुसलमानी दरबारांत सरदाऱ्या व मनसबदाऱ्या व त्याबरोबर येणारे पारतंत्र्य पत्करलें होतें, इतकेंच नव्हे तर, निरनिराळ्या मराठे घराण्यांमध्यें हाडवैर माजलें असून मुसलमान पातशाहांनीं मराठ्यांतील अंतःकलहावर मुख्य भिस्त ठेवली होती व तो कलह शांत न होईल अशी ते व्यवस्था करीत. ज्या साली लंडन येथे ईस्ट इंडिया नामक इंग्रजी व्यापारी कंपनी स्थापली गेली त्याच्या आदल्याच सालीं मालोजीचा मुलगा शहाजी भोसले याचें जाधवराव याची कन्या जिजाबाई इच्याशीं लग्न झालें. या वेळीं शहाजी अवघा पांच वर्षांला होता; अर्थात् त्याचे सर्व पराक्रम यापुढें व्हावयाचे होते. १६१२ सालीं इंग्रजांनीं सुरतेस वखार स्थापली तेव्हां शहाजी सतरा वर्षांचा होता. शिवाजीच्या जन्मापूर्वींच इंग्रजांनीं जहांगीर व शहाजहान यांजकडून परवानगी मिळवून बंगाल्यांत व्यापारी वखारी घालण्यास सुरुवात केली होती; त्यांनीं मच्छलीपट्टणास वखार घालून मद्रास इलाख्यांत आपला पाय रोवला तेव्हां शिवाजी चार वर्षांचा होता, व शिवाजीच्या वयाच्या बाराव्या वर्षीं इंग्रजांनीं खालीं मद्रासेस फोर्ट सेंट जॉर्ज किल्ला बांधण्याइतकें आपलें बस्तान बसविले होतें ( १६३९ ). शिवाजीनें महाराष्ट्रांतील प्रमुख किल्ले हस्तगत करून, अफजुलखानाचा वध करून विजापुरकरांकडून कल्याणापासून गोव्यापर्यंत व भीमेपासून वारणानदीपर्यंत मुलूख हस्तगत केला त्या सुमारास इंग्रजांना मुंबई बेट मिळून मुंबई इलाख्याच्या कोंकणपट्टीच्या

तोंडीं त्यांचा प्रवेश झाला होता. डच हतप्रभ झाले होते; मात्र पोर्तुगीज अजून जोरांत होते. शहाजी वारून शिवाजी हा विजापूरदरबारापासून सर्वस्वीं स्वतंत्र झाला त्याच सालीं इंग्रजांची व शिवाजीची सुरतेस प्रथम लष्करी सलामी झाली, व इंग्रजांना बंदरावरील जकातीपैकी शेंकडा एक इतका कर शिवाजीने माफ केला. शिवाजींच्या राज्यारोहणाच्या सुमारास इंग्रजांचे बस्तान मुंबई इलाख्याकडे यथातथाच होते; पण बंगाल्यात व मद्रासेकडे त्यांची प्रगति होत होती. राज्यारोहणापासून दुसऱ्या साली इंग्रजांनी चंद्रनगर येथे वखार घातली; त्यांचे व फ्रेंचांचे युद्धप्रसंग अद्यापि व्हावयाचे होते.

शिवाजीच्या मृत्यूपासून पांचवे साली ( १६८५ ) मुंबई बेटात ईस्ट इंडिया कंपनीची प्रतिष्ठापना झाली; व तिकडे बंगाल्यांतहि पुढच्याच वर्षी त्यांनीं कलकत्त्यास आपलें ठाणे बसविले. दक्षिणेत औरंगजेब मराठ्याशी लढत असतां इंग्रज हळूहळू आपला व्यापार वाढवीत होते; व ज्या साली(१६९८) झुलफिकारखानाने जिंजीचा किल्ला हस्तगत करून राजाराममहाराज व त्यांचे बरोबर सर्व मराठेशाही प्राणसंकटांत घातली त्या साली कलकत्यास इंग्रजानी फोर्ट वुइल्यम किल्ला बांधला. १६८७ साली इंग्रजानी औरंगजेबाशी युद्ध करण्याइतकें मनःसामर्थ्य संपादन केले होते. या युद्धांत त्यांचा अर्थातच टिकाव लागला नसता व या अविचाराच्या कृत्यामुळे आपण फार संकटांत आलो आहों असें सर्व इंग्रज वसाहतींना वाटूं लागले असते; पण दक्षिणेत संभाजीची औरंगजेबाशीं विरोध करण्यास याच वेळी गांठ पडून इंग्रजांस मोठे साहाय्य झाले. कारण, इंग्रजांपेक्षां संभाजीचा नाश करणे औरंगजेबास अधिक जरूर वाटत होते. व १६८९ साली संभाजीस पकडून त्याने त्याचा वध केला तरी त्यामुळे दक्षिणंतील युद्ध न थांबतां उलट आपणास हे गांधीलमाशांचें घरटे डवचण्याची कोठून बुद्धि झाली असा पश्चात्ताप बादशहास होण्याइतके मराठे चवताळून त्याच्याशीं लढूं लागले. इंग्रजांचा मुलुख बंदरानजिक असल्यामुळे व औरंगजेबाचा सर्व रोख घाटमाथ्यावरील प्रदेशाकडे असल्यामुळे इंग्रज एका अर्थाने त्याच्या सपाट्यांत सहसा सांपडण्यासारखे नव्हते. शिवाय, इंग्रज ही घुगुरटी आहेत, तीं केव्हांच चिरडून टाकू; पण मराठ्यांचा समाचार मात्र आधीं घेतला पाहिजे, असें त्यास वाटत असावें.

असो; संभाजीच्या वधाच्या दुसऱ्याच वर्षापासून (१६९०) इंग्रजांची निव्वळ व्यापाराची दृष्टि जाऊन तिच्याबरोबर इकडील मुलखापासून वसूल उत्पन्न करण्याची दृष्टि आली होती. याच सुमारास त्यांनीं विलायतेंत आपणाकरितां एक सैन्य उभारण्याची व्यवस्था केली असून हिंदुस्थानांतील राजेरजवाड्यांशीं जरूर तर युद्ध करण्याची परवानगी घेऊन ठेवली होती.

राजाराममहाराजांच्या मृत्यूनंतर दोन वर्षांनीं हिंदुस्थानशीं तुटक व्यापार

करणाऱ्या निरनिराळ्या इंग्रज व्यापारी कंपन्या मोडून युनायटेड ईस्ट इंडिया कंपनी नामक एकच संघटित व्यापारी कंपनी बनली. अर्थात कंपनीच्या व्यापाराला व सामर्थ्याला एकीमुळे बरकत आली. १७०७साली औरंगजेब मृत्यु पावल्यापासून पुढील काळांत मराठ्यांची सत्ता वाढण्यास सुरुवात झाली. पुढच्याच वर्षी शाहूस राज्याभिषेक झाला(१७०८)व व पुढे १० वर्षांच्या आंत बाळाजी विश्वनाथ याने दिल्लीहून चौथाई व सरदेशमुखी यांच्या सनदा आणून पातशाही राजकारणांत मराठ्यांचा हात प्रथम शिरकविला. याच सुमारास ( १७१५ ) इंग्रजांनीहि दिल्लीच्या बादशहापासून बंगाल्यांतील अडतीस शहरें व व्यापारावरील कराची माफी मिळविली. येथपासून पुढें एका बाजूस मराठे व दुसऱ्या बाजूस इंग्रज असे दुतर्फी राजकारण दिल्लीच्या दरबारी सुरू झाले, ते १८०३ साली इंग्रजांनी शिंद्याच्या हातून दिल्ली शहर काबीज करीपर्यंत सतत सुरू होते. पहिल्या बाजीरावाने दिल्लीवर स्वारी केली ( १७३४ ) व निजामाचा पराभव करून त्याच्यापासून माळव्याची सनद दिल्लीच्या पातशहाकडून मिळवून देण्याची हमी घेतली ( १७३८ ), चिमणाजी आप्पाने वसई घेऊन इंग्रजांचे प्रतिस्पर्धी जे पोर्तुगीज याचा पाडाव केला ( १७३९ ),नानासाहेब पेशव्यानें माळव्याची सनद मिळविली,सदाशिवरावभाऊने कर्नाटकावर स्वारी करून सावनूरच्या नबाबाकडून २५ लक्षांचा मुलूख मिळविला,या सर्व अवधीत इंग्रजांचे फ्रेंचाशी कर्नाटकांत युद्ध सुरू झाले होते; व ज्या सालीं रघुनाथरावाने उत्तरहिंदुस्थानावर स्वारी केली त्याच साली कर्नाटकात फ्रेंचाना माघार घ्यावी लागून इंग्रजांची सरशी झाली. रघुनाथराव पेशवे व क्लाईव्ह साहेब यांचे पराक्रम अनुक्रमे दक्षिणेत व उत्तरेत समकालीन घडले. १७५७ साली इकडे दक्षिणेत मराठ्यांनी श्रीरंगपट्टणाला वेढा देऊन ३२ लक्षांची खंडणी घेतली, तर तिकडे बंगाल्यांत लॉर्ड क्लाइव्ह याने प्लासीची लढाई जिंकून इंग्रजी राज्याची त्या प्रांतांत स्थापना केली. ज्या साली म्हणजे१७५८ मध्ये अटकेवर झेंडा लागला त्या सालीं फ्रेंचांच्या हातून उत्तरसरकार हा प्रांत जाऊन मद्रासेकडे इंग्रजांची सरशी झाली. १७६० सालीं मराठ्यांनी उदगीरच्या लढाईत निजामाचा पराभव करून ६० लक्षांचा मुलुख मिळविला त्याच साली इंग्रजांनी बंगालचा संपूर्ण ग्रास केला. अशा रीतीने अनेक वर्षें समांतर चालू असलेल्या इंग्रज व मराठ्यांच्या यशाची जोडी फुटण्यास १७६१ साली प्रारंभ झाला. कारण, या साली पानपतास मराठ्यांचा मोठा पराभव झाला;व त्याच सालीं इकडे मद्रासेकडे फ्रेंच सरदार लाली याचा पुरा मोड होऊन इंग्रजांनीं पॉंडिचरी शहर घेतले.

फिरून कांहीं काळपर्यंत पेशवे व इंग्रज यांच्या यशाची जोडी बरोबर चालू लागली. १७६३ सालीं मराठ्यांनीं राक्षसभुवनाची लढाई जिंकून निजा-

मास चीत केले, तर तिकडे इंग्रजांनीं फ्रेंचांचा पुरा निःपात केला. सन १७६४त माधवराव पेशव्यानें हैदराचा पराभव केला तर बंगाल्यांत क्लाइव्हनें बक्सारची लढाई जिंकली. १७६५ च्या सुमारास पेशव्यांनीं उत्तरहिंदुस्थानांत स्वारी करून १५ लक्ष खंडणी घेतली तर क्लाइव्हसाहेबानें दिल्लीच्या पातशहापासून बंगालच्या दिवाणीची व उत्तरसरकार प्रांताची सनद मिळविली.

१७७१ सालीं मराठ्यांनीं शहाअलमबादशहास गादीवर बसवून दिल्लीस आपले वर्चस्व पुरे प्रस्थापित केलें. १७७३ साल एका दृष्टीने या तुलनेस अत्यंत महत्त्वाचे आहे. या साली नारायणरावाचा वध होऊन मराठ्यांच्या राज्यांत दुफळीचें बीज रोवले गेलें; तर त्याच सालीं विलायतेंत पार्लमेंटनें रेग्युलेशन आक्ट पास करून सर्व हिंदुस्थानांत निरनिराळी विभागलेली सत्ता एकाच गव्हर्नर जनरलाच्या हाती एकीकृत केली. मराठ्यांच्या कमकुवतपणास, इंग्रजांच्या खंबीरीस, व मराठ्यांच्या कारभारांत इंग्रजांचा हात शिरण्यास येथपासून खरा प्रारंभ झाला. पुढें दोन वर्षांतच हा फरक विशेष दिसून आला. कारण पुरंदरच्या तहाने राघोबाचा पक्ष इंग्रजांनी सोडावा असे ठरलें तरी त्यांना साष्टी व वसई इंग्रजांस द्यावी लागली. साष्टी इंग्रजांनी आधीच घेतली होती व तिच्या भरीस आणखी वसई गेली. सन १७७९ सालीं वडगांवास इंग्रजांचा मराठ्यांनीं पराभव केला व इंग्रजांनीं साष्टी परत देण्याचे नाइलाजाने तहांत कबूल केले. इंग्रजांचा पुरा निःपात करण्याची जरूरी भासून मराठे निजाम व म्हैसूरकर यांचें त्रिकूट जमण्याच्या बेतांत आलें. पण १७८१ साली इंग्रजांनीं तिकडे हैदराचा पराभव करून व इकडे मराठ्यांशींहि शांततेचा तह करून आपली बाजू सांवरली. १७८२ सालीं हैदर अल्ली मेल्यामुळें इंग्रज मोकळे झाले, यामुळें सालबाईच्या तहांत मराठ्यांना साष्टी व वसई इंग्रजांना कायमची द्यावी लागली व त्यांनी इंग्रजांपासून काय मिळविलें तर मराठ्यांच्या शत्रूंना त्यांनी मदत करूं नये असे अभिवचन ! इतके इंग्रजांचे पारडे जड होऊन बसले होते. १७८४पासुन १७९९ पर्यंत मराठे व इंग्रज यांना टिपू हा एकच समान शत्रु असल्यामुळे त्यांचे सहकार्य सुरू होतें. दरम्यान महादजी शिंद्यानें १७८९ सालीं दिल्ली घेऊन तेथील सर्व सूत्रें आपल्या हातीं घेतली व १७९१ साली, म्हणजे इकडे इंग्रजांनीं मराठ्यांसह टिपूचे अर्धे राज्य घेतले त्याच सालीं महादजीने पेशव्यास वकीलमुतलकीची वस्त्रें अर्पण करून दिल्लीस आपण प्रस्थापित केलेल्या वर्चस्वाचा अनुभव पुण्यास नाना फडणविसांस आणून दिला पुढें चार वर्षांत खर्ड्याची लढाई होऊन पेशव्यांचें यश कळसास पोंचलें; पण पुढच्याच वर्षी सवाईमाधवरावाच्या मृत्यूमुळें मराठ्यांच्या यशानें माघार खाल्ली. तिकडे बंगाल्यांत कॉर्नवालिससारखा गव्हर्नर जनरल येऊन इंग्रजी राज्याची उत्तम व्यवस्था लावीत होता, तों इकडे सवाईमाधवरावाच्या

व महादजीच्या मृत्यूमुळे नाना फडणवीस कमकुवत होऊन गेला, व बाजीरावास गादीवर बसविण्यासंबंधाने तंटे सुरू होऊन बाजीराव व नाना फडणवीस दोघांनाही शिंदेहोळकरांच्या दहशतीनें आळीपाळीने इंग्रजांची मदत घ्यावी लागली, आणि १८०२ च्या वसईच्या तहानें बाजीराव इंग्रजांच्या हातचे बाहुलें होऊन बसला. यापुढें इंग्रजांना मराठ्यांशिवाय दुसऱ्या कोणाशीं लढण्याचे कारणच नव्हते, व त्यांनीं १८०२–३ सालीं शिंद्यांचा, १८०४ सालीं होळकरांचा व १८१७–१८ सालीं पेशव्यांचा पराभव करून पेशवाई खालसा केली !

## प्रकरण दुसरें

# मराठेशाही कशानें बुडाली ?

## ब्राह्मणांची जबाबदारी।

मराठेशाही बुडविल्याचा दोष दुसऱ्या बाजीरावावर सहजच येतो, व त्या दोषास धनी होण्याइतकी त्याची लायकीहि होती यांत शंका नाही; पण एक तर एका रावबाजीशिवाय ज्याला सामान्यतः नादान म्हणतां येईल असा कदाचित् नारायणरावाखेरीज पेशवाईत दुसरा पुरुषच झाला नाही ही गोष्ट लक्षांत ठेविली पाहिजे. सवाई माधवराव अल्प वयांत वारला, व त्याच्या नांवाने राज्यकारभार चालत असला तरी तो सर्व नाना फडणवीस चालवीत असे. अर्थात् राज्यरक्षणाच्या दृष्टीने सवाईमाधवरावाच्या कारकीर्दीस नांव ठेवण्यास जागा उरत नाही. रघुनाथराव स्त्रैण होता तरी तरवारबहादूर होता व या दृष्टीने राज्यरक्षणास त्याचा उपयोगच झाला असता. या सर्वांवरून निदान एवढे खास म्हणता येईल की, सतराशें चौदापासून सतराशे नव्याण्णवपर्यंत मराठी राज्याची चढतीच कमान होती, व खर्ड्याच्या लढाईपर्यंत मराठी दौलतीचा जो डौल होता तो तसाच पुढे टिकता तर मराठी राज्य बुडण्याचे कांहींच कारण नव्हते. मराठ्यांच्या राज्यांत ब्राह्मण पेशवे हे जसे उदयास आले व मराठ्यांनी त्यास उदयास आणले तसेच ब्राह्मण पेशव्यांच्या अमदानीत त्यांनी शिंदे होळकर गायकवाड यांसारखे मराठे सरदार उदयास आणले. मराठी राज्य टिकविण्याची जबाबदारी एकट्या पेशव्यावरच होती असे म्हणतां येत नाही. पेशवे, रास्ते, पटवर्धन या ब्राह्मण सरदारांइतकीच सातारकर महाराजांवर व शिंदे होळकर गायकवाड या मराठे सरदारांवरहि ती होती. साताऱ्च्या दरबारांत पेशव्यांस वरिष्ठ मान होता तो माधवराव पेशव्यांपर्यंत त्यांच्या कर्तबगारीमुळे सकारणच होता. शाहूमहाराज कधींहि पेशव्यांच्या कैदेत नव्हते, व त्यांच्या मागून आलेल्या साताऱ्च्या गादीच्या धन्यास कैद झाली असल्यास तीहि त्यांच्या नादानपणामुळे सकारणच होती. साताऱ्चे गादीचा अभिमान शिंदे होळकर गायकवाड वगैरे ब्राह्मणेतर सरदारांस होता किंवा नव्हता यांपैकीं एक कांहींतरी निश्चित म्हटले पाहिजे. त्यांना हा अभिमान नव्हता म्हटलें म्हणजे पेशव्यांवरील दोषारोपाचा सर्वच ग्रंथ आटोपला. उलटपक्षीं त्यांना हा अभिमान होता असें म्हटले तर त्यांना पेशव्यांस बाजूस ठेवून व सातारकर महाराजांचें नांव पुढें करून राज्यकारभार चालविण्याचा उद्योग करण्यास नको कोणीं म्हटलें होते ?

## मराठ्यांची जबाबदारी.

पण शिंदे होळकर व गायकवाड यांच्या मनांत साताऱ्च्या गादीचा विशेष अभिमान धरण्याचे कधी आले असे कागदपत्रांवरून दिसत नाही. शिंदेहोळकरांनी मुलुख मिळविला तो सर्व उत्तरहिंदुस्थानांत व तेथे त्यांनी स्वतंत्र होऊन राज्ये स्थापण्याचा प्रयत्न केला. शिंद्यांनी तर सालबाईच्या तहाच्या वेळी स्वतःस स्वतंत्र सस्थानिक बनवून पेशवे किंवा सातारकर महाराज यांपैकी कोणाचाच मुलाजा ठेवला नाही. यावर कदाचित् कोणी असे म्हणेल कीं, शिंदे होळकर गायकवाड हे मूळ पेशव्याच्या अमदानीत प्रत्यक्ष उदयास आले; त्यांच्या घराण्यातील मूळ पुरुषांस पेशव्यांनीच हातांशी धरून प्रथम सरदार बनविले, यामुळे त्यांना पेशवे हेच आपले धनी असे वाटे, व एका अर्थाने हे खरेहि आहे. राणोजी शिंद्याने पहिल्या बाजीरावाचे जोडे उरावर सभाळून व इमानाची परीक्षा देऊन सरदारी मिळविली व त्याचा मुलगा महादजी यानेहि उत्तरहिंदुस्थानात पराक्रम करून दिगत कीर्ति मिळविली तरीहि तो पेशव्यांच्या चरणपादुकांना विसरला नाही; व सवाईमाधवरावास दिल्लीच्या बादशहाकडून आणलेली वकीलमुतालकीची वस्त्रे ज्या हाताने अर्पण करून पेशवाईच्या ऐश्वर्यात भर घातली, त्याच हाताने त्याने सवाई माधवरावाचे जोडे उचलले ! शिंद्यांच्या दौलतीच्या भूषणांत पेशव्याचे जोडे राखून ठेवण्यात आले होते असे ग्रॅट डफ म्हणतो ! पण महादजीच्या वेळेपर्यंत शिंद्यानी पेशव्याच्या गादीशीं जे इमान राखले ते पुढे दौलतराव शिंद्याने कितपत पाळले ? दुसरा बाजीराव नादान म्हणून आपल्या धन्याला प्रतिबधांत ठेवण्याचा हक्क जर शिंदेहोळकरांस पोहोचत होता तर पेशवे किंवा फडणवीस यानाहि, सातारकर महाराज नादान. वाटल्यास त्यांनाहि प्रतिबधांत ठेवण्याचा हक्क कां पोहोचू नये ? साताऱ्चे राजे हे शिवाजीमहाराजांचे वशज या नात्यानेंच पाहावयाचे तर शिंद्यांनी कोल्हापुरकरांवर फौज का न्यावी ? कोल्हापुरकर झाले तरी शिवाजीचे वशजच होते. तात्पर्य, इमान हे कोणत्याहि एखाद्या तत्वाच्या कसोटीस लावून त्यावरून निमकहरामपणा ठरवावयाचा तर मराठे सरदार हे पेशवे व फडणवीस यांच्याइतकेच दोषी किंवा निर्दोषी, म्हणावे तसे, सारखेच ठरतील. शिंदे व होळकर यांनीं इंग्रजांशीं शेवटीं जे तह केले त्यांत त्यांनीं साताऱ्च्या गादीची किंवा सर्वसाधारणरीत्या शिवाजीच्या वशजांची आठवण ठेविली होती असे दिसत नाही. सर्व गोष्टींतली गोष्ट ही की, पेशवाई बुडाल्यानतर छोटेसे कां होईना, पण इंग्रजांनी सातारकर महाराजांस स्वतंत्र राज्य दिलें होतें तें तरी सातारकरांनीं कोठें टिकविले ? पेशवाईच्या नाशानंतर अवघ्या ३० वर्षांत हेंहि राज्य बुडालेंच कीं नाहीं ? बरें, इग्रज सर्वच बुडवावयास निघाले होते असे म्हणावें तर शिवाजीच्या वंशजांचें एक राज्य अद्याप कोल्हापुरास व पेशव्यांचे

सरदार शिंदे व होळकर यांचीं राज्यें उत्तर हिंदुस्थानांत अद्यापि जिवंत आहेत! या सर्व गोष्टींचा विचार करतां मराठेशाही बुडण्यास अमुक एकच पुरुष किंवा अमुक एकच घराणें अथवा जात कारणीभूत झाली असें म्हणतां येत नाहीं. इंग्रजी सत्तेचा पूर आला म्हणून कोणत्या तरी निमित्तानें त्या पुरांत मराठी राज्यें वाहून गेलीं; व पुरांत झाले तरी सर्वच झाडें उन्मळून पडतात असें नाहीं, कांहीं टिकतातहि. या न्यायाने वर दर्शविल्याप्रमाणे कांहीं मराठी राज्यें अद्यापि टिकून आहेत.

मराठी पातशाही बुडविली असा आरोप करून ब्राह्मणांना दोष देणारे जसे कांहीं असमंजस लोक आढळतात, तसेच पेशवाईच्या अखेर इंग्रजांशीं परस्पर राजकारण करून आपली बंधमुक्तता करू पाहण्याचा प्रयत्न केल्याचा दोषारोप साताराच्या दरबारावर करून पेशवाई बुडविण्यास त्यांनी मदत केली असे म्हणणारे असमंजस लोकहि कांहीं आढळतात. पेशवे नोकर व सातारकर महाराज धनी हें नाते लक्षांत घेतां पेशव्यांनीं त्यांना कैदेत ठेवणें अयोग्य होते असें एका दृष्टीनें म्हणतां तरी येईल; पण आपणास कैदेत टाकणाऱ्या नोकराविरुद्ध व तीहि स्वतःच्या बंधमुक्ततेकरितां इंग्रजांपाशी दाद मागण्याने सातारकर धन्यास बेइमानीचे लांछन कसे लागू शकते हे समजणे कठिण आहे.

## व्यापारी धोरण चुकलें काय ?

इंग्रज लोक हिंदुस्थानांत प्रथम व्यापारी वेषाने आले व नंतर हळूहळू त्यांनीं राज्य स्थापन केलें. या गोष्टीस अनुलक्षून पुष्कळांस कदाचित् असा प्रश्न सुचत असेल कीं, " मराठ्यांची मूळ चूक हीच झाली नाहीं काय कीं, त्यांनीं इंग्रजांना आपल्या देशांत व्यापाराची परवानगी दिली ? " पण असला प्रश्न समजसपणाचा आहे असे आम्हांस वाटत नाहीं. आजचे विचार जुन्या काळाला लावण्याची चूक मनुष्य नेहमीं करीत असतो. ज्या वेळी इंग्रज लोक व्यापार करण्यास प्रथम हिंदुस्थानांत आले त्या वेळीं हे आपल्या देशांत न आलेले बरे असें वाटण्यास काहींच कारण नव्हते.पुढें हे लोक आपणांस भारी होऊन आपलें राज्य घेतील असे दुःस्वप्न मराठ्यांना त्या वेळीं पडलें नाहीं. कारण, त्यांच्या वेळच्या व त्यांना माहीत असलेल्या जगाच्या पूर्वीच्या इतिहासांत हातामध्यें प्रथम तागडी घेऊन येऊन मागाहून तख्त बळकावल्याचे उदाहरण घडलेलें नव्हतें.वैश्यवृत्ति व क्षात्रवृत्ति या वेगळ्या आहेत. त्यांची अदलाबदल होऊं शकत नाहीं. किंबहुना वर्ण हा वृत्तिनिष्ठ असल्यामुळें वृत्तिसंकर म्हणजे तो एक वर्णसंकरच अर्थात् पाप होय; व हें पाप कोणी म्हणजे परके लोकहि करीत नसतात, असें चातुर्वर्ण्यावर विश्वास ठेवणाऱ्या हिंदी लोकांस वाटलें असल्यास नवल नाहीं ! महाराष्ट्र देशांत मारवाडी वगैरे वैश्यवृत्तीचे लोक

अनेक झाले व त्यांनीं व्यापाराकरितां देशांतरही केलें; पण त्यांच्यापैकीं कोणीं राज्याची आकांक्षा धरल्याचा अनुभव नव्हता, मोंगल वगैरे यवन इकडे येऊन त्यांनीं राज्यें स्थापिलीं ही गोष्ट खरी.पण ते उघड उघड उघड जेतेम्हणूनच आले,व्यापारी म्हणून आले नव्हते.अर्थात् व्यापाऱ्याची जात वेगळी व राज्य करणाराची जात वेगळी तिची अदलाबदल होऊ शकत नाही, असाच त्या वेळच्या मराठ्यांचा विश्वास असावा असे वाटते; आणि तसा तो असल्यास चूक म्हणतां येत नाहीं !

आपल्या हातांतून तागडी गळून पडली केव्हां, तरवार तेथे आली केव्हां व आपल्या बुडाखाली तख्त बसले केव्हां हे स्वतः इंग्रजांचे इंग्रजांनाच जर कळले नाही,सर्व प्रकार जर त्यांनाहि स्वप्नसाक्षात्काराप्रमाणे झोपेतच झाला तर मराठ्यांना तरी टोपीकर पहिल्याने डोळ्यास दिसतांच हे पुढे आपले राज्य घेणार असे कसे वाटावे ? व त्यांना आपल्या राज्यांत राहू देण्यास प्रतिबंध करण्याची बुद्धि त्यांना कशी व्हावी ? उलटपक्षी, ते आपल्या राज्यांत आले तर बरे असेच वाटले असावे.'स्वदेशी'चा मंत्र मनुष्याला फक्त प्रसंगविशेषीच म्हणजे आपत्तीच्या किंवा विपत्तीच्या विशेष प्रसंगीच आठवतो, सुस्थितीत आठवत नाही हे प्रसिद्धच आहे. मूर्तिमंत समद पुढे येऊन उभा राहिला म्हणजे मग तोंडांत रामनाम येते ! हिंदी लोकांना बंगालच्या फाळणीनंतर ' स्वदेशी ' आठवली व इंग्रजांना ती सांप्रतच्या महायुद्धानंतर आठवली ! इंग्रज हिंदुस्थानांत आले तेव्हां हिंदी लोक सुस्थितीत होते, तेव्हां त्याना आजच्या अर्थानें 'स्वदेशी' कशी सुचणार ? मनुष्य हा स्वभावतः विलासप्रियच असतो सांपत्तिक सुस्थिति असली म्हणजे विलासबुद्धि सहजच बळावते.शिवाय असा कोणताहि देश नाहीं कीं, ज्याला सर्व प्रकारच्या कारागिरीचा किंवा कलाकौशल्याचा मक्ता ईश्वरानें दिला आहे. म्हणून चैनीचे व विलासाचे पदार्थ मिळतील तेथून, आपपरभाव न ठेवतां मनुष्यास विकत घ्यावे लागतात. एरवीं चैन किंवा विलासबुद्धि पुरी होत नाही. हिंदुस्थानांत इंग्रच हेच कांहीं पहिले विदेशी व्यापारी आले नव्हते. त्यांच्यापूर्वी पोर्तुगीज, त्यांच्यापूर्वी डच, त्यांच्यापूर्वीं यवन असे अनेक परकीय लोक इकडे व्यापाराकरितां येत असून परदेशी माल विकत घेण्याचा परिपाठ इकडे सर्रास पडलेला होता.बरे, मराठे कांहीं एकच सर्वसत्ताधारी नव्हते. त्यांचा मुलुख आधींच थोडा, त्याला समुद्रकिनाऱ्याची एकच पट्टी व या पट्टीत इंग्रजांचा व्यापार फारच थोडा होता त्यांच्या व्यापाराचा भर मराठ्यांच्या हातीं नसलेल्या मुलखांतच विशेष होता. व या इतर मुलखांतच, ते आधींच इतके बळावले होते कीं,मराठ्यांनी त्यांना आपल्या मुलखांत येऊं न दिल्यानें हिंदुस्थानांतून त्यांना आपला गाशा गुंडाळावा लागता अशी स्थिति नव्हती. तात्पर्य, इंग्रजांच्या व्यापाराला प्रतिबंध

करून त्यांना सुरुवातीस आपल्या राज्यांत बहिष्कार घालणें हें त्या वेळीं स्वाभाविक किंवा शक्य नव्हते.

पण याच्याहि पलीकडे जाऊन असे म्हणतां येईल कीं, इंग्रज व्यापाऱ्यांस प्रतिबंध न करितां त्यांना उत्तेजन व सवलती देऊन आपल्या राज्यांत बोलावणे हेंच अधिक स्वाभाविक असून त्या वेळच्या मराठ्यांना इष्टहि वाटले असले पाहिजे. व्यापारी म्हटला की तो आपणाकडे ओढावा, त्यापासून त्याचा फायदा असला तरी आपलाहि आहे, हे मनुष्यमात्राला उपजत बुद्धीचे अर्थशास्त्रच शिकवते. घरीं चालत आलेला सौदागर घालवून दिला असे जगाच्या चरित्रांतील कोणत्याहि राष्ट्राच्या इतिहासांत आढळणार नाही. आपल्या कारागिरांस उत्तेजन देणे वेगळे व परकी व्यापाऱ्यांवर बहिष्कार घालणे वेगळें. किंबहुना स्वदेशी कारागिरीचे चीज व फैलाव होण्यास परकी व्यापाऱ्यांची मदत घेणेंच जरूर असते. आपला कारागिरीचा माल परदेशांत गेला तरच त्याला भारी किंमत येते; कारण, त्याची अपूर्वाई तेथेच विशेष. तसेच आयात मालावरील जकातीचे उत्पन्नहि बरेच असते. ते सुखासुखी कोण गमावणार ? या नियमास अनुसरून त्या काळी परक्या व्यापाऱ्यांची हिंदुस्थानात चहा होत असे. कारण, त्यांच्या हातून कोट्यवधि रुपयांचा देशी कारागिरीचा माल परदेशास जाऊन त्याच्या मोबदला मौल्यवान सोने रुपें वगैरे हिंदुस्थानांत येई. शिवाय इकडे पैदा न होणारे उपयुक्त व चैनीचे असेहि अनेक जिन्नस त्यांच्या मार्फत मिळत; अशा प्रकारे त्यांच्यापासून दुहेरी फायदा होई तो कोण टाकून देणार ? व तो टाकावयाचा कां, तर हे व्यापारी पुढेंमागे शिरजोर व सत्ताधीश होऊन आपला व्यापार बुडवितील आणि आपलें राजकीय स्वातंत्र्य हिरावून घेतील म्हणून ? आमच्या पूर्वजांना भावी सर्व इतिहास करपुतळीत दिसणाऱ्या भविष्याप्रमाणें कोणी दाखविला असता तर त्यांनीं व्यापारी पेषाच्या इंग्रजांचें उंटाचे पिल्लूं तेव्हांच घरांत घुसूं दिले नसते ! पण तसें भविष्यचित्र त्यांना दिसलें नाहीं, व तें जर दिसलें नाहीं तर त्यांना परकी व्यापाऱ्यांवर बहिष्कार न घातल्याबद्दल दोषहि देतां येत नाहीं. " कां न सदन बांधावें कीं, त्यांत पुढें बिळें करिल घूस ? " हाच न्याय या कामीं लागू पडतो. शिवाय इंग्रज व्यापाऱ्यांनीं हिंदुस्थानांत राज्य स्थापणें हे घरांत घूस शिरण्याइतकेहि स्वाभाविक मानतां येत नाहीं. तो केवळ दैवगतीचा फेरा होय; पण ती तत्कालीन मराठ्यांच्या व्यापारी धोरणाची चूक नव्हे.

## इंग्रजांची मदत.

इंग्रजांना आपल्या राज्यांत व्यापार करण्याची परवानगी दिली हीच मराठ्यांची पहिली घोडचूक झाली, या समजुतीइतकीच प्रबळ अशी दुसरी एक

समजूत आहे. व ती ही कीं, मराठयांनी इंग्रजांची मदत घेऊन त्यांचा हात आपल्या राजकारणांत शिरू दिला ही त्यांची मोठी चूक झाली. पहिली समजूत बरोबर नाहीं हे आम्हीं पूर्वीं सिद्ध केलेच आहे; पण दुसऱ्या समजुतीबद्दल तसें म्हणतां येत नाही. त्या समजुतीत सत्याचा अंश बराच आहे. तथापि, इंग्रजांची मदत घेण्याचे मराठयांना त्या स्थितींत सर्वस्वी टाळता आले असते की नाहीं हा प्रश्नच आहे. आपले भांडण आपण भाडावयाचे, दुसऱ्यास त्यांत हात घालूं द्यावयाचा नाहीं, ही भावना खऱ्या स्वाभिमानबुद्धीची असून शिवाय तिनें अखेर आपले हितच होते. स्वावलंबन हे नेहमी सुखपर्यवसायी असते. पण शत्रूचा प्रतिकार करावयाचा किंवा स्वहित बेसुमार बोकाळू द्यावयाचें अशी, म्हणजे सूडाची किंवा आप्पलपोटेपणाची, बुद्धि मनुष्याच्या मनांत उत्पन्न झाली म्हणजे हातीं लागेल त्या साधनाचा उपयोग करण्यास संपन्न मनुष्यहि प्रवृत्त होतो. मग संकटांत सापडलेला व आत्मरक्षण करू पाहणारा मनुष्यहि तसें करील तर त्यांत नवल काय ? गोऱ्या गोऱ्या लोकाच्या युद्धात काळेपणाची किंचितहि छटा असलेल्या लोकांची मुळींच मदत घ्यावयाची नाहीं हा इंग्रजाचा बाणा बोअर लोकांशीं युद्ध होते तोपर्यंत टिकला; पण प्रस्तुतच्या युद्धामुळे प्राणसंकट उपस्थित झालें तेव्हां पूर्वींचे स्वावलंबनाचे इंग्रजांचे विचार टिकले नाहीत. आतां तर त्यांना नीग्रोपेक्षांहि दसपट काळा अदमी मिळाला तरी त्याची मदत ते घेतील; तो बंदूक धरण्यास समर्थ असला म्हणजे झाले ! प्रस्तुतच्या युद्धांत फ्रान्सने मोरोक्कन लोकांच्या व इंग्रजांनीं हिंदी लोकांच्या पलटणींचा उपयोग आपल्या युरोपियन गोऱ्या शत्रूविरुद्ध केला हे प्रसिद्धच आहे. त्यांचा तो स्वावलंबनाचा बाणा व वर्णमद संकटानें जिरविला.

पण मराठयांनीं आपल्या भांडणांत इंग्रजांची मदत घेतली ती केवळ प्राणसंकटाच्या प्रसंगींच घेतली असें मात्र म्हणतां येत नाहीं; तर वैरबुद्धि किंवा स्वार्थबुद्धि यांच्या प्रशमनार्थ घेतली. मराठयांच्या राजकारणांत इंग्रजांचा हात शिरकावण्याचा पहिला मान राघोबास देण्यांत येतो; पण ही चूक आहे. हा मान आमच्या मतें नानासाहेब पेशव्यास दिला पाहिजे. राघोबास गादी तरी पाहिजे होती; पण नानासाहेबास फक्त आपल्या एका वरचढ सरदाराचा पाडाव करावयाचा होता. इंग्रज हे आपले भावी प्रतिस्पर्धी हें नानासाहेबास पूर्णपणें दिसत होतें. आंग्र्याचा मोड केल्यानें कोंकणकिनाऱ्यावरचा इंग्रजांचा एक शत्रु कमी होईल हेंहि त्यास माहीत असावे. तथापि इंग्रजांच्या मदतीनें आंग्र्यास जमीनदोस्त करण्याचा मोह त्यास आवरतां आला नाहीं. राघोबानें १७७४ सालीं सुरतेच्या तहानें इंग्रजांना घरांत घेतलें; पण त्याच्या आधीं सुमारें वीस वर्षें म्हणजे १७५५ त नानासाहेब पेशव्यानें मुंबईच्या तहानें तेंच कर्म केलें

होते, हें सामान्य वाचकांच्या फारसें स्मरणांत नसतें. या तहाने असें ठरलें होते कीं, इंग्रजांनीं पेशव्यांस आंग्र्याचा पाडाव करण्यास मदत करावी, व त्याचा मोबदला इंग्रजांचा ताबा सर्व पश्चिमकिनाऱ्यावर रहावा व बाणकोट हिंमतगड व लगतचीं पांच गावें इंग्रजांस बक्षीस मिळावीं. या तहाप्रमाणें इंग्रजांनीं विजयदुर्ग किल्ला घेतला, आंग्र्याचे आरमार जाळून टाकले, किल्ल्यांतील दहा लक्षांची लूट गडप केली व तहाविरुद्ध तो किल्लाहि प्रथम आपणाकडेच ठेवला. आंग्र्याच्या पराभवापर्यंत इंग्रजांचा मुंबईच्या दक्षिणेखालीं प्रवेश नव्हता; आंग्र्याची दहशत गेल्याने इंग्रजांना यापुढे कोंकणपट्टीभर अनिरुद्ध संचार करितां येऊं लागला ! यांत नानासाहेबाने कोणता दूरदर्शीपणा, कोणता स्वाभिमान किंवा कोणती स्वावलबनबुद्धि दाखविली ? तुळाजी आंग्रे हा ताराबाईच्या पक्षाचा असेल; तरी पण पेशव्यांना तो इंग्रजापेक्षां क्वचित अधिक जवळ होता. आंग्रे हे शिवाजीच्या वेळेपासून मराठी आरमाराचे अधिपति होते; व त्यांनी जवळजवळ शंभर वर्षेपर्यंत मराठी आरमाराचा लौकिक राखला होता. ताराबाईचा पक्षपाती म्हणून तो कांट्यासारखा पेशव्यांच्या मनांत कदाचित् सलत असेल; पण त्याने कांही इंग्रजांची मदत घेतली नव्हती. उलट पेशव्यांप्रमाणें तो इंग्रजांशींहि भांडतच होता. याच्याहि पूर्वीं पेशव्यांनीं जंजिऱ्याच्या हबशाविरुद्ध इंग्रजांची मदत मागितली होती; ती त्यांनीं दिली नाहीं ही गोष्ट वेगळी. हबशी हा मराठा नसला तरी इंग्रजांच्या मानानें कमी परका असा त्यांना वाटावा अशी अपेक्षा आज आपण करितो; पण त्या वेळीं आपपरभाव ओळखण्याची दृष्टि आजची नव्हती असेंच उघड दिसतें.

स्वकीयांविरुद्ध इंग्रजांची मदत घेणें हा गुन्हा मानला तर त्यापासून म्हणण्यासारखा कोणीच अलिप्त होता असे दिसून येत नाहीं; कारण, इंग्रजांची मदत स्वकीयांविरुद्ध घेण्याची चाल, घेण्यासारखी मदत देण्यास इंग्रज समर्थ आहेत असे कळून आल्यापासून, प्रायः सर्वांनींच ती पाळलेली आढळते. अलिबागचे आंग्रे डोईजड झाले असतील; पण मराठे या दृष्टीनें ते स्वकीयच होते कीं नाही ? मग नानासाहेब पेशव्याने त्यांचा पाडाव करण्याकरितां इंग्रजांची मदत कां घ्यावी ? रघुनाथरावानें इंग्रजांची मदत घेतली म्हणून त्याला जर नांवें ठेवावयाचीं तर टिपूविरुद्ध किंवा शिंद्याविरुद्ध खुद्द नानाफडणविसानें इंग्रजांची मदत घेतली तेव्हां त्याला नांवें कां ठेवूं नये ? इंग्रज ज्या अर्थानें परकी त्या अर्थानें टिपू झाला तरी तो स्वदेशी नव्हता काय ? स्वकीयांविरुद्ध हिंदुस्थानांत मदत घेतली नाहीं अशी काय ती इंग्रजांनींच. हिंदुस्थानांतील सर्व जातींचे, म्हणजे ब्राह्मण मराठे रजपूत, राजेरजवाडे एकमेकांविरुद्ध लढण्याला किंवा आपले गृहकलह तोडून घेण्यालाहि इंग्रजांच्या मदतीची व मध्यस्थीची याचना

करीत असतां इंग्रजांनी मात्र त्याच्या निदर्शनास असे खरे आणून दिले की, हिंदुस्थानांतील सर्व इंग्रज एक; त्यांच्यांत पक्षभेद नाही किंवा हितविरोधहि नाही; हिंदुस्थानच्या तीन टोकांस असणारे इंग्रज एकाच हुकमतीचे बंदे गुलाम आहेत; तिघांचेहि सर्व प्रयत्न एका मनुष्य व्यक्तीच्या मनाने योजल्याप्रमाणें एकाच धोरणाने चालतात, ते वरिष्ठाचा हुकूम कधीहि अमान्य करीत नाहीत; त्यांच्यांत चढाओढ लागली तर ती कंपनीच्या राज्याचे एकदरीने जास्तीत जास्ती हित कशाने होईल हे पहाण्यांतच लागते.

इंग्रजाची स्थितीच या वेळीं अशी होती की, एतद्देशीय राजेरजवाड्यांनी त्यांची मदत मागावी, इंग्रजांना मात्र आपापसांतलि भांडणांत एतद्देशीय राजेरजवाड्यांची मदत मागण्याचे कारण पडू नये. इंग्रजांची मदत मागण्याला कारणे, एक, मराठे लोकांतील तटे व दुसरे, इंग्रजांजवळची कवाइती फौज व युद्धसामग्री. इंग्रजाकडे पहावे तो त्याचे आपापसात तटे असे कधींच झाले नाहीत; निदान झाले असल्यास त्यानी ते हिंदी लोकांचे साहाय्य घेऊन तोडण्याचा प्रयत्न केला नाही ही गोष्ट तरी निर्विवाद आहे. दिल्लीच्या बादशहीचे सुभेदार जसे स्वतंत्र नबाब व राजे बनले तसे क्लाइव्ह वॉरन हेस्टिंग्ज यांनाहि सहज बनतां आले असतें. दिल्लीपासून अवघ्या दोनशे मैलांवर स्वतंत्र नबाब बनण्यास प्रारंभ झाला होता ! आणि कंपनीची गादी तर लंडनांत म्हणजे हिंदुस्थानापासून सहा हजार मैलांवर ! अर्थात् कंपनीचा इकडचा एखादा महत्त्वाकांक्षी नोकर कंपनीचा मुलुख बळकावून राजा होऊन बसता तर कंपनीस त्याचे पारिपत्य करण्यास कितीतरी प्रयास पडले असते. सहा हजार मैलांवरून गोरी फौज येणार किती व इकडे जमविलेल्या मोठ्या फौजेबरोबर टक्कर देणार कशी ? इंग्रजांचा इकडे केव्हांहि आधार म्हटला म्हणजे इकडचीच फौज. विलायतेहून फौज येई, पण ती थोडी पुरवणीदाखल असे. एखाद्या गोऱ्या बंडवाल्या नबाबाने एतद्देशीय राजेरजवाड्यांची मदत मागितली असती तर ती त्यास सहज मिळाली असती; पण तसा कोणीहि बंडवाला निघाला नाहीं. अकलेच्या किंवा तरवारीच्या बळावर इंग्रज व फ्रेंच लोकांनी व्यक्तिशः हिंदुस्थानांत लाखो रुपयांची संपत्ति मिळविली; त्यांतील कित्येकांनी खाजगी जहागिरी संपादिल्या; कित्येक हिंदु व मुसलमान राजांच्या पदरीं सेनापति व दिवाण म्हणून नोकरहि राहिले; पण युरोपांतल्या कंपन्यांविरुद्ध फुटून किंवा बंड करून कोणीच युरोपियन निघाला नाहीं व आपल्या जातभाईच्या विरुद्ध एतद्देशीयांची कुमक त्याने घेतली नाहीं. इकडील इंग्रज लोकांत खाजगी वैर नव्हतें असें नाहीं. वॉरन हेस्टिंग्जचा जन्म आपल्या कौन्सिलांतील लोकांशीं भांडतां भांडतां गेला. पण त्यानें आपल्या प्रतिस्पर्ध्यांचा मोड करण्याकरतां एतद्देशीय फौजेची मदत घेतली नाही. तीच गोष्ट फ्रेंचाची. ड्यूप्ले वगैरे फ्रेंच मुत्सद्द्यांचें आपआपसांत अनेक वेळां भांडण

होत असे. पण त्यांपैकीं कोणींहि एकमेकांविरुद्ध एतद्देशीयांची मदत घेत-ल्याचे आढळत नाहीं. इंग्रज व फ्रेंच यांनीं परस्परांविरुद्ध लढतांना हिंदी लोकांची मदत घेतली होती; पण इंग्रजांनीं इंग्रजांविरुद्ध किंवा फ्रेंचांनीं फ्रेंचां-विरुद्ध कधींहि घेतली नाहीं; एवढेच नव्हे तर हिंदी राजेरजवाड्यांच्या नोक-रीत जे युरोपियन राहिले होते त्यांचा करारच प्राय: असा असे की, स्वकीयांविरुद्ध युद्ध उपस्थित झाले असतां आपणास लढण्याची माफी असावी. होळकराच्या नोकरींत असलेले इंग्रज स्वकीयांविरुद्ध लढेनात तेव्हां त्याने त्यांस तोफेच्या तोंडीं दिले असे म्हणतात ! बाजीरावाच्या पदरी कॅप्टन फोर्ड म्हणून साहेब होता; पण १८१७ सालीं इंग्रजांशी लढाई सुरू झाली तेव्हां फोर्ड याने इंग्रजां-विरुद्ध लढण्याचे नाकारले. हे गोरे लोक निमकहराम म्हणावे कीं स्वदेशा-भिमानी म्हणावे याचा वाचकांनींच विचार करावा. त्यांना सर्वस्वी निमकहराम असें म्हणतां येणार नाहीं. कारण, नेटिवांचे मीठ खातांना म्हणजे नोकरी धर-तांना ते स्वकीयांविरुद्ध न लढण्याची अटच घालीत, व ही अट पतकरूनच बहुधा त्यांना नोकरीत ठेवण्यांत येत असावे. कारण, स्वकीयांविरुद्ध लढण्याच्या कामी त्यांचा प्रसंगविशेषी उपयोग न झाला तरी इतर रीतीने कवाइती फौज तयार करण्याच्या कामी त्यांचा जो उपयोग होई तो त्यांस नोकरीत ठेवण्यास पुरेसा वाटत असावा. इंग्रज व फ्रेंच हे हिंदुस्थानात परस्परांविरुद्ध लढले, पण स्वकीयांविरुद्ध लढले नाहीत; याचा अर्थ, त्यांचे परस्पर इमान धर्मनिष्ठ नव्हतें, तर स्वदेशभक्तिनिष्ठ होतें, असाच दिसतो. खिस्ती धर्मामुळें त्यांना आपलेपणा वाटत नव्हता, तर आपण एका देशाचे–एका राष्ट्राचे–या भाव-नेनेच त्यांना आपलेपणा वाटत होता. आपापसात भांडून तिसऱ्याचा फायदा करून देऊं नये ही त्यांची बुद्धि परदेशांत म्हणूनहि विशेष जागृत झालेली असावी असें वाटतें.

हिंदी लोक परदेशांत असेच गेले असते तर तेहि कदाचित् परस्परांविरुद्ध लढले नसते; पण स्वदेशांत असतां ही त्यांची बुद्धि जागृत राहिली नाहीं एवढी मात्र गोष्ट खरी. कारण, आपसांत भांडून आपल्या भांडणांत परक्याची मदत घेतल्यामुळेंच हिंदी लोकांचें स्वातंत्र्य नष्ट झालें. या बाबतींत लागणारा दूरदर्शीपणा एकाहि हिंदी मुत्सद्याच्या अंगीं दिसून आला नाहीं. थोरल्या बाजीरावानें व नानासाहेबानें आंग्र्यांविरुद्ध इंग्रजांची मदत घेतली; रघुनाथ-रावानें नाना फडणविसाविरुद्ध घेतली; नाना फडणविसानें होळकराविरुद्ध घेतली; बाजीरावानें शिंद्याविरुद्ध घेतली; नागपूरकर भोसल्यानें पेशव्याविरुद्ध घेतली; मुसलमानांनीं इंग्रजांची मदत आपापसांविरुद्ध व पेशव्याविरुद्ध घेतली; दिल्ली बंगाल औंध हैदराबाद व कर्नाटक या ठिकाणीं सर्व राजकारणी उलाढाली इंग्रज व फ्रेंच यांची मदत घेऊनच झाल्या. नाहीं म्हणावयास युद्धांत इंग्रजांची मदत

घेतली नाहीं अशी शिंदे होळकर आंग्रे आणि विशेषतः हैदर व टिपू यांनीं. पण टिपूनें इंग्रजांची मदत न घेतली तर फ्रेंचांची घेतली–मिळून घेतलीच ! आतां या सर्व गोष्टींवरून या सर्वांना अदूरदर्शी मुत्सद्दी म्हणण्यापेक्षां, अशी मदत घेणें हेच परिस्थितीच्या मानानें योग्य होतें असे तरी कां म्हणूं नये हाहि एक प्रश्नच आहे. राजकारणांत सर्वांना सर्वांची मदत घ्यावी लागते. इंग्रजांचें देखील टिपूविरुद्ध मराठे व निजाम याची मदत घेतल्यावांचून कोठें चाललें ? पण दोष असेल तर तो इतकाच कीं, कित्येकांना मदत घेण्याचें कारण सपल्याबरोबर मदतनिसाला झाडून दूर टाकतां आले नाहीं. स्वतःच्या पायांत थोडीबहुत खंबीरी असल्यावर दुसऱ्याची मदत घेतल्यास ती फारशी बाधक होत नाहीं; पण ज्यांची भिस्त सर्वस्वी दुसऱ्यावरच, त्यांना स्वतः मदतनिसांनीच ग्याऊन टाकावें यांत आश्चर्य नाहीं. आंग्र्यांच्या प्रकरणी मराठ्यांनीं इंग्रजांची मदत घेतली किंवा टिपूच्या प्रकरणीं इंग्रजांनीं मराठ्यांची मदत घेतली. तरी पण उभयतांचा समाईक कार्यभाग होतांच दोघेहि पूर्वींसारखेच स्वतंत्र झाले; त्या मदतीपासून अप्रत्यक्ष परिणाम कांहीं होवो, पण प्रत्यक्ष स्वातंत्र्यनाश असा कोणाचाच झाला नाही. पण याच्या अगदीं उलट उदाहरणें म्हटलीं म्हणजे राघोबा, बाजीराव ( दुसरा ), निजाम, कर्नाटकचे नबाब यांची होत. या प्रत्येकाने इंग्रजांची मदत घ्यावयास जातांना स्वतःचे हातपाय इतके जखडून घेतले की, मदतीचा कार्यभाग झाल्यावर त्याला मदतनिसास झाडून दूर टाकतां आले नाही. घोड्यानें आपल्या शत्रूचा नाश करण्याकरतां मनुष्यास पाठीवर बसू दिले; पण शत्रूचा नाश झाल्याबरोबर घोड्याला काहीं मनुष्यास पाठीवरून फेकून देतां आले नाही, या इसापनीतींतील गोष्टीचें रहस्य हिंदुस्थानचे हिंदुमुसलमान राजेरजवाडे यांच्या आणि इंग्रजांच्या संबधांत पदोपदीं अनुभवास येतें.

## नाशाचीं खरीं कारणें.

इंग्रजांना आपल्या राज्यांत व्यापार करण्याची परवानगी दिल्याने किंवा केवळ प्रसंगविशेषीं त्यांची मदत घेतल्यानेंच मराठ्यांचे राज्य गेलें असे म्हणवत नाहीं. या दोन गोष्टी करून देखील राज्य राहिलें असतें; पण राज्य जाण्याची खरीं कारणें आमच्या मतें मुख्य अशीं दोनच आहेत. पहिलें, मराठ्यांमधील सवत्यासुभ्याची आवड आणि जुटीचा शिस्तीचा व राष्ट्राभिमानाचा अभाव.आणि दुसरें, कवाइती लष्कर आणि सुधारलेली युद्धसामग्री यांचा अभाव. पहिल्या कारणासंबधानें इतकेंच सांगितलें असतां पुरें होईल कीं,रघुनाथराव किंवा गाइकवाड यांनीं घरच्या भांडणांत इंग्रजांचा हात शिरू दिल्यानंतरहि जरी मराठे उमजते व एक होते तरी इंग्रजांचें कांहीं चाललें नसतें; पण एकजुटीने व एकदिलानें काम करण्याची मराठ्यांना सवयच नव्हती असें म्हटलें तरी चालेल. इंग्रजांशीं

लढला नाहीं असा वास्तविक एकहि मराठा सरदार नाहीं; पण ते सर्व मराठे सरदार मिळून–फार काय ? दोघे दोघे तिघे तिघे असे मिळून देखील–एकदम इंग्रजांविरुद्ध लढले नाहीत; व याच गोष्टीचा इंग्रजांस सर्वांत फायदा झाला. राघोबाच्या कलहाच्या वेळीं पेशवे शिंदे होळकर हे सर्व एकजुटीनें वागले म्हणून इंग्रजांचे त्यांच्याविरुद्ध कांही चालले नाही. वडगांवास त्यांना मराठयांस शरण येऊन अपमानास्पद तह करावा लागला; व तो तह अपमानास्पद म्हणून मोडून फिरून जरी त्यांनीं युद्धाला आरंभ केला तरी शेवटी त्यांना हार खावी लागलीच. आणि जो 'इंग्रजांना शरण येऊन पाठीस पडला त्याला अभय देणे हेच इंग्रजांचे ब्रीद' अशी जी अभिमानाची भाषा प्रथम ते बोलत होते ती सोडून देऊन रघुनाथरावाला त्यांना अखेर नाना फडणविसाच्या स्वाधीन करावेच लागलें. तसेच ज्या निजामाचे मराठयांपासून सरक्षण करण्याचा विडा इंग्रजांनी उचलला होता व ज्याच्या साहाय्यामुळें त्यांना टिपूचा पाडाव करितां आला, त्या निजामावर मराठयांनीं १७९६त स्वारी केली तेव्हां इंग्रजांना हालचाल न करितां निमूटपणे बसावे लागले. याचे कारण, सर्व मराठे तेव्हां एक होते, त्यांच्यात फाटाफूट झाली नव्हती हेच होय ! पुढे बाजीराव गादीवर बसण्याचा प्रश्न निघाला तेव्हांहि शिंदे व होळकर एकविचारानें वागते तर बाजीरावाची इंग्रजांकडे जाण्याची छाती झाली नसती. ते म्हणतील त्याला ते गादीवर बसविते. कारण, नाना फडणविसाजवळ शहाणपण असलें तरी लष्करी सामर्थ्य नव्हतें; आणि बाजीरावास पदच्युत केल्यानें तो जरी इंग्रजांकडे गेला असता तरी वसईचा तह होताना. इंग्रजांना रघुनाथरावाचा पक्ष धरल्याचा परिणाम माहीत होता, म्हणून त्यांनी बाजीरावास पाठीशीं घातलाच नसता; व घातला असता तरी शिंदेहोळकरांच्या एकजुटीपुढें त्यांचें कांहीएक चाललें नसते. बरे, वसईचा तह नापसंत पडून, व आपल्या हातचा पेशवा इंग्रजांनी स्वतःच्या हाताखाली घातला या रागावर शिंदे होळकर हे दोघेहि इंग्रजांशीं लढले. त्यांचें इतर भांडण कांहीहि असो, पण वसईचा तह फिरवून पेशवा मराठयांच्या हातीं ठेवावयाचा इतक्यापुरती तरी त्यांची एकवाक्यता होती. अर्थात् दोघेहि मिळून इंग्रजांशीं लढते तर वसईचा तह दुरुस्त झाला असता; पण आधी शिंदा लढून पुरा पराभूत झाल्यावर मग होळकरास लढण्याची हौस आली. अर्थात् एकेकट्याशीं निरनिराळें लढायला सांपडल्यानें इंग्रजांची सोयच झाली. शिंद्याचा पराभव कसा होतो ही मौज पहात होळकर बसला होता. बरें, शिंद्याचा पराभव झालेला पाहून बोध घेऊन गप्प बसावें, तेंहि नाहीं! एकट्यानेंच लढाईस सुरुवात करून त्यानें विनाकारण आपला नाश मात्र करून घेतला. हीच संधि फिरून १८१७–१८साली आली होती. इंग्रजांनीं आपल्यावर इतके उपकार केले, सर्वांनीं आपला पक्ष सोडला असतांहि त्यांनीं आपणास

पाठीशीं घालून राज्यावर बसविले, आपल्या बापाला न कां मिळेना पण आपणाला तरी इंग्रजांनीं गादी दिली, व अशा ना अशा रीतीने आपला पूर्वीचा शब्द खरा केला, ही गोष्ट लक्षांत ठेवून बाजीरावाने इंग्रजांविरुद्ध लढण्यास तयार होऊं नव्हतें; पण वसईच्या तहाची लाज किंवा इंग्रजांचा जाच वाटून तो लढाईस तयार झाला. तेव्हां शिंदेहोळकरांच्या दृष्टीने फिरून १८०२ ची स्थिति प्राप्त झाली. तेव्हां तरी त्यांनी पुढे जोरीने येऊन बाजीरावास सहाय्य करावयाचें होते; पण तेंहि केले नाहीं. व बाजीराव शरण आल्यावर होळकराने एकट्यानेच फिरून हातपाय हालवून ते अधिक जखडून मात्र घेतले ! पण इंग्रजांचें वर्चस्व मराठी राज्यांतून कमी व्हावे अशी शिंदे होळकर भोसले यांच्या मनांतून इच्छा असली तरी तीत बरीचशी भेसळ होती. इंग्रजांबरोबरच आपणांखेरीज इतर मराठे सरदारांचे वर्चस्व कमी झाले तर हवे— इंग्रजांच्या हातून तें घडून आल्याने इंग्रज मधल्यामध्ये प्रबळ झाले तरी ते चालेल—अशी प्रत्येकाच्या मनांत गुप्त भावना असल्याने कोणाचे काहींच साधले नाही. इतरांचा तर नाश झालाच; पण अखेर त्यांचा स्वतःचाहि नाश झाल्याशिवाय राहिला नाहीं !

मराठ्यांतील दूरदर्शी मुत्सद्द्यांना इंग्रजांचें धोरण दिसत नव्हते किंवा त्याच्या मुत्सद्दीगिरीचे डावपेच कळत नव्हते असें नाहीं; पण त्यांना त्यांच्याशीं टक्कर देतां आली नाही हीच गोष्ट खरी. मोगलांची पातशाही औरंगजेबाच्या मरणाबरोबरच ढासळली आणि साम्राज्यसत्तेच्या बुद्धिबळाचा डाव हिंदुस्थानच्या प्रचंड पटावर एका बाजूने इंग्रज व दुसऱ्या बाजूनें मराठे खेळावयास बसले होते. दोघांशी मोहरीं प्रथम सारखींच व त्या मोहऱ्यांची पगेंहि सारखीच होती. दोघांनाहि आपल्या मोहऱ्यांकडून सर्व पट आक्रमावयाचा होता व दुसऱ्यांचीं मोहरी होतील तितकी निकामी करून डावांतून काढून टाकावयाची होती. डावांत कोण कोणते मोहरे कोणत्या हेतूने पुढे टाकतो याची कल्पना एकमेकांस अगदीच नसते असे नाहीं; पण सुरुवातीस उभयपक्षीं खेळणारे गडी समबल असताहि दुसरा पाहत असतां त्याच्या बुद्धीस आकलन न होणारे, किंवा आकलन करितां येत असूनहि प्रतिकार करितां न येण्यासारखे, डाव टाकणें यांतच काय ते 'बुद्धिबळ' असते. जेथें हे बुद्धिबळ एकापेक्षां दुसऱ्यास अधिक असतें तेथेच कांहींतरी प्यादी मातेसारखा डाव होतो. साम्राज्यपटावरचा डाव मराठ्यांना खेळावयास मुळींच येत नव्हता असे नाहीं. इंग्रज दक्षिणहिंदुस्थानांत जितके घुसले त्यापेक्षां पुष्कळच अधिक मराठे उत्तरहिंदुस्थानांत घुसले होते. पण नाक्याचीं घरे घेऊन बसण्यांत इंग्रजांनीं अधिक शहाणपणा दाखविला; व शेवटीं मोहऱ्यांच्या गर्दी—मारामारीची वेळ आली तेव्हा मराठ्यांचीं मोठमोठीं मोहरीं बिनजोरी सांपडून मारलीं गेलीं !

इंग्रज व्यापारांतून निघून राजकारणांत पडले ही गोष्ट मराठ्यांना १७६५ च्या सुमारासच दिसून आली होती. तसेच त्यांचा प्रयत्न हिंदी राजेरजवाड्यांच्या भांडणांत पडून आपला फायदा करून घ्यावयाचा आहे हेहि त्यांना लवकरच दिसून आले. पण उतरणीवर उभे असतां भरला गाडा अगावर आलेला जसा सांवरून धरतां येत नाही, तसेच मराठ्याचे इंग्रजासंबंधी झाले. इंग्रजांना इमानी असे कोणीच मानले नाही. सर्व मराठे त्याना मनात बेमान समजत. "इंग्रजांचे मानस आहे की, हैदरखान श्रीमत व नबाब तिघांच्याहि दौलता घ्याव्या. त्यांस कोणेहि प्रकारे एकाशी शकटभेद करून एकास खाली पाडावे, असे करतां एक राहील त्यास आपण शेवटी गुडाळावे." असले हे इंग्रजांचे धोरण पुण्याच्या दरबारास विदित होते; पण असे असताहि पेशव्यांनी टिपूविरुद्ध इंग्रजांस मदत दिलीच की नाही ?

बळी तो कान पिळी हीच दृष्टि टेवली तर मराठेशाहीचा शेवट इंग्रजांचे हातून झाला याबद्दल त्याना दोष लाविता येत नाही. इंग्रज हिंदुस्थानांत कांही मोक्षसाधनाकरतां आले नव्हते. त्यांना व्यापार करून संपत्ति मिळवावयाची होती, आणि व्यापार करतां करतां त्यांना जर राज्यहि मिळाले तर ते त्यांनी का घेऊ नये? राजसत्तेच्या बळावर व्यापार वृद्धिंगत करतां येतो हा नियमच आहे. शिवाय राज्य म्हणून मिळालेल्या मुलखापासून प्रत्यक्ष वसूल मिळतो तो वेगळाच. या दृष्टीनें पहाता ज्यानी आपला हात चालवून नवे राज्य मिळविले, त्याना दोष न देतां, ज्यानी हाती असलेले राज्य गमावले त्यानाच दोष दिला पाहिजे. एकदां राज्य मिळविण्याच्या मागे मनुष्य लागला म्हणजे मग न्यायान्यायाचा सूक्ष्म विवेक तो करीत बसत नाही. मराठ्यांना तरी उत्तर हिंदुस्थानात राज्य संपादण्याचा काय हक्क होता ? त्यानी दक्षिणेत मोंगलांच्या हातून जुने स्वराज्य परत मिळविले येथपर्यंत न्यायाची बाजू ठीक होती. पण साम्राज्यसत्ता स्थापण्याच्या नादी लागून जेव्हां त्यानी उत्तरहिंदुस्थानांत धुमाकूळ माजविला तेव्हां न्याय कोठे राहिला होता? मोंगलांकडून सनद मिळाल्याने मराठ्याना रजपुतांवर तरवार चालविण्यास जितका न्याय्य हक्क प्राप्त झाला असेल तितकाच मोंगलांचे दिवाण म्हणून साधेल त्या प्रयत्नाने दक्षिणेतील मराठी राज्ये जिंकण्याचे मोंगलांचे उरलेले काम पुरे करण्याचा हक्क इंग्रजानाहि मिळाला होता, असा युक्तिवाद कोणी लढविला तर त्याला उत्तर देणे कठिण जाईल. केवळ सामर्थ्य व महत्त्वाकांक्षा यांच्या दृष्टीने बोलावयाचे तर मराठ्यांचे राज्य इंग्रजांनी घेतल्याबद्दल त्याचा राग न येतां हातचे राज्य गमावण्याचा जो नादानपणा मराठ्यांनी दाखविला त्याचा मात्र राग येतो खरा.

मराठ्याच्या मानाने इंग्रजांना राज्य मिळविण्याला किती तरी अधिक अडचणी होत्या हे कोणीहि कबूल करील. इंग्रज सहा हजार मैलांवरून हिंदुस्थानांत

आले; मराठे आपल्या देशांत आपल्या घरीच होते. इग्रजांना सर्व मुलुख परका होता; त्यांना मुद्दाम प्रत्यक्ष प्रवास करून माहिती मिळवून नकाशे काढल्या-शिवाय त्या मुलखाचा परिचय होणे शक्य नव्हते; मराठयांना सर्व मुलुख खडान्‌खडा माहीत होता. ज्या अवघड वाटा दऱ्या खोरी जगले मराठयांच्या नित्य पायाखालची ती हुडकून काढणे व त्यातून फिरणे हे इग्रजांना जवळ जवळ अशक्य होते. इग्रजांचा पायच मराठी मुलखाला लावू देऊ नये असा मराठ्यानी प्रथम निर्धार केला असता तर इग्रजाच्या सत्तेचे बीज इकडे रुजले नसते; मग त्याचा एवढा मोठा प्रचड वृक्ष होण्याचे तर दूरच! विलायती मालच मुळीं आपणास नको असे मराठ्यानी प्रथमपासून ठरविले असते म्हणजे इग्रज व्यापार कसचा करिते ? निदान त्याच्या व्यापारावर जबरदस्त जकाती बस-विल्या असत्या तरी व्यापार किफायतशीर होत नाही असे पाहून त्यानी लव-करच गाशा गुडाळला असता. इग्रज व्यापारी पदरी फौज ठेवू लागले असे आढळून येताच तरी मराठे सावध का झाले नाहीत ? इग्रजी सत्तेच्या उटाचे पिल्लू त्यांच्या डोळ्यासमोर वाढत होते ते त्याना कां दिसू नये ? आणि दिसल्याबरोबर त्यानी त्याला घरातून घालवून देण्याचा का प्रयत्न करू नये ? इग्रजांच्या जवळ बदुकी तोफा वगैरे लष्करी सरजाम जमत चाललेला पाहून मराठ्यानीहि तावडतोब असा सरजाम आपला आपण तयार करण्याचे कार-खाने का काढू नये ? हत्याराचा कायदा तेव्हा खचित नव्हता ! युरोपियन राष्ट्र हिंदी लोकांस हत्यारे विकण्यास एका पायावर तयार होतीं, व इग्रजा-शिवाय इतर अनेक युरोपियन लोक मराठ्यांच्या पदरी नोकर म्हणून राहून त्याचे सैन्य कवाईत शिकवून तयार करण्यास व तोफा-बदुकाचे कारखाने काढून चालविण्यास तयार होते. इग्रज सहा हजार मैलांवरून हिंदुस्थानास आले तसे त्याचे उदाहरण पाहून धाडस करून मराठ्याना युरोपास जाऊन हिंदुस्थानांत उपलब्ध नसणाऱ्या विद्या शिकण्यास,स्नेही मिळविण्यास व व्यापार सपादण्यास नको कोणी म्हटले होते ? इग्रजांच्या मनात राज्यलोभ कितीहि प्रबळ असता तरी त्यांच्या पदरीं लष्करभरतीला हिंदी लोकच मिळाले नसते तर ते काय करणार होते ? इग्रज जर इग्रजाविरुद्ध लढण्याला मराठ्यांना मिळाले नाहीत तर मराठे तरी मराठ्याविरुद्ध लढण्याला इग्रजाना कां मिळावे ?

इग्रजाच्या फौजेत शेकडा विसांहून अधिक इग्रज शिपाई केव्हाहि नव्हते, शेकडा ऐंशी हिंदीच होते. इग्रजांना एकमेकाविषयी आपलेपणा वाटत होता तसा हिंदी लोकांविषयीं हिंदी लोकांना, निदान हिंदूविषयीं हिंदूना, त्यांतूनहि निदान मराठ्यांविषयी तरी मराठ्यांना, कां वाटू नये ? पण सर्वांत महत्त्वाची गोष्ट ही की, मराठ्याच्या भांडणांत जर मराठ्यांनी आपण होऊन इग्रजांना घेतले नसते तर नसते भांडण उकरून काढून, किंवा विनाकारण

म्हणजे केवळ विजिगीषीने मराठ्यांच्या राज्यावर स्वारी करून त्यांचे राज्य जिंकण्यास इंग्रजांना आणखी तीनचारशें वर्षेहि कदाचित् पुरलीं नसतीं ! उत्तरहिंदुस्थान मोंगलांनीं वेडेपणामुळे इंग्रजांना दिले असे जरी घेऊन चालले तरी अठराव्या शतकाच्या अखेरपर्यंत यमुनानदीच्या दक्षिणेस इंग्रजांचा एक वीतभर देखील मुलुख नव्हता. येऊन जाऊन पश्चिमकिनाऱ्यावर एक मुंबई सुरत वगैरे ठाणीं आणि पूर्वकिनाऱ्यावर थोडासा मुलुख इतकाच काय तो त्यांच्या हातीं होता. असे असतां टिपूविरुद्ध मदत करून इंग्रजांना शेकडो मैलांचा मुलुख कोणीं मिळवून दिला ? मराठ्यांनीच ना ? निजाम व मद्रास इलाख्यांतील मुसलमान यांनीं इंग्रजास घरांत घेतल्याचें आपण एक वेळ सोडून देऊ;पण उत्तरेस यमुना नदी,ईशान्येस कटक संबळपूर, पूर्वेस पूर्वसमुद्र, आग्नेयीस कावेरी नदी, दक्षिणेस म्हैसूर, नैर्ऋत्येस मलबार, पश्चिमेस पश्चिमसमुद्र, व वायव्येस राजपुताना एवढ्या प्रचंड क्षेत्रांत अगदी अठराव्या शतकाच्या मध्यभागापर्यंत इंग्रजांना पाय ठेवण्यास तरी जागा काय होती ? अशी स्थिति असतां त्यांना आपल्या भांडणांत न्यायाधीश किंवा मदतनीस म्हणून मराठ्यांनीं कां घेतलें?

या प्रचंड मुलखांत सर्व मराठ्यांचें राज्य होतें. सर्व मुलुख एकाच छत्रपतींखालीं होता असे म्हणण्यास हरकत नाहीं ? पेशवे शिंदे होळकर गायकवाड भोसले आणि पटवर्धन वगैरे मराठे ब्राह्मण सरदार औपचारिकरीत्या कां होईना पण एकाच राजाचा अम्मल मानीत होते. ते सर्व एकाच दौलतीचे आधारस्तंभ असून दौलत एकदां कां ढांसळली तर ती सर्वांच्याच अंगावर कोसळून पडणार अशी भीति असतां व ती सांवरून धरली तर त्यांत सर्वांचेच कल्याण व सर्वांचीच कीर्ति हे माहीत असतां, मराठ्यांनीं आपल्या राज्यांत इंग्रजाचा प्रवेश कां होऊं दिला ? एखादा इंग्रजांकडे गेला असतां बाकीचे सर्व जरी मिळून वागते तरी सर्व बंदोबस्त झाला असता. इंग्रजांना मुंबई मद्रास कलकत्ता अशा दूरदूरच्या तीन ठिकाणाहून कारस्थान करावें लागे. मराठे सरदार यांपेक्षां एकमेकांच्या पुष्कळच जवळ होते. मराठे जर एकमतानें वागते तर इंग्रजांचें नुसतें टपालहि या मुलखांतून फिरूं शकलें नसतें. ते एकमतानें वागते तर इंग्रजांना मुळीं सैन्यच मिळालें नसतें, त्यांनी परक्या लोकांचें सैन्य जमविलें असतें तरी त्याचा प्रवेश मराठी मुलखांत झाला नसता; प्रवेश झाला असता तरी त्याला रसद मिळाली नसती व छापे पडून सैन्य कापून निघालें असतें ! कलकत्त्याहून मुंबईकडे किंवा मद्रासेहून मुंबईकडे इंग्रजांचें सैन्य यावयाचें ते समुद्रमार्गानें फारसें कधीं आलें नाहीं. जहाजांचा एवढा मोठा काफिला त्यांच्याजवळ कधीच नव्हता. त्यांच्या सैन्याच्या सर्व हालचाली मराठ्यांच्या मुलखांतून खुशाल होत व मराठे त्या होऊं देत ! पण तेच सर्व मराठे एकविचारानें वागते तर इंग्रजांचें सैन्य काय पण चिटोरेंसुद्धां मराठ्यांच्या मुल-

खांतून जाऊ शकलें नसतें. असे झाले असते तर इंग्रज मराठयांचे राज्य घेण्याच्या भानगडींत न पडतां, राज्य मिळविण्याच्या भानगडीत आपण पडू नये असे म्हणणारा ईस्ट इंडिया कंपनीच्या डायरेक्टरांत जो एक पक्ष होता त्याचाच विजय झालेला दिसला असता. पण इंग्रजांनीं मराठयांच्याच साहाय्याने मराठयांस जिंकले ! त्यांनी थोडासा विलायती माल व पुष्कळशी अक्कल याच्या भांडवलावर हिंदुस्थानचा व्यापार व हिंदुस्थानचे सर्व राज्य मिळविले ! त्यांनीं मोगलासारख्या जीर्ण झालेल्या राज्यावरच घाला घातला असे नाही, तर तरतरीत नव्या दमाच्या महत्त्वाकांक्षी व उदयोन्मुख अशा मराठयाचेंहि राज्य जिंकून घेतले ते फक्त दोन गोष्टींच्या जोरावर; एक, स्वतःची अक्कल व हिंमत, आणि दुसरी, मराठयांची अदूरदृष्टि व आपापसांतली फूट !

## मध्यवर्ती सत्तेचा अभाव

शिवाजीच्या स्वराज्यस्थापनेच्या वेळीं राजा व अष्टप्रधान एवढीच राज्याची अंगे होतीं. राज्य एकसत्तात्मक असून अष्टप्रधान हे सल्ला देणारे पण जबाबदार कामगार होते. शाहूच्या कारकीर्दींत सरंजामी सरदार प्रथम उत्पन्न झाले. या सरदारांकडे आपापल्या प्रांतांतील दिवाणी मुलकी व लष्करी व्यवस्था असे. ही व्यवस्था करून उरलेली, पण आगाऊ जमाबंदीनें ठरलेली, रक्कम त्यांनीं छत्रपतीला द्यावयाची असे. सरंजामी सरदार उत्पन्न व्हावयाला व मराठयांची सत्ता स्वराज्याबाहेर पसरण्याला एकच गांठ पडली, असे कोणी इतिहासज्ञ म्हणतात. पण आधीं सरंजामी सरदार उत्पन्न होऊन मग राज्याचा विस्तार बाहेर वाढण्यास सुरुवात झाली असे नसून, बाहेर राज्यविस्तार होण्यास सुरुवात झाल्यामुळेच सरंजामी सरदारकीची सुरुवात झाली हे म्हणणे अधिक सयुक्तिक वाटते. शाहूच्या सनदेची वाट न पाहता दाभाडे, बांडे, भोसले, आंग्रे वगैरे सरदारांनीं मोगली राज्याचे लचके तोडण्यास आधींच सुरुवात केली होती; व जिंकलेल्या मुलखांत ते स्वतंत्रपणे कारभारहि करू लागले होते. अशा सरदारांना आपल्या पदरी ठेवण्यात छत्रपतीचा फायदाच होतो, व हे सरदारहि छोटे असल्यामुळें त्यांना छत्रपतीच्या सत्तेचें रक्षण हवे होते. यामुळें सरंजामी सरदारांचे मांडलिक–मंडळ तयार झाले. अशा वेळीं स्वतः शिवाजी असता तरी त्याला सरंजामी पद्धति अंगिकारण्याचे टाळतां आले असतें कीं नाही याची शंकाच वाटते. युरोपांतील 'फ्यूडल सिस्टीम'चा उगमहि असाच झालेला होता. मराठयांमध्ये आनुवंशिक असे मुख्य दोन गुण–किंवा वाटेल तर दोष म्हणा–होते. एक स्वातंत्र्यप्रियता, व दुसरा वतनाची आवड. युरोपांतहि प्रथम फ्यूडल पद्धति सुरू होण्यास हेच दोन मनोधर्म कारणीभूत झाले. फ्यूडल पद्धतीचा नायनाट होण्यास युरोपांत कित्येक शतकें लागली व महा-

राष्ट्रांतहि इतर कोणाचा संबंध न येता मराठ्यांची राज्यघटना स्वतंत्रपणे उत्क्रांत होण्यास शतकाचा अवसर मिळता तर, इकडेहि कालांतराने ही पद्धति नष्ट होऊन एकतंत्री राज्यसत्ता प्रस्थापित झाली असती. पण हा उत्क्रांतीचा प्रयोग निर्वेध रीतीनें शेवटास गेला नाही. अष्टप्रधानांवर पेशवा नेमणे ही या उत्क्रांतीचीच एक पायरी होती. आणि प्रबळ छत्रपति व प्रबळ पेशवा अशांची जोडी बरेच दिवस लाभती तर, सरजामी पद्धतीस कदाचित् लवकरच आळा पडला असता. पेशव्यांनी घराबाहेर अंगिकारलेल्या उद्योगाच्या वेळी घरी छत्रपतीच्या एकतंत्री व जोरकस सत्तेचा त्यांना आधार मिळता तर नवे जुने सरदार आपला नोकरपेशा इतक्या लवकर विसरले नसते. पेशव्याना मुख्य आधार आपल्या कर्तृत्वाचा असल्यामुळे त्यांनी हातची पेशवाई जाऊ दिली नाही,हीच मोठी गोष्ट केली म्हणावयाची. स्वतःराजा तरतरीत, कर्तृत्ववान, स्वाभिमानी असता तर त्याला सरजामी सरदाराच्या सत्तेला व अधिकारातिक्रमणाला आळा घालणे अधिक सोपे झाले असते. किंबहुना पेशवेहि झाले इतके स्वतंत्र झाले नसते. खुद्द मुख्य प्रधानालाच जर स्वातंत्र्य नाही तर नुसत्या सरदाराना ते कसे मिळणार ?

वरील इतिहासज्ञ म्हणतात, " शाहू व बाळाजी विश्वनाथ यांच्या कारकीर्दीत महाराष्ट्रांतील राज्यपद्धतीला इंग्लंडांतील हल्लीच्या संयुक्त साम्राज्याचे स्वरूप आले होते; फरक इतकाच की, इंग्लंडांतील वंशपरंपरेने चालणाऱ्या राजसत्तेला राष्ट्रांतील लोकांनी निवडलेल्या प्रतिनिधींच्या आणि प्रतिनिधीतून नेमलेल्या अनेक प्रधानमंडळांच्या सत्तेचे बंधन आहे; आणि दुसरे पक्षी पेशवाईच्या वेळी सर्व सत्ता एका मुख्य प्रधानांत सांठविली गेली होती." पण आमच्या मते हा फरकच इतका मोठा आहे की, त्यामुळे पेशवाईच्या वेळच्या मराठेशाहीस संयुक्त साम्राज्य असे नांवच देतां येत नाही; व ते देतां आले तरी या दोन साम्राज्यांचे साम्य सिद्ध होऊ शकत नाही. एक निव्वळ एकतंत्री राज्यसत्ता तरी चालते किंवा निव्वळ लोकप्रातिनिधि सत्ता तरी चालते; पण निव्वळ एकतंत्री प्रधानसत्ता कधीही चालू शकत नाही ! तक्तनशीन राजवंशीय व्यक्तीबद्दल जो आदर नोकर लोकांच्या मनांत असतो तो प्रधान कितीहि गुणी किंवा प्रबळ असला, तरी त्याबद्दल असू शकत नाही. दुसरे पक्षी प्रातिनिधिक पद्धतीची राज्यघटना असल्यास अशा राज्यांत प्रधानाला जे जनतेचे पाठबळ असते तेहि पेशव्यांना नव्हते. अशा रीतीने इकडे छत्रपतीचा जोर नाही व इकडे जनतेचाहि जोर नाही अशा स्थितींत अगदी निरुंद पायावर पेशव्यांच्या सत्तेची इमारत उभारली गेली होती. यामुळे स्वतःला आधार म्हणून त्यांना सरजामी सरदारांचें मंडळ उत्पन्न करावे लागले; पण ते सरदारमंडळच पेशव्यांना अखेर डोईजड झाले !

या सरदारांना पेशव्याची 'हुकूम करितो' अशा प्रकारची भाषाच कधीं नव्हती. कोणतीहि गोष्ट पेशव्यांनीं सुचवावी व ती सरदारांनी अमलांत आणली तर ते त्यांचे भाग्य ! त्यांना हुकूम करण्याचा पेशव्यांना अधिकारच नव्हता. अर्थात्, हुकूम करण्याचाच अधिकार नाही तर हुकूम अमान्य केल्यावर शिक्षा देण्याचा तरी अधिकार कोठून येणार ? पेशव्याचा हुकूम अमान्य झाल्याची उदाहरणे सांपडतील; पण एकाद्या सरजामी सरदाराच्या हयातीत त्याला पदच्युत केल्याचे उदाहरण क्वचितच सापडेल. स्वतः पेशवे हे जोपर्यंत सेनापति होते, व फौज घेऊन स्वारीवर जाऊन पराक्रम करीत, तोपर्यंत त्याचा अधिकार थोडा तरी चाले; पण थोरल्या माधवरावाच्या पश्चात् हा प्रकार सपून सत्तेची सूत्रे फडणविसाच्या हाती आली तेव्हां मध्यवर्ती सत्तेची आणखी एका पायरीने अवनति झाली. जी स्वामिनिष्ठेची भावना शाहूसबधाने होती ती माधवरावासबधाने उरली नाही; व जी माधवराव पेशव्यासबधाने होती ती नानाफडणविसासबधाने उरली नाही. मग कोकणस्थ भानू नांवाच्या फडणविसांऐवजी देशस्थ बोकील नांवाचा फडणवीस किंवा कारभारी असता तरी तीच स्थिति व्हावयाची. अशा रीतीने घड्याळांतील मुख्य स्प्रिंग किंवा कमान शिथिल व निर्जीव झाल्यामुळे छत्रपतींची सत्ता सरजामी सरदारापर्यंत वांटवाटून विभागली गेली; व मराठेशाहीला सयुक्त साम्राज्याचे स्वरूप न राहता केवळ एका तात्पुरत्या सघाचे स्वरूप आले. खरे सयुक्त स्वराज्य म्हणजे फेडरेशन. व सघ म्हणजे कानफिडरसी. फेडरेशन व कानफिडरसी यांतील भेद फार महत्त्वाचा आहे. दोन्ही घटना अनेक अवयवाच्या मिळून बनलेल्या असतात; पण फेडरेशनमध्ये हे अनेक अवयव अनेक अगांनी एकत्र जखडले गेलेले असतात व एकजीव झालेले असतात. याच्या उलट कानफिडरसीमध्ये हे अनेक अवयव फक्त एका अगाने कोठे तरी एका बिंदूशी एकमेकाना चिकटलेले असतात; म्हणून फेडरेशनपेक्षां कानफिडरसी ही थोड्याशा धक्क्याने मोडू शकते. एकतत्री राज्यपद्धतींत जे काम राजनिष्ठेच्या भावनेने होते तेच फेडरेशनमध्ये ( सयुक्त स्वराज्यांत ) सामुदायिक प्रेमाच्या भावनेने घडून येते. अनेक हे एकजीव झाले म्हणजे एकच होत. सघ किंवा कानफिडरसी यांत नैष्ठिक प्रेम असत नाही. तात्पुरता स्वार्थ हेच काय ते सयोगकारण असते; पण हा स्वार्थ सात्विक किंवा मोठ्या दृष्टीचा नसल्यामुळे तो वाटेल तेव्हां थोड्या कारणाने आपले रूप बदलू शकतो. मराठेशाहीत सरजामी सरदार—मडळाच्या पुढच्या पुढच्या दिवसांत प्रत्येक सरदार अधिकाधिक जड बुडाचा होऊ लागला. अर्थात् पेशव्यांच्या फडणविसाची बुद्धि किंवा त्याचा मानीव अधिकार अशा नाजुक मध्यवर्ती आधारावर लोंबत राहणारे हे सरजामी सरदार मडळाचे ओझे फार दिवस कसे लोंबत राहणार ? मराठ्याचे राज्य

शिवाजीच्या वेळच्या स्वराज्याच्या मर्यादेबाहेर मुळीं गेलेच नसते तर ह सगळा घोटाळा झाला नसता असे या बाबतींत कित्येकांस वाटते; पण त्याव आमचे म्हणणे इतकेंच की, अशा प्रकारची आगठीवरील खड्यासारखी लहा नशीं राज्यें हिंदुस्थानांत दुसरीं पुष्कळ होतीं, पण ती तरी अखेर कोठें टिकलीं खरी गोष्ट हीच की, मराठेशाही विस्तार पावली यांत तिची खरी चूक नव्हत तर त्या विस्ताराबरोबरच तिजमध्यें अतस्थ सुदृढता यावयास पाहिजे होत ती आली नाहीं. ही सुदृढता केव्हांहि एक मध्यवर्ती प्रबळ राजसत्ता किं सर्वव्यापी प्रबळ लोकसत्ता यांपैकी कोणत्या तरी एका सत्तेने येऊं शकते मराठेशाहीच्या अखेरच्या दिवसांत यांपैकी एकहि सत्ता प्रबळ नव्हती; य गोष्टीचा दोष जितका ब्राह्मण पेशव्याकडे, तितकाच सरजामी मराठे सरदार कडेहि येतो. पेशव्यांनीं केलेली चूक मराठे सरदारानी दुरुस्त करण्यास का हरकत होती ? त्यांनी वाटेल तर राज्यक्रांति करून पेशवाई पालथी घाल हवें तर मराठे–मन्त्रिमंडळ स्थापावयाचे होतें; पण मराठेशाही मोडू द्यावयाच नव्हती. से त्यांनीं तरी कोठें केले ?

## इंग्रजांनीं राज्य कसें मिळविलें ?

इग्रजांनीं हिदुस्थानांत राज्य कसे मिळविले? म्हणजे तरवारीच्या जोराव किंवा इतर साधनांनी ? असा एक वाद नेहमी पुढे येत असतो. व इग्रजान हिदुस्थानच्या लोकांस स्वराज्याचे हक्क द्यावे, प्रजेला स्वतत्रता देण्याच्या त्यांच्य ब्रीदास त्यांनीं हिदुस्थानांतहि जागावे, तरवारीच्या जोरावर हिंदुस्थानचे राज आपल्या हाती ठेवण्याची इच्छा धरू नये, असे ज्याना प्रतिपादन करावया असते ते वरील प्रश्नाचे असे उत्तर देत असतात की, इग्रजांनीं तरवारीच्य जोरावर राज्य मिळविले ही गोष्ट खरी नाही, आणि या मताला प्रो. सीली प्रभृति इतिहासकारांनींहि सप्रमाण पुष्टि दिली आहे. पण हे उत्तर आम्हाल फारसे मान्य नाही. कारण, एक तर इंग्रजी राज्यविस्ताराचा खरा इतिहा पाहू गेलो असतां, प्रत्यक्ष युद्धानतर झालेल्या तहांतच निम्याहून अधिक राज इंग्रजांनीं मिळविलें आहे व बाकीचे जवळजवळ निम्मे राज्य मिळविण्यात त्यांन प्रत्यक्ष तरवारीचाच उपयोग करावा लागला नसला तरी त्यांच्या तरवारीचं दहशत उपयोगी पडलेली होती ही गोष्ट कोणास नाकबूल करतां यावयाचं नाही. मोगलांपासून सपादलेल्या दिवाणीच्या सनदेच्या जोरावर पूर्वेकडे कांह मुलुख इग्रजाना प्रथम कारभार करण्याकरतां म्हणून मिळाला व तो पुं त्यांजकडेच मालकी हक्कानें राहिला ही गोष्ट खरी; तथापि खुद्द मोगलांई नसलें तरी मोंगलांच्या नबाबाशी इंग्रजांना लढावे लागले हीहि गोष्ट कांह खोटी नाहीं. प्लासी बक्सार वगैरे लढाया इग्रजांनीं जिकल्या नसत्या त

बंगाल्यांतील सर्व मुलुख त्यांना स्वाधीन करून घेतां आला नसता. निजामाकडून इंग्रजांना जो मुलूख मिळाला तो इंग्रजांना लढाई केल्याशिवाय मिळाला हे खरें; पण स्वतः निजामाशी लढाई न झाली तरी निजामाच्या शत्रूपासून त्याचें संरक्षण करण्याचे लष्करी सामर्थ्य आपल्या हाती आहे असे इंग्रजांना दाखवितां आले म्हणूनच तो मिळाला. निजामाने तो त्यांना स्नेही म्हणून खुषीनें बक्षीस दिला नव्हता किंवा इंग्रज हे त्याचे धर्मगुरु किंवा ईश्वरलीला दाखविणारे फकीर म्हणून त्यांना धर्मादाय दिला नव्हता ! लॉर्ड डलहौसी याच्या कारकीर्दींत बरींच राज्यें बेवारस झालीं म्हणून इंग्रजांनी ती खालसा करून आपल्या मुलखास जोडली हे खरे आहे; पण अधिराजे किंवा साम्राज्याचे धनी असा आपला हक्क सांगतां आल्याशिवाय इंग्रजांना हीं राज्यें खालसा कशी करतां आली असतीं ? इंग्रज ही कांहीं मराठ्यांची अवलाद नव्हे की ते साताऱ्च्या राजाचे वारस होऊं शकतील ! मग हे अधिराजाचे किंवा साम्राज्याच्या धन्याचे नातें इंग्रजांना लष्करी सामर्थ्याशिवाय म्हणजे तरवारीच्या जोराशिवाय कसे मिळवितां आले असतें ? म्हैसूर महाराष्ट्र उत्तरहिंदुस्थान बंगाल आणि पंजाब हे प्रांत इंग्रजांना तरवारीच्या जोरावरच जिंकावे लागले असे कबूल केल्यावर, बाकी शांततेच्या साधनांनीं, म्हणजे तह म्हणा, करार म्हणा, मोबदला म्हणा, जहागीर म्हणा, सरंजाम म्हणा, शेषाधिकार म्हणा, वारसा म्हणा, फार काय पण कपटप्रयोग म्हणा, अशा साधनांनी मिळालेला मुलुख फार थोडा ठरतो ही गोष्ट अगदी उघड आहे. तात्पर्य, इंग्रजांनीं हिंदुस्थानातील राज्य तरवारीच्या जोरावर मिळविले हीच उपपत्ति अधिक खरी आहे. प्रो. सीली वगैरे जे म्हणतात त्याचा पुरा अर्थ लक्षांत न घेतां किंवा खोल विचार न करतां आपण पुष्कळ वेळां न कळत त्यांचा अनुवाद करीत असतो. प्रो. सीली यांच्या म्हणण्याचा अर्थ इतकाच आहे कीं, इतर देशांत मुलुख जिंकण्याला विजिगीषु राजांना जितके झगडावे लागते तितके हिंदुस्थानांत झगडावे लागलें नाही. त्यांचा कार्यभाग थोड्या प्रयासाने साधला व त्यांतहि खुद्द हिंदी लोकांचाच इंग्रजांना विशेष उपयोग झाला; मग तो त्यांनी इंग्रजांविषयींच्या प्रेमानें किंवा आपआपसांतील मूर्खपणाच्या स्पर्धेने करून दिला यांपैकी वाटेल तें म्हणा. हिंदुस्थानांत इंग्रजी सैन्य नेटिव्ह सैन्याच्या मानानें केव्हांहि फारच थोडें होतें, तसेंच हिंदुस्थान जिंकण्याकरतां म्हणून इंग्रजांनी आपल्या राष्ट्राचा पैसा आणून तो इकडे खर्च केला नाही व कंपनीसरकारनें प्रथमपासून राज्य मिळविण्याचे धोरण जाहीर केले नाहीं, या गोष्टींवर प्रो. सीली यांनीं विशेष भर देऊन, जगांतील इतर ठिकाणी प्रायः होणारे राज्यसंपादन व हिंदुस्थानांतील इंग्रजांचे राज्यसंपादन यांतील फरक बारीक नजरेनें दाखविला आहे. पण इंग्रजांनी ब्रिटिश फौज हिंदुस्थानांत फारच थोडी आणिली होती याचा अर्थ,

त्यांनी आपल्या पदरी नेटिव्ह फौज पुष्कळशी ठेविली नव्हती, असा होत नाही. इंग्रजांनी राज्य जिकण्याकरितां विलायतेहून पैसा आणला नव्हता याचा अर्थ हिंदुस्थानांत उत्पन्न केलेला पैसा हिंदुस्थानांत राज्य जोडण्यास त्यांनी खर्च केला नाही, असा होत नाही. व ईस्ट इंडिया कंपनीचा हेतु प्रथमपासून राज्य संपादण्याचा नसला तरी शेवटीं हेतूपेक्षां कृतीवरूनच जे काय ठरते ते मान्य केल्याशिवाय गत्यतर नाहीं !

प्रो. सीली वगैरे कांहीहि म्हणोत, आपण आपल्या ठिकाणीं विचार करतांना काय म्हणू ? " इंग्रजांनी मराठ्यांचें राज्य जिंकून घेतले नाही" असे म्हणावे तर ते त्यांना मिळाले कसे या प्रश्नाचें उत्तर काय ? मराठ्यांनीं ते इंग्रजांना गहाण किंवा खरेदी व दान किंवा बक्षीस दिले नाहीं. मग तें त्यांना कसे मिळाले ? राज्याची झोंपेत चोरी होऊं शकत नाही व जागा झाल्यावर चोरीचा माल परत मिळविल्याशिवाय शभर शभर वर्षे कोणी गप्प बसत नाही. शिंदे होळकर पेशवे भोसले ( नागपुरचे व सातारचे ) यांच्या हातून कोणाची सगळीं, कोणाची पाऊण, कोणाची निम्मी, अशी राज्ये इंग्रजांच्या हातीं गेली. ती त्यांनीं देतांना सुखासमाधानानें दिली नाहीत. किंवा तीं गेल्यावर खऱ्या वैराग्यवृत्तीनें मनांत यत्किंचितहि असंतोष न राहतां आज शभर वर्षे कोणी वागला असेहि म्हणतां येत नाहीं. घेतलेल्या राज्यांपैकीं कोणास इंग्रजांनी त्यांचे राज्य परत दिले असे म्हैसूर व तंजावराखेरीज इतरत्र घडले नाहीं. ज्यांना राज्ये परत मिळालीं तीं त्यांनीं घेतलीच; पण ज्यांना ती मिळाली नाहींत ते निराशेनें मनांत पिचतच राहिले. तरवार चालवून गेलेलीं राज्यें परत मिळविण्याची कोणास आशा दिसत असती तर त्यांनीं प्रयत्न केल्याशिवाय सोडला असता असे वाटत नाहीं; पण असा प्रयत्न करून सगळ्याच्या आशेने अर्धेहि गमाविणें त्यांना पसत पडले नाहीं किंवा इंग्रजांची श्रेष्ठ लष्करी सत्ता पाहून ते जागच्या जागीं थिजून बसले. कसेंहि म्हटलें तरी त्यावरून इंग्रजांनी लष्करी सत्तेच्या जोरावर राज्य मिळविले नाही व आजवर टिकविलेंहि नाहीं हे प्रमेय सिद्ध करण्यास मदत मिळत नाहीं. महाराष्ट्रांतील लोकांना पेशवे व मराठे राजे यांच्या राज्यकारभाराविषयीं तिरस्कार उत्पन्न झाला होता, व इंग्रजांची शिस्त त्यांची टापटीप त्यांची व्यवस्था त्यांचें शहाणपण फार आवडले होतें हें कांहीं अंशीं खरें मानलें तरी, इंग्रजांनीं बाजीरावाकडून राज्य घेतले नसते तर, महाराष्ट्राच्या लोकांनीं आपण होऊन अर्ज करून ते इंग्रजांच्या स्वाधीन केले असते असें वाटत नाहीं !

अशी स्थिति असल्यामुळें इंग्रजांनीं तरवारीच्या जोरावर राज्य मिळविले नाहीं असे म्हणवत नाहीं; तथापि एवढी गोष्ट मात्र खरी की, इंग्रजांच्या तरवारीस आमची स्वतःची मदत बरीच झाली !

इंग्रजांनीं बहुतेक मुलुख तरवारीच्या प्रत्यक्ष उपयोगावर किंवा तरवारीच्या दहशतीवर मिळविला असला तरी इतर साधनांनी कोणताच मुलुख मिळविला नाहीं असे मात्र म्हणतां येत नाही याचे वाईट वाटतें. शिंदे होळकर पेशवे भोसले यांनी इंग्रजांशी प्रत्यक्ष लढाईच केली होती, यामुळे त्यांच्यापासून घेतलेल्या मुलखास राजनीतीचा उघड व राजमान्य आधार होता. पण दत्तक घेण्याची परवानगी नसल्यामुळें बिनवारशी म्हणून जो मुलुख इंग्रजांनीं खालसा केला तो सर्वस्वी न्यायानें मिळविला असे म्हणतां येत नाही. त्यांतल्यात्यांत तहानें स्नेहबद्ध म्हटलेली व बरोबरीच्या नात्याने वागविलेली राज्ये बिनवारशी ठरवून खालसा केली हा मोठा अन्याय झाला याबद्दल वादच नाही. या बाबतींत एकच ठळक उदाहरण दिले असतां पुरे होणार आहे, व ते साताऱ्च्या गादीचे. सुदैवाने हे राज्य खालसा केल्याचा गवगवा थेट पार्लमेंटपर्यंत गेला होता, म्हणूनच त्याविषयी इंग्रजांइंग्रजांतले वाद जगास ऐकावयास तरी सांपडले. गवगवा न होतां व जगास विशेष बातमी न लागतां अशी किती तरी राज्ये खालसा झाली ! असो. सातारचे राज्य मराठेशाहीतील अग्रगण्य म्हणून त्याविषयीं येथे थोडी विस्तारपूर्वक चर्चा केल्यास ती अस्थानी होणार नाहीं.

सातारकर महाराजांचा प्रत्यक्ष अमल शाहूच्या वेळेपासूनच कमी कमी होऊ लागला होता हे प्रसिद्धच आहे. दुसऱ्या बाजीरावाच्या वेळेस सातारकर महाराज अगदीं नामशेष होऊन गेले असुन या स्थितीतून डोकें वर काढण्याचा त्यांच्या मंडळीचा प्रयत्न सुरू झाला होता, व खडकीच्या लढाईच्या आधी पांचचार वर्षे या प्रयत्नास इंग्रजांचे उत्तेजन मिळण्यास सुरवात झाली होती. अखेर अष्टीच्या लढाईत पेशवे पराभव पावून त्यांच्या गोटांत असलेले महाराज इंग्रजांच्या हाती लागल्यावर त्यांनी त्यांना साताऱ्यास नेऊन फिरून आपल्या गादीवर बसविलें. बाजीरावानें पळास आरंभ केल्यावर इंग्रजांनीं जो जाहिरनामा प्रसिद्ध केला त्यांत " साताऱ्च्या महाराजांस कैदेत टाकून त्यांची अनास्था केली व आपण सर्व सत्ता बळकाविली " हा एक आरोप बाजीरावावर ठेवण्यांत आला असून सर्व सरदार व जहागीरदारांस असे आश्वासन दिले होतें कीं, "बाजीरावापाशीं आम्हीं युद्ध आरंभिले असले तरी मराठेशाही बुडविण्याचा आमचा इरादा नाहीं;मराठ्यांची गादी कायम राहील." या जाहीरनाम्यानें पुष्कळ मराठे सरदार जहागीरदार यांचें समाधान होऊन ते लढाईतून आपले अंग काढून घेऊन आपापल्या घरीं गेले. पुढें ता. २५ सप्टेंबर सन १८१९ रोजीं इंग्रजांचा व महाराजांचा तह झाला त्यांत खालील शब्द आहेत. " छत्रपती सातारकर यांचे खानदान बहुत दिवसांपासून आहे;यास्तव त्यांचे व त्यांचे मंडळींचे शानशौकतीकरितां त्यांस कांहीं राज्य द्यावें" म्हणून

यादींत लिहिलेल्या मुलखाचें राज्य " महाराज छत्रपती व त्यांचे फरजद व वारीस व कायम मुक्काम ( रीजंट ) यांणीं सदोदित करीत असावें याजकरितां देत आहेत." ते घेऊन सरकार इंग्रजबहादुर यांचे कह्यांत व मदतीस निरंतर राहून सरकार इंग्रजबहादुर यांचे सल्लामसलतीने हरयेक काम करीत जाऊ" असा महाराजाचा करार होता. शिवाय परराज्याशी व्यवहार ठेवूं नये, युद्धप्रसगी मदत द्यावी वगैरे इतर सामान्य करारहि होते. या तहावरून दक्षिणेस कृष्णा व वारणा, उत्तरेस नीरा व भीमा, पश्चिमेस सह्याद्री व पूर्वेस पंढरपूर–विजापूर या चतुःसीमेंतील सुमारे पंधरा लक्षांचा मुलुख महाराजांचे स्वतंत्र वंशपरंपरेचें राज्य म्हणून देण्यांत आला. पुढे वीस वर्षांनीं प्रतापसिंहमहाराजांवर कांहीं आरोप ठेवून त्यांस बनारसेस नेऊन ठेवण्यांत आले आणि त्यांचा भाऊ शहाजीमहाराज ऊर्फ अप्पासाहेब यांशीं १८३९ साली नवीन तह करून त्यांस गादीवर बसविलें. १८४८ त शहाजीमहाराज वारण्यापूर्वी त्यांनीं व्यंकोजीमहाराजांस दत्तक घेतलें. या वेळी प्रसिद्ध मुत्सद्दी व भावी गव्हर्नर सर बार्टल फ्रीअर हा साताऱ्यास रेसिडेंट होता व त्याने तहाच्या आधारें राजमंडळ बोलावून व दरबार भरवून व्यंकोजीस गादीवर बसविलेंहि. पण सरकारच्या परवानगीवांचून दत्तक घेतला म्हणून नामंजूर करून कंपनीच्या कोर्ट ऑफ डायरेक्टरांनी साताऱचें राज्य खालसा केलें ! हा ठराव सर्वस्वी अन्यायाचा होता. कारण, हे राज्य स्वतंत्र होतें; यास दत्तकाचा निर्बंध लागू शकत नव्हता. पण राज्याचें उत्पन्न ३५ । ३६ लक्षांपर्यंत वाढलेलें; तें कंपनीस सोडवेना ! बाजीरावानें युद्ध सुरू केलें तेव्हां त्याला पदच्युत केला व त्याचें राज्य खालसा केलें हें ठीक झालें; पण सातारकर महाराज निपुत्रिक वारला हा त्याचा अपराध मानितां येत नाही व इंग्रजसरकारने असें निमित्त काढून हें राज्य खालसा करणें योग्य नाहीं. असे शेकडो इंग्रजांनींहि अभिप्राय दिले आहेत. साताऱचे जुने नवे रेसिडेंट म्हणजे सर बार्टल फ्रीअर जनरल ब्रिग्स व मॉ. स्टु एलफिन्स्टन वगैरे सर्व मंडळीस हा मोठा अन्याय वाटून ते पुष्कळ भांडले. जसा बाजीरावाचा कारभार वाईट होता तसा सातारकर महाराजांचा नव्हता असा कागदोपत्री पुरावा आहे. तेव्हां राज्य खालसा करण्याला तिकडूनहि कारण नव्हते. बाजीरावानें सातारकर महाराजांस कैदेंत ठेवलें होतें हा जर इंग्रजांच्या मतें गुन्हा होता व मराठेशाही आम्ही कायम ठेवूं असें जर त्यांनीं वचन दिलें होतें तर पेशवा काढून टाकून आपला लढाईचा खर्च तेवढा घेऊन सबंध चार कोटींचें राज्यच साताऱच्या महाराजांकडे चालविण्यास काय हरकत होती ?

सातारकर महाराज हे प्रत्यक्ष कांहीं राज्यकारभार न करतां साताऱ्यास स्वस्थ बसून असत ही गोष्ट सर्वांसच कबूल आहे. तथापि त्यांना पेशव्यांनीं

कैदेंत ठेविले होते हे वर्णन सर्वांस सारखेंच मान्य होण्यासारखे नाहीं. निदान दुसऱ्या बाजीरावाच्या वेळेपर्यंत तरी तशी स्थिति होती असे म्हणतां येत नाही. साताराचा रेसिडेंट जनरल ब्रिग्ज यानें कागदपत्र पाहून हे वर्णन बरोबर नाहीं असेच मत दिले आहे. सन १८२७ सालीं जनरल ब्रिग्ज यानें मुंबईसरकाराकडे रिपोर्ट केला, त्यांत खालीलप्रमाणे शब्द आहेतः—

Besides these proofs of the respectable treatment experienced by the Rajas of Satara, there is abundant testimony to confirm the fact of pains being taken to prevent the Raja forgetting the dignity of his station. I find that the movement of troops, prerartions for war, the favourable results of battles and campaigns were regularly reported to the Raja. Honorus were granted by him and the succession to the great hereditary offices and estates received confirmation from the Maharaja alone.

युद्ध किंवा तह करणे, दौलतीचे अष्टप्रधानांसुद्धां सर्व अधिकारी नेमणे, त्यांना वस्त्रे व शिक्कामोर्तब देणे, सरदार लोकांस स्वारीवर व मुलुखगिरीवर पाठविणे किंवा परत बोलावणे, इनाम, इतमाम. सरंजाम, नेमणुकी, धर्मादाय, देणगी, वंशपरंपरागत कामगारी, बहालीबडतर्फी, तात्पर्य–हरएक बाबतीत सनदा किंवा तशा महत्त्वाचे कागदपत्र देणे, ही सर्व सातारकर महाराजांच्या अखत्यारीची गोष्ट असून पेशवे जरी या सर्व बाबतीत शिफारशी करीत व सल्लामसलत देत तरी कोणतीहि गोष्ट महाराजांस पटल्याशिवाय किंवा निदान ती त्यांनी मान्य केल्याशिवाय अमलांत येत नसे, व शिक्कामोर्तब होणे ते त्यांच्या आज्ञेने व दखलगिरीनें होत असत. महाराजांजवळ पेशव्यांकडील कोणी कारभारी किंवा चिटणवीस सुनावणीस असत. खुद्द पेशव्यांकडून अगर पेशव्यांमार्फत कामकाज लिहून जाई, ते त्यांजकडून महाराजांस समजाविलें जाई व त्यांच्या आज्ञेनुरूप हुकूम सुटत. वरील हरएक बाबतीत पेशवे हे सांगतील किंवा सल्ला देतील त्याप्रमाणेच महाराज प्रायः हुकूम देत; परंतु महाराज एकादे वेळीं अडून बसल्यास पेशव्यांनी सक्ति चालवून बळजबरीनें शिक्कामोर्तब करून घेतल्याचीं उदाहरणे नमूद नाहीत. पेशव्यांना अशी बळजबरीच जर करावयाची होती किंवा त्यांना करतां आली असती तर त्यांनीं महाराजांचें शिक्कामोर्तबच साताऱ्याहून पुण्यास कां नेले नसतें? अथवा निदान ज्या गोष्टी पेशव्यांना परस्पर करतां आल्या असत्या त्या त्यांनीं कां केल्या नाहीत? उदाहरणार्थ, तहनामे स्वतःच्या नांवानें करणे, कागदपत्र व सनदा केवळ आपल्या नांवानें व शिक्कामोर्तबानें देणे, वगैरे गोष्टी त्यांना परस्पर करतां

आल्या असल्या. स्वतः बाजीरावाची वस्त्रे साताऱ्याहून आलीं होती एवढेंच नव्हे तर, पुढे सन १८१० साली सातारकर महाराज पुण्यास गेले तेव्हां बाजीरावाने स्वतः त्यांचा सर्व इतमाम आपल्या धन्याप्रमाणे ठेवला व त्याच नात्याने इंग्रजाकडूनहि ठेवविला. सातारकर महाराजांचे खास हुकूम किती किरकोळ बाबतीतहि लागत होते, मागून घेतले जात होते किंवा दिले जात होते, तसेच लष्करी व मुलकी अधिकारी व फौज वगैरेच्या हालचाली, युद्धप्रसंग, तहाच्या व इतर राजकारणी वाटाघाटी याच्या बाबतीत किती बारिकसारीक गोष्टींचाहि तपशील खुद्द बाजीरावाच्या वेळेपर्यंत सातारकर महाराजास कळविला जात असे. याविषयी पुरावा देत बसल्यास फारच विस्तार होईल, म्हणून या बाबतीत ज्या कोणास हा पुरावा पाहण्याची इच्छा असेल त्याने साताऱ्चे महाराज शहाजीराजे ऊर्फ अप्पासाहेब याच्या राणीने विलायतेस राणीसरकाराकडे साताऱ्ची दौलत परत मिळविण्याकरिता जो अर्ज केला होता तो मिळवून पहावा असा आम्ही हवाला देतों. पेशव्यानी स्वतःस मराठी दौलतीचे धनी म्हणवून घेतल्याचा पुरावा केव्हांहि पुढे आलेला नाही. दौलतीच्या उत्पन्नातून महाराजाच्या खासगी खर्चाकरिता विलायतेतील सिव्हिल लिष्टाप्रमाणे नेमणूक ठरवून दिली असली तरी जरूर पडेल तेव्हां खाजगी कामाकरितां स्वतंत्र नेमणुका किंवा रकमा दिल्या जात व महाराज दौलतीतून रकमा देण्याचे हुकूम सोडीत. कारभाराची परंपरा पुण्यात पेशव्याच्या कचेरींत शाहूच्या वेळेपासून चालत आली होती, आणि शाहूच्या वेळेपासून—विशेषतः त्याच्यानंतर—महाराजमंडळी आळसात अगर व्यसनात आपला सारा काळ घालवीत व कारभाराची फिकिर स्वतः करीत नसत, यामुळे पुण्याच्या कचेरींत कारभार होण्याची परंपरा बळावत गेली ही गोष्ट काही खोटी नाही. परंतु एकाद्या महाराजास आपला कारभारी वरचढ व शिरजोर झाला असे वाटून त्याने स्वाभिमानपूर्वक हुचल खाल्ल्याचा पुरावा कोठेंहि आढळत नाही. शिंदे, होळकर व नागपूरकर भोसले याच्याकडे गुप्त रीतीने पत्रव्यवहार करून त्यांची सहानुभूति मिळवून, पेशव्यांच्या जाचांतून महाराजमंडळींना आपली सुटका करून घेतां आली असती. पेशव्यांनी महाराजांस खरोखरच बंदिवासांत ठेवले असते तर मराठे सरदारास मूळ गादीचा व आपल्या जातीचा अभिमान वाटून त्यांनी त्यांची मुक्तता खचित केली असती; व ती केली नाहीं याचा अर्थ उघडच असा होतो की, सर्व गोष्टी—म्हणजे महाराज व्यक्तीचा नादानपणा, पेशव्यांनीं पाऊणशें वर्षेपर्यंत दौलतीस जोडलेलें वैभव व पुण्यास केल्या जाणाऱ्या कारभाराची सुव्यवस्था—लक्षांत घेतां, आहे ही स्थिति फारशी गैर नाहीं, निदान ही पालटण्याकरितां हातांत हत्यारच घेऊन उठलें पाहिजे असें नाहीं, असेंच या मराठे सरदारांना वाटलें असलें पाहिजे. तें

कसेहि असले तरी, निदान इंग्रजांना सातारकर महाराजांचा धनीपणा मान्य होता व पेशव्याना ते नोकर असेच मानीत होते; पेशव्यांच्या वागणुकीस ' अधिकाराचे अतिक्रमण ' हे नाव ते जर देत होते तर बाजीरावाच्या हातून निघून सातारकर महाराज इंग्रजांच्या गोटांत उपकृत स्नेही म्हणून गेले त्याअर्थी त्यानी तरी महाराजांना स्वतंत्र राजे असे मानावयास काय हरकत होती ? पण सातारकर स्वतंत्र मानले असते तर, दत्तकाची सबब लावून राज्य कसे खालसा करता आले असते ? अल्फिष्टनानें १८१७ सालीं जाहिरनामा प्रसिद्ध केला त्यात खालील शब्द आहेत:—

The Raja of Satara who is now a prisoner in Bajirao's hands will be released and placed at the head of an independent sovereignty of such an extent as may maintain the Raja and his family in comfort and dignity.

वरील शब्दात सर्वच मराठी दौलत सातारकर महाराजांच्या स्वाधीन होणार नाही, काही खालसा होईल, असा ध्वनि उघड निघतो, परंतु "independent sovereignty " हे शब्द खरे करावयाचे तर पुढे महाराजाशीं झालेल्या तहात, त्याच्या स्वातंत्र्यास बाध येण्यासारख्या कोणत्याहि अटी त्यांनीं घालणे योग्य नव्हते. निदान जुन्या अनुभवावरून परराज्याशी पत्रव्यवहारसंबंध इंग्रजामार्फतच करावा व आपल्या जहागीरदार सरदारांची व्यवस्था इंग्रजांमार्फत लावावी, अशा तऱ्हेची कलमें घालणे अवश्यक मानले तरी त्याच्या योगाने दत्तकाच्या परवानगीचा ससेमिरा महाराजाचे मागे कायमचा लावण्याचें कारण नव्हते. दौलत देतांनाच थोडी दिली. कारण, चार कोटी दौलतीपैकीं १५ लक्षाची दौलत म्हणजे काही फार नव्हे. शिवाय फंदफितुरी न करण्याबद्दल बांधूनहि घेतले होते. असा बंदोबस्त झाल्यावर हे १५ लक्षांचें उत्पन्न औरस संततीने खाल्लें किंवा दत्तक संततीने खाल्लें तर इंग्रजास विषाद का वाटावा ? पण जाहिरनाम्यातले 'स्वतंत्र राजे ' हे शब्द जाहिरनाम्यांतच राहिले! तहानें महाराजांना 'Subordinate Ally 'असा गौण दर्जा आणला व पुढे दत्तकाच्या बाबतींत 'Dependent Ally' म्हणजे पदरचे सस्थानिक असे त्यांस वागविलें. व सर्वात मौज ही कीं, राज्य खालसा करण्याची संधि आली तेव्हा, पेशव्यांनीं महाराजांवर लादलेली मानीव कैद किंवा परतंत्रता ही खरोखरीची राज्यभ्रष्टता मानून "पेशव्याच्या वेळीच तुम्ही स्वतंत्र राजे नव्हतां तर आमच्या अंमलाखालीं तुम्ही स्वतंत्र कसे ? " असा युक्तिवाद आरंभिला. पेशव्यांच्या वेळची परतंत्रताच जर इंग्रजांच्याहि स्नेहसंबंधांत सातारकर महाराजांस चिकटून बसली तर इंग्रजांनीं महाराजांवर उपकार तो कोणता केला ? १८१९ किंवा १८३९ सालच्या तहाच्या शब्दांत वास्तविक महाराज हे इंग्रजांच्या पदरचे सरदार

असे नाते जोडणारे शब्द कोणतेच नाहीत. सत्तेने इंग्रज कितीहि श्रेष्ठ असले तरी ते अद्यापि राजाधिराज बनले नव्हते. शिवाजीने मोंगलांपासून स्वराज्य जिंकून घेऊन स्वतःस राज्याभिषेक करविला होता व त्याच स्वतंत्र राज्याचा वारस प्रतापसिंह महाराज हा १८१९ सालीं होता. आणि तेच नाते १८३९ सालपर्यंत चालले होते. याच्या उलट इंग्रजाची सत्ता, मोंगलांचे दिवाण कारभारी व सेनापति, अशाच नात्याची होती. किंबहुना १८३९ तेहि इंग्रजसरकार आपणास व्यापारी कंपनी असेच म्हणवून घेत असे. व या दोन्ही तहांवर इंग्रजांचे म्हणून जें शिक्कामोर्तब झाले, त्यांत "व्यापारी कंपनी व दिल्लीच्या पातशहाचे नोकर" असेच शब्द होते. अर्थात् कायदेशीर भाषेने बोलावयाचे तर दिल्लीच्या पातशहाच्यासंबंधाने महाराजाचे नाते श्रेष्ठ व इंग्रजाचे नाते कनिष्ठ असेच म्हणावे लागते. चौथाईसरदेशमुखीच्या सनदा मराठ्यानाहि बादशहाकडून मिळाल्या होत्या या गोष्टीवरून पाहिले तरीहि सातारकर व इंग्रज दोघेहि कांहीं बाबतीत पातशहाचे सनदी नोकर म्हणजे परस्पर नात्याने बरोबरीचे, इतके तरी निदान म्हणण्यास हरकत नाही.

राजाचे अधिकार प्रधान मर्यादित करीत असतात हे इंग्रजास माहीत होतेच. खुद्द इंग्लंडचा राजा १८१८ सालच्या सातारच्या महाराजांपेक्षां कोणते जास्त अधिकार बजावतो ? इंग्लंडातहि सर्व राज्यकारभार प्रधान राजाच्या नांवाने करितात. बाजीरावाच्या किंवा तत्पूर्वीच्या पेशव्यांच्या शिफारशी सहसा नामंजूर करण्यास सातारकर महाराज धजत नसल्यास त्याला तसेच कारण असले पाहिजे. इंग्लंडाचा राजा तरी प्रधानमंडळाची शिफारस नामंजूर करण्याचे धाडस सहसा करितो काय ? अर्थात् पेशवा वाटेल तसा कारभार करीत असे, यामुळे सातारकर महाराज पदभ्रष्ट झाले होते असे म्हणतां येत नाही. तसेच, इंग्रजांना कळविल्याशिवाय परराष्ट्रांशी व्यवहार न ठेवण्याचे तहांत सातारकर महाराजांनी कबूल केले यावरून महाराज स्वतंत्र राजे नाहीत असेहि होऊ शकत नव्हतें. एका राजाचा दुसऱ्या राजावर विजय झाल्याने पहिल्यास दुसऱ्याच्या कांही अटी मान्य कराव्या लागतात; पण त्यामुळे त्याचे स्वातंत्र्य नष्ट झाले असे मानीत नाहींत. इटालीनें कार्थेज जिंकून त्याजवर बेसुमार जुलमाच्या अटी लादल्या म्हणून कांहीं कार्थेजचे राजकीय स्वातंत्र्य नष्ट झालें असे घडलेले ऐकिवांत नाहीं.

इंग्रज व सातारकर यांच्यांतील तह एकानें दुसऱ्यास लढाईत जिंकूनहि झालेला नव्हता. उभयपक्षीं स्नेहाचा असाच तो तह होता. श्रेष्ठ व कनिष्ठ राष्ट्रांत आपले स्वातंत्र्य राखून अमुक अमुक करण्याच्या किंवा न करण्याच्या अटीचे तह होऊ शकतात. १८०९ सालीं काबूलच्या अमिराने इंग्रजांशीं तह करून असें कबूल केलें कीं, "मी कोणाहि फ्रेंच मनुष्याला आमच्या राज्यांत

घेणार नाहीं.'' १८१५ सालीं नेपाळच्या राजानें इंग्रजांशी तह करून असें कबूल केलें कीं, '' सिकीमच्या राजाशी वाद उपस्थित झाल्यास मी तो तुमच्या ( इंग्रजांच्या ) मध्यस्थीने तोडून घेईन व तुम्ही द्याल तो निवाडा मान्य करीन. '' पण अशा तहांच्या योगाने काबूलच्या अमीराचें किंवा नेपाळच्या महाराजांचें स्वातंत्र्य नष्ट झालें असें कोणी मानीत नाही. किंवा या उभयतां राजांना दत्तकाच्या कामी इंग्रजांची परवानगी घ्यावी लागत नाही. तीच गोष्ट सातारकर महाराजाचीहि होती. साताऱ्चे महाराज कितीहि कमकुवत झाले असले व इंग्रज कितीहि प्रबल असले तरी १८१७ च्या जाहिरनाम्यांत ' स्वतंत्र राजा ' असे शब्द वापरले होते, 'जहागीरदार' असे शब्द नव्हते, ही गोष्ट नाहीशी होत नाही. एका राजाचा मुलुख दुसऱ्याहून कमी असला किंवा एकाची लष्करी सत्ता दुसऱ्याहून कमी असून त्याच्या मदतीवर त्याला अवलंबून रहावें लागलें म्हणून पहिला राजा स्वतंत्र नाही असें होत नाही.

आज युरोपांत कमकुवत राजेहि स्वतंत्र राजे असू शकतात हें सिद्ध झालें असून, अशा कमकुवत व आत्मरक्षण करावयास असमर्थ असलेल्या राजांचें कायदेशीर स्वातंत्र्य सिद्ध करण्याकरितांच इंग्लंड हें युद्धांत पडलें असल्याचें इंग्लंड आपल्याच तोंडानें सांगत आहे. सन १८१९ च्या तहांत उभय पक्षांची सोयच मुख्यतः पाहण्यांत आली होती. सातारकर महाराजांना आत्मरक्षण करावयाचें होतें; व इंग्रजांना मराठी राजेरजवाड्यास संतुष्ट करून, पुढें होणारीं युद्धें टाळून स्वतःचा खर्च व राज्य गमावण्याचा संभव हा वांचवावयाचा होता. म्हणून त्यांनीं एकमेकांच्या खुषीनें तो तह केला. दत्तकाच्या परवानगीचें बंधन इंग्रजांना घालावयाचें होतें तर तें स्पष्ट शब्दांनी इतर बंधनांबरोबरच त्या तहांत त्यांनीं कां घातलें नाहीं ? सातारकर महाराजांना त्याच वेळीं स्वतंत्र राज्य इंग्रजांनीं दिलें नसतें तर त्याचा हात कोण धरणार होतें ! तथापि उदार मनानें कां होईना पण एकदां दिलेलें स्वतंत्र राज्य त्यांना परत घेण्याचा हक्क उरला नव्हता. तात्पर्य, कायदा न्यायनीति वगैरे कोणत्याहि दृष्टीनें पाहतां साताऱ्चें राज्य इंग्रजसरकारनें खालसा केलें ही गोष्ट बेसुमारच झाली. साताऱ्च्या राज्याच्या या मुद्द्याची आम्हीं इतक्या विस्तारानें चर्चा करण्याचें कारण इतकेंच की, हिंदुस्थानांत इंग्रजांनी पुष्कळसा मुलुख तरवारीच्या जोरावर मिळविला हे खरें आहे; तरी कांहीं मुलुख त्यांनी न्यायाकडे न पाहतां राज्य मिळविण्याच्या भरांत मिळविला हीहि गोष्ट कांहीं खोटी नाहीं ! लॉर्ड डलहौसी याच्या कारकीर्दीत इंग्रजी राज्यास जोडल्या गेलेल्या मुलखांपैकीं बऱ्याच मुलखाला हीच विचारसरणी लागू पडण्याचा संभव आहे; पण या विषयावर आतां अधिक विस्तार करण्याची आमची इच्छा नाही.

मराठेशाहीच्या नाशाच्या खऱ्याखोट्या कारणांचें विवेचन आणखीहि

अनेक दृष्टींनीं करितां येण्यासारखें आहे; तथापि विस्तारभयास्तव शेवटी एकाच मुद्द्याचा थोडासा विचार करून हे प्रकरण संपवितो. तो मुद्दा म्हणजे—

## जातिभेद व राज्यनाश.

मराठेशाहीच्या अवनतीला महाराष्ट्रांतील जातिभेद हा कारणीभूत झाला असे पुष्कळांकडून म्हणण्यांत येते. पण या जातिभेदास खरोखर कितपत जबाबदार धरितां येईल याची बरीच शंका वाटते. महाराष्ट्रात जातिभेद होता ही गोष्ट खरी. पण त्याबरोबर हेहि लक्षात ठेविले पाहिजे की, तो बाळाजी विश्वनाथापासूनच पुढे महाराष्ट्रात उत्पन्न झाला आणि त्याच्या पूर्वी तो नव्हता असे नाही. जातिभेद होता, पण तो सनातन होता; पूर्वी हजारो वर्षांपासून चालत आलेला होता. तो महाराष्ट्रातच होता असे नाही, तर हिंदुस्थानच्या इतर भागांतहि होता. असे असता तो महाराष्ट्रातच तेवढा आणि अठराव्या शतकाच्या अखेरच दुष्परिणामी झाला असे कसे म्हणता येईल ? पूर्वी मुसलमानांनी महाराष्ट्रातील बराच मुलुख जिंकला त्या वेळी जातिभेद होता. पुढे मोगलांच्या स्वाऱ्या आल्या तेव्हा तो होता, पुढे मोगलांच्या हातून मराठ्यांनी आपले राज्य सोडविले व शिवाजीने स्वतंत्र राज्य स्थापले तेव्हा तो होता; शिवाजीच्या पश्चात् मोगलांनी फिरून इकडचा मुलुख काबीज केला तेव्हा तो होता. पुढे राजारामाच्या कारकीर्दीत मराठ्यांनी वीस वर्षेपर्यंत झगडून स्वातंत्र्यरक्षण केले तेव्हा तो होता, पुढे सवाई माधवरावाच्या कारकीर्दीपर्यंत मराठेशाहीचे तेज वाढून दिल्लीपर्यंत मराठी सत्ता स्थापित झाली तेव्हा तो होता; व शेवटी बाजीरावाच्या कारकीर्दीत मराठेशाहीचा नाश झाला तेव्हा तो होता; थोडक्यात बोलावयाचे तर शिवाजीच्या आधी दोनशे वर्षांपासून व शिवाजीच्या नंतर दोनशे वर्षांपर्यंत हिंदुस्थानातील व महाराष्ट्रांतील जातिभेद एकाच स्वरूपात कायम होता. असे असतां हे चढउतार आणि ही स्थित्यंतरे कशीं घडून आली ? मोगलांशी लढावयाचे असता जातिभेद आडवा आला नाहीं व इंग्रजांशी लढावयाचे असता मात्र तो आडवा आला याची उपपत्ति काय सांगतां येणार ?

मोगलांच्या वेळी जे मराठे व ब्राह्मण स्वराज्याला ग्वाही लावून लढत होते ते मनाने किंवा कृतीने आजच्या दृष्टीचे समाजसुधारक होते असे म्हणतां येईल काय ? शिवाजीने ज्या वेळी महाराष्ट्रमंडळात एकी करून मुसलमानांपासून देशाचे संरक्षण करावयाचे योजिले त्या वेळी त्याने जातिभेदाविरुद्ध व्याख्याने दिलेली आढळत नाहीत ! त्याने आपल्या राज्यात केवळ गुणांकडे पाहून कर्ते पुरुष जवळ ओढले व ज्याच्या अंगी कर्तृत्व नव्हते त्यास दूर लोटले ही गोष्ट प्रसिद्ध आहे. त्याने अमुक म्हणजे मराठा व अमुक म्हणजे ब्राह्मण असा भेदाभेद केला नाहीं असे दिसते. पण इकडे पहावे तर शिवाजी

देखील सनातन पद्धतीप्रमाणे जातिभेद मानणाराच होता. वर दर्शविल्याप्रमाणे त्याने केवळ सद्‌गुणनिष्ठ आवडनिवड दाखविली ती तो समाजसुधारक किंवा जातिभेदाचा द्वेष्टा होता म्हणून खास नव्हे. तसेंच पेशव्यांच्याहि वेळीं सनातन जातिभेद मान्य होता म्हणून काहीं प्रत्यक्ष राजकारणांत जातिनिष्ठ आवडनिवड दाखविली गेली नाहीं, तर दौलतीच्या कल्याणाच्या दृष्टीनेंच ती दाखविली गेली. बाळाजी विश्वनाथ पेशवा झाल्यानंतर जी घराणीं उदयास आलीं त्यांतील शेकडा पाऊणशे घराणीं तरी ब्राह्मणेतर होतीं. त्या वेळची सरंजामी यादी जर काढून पाहिली तर भारी सरंजामदार ब्राह्मणेतर असलेलेच आढळतील. पेशव्यांनीं कोंकणस्थ ब्राह्मणाचें कल्याण केलें असाहि एक विशिष्ट आरोप त्यातल्या त्यात त्यांच्यावर लादण्यात येतो. पण त्यालाहि फारसा आधार नाहीं. बेहेरे फडके रास्ते पटवर्धन मेहेंदळे—आणखी फार तर आम्हास माहित नसेल असा एखादुसरा—याशिवाय कोंकणस्थ सरदार तरी असे कोण होते ? पेशव्याशिवाय बाकीचे सर्व प्रधान, तसेंच विंचूरकर पानशे पुरंदरे मुजुमदार हिंगणे वगैरे सरदार मंडळी देशस्थ होती. गोविंदपंत बुंदेल्यासारखे कऱ्हाडे सरदारहि अनेक होते. येऊन जाऊन कारकुनी फडांत काय कोंकणस्थ मंडळी असतील ती.

एकाद्या वरिष्ठ जागीं ज्या जातीचा अधिकारी असतो त्या जातीचे लोक त्याच्या खात्यांत हळूहळू थोडेबहुत भरले जातात ही गोष्ट खोटी नाहीं; पण ती नुसत्या कोंकणस्थांना लागू नसून हिंदूंतील सर्व जातींना इतकेंच नव्हे तर, मुसलमान इंग्रज युरोपियन या सर्वांनाच ती मनुष्यस्वभावामुळे लागू आहे. आज इंग्रजी राज्यांत देखील या गोष्टी वाटतील तितक्या पहावयास सापडतात. कलेक्टरचा एकादा चिटणीस किंवा जज्जाचा शिरस्तेदार प्रभू किंवा सारस्वत असला तर थोड्याच काळांत त्या त्या कचेऱ्यांतील महत्त्वाच्या जागा प्रभू किंवा सारस्वत यांनीं व्यापलेल्या काहीं जिल्ह्यांत आढळतात. गेल्या काहीं वर्षांत मुंबई इलाख्यांतील मुनसफाच्या जागा कोणत्या पोटजातींतील लोकांना मिळाल्या याचा तक्ता कोणी प्रसिद्ध केल्यास वरील विधानाचें समर्थनच होईल. मुंबईच्या म्युनिसिपालिटींत किंवा ओरिएंटल इन्शुअरन्स कंपनीच्या हपिसांत पारशी लोकांचा बेसुमार भरणा झाला आहे अशी तक्रार मुंबईच्या कारकुनी बाजारांत नेहमीं ऐकू येते. जी गोष्ट पारशांची तीच खिस्त्यांची. पूर्वीं विलायतेंत हेलिबरी कॉलेजांतून इकडे सिव्हिलियन येत तेव्हां काहीं ठराविक घराण्यांतील लोकच येत अशी फार तक्रार असे. हिंदुस्थानांतील ब्रिटिश अमदानीचा शंभर वर्षांचा इतिहास चाळल्यास त्यांत तींच तींच आडनांवें अधिकारीपटांत वरचेवर आलेलीं आढळतील. खुद्द विलायतेंत किंवा अमेरिकेंत जातिभेद नसला तरी पक्षभेद तितकाच तीव्र आहे, व विलायतेंतील पुष्कळशा घराण्यां-

नून एकच राजकीय पक्ष मोठया निष्ठेनें व अभिमानानें अनुसरलेला परवां-परवांपर्यंत पहावयास सांपडत असे. अर्थात् हाताशीं असलेला, डोळ्यांपुढें असलेला, माहिती असलेला, किंवा इतर रीतीने हितसंबध असलेला, पण दिलेलें काम झेंपण्यासारखा आपला मनुष्य टाकून मुद्दाम आर्जवून दुसरा दूरचा मनुष्य शोधून आणून जवळ करण्याइतका लोकोत्तर निःस्वार्थीपणा निःपक्षपातीपणा किंवा परोपकारबुद्धि कोणत्याच राष्ट्रात केव्हांहि बोकाळलेली होती असे वाटत नाहीं. पेशव्यांनी कोंकणस्थ ब्राह्मणांची घराणी आणली याहून आणखी पुष्कळशी उदयास आणलीं असती तरी ते वर वर्णन केलेल्या मनुष्यस्वभावास अनुसरूनच झाले असते. पण वर दर्शविल्याप्रमाणे ती गोष्ट त्याच्या हातून मुळीं घडलीच नाही.

आता पेशव्यानी स्वतःकरितां सत्तेचा अभिलाष धरला असा आरोप वाटेल तर त्याजवर करावा. या बाबतीत त्यांचे विशेष प्रकारचे समर्थन आम्ही करीत बसत नाही. कारण, जी गोष्ट त्यांची तीच ब्राह्मणेतर सरदारांचीहि होती. अष्टप्रधान व सरदार याच्या दौलती वंशपरंपरागत चालणे ही गोष्ट शिवाजीच्या वेळीं नव्हती याचे कारण, नवीन राज्यव्यवस्थेची त्याची पहिलीच पिढी होती. पण त्याच्याहि वेळीं परंपरागत नोकरी–वतनाची आवड–दृढमूल झालेली असून तीच आवड सरदारकीच्या वतनालाहि पुढे लागू झाली इतकेच काय तें. पण खुद्द इंग्लंडातहि वंशपरंपरागत वतनांची चाल अजून पहावयास सापडते; व देशाचे कायदेकानू करण्याचा अधिकार ज्या दोन सभांमध्ये वांटला गेला आहे त्यांपैकी एका म्हणजे हौस ऑफ लॉर्डस या सभेत लोकांनीं न निवडतां किंवा राजानेंहि न नेमतां आज शेकडो वर्षे केवळ जन्मसिद्ध हक्कानें जागा अडवून कायदेकानू करण्याचा अधिकार उपभोगणारी अशीं शेकडो घराणी आहेत.

जातिभेदबुद्धीनेच महाराष्ट्रांत फूट फार झाली आणि कलागति लागल्या असेंहि म्हणण्यांत येतें; पण याला फारसा पुरावा नाहीं. कारण, याच्या उलटसुलट गोष्टी अन्वयव्यतिरेकाने किती तरी सिद्ध करतां येतील. जातिभेद जोरांत असताहि मराठ्या शिवाजीने चंद्रराव मोऱ्यासारख्या मराठया सरदारास ठार मारिले, अनेक प्रभू घराण्यास जवळ केलें, रामदासासारख्या ब्राह्मणाच्या पदरांत एवढ्या पराक्रमाने मिळविलेले राज्य टाकण्यास तो तयार झाला, ही गोष्ट जातिभेदाच्या दुष्परिणामाची द्योतक आहे काय ? शिंदे व होळकर दोघेहि ब्राह्मणेतर; असे असतां त्यांच्यांत तीन पिढ्यांचे वैर कां होतें ? तसेंच देशस्थ व कोकणस्थ हा भेद बोकळला होता असें म्हणावे तर, पेशव्यांतील मुख्य भांडण कोकणस्थकोंकणस्थांतलेच किंबहुना एकाच घराण्यांतले होतें ! हरिपंत फडके व परशुरामभाऊ हे नाना फडणविसाच्या पक्षास होते ते कोंक-

णस्थ म्हणून नव्हे. रघुनाथराव मोरोबादादा वगैरे एका बाजूला व माधवराव नाना फडणवीस वगैरे दुसऱ्या बाजूला, असे जे पेशवाईत तट पडले ते जातिद्वेषामुळें पडलेले नाहीत. अशाच प्रकारची भांडणे त्या वेळी मागे पुढे शिंदे होळकर भोसले गायकवाड आंग्रे वगैरे घराण्यांत होती, त्याला कारण जातिभेद खचित नाही, मूळचे व्यक्तींचे भांडण असेल तेथे कदाचित् या जातिभेदबुद्धीने आणखी एक पैची भर पडली असेल. उदाहरणार्थ, मराठेशाहीत ब्राह्मण व कायस्थ यांच्या भांडणामुळे वितुष्ट माजले होते हे आम्हांस माहीत आहे; पण ती भर रुपयास पैची असेच आम्ही समजतो. तात्पर्य, भांडणाचे किंवा दुहीचे खरे कारण शोधू जाता ते नेमके जातिभेदापर्यंत जाते, पुढे मागे जाऊ शकत नाही असे मुळीच म्हणतां येत नाही.

देशस्थांनी राघोबाचा पक्ष उचलला व कोकणस्थानी नाना फडणविसाचा पक्ष उचलला असे न्यायमूर्ति रानडे यानीहि म्हटलेले आढळते. पण देशस्थांनी ज्याचा पक्ष उचलला तो राघोबाच मुळी कोकणस्थ होता याची वाट काय ? कोकणस्थातील भांडणाचा फायदा घेऊन सर्व देशस्थानी मिळून एकादा देशस्थ किंवा सर्व मराठ्यांनी मिळून एकादा मराठा पेशवा करण्याचा कट केल्याचा पुरावा असता तर गोष्ट वेगळी. तात्पर्य, मराठेशाहीत आपापसांतील कलह बेसुमार वाढले होते याबद्दल जरी भरपूर पुरावा आहे, तरी हे कलह जातीच्या किंवा पोटजातीच्या अभिमानाने व मत्सराने उत्पन्न झालेले होते अशाविषयीं फारसा पुरावा नाही. किंबहुना स्वहिताचा म्हणजे व्यक्तिहिताचा प्रश्न उत्पन्न झाला असतां जातींचा व पोटजातींचा अभिमानहि बाजूस पडे, व हे हित साधण्याकरितां परजातीचे किंवा पर-पोटजातीचेहि लोक खुशाल जवळ केले जात. या वेळेच्या जातिभेदासंबधाने न्यायमूर्ति रानडे यांनीं केलेल्या विधानापेक्षा त्यांनीच आपल्या पुस्तकात दुसरे जे एक विधान केले आहे ते मात्र आम्हास अधिक ग्राह्य वाटते. 'मराठ्याच्या सत्तेचा उत्कर्ष' या विषयावरील आपल्या पुस्तकात ' बी कसे पेरले ? ' या प्रकरणात त्यानीं असे म्हटले आहे की, " केव्हाहि पहा ! हिंदुस्थानात परकीयाचा शिरकाव हिंदु लोकांच्या आपसातील दुहीमुळेच झालेला आहे. व्यवस्थितपणा कसा तो हिंदु लोकांस मुळींच माहित नाहीं. जुटीने काम करण्याची त्याना कधीच संवय नाहीं. कांहीं विवक्षित नियम ठरवून त्याप्रमाणे बिनबोभाट चालण्याचा त्यांना मनापासून तिटकारा. शिस्त व कनिष्ठपणाचे नाते मान्य करण्याचा उपदेश त्यांच्या बुद्धीस आवडावयाचा नाहीं. जात्याच असे दुर्गुण हिंदु लोकांच्या अंगीं असल्यामुळे व्यवस्थित रीतीने तयार केलेल्या सैन्यापुढे हिंदूंची सत्ता टिकली नाहीं यांत नवल नाहीं. हिंदु लोकांतील हे दोष नाहीसे करून लहान सहान गोष्टींपासून तों तहत मोठमोठ्या राज्यकारस्थानांपर्यंत प्रत्येक बाबतीत समा-

जाचे हित ते व्यक्तीचे हित, समाजाचा उत्कर्ष तोच व्यक्तीचा उत्कर्ष,समाजाचा अपमान तो व्यक्तीचा अपमान असे प्रत्येक मनुष्यास वाटू लागावे म्हणून शिवाजीची सारखी खटपट चालू होती." ही गोष्ट अगदी खरी आहे; पण शिवाजीने ही खटपट कोणत्या मार्गाने केली याचा विचार आपण करूं लागल्यास ज्या जातिभेदास ज्या दृष्टीने आज नावे ठेवण्यांत येतात व जो मराठेशाहीच्या अवनतीस कारण झाला असे सागण्यांत येते, तो जातिभेद या दृष्टीनें मोडण्याची खटपट शिवाजीने केली असा पुरावा कोठेहि आढळत नाही.

शिवाजीच्या अगी हिंदुधर्माभिमान पूर्ण बाणलेला होता व या धर्माभिमानाच्या जोरावर त्याने सर्व राष्ट्र खडबडून जागे केले. पण ज्या धर्माचा अभिमान शिवाजीच्या मनांत होता तो सनातन हिंदुधर्मच नव्हता काय ? म्हणजे त्या धर्माचे अधिष्ठान चातुर्वर्ण्य व त्या धर्माच्या आचाराचे एक प्रमुख अग जातिभेद हे नव्हते असे कोणी प्रामाणिकपणाने म्हणू शकेल काय ? या प्रश्नाचे सरळ उत्तर विरोधी वाचकानी आपल्या मनाशी देऊन पहावे. शिवाजीने जातिभेद मोडण्याचा प्रयत्न केला नाही इतकेच नाही, तर जातिभेद ही सस्था किंवा व्यवस्था राष्ट्रहितदृष्ट्या फार घातक आहे, राजकीय प्रगति दर पावलागणिक या जातिभेदाच्या उबरठ्यावर अडखळून पडते,अशी शिवाजीची भावना असल्याविषयीहि पुरावा नाही. ' गोब्राह्मणप्रतिपालक ' हे शब्द त्याने आपल्या ब्रीदावर सुवर्णाक्षरानी लिहून ठेवले होते, ते तत्कालीन ब्राह्मणाच्या भिडेमुळे किंवा धूर्तपणाने कोणास फसविण्याकरिता खास लिहिलेले नव्हते. त्याची जातिभेदावर एक प्रकारची श्रद्धाच होती असे दिसते; असे असता, या चातुर्वर्ण्यविशिष्ट धर्माचा अभिमान प्रदीप्त करून ब्राह्मणाबरोबर मराठे व मराठ्याबरोबर ब्राह्मण ग्याद्रास ग्यादा भिडवून व जिवावर उदार होऊन लढण्यास त्याने तयार केले याचा अर्थ, जातिभेदातीत असा जो अवशिष्ट हिंदुधर्म त्याचेच त्याला व इतराना अधिक महत्त्व वाटत होते व हे महत्त्व मनात बिबले असल्यामुळे त्यास जातिभेद किंवा जातिद्वेष आड येत नव्हता हे उघड आहे. पण त्यातल्यात्यात विवेकपूर्वक बोलावयाचे तर, आपल्या सभोवतालच्या लोकांना व्यक्तिहित विसरून समाजहित उराशी बाळगण्यास शिवाजीने तयार केले ते तो समाजसुधारक होता म्हणून तर नव्हेच, पण सनातन धर्माचा अलौकिक व दिव्य उपदेष्टा होता म्हणूनहि नव्हे; तर लोकांची मने आकर्षून घेण्यासारखा तो धीट धाडसी बुद्धिमान पुढारी व महाराष्ट्रभक्त होता म्हणूनच ! जातिभेद हा जसा शिवाजीपूर्वीच्या अवनतीस कारणीभूत होता असे म्हणतां येत नाही, तसेच शिवाजीच्या काळी जातिभेदबुद्धीचा ऱ्हास हेच त्याच्या काळच्या उन्नतीचे कारण असेंहि म्हणतां येत नाही.

शहाजी, शिवाजी व सभाजी या तीनच पिढ्या ओळीने घेतल्या व

त्यांतील स्थित्यंतराचीं कारणे पाहू गेलो तर तीं धार्मिक विचार किंवा आचा। यांच्या फरकात आढळून न येतां व्यक्तिनिष्ठ अशा लोकोत्तर गुणावगुणांच्या फरकातच आढळून येतील. जी गोष्ट भोसले घराण्यांतील या तीन पिढ्यांची तीच तत्कालीन महाराष्ट्रसमाजांतील तीन पिढ्याची समजावयाची आहे तसेच महादजी शिंदे व नाना फडणवीस यांच्या पश्चात् पाठोपाठ तशाच गुणांचे पुढारी दौलतीस लाभते तर जातिभेदामुळें मराठेशाही गेल्याचा हा शुष्क व खोटा वाद करीत बसण्याचे आज कारणच पडले नसते. महादजी व दौलतराव किंवा थोरले माधवराव व दुसरा बाजीराव यांच्या कालच्या स्थित्यंतरास समाजास्थिति कारण नसून लोकोत्तर व्यक्तींचा म्हणजे विभूतीचा अभाव हेच खरें कारण आहे. विभूतीचा जन्म सामाजिक स्थितीवर फारसा अवलंबून नसतो. सामाजिक स्थिति विशेष अनुकूल असेल तर ते दुधात साखर पडल्याप्रमाणे गोड अतएव इष्टच होईल आणि विभूतींचे तेज आणखी विशेष पडेल ही गोष्ट निराळी. मनुष्याला व्यक्तिनिष्ट स्वार्थ विसरण्याला विभूति तरी त्याच्या डोळ्यापुढे निपजाव्या लागतात किंवा संकीर्णराष्ट्रप्रेमाची भावना तरी त्याच्यात उदित व्हावी लागते. महाराष्ट्रातील लोकांच्या अंगीं व्यक्तिनिष्ट स्वार्थ विसरण्याची पात्रता असल्याचे आजवर अनेक वेळा सिद्ध झालेले आहे. पण या पात्रतेस उद्दीपनकारण विभूतिपूजनबुद्धि हेच असून राष्ट्रीय-प्रेम-बुद्धि हें फारसें नव्हते, व अद्यापिहि नाहीं असेंच म्हणणे भाग आहे. पण त्याजबरोबर हेहि सांगितलें पाहिजे कीं, राष्ट्राभिमानबुद्धि ही जातिभेदनाशावर अवलंबून असते असें नाहीं. सामुदायिक हिताकरिता शिस्त पाळणें, ठराविक नियमाचे उल्लंघन न करणें, राष्ट्रहितशत्रूविरुद्ध नेहमीं आपसातील एकमेकाचा अभिमान धरणें या गोष्टी जातिभेद असला तरी होऊं शकतील. जातिभेद असूनहि सामुदायिक अशी राष्ट्रहितबुद्धि उत्पन्न होऊं शकते कीं नाहीं याचें उत्तर अस्तिपक्षीच दिलें पाहिजे असेंच कोणालाहि वाटेल. जसा जातिभेद तसाच धर्मभेद; युरोपांत धर्मपंथ प्रबळ असतांहि अनेक धर्मपंथांचे लोक एकाच राष्ट्राचे अभिमानी असलेले आढळतात. स्पेनचा रोमन क्याथोलिक राजा धर्मपंथाभिमानानें प्रचंड आरमार घेऊन इंग्लंडवर स्वारी करण्यास आला तेव्हां इंग्लंडांतील प्रॉटेस्टंट लोकांप्रमाणेच रोमन क्याथोलिक लोकांनीहि या आरमाराचा पराभव करण्याची तयारी केली होती ! आज युरोपात माजलेल्या युद्धांत प्रॉटेस्टंट इंग्लंड आणि क्याथोलिक फ्रान्स व रोमन क्याथोलिक इटाली एकमेकांच्या खांद्यास खांदा लावून प्रॉटेस्टंट जर्मनी व क्याथोलिक ऑस्ट्रिया यांच्याशीं लढत आहेत. मुसलमान धर्माचे आरब इंग्लंडच्या बाजूला लढत असून मुसलमान तुर्क जर्मनीच्या बाजूला लढत आहेत !

जातिभेद असावा किंवा नसावा या प्रश्नाचें तात्विक उत्तर कांहींहि ग्सो; आणि स्वतः प्रस्तुत लेखकहि तो नसावा असे म्हणणारांपैकीच एक गाहे. तात्त्विक न्यायबुद्धि व व्यवहार अशा दोन दृष्टींनी जातिभेदाच्या [श्नाचा विचार करावा लागतो. न्यायबुद्धीच्या दृष्टीनें पाहतां हे ईश्वराने केवळ न्मसिद्ध अशा श्रेष्ठ हक्काचा सर्व मक्ता कोणत्याहि एका जातीस निरतर ावा, किंवा दुसऱ्या कोणत्याहि एका जातीस निरतर कनिष्ठ दर्जाच्या स्थितीत ावे, असे म्हणणे म्हणजे ईश्वराच्या न्यायबुद्धीची थट्टा करणेच होय. एकाद्या त्कृष्ट राजाच्या अमलाप्रमाणे ईश्वराच्या अमलांतहि सर्व भूतमात्रांना उत्क्रान्ति ावण्याची निदान समान संधि तरी असावी अशी अपेक्षा न करणे म्हणजे, श्वर हा अन्यायी मनुष्यापेक्षांहि अधिक अन्यायी आहे असेच म्हणावे लागेल! ,सत्या व्यवहाराच्या दृष्टीने पाहिले तरी ज्यांना आज राजकीय स्वातंत्र्य मिळ- ाण्याची इच्छा आहे अशा लोकांना जातिबंधन शिथिल करणें हे, आपण ाजकारणी युद्धांत आजवर उपयोगांत न आणलेले एक शिलकी शस्त्र, या ात्याने तरी ग्राह्य होण्यास हरकत नसावी, मग त्यांचे निव्वळ तात्त्विक विचार ांहींहि असोत. प्रत्येक राष्ट्राची कोणत्याहि वेळी श्रेष्ठ मूर्धाभिषिक्त किंवा ार्वंकष अशी एकादी भावना असतेच. खुद्द शिवाजीच्या वेळी देखील महा- ाष्ट्रांत राष्ट्रीय भावना धर्मापेक्षा राजकारणावरच अधिक अधिष्ठित होती ासे आम्हास वाटते; व आज विसाव्या शतकांत तर आमच्या राष्ट्राची दृष्टि ार्मापेक्षां राजकारणावरच अधिक लागलेली आहे ही गोष्ट कोणासहि ना- ाबूल करितां येणार नाहीं. सध्याच्या अनुषंगाने साधने योजणे यांतच शहा- ापण आहे. राष्ट्रभक्तीचे औषध जे जुनें तेच आजहि आहे. मात्र पूर्वी केवळ ानातन धर्मकल्पनांच्या अनुपानातून ते दिले जात होते तर ते आज सना- न धर्मांचीच कल्पना पण ती किंचित् शिथिल म्हणजे अधिक उदार करून दललेल्या सामाजिक स्थितीच्या अनुपानांतून दिले पाहिजे. हे अगांतुक ावेचन अर्थात् हल्लीच्या काळास अनुलक्षून आहे. पण सर्व जगांतील साम्रा- ायांशी संबंध आलेली आजची स्थिति मनाने पूर्वकाळी संक्रमित करून ाजच्या अडचणी तेव्हांहि होत्या अशी भ्रामक समजूत करून घेऊन जाति- ादामुळेच राष्ट्रनाश झाला असे म्हणणे मात्र वाजवी होणार नाही.

## प्रकरण तिसरें

# मराठेशाहीची राज्यव्यवस्था

मराठ्यांचा 'चोर लुटारू दरोडेखोर' अशा नांवाशिवाय इंग्रज ग्रंथकारांनी सहसा उल्लेख केला नाही. तथापि हिंदुस्थानात मराठे हेच काय ते इंग्रजांना आपल्या बरोबरीचे प्रतिस्पर्धी भेटले ही गोष्ट लक्षांत घेतली म्हणजे इंग्रज ग्रंथकारांनी असे उद्गार काढावे हें योग्यच आहे, शत्रूविषयीं कधी कोणी चांगले उद्गार काढिले आहेत काय ? मराठ्यापेक्षा इंग्रज हे अधिक खंदे कलमबहाद्दर असून इतिहास प्रबंध रोजनिशा टिपणें कैफियती विवेचनें व वर्णनें लिहून ठेवण्याचा त्यांना मोठा नाद असे. यामुळे मराठ्यासंबंधानें इंग्रजांनी जितके लिहून ठेवले आहे तितके इंग्रजांसंबंधानें मराठ्यांनी लिहून ठेवलेलें नाहीं. मराठी बखरकार मुत्सद्दी वगैरेंनी इंग्रजांविषयी फक्त प्रसंगोपात्त अगदी त्रोटक उडत उडत उल्लेख केले आहेत. हल्ली इंग्रजी राज्य झाल्यामुळे, तसेच इंग्रजी ग्रंथ छापलेले असल्यामुळे इंग्रजांनी लिहिलेल्या ऐतिहासिक वाङ्मयाचा खुराक आमच्या इकडील सुशिक्षित तरुण पिढीस सहजच चारण्यात येतो. आणि नित्य एकाच प्रकारचें वाङ्मय वाचल्यानें वाचकाचा बुद्धिभ्रंश व्हावा हें साहजिकच आहे. परंतु गेल्या पंचवीस तीस वर्षांत महाराष्ट्रांत इतिहासभक्तांनी जी संशोधनात्मक देशसेवा केली तिच्यायोगानें मराठ्यांसंबंधानें अस्सल कागदपत्र व प्रबंध इतके विपुल उपलब्ध झाले आहेत कीं, मराठ्यांविषयीं यथातथ्य माहिती समजून घेण्याची ज्याला इच्छा असेल त्याला वाङ्मयसाधन नसल्याची सबब आतां उरली नाही. इसापनीतींतील गोष्टीप्रमाणे मनुष्यानें काढलेल्या सिंहाच्या चित्रावरच आपणास विसंबून राहण्याचें कारण नसून, सिंहानें काढलेलें मनुष्याचें चित्रहि आपणास पहावयास मिळू लागलें आहे ! पण मराठ्यांनी केलेल्या इंग्रजांच्या वर्णनापेक्षां, मराठ्यांनी स्वतः लिहिलेल्या कागदपत्रांतून स्वतः मराठ्यांविषयीं नकळत रेखाटले गेलेले जे चित्र पहावयास सांपडेल त्याशींच आपणास प्रस्तुत अधिक कर्तव्य आहे. हें चित्र न्याहाळून निरखून पाहणारास, मराठे म्हणजे निव्वळ उपटसुंभ होते, त्यांनी लढण्याशिवाय व लुटण्याशिवाय दुसरे कांहींच कधीं केले नाही, त्यांना शांततेचे सुख माहीत नव्हते किंवा संघटित राज्यपद्धतीच्या मूलतत्त्वाची ओळख नव्हती, हे आरोप कधींहि खरे वाटणार नाहींत.

कै. न्यायमूर्ति माधवराव रानडे यांनी ' मराठ्यांच्या सत्तेचा उत्कर्ष ' या आपल्या लहानशा पण उत्कृष्ट इंग्रजी पुस्तकांत मोठ्या अधिकारयुक्त वाणीनें

वरील आरोप सप्रमाण खोडून काढून, मराठ्याची खरी योग्यता हिंदुस्थानांतील सर्व प्रांतांच्या लोकांस समजावून दिली व आपले पूर्वजऋण व राष्ट्रऋण उत्तम रीतीने फेडले यात शंका नाही. मराठे म्हणजे सह्याद्रिपर्वतांतलि अरण्यामध्ये वावटळीने उडालेला पाचोळा ! तो एक ठिकाणी यदृच्छेने गोळा होऊन त्याचा एकदम भडका झाला व लवकरच शमला, अशा तऱ्हेच्या ग्रांट डफसारख्या इतिहासकार म्हणविणारांनी केलेल्या मराठेशाहीच्या वर्णनाचा प्रौढ शब्दांनी पण समर्पक असा खंडनपूर्वक निषेध करून रानड्यांनी सिद्ध केले आहे की, अशा लोकास मराठ्याच्या इतिहासाचे खरे मर्मच कळले नाही. ते म्हणतात, केवळ लुटारू लोकाच्या हातून पिढ्यानुपिढ्या टिकणाऱ्या पातशाहीची उभारणी कधी होत नसते, किंवा एका मोठ्या खंडाच्या राजकीय नकाशाला वाटेल तो रंग देण्याचे व तो कायम टिकविण्याचे कार्य घडत नाही. अशा गोष्टी घडून येण्यास मनुष्याच्या अंगी काही निराळाच जोम असावा लागतो. क्लाईव्ह व वॉरन हेस्टिंग्ज यासारख्या धाडशी इंग्रजाच्या हातून ब्रिटिश राज्यासारखी संस्था हिंदुस्थानात निर्माण होण्यास त्याच्यामागे असणारी श्रीमान् बलाढ्य निश्चयी पण अमूर्त अशा ब्रिटिश राज्याची वृद्धि व सत्ता ज्याप्रमाणे खरी कारणीभूत झाली, त्याप्रमाणे मराठे लोक व्यक्तिशः कितीहि धीट धाडसी व शूर असते पण त्यांच्याहि मनात राष्ट्रप्रेम किंवा राष्ट्रभक्ति म्हणून कांहीं चीज नसती, मराठी राष्ट्र म्हणून मुळात काहीच नसते, तर त्याच्या हातून मराठापदपातशाहीची स्थापना कधीच झाली नसती. महाराष्ट्रात वीराप्रमाणे मुत्सद्द्यांचीहि परंपरा शेकडो वर्षे अबाधित चालली व ही परंपरा राहण्यास मराठा राष्ट्राची अमूर्त कल्पनाच उपयोगी पडली. फिनिक्स पक्षाप्रमाणे चितेतून नवा सजीव प्राणी एरवी उत्पन्न होत नाही. राजकार्यधुरंधर अहिरावणमहिरावणाच्या रक्ताच्या एका थेंबागणिक शेकडो अहिरावणमहिरावण केवळ व्यक्तिनिष्ठ महत्त्वाकांक्षेच्या भूमीत उत्पन्न होऊ शकत नाहीत. मराठे शेवटी इंग्रजाच्या हातून जिंकले गेले, यावरून इंग्रज कदाचित् मराठ्यांपेक्षां संस्कृतीने राष्ट्रप्रेमाने उद्योगाने चिकाटीने भौतिक व नैतिक सामर्थ्याने अधिक श्रेष्ठ होते व आहेत असे फार तर म्हणता येईल; पण केवळ एकाने दुसऱ्यास जिंकले म्हणून एक सर्वगुणसंपन्न व दुसरा अगदी नादान असे ठरत नाही.

हिंदुस्थानात इतक्या छप्पन्न जाती असता इतरांना जी गोष्ट साध्य झाली नाही ती मराठ्यांना साध्य झाली, इतरांना मोगलांविरुद्ध चळवळ करून जे यश आले नाहीं ते मराठ्यांना आले, इतरांना सर्व हिंदुस्थानभर स्वराज्य पसरण्याची जी कला साधली नाहीं ती मराठ्यांना साधली, या एका गोष्टीवरूनच मराठ्यांचे वैशिष्ट्य सिद्ध

होते ! " जेव्हां एकूणएक माणसाच्या हृदयांत राष्ट्रीय बुद्धीचे बीज पेरलें जाते, किंवा राष्ट्रीय स्वाभिमानाचा भक्कम व खोल पाया रचला जातो तेव्हांच असे अलौकिक पराक्रम घडून येतात ! राष्ट्रीय राजकारण म्हणून ज्यास नांव देतां येईल अशा प्रकारची एक विलक्षण वृत्तपरंपरा घडून आली त्यामुळेच मराठी राज्याची स्थापना झाली. " धर्म एक, भाषा एक, राजकीय विचारसरणी एक, सामुदायिक महत्त्वाकांक्षा एक, ध्येय एक, इत्यादि अंतःस्थ ऐक्यहेतूंना शत्रु एक, परिस्थिति एक, संकटे एक वगैरे बाह्य ऐक्यहेतूंची जोड मिळाल्याने मराठ्यांची जूट अधिक लवकर किंवा अधिक फलद्रूप झाली असेल, पण मराठी राष्ट्राचा मानसशास्त्रदृष्ट्या विचार करितांना त्यांत ही अंतःस्थ ऐक्य कारणे नव्हती असे मात्र कोणासहि म्हणता यावयाचे नाही. या कारणामुळेच त्यांना गतकाली इतके महत्त्व प्राप्त झाले आणि रा. ब. रानडे यांनी भविष्यकथनाच्या ऊर्मीत म्हटल्याप्रमाणे "कालेकरून राष्ट्रीयत्वाच्या तत्वानुसार हिंदुस्थान देशाचे भाग पडून त्या भागांची निरनिराळी स्वतंत्र संस्थाने बनून एकंदर हिंदुस्थानात बादशाही सत्तेच्या सामान्य सूत्राने ती सर्व एकत्र बद्ध होतील. अशा वेळी हिंदुस्थान देशात कोणकोणत्या गोष्टी साध्य करितां येतील आणि या देशाची योग्यता पुढील काळी कशी होईल याचा दूरवर विचार करू पाहणारास मराठ्याच्या इतिहासापासून पुष्कळ शिकावयाचे आहे. त्यांतहि विशेषतः हल्लीच्या मराठे लोकांना पुढील इतिहासात कोणता कार्यभार उचलावा लागणार आहे याच्या निर्णयाचे कामी मराठ्याचा इतिहास उपयोगी पडेल.'

## मराठ्यांची लष्करी व्यवस्था

कोणत्याहि राष्ट्राच्या इतिहासाचा अभ्यास करिताना प्रथमतः त्या राष्ट्रातील लष्करी सामर्थ्याकडे व लष्करी पराक्रमाकडे लक्ष जावे हे साहजिकच आहे. कारण, राज्ये मिळविण्याच्या किंवा राखण्याच्या कामी जी साधने उपयोगीं पडतात त्यात लष्करी सामर्थ्याचा दर्जा पहिला असतो यात शंका नाही. राजकारणाला बुद्धिबळांच्या खेळाची उपमा साजली तरी ती सर्वांशी समर्पक ठरत नाही. कारण, बुद्धिबळाच्या डावाला एक प्रकारच्या कायद्यांचे म्हणजे उभयपक्षी मान्य झालेल्या नियमांचें बंधन असते, म्हणून प्याद्याचा शह देऊन आपल्या राजाला प्रतिपक्षी अडवून धरू लागला असता, ज्याच्यावर डाव येतो तो मनुष्य प्रतिपक्षापेक्षां शरीरसामर्थ्याने प्रबळ असला तरी त्याचा हात धरून शह देऊं नको असे म्हणूं शकत नाहीं. तसेच राजकारणांत कांही काळपर्यंत खेळांतील नियमाप्रमाणें धर्म-न्याय-नीति-रीति यांचा अवलंब करण्यांत आला तरी, गोष्ट निकरावर आली असतां सर्व नियम बाजूस पडतात व केवळ मनगटाच्या जोरावर पुढील सर्व गोष्टींचा निकाल लागतो. अर्थात् ज्याची , तरवार त्याचें

राज्य हेच प्रायः खरे ठरते. नाना फडणविसाची तरवार केवळ मनसुब्याची होती हे खरे ! तरी पण प्रत्यक्ष खऱ्याखुऱ्या तरवारीशी तिची गांठ पडली तेव्हां तिला नमावेच लागले ! शिवाजी हा मुत्सद्दी होता; पण तो तरवारबहादूर नसता तर स्वराज्यसंस्थापनेस त्याची निव्वळ मुत्सद्देगिरी कितपत उपयोगी पडली असती ? असो.

पेशव्याची खडी फौज अशी फार थोडी असे. सरजामी किंवा तैनाती मराठी फौज बरीच होती. मराठी दौलतीचे मुख्य धनी सातारकर महाराज पण सातारकराजवळ त्याची अशी हजार दोन हजार इतकीहि फौज केव्हां असेल का नाही याची शंकाच आहे. इतमामाने त्यांच्या खालोखाल पेशवे; पण खास पेशव्यांची अशी फौज दहापांच हजारांहून जास्त नव्हती. पेशव्यांची मुख्य फौज म्हणजे हुजरात व खास पागा. तिची अमलदारी पेशव्यांनी नेमलेल्या एखाद्या आवडत्या सरदाराकडे असे.

पेशव्याच्या पदरचे सरदार, त्यानी ठेवण्याची फौज व फौजेकरिता दिलेली जहागीर याचा थोडासा तपशील काव्येतिहाससंग्रहांत प्रसिद्ध झालेल्या एका यादीवरून पुढे दिला आहे:—

| सरदार | फौज | | जहागीर | |
|---|---|---|---|---|
| मल्हारराव होळकर | २२ | हजार स्वार | ९५ | लक्ष जहागीर |
| आनंदराव पवार | १५ | ,, | ४५ | ,, |
| पटवर्धन–चिंतामण पांडुरंग<br>गंगाधर गोविंद | ३ | ,, | ११ | ,, |
| पटवर्धन परशुराम रामचंद्र | १॥ | ,, | ६॥ | ,, |
| पटवर्धन कुरुंदवाडकर | ३ | शे | २॥ | ,, |
| प्रतिनिधि | ५ | ,, | १४ | ,, |
| रास्ते | ३ | ,, | ११ | ,, |
| मुधोळकर घोरपडे | ८ | शे | ४ | ,, |
| पानसे | | तोफखाना | ३॥ | ,, |
| थोरात | ५ | शे | १। | ,, |
| भापकर | | दीडशे | ६० | हजार |
| हरिपंत फडके | ·० | | १ लक्ष ८० हजार | |
| नाना फडणवीस | ७ | शें | ४॥ लक्ष | |
| त्र्यंबकराव पेठे | १२ | शे | ७॥ लक्ष | |
| अक्कलकोटकर भोंसले | १ | हजार | ४॥ लक्ष | |
| सुल्तानराव | ५ | शे | १॥ लक्ष | |
| पुरंदरे | ३ | शें | २ लक्ष ३२ हजार | |

| सरदार | फौज | जहागीर |
|---|---|---|
| शेखमिरे | १॥ शें | ६० ,, |
| अंबेकर | | ८० ,, |
| सुल्तानजी भोसले ( खानदेश ) | २ शें | ७५ ,, |
| नायगांवकर | ५ शे | १ लक्ष ५० ,, |
| राजेबहादूर | ३ हजार | ९ लक्ष |
| विठ्ठलराव सुरर | ३ ,, | १२ लक्ष |
| खंडेराव वोडकर | ८ शे | २ लक्ष ४० हजार |
| अली बहादूर | १० हजार | २२ लक्ष |
| दाभाडे | ५ शे | १ लक्ष ३५ हजार |
| रघुजी भोसले ( नागपूर ) | २५ हजार | १ कोटी |
| गायकवाड | ५ ,, | ७२ लक्ष |
| इसलामपुरकर मंत्री | ३ शे | ७५ हजार |
| आंग्रे ( कुलाबा ) | | ३ लक्ष |
| सुमत | | २५ हजारं |
| चिटणवीस | | ७५ हजार |
| अमात्य | | १५ हजार |
| सचीव | | २ लक्ष ३२ हजार |
| राजाज्ञा | | ३० हजार |
| ( एकूण राजमंडळ १ कोटी ८० लक्ष ) | | |
| कोल्हापुरकर राजमंडळ | ३ हजार | ९ लक्ष २५ हजार |
| नाईक बारामतीकर | २ शे | १ लक्ष ६५ हजार |
| भोसले शंभुमहादेव | | ४५ हजार |
| निंबाळकर ( चार ठिकाणचे ) | | २ लक्ष ५७ हजार |
| सरदेशमुखी चौथाईबद्दल मुकर घासदाणा वगैरे— | | |
| सरंजामाबद्दल | | २० लक्ष |
| इतर सरंजाम | | २ लक्ष |
| दौलतराव शिंदे अलिजाबहादूर ऽ | २२ हजार | ९० लक्ष |
| घोरपडे मंडळी ( गुत्तीकर ) | | १४ लक्ष ६३ हजार |

स्वतः छत्रपति महाराजांनीं लढाईवर सेनापति म्हणून लष्कराबरोबर जाण्याचे दिवस शिवाजी संभाजीबरोबरच सपले. पेशवे मात्र नेहमीं स्वतः स्वारीवर

ऽसरंजामाशिवाय शिंदे होळकर पवार यांस पातशाही मुलुख सुभा दिल्ली अकबराबाद वगैरे सर केले त्यांची वाटणी दर शेकडा अनुक्रमे २२,२३,१०, द्यावयाची असून पेशव्यांकडे शेंकडा ४५ रहावयाची होती. त्याप्रमाणे शिंद्याचा हिस्सा २ कोटि ५ लक्षं.

जात, व ही पद्धत सवाईमाधवराव पेशव्यांपर्यंत टिकली होती. खर्ड्यांच्या लढाईला स्वतः सवाईमाधवराव गेले होते. दुसऱ्या बाजीरावानें मात्र जन्मांत लढाई पाहिली ती लांबून पाहिली व तीहि पळून जाण्याच्या बेतानें ! नाना फडणविसासारख्या मुत्सद्द्यासहि केव्हां केव्हां स्वारीवर जावें लागे. ब्राह्मणांची ही गोष्ट, मग मराठ्याविषयी बोलावयासच नको. मराठा म्हटला म्हणजे त्याला बहुधा रणांगणाचें बाळकडूच पाजलेलें असावयाचें. मराठी फौजेंत पायदळापेक्षां घोडदळाचा भरणाच अधिक असे. पहिल्यापासून मराठ्यांची लढण्याची पद्धतच अशी असे की, त्यांना पायदळापेक्षा घोडेस्वारांचाच उपयोग अधिक होई. तळ पाडून खदक खणून लढण्याची त्यांची रीति नव्हती. धीमेपणानें लढत बसणें हे त्यांच्या गुरूनें त्यांना कधी शिकविलेंच नव्हतें. शत्रु आटोक्यांत आला की त्यावजर दौड करून हल्ला चढवावा अगर घाला घालावा, व एका हल्ल्याच्या घावात जितके तुकडे पाडतां येतील तितके पाडावे; पण शत्रु आटोक्यांत येण्यासारखा नसेल किंवा आपणाहून अधिक प्रबळ असेल तर त्याजपासून फटकून दूर रहावें व त्याच्या आसपास घिरट्या घालून त्याची रसद मारून त्याला जेरीस आणावें असा त्यांचा परिपाठ असे. विशेष बिकट प्रसंग असल्यास ते किल्ला किंवा गढी अशा बळकट जागेचा आश्रय करून रहात. या सर्व गनिमी काव्याच्या लढाईच्या कामगिरीस घोडदळच विशेष उपयोगी पडणार हे सांगावयास नको.

मोगलांपर्यंत ही पद्धति त्यांना उपयोगी पडली; पण इंग्रजांशी युद्धप्रसंग येऊं लागल्यावर पायदळाची आवश्यकता त्यांना भासू लागली. पूर्वीच्या पद्धतीच्या युद्धांत तोफखान्याचें त्यांना कांहीं काम नसे. परंतु युरोपियनांशीं संबंध आल्यापासून त्यांना तोफखान्याकडे लक्ष द्यावें लागलें. खासपागा व शिलेदार असे घोडदळाचे मुख्य भाग असत. खासपागेच्या स्वारास घोडे व लढाऊ सरंजाम सरकारी असून त्यास महिनेमाल पगार मिळे. या स्वारांना बारगीर म्हणत. शिलेदार हे स्वतःचे घोडे ठेवून नोकरी करीत. लष्करी पेशाचे शिलेदार लोक सरकाराला कौल देऊन त्यांजकडून तनखा ठरवून घेऊन वेळीं मागणी होईल तेव्हां अमुक इतके घोडेस्वार पुरविण्याचा करार करीत. खासपागेच्या बारगिरास फक्त पोटगी म्हणून महिना ८ ते १० रु० पगार असे. शिलेदाराची पोटगी व त्याच्या घोड्याचा खर्च मिळून दरमहा ३५ रु. पगार मिळे. याशिवाय स्वारीवर लष्कर निघालें व मोहिम पुकारली गेली म्हणजे हौशी तरुण मराठे लोक आपापले घोडे घेऊन लष्करी नोकरीस निघत. त्यांचा दर्जा प्रतिष्ठित व जनावर चांगलें असल्यामुळें त्यांना सुमारें ४५ रु० पर्यंत पगार मिळे. पेंढारी हे घोडेस्वार असत; त्यांना ठराविक पगार नसे. ते अडप-झडप लुटीवरच आपला चारितार्थ प्रायः चालवीत. पेंढारी हे निव्वळ पोटभरू असत. लष्करी नोकरीचा अभिमान त्यांना नसे. युद्ध संपल्यानंतर लूट करण्याची परवानगी त्यांना

मिळाल्यास त्यांच्या लुटीपैकीं कांहीं ठराविक हिस्सा सरकारांत भरावा लागत असे. पण पेंढारी हे कोणासच प्रिय नसत. क्वचित्प्रसंगीं ते आपल्या पक्षाकडील सैन्याचा गोटहि संधि सांपडल्यास लुटीत. यामुळे होळकर वगैरे एकदोन सरदारांखेरीज आपल्या पदरीं पेंढार असे सहसा कोणी बाळगीत नसे. खडी पायदळ फौज किंवा पागा ही बारमहा नोकरीत असे. पण शिलेदार वगैरे इतर फौज तात्पुरती जमविलेली असून तिच्या नोकरीस ठराविक मुदत नसे. फार काय पण अशी फौज, मुख्य लष्कर स्वारीवर निघाले म्हणजे, आपल्या सोईप्रमाणे कोठे तरी केव्हां तरी त्यास जाऊन वाटेत मिळे; व उलट परत फिरण्याच्या बाबतीतहि ती केव्हां परत फिरू म्हणेल याचा नेम नसे ! दूरमुलखीं फौजा गेल्यास एकटादुकटा शिलेदार परत येणे शक्यच नसे. पण फौज परत फिरली म्हणजे कोणी तळ सोडून मागे रहावे अगर कोणी कोणास मागे टाकून पुढे निघून जावे याचा विधिनिषेध नसे. हजीरी म्हणून होई, पण खड्या फौजे-शिवाय इतरांची हजिरी म्हणजे ती आपली नांवाचीच हजिरी ! आपल्या पदरचा स्वार म्हणून मनुष्य व घोडा नगास नग दाखवून दिला म्हणजे हजिरीवाल्यास पुरे होई. वेळेवर घोडा दाखवितां न आला आणि तोबरा व पायबंद दाखविता आले तरी हजिरीचे काम भागे ! शिलेदार वगैरे लोकांना लढाईच्या कामा-खेरीज दुसरी कांही सरकारी कामगिरी नसे; एरवींच्या वेळी ते स्वतंत्र असत. मात्र लष्करांतील सर्वत्र लोकांना छबिन्याची नोकरी करावी लागे. व छबि-न्याच्या नोकरीची पाळी बऱ्याच वरच्या दर्जाच्या सरदारापर्यंत पोचत असे. भाला बोथाटी तरवार व बंदुक ही चालविण्यास शिकविण्याच्या शाळा नसत. या गोष्टीचे मराठे लोकांना उपजतच शिक्षण असे असें म्हटले असता चालेल. या सर्व गोष्टी प्रत्यक्ष हाताने करूनच करावयास येतात तशा त्या मराठी सैनिकांनाहि येत असत. तथापि शिक्षणाच्या लष्करी शाळा व शिस्तीची कवा-इत नसल्यामुळे मराठ्यांच्या लष्करी गुणाच्या उपयुक्ततेत कमीपणा भरला होता तो त्यांना पुढे पुढे जाणवूं लागला. लष्करभरतीला माणसे व घोडीं यांची वाण मात्र मराठ्यांस कधींच पडली नाहीं. सुगीच्या दिवसांत कुरणांत घोडीं सोडून द्यावयाचीं व जातिवंत मादवाऱ्या बाळगून घोड्यांच्या पागा तयार करावयाच्या हेंच शिलेदार लोकांचें काम असे. सर्वत्र खेळ घोड्यांचा असल्या मुळें गरिबापासून श्रीमंतापर्यंत उमदीं घोडी पदरीं बाळगण्याचा सर्वांनाच एक प्रकारचा शोक असे; आणि दारांत घोडें नाहीं असे घर नाहीं व घोड्यावर बसतां येत नाहीं असें घरांत मनुष्य नाहीं अशी महाराष्ट्राची स्थिति एक वेळ होती ! भीमा व गोदावरी या नद्यांच्या कांठचीं तट्टें खंबीर असून तीं भारी मजला मारीत. पण देखण्या किंवा उमद्या घोड्यांची पैदास महाराष्ट्रांत होत नसे. ही उणीव घोड्यांचे सौदागर भरून काढीत. काबुली अफगाणी अरबी

जात, व ही पद्धत सवाईमाधवराव पेशव्यांपर्यंत टिकली होती. खर्ड्याच्या लढाईला स्वतः सवाईमाधवराव गेले होते. दुसऱ्या बाजीरावाने मात्र जन्मांत लढाई पाहिली ती लांबून पाहिली व तीहि पळून जाण्याच्या बेताने ! नाना फडणविसासारख्या मुत्सद्द्यासहि केव्हां केव्हां स्वारीवर जावे लागे. ब्राह्मणांची ही गोष्ट, मग मराठ्याविषयी बोलावयासच नको. मराठा म्हटला म्हणजे त्याला बहुधा रणांगणाचे बाळकडूच पाजलेले असावयाचे. मराठी फौजेत पायदळापेक्षां घोडदळाचा भरणाच अधिक असे. पहिल्यापासून मराठ्यांची लढण्याची पद्धतच अशी असे कीं, त्यांना पायदळापेक्षा घोडेस्वारांचाच उपयोग अधिक होई. तळ पाडून खदक खणून लढण्याची त्याची रीति नव्हती. धीमेपणाने लढत बसणे हे त्यांच्या गुरूने त्यांना कधी शिकविलेच नव्हते. शत्रु आटोक्यांत आला की त्यावजर दौड करून हल्ला चढवावा अगर घाला घालावा, व एका हल्ल्याच्या घावात जितके तुकडे पाडतां येतील तितके पाडावे; पण शत्रु आटोक्यांत येण्यासारखा नसेल किंवा आपणाहून अधिक प्रबळ असेल तर त्याजपासून फटकून दूर रहावें व त्याच्या आसपास घिरट्या घालून त्याची रसद मारून त्याला जेरीस आणावे असा त्यांचा परिपाठ असे. विशेष बिकट प्रसग असल्यास ते किल्ला किंवा गढी अशा बळकट जागेचा आश्रय करून रहात. या सर्व गनिमी काव्याच्या लढाईच्या कामगिरीस घोडदळच विशेष उपयोगी पडणार हे सांगावयास नको.

मोगलापर्यंत ही पद्धति त्यांना उपयोगी पडली, पण इंग्रजांशी युद्धप्रसग येऊ लागल्यावर पायदळाची आवश्यकता त्यांना भासू लागली. पूर्वीच्या पद्धतीच्या युद्धांत तोफखान्याचे त्यांना कांहीं काम नसे. परंतु युरोपियनांशीं संबंध आल्यापासून त्यांना तोफखान्याकडे लक्ष द्यावे लागलें. खासपागा व शिलेदार असे घोडदळाचे मुख्य भाग असत. खासपागेच्या स्वारास घोडे व लढाऊ सरंजाम सरकारी असून त्यास महिनेमाल पगार मिळे. या स्वारांना बारगीर म्हणत. शिलेदार हे स्वतःचे घोडे ठेवून नोकरी करीत. लष्करी पेशाचे शिलेदार लोक सरकाराला कौल देऊन त्यांजकडून तनखा ठरवून घेऊन वेळीं मागणी होईल तेव्हां अमुक इतके घोडेस्वार पुरविण्याचा करार करीत. खासपागेच्या बारगिरास फक्त पोटगी म्हणून महिना ८ ते १० रु० पगार असे. शिलेदाराची पोटगी व त्याच्या घोड्याचा खर्च मिळून दरमहा ३५ रु. पगार मिळे. याशिवाय स्वारीवर लष्कर निघालें व मोहिम पुकारली गेली म्हणजे हौशी तरुण मराठे लोक आपापले घोडे घेऊन लष्करी नोकरीस निघत. त्यांचा दर्जा प्रतिष्ठित व जनावर चांगलें असल्यामुळें त्यांना सुमारें ४५ रु० पर्यंत पगार मिळे. पेंढारी हे घोडेस्वार असत; त्यांना ठराविक पगार नसे. ते अडप-झडप लुटीवरच आपला चारितार्थ प्रायः चालवीत. पेंढारी हे निव्वळ पोटभरू असत. लष्करी नोकरीचा अभिमान त्यांना नसे. युद्ध संपल्यानंतर लूट करण्याची परवानगी त्यांना

मिळाल्यास त्यांच्या लुटीपैकी कांहीं ठराविक हिस्सा सरकारांत भरावा लागत असे. पण पेंढारी हे कोणासच प्रिय नसत. क्वचित्प्रसंगीं ते आपल्या पक्षाकडील सैन्याचा गोटहि साधि सांपडल्यास लुटीत. यामुळे होळकर वगैरे एकदोन सरदाराखेरीज आपल्या पदरीं पेंढार असे सहसा कोणी बाळगीत नसे. खडी पायदळ फौज किंवा पागा ही बारमहा नोकरीत असे. पण शिलेदार वगैरे इतर फौज तात्पुरती जमविलेली असून तिच्या नोकरीस ठराविक मुदत नसे. फार काय पण अशी फौज, मुख्य लष्कर स्वारीवर निघाले म्हणजे, आपल्या सोईप्रमाणे कोठे तरी केव्हां तरी त्यास जाऊन वाटेत मिळे, व उलट परत फिरण्याच्या बाबतीतहि ती केव्हां परत फिरू म्हणेल याचा नेम नसे ! दूरमुलखी फौजा गेल्यास एकटादुकटा शिलेदार परत येणे शक्यच नसे. पण फौज परत फिरली म्हणजे कोणी तळ सोडून मागे रहावें अगर कोणी कोणास माग टाकून पुढे निघून जावें याचा विधिनिषेध नसे. हजीरी म्हणून होई, पण खड्या फौजे-शिवाय इतरांची हजिरी म्हणजे ती आपली नांवाचीच हजिरी ! आपल्या पदरचा स्वार म्हणून मनुष्य व घोडा नगास नग दाखवून दिला म्हणजे हजिरीवाल्यास पुरे होई. वेळेवर घोडा दाखविता न आला आणि तोबरा व पायबंद दाखविता आले तरी हजिरीचे काम भागे ! शिलेदार वगैरे लोकांना लढाईच्या कामा-खेरीज दुसरी कांहीं सरकारी कामगिरी नसे; एरवींच्या वेळी ते स्वतंत्र असत. मात्र लष्करांतील सर्वत्र लोकांना छबिन्याची नोकरी करावी लागे. व छबि-न्याच्या नोकरीची पाळी बऱ्याच वरच्या दर्जाच्या सरदारापर्यंत पोंचत असे. भाला बोथाटी तरवार व बंदुक हीं चालविण्यास शिकविण्याच्या शाळा नसत. या गोष्टीचे मराठे लोकांना उपजतच शिक्षण असे असे म्हटले असता चालेल. या सर्व गोष्टी प्रत्यक्ष हाताने करूनच करावयास येतात तशा त्या मराठी सैनिकांनाहि येत असत. तथापि शिक्षणाच्या लष्करी शाळा व शिस्तीची कवा-इत नसल्यामुळे मराठ्यांच्या लष्करी गुणाच्या उपयुक्ततत कमीपणा भरला होता तो त्यांना पुढे पुढे जाणवूं लागला. लष्करभरतीला माणसें व घोडी यांची वाण मात्र मराठ्यांस कधींच पडली नाहीं. सुगीच्या दिवसांत कुरणांत घोडीं सोडून द्यावयाचीं व जातिवंत मादवान्या बाळगून घोड्यांच्या पागा तयार करावयाच्या हेंच शिलेदार लोकांचें काम असे. सर्वत्र खेळ घोड्यांचा असल्या मुळें गरिबापासून श्रीमंतापर्यंत उमदीं घोडी पदरीं बाळगण्याचा सर्वांनाच एक प्रकारचा शोक असे; आणि दारांत घोडें नाहीं असें घर नाहीं व घोड्यावर बसतां येत नाहीं असें घरांत मनुष्य नाहीं अशी महाराष्ट्राची स्थिति एक वेळ होती ! भीमा व गोदावरी या नद्यांच्या कांठचीं तट्टें खंबीर असून तीं भारी मजला मारीत. पण देखण्या किंवा उमद्या घोड्यांची पैदास महाराष्ट्रांत होत नसे. ही उणीव घोड्यांचे सौदागर भरून काढीत. काबुली अफगाणी अरबी

तिबेटी काठेवाडी वगैरे जातिवंत घोडे फेरीवाले सौदागर मोठमोठ्या शह-रांतून विकावयास घेऊन जात; व दरेक श्रीमंताच्या पागेत असा एकादातरी घोडा पाहावयास सांपडेच.

पायदळांत मराठ्यांपेक्षां इतर जातींचा भरणाच विशेष असे. मराठ्यांच्या सैन्यांतून मुसलमान लोकांस सर्रास चाकरीस ठेवण्यांत येत असे; इतकेंच नव्हे तर, त्यांना मोटमोठ्या अधिकाराच्या जागाहि देण्यांत येत असत. हल्लीं इंग्रजी राज्यात तोफखान्यामध्ये हिंदी सैनिकांचा चुकून सुद्धां प्रवेश होऊं शकत नाहीं. मराठी राज्यांत एके वेळीं सगळा तोफखाना मुसलमानांच्या स्वाधीन होता. मुसलमानांशिवाय अरब व हिंदुस्थानी म्हणजे परदेशी पुरभय्ये वगैरे लोकांचा भरणा पायदळांत विशेष असे. दक्षिणेतील मराठे लोक उत्तरहिंदुस्थानांत जाऊन कोणत्याहि राजाच्या पदरीं लष्करी नोकरीत राहिल्याचे नमूद नाही. फार काय पण महादजी शिंद्यानें नर्मदेच्या उत्तरतीरीं कायमची वस्ती करून राज्य स्थापल्यावर त्याला पदरी ठेवण्यास हवे इतके मराठे शिपाई स्वार मिळाले नाहींत, म्हणून त्याला सैन्याची भरती हिदुस्थानी लोकांतूनच करावी लागली. याच्या उलट मराठ्यांना आपल्या लष्करांत शिपाईगिरी करण्यास अरब पुरभय्ये गोसावी यांची वाण केव्हाच पडली नाहीं. मराठ्यांच्या नोकरपेशात व या लोकांच्या नोकरपेशांत बराच फरक असे. मराठा हा एकंदरीनें इमानी असला तरी हिंदुस्थानी शिपायासारखा तापट तल्लख कडवा व अविचारी नसतो. अर्थात् जेथे खडी नोकरी करावयाची असेल किंवा बरहुकूम बेधडक तरवार चालवावयाची असेल तेथे मराठ्यापेक्षां हिंदुस्थानी शिपायाचाच उपयोग अधिक; म्हणून तेव्हांचे सरदार लोक किंवा श्रीमंत सावकारहि शरीरसरक्षणार्थ किंवा खजीना वगैरे सभाळण्यास शिपाई ठेवावयाचे ते अरब किंवा परदेशीच ठेवीत. हे परके शिपाई आपला मुलूख व घरदार सोडून दूरदेशी नोकरीच्या मागे आल्यामुळे व त्यांचे ऋणानुबंध इकडे नसल्यामुळें अष्टौप्रहर नोकरीशिवाय त्यांना दुसरे व्यवधानच नसे. याच्या उलट मराठा शिपाई म्हटला म्हणजे त्याच्यामागे घरदार कुटुंब शेतवाडी गुरेढोरे याचा थोडाना थोडा तरी व्याप असावयाचा. यामुळे मराठा शिपाई कितीहि इमानी असला तरी त्याच्या नोकरीत थोडाना थोडा तरी अतराय हा यावयाचाच. शिवाय मराठा शिपाई हा विचारी व मनाचा थोडासा कोंवळा असल्यामुळें त्याचें भय शत्रूस वाटावे तितके सहजच वाटत नाहीं. परदेशी शिपाई नोकरीस ठेवण्याची मराठ्यांची ही चाल पुढे पुढें इतकी बळावली की, थोरामोठ्यांच्या खास नोकरींत मराठे शिपाई दिसेनासे झाले. प्रत्येक श्रीमताच्या देवडीवर पहारा अरबांचा. नाना फडणवीस बाजीरावशाहींत महाडास जीव बचावण्याकरितां पळून गेला तो अरबांच्याच भिस्तीवर. बडोद्यास तर अरबांचें प्रस्थ

इतके माजले होते कीं, त्यांचें बंड मोडून त्यांच्या पाशांतून गायकवाडांना मुक्त करण्यास इंग्रजांना सक्त श्रम करावे लागले. गायकवाड सरकारास कर्ज लागलें असतां संस्थानच्या वसुलाचीहि हमी दिलेली पुरत नसे; पण अरब सरदाराच्या शब्दाची जामिनकी पुरे होई ! याला 'बहांदरी' म्हणत व गायकवाडी का भारातले ते एक प्रकरणच होऊन राहिलें होतें. दुसरा बाजीराव पळत असता अखेर उत्तरहिंदुस्थानांत त्याच्याजवळ जें सैन्य उरलें त्यांत अरब हेच प्रमुख होते. पण बाजीराव जेव्हां इंग्रजाच्या स्वाधीन झाला तेव्हां आपल्या पगाराच्या बाकीबद्दल त्यांनीं बंड करून बाजीरावास कैदेत ठेवलें व जनरल स्मिथ यानें मध्यस्थी केली नसती तर ते त्या वेळीं त्याचा प्राणहि घेते ! नागपूरच्या आप्पासाहेब भोसल्यास पदच्युत केल्यावर शांतता प्रस्थापित करण्याच्या वेळीं तेथील अरब सैन्य काढून लावण्याचीच मुष्कील पडली. अद्यापिहि दक्षिण हैदराबादेस सामान्य देशी मुसलमानापेक्षां अरबांचेंच प्राबल्य शिपाइगिरीच्या कामीं अधिक दिसून येतें. जी गोष्ट अरबाची तीच पुरभय्याची. या लोकाचा तापटपणा धन्यावर उलटण्यास वेळ लावीत नाही, व इमानाच्या फशी ते कसे पडतील याचाहि नेम नाहीं. गारद्यामध्ये परदेशांचा भरणा पुष्कळ होता. सुमेरसिंग खरकसिंग वगैरे नारायणराव पेशव्याचे मारेकरी गारद्यांपैकीच होते. आज इंग्रज सरकार लष्करी पलटणींतून विदेशी लोकाचा भरणा करतें अशी आपली तक्रार आहे; पण ही तक्रार मराठेशाहीत मुळींच नव्हती असे नाहीं. अर्थात् याला दुसरीहि बाजू आहे. ती अशी कीं, आज हिंदी लोकांचा वरिष्ठ लष्करी नोकरींत समावेश मुळींच होत नाहीं, तो पूर्वीं सर्वस्वी होत होता, व केवळ मराठे सैनिक येतील तितके घेऊनहि त्यांच्या हातून चांगलेंसें बजावलें न जाणारें असें उरलेलें विशिष्ट प्रकारचें काम परदेशी वगैरे लोकास देण्यात येत असे. तथापि केवळ नोकर म्हणून कां होईना पण परदेशी लोक इतक्या मोठ्या प्रमाणावर नोकरीस ठेवण्यांत येत व ही एका अर्थानें चूकच म्हटली पाहिजे.

कवाइती पायदळाचा व तोफखान्याचा उपयोग भाऊसाहेब पेशव्यांच्या सरदारकींत मोठ्या प्रमाणावर प्रथम करण्यांत आला. पानपतास गनिमी काव्याचें धोरण मराठ्यांनीं प्रथम बाजूस ठेवलें व मैदानांत उभे राहून छातिठोकपणानें लढण्याची बुद्धि सदाशिवरावभाऊस झाल्यामुळें त्यास पानपतच्या लढाईत अपयश आलें असा एक प्रवाद आहे. तथापि त्या लढाईत इब्राहिमखान गारद्याच्या फौजेनें बरीच चांगली कामगिरी बजाविली यांत शंका नाहीं. व पुढें कवाइती फौजेची ही पद्धत महादजी शिंद्यानें तर चांगलीच यशस्वी करून दाखविली. कवाइती फौजला लागणारी शिस्त मराठ्यांना अप्रिय असल्यामुळेंच कदाचित् या फौजेत मराठेतरांचा भरणा विशेष

होत असेल. पण फौजेंत कोणीहि असो, महादजीच्या सुधारलेल्या पद्धतीमुळेंच त्याचा पाय टिकला व दरारा बसला. महादजीने ही विद्या युरोपियन लोकांपासून उचलली. तो हिंदुस्थानांत असल्यामुळे कंपनीसरकारच्या पदरच्या कवाइती फौजेची करामत पहावयाचे प्रसंग त्याला आले; व त्याची महत्त्वाकांक्षा मोठी असल्यामुळे लष्करी सामर्थ्याचे हें साधन त्याने तावडतोब उपयोगांत आणलें. सुदैवाने फ्रेंच शिपाई व मुत्सद्दी डिबॉइन याची व महादजीची गाठ पडल्यामुळे महादजीचा कार्यभाग त्याच्या मनाजोगा साधला आणि अवघ्या दहापधरा वर्षांच्या अवधींत महादजीने डिबॉइनच्या मदतीने कवाइती पलटणेच काय पण लहानमोठी हत्यारें बनविण्याचा व तोफा ओतण्याचा कारखानाहि आग्रा येथे काढला ! वडगांव व खर्डा येथील लढायांत शिंद्याच्या तोफखान्याचा व कवाइती पलटणांचा उपयोग विशेष झाला. महादजी नंतर होळकराने ही विद्या उचलली व यशवंतराव होळकराचे अखेरचे दिवस म्हणजे तो वेडा होण्याच्या आधीचे दिवस, कवाइती पलटणी बनविण्यांत व तोफांचे कारखाने काढण्यांत गेले. इंग्रजाप्रमाणे फ्रेंचहि कवाइतीचे भोक्ते असल्यामुळे दक्षिणहिंदुस्थानांत निजाम वगैरेंच्या फौजेंतूनहि कवाइती पलटणांचा समावेश झाला होता टिपूनेहि ही विद्या उचलली होती. १७६३ च्या पूर्वी इंग्रजांशीं फ्रेंचांची स्पर्धा व युद्ध सुरू होते ते बरेचसे एतद्देशीय राजेरजवाड्यांचे मदतीने सुरू होते; आणि या सालानंतर म्हणजे फ्रेंचांचे राज्य स्थापनेचे मनोरथ ढासळल्यावरहि शक्य तर एतद्देशीय राजेरजवाड्यांच्या हातून त्यांना इंग्रजांवर सूड घ्यावयाचा होता यामुळे, स्वतःच्या पदरीं कवाइती पलटणें ठेवण्याचे दिवस संपले तरी, मराठे सरदारांचे पदरीं राहून त्यांच्या पलटणीस कवाइत शिकवून त्यांना युद्धविद्येत तरबेज करण्याची फ्रेंचांची इच्छा कायमच राहिली. डिबॉइनच्या मदतीने शिंद्याने २० हजार पायदळ १० हजार नजीब ( बंदुकवाले शिपाई ) ३ हजार तुरुकस्वार व भरभक्कम तोफखाना तयार केला. पेशव्यांच्या पदरच्या शिलेदारांचे हाल पाहून महादजीने आपल्या पदरच्या शिपायांस रोख तनख्वा वेळच्या वेळेस मिळेल अशी व्यवस्था केली. या सर्व कारणांमुळे एकंदर मराठेशाहींत महादजीचे वर्चस्व स्थापले गेले. शिंद्यांच्या फौजेचा खर्च पुढे अंदमासाबाहेर गेला ही गोष्ट वेगळी. कारण, बाजीरावास गादीवर बसविण्याच्या धामधुमीच्या वेळीं फक्त दक्षिणेतच शिंद्यांची एवढी फौज होती कीं, तिचाच खर्च दरमहा २५ लक्षांचा होता; व मुख्यतः हा खर्च भागविण्याकरिताच पुण्यातील नागरिकांनी नाहक छळ सोसले ही गोष्ट प्रसिद्धच आहे.

घोडदळाच्या मानाने पायदळ कमी खर्चाचें असतें. घोडदळ मागें पडून पायदळाचा उपयोग जसजसा अधिक होऊं लागला, तसतशी मराठ्यांस बंदुकांची

जरूरी अधिक भासूं लागली. पण मराठी सैन्यास पुरतील इतक्या बंदुका मराठ्यांच्या कारखान्यांत तयार होणें शक्य नव्हतें. मराठ्यांचा व इंग्रजांचा संबंध आल्यापासून, कंपनीकडून इतर मालाबरोबर मराठे बंदुकाहि विकत घेऊं लागले; व कंपनीहि त्या व्यापारी दृष्टीने त्यांस पुरवूं लागली. पुढे पुढे कंपनीचे व मराठ्यांचे युद्धप्रसंग सुरू झाले. तेव्हां कंपनीने या बाबतीत सहजच हात थोडा आंखडता धरला, आणि बंदुकांची मराठ्यांची मागणी कंपनी सर्रास पुरवीनाशी झाली. अखेर कंपनीने असा नियम केला कीं, आपल्या फौजेच्या हातच्या बंदुका निकामी होऊन परत आल्या म्हणजे त्या मराठ्यांच्या हातीं जाऊं नयेत म्हणून त्यांच्या नळ्या तोडून त्या विलायतेस पाठविण्यांत याव्या! कारण कंपनीचे बंदुकांचे कारखाने हिंदुस्थानात नसत. हत्यारांचा पुरवठा बहुतेक विलायतेहून होई. पण कंपनीच्या कित्येक अधिकाऱ्यास ही पद्धत मुळीच पसंत नव्हती. ते म्हणत की, "कंपनीने बंदुका विकण्याचे बंद केल्यास मराठ्यांना जरूरीमुळे स्वतःचे कारखाने काढण्याची बुद्धि होईल. व शिंद्यांने असे कारखाने काढून उदाहरण घालूनहि दिले आहे. कंपनीने नियम केले तरी पुष्कळशा बंदुका चोरूनमारून विकल्या जाणारच. किंमत चांगली आल्यावर कोण सोडतो? मग चोरी होऊन व्यक्तीचा फायदा होण्यापेक्षा कंपनीनेच भारी किंमत घेऊन त्या स्वतः विकून आपला फायदा का करून घेऊ नये? शिवाय निरुपयोगी बंदुका घेऊन मराठे लढूं लागले तर कंपनीचे आयतेच झाले. कारण, कंपनीच्या शिपायांच्या हातीं चांगल्या नव्या बंदुका राहणार व मराठ्यांच्या हातीं जुन्या निरुपयोगी अशा राहणार! अर्थात् उभय पक्षाच्या सैन्याची लढाई होण्याची वेळ आल्यास कंपनीच्या शिपायांना लांबून मारा करितां येईल, व मराठ्यांच्या हातातल्या बंदुका कमी पल्ल्याच्या असल्यामुळे त्यांना कंपनीच्या शिपायांवर मारा करितां येणार नाही. निरुपयोगी बंदुका विलायतेस पाठविण्याला जहाजांतून जी जागा अडावयाची ती न अडतां तितका अधिक व्यापारी माल विलायतेस नेतां येईल व मराठे जुन्या बंदुका घेऊन बसतील; असे आयतं दुहेरी काम होईल. हातीं बंदुका पडूं लागल्यास मराठे पायदळाकडे अधिक ओढा ठेवतील व असे झाले असतां त्यांचे घोडदळाचे सैन्य कमी कमी होईल. मराठ्यांचे घोडदळ बिनशिस्तीचे असलें तरी फार त्रासदायक असते. घोडदळाशीं लढतांना समोरासमोर छातीठोक मैदानीं लढाई न होतां युद्ध विनाकारण लांबते; आणि पायदळाशीं लढाई व्हावयाची तर चांगल्या पल्लेदार बंदुकांमुळें कंपनीच्या पायदळालाच जय मिळण्याचा संभव अधिक. युरोपांत तह असतां हिंदुस्थानांत इतर राष्ट्रांतून बंदुका वाटतील तितक्या येतील; टिपू सुलतान तर त्या नेहमीं आणवीत असतो. इतर राष्ट्रें हा व्यापार करण्याची थांबणार नाहींत; मग इंग्लंडने आपलाच

तेवढा व्यापार कां बुडवावा?" कंपनीच्या हिताच्या दृष्टीनें वरील युक्तिवादांत बरेंच तथ्य होतें पण तें कसेंहि असो; मराठे बंदुकांच्या बाबतीत बरेचसे परावलंबी होते ही गोष्ट निर्विवाद आहे.

बंदुकांप्रमाणें मराठ्यांच्या कारखान्यांत तोफा व दारूगोळाहि थोडाबहुत तयार होत असे. बंदुकीच्या दारूचा मसाला उत्तम असे; पण तो मिसळण्याचें प्रमाण सशास्त्र नसल्यानें दारू व्हावी तशी चांगली होत नसे. तोफा बऱ्या असत; पण त्याचे गाडे लवकरच खिळखिळे होत व चाकें झिजून वेडीं-वांकडीं होत. तोफा गोळ्यांच्या प्रमाणानें न ओततां गोळे तोफांच्या तोंडाच्या मापाचे करीत. गोळे ओतीव नसत, घडीव असत. ते हातोड्यानें ठोकून वाटेल त्या आकाराचे बनवीत. पण यामुळें त्यांना टोकें व कोंचा राहून जात, व म्हणून तोफांचीं तोंडें लवकरच खराब होत. स्वारीबरोबर तोफखाना असे, पण खरी भिस्त त्यावर नसे. बाणाचाहि उपयोग मराठे करीत. बंदुकीच्या बागनेटाचा उपयोग प्रथम शिंद्याच्या फौजेंत होऊं लागला. भाला व तरवार हींच मराठ्यांची मुख्य हत्यारें होतीं.

मराठ्यांच्या लष्कराचा तळ पडला म्हणजे तेथेंच जवळ बाजार बसत असे. पुढील मुक्कामाची दौंडी पिटविल्यानें बाजारांत पुकारणी म्हणजे ती सर्व सैन्याला पोंचली असें समजण्यांत येई. लष्करांबरोबर खासा स्वारी असली म्हणजे बरेंच वैभव दिसे. हौद्याचे हत्ती कोतवाल घोडे पालख्या मेणे वगैरे सरंजाम बरोबर असावयाचाच. खाशाचे व सरदारांचे तंबू शोभिवंत असत. मुख्य सरदाराच्या तंबूपुढें दररोज संध्याकाळीं देवडीवर दरबार भरून सर्व सरकारी कामकाज व्यवस्थितपणें चाले. वाटेल त्या मनुष्यानें यावें व सरदाराची मुलाखत खुशाल घ्यावी असा शिरस्ता असे. तत्कालीन युरोपियन लोकांना मराठ्यांचें हें साधें वैभव पाहून कौतुक वाटे, आणि मिजासखोर मोगलांशीं तुलना करितां मराठे त्यांना विशेषच साधे वाटत. कदाचित् या साधेपणामुळेंच मराठ्यांना तळ तावडतोब हालवून लांब लांब मजला मारितां येत असत. हवा भलीबुरी कशीहि असो, जेवण भरपूर मिळो न मिळो, ज्वारीचीं कणसें हातावर चोळून खात खात त्यांची ठराविक मजल बहुधा पुरी होई. बरोबर तोफखाना असला तरी घोडेस्वार अघाडीस दौड मारून तोफांच्या गाड्यांना ओढण्याकरितां बैल गांवगन्ना हांकून काढीत. दररोज बारा मैलांचा मुक्काम सहज होई. मराठे सैन्याबरोबर सरकारी कोठी अशी कधींच बाळगीत नसत. वाणी उदमी वंजारी हे लष्कराच्या अघाडीस अनेक मजला आपले तांडे व नोकर पाठवून गांवगन्ना धान्य खरेदी करून बाजार भरविण्याची तयारी करीत; व गांवांतील दरापेक्षां लष्करी बाजारांत सव्वापट दाम घ्यावा अशी त्यांस परवानगी असे.

मराठ्यांनीं कवाइती फौजेची पद्धति युरोपियनांपासून घेतली, तिजबरोबर त्यांना युरोपियन अधिकारीहि घ्यावे लागले. या अधिकाऱ्यांचे तनखे भारी असत. शिंद्याच्या पदरचा डिबॉईन हा तर जहागीरदारच बनला होता. त्याच्या मागून आलेला सेनापति कर्नल पेरन यास दरमहा पांच हजार रुपये पगार असे ! एक ते तीस हजार पगाराचेहि कांहीं गोरे अधिकारी होते. पगाराशिवाय या लोकाना इतरहि मिळकत असे. होळकराच्या पदरच्या युरोपियन सेनापतीला आणि बाजीरावाच्या पदरच्या युरोपियन अधिकाऱ्याला दरमहा तीन तीन हजार रुपये पगार असे. निजामाच्या पदरचा सेनापति मॉ. रेमंड यास सैन्याच्या खर्चाकरिता तीस लक्षाची जहागीर होती ! सन १७९६ च्या सुमारास सर्व हिंदु व मुसलमान सरदाराच्या पदरीं मिळून सुमारे तीनशे युरोपियन असावे असा अंदाज आहे. पैकीं सात आठ मोठ्या हुद्द्यांवर, सुमारे ६० दुय्यम प्रतीच्या अधिकारावर व बाकी कोणी सार्जंट कोणी गोलंदाज असे असत बराचसा भरणा फ्रेंचांचा असे. इंग्रज कंपनीच्या लष्करातून पळून आलेले, जहाजावरील नोकरी सोडून इकडेच राहिलेले असेहि अनेक लोक असत. अशा लोकाना तीसपासून साठपर्यंत पगार असे. या असामी म्हणजे गाळीव बदमाषापैकीच बहुधा असावयाच्या; पण लष्करी नोकरीला अशीच माणसे उपयोगी पडत. कवाइती फौजाकडे मराठ्याचे लक्ष लागल्यापासून युरोपियन नोकर ठेवण्याची मराठ्यांची प्रवृत्ति वाढली, व कांहीं कांहीं बाबतींत स्वतः मराठ्यापेक्षा गोऱ्या लोकाना सरकारकडून सवलती अधिक मिळू लागल्या. या गोऱ्या लोकाकरिता विलायतेहून येणाऱ्या मालावरील जकात माफ होऊं लागली. दरबारांत खुद्द यजमानाशिवाय इतरांस पालखीची मनाई असे. पण गोऱ्याना पालखीची मुभा मिळू लागली ! निजामाच्या दरबारीं पिवळा हौदा हत्तीवर कोणी घालावयाचा नाहीं असा निर्बंध असे; पण गोऱ्या लोकाना तो लागू होईनासा झाला. गोऱ्या लोकांचे सामानसुमान वाहून नेण्याला बिगार बिनतक्रार मिळू लागली.

अनुकरण हा स्तुति करण्याचाच एक प्रकार होय अशी म्हण आहे. या दृष्टीने पहातां शिंद्यासारख्या प्रमुख व प्रबळ मराठा सेनापतीने युरोपियन लोकांची लष्करी पद्धति स्वीकारली व तिजकरितां आपल्या पदरीं भारी पगाराचे युरोपियन ठेवले, यावरून त्या पद्धतीत व त्या लोकांत अनुकरणीय व स्तुतीला पात्र असे कांहीं तरी आहे अशी त्याने गर्भित समतिच दिली असे ठरतें. पण जो मनुष्य दुसऱ्याची स्तुति करितो तो वागण्यांत त्या दुसऱ्याला थोडा तरी वचकून वागूं लागतो ! महादजी सर्व शत्रूत इंग्रजांनाच थोडा वचकून वागत असे; रजपूत मुसलमान किंवा रोहिले यांची त्याने कधींच पर्वा केली नाहीं. फ्रेंचांच्या साहाय्यानें आपल्या लष्करी पद्धतीचा उणेपणा भरून काढून इंग्र-

जाशीं टक्कर देण्याचा त्याचा विचार होता. व या उपक्रमांत त्याला थोडेंबहुत यशहि येऊं लागले होतें. प्रथम महादजीच्या व इंग्रजांच्या थोड्याबहुत लढाया झाल्या त्यांत एकंदरीनें ते परस्पर तुल्यबळ असेच ठरले. म्हणून इंग्रजांनींहि त्याच्या हयातींत शिंद्याची उत्तरहिंदुस्थानांतील सत्ता ग्रासण्याचा प्रयत्न केला नाहीं. पण महादजी शिंदा वारल्याबरोबर त्यांना सारे रान मोकळें झालें! दौलतराव शिंदा पुण्याची सत्ता आपल्या हाती ठेवण्याकरितां पुण्यास तळ देऊन बसला; व बसल्या बसल्या त्याने बदसल्लागारांच्या सल्ल्याने नाही नाही त्या कुरापती काढल्या. त्याचा प्रतिस्पर्धी होळकरहि त्याच अभिनिवेशाने पुण्यास आला. या दोन कारणात बाजीरावाच्या कलिमूर्तीची भर पडून अखेर मराठेशाहीस त्रिदोष बाधला. या आपत्तीच्या सुमारास मुख्य मराठे सरदारांची मिळून फौज मोजली तर ती इंग्रजांच्या फौजेपेक्षां संख्येने पुष्कळच अधिक भरली असती. एका इंग्रज ग्रंथकाराच्या अंदाजाप्रमाणे ही फौज पुढील प्रमाणे वांटली गेली होती.

| | घोडेस्वार | पायदळ | एकूण |
|---|---|---|---|
| पेशवे | ४०००० | २०००० | ६०००० |
| शिंदे | ६०००० | ३०००० | ९०००० |
| भोसले ( नागपूर ) | ५०००० | १०००० | ६०००० |
| होळकर | ३०००० | ४००० | ३४००० |
| गायकवाड | ३०००० | | ३०००० |
| | | | २७४००० |

या मानाने इंग्रजाची फौज बरीच कमी होती असे म्हणावे लागते.

अठराव्या शतकांत हिंदुस्थानात काळया गारद्यांप्रमाणे गोऱ्या गारद्यांचाहि सुळसुळाट झाला होता. हातात तरवार व अंतरंगात धाडस असलें म्हणजे पैसा व कीर्ति मिळविण्याला त्या अस्वस्थतेच्या काळांत कांहीं कमी नव्हतें. जो आपले घरदार व देश सोडून हजारो कोसावर जातो तो मिळेल त्या अनुभवाला सादर करून घेण्यास तयार असतोच. अशा स्थितींत अपयश येऊन बेपत्ता झालेलेंहि अनेक लोक अर्थात् असणार; पण केवळ धाडसाने ज्यांना हात दिला असे पुष्कळ लोक काळया गारद्यांप्रमाणें गोऱ्या गारद्यांतहि होते. अशा लोकांच्या परंपरेचा उगम मूळ दक्षिणहिंदुस्थानांत झाला असें दिसते. सर्व हिंदुस्थानांत पदरीं युरोपियन गारदी ठेवण्याचा पहिला मान कदाचित् हैदरासच द्यावा लागेल. त्याचा मुलगा टिपू याने हे नूतन साधन परमावधीस नेऊन पोचविलेंच; पण त्याचा शेजारी निजाम यानेंहि त्या साधनाचा लवकरच अंगिकार केला. त्याचे पाहून सदाशिवरावभाऊ पेशव्यानेंहि गारदी

फौजेची कल्पना उचलली. उत्तरेसही इंग्रज आणि फ्रेंच यांच्या उदाहरणानें अनेक राजेरजवाड्यानीं आपल्या पदरीं गोरे गारदी ठेवण्याचा उपक्रम केला होता. शिंद्याने डिबॉइनला नोकरीत ठेवण्यापूर्वी गोहदच्या राण्याने मेडो नामक एका फ्रेंच शिपायाच्या साहाय्याने कवायती फौजेची एक पलटण तयार केली होती. या पलटणीवर सॅक्स्टर नांवाचा स्कॉचमन मुख्याधिकारी असून टॉमस लेग नांवाचा एक आयरिशमन दुय्यम अधिकारी होता; पण अखेर हे नूतन साधन पूर्णतेस पोचविण्याचा मान शिंद्यालाच मिळाला.

डिबॉइन हा अनेक युरोपियन राष्ट्रांच्या लष्करी नोकरीत टक्केटोणपे खाऊन केवळ नशीब काढण्याच्या हेतूने अशा कामीं हिंदुस्थानची कीर्ति ऐकून इकडे आला होता. कंपनीसरकारच्या मद्रास येथील सैन्यांतील नोकरीचा राजीनामा दिल्यावर तो १७८२ सालीं कलकत्यास वॉरन हेस्टिंग्जकडे गेला. शहाअलम बादशहाच्या दरबारीं मराठ्यांचे बस्तान खरोखर कितपत बसले आहे व आपल बोट शिरकण्यास जागा आहे की नाहीं याचा गुप्त तपास काढण्याकरतां हेस्टिंग्जनें पाठविलेल्या मेजर जेम्स ब्राउन नामक वकिलाबरोबर तो दिल्लीस गेला व तेथून आग्र्यास गेला. आपल्या आसपास भटकणाऱ्या गोऱ्या उडाणटप्पूंवर महादजी शिंद्याची बारीक नजर असे; व हा भटक्या हेस्टिंग्जकडून आलेला आहे असें समजल्यावरून, महादजीनें त्याच्या सामानाची चोरी करवून त्याची पत्रे उपटली अशी गोष्ट सांगतात ! महादजीचे व गोहदच्या राण्याचे या वेळी युद्ध सुरू होते; व महादजीच्या दरबारीं असणारा इंग्रज वकील अँडरसन याच्याच सल्ल्यानें डिबॉइन हा राण्याकडे लष्करी नोकरी मागण्यास गेला ही गोष्ट लक्षात ठेवण्यासारखी आहे. डिबॉइननें पांच हजार फौज जय्यत तयार करून देण्यास एक लक्ष रुपये सुरवातीसच मागितले. पण राण्यानें ही गोष्ट नाकबूल केल्यावर तो शिंद्याचा दुसरा शत्रु जयपूरचा राजा याच्या पदरीं दोन हजार रुपये पगारावर राहिला पुढे सालबाईचे तहानें उत्तरहिंदुस्थानांत झगडणाऱ्या राजेरजवाड्यांचेहि तात्पुरतें सख्य झाल्यामुळे जयपूरच्या राजानें डिबॉइनला १० हजार रुपये देणगीदाखल देऊन कामावरून कमी केलें. डिबॉइनविषयीं शिंद्याचा ग्रह थोड्याच चांचणीने चांगला झाला होता. म्हणून जयपूरच्या राजाच्या नोकरींतून तो सुटतांच शिंद्यानें त्यास आपल्या पदरीं १ हजार रुपये पगारावर ठेवून कंपनीसरकारकारच्या फौजेसारखी आपली फौज बनवून द्यावी असें त्याजकडे काम सोंपविलें. डिबॉइननें 'रिक्रूटभरती' ताबडतोब केली व कित्येक युरोपियन ( स्काच डच फ्रेंच ) लोक गोळा करून त्यांना आपल्या हाताखालीं हपिसर नेमले. राण्याचा पदरचा सॅक्स्टर यास आपणाकडे बोलावून त्याच्या विद्यमानें आग्र्यास तोफाबंदुकांचा मोठा कारखाना त्यानें सुरू केला. डिबॉइनची नेमं-

णूक प्रथम शिंद्याचा सरदार अप्पा खंडेराव याच्या हाताखाली झाली व पुढील तीन वर्षांत कलिंजर लालसोट आग्रा व चकसाणा इत्यादि ठिकाणच्या लढायांत डिबॉइनच्या फौजेनें केलेला पराक्रम पाहून शिंद्यास समाधान वाटलें; पण कोणताहि कारागिर एकदां यजमानाच्या घरांत शिरला म्हणजे तो आपलें काम कधींहि थांबूं देत नाहीं. तसेंच डिबॉइन याचें समाधान थोड्याशा पलटणांनीं न होऊन तो आणखी पलटणें वाढविण्याविषयीं शिंद्यास सांगूं लागला. प्रथम तें शिंद्यास नापसंत झाल्यानें डिबॉइननें राजीनामा दिला पण जिंकलेला मुलुख राखण्यास उत्तरहिंदुस्थानांत शिंद्याला मराठी फौज हवी तेवढी मिळेना तेव्हां त्याला फिरून नवी फौज ठेवावी लागली. म्हणून महादजींनें डिबॉइनला लखनौ येथून व्यापारांतून काढून पुनः आपल्या पदरीं नोकरीस आणलें. नंतर डिबॉइननें दहा पायदळ पलटणींचा कंपू व तोफखाना युरोपियन पद्धतीनें तयार करून त्यावर युरोपियन अधिकारी नेमले. शिंद्याच्या फौजेंत या वेळीं अठरापगड युरोपियन जात भरली होती. आग्र्याच्या किल्ल्यांत तोफा बंदुका वगैरे लष्करी सरंजाम लवकरच खूपसा भरून ठेवण्यांत आला. बंदुकाहि तेथें स्वस्त तयार होत. अवघ्या दहा रुपयांत विलायती बंदुकीच्या बरोबरीनें बंदुक तयार होई. शिपायांना पोषाखहि नव्या पद्धतीचे दिले होते. नव्या व्यवस्थेनें डिबॉइनला जनरलचा दर्जा मिळून त्याचा पगार प्रथम ४ हजार होता तो नंतर १० हजारांपर्यंत वाढला ! आपण इंग्रजांविरुद्ध लढणार नाहीं असा डिबॉइननें शिंद्याशीं करार केला होता असे म्हणतात; पण तो शिंद्यानें मान्य केला असल्यास आश्चर्य होय. फौजेच्या खर्चाकरितां शिंद्यानें डिबॉइनला जी सोळा लाखाची जहागीर दिली होती तिचा वसूल पुढें वीससांपर्यंत वाढला. जहागिरीच्या व्यवस्थेमुळें डिबॉइनचा दुहेरी फायदा झाला. वसूल नियमित करून फौजेचा पगार वेळचेवेळीं देण्याचें त्याच्या स्वाधीन राहिलें, व वसुलीकरितां शेंकडा २ टक्के स्वतः त्याला मिळत यामुळें स्वतः तोहि श्रीमंत झाला. अशा रीतीनें शिंद्याच्या सैन्यांत एकाच वेळीं कवाइती व बिनकवाइती अशा दोन फौजा झाल्या. १७९० मध्यें या कवाइती फौजेनें पाटणची लढाई जिंकली. रजपुतांच्या शौर्याला शिंद्याच्या फौजेच्या शिस्तीपुढें हात टेकावे लागले. याच सैन्याच्या बळावर शिंद्यानें इस्मायल बेगचा पराभव केला. मर्टा येथील लढाई याच साधनानें त्यानें जिंकली. १७९१ व ९३ मध्यें शिंद्यानें आणखी दोन कंपू तयार करविले. शेवटीं ही फौज ३० हजारांपर्यंत वाढली. एकशेंवीसपासून चौदाशें रुपयांपर्यंत सुमारें १७ । १८ युरोपियन लहान अधिकारी यापूर्वीं होतच; शिवाय यांच्यावर तीन हजारांचा कर्नल, दोन हजारांचा लेफ्टेनंट कर्नल, बाराशेंचा मेजर, चारशेंचा कप्टन व दीडशेंदोनशेंचे लेफ्टेनंट असेहि अधिकारी होते. या गोऱ्या लोकांना चंबळानदीच्या दक्षिणेस नोक-

रीस पाठविल्यास दीडपट पगार मिळे. पगारशिवाय इतर मिळकत लक्षांत घेतली तर वरिष्ठ गोऱ्या अधिकाऱ्यांना दहा लक्ष रुपयांपर्यंत संग्रह करण्यास कठिण नव्हतें. स्वत: डिबॉइन हा नबाबच बनला होता; मात्र तो केवळ मिजासी नबाब नसून लढवय्या नबाब होता. या कवाइती फौजेचे इतर मराठी फौजेस प्रथम वैषम्य वाटले पण केवळ नवीन योजनेमुळे उत्तरहिंदुस्थानांत शिंदे व होळकर यांच्या दरम्यान शिंद्याचा कमी पक्ष होता तो बळावून होळकराच्या बरोबरीचा झाला. असे पाहून १७९१ साली तुकोजी होळकरानेंहि शेव्हेलियर दूद्रेल या फ्रेंच शिपायास आपल्या पदरी ठेवून कवाइती फौजेचे एक कोअर बनविण्यास सुरवात केली. पण या वेळी डिबॉइनवर सर्व भार टाकून उत्तरहिंदुस्थान सोडून पुण्याच्या दरबारीं आपलें वजन भक्कम करण्याकरतां शिंद्याला स्वस्थ मनानें इकडे येतां आले. महादजी पुण्याकडे असता रजपुतांकडील खडण्या वसूल करण्याच्या बाबतींत कटकट होऊन सन १७९३ साली लाखेरी येथें डिबॉइनने दूद्रेल याच्या हाताखालील फौजेचा पराभव केला; तेव्हां होळकरास माळव्यांतील आपल्या मुलखाचे रक्षण करण्यास परत यावे लागले. शिंद्याच्या गैरहजीरीत दिल्ली येथील त्याचा अधिकार डिबॉइन हाच चालवीत असे. १७९४ साली महादजी वारल्यावर दौलतराव शिंद्याचा कारभार सुरू झाला. यापूर्वी मेजर पेरन याच्या हाताखालची पलटणें दक्षिणेत आली होतीं, त्यांच्या बळावर पेशव्यांनी खड्यांची लढाई लीलेनें जिंकली. शिस्तीचा गुण संसर्गजन्य असल्यामुळे होळकरानेंहि युरोपियन अधिकाऱ्याच्या हाताखालील पलटणी बऱ्याच वाढविल्या प्लिमेट व गार्डनर हे होळकराचे सरदार होते. शिंद्याच्या उपसेनापतींनीहि आपापल्या हाताखाली गोरे अधिकारी ठेवले. कॅप्टन बटरफील्ड हा लखबादादाकडे राहिला,शेफर्ड व बेलासिस हे अंबाजी इंगळ्याकडे राहिले. अप्पा खंडेराव यानें जॉर्ज टॉमस यास नोकर ठेवलें. दौलतराव शिंद्यानें जॉन हेसिंग मायकेल फिलोन कॅप्टन ब्राऊन रिग आणि कर्नल सेलर हे अधिकारी आणखी ठेवले. बुंदेलखडांत अलीबहादूर व वऱ्हाडांत रघूजी भोसल्याने हाच क्रम स्वीकारला. खुद्द बाजीराव पेशव्यानें मेजर टोन व मेजर बॉइड यांस नोकरीस ठेवून आपल्या पदरच्या सरदारांचें अनुकरण केलें.

मराठ्यांनीं आपली गनिमी काव्याची युद्धपद्धति टाकून देऊन कवाइती पद्धति स्वीकारली ही गोष्ट त्यांच्या फायद्याची झाली नाहीं, असें पुष्कळ लोकांचें म्हणणें आहे.' मराठ्यांच्या खालचा घोडा ज्या दिवशीं निघून गेला त्या दिवशींच त्यांचे राज्य गेले " असें एकानें म्हटलें आहे ! दौलतराव शिंदे व त्याचा सरदार गोपाळराव यांच्या दरम्यान भरदरबारांत पुढीलप्रमाणें संवाद झाल्याचें सांगतात. गोपाळराव हा एक जुन्या पद्धतीचा शिपाई होता. तो म्हणाला, " आमच्या बापदादांनीं राज्य मिळविलें त्यांचें घर घोड्यांच्या

खेगिगवर होते, तेथून उडून ते तबूत जाऊन बसले ! आतां तर तुम्ही शिप यांना मातीच्या बगकी बांधून देऊ लागला; पण सभाळा ! पुढे सर्वांचीच मार होईल !" दौलतराव म्हणाला "माझी पलटणे आणि तोफा आहेत तोव मी कोणासच भीत नाहीं." त्यावर गोपाळराव म्हणाला "पण त्या तोफा शेवटी तुमचा घात करतील." पार्लमेंटमध्ये सर फिलिप फ्रॅन्सिस यांनी एकदां उघड असे बोलून दाखविले की, "मराठे कवाइत शिकू लागले तोफा ओतू लागले, पण त्यातच त्याचा नाश आहे. त्यांनीं आपली लढाईच स्वदेशी पद्धति सोडली; व परदेशी पद्धति तर कोणासच मानवत नाहीं, आम्ह त्यांना यापुढे भिण्याचे कांही कारण नाही." ड्यूक ऑफ वेलिंग्टन याचेहि म असेच होते म्हणतात. एका दृष्टीने हे म्हणणे खरेहि दिसते. इंग्रजांनी दौलतरा शिंद्याचा पुरा नाश अवघ्या एका वर्षात केला;पण बेशिस्त भुरट्या पेंढाऱ्यांन वठणीला आणण्याला मात्र त्यांना ७।८ वर्षे लागली. तथापि वरील सिद्धांता सर्वस्वी खरा मानता येत नाही.कारण पेंढाऱ्याचीच पद्धति चांगली म्हणावी त अखेर त्यांना तरी यश कोठे आले ? मोगलाविरुद्ध मराठयांना गनिमी काव्या यश आले; पण इंग्रजांविरुद्धहि ते साधन सदासर्वदा उपयोगी पडलेच अस असे म्हणवत नाही. छापे घालणे किंवा दौड करून पळून जाणे हा यु कर्मापैकी एक भाग झाला. पण तेवढ्याने कार्यभाग होऊ शकणार नाही शिवाय गनिमी काव्याच्या लढाईत आश्रयस्थाने म्हणून किल्ल्यांचा जो उप योग होत असे तो होणे इंग्रजांच्या तोफांमुळे पुढे पुढे अशक्य झाले होते १८१७।१८ साली मराठयांना एकहि किल्ला इंग्रजांविरुद्ध फार वेळ लढवित आला नाहीं याचे कारण इंग्रजांच्या तोफा. अर्थात् शत्रूचीं जीं युद्धसाध तीं आपलींशीं करून घेतल्याशिवाय मराठयांना यश मिळणे शक्य नव्हते.मरा ठ्यांचें काम फसलें ते फौजेत शिस्त सुरू केल्यामुळें नव्हे, तर तें स्वतः मरा सरदारांतली शिस्त बिघडल्यामुळें. शिवाय सैन्य हे चतुरंग दळाने सिद्ध हो असेंच पूर्वापार म्हणणें आहे. सैन्यांत कवाइती फौजेचा एक भाग ठेवल म्हणून त्याच्या जोडीला चपळ घोडदळाचा दुसरा भाग ठेवतां येत नाही असें नाहीं. टिपूनें कवाइती सैन्य पदरीं ठेवलें होते तरी तो छापे घालण्याची विद्या विसरला नव्हता. टिपूचा पराभव झाला त्याला एकच कारण होते ते कीं, अनेक शत्रूंचा संघ होऊन ते त्याजवर एकदम पडले. म्हैसूरच्या दुसऱ्य व तिसऱ्या युद्धांत टिपूचा पराभव होण्यास हेंच खरें कारण झालें. तात्पर्य मराठ्यांनीं कवाइती फौज किंवा तोफखाना पदरीं बाळगला याचमुळें त्यांच नाश झाला असें म्हणतां येत नाहीं. युद्धसाधनांत चूक नव्हती, ती सरदारांत होती. तोच डिबॉइन, पण महादजीच्या हाताखालीं त्याचें जें तेज व जो उपयोग होता तो दौलतरावाच्या हाताखालीं उरला नाहीं. टॉमस ब्राऊन यांची

१८०९ सालीं म्हणजे दौलतराव शिंद्याच्या वेळीं " मराठयांच्या छावणींतून लिहिलेलीं पत्रें " वाचलीं असतां अपयशाचें खरें कारण काय होतें हे कोणा-सहि सहज कळून येणार आहे.

## मराठ्यांचें आरमार

मुंबईच्या दक्षिणेस कोकणप्रांतात इंग्रजांचा अमल पेशवाईच्या अखेर-पर्यंत सुरू झाला नव्हता. पेशवाईच्या आधीं शिवाजीमहाराजांचा व त्यांच्या आधी मुसलमानांचा अमल कोकणपट्टीवर होता. कोकणांत स्वतंत्र राजा कधींच झालेला आढळत नाही. देशावरील एका किंवा अनेक राजांच्या सत्तेच्या मुलखात कोकणाचा नेहमी समावेश होई. तथापि कोकणपट्टीत जे अधिकारी असत ते देशावरील अधिकाऱ्यांपेक्षा अधिक स्वतंत्र असत. कारण, एक तर त्यांजकडील अधिकार व कामगिरी आरमारासंबंधाची असे, यामुळे त्या अधिकाराचा व कामगिरीचा त्यांना एक प्रकारें मक्ताच मिळाल्यासारखा होई. सैन्याचा अधिकार एका व्यक्तीकडून किंवा घराण्याकडून काढून घेऊन दुसऱ्याकडे देणे सोपे असते; पण आरमाराचें तसें नाहीं. शिपाया-प्रमाणे खलाशी हा लवकर शिकून तयार होत नाहीं. दुसरें असें की, कोकण-पट्टीची ठाणीं डोंगराळ किंवा दर्याकाठची असल्यामुळे तीं काबीज करून बडखोर अधिकाऱ्यास वठणीला आणण्यास देशावरील ठाण्यांपेक्षां अधिक परिश्रम पडत. तिसरें असें कीं, कोकणपट्टी हा विशेष उत्पन्नाचा मुलूख नव्हता, यामुळे फडणिशी दसरांत त्याला फारसें महत्त्व दिलें जात नसे. पर-सांतले दार साधारण जितक्या बंदोबस्तानें आपण राखतो तितक्या बंदोब-स्तानेंच कोंकणपट्टी ही देशांतील राजे लोकांना राखावयाची असे. कोंकण-पट्टींतील अधिकाऱ्यांनाहि त्याच कारणाकरितां विशेष महत्त्वाकांक्षा नसे. स्वतंत्र राहावें व बनेल तसा दर्यावर्दीपणा करावा एवढ्यावर ते प्रायः संतुष्ट रहात. आपल्या कार्यक्षेत्रांत मात्र ते बलिष्ठ असत; आणि देशावरील मोठमोठ्या लढायांच्या वर्णनाप्रमाणें जरी कोकणप्रांतांतल्या लढायांचीं वर्णनें देण्यास साधन नाहीं, तरी दर्यावरील झुंजांत व्यक्तिशः कोंकणी खलाशी व आरमारी सरदार यांनीं दाखविलेलें शौर्य व मर्दुमकी कांहीं कमी असेल असें मान-ण्याचें कारण नाहीं. चांचेगिरींतील साहसाची व धाडसाचीं कथानकें सर्वच देशांत चित्ताकर्षक असतात. आणि कोंकणी वीरांचीं चरित्रें लिहिणारा कोणी सहृदय ग्रंथकार किंवा शाहीर पुढेमागें मिळाल्यास मराठ्यांच्या बख-रींत व पोवाड्यांत चांगलीच भर पडेल.

कोंकणपट्टीशीं इंग्रजांचा व्यापार सतराव्या शतकाच्या आरंभापासून चालू होता. तथापि कोंकणी किनाऱ्यावर आरमारी ठाणीं बसविण्याचा त्यांचा

प्रयत्न कधींहि शेवटास गेला नाहीं. मुंबईच्या दक्षिणेस आंग्रे धुळप कोल्हापुरकर व सावंतवाडीकर अशा क्रमानें सर्व किनारा बलिष्ठ अशा दर्यावर्दी मराठ्यांनीं आक्रमिलला होता. या सर्वांत आंग्रे हे प्रमुख असून त्याचा दरारा एकदम कोकणपट्टीच्या बाजूस फिरणाऱ्या जलगामी व्यापाऱ्यांना चांगलाच भासत असे. कान्होजी आंग्र्यानें इंग्रजाचा अनेक जलयुद्धांत पराभव करून अनेक वेळां त्यांचीं गलबतें धरलीं व मारलीं. इंग्रजांनीं सन १६३८ त राजापूर येथें वखार स्थापली; पण त्यांना ती लवकरच मोडावी लागली. ही वखार शिवाजीनें लुटल्यापासून इंग्रजांना दहशत बसली व दिवसेंदिवस शिवाजीच्या पराक्रमामुळे मुसलमानाचा कोकणांतील अमल नाहींसा होऊं लागलेला पाहून त्याना आपण फक्त सुरत सभाळली म्हणजे पुरे असें वाटूं लागले. शिवाजीच्या मरणोत्तर कोकणांत मुसलमानांचा अंमल थोडाबहुत फिरून प्रस्थापित झाला. तथापि, प्रत्यक्ष अमल मोगलांतर्फे हबशी शामळ यांचा आणि मराठ्यांतर्फे आंग्रे धुळप यांचा असा दुतर्फी चालू होता. अवरंगजेबाच्या मृत्यूनंतर मोगलांचा कोकणातील अमल कायमचा नाहीसा झाला; आणि शिद्दी व हबशी हे जरी मराठ्यांना त्रास देत व त्याच्याशीं झगडत, तरी ते यापुढ मुसलमानाकरितां झगडत नसून स्वतंत्र राजे म्हणून झगडत असत. इंग्रजाना जो थोडाबहुत फायदा झाला तो या झगड्यापासूनच झाला. ते मधून मधून मराठ्यांच्या साहाय्यानें पोर्तुगीजाशी व शिद्द्याच्या साहाय्यानें मराठ्यांशी लढत व कोणीकडून तरी आपल्या संरक्षणाचे उपाय योजीत.

मराठ्याच्या आरमाराची सरकारी रीत्या संस्थापना छत्रपति शिवाजीमहाराजाचे कारकीर्दींत झाली. सन १६६१ मध्ये जंजिरा काबीज झाला नाहीं म्हणून समुद्राच्या बाजूनें त्यास शह देण्याचा शिवाजीनें विचार केला. ह्या प्रसंगीं हबशाजवळ जहाजे असल्यामुळें त्यास समुद्रांतून अन्नसामग्री आणता येत असे, ती बंद करण्याच्या उद्देशानें शिवाजीमहाराजांनीं आपलें स्वतंत्र आरमार उभारण्याचा हुकूम दिला.

आरमार तयार झाल्यानतर शिवाजीमहाराजांनीं कोकण प्रांतांतील दर्याकिनाऱ्याचीं बंदरें हळूहळू काबीज करण्यास सुरवात केली व दर्याकिनाऱ्याचें चांगलें निरीक्षण करून माऱ्याच्या खंबीर जागा शोधून जंजिरे म्हणजे पाण्यांतील किल्ले बांधण्यास प्रारंभ केला. सन १६६२ मध्ये वाडीकर सावंतावर स्वारी करून त्याच्या ताब्यांतील पुष्कळ प्रांत शिवाजीनें काबीज केला. त्याच वेळीं त्यास राम दळवी व तानाजी सावंत हे सावंताचे दर्यावर्दी सरदार येऊन मिळाले; त्यांस शिवाजीनें आपल्या आरमारांतील हशमांचे सुभेदार नेमले. मालवणचा सिंधुदुर्ग किल्ला इ. स. १६६४–६५ मध्ये बांधण्यास शिवाजीनें प्रारंभ केला व तेथें आरमाराचें मुख्य ठाणें करावयाचें योजिलें.

कुलाबा सुवर्णदुर्ग व विजयदुर्ग हे किल्ले सुधारून दुरुस्त केले व तेथें जहाजे बांधण्याचें काम चालविले.हे सर्व किल्ले मराठ्यांच्या आरमाराच्या मुख्य जागा होत.

मराठ्यांच्या आरमाराची सिद्धता झाल्यानंतर इ. स. १६६४ पासून कोंकणकिनाऱ्यावर मराठ्यांचीं व परराष्ट्रांतील लोकांची युद्धे सुरू झालीं. ह्या आरमाराची शक्ति पाहून पोर्तुगीज शिद्दी व इंग्रज यांस भीति उत्पन्न झाली. १६६५ मध्ये शिवाजीनें आपले आरमार घेऊन कारवारपर्यंत स्वतः चाल केली व तेथपर्यंत समुद्रकिनारा पादाक्रांत केला.शिवाजीच्या ह्या स्वारीबरोबर जे लष्कर होते त्यांत 'फ्रिगेट्स'म्हणजे ३० पासून १५० टन वजनाचीं व एका डोलकाठीचीं अशीं ८५ लहान जहाजे होतीं, व 'शिप्स' म्हणजे तीन डोलकाठ्यांचीं अशीं तीन मोठी जहाजे होतीं, असे कारवारच्या इंग्रज व्यापाऱ्यांनीं लिहिले आहे. इ. स.१६७०मध्ये ज्या वेळीं शिवाजीने जंजिऱ्यावर निकराचा हल्ला करून शिद्दीचे बंड मोडून टाकण्याचा निश्चय केला त्या वेळी शिवाजीचे आरमार वाढत जाऊन त्याचीं १६० जहाजें झाली होती, त्याच सालीं पोर्तुगीज लोकांची व शिवाजीच्या आरमाराची मोठी लढाई झाली व शिवाजीच्या आरमारापैकी बारा लहान गलबते पोर्तुगीज लोकांनीं हस्तगत केलीं; उलट मराठ्यांच्या आरमारानें दमणजवळ पोर्तुगीज लोकांचा पराभव करून त्यांचे एक मोठें जहाज जिंकून घेतले.

१६७९ मध्ये शिवाजीनें आपल्या आरमाराचा सेनापती दौलतखान याजकडून खांदेरी बेटावर चाल करवून ते घेतले. या बेटावर इंग्रज व पोर्तुगीज ह्यांचा डोळा असल्यामुळे शिवाजीचे आरमार जंजिऱ्याकडे जात असतां त्यांनी त्यास प्रतिबंध केला. इंग्रजांच्या 'रिव्हेंज' नामक सोळा तोफांच्या गलबताची व मराठ्यांच्या आरमाराचीं बरीच चकमक उडाली. आर्म नामक इतिहासकाराने या वेळीं मराठ्यांच्या गलबताची रचना व वल्हीं इंग्रजी जहाजांपेक्षां उत्तम होतीं असे म्हटलें आहे. शिवाजीच्या आरमाराचा मुख्य उद्देश कोंकणकिनारा जिंकून त्याचे परशत्रूपासून संरक्षण करावें हा होता, तो जंजिऱ्याच्या टापूवाचून इतर ठिकाणीं सिद्धीस गेला.

सर्व कोंकणपट्टी ताब्यांत आल्यावर तिजवर आरमाराच्या सोयीकरितां शिवाजीनें कुलाबा उंदेरी अजनवेल वगैरे तेरा जंजिरे बांधले होते. हे समुद्रांतील किल्ले बांधण्यामध्यें मराठ्यांच्या आरमाराची शक्ति वाढवून समुद्रकिनाऱ्यावरील सर्व नाकेबंदीच्या जागा खंबीर करण्याचा त्याचा हेतु होता. त्यानें बांधलेला सिंधुदुर्ग नांवाचा किल्ला ही त्याच्या कारकीर्दीतील मराठी आरमाराची मुख्य जागा होय.मालवणाजवळ पद्मदुर्ग म्हणून जो किल्ला आहे. तेथें जहाजें बांधण्याचा कारखाना होता.विजयदुर्ग व कुलाबा येथें लढाऊ जहाजांवरील तोफा व दारूगोळा ठेवण्याच्या जागा होत्या. समुद्रकांठीं राहणारे कोळी

भंडारी वगैरे दर्यावर्दी लोक शिवाजीनें वश करून आपल्या आरमारांत घेतले होते. डगलस साहेबाने लिहिले आहे कीं, " शिवाजी स्वतः खलाशी नव्हता म्हणून बरें झाले; नाहीं तर त्यानें ज्याप्रमाणें जमिनीचा पृष्ठभाग साफ म्हणजे निःशत्रु करून टाकिला,त्याप्रमाणें समुद्राचाहि करून टाकिला असता!" नेर्नसाहेबानें कोंकणच्या इतिहासांत " शिवाजी हा समुद्रकिनाऱ्यावर राज्य करणाऱ्या तत्कालीन मुसलमान अथवा ख्रिस्ती सत्ताधिकाऱ्यांपेक्षां कमी प्रतीचा राज्यकर्ता नव्हता " असे प्रांजलपणें कबूल केलें आहे.

जंजिऱ्याचा शिद्दी हा उन्मत्त होऊन शिवाजीमहाराजांच्या कारकीर्दींत मराठ्यांस हार गेला नाही. त्यास इंग्रज व पोर्तुगीज ह्यांचे गुप्त रीतीने साह्य होते. त्यामुळे त्यावर स्वारी करून जजिरा हस्तगत करावा असा संकल्प संभाजीने केला. परतु त्यांत त्यास यश आले नाही. इकडे राजापुरास मराठ्यांचें जे आरमार होते त्याने पोर्तुगीज लोकांस चांगला वचक बसवून त्यांच्या ताब्यांतून कारंजें वगैरे ठिकाणे घेतलीं."एकटें राजापूरचें मराठी आरमार गोंव्याच्या पोर्तुगीज आरमारास भारी होते " असे आर्म या इतिहासकाराने म्हटले आहे. सभाजीच्या कारकीर्दींत हबसाण व फिरंगाण ह्या दोन्ही समुद्रावरील मोहिमांमध्ये मराठयांच्या आरमाराचे पराक्रमतेज चांगलेंसें प्रकाशित झालें नाहीं. सभाजीनतर मराठी राज्यावर जे अरिष्ट ओढवलें त्यांतून ज्याप्रमाणें धनाजी जाधव संताजी घोरपडे ह्या महावीरांनीं यवनशत्रूंस आपला पराक्रम दाखवून त्यांच्या ताब्यांतून स्वराज्य सोडविलें, त्याप्रमाणे समुद्रकिनाऱ्यावरहि इग्रज फिरंगी डच शिद्दी इत्यादि स्वसत्ता स्थापन करणाऱ्या महत्त्वाकांक्षी परकी लोकांचा पाडाव करण्याकरितां ज्याने मराठ्यांचें आरमार पुनः सिद्ध केले व मराठयांचें दर्यायुद्धांतलें अलौकिक शौर्य दाखवून सर्वांस दिपवून सोडले, त्या कान्होजी आंग्रयाचे नांव मराठ्यांच्या इतिहासांत कीर्तिरूपाने चिरकाल चमकत राहील ह्यांत शंका नाहीं. शिवाजीच्या पश्चात् कोंकणकिनाऱ्यावर परद्वीपस्थ लोकांचा पाय न लागूं देण्याचे कामीं जर कोणीं पराकाष्ठेची दक्षता दाखविली असेल तर ती फक्त कान्होजी आंग्रे यानेंच होय, असें म्हटल्यास त्यांत अतिशयोक्ति होणार नाहीं.

कान्होजी आंग्रे ह्यास परदेशीय इतिहासकारांनीं चाच्यांचा नायक वगैरे निंदास्पद विशेषणांनीं संबोधिलें आहे. परंतु तो खरोखर चाच्यांचा नायक नसून मराठ्यांच्या आरमाराचा पुनरुद्धारक होता असेंच म्हटलें पाहिजे. कान्होजी आंग्रयासारखा दर्यावर्दी युद्धामध्यें पुरा निपुण, अद्वितीय पराक्रमी, आणि अचाट साहसी पुरुष राजारामाच्या कारकीर्दींत बिकट राजकारणप्रसंगीं निर्माण झाला नसता, तर सर्व समुद्रकिनारा मराठ्यांच्या ताब्यांतून नाहींसा झाला असता ह्यांत तिळमात्र शंका नाहीं.

कान्होजीनें मराठ्यांच्या आरमाराची पुष्कळ सुधारणा करून तें चांगले खंबीर केलें. शिवाजीच्या कारकीर्दींत मराठ्यांचें जें आरमार होते, त्यापेक्षां कान्होजीच्या कारकीर्दींत तें अधिक प्रबल व अधिक अजिंक्य झाले होतें. शिवाजीस खुष्कीवर व जलमार्गावर सारखीच सत्ता वाढवावयाची होती, त्यामुळे त्यास दोहोंकडे लक्ष देणे भाग असे. परंतु आंग्र्यानें सर्व दर्याकिनारा आपल्या टापूखालीं घेतल्यामुळें त्यास आपलें सर्व लक्ष्य आरमाराच्या सुधारणेकडे व अभिवृद्धीकडे लावितां आलें.त्यानें थोड्याच वर्षांत मराठ्यांच्या आरमाराची चांगली सुधारणा करून लढाऊ जहाजें व त्यांतील सैन्य ह्यांची संख्या बरीच वाढविली. हशम म्हणजे जहाजांवर लढणारे लोक व दर्यावर्दी म्हणजे जहाज चालविणारे लोक ह्यांस चांगले शिक्षण देऊन समुद्रयुद्धामध्यें त्याने निष्णात केले. सन १६९० पासून १७५६ पर्यंत मराठ्यांचे आरमार आंग्र्यांच्या हाताखालीं होते.

सन १७१९ मध्ये शिद्दी फिरंगी आणि मोंगल ह्या सर्वांनीं मिळून एकत्र होऊन प्रबल होऊन बसलेल्या कान्होजीची खोड मोडण्याचा प्रयत्न केला; परंतु कान्होजीने त्या सर्वांस आपल्या आरमाराच्या जोरावर दाबांत ठेवलें, व त्यांच्यांतील प्रांत एकसारखा काबीज करण्याचा सपाटा चालविला. जंजिऱ्याचा शिद्दी व मोंगल आंग्र्यांस वसूल देण्यास राजी झाले. ह्याप्रमाणें कान्होजीने मराठ्यांची सत्ता व वर्चस्व कोंकणामध्ये पुन्हां संस्थापित केलें. त्याने विजयदुर्ग येथे आपल्या आरमाराचें मुख्य ठिकाण केले; आणि सर्व बंदरीकिल्ल्यांस उत्तम तटबंदी करून तेथेंहि आरमाराचा पक्का बंदोबस्त केला. मुंबईपासून गोव्यापर्यंत सर्व समुद्रकिनाऱ्यावर एकहि खाडी, एकहि बंदर, किंवा एकहि नदीचे मुख त्याने तटबंदीवांचून किंवा जहाजांच्या नाक्यावांचून मोकळे ठेविले नाही.

कान्होजीच्या आरमाराबद्दल इंग्रज ग्रंथकारांनीं जी माहिती दिली आहे, तिजवरून तें बरेच मोठें असावे असें दिसून येते. त्याच्या मोठ्या जहाजांस दोन किंवा तीन शिडें असत. ज्या जहाजांस तीन शिडें असत त्यांची शक्ति ३०० टन ओझें वाहण्याची असे. बाकीचीं सर्व १५० पासून २०० टनपर्यंत ओझ्याचीं असत.भूमध्यसमुद्रांतील जहाजांप्रमाणें त्यांच्या नाळी पुढें निमुळत्या आलेल्या असून त्यांच्यावर चांगले खंबीर मजले असत.मोठ्या गुराबांवर सज्ज केलेल्या सहांपासून नऊ पौंड गोळा फेंकणाऱ्या तोफा असत. सन १७१६ मध्यें ३२ तोफांचें एक मोठे जहाज, २० पासून २८तोफांच्या ४ गुराबा, आणि ५ पासून १२ तोफांचीं २० गलबतें इतकें इंग्रजांचें आरमार असून ह्याच सुमारास कान्होजीचें आरमार म्हणजे १६पासून३०तोफांच्या १० गुराबा आणि ४ पासून १० तोफांचीं ५० गलबतें एवढेंच होतें. तरी कान्हो-

जीनें सन १७१६ मध्यें ईस्ट इंडिया कंपनीच्या 'प्रेसिडेंट' नामक जहाजाशी लढाई करून त्याचा फार नाश केला. सन १७१७ मध्ये त्याने 'सक्सेस' नांवाचें जहाज लढून घेतलें. सन १७२२ मध्ये इंग्रज व पोर्तुगीज ह्यांनीं एक होऊन कुलाब्यावर स्वारी केली, परतु त्यांस यश मिळाले नाहीं. पुढें दोन वर्षांनीं डच लोकांचे ३० पासून ५० तोफांच्या सात प्रचंड जहाजांचें आरमार विजयदुर्गावर चाल करून आले; पण तेहि छिन्नविच्छिन्न होऊन परत गेले. ह्याप्रमाणे आंग्र्यांच्या आरमाराची पराक्रमशक्ति परराष्ट्रीयांस चांगली व्यक्त होऊन त्यांचे एकहि व्यापारी गलबत लढाऊ आरमाराच्या साह्यावांचून फिरकेनासे झाले. "भूमध्यसमुद्रांतील आल्जेराईन्स नामक चाच्यांचे नांव ऐकतांच ज्याप्रमाणे तिकडील जहाजांवरील व्यापाऱ्यांचा थरकांप होत असे, त्याप्रमाणे या दर्यावर्दी मराठा वीराचे नांव ऐकून इंग्रज व्यापाऱ्यांची गाळण उडत असे," असे लो नामक इतिहासकारानें लिहून ठेविले आहे. पुढे सन १७२७ व १७२८ मध्ये इग्रजांच्या आणखी दोन जहाजांचा पाडाव झाल्यामुळे ते जेरीस आले व त्यांनीं वाडीकर सावतांशी तह करून त्यांचे साहाय्य घेण्याचे ठरविले. आंग्र्याप्रमाणेच वाडीकर सावंत हे दर्यायुद्धामध्ये फार निष्णात होते. सन १७२९ मध्ये कान्होजी मृत्यु पावला. त्यापूर्वीं त्याच्याशीं सलोखा करून आपला कार्यभाग साधावा म्हणून मुंबईच्या हुशार गव्हर्नरानें त्याची मनधरणी करण्याचा प्रयत्न केला. त्या वेळी कान्होजीने जे उत्तर दिले त्यावरून तो व्यवहारचतुर व धूर्त होता असें दिसून येतें. मुबईच्या गव्हर्नराने, "तुमचे व आमचे सौरस्य नाही ह्याचें कारण केवळ तुम्ही आहांत; तुम्ही दुसऱ्याचा माल घेण्याची इच्छा करितां हे अविचारीपणाचे आहे; अशा प्रकारचे गुन्हे म्हणजे एक प्रकारची चांचेगिरी आहे; अशा रीतीचे तुमचे वर्तन फार दिवस चालावयाचें नाही; तुम्ही प्रथमपासून व्यापार वाढविला असता व व्यापारी लोकांवर मेहेरबानी ठेविली असती तर तुमच्या ताब्यांतील बदर आजमितीस परमेश्वरकृपेनें भरभराट पावून त्यानें सुरतेवर ताण केली असती आणि तुमचा लौकिक सर्वत्र पसरला असता....ही गोष्ट सरळ रीतीनें व्यापारवृद्धि केल्यावांचून होणार नाहीं" असें दर्शवून तह करण्याबद्दल लिहिले होतें. त्यास कान्होजीनें फार खुबीनें उत्तर दिले. त्यानें लिहिलें की, "तुम्ही लिहिलें ते सर्व प्रशंसनीय आहे. आजपर्यंतच्या तुमच्या आमच्या भेदभावाचें व तंट्याचें कारण मी आहें असें तुमचे म्हणणें आहे, परंतु तुम्ही दोन्ही बाजूंचा विचार केला म्हणजे त्यांतील सत्य तुम्हांस कळून येईल. दुसऱ्याची संपत्ति अपहार करण्याची माझी इच्छा आहे म्हणून तुम्ही म्हणतां; पण तुमच्यासारखे व्यापारी तसल्या महत्त्वाकांक्षेपासून अलिप्त

आहेत असें मला वाटत नाहीं. कारण, सर्व जगाचा एकच मार्ग आहे. ईश्वर स्वतः थोडेच कांहीं देतो ! ह्याची संपत्ति त्यास व त्याची ह्यास अशीच मिळत असते. आमचे राज्य जुलूम बलात्कार अथवा चांचेगिरी ह्यांच्यावर चाललें आहे असे म्हणणे तुम्हां व्यापारी लोकांस शोभत नाहीं. शिवाजीमहाराजांनीं चार बादशहांबरोबर लढाया केल्या, आणि स्वपराक्रमानें स्वराज्य स्थापन केलें. ह्याप्रमाणें आमच्या सत्तेचा प्रारंभ आहे. ह्याच साधनांच्या योगानें आमचें राज्य टिकले आहे, हे तुम्हांस कळतच आहे. हें चिरकालिक आहे किंवा नाहीं ह्याचा विचार तुम्हींच करावा. जगांत चिरकालिक असे कांहींच नाहीं. जगाचा क्रम सर्वांस सारखाच माहीत आहे."

कान्होजी आंग्रे मृत्यु पावल्यावर आंग्र्याच्या घराण्यांत गृहकलहाचे बीजारोपण झालें, त्यामुळें कोकणकिनाऱ्यावर स्वसत्ता स्थापित करू इच्छिणाऱ्या परकीय लोकांना आपला मतलब साधण्यास अनायासे संधि मिळाली. कान्होजीचे पुत्र मानाजी व संभाजी या उभयतांमध्यें तंटे माजून त्यांच्या ज्या आपसांत लढाया झाल्या त्यांमध्ये स्वोत्कर्ष व स्वार्थेच्छा यावांचून राष्ट्रहिताचा उच्च किंवा उदात्त विचार कांहींच नव्हता. त्यांच्या भाऊबदकीस पेशव्यांनीं तरी आळा घालावयाचा होता ! परतु तेथेंहि स्वार्थबुद्धीचाच वास झाल्यामुळें राष्ट्रकल्याण एकीकडे राहून, पेशव्यांनीं आंग्र्यांचा प्रांत जिंकून घेण्याचा क्रम आरंभिला.

आंग्र्यांची भांडणें चालू होती, तथापि त्यांच्या आरमारानें आपला वचक परकीय लोकांवर चांगला बसविला होता. मानाजीनें इंग्रजांच्या व हबशांच्या आरमारांशीं अनेक वेळां युद्धप्रसंग करून, मुंबई बंदरापर्यंत आपलें आरमार एक वेळ थडकविलें होते. संभाजीनें तर इंग्रज फिरंगी आणि इतर शत्रु ह्यांच्याशीं अनेक वेळां दर्यायुद्धे केलीं व त्यांस अगदीं जेरीस आणिलें. पुर्वीं मराठ्यांच्या आरमारामध्ये ३०० टनपर्यंत वजनाचीं जहाजे होतीं; परंतु संभाजीनें ती ४०० टनपर्यंत केलीं. त्याचीं ४०० टनांचीं ८ जहाजें होतीं. तो १७४२ मध्ये मृत्यु पावला. त्याचे मागून त्याचा भाऊ तुळाजी हा सुवर्णदुर्गाच्या आरमाराचा अधिपति झाला. त्याने समुद्रामध्ये फारच प्रळय मांडून इंग्रजांस त्रास दिला आणि पेशव्यांशींहि वैमनस्य आरंभिलें. तेव्हा सगळ्यांनीं मिळून सन १७५५ मध्ये विजयदुर्गावर स्वारी करून त्याचा व त्याच्या प्रबळ आरमाराचा नाश केला व आंग्र्यांची समुद्रावरील सत्ता नाहींशी करून टाकिली.

कान्होजी आंग्रे व त्याचे वंशज ह्यांच्याबद्दल डगलस साहेबानें जें वर्णन लिहिलें आहे त्यांत, " हिंदीमहासागरांतील तिन्ही युरोपियन राष्ट्रांस ( इंग्रज फिरंगी व वलंदेज ) पराक्रमाच्या कामांत आंग्र्यांनीं खालीं पाहण्यास

लाविलें आणि कोणासहि त्यांची बरोबरी करतां आली नाहीं, "असें मोकळ्या मनानें उद्गार काढले आहेत.

इ. स. १७५६ मध्यें तुळाजी आंग्र्यास कैद केल्यानंतर, पेशव्यांनीं त्याच्या जहाजांपैकीं जीं जहाजें हातीं लागलीं तीं आपल्या उपयोगांत आणून विजयदुर्ग हीच मराठ्यांच्या आरमाराची मुख्य जागा केली. विजयदुर्ग हा पाण्यांतील जंजिरा फार बळकट व आरमाराच्या जागेस जसा पाहिजे तसा होता. त्याची नैसर्गिक रचना व मराठ्यांनीं बांधलेलें त्यावरील अजस्र काम ह्या दोहोंच्या योगानें त्यास फार महत्त्व आले होते.

विजयदुर्गच्या आरमारामध्यें लढाऊ लोक सुमारे दोनपासून तीन हजारांपर्यंत असत. अगदीं सगळ्यांत मोठें जे फत्तेजंग जहाज होते त्याच्यावर २२६ इसम, १६ गोलंदाज, १३२दर्यावर्दी मिळून ३७४ लोक होते. अगदीं लहान गलबत वावडी म्हणून होतें, त्यावर १५ लोक असत. आरमारी जहाजावर युद्धसामग्री चांगली असे. इ. स. १७८३ पासून १७८६ पर्यंत मराठ्यांच्या आरमाराकडे लढाऊ तोफा लहानमोठ्या मिळून २७५ पर्यंत होत्या. त्या वेळीं नारायणपाल म्हणून एक फार मोठें तिरकती पाल होतें, त्यावर २८ तोफा व ४ जंबुरे मिळून ३२ डाग होते.

ह्या आरमारावर एक मुख्य अधिकारी असे. त्यास 'सुभेदार निसबत सुभा आरमार' अशी संज्ञा असे. ह्या आरमाराचे आधिपत्य ज्यांच्या हातांत होतें त्यांच्यामध्ये आनंदराव धुळप हा दर्यायुद्धामध्ये विशेष नाणावलेला पुरुष होऊन गेला. आनंदराव धुळप व त्याचें बंधुमडळ यांनीं मराठ्यांच्या आरमारामध्यें शौर्याचीं व पराक्रमाचीं पुष्कळ कामे केलीं. त्यांपैकी इ. स.१७८३ मध्यें इंग्लिश आरमार व धुळपांचें आरमार ह्यांमध्ये जी हातघाईची लढाई झाली तीमध्यें उभय योद्ध्यांचे रणशौर्य व्यक्त झाले. त्या वेळच्या मराठ्यांच्या आरमाराचे खरें स्वरूप त्याच प्रसंगाचे एक अस्सल पत्र दिले म्हणजे नीट समजून येईल. हें पत्र म्हणजे या युद्धाची हकीकत आनंदराव धुळपानें श्रीमंत पेशवेसरकार यांस कळविल्यानंतर त्यांच्याकडून आलेले उत्तर होय. तें येणेंप्रमाणे:—

" राजश्री आनंदराव धुळप सुभेदार आरमार जजिरे विजयदुर्ग गोसावी यांसी:—

अखंडित लक्ष्मी अलंकृत राजमान्य स्ने. माधवराव नारायण प्रधान आशीर्वाद उपरी येथील कुशल जाणून स्वकीय लिहित गेलें पाहिजे. विशेष. तुम्ही छ. ५ जमादिलावलचें पत्र पाठविलें त्यांत लिहिलें कीं, इंग्रजी तरांडीं शिवाडें दोन,दीड घोशी बताले व तीन घोशी आरमारें जंगी दारूगोळ्यानिशीं येशीं हजार चापाची बदुक, चारशें गोरा गोलंदाज व सात कौंसलदार असे

विलायतेहून हैदर नाइक यांचे मुलखाचे बंदोबस्ताकरतां जळमार्गें जात होते, त्यांची आमची रत्नागिरीचे मुक्कामीं छ. १ जमादिलावल सकाळचे प्रहर दिवसांत गांठ पडली, आणि लढाई तोफखाना सुरू झाला. ते सायंकाळचे प्रहर दिवसापर्यंत मारामारी तोफांची चालली असतां, तरांडीं शिकस्त होत नाहींत असें समजून सर्व लोकांचा एकजीव करून, धन्याचे पायांचे स्मरण करून बेशक त्यांचे व आमच्या तरांडयांची अडावणी केली. हातास हात मिळालेवर कोण कोणास मारतो अशी शुद्धि राहिली नाहीं याप्रमाणे एक प्रहर गर्दी झाली. धन्याचे पुण्य समर्थ तरांडीं शिकस्त केली. त्या गर्दीत आम्हांकडे मोठे माणूस, आठ असामी सरदार ठार झाले. व जखमी पधराशे असामी व नऊशे असामी आडहत्यारी व बरकदाज ठार झाले. इग्रजांकडील दोन हजार असामी व खांसा असामी एक ठार झाला व जखमी पांचसहाशें असामी जहाले. सर्व आरमार व कौसलदारसुद्धां जजिरे मजकुरीं कैद करून ठेविले आहेत. सर्फराजी करणार धनी आहेत. म्हणून विस्तारे लिहिले तें कळलें. ऐसियास आंग्रे यांचा मुलुख आमचे वडिलांनीं घेतला, ते समयी तुमचे वडिलांची अठरा टोपीकरावर सलाबत आहे सबब तुमचे वडिलांस ठेविले. त्याप्रमाणे हल्ली तुमची सलाबत पाहून वडिलांनीं तुमचे पाणिग्रहण केलें त्याचे सार्थक करून दाखविले. इग्रज आपणास शिपाई म्हणवतो; आणि खासे गोरे वर असतां व त्यांची आरमारें मोठी असून तुम्ही प्राणांची आशा न धरितां, बेशक त्यांचे गळी जाऊन पडलां. शाबास, शाबास तुमची व तुमच्या लोकांची ! महाराजचाकरीस अशी मोठमोठी कामे करण्याची तुम्हीं उमेद धरितां, त्यांतच तुमचे स्वरूप आहे. आठ असामी सरदार ठार झाले, त्यांच्या पुत्रांच्या नांवे असाम्या होऊन जास्ती तैनाती केल्या जातील. ज्यांस पुत्र नसतील त्यांस दत्तक पुत्र देऊन सरदारी चालती केली जाईल, किरकोळ लोकांच्या पुत्रांच्या असाम्या चालत्या कराव्या. ज्यांस पुत्र नसतील त्यांस बालपर्वेशा चालविल्या जातील. तुमचे मर्जीने बक्षीस काय द्यावयाचें असेल ती यादी करून पाठविणे, समजून घेऊन चवकशीने आज्ञा होईल. आम्हांकडील लोक जखमी जाहले आहेत त्यांचा बंदोबस्त जातीनें करून खर्च लागेल तो करून बरें काय तें करणे. इंग्रजांकडील लोकांचा खर्च जुजबी करावा. तुम्हांस बहुमानाचा पोषाख खाजगीकडील व शिरपेच, मोत्यांची कंठी व कडीं पाठविलीं आहेत हीं घेणें. इंग्रजांकडील वकील येऊन दाखल झाला आहे, त्याचा तहनामा तुमच्या विचारें केला जाईल. तुम्हीं हें काम मोठें केल्यावरून सरकारची मर्जी फार खूष होऊन, सरदार दौलतीत तुम्ही मालक आहां असें समजून संतोष झाला. रवाना छ. १३ जमादिलावल, बहुत काय लिहिणें हे आशीर्वाद. ( मोर्तब ) ”

धुळपाप्रमाणे विचारे सुर्वे कुवेसकर जावकर इत्यादि अनेक सरदार दर्यायुद्धामध्यें फार नामांकित असून त्यांनींहि मराठ्यांच्या आरमारामध्यें उत्तम पराक्रम केले होते. पेशव्यांकडून आरमाराच्या सुभ्याकडे दिवाण फडणवीस मुजुमदार हशमनीस वगैरे दरकदार नेमून दिलेले होते. त्या सर्वांच्या तैनाती ठरीव असत. नवीन गलबत बांधण्यास खर्च दहापासून चाळीस हजारांपर्यंत व दुरुस्तीचा खर्च पांचपासून दहा हजारांपर्यंत असे. रत्नागिरी व अजनवेल येथे सरकारी व खासगी गोद्या असत. मराठ्यांच्या आरमाराचा खर्च प्रतिवर्षास दीडपासून दोन लाख रुपयेपर्यंत असे. आरमार सुभ्याकडे एक स्वतंत्र सौंदलमहाल तोडून दिला होता. ह्याशिवाय सरकारांतून रोख ऐवज बराच मिळत असे. परराष्ट्रीय व्यापारी जहाजांवर जकात असे. त्याशिवाय व्यापार करण्यास जी जहाजे जातील त्यांस हरजिन्नस व माल भरून ठिकठिकाणीं उदीम व्यवसाय करण्यास परवानगी देण्याबद्दल एक कर घेत असत. ह्या निमित्त सरकारांत प्रत्येक जहाजामागें ४॥ रुपये जमा होत. ह्याशिवाय पैदास म्हणून उत्पन्नाची बाब असे. जीं परराष्ट्रीय जहाजें सरकारचा कौल न घेतां व्यापारनिमित्तानें किंवा दुसऱ्या राजकीय हेतूनें मराठ्यांच्या राज्यांतील समुद्रकिनाऱ्यावर येत व युद्धास प्रवृत्त होत, त्यांच्याशीं लढाई करून तीं व त्यांतील माल मराठ्यांच्या आरमारावरील लोक जिंकून घेत. ह्या मिळकतीचे उत्पन्न फार मोठे असे व तिला पैदास असे म्हणत. ही पैदास कधीं कधी ५० हजारांपर्यंत देखील असे. व्यापार करणारे स्वदेशी लोक मुख्यतः भाट्ये सारस्वत व मुसलमान हे असत.

मराठ्यांच्या आरमारावर 'मालमी' म्हणजे दिशा पाहण्याचें होकायंत्र वांळुकायंत्रें व दुर्बिणी वगैरे होत्या. विद्युत्प्रकाशाचे काम त्या वेळी चंद्रज्योतीच्या साह्यानें करीत असत. जहाजांची निशाणे भिन्नभिन्न रंगांचीं खुणेकरतां लावली जात. सांप्रत जहाजाचे आगमन व प्रयाण कळविण्याकरतां ज्याप्रमाणे वाफेच्या योगानें कर्कश शीळ वाजवितात, त्याप्रमाणे शिंगें व कर्णे यांच्या उच्च स्वरानें पूर्वीं तें काम होत असे.

## मराठ्यांची मुलकी व्यवस्था

कोणत्याहि राज्यांत लष्करी सामर्थ्याचा मान पहिला असला तरी मुलकी राज्यव्यवस्थेचा मान त्याच्याच खालोखाल आहे. पराक्रम एक दिवसाचा होतो; पण राज्यव्यवस्था निरंतरची असते. यामुळें राष्ट्राचा मोठेपणा, त्याचा स्थायीभाव, त्याचे नैतिक गुण, यांची परीक्षा करावयाची असल्यास ती त्यांतील राज्यव्यवस्थेवरूनच करण्यांत येते. राज्य मिळविण्याच्या गुणाला जर राज्य चालविण्याच्या गुणाची जोड नसली तर मिळविलेलें राज्य नीट टिकत

नाहीं, प्रजा असतुष्ट होते, बेबंदशाही माजते, व एक दिवसांत मिळालेल्या राज्यास हातून जाण्यास जरी कदाचित् चार दिवस लागले तरी अखेर तें जातेंच! तरवारीच्या पराक्रमावर राज्य मिळाले तरी राज्यांतील वसूल येण्यास तरवारीचा उपयोग होऊ शकत नाहीं. त्याला व्यवस्थाच चांगली लागते. तसेच राज्य मिळविणारा स्वतः राजा होऊन बसला तरी राजा देखील कोणतेहि राज्य स्वतः एकट्याकरितां मिळवीत नाही. तो तें आपल्या लोकांकरितां, आपल्या समाजाकरितां मिळवीत असतो, व समाजास राज्याचा जो उपयोग होतो किंवा उपभोग मिळतो तो राज्यांतल्या ज्या राज्यसंस्था निर्माण होतात त्यांच्या द्वारेच मिळतो. म्हणून शिवाजीची योग्यता, तो शूरवीर असल्यामुळे जितकी मानली जाते तितकीच किंवा तिच्याहूनहि कांकणभर अधिकच तो सुराज्यसंस्था निर्माणकर्ता झाला यामुळेच इतिहासकार मानतात. महाराष्ट्रांत या राज्यसंस्था एकदां स्थापल्यानंतर त्या पद्धतशीर चालविण्याचे कामहि शहाणपणाचें व जोखमीचे होते, आणि या कामीं क्षत्रियांपेक्षां ज्यांचा विशेष अधिकार व ज्यांच्या अंगी शिक्षणजन्य परपरागत विशेष शहाणपण होते असा ब्राह्मण व कायस्थ वर्ग शिवाजीस लाभला. अशा रीतीने तरवारीस लेखणीची जोड मिळाल्यामुळे शिवाजीने मिळविलेल्या राज्यास सुव्यवस्थित स्वरूप आले व शेदोनशे वर्षे तरी टिकण्यास तें समर्थ झाले. मराठ्यांच्या अंगचें लष्करी तेज आणि ब्राह्मण प्रभू यांच्या अंगचा सुव्यवस्थितपणा यांस पुढें कमतरता आली आणि या दोनहि गुणांची खराबी स्वार्थपरायणतेने केली. विशेषतः मराठ्यांहूनहि अधिक सुव्यवस्थेचे भोक्ते व लष्करी सामर्थ्यांतहि त्यांस हार न जाणारे अशा इंग्रजांची व मराठ्यांची गांठ पडली तेव्हां मराठ्यांचा पराजय होऊन त्यांना आपले राज्य गमवावे लागले ही गोष्ट वेगळी; तथापि ही गोष्ट घडून येईपर्यंतच्या काळांत तरी मराठ्यांनी आपली राज्यसंस्था चालविण्याचें शहाणपण प्रकट केले ही गोष्ट निर्विवाद आहे. मनुष्य हा मृत्युवश असल्यामुळे केव्हां तरी रोगांचा जोर विशेष होऊन तो मरावयाचाच. पण तो मेला म्हणून तत्पूर्वी कधींहि तो धट्टाकट्टा किंवा सतेज रगेल सामर्थ्यसंपन्न असतच नाहीं असे ठरत नाहीं. आम्ही प्रस्तुत पुस्तकाच्या द्वारे मराठेशाहीचे शतसांवत्सरिक श्राद्ध करीत आहो, त्या अर्थी जुनी मराठेशाही नष्ट झाली ही गोष्ट आम्हांस मान्य आहे हें सांगावयास नको. पण हाताने पिंडदान करून तिलांजली सोडीत असताहि भूतकालीन व्यक्ति ही एक वेळ जिवंत होती व तिच्या अंगी अमुक अमुक गुण होते असें म्हणण्याने मनुष्याच्या हातून विसंगतपणा घडतो असे होत नाहीं. सर आलफ्रेड लायल म्हणतो, "मराठी फौजा लुटारू असतील किंवा मराठे सरदार अडमुठे अशिक्षित असतील; पण त्यांची सर्व मुलकी व्यवस्था व वसूल ब्राह्मणांच्या हातीं असे. व हे ब्राह्मण

त्या काळच्या सर्व लोकांत अत्यंत हुषार व कर्तृत्ववान असत."

## मराठ्यांचा राज्यविस्तार

शिवाजीच्या वेळेपेक्षां दुसऱ्या बाजीरावाच्या वेळीं मराठी राज्याचा विस्तार पुष्कळ पटीने मोठा होता. शिवाजीच्या ताब्यांत खालील प्रांत होते. ( १ ) मावळ व त्यांतील १८ किल्ले, ( २ ) वाई–सातारा प्रांत य त्यांतील १५ किल्ले, ( ३ ) पन्हाळा प्रांत व १३ किल्ले, ( ४ ) दक्षिण कोकण व ५८ किल्ले, ( ५ ) ठाणे प्रांत व १२ किल्ले, ( ६ ) व ( ७ ) त्र्यंबक व बागलाण प्रांत व ६२ किल्ले, ( ८ ) वनगड ऊर्फ धारवाड प्रांत व २२ किल्ले, ( ९ ) विदनूर प्रांत, ( १० ) कोल्हार प्रांत, ( ११ ) श्रीरंगपट्टण ( तीन मिळून १८ किल्ले ), ( १२ ) कर्नाटकप्रांत व १८ किल्ले, ( १३ ) वेलोर प्रांत व २५ किल्ले, (१४) तजावर प्रांत व ६ किल्ले. यावरून शिवाजीचें राज्य उत्तरेपेक्षां दक्षिणेकडेच अधिक पसरले होते असे दिसून येईल. त्याच्या राज्याची पश्चिमसीमा अरबीसमुद्र, उत्तरसीमा गोदावरी, पूर्वसीमा भीमानदी व दक्षिणसीमा कावेरी, असे स्थूल मानाने म्हणतां येईल. शिवाजीच्या पश्चात् मराठयांचे राज्य दक्षिणेकडे फारसे वाढले नाहीं; उलट कालांतराने हैदर टिपू व इंग्रज दक्षिणेकडे प्रबळ झाले तेव्हां तिकडे ते थोडेसे हटलें असेंच म्हणावें लागते. पण पुढील काळांत राज्यविस्ताराचा सर्व भर उत्तर व पूर्व इकडे होता. त्यांतल्या त्यांत खाली पूर्वेच्या बाजूस निजामाच्या राज्यानें त्यांना जवळच कुंठित केले. पण उत्तरेकडे त्याची मर्यादा पंजाबापर्यंत गेली व वरच्या मुलखांत पूर्वेस बंगाल्यापर्यंत व पश्चिमेस राजपुतान्यापर्यंत पसरली.

दिल्ली मराठ्याच्या हातून इंग्रजांच्या हाती जाईपर्यंत पातशाही मुलुख व मराठी मुलुख यांची सरमिसळ झाली होती. स्वराज्याचा मुलुख जहागिरीचा मुलुख, चौथाई व सरदेशमुखी वसूल करण्याच्या हक्काचा मुलुख,केवळ खंडणी करभार वसूल करण्याचा मुलुख, घांसदाणा मिळविण्याचा मुलुख व शेवटीं विनोदाने बोलावयाचे तर बेलाशक घोडी घालून लुटण्याचा मुलुख, अशा अनेक नात्यांनीं उत्तरेकडील बराच मुलुख मराठ्यांकडे होता. बादशहाचे गुमास्ते किंवा सेनापति किंवा कमावीसदार म्हणून उत्तरहिंदुस्थानांतील अनेक राजेरजवाड्यांशीं मराठ्यांचे अनेक प्रकारचे राजकीय संबंध उत्पन्न झाले होते. पातशहा व मराठे यांच्या मुलखाची मिळून एक यादी उपलब्ध असून ती खाली दिली आहे.

धाकट्या शाहूमहाराजांच्या वेळीं लिहून ठेवलेला 'सुभे दक्षण व हिंदुस्थानचा झाडा' म्हणून एक कागद 'भारतवर्षांत' प्रसिद्ध झाला होता. त्यावरून पुढील माहिती मिळते.

| | | |
|---|---|---|
| सुभेदक्षण ६ | जमाबंदी | १८२९१८९६५।-॥। |
| सुभेहिंदुस्थान १५ | ,, | ३२४६१६०६३॥।≡ |
| पैकी तपशील सुभेदक्षणचा | | |
| सुभेविजापूर | | ७८२८३९२६॥-। |
| ,, तेलंगण | | ७५९५८९८ |
| ,, औरंगाबाद | | १२०६६९५९॥।- |
| ,, ब्ऱ्हाणपूर | | ५८०८१५९॥।- |
| ,, वऱ्हाड | | १३०५३४८९।-॥ |
| ,, हैदराबाद | | ६६११०५३१॥।-॥ |
| | | १८२९१८९६५।-॥। |

सुभे हिंदुस्थानचा तपशील—

| सरकार | | महाल | देहाय | जमाबदी |
|---|---|---|---|---|
| अकबराबाद | ( १२ ) | २४४ | ३१८०० | २७१००१०३ |
| शहालयाबाद | ( १२ ) | २८१ | ४०५८८ | ३१०१२१५४ |
| अलाहाबाद | ( ८ ) | २१७ | ७९०५ | १०६०९०९७१ |
| हलालाबाद | ( १७० ) | २६९ | ४७६०७ | १८७०४०८ |
| पजाब | ( ५ ) | ३५८ | २७७६१ | १८७०४९८ |
| अयोध्या | ( ५ ) | १५० | ५२६९१ | ९२२५५९१ |
| मुलतान | ( ४ ) | १०३ | ५२५६ | २४७५३४९॥।≡ |
| काश्मीर | ( ० ) | ५३ | ५९५२ | ३५२४५९ |
| अंतर्वेद | ( ० ) | ४८ | १३१६ | ३७४२०१ |
| ठठा | ( ४ ) | ५९ | १३२३ | २३६५३९७· |
| विहार | ( ० ) | २५० | ५५९७६ | ९३३५५५१ |
| माळवा | ( ११ | २६२ | १८६७८ | ८४७२२९९ |
| बगाला | ( ३४ ) | ३५० | ५०७८८ | ८६१९२४६० |
| ओरिसा | ( ४९ ) | १०११ | १३०७८० | १६५५८८५६ |
| गुजराथ | ( १० ) | २१६ | १०३७० | ८९६२८०३ |

एकूण सुभे १५ सरकार २७४ महाल ३८७१ देहाय ४९०७९१ जमाबंदी ३२४६१६०६३॥।-

एकूण सुभे दक्षण व हिंदुस्थान मिळोन २१ सुभे आणि जमाबंदी ५०७५३५०२९०≡॥।

काव्येतिहाससंग्रहांत पातशाही दौलतीच्या जमाबंदीची एक यादी प्रसिद्ध झाली आहे, तिचा सारांश पुढीलप्रमाणें:—

—जमाबंदी रुपये—

| राज्य | सरकार | परगणे अगर महाल | कोटि | लक्ष | हजार |
|---|---|---|---|---|---|
| शहाजहानाबाद ( दिल्ली ) | | २२६ | २ | ८६ | ५८ |
| अकबराबाद ( आग्रा ) | १४ | २६८ | २ | ४५ | ४६ |
| अजमेर ( मारवाड ) ... | ७ | १२३ | १ | ३७ | ५९ |
| अलाहाबाद ... | १६ | २४७ | ० | ९४ | ० |
| बेदर ऊर्फ पैठण ... | ८ | २४० | ० | ९५ | १८ |
| अयोध्या ... | ५ | १२७ | ० | ६६ | १३ |
| उडिया ( जगन्नाथ ) ... | १५ | १३२ | १ | २ | ६२ |
| डाका ( बगाला ) ... | ७ | १०९ | १ | १५ | ७२ |
| अमदाबाद ( गुजराथ ) ... | ९ | ८८ | १ | ४५ | २४ |
| ठठा ( सिंध ) ... | ४ | ५७ | ० | २३ | ७४ |
| मुलतान ... | ३ | ९६ | ० | ६१ | १६ |
| लाहोर ... | ५ | ३१६ | २ | २३ | ३४ |
| काश्मीर ... ... | ० | ४६ | ० | ३१ | ५७ |
| काबूल ... ... | ८ | ९६ | ० | ३१ | ६३ |
| उज्जन ( माळवा ) ... | १२ | ३०३ | १ | ९२ | २६ |
| केदार ... ... | ० | ५० | ० | ३८ | ६५ |
| औरंगाबाद... ... | १२ | १३६ | १ | २७ | ४३ |
| बऱ्हाणपुर ... ... | ६ | १३६ | ० | ५७ | ४ |
| बेदर ... ... | १२ | १३६ | ० | ७५ | ४ |
| इलिचपूर ( वऱ्हाड ) ... | ५ | ६१ | १ | १२ | ५० |
| विजापूर ... ... | १८ | २८१ | ४ | ६९ | ७६ |
| हैदराबाद ... ... | ४२ | ४०५ | ५ | ७७ | ३६ |
| | | | ३३ | १० | ९ |
| पैकीं | | | | | |
| राव पंत प्रधान यांजकडे . | ० | ० | १२ | ४२ | २० |
| नबाब अली निजाम बहादूर | ० | ० | ३ | ४६ | ७३ |
| इंग्रज बहादूर ... | ० | ० | १२ | ३५ | ७८ |
| आबदाली ... | ० | ० | १ | ६३ | १ |
| सीक वगैरे ... | ० | ० | ३ | २२ | ३४ |

अशा तऱ्हेची वांटणी होती. या यादीच्या मथळ्याचें वर्णन असे आहे: " यादी दास्त बेरीज बादशाही हिंदुस्थान औरंगजेब कारकीर्दीचे जमा-

बंदी रुपये रुधिरोद्गारी सवत्सरे ( सन १८०३ ) पुणेचे मोहिमेस गेले असता कुंपणी सरकारतर्फे जेनरल वेलसली बहादूर याणी ठराव केला बेरीज. ”

या यादीपैकीं राव पंडित प्रधान यांच्या हिश्शाचा तपशील खालीं लिहिल्याप्रमाणें दिला आहे:—

| | | | |
|---|---|---|---|
| सरकार | ८ कोटि | ७२ लक्ष | २९ हजार |
| निसबत | ३ | ६९ | ९१ |
| | १२ | ४२ | २० |

पैकीं सरकारचा तपशील ठोकळ मानानें ( आकडे लक्षांचे )

दिल्ली ८५ आग्रा १२१ मारवाड १३ जगन्नाथ १६
माळवा १९२ वऱ्हाड ६५ बऱ्हाणपूर ५५ लाहोर ३०
विजापूर ११९ अहमदाबाद १०७ औरंगाबाद ६२ बेदर ३

एकूण ८ कोटि ७२ लक्ष.

सदर यादीत इंग्रजांकडील उत्पन्नाचा तपशील मिळतो तो येणेप्रमाणे:—

| | कोटि | लक्ष | हजार |
|---|---|---|---|
| खालसात ... ... ... ... | ९ | ४१ | २१ |
| निसबत ... ... ... ... | २ | ९४ | २७ |
| खालसाचा तपशील:— | | | |
| नबाब कासम अल्लीन बंगाला यांजकडून ... | ३ | २ | ३५ |
| सुरतकर नबाब याजकडून ... ... ... | ० | ४१ | ० |
| सुभे औरंगाबाद व परगणे मुंबई साष्टी वगैरे ... | ० | ९ | ० |
| नबाब महंमद अल्लीखान यास चालत होतें ते ... | १ | ८१ | ९६ |
| टिपु सुलतान याजकडून घेतले तें ... ... | २ | २४ | १२ |
| नबाब निजाम अल्लीखान यांनी दिला तो म्हणजे ... | १ | २० | २ |
| अव्वल दफा दिला तो ... ... | ० | ४२ | ८ |
| दुय्यम दफा दिला तो ... ... | ० | ७७ | ९३ |
| चंदावरच्या राजाकडे चालत असलेला हल्लीं कंपनीदाखल | ० | ९९ | ५६ |
| निसबतीचा तपशील:— | | | |
| सुजा उद्दवला बहादूर ... ... ... | १ | ५९ | ८६ |
| नंजनाड किरीटी राजे ... ... ... | ० | ९२ | ० |
| इतर संस्थानिक ... ... ... | ० | ४२ | ७१ |
| झिमानशाहा अबदाल्ली यास ... ... | १ | ६३ | ० |

इतर:—

| | | | |
|---|---|---|---|
| शीख ( लाहोर ) ... ... ... | १ | ९३ | ३४ |
| नेपाळ गुरखे वगैरे ... ... ... | १ | ० | ० |
| सांवतवाडी, श्रीवर्धन हबशी ... ... | ० | ५ | २६ |

एकूण मोगलाई दौलत—३३ कोटि १० लक्ष ९ हजार

वरील सर्व याद्यांतील आंकडे कितपत प्रमाण मानतां येतील याविषयीं शंकाच आहे; तथापि प्रसिद्ध ऐतिहासिक कागदपत्रांत सांपडलेल्या मनोरंजक याद्यांइतकी तरी त्यांची किंमत खास आहे.

१७७४ सालीं इंग्रजांचा हात पेशवाईच्या गृहकलहांत शिरला व मराठे आणि इंग्रज यांच्या भावी युद्धाचें बीज पेरले गेलें. यापूर्वी एक वर्ष रेग्युलेटिंग आक्ट पास होऊन हिंदुस्थानांतील सर्व इंग्रजी मुलुख एका गव्हर्नर जनरलच्या सत्तेखाली येऊन कारभाराचे बस्तान चांगले बसलें होतें. १७७४ सालीं कंपनी सरकारचें उत्पन्न खालीलप्रमाणें होतेः—

| | जमा | | खर्च | |
|---|---|---|---|---|
| | कोटि | लक्ष | कोटि | लक्ष |
| बंगाला | २ | ४८ | १ | ४८ |
| मद्रास | ० | ८९ | ० | ८१ |
| मुंबई | ० | ११ | ० | ३५ |
| | ३ | ४८ | २ | ६४ |

खर्चाच्या बाजूला लष्करी खर्चच अर्थात् मोठा होता. १७७४ च्या सुमारास कंपनीच्या पदरी सुमारें ५३ हजार खडी फौज होती. पैकीं सुमारें चाळीस हजार नेटिव्ह् फौज असून १३ हजार गोरी फौज होती. व कंपनीच्या पदरीं इंग्लंडांत व बाहेर मिळून ७०।७१ हजार टन वजनाचीं ८५ जहाजें होतीं. या वेळीं कंपनीचा व्यापारहि बराच मोठा होता. म्हणजे सरासरीनें दरसाल कंपनी विलायतेतून ६५–६७ लक्षांचा माल आणि सोनें चांदी बाहेर पाठवी; बाहेरून दीड कोटीचा माल विलायतेंत नेई, व विलायतेत कंपनीच्या हातून साडेतीन कोटी रुपयांची विक्री होत असे.

## मराठ्यांच्या दौलतीची सांपत्तिक स्थिति

या सुमारास मराठी राज्याचें द्रव्यबल व मनुष्यबल किती होतें हें पाहूं. ग्रँट डफ याच्या मते एकदर राज्याचा कागदी वसूल दहा कोटि रुपये होता. यांत होळकर शिंदे भोसले गायकवाड यांच्या जहागिरी, मांडलिकांच्या खंडण्या, नजराणे, जमीनबाबीखेरीज इतर अनेक बाबी यांचा समावेश होतो. पण सर्वच कागदी वसूल हातीं येत नसे. हातीं येणारा वसूल सुमारें ७॥ कोटी

असे; पैकीं खुद्द पेशव्यांच्या हातीं येणारा वसूल सुमारें २३/४ ते ३ कोटि असे; नानासाहेब पेशव्यांच्या वेळीं सर्वांत जास्त वसूल येत असे व तो ३१/२ कोटीं- पर्यंत गेला होता. पेशव्यांच्या कारभारांत इंग्रजांचा हात शिरण्याच्या सुमारास कंपनीसरकारचे उत्पन्न एकट्या पेशव्यांच्या उत्पन्नापेक्षां मोठे होते; तरी सर- दारांच्या जहागिरी लक्षांत घेऊन हिशेब केल्यास एकदर मराठी राज्याचें उत्पन्न इंग्रजांच्या राज्याच्या उत्पन्नाच्या दुप्पट होते. पेशव्यांच्या खर्चाचा नक्की अदाज मिळत नाही. तथापि उत्पन्नाच्या मानाने, म्हणजे इंग्रजांच्या खर्चाच्या तुलनेने, पेशव्यांचा खर्च बराच अधिक असावा. १७७४ च्या सुमा- रास कपनीसरकारला कर्ज नव्हते. पण याच्या उलट पेशव्यांना बरेच कर्ज असे. याचें एक कारण असे असावे की, इंग्रजांचा खर्च बांधलेला व पेश- व्यांचा बिनबांधलेला असे. कपनीचे हिंदुस्थानांतील नोकर मुनीमासारखे असत व त्यांच्या खर्चास विलायतेतील धन्याची म्हणजे कपनीच्या भागी- दारांची मंजुरी लागे. कंपनीचे नोकर हे खाजगी व्यापार लाचलुचपत व लूट वगैरेनीं बरेच पैसे मिळवून विलायतेस नेत. पण त्यांचा पगार बांधलेला असून कंपनीच्या उत्पन्नांतून त्यांना मंजुरीशिवाय वाटेल तसा खर्च करितां येत नसे. सर्व हिशेब दर सहामाहीस विलायतेस भागीदारांच्या सभेपुढे ठेवण्याकरितां पाठवावे लागत व हिशेबांवर हिशेबनिसांची तपासणी असे. पेशव्यांच्या राज्यांत पेशवे हे स्वतःच धनी असल्यामुळे अमुक खर्च करा किंवा करूं नका असे म्हणणार कोणी नव्हता. खाजगी खर्च किती व्हावा व दरबारी किती असावा याची व्हावी तशी फोड झालेली नसे. थोरला माधवराव पेशवा वारला तेव्हां त्याची खासगी मिळकत चोवीस लक्षांची होती असे म्हणतात. दुसरा बाजीराव ब्रह्मावर्ताकडे गेला तेव्हां त्याच्याजवळ सुमारे एक कोटि रुप- यांचें जवाहिर होते ! माधवरावाजवळ स्वतःचे २४ लक्ष रुपये होते. तथापि दौलतीस इतके कर्ज होते की, ते फिटेना म्हणून मरणसमयी त्याला दुःख झालें ! आज देशी संस्थानांतून संस्थानच्या उत्पन्नांतून खाजगी रक्कम तोडून दिलेली असते, तरी ती कमीजास्त करणे सर्वस्वीं संस्थानिकांच्या मर्जीवरच अर्थात् असते; तीच गोष्ट पेशवाईतहि असावी असे वाटते. दौलतीतून खासगी- वर होणाऱ्या राजरोस खर्चाशिवाय व्यक्तिशः पेशव्यांचे खाजगी उत्पन्न किंवा खाजगी जहागीर म्हणून असे. थोरल्या माधवरावांची खाजगी जहागीर तीन लक्षांची होती. अशा जहागिरी परराज्यांतूनहि मिळत. उदगीरच्या लढाईनतर तह झाला त्यांत निजामाने सदाशिवरावभाऊस सुमारें दोन लक्ष रुपयांची जहागीर देऊं केली. पराभव पावून शरण आलेल्या रघुनाथरावास पुरंदरच्या तहाने १२ लक्ष नक्त नेमणूक ठरली होती; सालबाईच्या तहांत ही हटली तरी ४ लक्षां- खालीं गेली नाहीं. बाजीराव पेशवा इंग्रजांस शरण गेला तेव्हां त्यास ८ लक्षांची

जहागीर ठरविण्यांत आली. यावरून राज्यकर्त्या पेशव्याच्या दिमतीस सालिना किती खर्च असेल याची कल्पना करितां येते. कर्ज हे दौलतीचे भूषण आहे, व हे भूषण मराठेशाहीत स्वतः पेशव्यांच्या व त्यांच्या सरदारांच्या वांटणीला बरेंच आलें होते. सरजामी पद्धतीप्रमाणे फौज निरंतर बाळगावी लागते; पण फौजेकरितां तोडून दिलेल्या मुलुखाचे उत्पन्न येईल तेव्हां येईल व येईल तितकें येईल ! सरकारी खजिन्यांतून महिन्याच्या महिना पगार मिळण्याची गोष्ट वेगळी ! मराठे सरदाराला सावकार नाही असे क्वचित् होई. पहिल्या बाजीरावाचा व्याप मोठा; तो नेहमी पदरीं मोठी फौज बाळगी, त्यामुळे त्यास कर्ज फार असे. बाजीरावाचीं ब्रह्मेंद्रस्वामीस लिहिलेलीं पुष्कळशीं पत्रे प्रसिद्ध झालेली आहेत; त्या पत्रांत कर्जसंबंधीं गायिलेलें रडगाणे वाचून कटाळा येतो. एके ठिकाणीं तो असे लिहितो कीं, " हल्लीं मी बहुतांचा देणेदार होऊन माझी कुतरओढ चालली आहे; हीच मला नरकयातनाशी वाटते. सावकार व शिलेदार यांच्या पायां पडतां पडतां माझ्या कपाळाचे कातडे गेलें ! " थोरल्या माधवरावाच्या वेळी दौलतीला कर्ज इतके झाले होते की, मरतेसमयी माधवरावास तें एक मोठेच दुःख वाटले, व त्याला समाधान वाटावे म्हणून रामचंद्र नाईक परांजपे याने सावकारास आपल्या नांवचे कर्जरोखे मोबदला करून देऊन माधवरावास मोकळे केले. परशुराम भाऊ पटवर्धन व हरिपंत फडके यांच्या पत्रांतूनहि कर्जबाजारीपणाचा बोभाटा फारच दिसून येतो. दुसऱ्या बाजीरावाचा सेनापति बापू गोखले याचीहि कर्जामुळे हैराणगत झाली होती. त्याने आपला गुरु चिदंबर दीक्षित यास लिहिलेली कांही पत्रे आम्हास उपलब्ध झालीं, त्यांत अथपासून इतिपर्यंत हा एकच विषय आढळतो. सरदार कर्जबाजारी झाला म्हणजे सैन्याचे पगार थकतात व तो स्वतः त्यांचा मिंधा होऊन बसून हुकमतीस कमीपणा येतो. स्वारीच्या मुलखांत लूट करणें व जरब लावून खडण्या बेसुमार वसूल करणें हाहि त्या स्थितीचा एक साधारण परिणाम आहे. मराठे सरदारांचे नांव लुटारू म्हणून जे बद्दू झालेलें आढळते त्याचे हे एक कारण होय. तथापि सावकार लोकांजवळ पुष्कळ पैसा असतो म्हणून त्यांना नाहक लुटून घेतल्याचीं उदाहरणें मात्र आढळत नाहीत. या कर्जबाजारीपणाला दुसरीहि एक बाजू आहे. ती अशी की, कर्जाचे निमित्त सांगून सरदारांना आपल्या सरंजामाचे हिशेब किंवा खंडणीवसुलाचे हिशेब मुख्य सरकारास देण्याचें टाळतां येत असे. शिंदे व नाना फडनवीस यांची हिशेबासंबंधानें नेहमीं तक्रार सुरू असे. सरदारांचे कारकून पेशव्यांच्या दरबारी नेहमीं बोलावले जावे, त्यांनीं वर्षानुवर्ष पुण्यास राहून हिशेब देत असावे; पण हिशेबांचा पुरा उलगडा केव्हांच होऊ नये असेहि होई. हिशेबांची रुजवात घेणारे कारकून पैसे खात व सरदारांचे

कारकून त्यांना पैसे देत, यामुळें दौलतीचे फार नुकसान होई.

सरदारीला कर्ज असले तरी स्वतः सरदारांची घरची गरीबी असेच, असे मात्र मानण्याचें कारण नाहीं. प्रत्येक सरदाराला खाजगी म्हणून उत्पन्न असे. परदरबारचे लोक या सरदारांना त्यांच्या महत्त्वाच्या मानाने अतःस्थ पैसे देत. शिवाय स्वारी फत्ते झाल्यास लुटीचा हिस्सा मिळून जिंकलेल्या राजेरजवाड्यांकडून जिंकणाऱ्या सरदारास स्वतःकरितां स्वतंत्र जहागीर घेतां येत असे. अतःस्थ किंवा दरबारी खर्च ही एक राजरोसपणे कागदोपत्री नमूद करण्याची बाब असे. सरकारी नोकराने खासगी मिळकत राजकारणाच्या व्यवहारांत मिळवू नये अशा प्रकारची सक्ति तेव्हां कडक नसे; आणि ही पद्धत मराठ्यांच्याच काय, पण त्या वेळीं इकडे असलेल्या इंग्रजांच्या कारभारांतहि दिसून येई. क्लाइव्ह हेस्टिंग्ज प्रभृति कंपनीच्या अमलदारांनी लाखो रुपये मिळविले होते; व त्यांची खासगी संपत्ति पाहून विलायतेतील लोक व ईस्ट इंडिया कंपनीचे घरकोंबडे भागीदार यांच्या पोटांत दुखे; यामुळेंच वॉरन हेस्टिंग्जसारख्या मातबर नोकरांवरहि कमिशनें बसून इनसाफ करण्यांत आला. कंपनीस दिवाणीची सनद मिळाली त्यापूर्वी क्लाइव्ह यानें स्वतःकरितां एक मोठी जहागीर मिळविली होती, ती त्यास पुढें कंपनीच्या नांवाने करून द्यावी लागली. लॉर्ड कार्नवालीस याच्या अनेक सुधारणांपैकीं कंपनीच्या नोकरांच्या खासगी मिळकती बंद करणे ही एक मोठी सुधारणा होती; व ही घडवून आणण्याकरतां त्याने नोकराचे पूर्वीचे लहान पगार खूप वाढविले. मराठेशाहीत पगारापेक्षां इतर मिळकतीवर अधिक भिस्त असे. नाना फडणवीस याचा पगार त्याच्या अधिकाराच्या मानाने अगदीं कमी होता; पण नानांची खासगी संपत्तिमत्ता पुष्कळच होती. ती इतकी कीं, दुसऱ्या बाजीरावाच्या कारकीर्दींत त्याला जेव्हां पुणें सोडावे लागले तेव्हां त्यानें एखाद्या मोठ्या लष्करी सरदाराप्रमाणे खास स्वतःची अशी फौज ठेविली होती ! शिवाय त्याने आपले लाखो रुपये पुण्याबाहेर नामांकित सावकारांच्या पेढ्यांवर ठेवीदाखल ठेवलेले असत.

## दप्तर.

पेशव्यांच्या दप्तरांत सर्व प्रकारचे लिहिणे असून त्यांत प्रत्येक खात्यांतील बारिकसारिक गोष्टींचाहि उल्लेख आढळतो. पुणे येथील इनाम कमिशनच्या ताब्यांत हल्लीं असलेल्या या दप्तरांतून कै. रा. ब. गणेश चिमणाजी वाड यांनी काढलेल्या निवडक उताऱ्यांचे दहाबारा खंड पुणे येथील डेक्कन व्हरनॅक्युलर ट्रॅन्सलेशन सोसायटीच्या विद्यमाने छापून प्रसिद्ध झाले आहेत. मराठ्यांच्या राज्यकारभारासंबंधी ज्यांना माहिती हवी असेल, त्यांनीं हे खंड अवश्य वाचून पहावे. या खंडांत फौज, किल्ले, आरमार, जमिनीची मोजणी, पाहणी,

जमाबंदी, सारावसूली, सूट, हस्तेबंदी, मामलेदार कमावीसदार यांचीं कामें, गांवाशिवेसंबंधाचे तंटे, जमिनीची लागवड व बागाइती वगैरे वाढविण्यास उत्तेजन, पिकाची नुकसानभरपाई, गांवठाणे, जमीनविक्री, जमीनमहसुलाचे मक्ते व खोती, जकात, करपट्टी, घासदाणा वगैरे बाबी, गांवकामगार, वतनदार, इनामे, नक्तनेमणुका, वतने, दिवाणी दावे, कर्जवसुली, पंचायती, गुन्हेगारी इनसाफ व शिक्षा, पोलिस, तुरुगव्यवस्था, सरकारी कामगार व जहागीरदार यांचें गैरवर्तन, बडखोरी, फदफितुरी, राजद्रोह, परराष्ट्रांशीं व्यवहार, वकिलाती, संस्थानिकांशी व्यवहार, टपाल, वैद्यक्रिया, शस्त्रक्रिया, टांकसाळी व नाणीं, निरख व मजुरी, गुलामगिरी, वेठ, सरकारी कर्ज, व्यापार व कारखाने यांस उत्तेजन, धर्मविषयक निर्णय, सामाजिक बाबी, ग्रामण्ये, धार्मिक व सार्वजनिक उत्सव, शहरे व पेठा यांची वसाहत, जलमार्गांचा व्यापार, वजने, मापे, सार्वजनिक इमारती, विहिरी तलाव व इतर लोकोपयोगी कामे, वेड्यांची व्यवस्था, किताबती व बहुमान, भूमिगत द्रव्याची व्यवस्था, सरकारी दुकाने, खाणी वगैरे वगैरे शेकडो बाबीसबंधाची मनोरंजक माहिती मिळणारी आहे. सदर उतारे हे तुटक असून त्यांवरून कोणत्याही खात्यांतील कारभाराची समग्र व सुसंगत अशी माहिती मिळू शकत नाही; तरी पण या तुटक्याफुटक्या माहितीवरूनहि पेशव्यांच्या वेळचा राज्यकारभार बराचसा व्यवस्थित होता हे कोणासहि दिसून येण्यासारखे आहे.

## सनदा.

कोणतीहि सनद द्यावयाची तर ती समर्पक असे, तींत दिलेला अधिकार वृत्ति किंवा देणगी यांचा उल्लेख अगदीं नेमका हिशेबी असून त्यांत समाविष्ट कोण होतात, वगळले कोण जातात, यांच्या हक्कमर्यादा तपशीलवार दिल्या जात; व सनदेचा अमल होण्याकरितां तिच्या अनेक प्रती करून ज्या त्या खात्याच्या अधिकाऱ्यांकडे पाठविल्या जात, सनद खुद्द छत्रपतींची दिली असली तरी तिची समजूत स्वत: पेशवे किंवा प्रधानमडळापैकी विवक्षित प्रधान यांजपासून तो खाली ग्रामाधिकाऱ्यापर्यंत दिली जाई. उदाहरणार्थ, "......राजेश्री स्वामी गडावरून खाली उतरून सिंहासनारूढ झाले ते समयीं ब्राह्मणांस इनाम जमीनी वहीत अव्वल दूम, दोन प्रतीची स्वराज्य व मोगलाई एकूण दुतर्फा देखील इनाम तिजाई व हक्क, चौथाई व सरदेशमुखी व साहोत्रा व नाडगौंडी कुलबाब व कुलकानु हल्लीं पट्टी व पेस्तर पट्टी जलतरुतृणकाष्ठपाषाणनिधिनिक्षेपसहित खेरीज हक्कदार करून ६ वेदमूर्ति राजेश्री जनार्दन भट बिन नारायण भट उपनांव सातपुत्रे गोत्र वशिष्ठ सूत्र आश्वलायन जोतिषी मौजे भुईंज व धर्माधिकारी कसबे वाई यांसी समत हवेली परगणें मजकूरपैकीं, चावर ·।।· मौजे पांचवड ·।· मौजे कळंबे ·।·

एकूण ॥। येविषयी पत्रें १ मुख्य पत्र २ मोकदमास ३ चिटणीशी पत्रें. १ देशमूख व देशपांडे १ राजश्री देशाधिकारी व लेखक वर्तमान. १ राजश्री नारोपंडित प्रतिनिधी एकूण ६ ”

## किल्ले

शाहूच्या वेळी दोनशे किल्ल्यांची यादी दप्तरी दाखल होती. प्रत्येक किल्ल्यावर किल्लेदाराच्या हाताखालीं शिबंदी असून शिबंदीचे लोक प्रायः आसपासच्या प्रांतांतले असत व त्यांच्या निर्वाहाकरितां आसपास वतनी जमिनी तोडून दिलेल्या असत. किल्ल्यावरील किंवा किल्ल्याखालच्या नोकरीस ब्राह्मण मराठे महार मांग इत्यादि अनेक जातीचे लोक असत, यामुळें किल्ल्याचें सरक्षण करण्यांत सर्व जातींचे हित असे. किल्ल्याच्या महत्त्वाच्या मानानें शिबंदीच्या मदतींकरितां अरब किंवा गारदी किंवा कवाइती फौज थोडीबहुत असे. कित्येक किल्ल्यावरून तोफा व त्याजकरिता गोलदाज ठेवण्यांत येत. बहुतेक किल्ल्यांवरून पाण्याची तळीं टाकीं वगैरे मुबलक असून धान्य व दारुगोळा यांचीहि तरतूद बरेच दिवसांची केलेली असे. किल्ल्याच्या खर्चांचे लिहिणे लिहिण्यास किल्लेदाराच्या हाताखालीं कारकून असे. पहिल्या माधवराव पेशव्याच्या रोजनिशीत चदनवंदनच्या किल्ल्यासबंधी खालील वेहडा आढळतो.

“ विठ्ठलराव विश्वनाथ यांसी सनद दिली कीं, सालमजकुरी तुम्हांकडे किल्ले चदनगड व किल्ले वदनगड येथील तालुका त्यास नेमणूक खर्चाची बितपशील रुपये

३६० भोजनखर्च ब्राह्मण दररोज असामी पांचप्रमाणे दरमहा रुपये ३० एकूण बारमाही.

१३५ बरहुकूम मुशाहिरा दरसाल

७५ आचारी १

६० ब्राह्मण असामी १

१३५ २

२१६ कित्ता असामी यांसी दरसाल नेमणूक

६० दिवट्या १

७२ आफतागिरा १

६० पोरगा १

२४ दिवटीस तेल द. म. रु. २ प्रमाणें

२१६

७११

एकूण ७११ रु. सालीना मोइन करार करून दिली असे. तुम्ही कारभारांत तफावत सरकारनुकसानी न करतां अखेर साली कच्चा हिशेब आणून समजावणे. ”

किल्ले बहुला येथील नेमणूकबेहडा दिला आहे त्यावरून खालील तपशील आढळतोः—

आढाव व बरकदाज चांगले कसबी ७५ यांस तैनात द. म. ७ रु. प्रमाणे. कारकून ३ कायमचे सालीना ६५० रु. दरकतदार दोन मिळून सालीना २५० रु. ( कबिल्याचा खर्च कापडचोपड मिळून सर्व ) इमारत पडझड नवीन करणें रु. १००० एकूण किल्ल्याची नेमणूक ७६७५ रुपये. किल्ल्यांच्या व्यवस्थेचा तपशीलः “ किल्ला निसबत सरंजाम गांव दिले आहेत लावणी जुपणी यथास्थित करून हाल वसुलापेक्षां जाजती जमा सादणूक करावी. लोकांची नेमणूक केली आहे त्याची हजिरी गैरहजिरी राखीत जावी. लोक मुबदला ठेवू नये. जे लोक ठेवावे त्यांचा तैनात जाबता हुजुरचा शिक्क्यानिशीं करून घ्यावा. किल्ल्याचा चौकी पाहरा अलग नौबत शिरस्तेप्रमाणे करीत जाणें. देवाची जत्रा व नदादीप वगैरे रोषनाई सरबत्ती व कुर्त्री किल्ल्यावर आहेत त्यांस पेशजीपासून नेमणूक चालत असेल त्याप्रमाणे खर्च करणे मजुरा पडेल. बाजे लोक दिवट्या कोठावळा हलालखोर कार्याकारण लागेल ते ठेवून बंदोबस्त करणे. ”

## जमीनबाब

वहिती जमिनी व गांवठाणे यांच्या याद्या गांवच्या दप्तरांत नीट ठेवलेल्या असत व त्यांच्या अनेक प्रती असत. एखादी याद सांडल्यास सही शिक्क्यानिशीं दुसरी याद ( नक्कल ) देतां येई. “ मौजे मजकूरचा थळझाडा व पांढर झाडा कुल कैफत दस्तक शिकियानिशीं फिरून यांजपाशी देणें फिरून बोभाट येऊं न देणे. ” ( रो. शा. )

सारावसुलीची सूट व हप्तेबंदी देण्यांत येई. “ मोकदमानी मौजे रहिमतपूर यांसी अभयपत्र जे कसबे मजकुरास कसाला पडिला यानिमित्त गांव खराब जाला. याकरितां सन इहिदे खमसैन ( १७५२-५३ ची) बाकीपैकीं रुपये ३००० व सन इसन्नेपैकी स्वारी पट्टी एकूण दोन कलमें सूट दिली. तरी बेशक लावणी करणें. खंडणीप्रमाणे उगवणी केली जाईल.” ( रो. शा. )

“ कल्याणभिवंडीच्या कांहीं ब्राह्मणांनीं १० बिघे जमीन ऐनजिन्नस साऱ्यानें केली. त्यांस धारा द्यावयाची ताकद नव्हती. त्यांस धारा ऐनजिन्नस न घेतां नक्की धारा देण्याची परवानगी मिळावी.” ( रो. मा. )

अहमदनगरकिल्ल्याजवळून रघुनाथरावाची स्वारी गेली त्या वेळीं शिपायांकरितां पिकें कापलीं गेलीं; तेव्हां त्या शेतवाल्यांस शेताचा आकार माफ झाला.

परशत्रूच्या स्वाऱ्या देशांत झाल्यानें नुकसानी विशेष होई तेव्हां शेतसाऱ्याची सूट मिळे. स्वारी होऊन गेल्यावर जुनीं कुळें परागदा झाल्यास नवीन कुळांकडून माफक लावणीचा कौल घेतला जाई. ( रो. मा. )

बागलाणांतील एका पाणथळाचा बंधारा वाहून गेला तो फिरून बांधण्यास १०००० रु. लागणार ते भरून राघो नारायण कुळकर्णी यांनीं बदस्ती करण्याचें कबूल केल्यावरून त्याला १४ वर्षें वाढत्या साऱ्याची इस्तेबदी देण्यांत आली. बागलाण प्रांतांत बधारे बांधून पाटस्थळ करून जो नवे बागाइत करील त्यास दरशेकडा १० बिघे जमीन इनाम द्यावयाचा शिरस्ता होता. सदरप्रमाणें इनाम खाऊन लोक पाटबंधाऱ्यांची दुरुस्ती ठेवीत.

नसरापुराजवळ बनेश्वर येथें ८०० रु. खर्चून धरण बांधता येण्यासारखे होते. पैकीं ४०० रु. सरकारनें दिले व ४०० रु. ज्यांची पाणथळ जमीन भिजणार होती त्यांनीं दिले.

तुगभद्रेच्या एका कालव्याचा बांध फुटून नुकसानी होऊ लागली तेव्हां कमाविसदारास कोपळ परगण्याच्या वसुलांतून बांधदुरुस्तीकडे २००० होन खर्चण्याचा हुकूम होऊन जमाबदीत ती रक्कम मजूरा घातली गेली.(रो.मा.)

इजाऱ्याने गांव दिले जात व इजाऱ्याच्या रकमेहून कमाविसदार यांनीं अधिक मागणी केल्यास त्यास ताकीद मिळे.

गांवच्या शिवेसंबधानें किंवा खासगी खात्याच्या जमिनीच्या शिवेसबधाने तटा उपस्थित झाल्यास पंचमार्फत किंवा शपथप्रमाण करून हद्द ठरविली जाई. ( रो. शा. )

गांवठाणची जमीन वस्ती करण्यास लागल्यास गांवखर्चीं वहीत जमिनीपैकीं जमीन देण्यांत येऊन जमिनीचा आकार गांवच्या जमाबदीत बाद घातला जाई. ( रो. मा. )

## गांवकामगार.

गांवकामगारांना गांवच्या लोकांकडून बलुतें मिळे व त्याची कराप्रमाणे अंमलबजावणी होई. शाहूराजाच्या रोजनिशींत पाटीलकुळकर्णी यांचे मान व कर खाली लिहिल्याप्रमाणे आढळतात.

कुळकर्ण्याचे मानः—१ शिरपाव, २ तेल दुकानास दररोज नऊ टांक, ३ चांभाराचा जोडा वर्षास एक, ४ कोळ्याकडून पाणी, ५ लाकडाची मोळी सणाची एक, ६ शाईस तेल व कागदास रुमाल गांवापैकीं, ७ तांबोळ्यांकडील पानें पाटलाच्या निम्मी, ८ दिपवाळी दसरा वाजंत्री, ९ माळ्याकडील माळवे, १० देवळांतील हक्क उत्पन्नापैकीं हिस्सा.

सर मोकदमी वतनाचे हक्क खालीलप्रमाणे आढळतातः—

शंभर रुपये सरकारसारावसुलीस एक रुपया व ऐनजिनसी आका-

रावर वजनी खंडीस १ धडा. जलमार्गाने जिन्नस येईल त्यावर खडीस ३ पायली. वजनी खडीस १० शेर. दर खडी मिठास ३ पायली मीठ. दर बैलास एक रुका जकात. गवळ्याच्या दर म्हशीगणीक सालीना अच्छेर लोणी. तेल्याच्या दर घाण्यास दरमहा अच्छेर तेल. दर गांवास सालीना एक शेर लोणी व एक इरले व एक चांभारी जोडा. अशाच तऱ्हेचे देशमुख देशपांडे नाडगौडा चौगुला वगैरेचेहि हक्क बांधून दिलेले असत. एका दृष्टीने ही कराची आकारणी व त्याची वसुली या गोष्टी भानगडीच्या अशा दिसतात पण सर्व व्यवहार गांवांतल्या गांवांत असून उभयपक्षी तो चांगला माहित व मान्य असे. बलुती कर व मान यांचा वसूल प्रायः बिनतक्रार होई व तटा निघालाच तर तो गांवांतल्या गांवांत तुटे. पाटील व कुळकर्णी यांच्या आगळकीने रयत परागंदा झाल्यास त्यांना रयत जमा करून लावणी करण्याचे हुकूम होत.

## लोकसंरक्षण

मराठेशाहींत गांवगन्ना लोकसंरक्षणाचे तपासाचें व इनसाफाचे पुष्कळसे काम गांवचे लोक आपले आपण करीत. विशेष प्रसंगी सरकारांतून रखवालीचा बंदोबस्त होई. एकादे क्षेत्रीं मोठी यात्रा भरावयाची असल्यास जरूर त्या पोलिस असाम्या तात्पुरत्या नेमल्या जात. घाटांतून चोराचिलटांचा उपद्रव होई, यामुळे तात्पुरत्या किंवा कायमच्या चौक्या बंदोबस्ताकरतां कमाविसदारामार्फत ठेवल्या जात. गुन्हेगार पकडण्याकरतां बक्षिसे लावीत. प्रसंगविशेषी ज्या गांवास पोलिसची मदत दिली त्या गांवच्या लोकांकडून त्याचा खर्च वसूल केला जाई. ही करपट्टी ब्राह्मणांस माफ नसे. दरोडेखोरांचे लक्ष सावकार लोकांच्या घरीच चोऱ्या करण्यावर आहे असे दिसून आल्यास त्यांचा खर्च फक्त श्रीमंत लोकांकडून घेतला जाई; गरिबांस त्याची माफी होई. पोलिसांस हत्यारे सरास दिलीं जात व कमाविसदाराच्या हाताखालील शिबंदी व घोडेस्वार हे लष्करी पोलिसचे काम करीत. मोठमोठ्या शहरीं कोतवाल नेमलेले असत. इतर ठिकाणीं कमाविसदार हेच कोतवाल असून त्यांजकडे फौजदारी इनसाफाचे अधिकार थोडेबहुत असत.

## तुरुंग

पोलिसव्यवस्थेप्रमाणे तुरुंगाची व्यवस्थाहि चांगली असे. गुन्हेगारांच्या पायांत बिड्या ठोकीत; पण प्रतिष्ठित कैद्यास मोकळे ठेवीत. कैद्याच्या स्थितीप्रमाणें त्यास पोटास धान्य किंवा शिधा दिला जाई. तुरुंगांत गुन्हेगारांची गैरअब्रू न व्हावी अशी व्यवस्था करण्यांत येई. ब्राह्मण कैदी असल्यास ब्राह्मणाच्या स्वैंपाकाचे अन्न दिले जाई. कैदी मोकळा ठेवल्यास त्यानें कड्यावरून उडी मारून

जाऊं नये, विष खाऊं नये व ब्राह्मण असल्यास त्यानें आततायीपणाहि करूं नये अशी व्यवस्था करण्यांत येत असे. भोजनसमयीं बिड्या काढण्याची सवलत राजकीय कैद्यांना देण्यांत येई. स्त्रियांनाहि तुरुगवासाची शिक्षा देण्यांत येत असे. तुरुगांतील खोडे फटके वगैरे शिक्षांचा उल्लेख रोजनिशांतून सांपडत नाहीं. नजरकैदेत ठेवण्याच्या कैद्यांना त्यांच्या घरीं ठेवून त्यांजवर चौकी पाहरे बसविले जात. एकदरीने अपराध्यांशीं वागण्याची सरकारची रीति सौम्यपणाची असून फक्त राजकीय गुन्ह्यांखेरीज इतर गुन्ह्यांकरितां शिक्षा दिल्या जात त्या फार कडक नसत. देहान्तशिक्षा फार क्वचित् देत. राजकीय गुन्हेगारास हत्तीच्या पायीं देऊन किंवा डोक्यात मेखसू मारून ठार करीत. खाजगी व्यक्तीच्या सूड वगैरे बुद्धीनें झालेल्या गुन्ह्याकडे फार करडी नजर नसे; पण हत्यारे घेऊन दरवडे वगैरे घालणारांचे हातपायहि तोडले जात. बाप गुन्हेगार असून पळून गेल्यास सक्तीचा उपाय म्हणून त्याच्या मुलास बापाचा पत्ता लागेपर्यंत कैदेत ठेवीत. अशा प्रकारची मोबदला शिक्षा शिवाजीकरितां शहाजीनेंहि विजापूरदरबारी सोसली होती हे प्रसिद्धच आहे. फौजदारी कायद्याचा अमल व तुरुग या बाबतींत न्यायमूर्ति रानडे यांनी पुढीलप्रमाणे उद्गार काढले आहेत.

" नाना फडणविसाची कारकीर्द खेरीज करून इतर वेळीं कायद्याची अंमलबजावणी निर्दयपणाने किंवा सूड उगविण्याकरितां होत नसून फारच सदय व सौम्यपणाची असे. इतकी की, मागे कधीं तशी झाली नाहीं व पुढेहि होईल असें दिसत नाहीं. शिक्षा देत त्या अपराधास योग्य अशा देत; जास्त कडक केव्हांहि नसत. "

## न्यायखातें

मराठेशाहींत दिवाणी व फौजदारी कायद्याची अमलबजावणी चांगली होत असे. पेशव्यांनी पुण्यास राजधानी आणल्यावर साताऱ्या सर न्यायाधीशाचें महत्त्व कमी झाले. पण पुण्यास न्यायाधीशाची जागा ही विशेष महत्त्वाची मानली जात असून त्या जागेवर एकाद्या विद्वान् व निःस्पृह शास्त्र्याची नेमणूक होत असे. न्यायाधीश या नात्याने रामशास्त्र्याची योग्यता प्रसिद्धच आहे. पुणें येथील न्यायकचेरीप्रमाणें प्रांतानिहायहि लहानशा न्यायाच्या कचेऱ्या असत. शिवाय कमाविसदार मामलेदार यांस न्यायनिवाडा करण्याचे दिवाणी व फौजदारी अधिकार कांही थोड्या प्रमाणांत असत. तथापि एकंदरीने न्यायमनसुब्याचें बरेंचसें काम खाजगी रीतीनें निकालांत निघे. शपथप्रमाण व दिव्य करून आपापसांत न भागले किंवा धनकोचा हात रिणकोकडन हक्क वसल करण्याच्या कामीं प्रायः चाले तो नच चालला—

म्हणजे रिणको हा धनकोपेक्षां भारी जोरदार किंवा सत्ताधीश असला–तरच न्यायासनापुढें फिर्याद जाई. फिर्याद दाखल झाल्यावरहि पंच निवडून खाजगी निकाल करून घेण्यास संधि मिळे, व सरकारी न्यायकोर्टाचा विशेष उपयोग म्हटला म्हणजे पंचायतीचा निकाल कांहीं कारणामुळे अमान्य झाल्यास अपील-कोर्ट म्हणून होई. अव्वल चौकशी इनसाफ व साक्षीपुरावा हीं कामें स्वतः न्यायकचेरीत फारशीं होत नसत. शास्त्रार्थ म्हणजे कायद्याचा अर्थ करण्याचा व सांगण्याचा प्रश्न असल्यास तो अर्थात् न्यायधीशाकडे येई. न्यायकचेरींत दावा दाखल करणें ही गोष्ट क्वचित् घडणारी असल्यामुळें दाव्याच्या रकमेस शेंकडा २५ इतकी कोर्ट फी पडल्यास तो मोठासा बोजा वाटण्याचें कारण नव्हते. मुख्य कायदा म्हणजे स्मृतिग्रथ; पण स्मृतिग्रथांतील कायद्यापेक्षां देशाचार कुलाचार ग्रामाचार वगैरे कायद्यांचेच प्राबल्य विशेष असे. यामुळे गांवपंच म्हणतील तसाच न्याय होई. नदींत स्नान करून किंवा शपथप्रमाण करून जर दाव्याचा निकाल होण्यासारखा असेल तर वकिलाचें कारण अर्थातच लागणार नाही. पक्षकार हेच स्वतःचे वकील असत व न्यायाधीश हे न्यायाधीशाचें व उभय पक्षांच्या वकिलाचे काम करीत. सरकारास पचांचा निकाल मान्य न झाल्यास फेरचौकशीसाठीं नवीन पचाईत निवडण्यास सांगण्यांत येई. मोठ्या दाव्यांत खुद्द पेशव्यांपर्यंत दाद मागण्यास रयतेला अधिकार असे. पण लहानसहान बाबतींतहि पक्षकारांचा प्रवेश पेशव्यांपर्यंत झाल्यास त्यांची दाद घेतली जाई. कोणत्याहि तऱ्हेने झालेला अखेर निकाल बजावणीकरितां कमाविसदाराकडे जाई तेव्हां बजावणी सक्तीची व ताबडतोब होई. मराठेशाहींतील अनेक निवाडपत्रें प्रसिद्ध झाली असून निवाड्यांमध्ये कज्जाची हकीकत किती सविस्तर लिहिलेली असते हें पाहण्यासारखे आहे.

## कर व जकाती

जमीनीच्या महसुलाखेरीज किरकोळ कर अनेक असत. निरनिराळ्या धद्यांवर कर असून जकात गांवगन्ना वसूल केली जाई. विशेष लोकोपयोगी धदे असल्यास जकातीची माफी मिळे; पण एरवीं जकात सक्तीनें वसूल होई. खुद्द पेशव्यांकरितां येणाऱ्या मालावरहि विशेष प्रकारचा माफीचा परवाना नसेल तर जकात वसूल केली जाई. अशी एक गोष्ट सांगतात कीं, थोरले माधवरावसाहेब यांची आई गोपिकाबाई इनें खासगी देऊळ बांधण्याकरितां मलबाराहून इमारती लांकूड आणविलें, तेव्हां त्यावर श्रीमतांचे घरचें लांकूड म्हणून जकात वसूल करण्यांत आली नाहीं; पण ही गोष्ट माधवरावाचे कानीं गेली तेव्हां त्यानें शिस्त राखण्याकरितां म्हणून खासगी खर्चांतून जकातीचे पैसे दिले !

## व्यापार व वसाहत

इंग्रजांना आपल्या राज्यांत येऊन व्यापार करण्याची परवानगी दिली यांत मराठ्यांची चूक झाली नाही असे आमचे मत आम्ही पूर्वी दिलेच आहे. पण एक इंग्रजच काय, वाटेल त्या इतरहि परदेशी लोकांस आपल्या देशांत येऊन व्यापार करण्यास परवानगी व सवलती देण्याचे धोरण मराठेशाहीत अव्याहत चालू होते. शाहूच्या रोजनिशीतील एका उताऱ्यावरून असे दिसते कीं, शिवाजीच्या वेळेपासून अरब लोक पश्चिमकिनाऱ्यावरील बंदरांत येऊन सावकारी करीत. पुढे आंग्रयांनीं अरबांना प्रतिबंध केला. तेव्हां मस्कत येथील 'मुख्यांनी' अर्ज केल्यावरून शाहूने त्यांस राजापूर बंदर नेमून दिले. १७३४ साली अरब मलिक महमद याचा शाहूने सत्कार करून तो मस्कतेस परत जाण्यास निघाला तेव्हां त्यास जहाजाची सोय करून दिली. नानासाहेब पेशव्यांच्या रोजनिशीवरून असे दिसते की, विठोजी कृष्ण कामत नामक सारस्वत व्यापाऱ्यास वसईस व्यापार सुरू करण्याकरतां जकातीची माफी करून त्यास पालखी वस्त्रे व राहण्यास व वखारीस जागा दिली ( १७४३ ). तीन वाणी सावकारांस वसई व साष्टी येथे घरे व जमिनी देऊन निम्मी जकात माफ केली ( १७५१ ). उमदुत्तुजार मुल्ला महमद फकरुद्दीन यास अमदाबादेस व्यापार वाढविण्यास उत्तेजन म्हणून दरसाल ९ लाख रुपये किंमतीच्या मालापर्यंत जकात माफ केली. जलमार्गाने बंदर किनारीं व्यापार करणाऱ्या लोकांस अशाच प्रकारे उत्तेजन दिले जाऊन जलमार्गावरील चोरट्या लोकांपासून त्यांचे संरक्षण केले जाई. वादळांत वगैरे किनाऱ्यास वाहून आलेला माल सरकारजमा होई; पण रिकामी जहाजे मालकास परत ताबडतोब देण्यांत येत. उत्तरकोंकणपट्टीचे पार्शी व्यापारी हे डच लोकांचे निशाण जहाजावर लावून डच वसाहतींशीं व्यापार करीत, व त्यांस या बाबतींत सवलती मिळत. कित्येक ठिकाणी सरकारी दुकाने घालून विशिष्ट प्रकारचा व्यापार करविला जाई. उदाहरणार्थ, सकलाद पटू वगैरे कापड, सरकारी खाणींतून निघालेले हिरे वगैरे जिनसांचा व्यापार सरकारमार्फत होई. हिऱ्यांच्या खाणीची स्वतंत्र कमाविस म्हणजे तालुका करीत. सरकारी व्यापारी दुकानांतून कुळांस कर्जे दिलीं जात. कागद, कपडा, कलाकौशल्याचे पदार्थ वगैरे व्यापारी जिनसा लागल्यास कारखानदारास आगाऊ पैसे देऊन मक्ते दिले जात आणि नमुन्याबरहुकूम माल करून घेण्याकरतां व सरकारी माल वसूल होईपर्यंत मालाची विक्री होऊं न देण्याकरतां सरकारी शिपाई बसविण्यांत येत. नवीन बाजारपेठा व गांवगन्ना वसाहतींच्या नवीन पेठा वसविण्याकडे पेशव्यांचें निरंतर लक्ष असे. या पेठा बसविण्याचें कोणी अंगावर

घेतल्यास त्याला राहण्यास जागा गांवठाणचे परवाने, तसेच पेठेत नवीन दुकाने अगर वस्ती होईल तिजकडून माफक दराने भाडे किंवा ऐन जिन्नसी कर अथवा पेठेची कुलकर्णीपणाची वृत्ति वगैरे बहाल केली जात असे. या मोबदला सरकारदेण्याच्या पेठवसुलीचें काम अगर मक्ताहि त्याजकडे देण्यांत येई. पेठवसाहतवाल्यांना दिलेल्या या वतनास शेटेपण असे म्हणत. सरकारी रस्ता अगर सरकारी इमारत यांजकरितां खासगी जागा घ्यावी लागल्यास ती घेऊन तिची किमत किंवा मोबदला दुसरी जागा सनद करून देण्यांत येई.

## सरकारी कर्ज

मराठेशाहींत इतर राष्ट्राप्रमाणे सरकारास वेळोवेळी कर्ज लागे तें खासगी सावकाराकडून घेतले जाई. शांततेच्या काळी श्रीमत सावकार लोकांना यत्किंचितहि उपसर्ग लागत नसल्यामुळे व व्याजाचा दर भारी असल्यामुळे सावकारीचा धंदा फार चांगला चाले. सावकार लोक सर्व प्रकारचे नाणे मुबलक बाळगीत व केव्हांहि कारण पडल्यास त्यांजकडून मध्यरात्रीं वाटेल त्या छापाचे वाटतील तितके रुपये गाड्यावर थैल्या भरून सरकारास किंवा सरदारास हुकमी नेतां येत. मराठेशाहींतील सावकार म्हणजे ती एक बडीं धेंडेच होती. शाहूच्या रोजनिशींत असा उल्लेख आहे की, शिद्द्यावरील स्वारीस बाजीराव गेला तेव्हां स्वारीखर्चाकरता काढलेल्या रकमेवर दरमहा दरशेकडा तीन रुपयेप्रमाणे व्याज ठरवून शिवाय मुदतीत पैसे परत न झाल्यास वसुलीकरता कमाविसी कबुली केली होती ! नानासाहेब पेशव्याच्या वेळीं व्याजाचा द्दर जास्तीत जास्ती दरमहा २॥ टक्के व कमींत कमी १४ आणे असलेला आढळतो; नानासाहेबाच्या रोजनिशीत सन १७४० पासून १७६० पर्यंत ज्यांकडून दरबारने सुमारे १॥ कोट रु. कर्ज घेतले अशा मुख्य मुख्य सावकारांची व कर्जाच्या रकमेची यादी दिली आहे.ती वाचल्यास त्या वेळी मोठे सावकार लोक कोण होते याची माहिती मिळेल.व्याजाचा दर सरासरीनें १ पासून १॥ रु. पर्यंत असलेला दिसतो. थोरल्या माधवरावाच्या वेळीं व्याजाचा दर सर्रास एकोत्राप्रमाणे असलेला आढळतो. सवाई माधवरावाच्या वेळीहि सरकारकर्जाचा व्याजाचा दर सर्रास एकोत्राप्रमाणेच असलेला दिसून येतो.दुसऱ्या बाजीरावाच्या रोजनिशींत सरकारी कर्जाच्या बाबींचा उल्लेख नाहीं. बाजीरावाच्या वेळीं १८०३।४ पासून पुढें शांतता होती, यामुळें सरकारास कर्ज लागलें नसावें. शिवाय सवाईमाधवरावाच्या कारकीर्दीच्या अखेर नाना फडणविसाच्या अंमलांत जमाखर्चाची व्यवस्था उत्तम राहिल्यामुळें सरकारी खजिन्याची स्थिति चांगली होती.

## टांकसाळ व नाणीं

मराठेशाहीच्या काळांत महाराष्ट्रांत अनेक प्रकारची नाणीं चालत. नाण्यांचा मोबदला करावयाचा असतां वर्तावळा व बटाई ही वरतीं द्यावी लागत. व त्यांचे भाव निश्चित होत, यामुळे बराच घोटाळा होई. नाण्यांमध्यें अस्सल सोने रुपे तांबे यांच्या बरोबरीस थोडी बहुत भेसळ मुद्दाम करावी लागे. जेथले नाणे तेथें चालवावयाचे असतां दर्शनी किमत व ऐन किमत यांचा घोटाळा पडत नसे; पण परक्या छापाच्या नाण्यांचा व्यवहार होण्याच्या वेळीं हा घोंटाळा बराच त्रासदायक होई. शिवाजीच्या व इंग्रजांच्या व्यवहारांत एकदां रक्कम ठरविण्याचा प्रसंग आला असतां, "मी दर्शनी किंमत मानीत नाहीं;फक्त ऐन किमत मानीन" असे शिवाजीने म्हटल्याचा उल्लेख या पुस्तकाच्या पूर्वार्धात आलाच आहे. मराठ्यांचे नाणे स्वीकारतांनाहि इंग्रज उलट अशाच प्रकारचा हिशेब करीत. हल्ली सर्व हिंदुस्थानांत एकछत्री राज्य झाल्यामुळे सर्व देशभर प्रायः एकाच प्रकारची नाणीं चालतात. तथापि निजामशाही नाणे अजून चालत असून मोगलाईच्या सरहद्दीवर व मोगलाई मुलखांतील रेलवेवर अद्यापि प्रवाशांची नाण्यांच्यासंबधाने धांदल कशी उडते हें प्रसिद्धच आहे. स्वतःचे नाणे चालविणे हे स्वतंत्र राजसत्तेचे चिन्ह असतांहि हिंदुस्थानांतील निजाम शिंदे होळकर वगैरे संस्थानिकांचे स्वातंत्र्य वस्तुतः नष्ट झाले तरी स्वतःचे नाणे चालविण्याचा त्यांचा अधिकार मात्र इंग्रज सरकारास सक्तीने काढून घेतां आला नाही, त्याचे मन वळवूनच ते करावे लागले. अर्थात् सतराव्या व अठराव्या शतकांत हिंदुस्थानभर चोहोंकडे छत्रेच छत्रे माजल्यामुळे सर्व हिंदुस्थानभर एकच नाणे शक्य नव्हतें. इतर राजांप्रमाणे मराठ्यांनींहि आपलें नाणे सुरू केले होते. तथापि सरकारी अशी एकच टांकसाळ नसून खासगी टांकसाळी घालण्याचे परवाने सरकारकडून लोकांस देण्यांत येत. या बाबतीत खाली दिलेल्या पेशव्यांच्या रोजनिश्यातील त्रोटक उताऱ्यांवरून खासगी टाकसाळींची व्यवस्था कशी करीत हे दिसून येईल.

( रो. नाना. ) कौल बाळाजी बापुजी नागोठणें. टांकसाळ घालावी. १० माशी पैसा करणे. दसमाशी पैसा झाला तर उत्तमच झालें. उणा पैसा झाला तर गुन्हेगारी घेतली जाईल. कौल तीन वर्षांचा. मक्त्याची रक्कम ५०, ७५ व १०० रु.

बहिरो राम दातार रेवदंडा. टांकसाळ घालावी. पैसा वजन १० मासे. तिमाही मक्ता ६०, ९० व १२० रु.

धारवाड येथे जमीनदारांनीं घरोघर टांकसाळा घालून खोट्या नाण्याची चाल केली यामळे तोटा फार पडतो. सबब सर्व टांकसाळा मोडून नाणें पाड-

ण्याचा मक्ता एकास द्यावा. होनाचा शिक्का पहिला आहे तोच करार. होन वजन साडेतीन मासे. रुपया अर्कॉटी फुलचरीप्रमाणें माल खरा, तोल पुरा करावा. मोहोर दिल्लीशिक्क्याप्रमाणें बाराकसी करावी. याबद्दल सरकारास दर-हजारीं ६ मोहरा ( नाणीं ) व ६ रुपये ( नाणीं ) द्यावे. पहिल्या वर्षी कर माफी. शिक्के टांकसाळवाल्यानें आपल्यां कुलुपांत ठेवणेंचे. सरकाराकडून पगारी ढालाईत मदतीस दिले जातील.

( रो. माधव ) पूर्वी नानासाहेब यांनी करार करून दिला त्याप्रमाणे चालले नाहीं. दोन वर्षे दंगा झाला व मामलेदारांनींहि ऐकले नाहीं. याज-करितां कृष्णेपासून तुंगभद्रेपर्यंत खोट्या टांकसाळी मोडाव्या, एक धारवाडी टांकसाळ घालावी, असा परवाना पांडुरंग मुरार यास देऊन ११ कमावीस-दार, २१ जमीनदार, १९ सावकार, २१ घटकार, आणकर व कारागीर वगैरे लोकांस सक्तीचे हुकूम द्यावे. सरकारकचेरींत फक्त या नवीन सर-कारी टांकसाळीचे नाणे घ्यावे, इतर घेऊ नये. टांकसाळीस कोळसा वगैरे सामानाबद्दल रानांतून लांकडे आणतील त्यास आणू देणे म्हणून हुकूम.—सन १७६५.

याच साली नाशिक येथें लक्ष्मण अप्पाजी यास सरकारी टांकसाळेची सनद दिली. मदतीस १ कारकून, २ शिपाई, ५ कारागीर सोनार, १ लोहार, २ घणकरी, १ शिक्के करणार, १ भातेकरी दिले. १००० रुपयांत ४५ रु. नफा मिळावयाचा.

तुकू सोनार व मोराजी सोनार यांस हुकूम कीं, चिंचवडच्या टाक-साळींत खरा रुपया व मोहोर उतरत नाहीं; म्हणून नवीन टांकसाळीचा पर-वाना दिला. तरी सुर्ती शिक्का नाणें न करतां जयनगरी करावा. मोहरा हरसनजी जयनगरी शिक्क्याच्या कराव्या. प्रत्येक नाण्यावरील साल दर-साल बदलावें. मोहरेंत व रुपयांत अंतर पडल्यास पारिपत्य करून गुन्हेगारी घेतली जाईल.

जागजागीचे टांकसाळी यांची घरे सरकारांत जप्त करून कागदपत्र असतील ते हुजूर पाठविणे म्हणून वडगांव, रासीन, तळेगांव ( इंदुरी ), तळेगांव ( ढमढेरे ) वगैरे ठिकाणच्या अधिकाऱ्यांस हुकूम.—सन १७६७.

नसराबाद तर्फ धारवाड येथें टांकसाळीचा परवाना द्यावा. नाणे होन वजन ३॥ मासे. पैकी २॥ मासे व अर्ध गुंज चांगलें सोने दिल्लीशिक्का जुने मोहरेचे कसाचें. भरीस रुपे ५॥ गुंजा. मोहोर वजन दिल्लीशिक्का अलमशाही वजन पाऊण तोळा पावणेदोन मासे एक गुंज. रुपया वजन ११। मासे चांदी दिल्लीछाप. सनदेबद्दल नजराणा ५०१ रु. सन १७६७.

( रो. स. माधव ) धारवाडी रुपयास व चांदीस जळ चार गुंजा

यावी. ४॥-५ गुंजा आली तरी टकसाळे आणवून पारपत्य करून खोट्या रुपयांतील तोटा व गुन्हेगारी घेऊन ताकीद देणें. जमखडीचे टकसाळ्यासंबंधीं हुकूम सदरप्रमाणे.—सन १७७७.

खुर्दा पाडण्याच्या टांकसाळीचा परवाना कोंकणप्रांताकरितां दुल्लभशेट वगैरेंच्या नांवें नजराणा रु. १२००१. सवलती—इतरांस परवाना मिळणार नाहीं, अलिबागेहून व इंग्रजांचे तालुक्यांतून दुसरा खुर्दा येऊं न द्यावा. नजरपट्टी कर माफ.—सन १७८२.

( रो. बा. २ ) वांई कऱ्हाड सातारा येथे खोटे मलकापुरी रुपये पसरले म्हणून चांदवडी चालू करावे. सरकारवसूल घेणें व खर्च करणे तो चांदवडी नाण्याचा करावा.—सन १८००.

## मराठेशाहींतील नाण्यांचीं नांवें

पैसे—ढब्बू १८॥ मासे; अलमगिरी १३॥। मासे; शिवराई ९। मासे.

रुपये—जोधपुरी चांदवड गंजीकोटी मिठे खंदार.

होन—एलोरी हैदरी सनगिरी हरपनहल्ली व्यंकटपती महमदशाही एकेरी धारवाडी नवे धारवाडी.

मोहरा—दिल्लीशिक्का अहमदाबादी चलनी मालखेड खटवा १४ रु. १० आणे. सुरती औरंगाबादी बनारसी जहानाबादी मच्छलीबंदरी पटणी लाहोरी बऱ्हाणपुरी दर १३॥। प्रमाणें.

## अबकारी

पेशवाईत अबकारी खाते फक्त नांवाचें होते. दारूचे सरकारी उत्पन्न मुळींच नसे म्हटले तरी चालेल. सवाईमाधवरावाचे वेळी अबकारी खात्याची प्रवृत्ति दारूची निपज कमी करण्याकडे होती. कोंकणांतील भंडार-माडाची दारूहि बंद करण्यांत आली होती. मात्र फिरंगी गोरे किरिस्ताव नवे सरकारनोकरीस ठेवले त्यांचे दारूशिवाय चालत नसे, म्हणून त्यांच्याकरितां त्यांना फक्त आपल्या खपापुरती दारू तयार करण्यास भट्टी लावण्याची परवानगी देण्यांत आली होती. बंदुकीची दारू तयार करण्यास कलाली दारू लागे, ती सरकारामार्फत तयार होई.

दुसऱ्या बाजीरावाच्या वेळीं गुजराथेतील मोहाच्या फुलांच्या विक्रीवर लहानसा कर असे. सन १८०० सालीं बलसाडचा पार्शी दोराबजी रतनजी यास मोहाचीं फुलें खरेदी करण्याचा व विकण्याचा मक्ता दरसाल ५० रुपयाला देण्यांत आला होता, असा दुसऱ्या बाजीरावाच्या रोजनिशींत उल्लेख सांपडतो. पेशवाईत अबकारीचा मक्ता बहुधा पार्शी लोकांकडेच असे.

## वेठ–गुलामगिरी

वेठीची व गुलामगिरीची चाल मराठेशाहीत असे. हल्ली कोणासहि त्याच्या इच्छेविरुद्ध उघडपणे वेठीच्या नोकरीस धरतां येत नाहीं. पण तसा प्रकार पूर्वी नव्हता. अर्थात् वेठीस धरलेल्या मनुष्यास पोटगी देण्यांत येत असे; पण त्याजवर नोकरी करण्याची सक्ति होई, ही गोष्ट नाकबूल करतां येत नाही. गुलाम आणि विशेषतः खालच्या जातीच्या स्त्रिया यांची खरेदीविक्री होत असे. परदेशी व्यापारी लमाण वगैरे अशा बायका सांपडतील तेथून आणून या मुलखांत विकीत. परतु गुलामगिरी या शब्दाला पाश्चात्त्य देशांतील अनुभवावरून जो एक भयकर अर्थ चिकटून बसलेला आहे तो या वेळी त्या शब्दास नव्हता. गुलामगिरी म्हणजे स्वातंत्र्यनाश किंवा खुषीविरुद्ध नोकरी इतकाच प्रकार होता. गुलामांना निर्दयपणाने वागविल्याचा दाखला फारसा कोठे मिळत नाहीं. हल्ली खानदेशांतहि वंशपरपरागत सालियानदार नोकर असतात तशाच प्रकारचे जवळ जवळ हे गुलाम असत. धन्याची नोकरी इमानानें केल्यास गडी कुणबिणी यांना बक्षीस देऊन किवा जमीन वगैरे देऊन सुखी व स्वतत्र करण्यांत येत असे. एका धन्याचा गुलाम दुसऱ्या धन्याकडे गेल्यास सरकारमदतीनें ज्याचा त्यास तो परत मिळे. कुणबिणींची वगैरे मोजदाद पागेकडील जनावरांत अगर असामींत होई व त्यांचा जमाखर्च ठेवला जाई ! बिनवारशी अनाथ अत्यंत दरिद्री अशा लोकांवर गुलामगिरीची आपत्ति सर्व देशांत सर्व काळी येतच असते. इग्रजी साम्राज्यांतहि गुलामगिरी कायद्यानें नष्ट होऊन अद्यापि शभर वर्षे झालीं नाहींत. वसाहतींतून ही चाल अप्रत्यक्ष रीतीने अजूनहि अंमलांत आहे. किंबहुना आज देखील हिंदुस्थानांत आसाम वगैरे ठिकाणी अगर हिंदुस्थानजवळ सिलोनमध्येंहि मुदतबदीच्या कराराच्या रूपानें गुलामगिरी थोडीबहुत वास करीत आहेच.

## प्रवास व टपाल

बरोबर पैसाअडका घेऊन राजमार्गानें दूरचा प्रवास निर्भयपणाने करितां आला म्हणजे ते राज्य सुराज्य असा सर्वकाळीं एकसारखाच समज असावा हे स्वाभाविक आहे. हल्लींच्या शांततेच्या इंग्रजी राज्याचे वर्णन करितांना "काठीला सोने बांधून काशीपासून रामेश्वरापर्यंत खुशाल जावें" असें म्हणण्यांत येतें. पेशवाईच्या काळीं या अर्थानेहि सुराज्य अस्तित्वांत असावें असे दिसतें. हल्लीं आगगाड्या झाल्यामुळे काठीला सोनें बांधून प्रवास करणे सोपे झालें आहे; तथापि आगगाड्यांतूनहि चोऱ्या होतच नाहींत असे नाहीं. तें कसेहि असो; पेशवाईतील एका काळासंबंधानें तरी तत्कालीन लोकांनीं हल्लीं सुराज्य आहे असें या अर्थी म्हटलेलें आढळतें. सवाई माधवरावसाहेबांच्या

कारकीर्दीस उद्देशून बखरकार लिहितोः—" श्रीमंत सवाईमाधवराव अवतार धारण केल्यापासून अलीकडे सडयांनीं पुण्यापासून दिल्लीपावेतो लाखो रुपयांचा जिन्नस सोने रुपे व जवाहीर घेऊन गेले असता मार्गांत निर्भय जाऊन यावे, या रीतीने स्वतेजप्रतापेकरून सहज रीतीने बंदोबस्त आहे."

( राजवाडे—खंड ४ )

मराठी राज्यांत हल्लींप्रमाणे आगगाडया व तारायंत्रे नव्हतीं. तथापि एवढ्या राज्याचा कारभार किंवा खासगी लोकांचा व्यवहार टपालाची कांहीं व्यवस्था असल्याशिवाय होणे शक्य नव्हते; व तशी व्यवस्था होतीहि. त्या काळीं बातमीचीं साधने हल्लींसारखीं सुधारलेली नव्हती, तरी बातमी समजून घेण्याची जरूरी किंवा हौस कमी होती असे नाही; एवढेंच नव्हे तर, सरकारी डाकेशिवाय खासगी डाकहि चालू असे. क्वचित् प्रसंगी उंटावरून किंवा स्वाराबरोबर पत्रे पाठविण्यांत येत; परंतु सर्वसाधारण रीती म्हटली म्हणजे मनुष्याहातीं टपाल धाडण्याची असे. जो धंदा पिढ्यानुपिढ्या चालू राहतो तो करणाऱ्या मनुष्यांची एक प्रकारची जात सहजच निर्माण होते; व टपाल वाहून नेण्यात ज्यांनी जन्मचे जन्म घालविले व या धंद्यांत प्राविण्य मिळविलें असे लोक त्या काळी शेकडो हजारो होते. टपाल वाहून नेणारास जासूद हरकारा किंवा काशीद म्हणत. लहान मजल असल्यास एकेकटा टपालवाला धाडण्यांत येई; पण मोठया मजलीवर किंवा कागदपत्र महत्त्वाचे असल्यास काशीदजोडी धाडण्यांत येई; कां कीं, वाटेत आजार अपघात किंवा दगाफटका होऊन एक निरुपयोगी झाल्यास दुसरा तरी ते काम उरकू शकेल. प्रत्येक सरकारी कचेरीतून किंवा व्यापारी पेढीवर आवक-जावक टपाल-पुस्तक असे; व बहुधा प्रत्येक सरकारी कचेरींतून व व्यापारी पेढीवरून रोजच्यारोज गांवोगांव पत्रे रवाना करण्याचे काम सुरू असे. सामान्य प्रतीचे लोकांकडून अर्थात् स्वतःचे जासूद पाठविण्यांत येत नसत; परंतु ज्या त्या ठिकाणच्या सरकारी कचेरीच्या टपालाबरोबर खासगी लोकांची पत्रे पाठविण्याची थोडी बहुत सोय असे, व त्याकरतां ठराविक आकार घेण्यांत येई.

डाक पाठविणे ती कातडयाच्या पिशव्यांतून बंदोबस्ताने पाठविण्यांत येई. टपालवाल्याचे ओझे हमालानें वाहण्याइतके जड नसले तरी बरेंच जड असे. सरकारी टपालाचे टप्पे असत, व गांवांत टपालवाला आला की, विलंब न करतां त्याचें ओझें दुसऱ्या टप्पेवाल्याच्या स्वाधीन करून त्याला ताबडतोब रवाना करणें हें गांवकामगारांचे एक महत्त्वाचे कर्तव्य असे; आणि या कामीं कसूर झाल्यास त्याबद्दल शिक्षा होई. टपालवाल्याला सरकारी खर्चानें पायतण व काठी देण्यांत येई. या काठीला घुंगरू लावलेले असत; त्यांच्या आवाजानें टपालवाल्याच्या चालीला तालदार गोड सुराची साथ होऊन त्याच्या

श्रमाचा थोडासा परिहार होई, रानांतून जातांना लहानसान श्वापदें भिऊन पळून जात, आणि पुढील टप्पेवाल्यास तयार होण्याची सूचना मिळे. घुंगराचा आवाज ऐकला कीं, जरूरी व ताबडतोबी यांचा मनांतून इशारा होण्याची सवय लोकांना लागून गेली होती; व टपाल म्हटले कीं, त्याला अडविणें म्हणजे एक प्रकारचा सरकारी गुन्हा करणें असे लोकांना वाटे. सरकारी टपालाच्या मजलीचा टप्पा लहान असल्यामुळे सरकारी डांक लवकर जाई, परतु खासगी टपालवालेहि वेळ पडल्यास रोजीं ३०।३५ मैलांची मजल करीत; व कैक वेळां तर दरबारापेक्षां बाजारांतच दूरची बातमी आधीं पसरे! " कासिदाचा करार पचविसा रोजीं तेथें ( काशीस ) पावावें व जाब पंचविसा रोजीं ( पुण्यास ) यावें. करार रुपये पंचविस व रोज शेर अन्न " असा पुरावा मिळतो. कलकत्त्याहून दिल्लीस भर पावसाळ्यांतहि पंधरा दिवसांचे आंत डांक जाई. सरकारी टपालवाल्यास नदीवर ताबडतोब नांव किंवा सांगड हक्कानें मिळे. तसेच जंगलांतून वाट असल्यास नजीकचे गांवकामगार त्याला अडचणीच्या जागेपुरती सोबत व मशालहि देत. बगीडांकेपेक्षां हरकाऱ्याची डांक अधिक जलद व हरकाऱ्याच्या डांकेपेक्षां काशीदडांक अधिक जलद पोंचे. सरकारी डांकवाल्याला दरमहा पगार असे. खासगी डांकवाल्यास खेपेपुरते वेतन ठरविण्यांत येई, व पत्रे मुक्कामाला पोचतीं झालीं म्हणजे तेथे ते मिळे. वाटखर्चीपुरती थोडी रक्कम आगाऊ मिळे.

## पदव्या

मराठेशाहींतहि बहुमानाच्या पदव्या देण्यांत असत, व त्या घेऊन लोक स्वतःस बहुमानास्पद समजत. मनुष्यस्वभाव नेहमी सारखाच असतो. कांहीं पदव्यांचीं नांवे पुढें दिलेलीं आहेत. हिंदूराव, हिम्मतबहाद्दर, समशेरबहाद्दर, बजारतमाआब, सेनापति, सेनाखासखेल, सेनासाहेब सुभे, सेनाधुरंधर, धुरंधर समशेरबहाद्दर, महाराव, रुस्तमराव समशेरबहाद्दर, फत्तेजंगबहाद्दर, सफेजंगबहाद्दर, सर लष्कर, सेनाबार हजारी.

मात्र या पदव्या बहुधा भरीव असत. म्हणजे पदवीबरोबर प्रायः जहागीर किंवा वतन कांहीं तरी मिळे. पदवीदानाचा खर्च पदवी दिलेल्या लोकांकडून घेत नसत. इतमाम सांभाळला जावा अशी सरकारकडून तजवीज होई. विठ्ठल शिवदेव यास तास वाजविण्याचें घड्याळ बाळगण्याची परवानगी होऊन त्याचबरोबर घड्याळजी म्हणजे तास वाजविणारा याची नेमणूक सरकारांतून करून दिली. पालखीचा खर्च आणि भोई लोकांचा पगार सरकारांतून मिळे. सन १७५३।५४ सालीं अखेराज नाइक नांवाच्या वंजारी लमाणास नगारा व निशाण बाळगण्याची परवानगी देण्यांत आली; त्याचें काम बैलांच्या तांड्यां-

वरून धान्याचा व्यापार व मुलखांत आमदरफ्त्ती करण्याचें होतें. कोणास अबदागिरीचा व मशालीचा मान दिल्यास त्यास अबदागीर धरणाराचा व दिवट्याचा पगार दिला जाई. तसेच चवरी दिल्यास चवरीखर्च मिळत असे.

## विद्यावृद्धि व सुधारणा.

विद्यावृद्धि व भौतिक प्रगति करणे हे सुधारलेल्या राष्ट्राचे एक कर्तव्य आहे. पण तत्कालीन युरोपियन राष्ट्रांच्या मानाने पाहता या बाबतीत विशेष कीर्ति मिळविण्यासारखे मराठ्यानी काही केले नाही असेच म्हणावे लागते. मराठ्याचे लक्ष विद्येपेक्षां राजकारणात केव्हाहि अधिक रममाण झालेले होते. शिवाय पूर्ण शांततेचा असा काळ त्याना लाभला नाही. या दोन कारणामुळें मराठ्यांच्या हातून विद्यावृद्धि किंवा भौतिक सुधारणा फारशी झाली नाही. त्यांचे समकालीन इंग्रज हे मराठ्याच्या मानाने शास्त्रे कला व जगाचे ज्ञान या बाबतीत पुष्कळच पुढे होते. तसे असल्याशिवाय ते सहा हजार मैलावरून इकडे आलेच नसते. मराठे उंबरांतल्या किड्यासारखे होते असे म्हटले तरी चालेल. महाराष्ट्र किंवा कोंकण हे प्रांत सुपीक नव्हत, व केवळ त्याच्या उत्पन्नावर अवलबून राहून आपण समृद्ध व सुखी होणार नाही हे मराठ्यांस माहीत नव्हते असे नाही. पण शास्त्रज्ञान मिळविणे, कला व हुन्नर शिकणे, व्यापार वाढविणे किंवा शेती सुधारणे असल्या—म्हणजे द्रव्योत्पादक—गोष्टीकडे त्यांचे लक्ष गेले नाही. राजकीय बाबतीत ते महत्त्वाकांक्षी असले तरी भौतिक सुखाच्या बाबतीत ते अल्पसंतुष्ट होते. मराठ्याना आपल्या कामापुरते तरी शास्त्रे व कला यांचे ज्ञान होते असेंहि म्हणता येत नाही. त्यांचे मुख्य काम लढण्याचे; पण त्यांना तोफा व बंदुका याच्या बाबतीत युरोपियनांवर बरेचसे अवलबून राहावे लागे, मग इतर कलांच्या ज्ञानाविषयी बोलावयासच नको. अठराव्या शतकांतील हिंदुस्थानच्या कलाकौशल्याचा लौकिक आहे खरा; पण त्या लौकिकापैकी फारच थोडा भाग मराठ्यांच्या वांटणीस येण्यासारखा होता. त्यांची साधी राहणी एका अर्थाने गुण असला तरी त्या साध्या राहणी-मुळें डोळे उघडून जगभर दूरवर चोहोंकडे बघण्याची इच्छा त्यांना झाली नाही हा दोषच म्हणावयास हरकत नाही. मुसलमान हे मिजासी होते हा एका अर्थाने त्याचा दोष असला तरी त्याच मिजासीच्या इच्छेमुळे त्यांनीं उद्योगधंदे कलाकौशल्य व व्यापार यांचा अधिक परिचय संपादिला होता. मुसलमान इतके देश ओलांडून हिंदुस्थानांत आले या एका गोष्टीवरूनच त्यांचें भूगोलज्ञान मराठ्यांपेक्षां अधिक होते असे ठरते. नाना फडणवीस हा चौकस होता; तरी पण त्याच्या दप्तरांतला भूगोलवर्णनाचा जो कागद रा. ब. पारसनीस यांनीं प्रसिद्ध केला आहे तो पाहून पुष्कळांस हंसू येईल.

ग्रँट डफच्या इतिहासास इतर रीतीनें कोणी कितीहि नांवे ठेवो; पण त्या मराठ्यांविषयींचें ज्ञान कोणाहि मराठ्याच्या ज्ञानापेक्षां शतपट अधिक खा होतें. मराठ्यांचे बरेचसे भूगोलविषयक ज्ञान 'दंडकारण्यमहात्म्या' वरू घेतलेले असून त्यांच्या इतिहासाचे मुख्य उगमस्थान म्हटलें म्हण 'भविष्यपुराण' हे होते! सदाशिवरावभाऊने दिल्लीनतर रूमशामचे तख्त हस्तगत करण्याची महत्त्वाकांक्षा बोलून दाखविल्याचे वर्णन बखरींत आहे पण रूमशामीची पातशाही या शब्दांखेरीज त्याला तिचे फारसे अधि ज्ञान नसावे! 'फराशी' म्हणजे फ्रेंच हे त्यांना प्रत्यक्ष माहीत होते. प फ्रान्स देशाचा पूर्वेतिहास काय असेल याची मराठयानी कधी अस्थापूर्व चौकशी देखील केली नसावी. टिपूने आपले वकील पारीस येथे पाठवू मुसलमानी वकिलातीच्या आवारांत आपले अर्धचंद्रचिन्हित निशाण कांह दिवस फडफडत ठेवले होते. टिपूला मराठ्यांपेक्षां परदेशाचे ज्ञान बरे अधिक असावे असे वाटते. बर्कच्या वेळी दोघे ब्राह्मण विलायतेस गे असल्याचे सांगतात, पण विलायतेच्या वर्णनाचा इंग्रजांकडून कां होईन पण माहिती मिळवून लिहिलेला एकाददुसराहि कागद इतिहाससंशोधकां अद्यापि कोठे मिळाल्याचे ऐकिवांत नाही. "फराशिसाच्या रयतांनी आपल राजा मारला" अशा बातमीचा उल्लेख मराठी कागदपत्रांतून सांपडतो पण फ्रेंच राज्यक्रांतीची तत्कालीनांना उपलब्ध होण्यासारखीहि माहित मराठ्याना नसावी असे वाटते. रा. राजवाडे म्हणतात "युरोपांत तत्काली दरबारांतून म्हणजे पधरावा लुई, बडा फ्रेडरिक, दुसरा जार्ज यांच्य दरबारांतून व राज्यांतून भूगोलाचे व इतिहासाचे जे ज्ञान त्या वेळ होते त्याच्या मानाने पेशव्यांच्या दरबारचे इतिहासाचे व भूगोलाचे ज्ञा अगदींच क्षुद्र होते हे कबूल करणे योग्य आहे. कपिल कणाद वगै पुराणमुनिप्रणीत शास्त्रांच्या व्यतिरिक्त युरोपांत ठाऊक असलेल्या शास्त्रां गधहि पेशव्यांच्या राज्यांत कोणाला नव्हता. पाठशाळा विद्यापीठे विद्वत्सः अजबखाने वादसभा शोधसभा पृथ्वीपर्यटणे वगैरे युरोपियन संस्था पेशव्यांच राज्यांत नव्हत्या इतकेंच नव्हे तर, त्या दुसरीकडे कोठे आहेत कि काय याचा पत्ताहि महाराष्ट्रांत कोणाला नव्हता! या नकारात्म वाक्यांचा इत्यर्थ एवढाच कीं, अठराव्या शतकाच्या पूर्वार्धात व उत्तर र्धात मराठ्यांची संस्कृति युरोपांतील प्रगत राष्ट्रांच्या संस्कृतीहून कम दर्जाची होती. पेशव्यांनी मुद्रणकला इंग्रजांपासून कशी उचलली ना याचे राजवाड्यांनीं आश्चर्य प्रदर्शित केले आहे. पण वैदिक विद्येत जेथे सर्व विद्यांची परिसमाप्ति मानली जात असे तेथें छापखान्यांचे क काम? वेदविद्या ही फक्त अधिकृत लोकांसच मिळावयाची: व वेदपठ

हेंच वैदिकांचें काम, वेदभाष्याचा अभ्यास असला तर फार थोडा; यामुळें छापखान्याची गरजच नव्हती. धर्मग्रंथांबाहेर स्वतंत्र वाङ्मय असा पदार्थच असूं शकत नाही अशी मराठेशाहींत कल्पना होती. मोरोपंताची कविता आज आपण वाङ्मय सदरांत घालतो; पण पेशवाईच्या काळच्या ग्रथसूचींत ती कदाचित् धर्मग्रथांतच पडली असती. मोरोपंताच्या ग्रथांत मुख्यतः भारत भागवत रामायण हेच विषय असल्यामुळें व त्याची स्फुट कविताहि केवळ भक्तिप्रधान असल्यामुळे त्या वेळीं ते ग्रथ धर्मग्रंथांच्या सदरात घालणेच अधिक प्रशस्त वाटले असते. मोरोपतांच्या ग्रथांच्या पोथ्या लिहून घेतल्या जात; पण अब्राह्मणांच्या हाती मोरोपताची कविताहि ब्राह्मणानें सहसा पडूं दिली नसती असे वाटते. वेद वेदांगे पुराणें हें तर धर्मवाङ्मयच होय; वाटेल ती विद्या धर्मपर मानण्याची–धर्माच्या सदराखाली कोंबण्याची–प्रवृत्ति फार जारी होती असे दिसते. धर्मविचाराची ही एककली दिशा सोडून दिली तरी व्यावहारिक शिक्षणहि फारसे नव्हते असेच आढळून येते. अक्षर, साधें गणित, हिशेब व थोडेसे सस्कृतज्ञान यांतच उच्च प्रतीच्या गृहस्थाच्या शिक्षणाची परिसमाप्ति तेव्हां होत असे.

भौतिक सुधारणेला वाङ्मयप्रसार हा जसा अवश्य असतो तसेच परदेशगमन हेंहि व्यवहारचातुर्याला अत्यत उपकारक असते. पण परदेशगमन मराठ्यांनीं वर्ज्य मानिले होते. तसेच स्वदेशांतहि हिडून फिरून सृष्टिनिरीक्षण करून दुसऱ्याचे कलाकौशल्य शिकणे याहि गोष्टी मराठ्यांनी फारशा केल्या नाहीत;यामुळे उपयुक्त पदार्थाकरितां त्यांस दुसऱ्यावर अवलबून रहावे लागे. राजसत्तेच्या भरांत असल्यामुळे तत्कालीन मराठ्यांना आमच्याप्रमाणे स्वदेशी तत्त्वाची गरज भासली नसेल; पण पुढे पुढे त्यांचे परावलबित्व त्यांचे त्यांनाहि भासू लागले असेल. पल्लेदार तोफा बदुका पाणीदार तरवारी व कस्यारी होकायत्रे दुर्बिणी वगैरे युद्धोपयोगी पदार्थ, तसेच घड्याळे हंड्या झुंबरे आरसे उत्तम रेशमी कपडा तलम बारीक मलमल वगैरे व्यावहारोपयोगी पदार्थ याकरिताहि त्यांना इग्रज चिनी मुलसमान वगैरे लोकांच्या तोंडाकडे पहावे लागे.परदेशी व्यापारी मराठ्यांच्या सौद्यावर गबर होऊन जात. मिजासी किंवा उपयुक्त जिनसा वापरण्याची हौस मराठ्यांना मनांतून मुळीच नव्हती असे नाही. पण या जिनसा स्वतः उत्पन्न करण्याची इच्छा त्यांना फारशी झाल्याचे आढळत नाही.

मराठेशाहींत शिक्षणाची पद्धत हल्लींहून अगदीं वेगळी होती. सार्वजनिक शिक्षणसस्था नव्हत्या असे म्हटलें तरी चालेल. व्यावहारिक शिक्षणाला पंतोजीच्या शाळा व वेदशास्त्रशिक्षणाला शास्त्री लोकांच्या घरच्या पाठशाळा असत पंतोजीला अमावास्या–पौर्णिमेस व सणावारी कांहीं देणगी दिली जात असे;पण पाठशाळेंतील शिक्षण सर्व धर्मार्थ असे,इतकेंच नव्हे तर, उलट घरचे खाऊन

पिऊन सुखी असे जे शास्त्री असत, त्यांच्या घरीं विद्यार्थ्यांना जेवावयास घालण्यांत येई ! विद्वान् झालेल्या शिष्यांनीं गुरूचें नांव अभिमानानें सांगणे व गुरु घराण्याची परंपरा स्मरणे एवढाच मोबदला शिष्याकडून मिळे. सरकारने शाळा काढल्या नसल्या तरी विद्वान् शास्त्रीपंडितांस वार्षिक दक्षिणेशिवाय जमिनी वगैरे इनाम दिल्या जात. व अशा रीतीनें सरकारी खजीन्यांतून शिक्षणास अप्रत्यक्ष मदत होई.पेशव्यांच्या रोजनिशीतून व इतरत्रहि वैदिक शास्त्री पंडितांस जमिनी इनाम दिल्याचे दाखले मिळतात. त्यांत केवळ स्नानसंध्या करून सुखरूप राहून राज्याचें अभीष्टचिंतन करून आशीर्वाद देत जाणे एवढ्याच भावी मोबदल्याची अपेक्षा केल्याचें दिसते ! निवळ धर्माचरण करणारा व स्नानसंध्या पोथीपुस्तक व शिष्यमंडळ यांमध्ये आपला सर्व वेळ घालविणारा असा वर्ग तेव्हा बराच असे.वेदशास्त्रे यांचे अध्ययन अध्यापन आणि पंडितगिरीची तालीम यांचीं लहानसान पीठे मुख्य मुख्य क्षेत्री असून आद्य पीठ श्रीक्षेत्र काशी येथे होते. कर्मधर्मसंयोगाने काशी प्रयाग गया वगैरे उत्तरेकडील मोठी क्षेत्रे प्रायः विजातीय लोकांच्या अमलांत राहिली; व मराठ्यांनी ती आपल्या सत्तेच्या जोरावर सद्दीच्या दिवसांत सोडवून आपल्या हाती घेण्याचा प्रयत्न केला तो सिद्धीस गेला नाही. तथापि विद्येच्या दृष्टीने काशी व महाराष्ट्र यांचा संबध तीनचारशें वर्षे अबाधित राहिला. काशी येथें प्रसिद्धीस आलेल्या पंडितांमध्ये दक्षिणी पंडित फार प्रख्यात होते १९११ साली 'केसरी'मध्ये " संस्कृत विद्येचें पुनरुज्जीवन " या लेखमालेत काशी येथील दक्षिणी पंडितांची घराणीं या मुद्यावर आम्हीं एक लेख लिहिला होता, तो कोणी वाचल्यास या मुद्द्यावरील विशेष माहिती त्यास तेथें मिळेल.

वेदशास्त्रांचे शिक्षण अर्थात् सर्व ब्राह्मणांच्याच हाती होतें; पण ही गोष्ट शिवाजीसहि मान्य होती. इंग्रजी विद्या व इंग्रज लोक यांच्याशी परिचय झाल्याने आतां आम्हांला चातुर्वर्ण्यव्यवस्था मान्य नाहीं, निदान जन्मसिद्ध चातुर्वर्ण्य व त्याचे ठराविक अधिकार हे आजकालच्या विद्वानांपैकी फार थोडे लोक मानतात, व आजची त्यांची मते त्यांना खरी आहेत असेंच प्रामाणिकपणानें वाटते. पण मतांची ही गोष्ट त्रिकालाबाधित नसून वरील लोकांपैकीं बहुतेक लोक पूर्वीच्या काळीं असते तर त्यांची मते आजच्यासारखी खास नसती. नदीच्या ओघांतील दगडी गोट्यांप्रमाणे कालाच्या ओघांत मते निरानिराळीं बनत असतात. शिवाजीच्या मनांत ब्राह्मणांचें निःसंतान करावयाचें आले असते तर ते त्याला करतां आले असते व रामदासाकडे जाऊन त्याला गुरु म्हणविण्याची बळजबरी त्यावर कोणींहि केली नव्हती. शिवाजीने वेदोक्त कर्म करण्याची इच्छा धरली व त्यानें राज्याभिषेकाच्या पूर्वीं आपले मौंजीबंधन करविले.पण आजच्या विचारसरणीनें या गोष्टी करण्याचे त्याला कांहींच कारण

नव्हते. तथापि वैदिक संस्कृतीचा पगडा त्याच्या मनावर आनुवंशिक असल्यामुळें त्याला राज्यारोहणाचे धार्मिक कृत्य सशास्त्र व अव्यग व्हावे असे वाटले असल्यास नवल नाहीं. पण एका तोंडाने वेदोक्ताचा अभिलाष व्यक्त करीत असतां दुसऱ्या तोंडानें ब्राह्मणनिंदा करण्याचा जो दुतोंडीपणा आज कित्येक क्षत्रियांना करतां येतो तसा शिवाजीला करतां आला नाहीं. क्षत्रिय ब्राह्मण हे शब्द एक प्रकारच्या अनुयोगीसबंधाने कायमचे जखडून गेलेले आहेत. चातुर्वर्ण्यव्यवस्था सगळीच्या सगळीच वाटेल तर कोणाला अमान्य करता येईल; पण या व्यवस्थेपैकी आपल्या कामापुरता एक भाग घेऊन दुसरा तेवढा मी टाकीन असें कोणाच्या मनांत असले तरी ते त्यास शक्य नाही. क्षत्रियत्वाचे भूषण ज्या चातुर्वर्ण्यव्यवस्थेमुळे उत्पन्न होते तीतच ब्राह्मणाला विशिष्ट स्थान दिलेले आहे. व मराठेशाहीतील क्षत्रियाला स्वतःस क्षत्रिय म्हणवूनच त्याला ब्राह्मणांसहि योग्य मान द्यावा असे वाटत असे. एका अर्थाने ब्राह्मणाना गुरुत्वाचा मान देऊन चातुर्वर्ण्यव्यवस्थेच्या लोकांतून ते या मानाचे किरण स्वतःकडे परावर्तित करून घेत होते असेंहि म्हणतां येईल. बहुतेक सर्व मराठेशाहीभर ब्राह्मणांना मराठ्यांनी वर्णभेदानुसार योग्य मान दिल्याचे आढळते, व अशा लोकांत शिवाजी हा अग्रेसर होता. अशा रीतीनें मराठेशाहीतील क्षत्रियांनींच ब्राह्मणांचा अभिमान धरल्यावर मग पेशवाईतील ब्राह्मणांनीं स्वतःचा अभिमान धरल्यास त्यांत काय आश्चर्य ? या सर्व विवेचनावरून हे सिद्ध होते की, मराठेशाहीत शिक्षण घेण्याची जबाबदारी ब्राह्मणांवर चातुर्वर्ण्यव्यवस्थेमुळे पडते असे मानलें जात असे, व त्यांनी ती जबाबदारी सभाळिली होती म्हणून राजदरबाराकडून शिक्षणाप्रीत्यर्थ मिळणाऱ्या धर्मादायाच्या देणग्या पुष्कळशा ब्राह्मणासच दिल्या जात. तथापि या बाबतीत ब्राह्मणाब्राह्मणातील पोटभेदांचा अभिमान पेशव्यांनी धरल्याचे फारसे दिसत नाही. काशीपासून रामेश्वरापर्यंत पेशव्यांच्या धार्मिक देणग्या जाऊन पोचत व श्रावणमासी सर्व हिंदुस्थानातून पचद्राविडच नव्हे तर पचगौडहि सन्मानले जात. वेदविद्येचे शिक्षण मागे टाकून आपण पुढे गेलो म्हणजे मग तर जातिभेदाचा प्रश्न उरत नसे. मराठेशाहींत फकीर अवलिये वगैरे मुसलमानी साधुसतांना व त्यांच्या देवस्थानांना देणग्या दिल्या जात. तसेंच कोणी धर्मार्थ वैद्यक्रिया किंवा शस्त्रक्रिया करीत असला किंवा कोणी धर्मार्थ विहिरी खणल्या, छायेचीं झाडे लाविलीं, मार्गावर धर्मार्थ पाणपोई घातली तर अशा लोकांस त्यांची जात लक्षांत न आणतां इनामे दिलीं जात. शाहूच्या रोजनिशीत सय्यद दाऊद बिन सय्यद दावल हकीम शस्त्रवैद्य, नानासाहेब पेशव्यांच्या रोजनिशींत रणछोड नाइक वैद्य वसईकर, राजेमहमद शस्त्र-हकीम, नारो राम बिन नरहर वैद्य बागलाण, भवानीशकर वैद्य गुजराथ, फीर मारतीग वैद्य रेवदंडा,

मीर अबू तलव सुरत वगैरे लोकांच्या नांवें देणग्या इनामें दिलेलीं सांपडतात त्यावरून वरील विधानाचा खरेपणा दिसून येईल. याचप्रमाणें व्यवहाराच्या इतर कोणत्याहि बाबतींत जातिभेदाचें बंड फारसें नव्हतें. धंदे जातवार वांटले गेल्यामुळें जे उत्तेजन निरनिराळ्या धंद्यांस तेंच निरनिराळ्या जातींस मिळे हें आपोआपच सिद्ध होतें.

## प्रकरण चवथें

# मराठ्यांचें पातशाही धोरण

" मराठ्यांचें साम्राज्य दिल्लीपतीची सेवा करितां करितांच वाढलें."

—राजवाडे

कोणत्याहि राष्ट्राच्या कार्यपरंपरेच्या मागे एकादे निश्चित धोरण म्हणून असतेच. मराठ्यांच्या इतिहासाकडे पाहिले असता त्याच्या निरनिराळ्या भागांत मराठ्यांचेंहि एकादे निश्चित असे धोरण असे, व त्या धोरणानुसार त्यांची कार्यपरंपरा घडून येत असे, असें कोणीहि थोडासा विचार केल्यास त्याला आढळून येईल. स्थूलमानाने बोलावयाचे तर असे म्हणतां येईल की, सन १६४६ पर्यंत मराठ्यांचे धोरण मुसलमानी पातशाहीखालीं मानमरातब संभाळून व जहागिरी उपभोगून परतंत्रतेने पण सुखाने नांदावयाचे होते. शिवाजीच्या वेळी मराठ्यांचे धोरण लहानसेंच पण स्वतंत्र असे स्वराज्य स्थापावयाचे होते. शिवाजीच्या मृत्यूपासून शाहू दक्षिणेत परत येईपर्यंत मराठ्यांचे धोरण शिवाजीने स्थापलेले राज्य मोगलांच्या हल्ल्यांपासून हरप्रयत्नाने रक्षावयाचे होते. शाहूपासून सवाईमाधवरावापर्यंत, जुने स्वराज्य तर संभाळावयाचेच पण सर्व हिंदुस्थानभर सत्ता चालवावयाची व दिल्लीची मोगल पातशाही फार तर औपचारिकपणे रक्षून प्रत्यक्ष व्यवहारांत हिंदुपदपातशाही गाजवावयाची असे धोरण वळावले. दुसऱ्या बाजीरावापासून मराठ्यांचे धोरण पुन्हा संकुचित होऊन नवीन मुलुख किंवा सत्ता मिळविण्याच्या भानगडीत न पडतां कोणीकडून तरी इंग्रजांकडून जुन्या मुलखांचे व सत्तेचे रक्षण करावयाचे व साधल्यास स्वातंत्र्य मिळवावयाचे असें झाले. सन १८१८ नंतर मराठेशाहीची हरिदासी गोष्ट फिरून मूळपदावर येऊन आजपर्यंतचे मराठी राजेरजवाड्यांचे धोरण इंग्रज पातशाहीच्या पंखाखालीं कोणीकडून आहे ते वैभव संभाळून पातशाहापासून मानमरातब मिळवून पातशाहीचें रक्षण करावयाचें आहे.

मराठ्यांचे जर केव्हां खरे पातशाही धोरण म्हणून असेल तर ते इ. स. १७०७ पासून १७९४ पर्यंत होते; व या धोरणाचे खरे स्वरूप काय असेल याचा थोडासा विचार करणें प्रस्तुत प्रसंगीं जरूर आहे. 'पातशाही धोरण' या शब्दाचे दोन वाच्यार्थ होऊं शकतात. एक अर्थ, पातशहा अर्थात् दिल्लीचा पातशहा याच्यासंबंधाचे मराठ्यांचें धोरण; व दुसरा अर्थ स्वतः पातशहा आहों किंवा होऊं अशा भावनेचे धोरण. सर्व अठरावें शतकभर मराठ्यांच्या धोरणांत दिल्लीचा पातशहा हीच मध्यवर्ती व आधारभूत वस्तु होती.

दिल्लीची पातशाही बुडवून स्वतःची मराठी पातशाही स्थापूं अशा प्रकारचें धोरण त्यांच्या मनांत कदाचित् उद्भवलें असलें तरी त्याचा ओंठाबाहेर केव्हांहि स्पष्ट उच्चार झालेला नव्हता असे आम्हांस वाटते. राजकीय महत्त्वाकांक्षेला मर्यादा असू शकत नाहीं; व ती असावी तरी कां ? 'अहं ब्रह्मास्मि' –मी ब्रह्मच आहे–अशा प्रकारच्या भावनेची महत्त्वाकांक्षा जशी धर्मात योग्य आहे, तशीच राजकारणांत मी सर्व जगाचा राजा होईन अशी महत्त्वाकांक्षा कोणीं धरल्यास राजनीतिदृष्ट्या तिला मुळीच नांव ठेवतां येत नाही. सर्व जगाचे राज्य मिळाले तर मला हवे आहे; व माझ्या अगांत धमक असेल तर ते मी मिळविण्याची खटपटहि खुशाल करावी. पण जगाची वस्तुस्थितीच अशी आहे की, सर्व जगाचे राज्य पूर्वीहि कधी कोणास मिळालें नाही व पुढेहि कोणास मिळणार नाहीं ही गोष्ट निराळी. याच दृष्टीने मराठ्यांनी बाळगिलेल्या पातशाही महत्त्वाकांक्षेचा न्याय आपण करावयास पाहिजे.

आजकाल इंग्रजांना किंवा त्यांच्यापूर्वी मोगलांना सर्व हिंदुस्थानांत साम्राज्यसत्ता स्थापण्याचा वास्तविक जितका हक्क आहे व होता तितकाच मराठ्यांनाहि हिंदुस्थानभर आपली मराठापदपातशाही स्थापण्याचा होता. कोणाचा हक्क सिद्धीस गेला, तर कोणाचा गेला नाहीं ही गोष्ट स्वतंत्र आहे. त्यांतल्या त्यांत पहाता, मराठे हे हिंदु असल्यामुळे हिंदुपदपातशाही ही त्यांची वडिलार्जित होती, या दृष्टीने मराठ्यांचा हक्क इतरांपेक्षां सरसच ठरेल. न्यायनीति ही यशःसिद्धीवर अवलंबून ठेवणे हे तत्त्वज्ञानास संमत नाही. दुसरेपक्षी, अठराव्या शतकांत हिंदुस्थानभर मराठापदपातशाही स्थापण्याच्या कल्पनेचा उच्चार मराठ्यांच्या तोंडून उघड झाला नाही याचें कारण अर्थात् परिस्थिति होय. जी गोष्ट सर्वस्वी शक्यतेच्या आवांक्याबाहेरची दिसते ती बोलून दाखविण्यात तरी काय शहाणपण ? अशक्यप्राय गोष्टी बोलणाराच्या धैर्याचे कौतुक न होतां त्याच्या मूर्खपणाचे हसेच होते ! १८ व्या शतकांत मराठ्याच्या मनाच्या पेटीच्या अगदी आतल्या कप्प्यांत जे धोरण होते त्याच्याविषयी आम्हांस प्रस्तुत विचार करावयाचा नाही; तर जे धोरण त्यांनी प्रत्यक्ष व्यवहारांत आणले होते त्याचाच विचार करावयाचा आहे. व दिल्लीच्या पातशहासंबंधाचे मराठ्याचे जे धोरण तेवढेच त्यांचे पातशाही धोरण असे आपणास घेऊन चालण्यास हरकत नाही. हे धोरण त्यांना जवळजवळ एक शतकभर पुरले. यावरून तेच किती मोठे व व्यापक होते याची कल्पना होईल.

मराठ्यांचे दिल्लीच्या पातशाहीच्या संबंधाने धोरण काय होतें ? या प्रश्नाचे उत्तर थोडक्यांत असें आहे कीं, दिल्लीची पातशाही नष्ट तर न करितां तिची मुख्य दिवाणगिरी व तिचे मुख्य सेनाधिपतित्व स्वतःच्या हातीं ठेवावयाचे व या जोड अधिकाराच्या जोरावर मराठ्यांचे 'स्वराज्य' राखून आणि वाढ-

वून शिवाय हिंदुस्थानातील सर्व राजेरजवाड्यांकडून आपलें वर्चस्व मान्य करवावयाचें, म्हणजे नांवानें नसली तरी कृतीनें हिंदुपदपातशाही गाजवावयाची असें मराठ्यांचें धोरण होतें. स्वतःच्या नांवची पातशाही प्रत्यक्ष स्थापणे आणि केवळ व्यवहारापुरती ती गाजविणें यांत फारसा फरक नाहीं असें कोणी म्हणेल तर ती मात्र मोठी चूक होईल. कारण, देखाव्यालाहि फार महत्त्व असतें. शक्याशक्यतेच्या विचारांत देखावा विसरून चालत नाही. कायदेशीरपणा हा न्यायाचा पुरा नऊदशांश एवढा मोठा हिस्सा असतो; व कायदेशीरपणा संभाळण्यास देखाव्याचीच मुख्य मदत होते. मराठ्यानी दिल्लीची पातशाही बुडविण्याचाच एकदम कां विचार केला नाहीं या प्रश्नाचें सरळ उत्तर असें आहे कीं, ती त्यांना त्या वेळीं बुडवितां तर आली नसतीच, पण ती बुडविण्याचा त्यांनी प्रयत्न केल्याचा जरी नुसता संशय आला असता तरी जे त्यांनी प्रत्यक्ष केलें तेंहि त्यांना करितां आलें नसतें, उलट नवें न मिळविता जुनें गमावण्याचा मात्र प्रसंग त्यांच्यावर येता.

सर्व हिंदुस्थानभर हिंदुपातशाही प्रस्थापित करणें हें काम देखील अवघडच; पण त्याहूनहि सर्व हिंदुस्थानभर एकाच म्हणजे मराठी वंशाची राजसत्ता प्रस्थापित करणें हें काम त्याहूनहि अवघड होतें. शिवाजीची एकतंत्री सत्ता महाराष्ट्रांत प्रस्थापित झाली व राज्यपद त्याच्याच घराण्याकडे दोनशें वर्षेपर्यंत चाललें याचें कारण, शिवाजीचा मुलुख फारसा विस्तृत नव्हता. तरीहि खुद्द शिवाजीला आपल्या पश्चात् मराठी राज्य टिकावयाचें तर अष्टप्रधान निर्माण करून राज्याची एक प्रकारची घटना बनविणें जरूर वाटलें. शिवाजीनंतर तिसऱ्या पिढीस खरी राज्यसत्ता त्याच्या घराण्यांतून निघून ती भटपेशव्यांच्या घराण्याकडे आली, पण पहिल्या बाजीरावाच्या वेळेपासूनच ही सत्ता केवळ आपल्या घराण्याकडेहि अबाधित राहील अशी खात्री न वाटून त्यानें जुन्या अष्टप्रधानमंडळाचेंच पुनरुज्जीवन जरी केलें नाहीं तरी, दौलतीचे आधारस्तंभ म्हणून मोठमोठे मराठे सरदार निर्माण केले. शिवाजीचें राज्य लहान म्हणून अष्टप्रधानमंडळीच्या कारभाराच्या सर्व दोऱ्या प्रत्यक्ष आपल्या हातीं ठेवून बसल्या जागेवरून सर्व राज्याच्या व्यवस्थेकडे, हातातल्या आंगठीवरील खड्याप्रमाणे, त्याला पाहतां येत होतें. पण राज्याचा विस्तार व राज्यकारभाराचा पसारा खुद्द शिवाजीच्या वेळींहि अधिक वाढता तर त्याला देखील एकतंत्री सत्ता आपल्या हातीं ठेवतां आली नसती व अधिकारविभागणी करणें म्हणजे पर्यायानें आपल्या सरदारांना कमीअधिक स्वतंत्रता देणें जरूर झालें असतें.

पेशव्यांची तर शिवाजीहून अधिक अडचणीची स्थिति होती. साताऱ्यास कर्तेपणा उरला नसल्यानें राज्यकारभाराची मुख्य जबाबदारी त्यांना पुण्यास

खेंचून आणून आपल्या हातीं ठेवावी लागली, यांत एका दृष्टीनें कदाचित् त्यांचा दोष मानतां येणार नाहीं. पण 'जबाबदारी' या शब्दाचा 'अधिकाराची हांव' असा अर्थ करणारे लोक तेव्हांहि होते. भट पेशवे हें कोकणांतून वर आलेलें उपरी घराणें, त्याला खानदानीची परंपरा नव्हती, यामुळें ज्यांची खानदानी शेकडो वर्षांची अशा मराठे घराण्यांना पेशव्यांबद्दल हेंवा वाटावा ही गोष्ट स्वाभाविक होती. पेशव्यांनीं हवे तर आपल्या कृत्याचे वर्णन " मराठी सत्तेच्या जबाबदारीची धुरा आम्हीं आपल्या मानेवर घेतली " अशा प्रौढ व भूषणास्पद शब्दांनीं वाटेल तर करावे. पण " या कारस्थानी ब्राह्मणांनी शाहूला भुरळ घालून व राज्यसत्तेचा मक्ता आपणा एकट्याकडे मिळवून केवळ स्वार्थ साधला " असेंच वस्तुस्थितीचे खरे स्वरूप वरील घराण्याच्या दृष्टीने होते. पेशवेपद आधीं ब्राह्मणाकडे जावेच कां ? त्यांतूनहि कोकणस्थांकडे कां ? असा प्रश्न उपस्थित करणारे प्रतिपक्षी पेशव्यांना पुष्कळ उत्पन्न झाले. कर्त्या पुरुषांच्या दोनतीन पिढ्या पेशव्यांच्या घराण्यांत एकामागून एक निपजल्यामुळे या घराण्यांतून ही सत्ता बाहेर खेचून काढणे सहजच दुर्घट झाले. परंतु पेशवेपद पूर्वी वंशपरंपरागत नसतां आता ते झाले, या गोष्टीनें पेशव्यांच्या प्रतिपक्ष्यांची चुरस दिवसानुदिवस वाढली, कमी झाली नाही. दाभाडे गायकवाड भोसले वगैरे अनेक मराठे सरदार केवळ याच कारणावरून पेशव्यांचे शत्रुत्व करीत होते. अर्थात् राजसत्ता बळकावल्याचा आरोप आपणावर आहे ही गोष्ट पेशव्यांच्या मनांत निरंतर जाणवत होती, यामुळे जे शिवाजीनें केले नाही ते पेशव्यांना जरूर करावे लागले—म्हणजे सरदारांना स्वतंत्र जहागिरी आणि सरजाम तोडून देऊन त्यांच्या महत्त्वाकांक्षेचे समाधान करावे लागले.

पण आम्ही प्रथम दर्शविल्याप्रमाणे पेशव्याच्या वेळी शिवाजीच्या वेळेपेक्षां राज्याचा विस्तार अधिक वाढल्यामुळेहि त्यांना अधिकारविभागणीबरोबर सत्ताविभागणी करावी लागली. पेशवे पुण्याला राहून एकीकडे दिल्लीच्या आसपास, दुसरीकडे कलकत्त्याच्या आसपास, व तिसरीकडे तंजावर–त्रिचनापल्लीच्या आसपास त्यांनीं मुलुख जिंकावा कसा ? व जिंकला तरी नित्य खंडण्या वसूल करून व्यवस्थित कारभार चालवावा कसा ? अर्थात् हीं कामे बऱ्याच अंशीं सरदारांच्या हातून करावीं लागलीं; व जो कर्तृत्व दाखवितो त्याला अधिकार व सत्ता कोणीं प्रत्यक्ष न देतांहि आपोआपच थोडीबहुत मिळते, या न्यायानें मराठे सरदारांना थोडाबहुत स्वातंत्र्यलाभ अनायासाने झाला होता. पेशव्यांचा मुलुख इतका मोठा वाढला होता खरा; पण त्यांतील बराच भाग असा होता कीं, त्यांत दरसाल खंडण्या वसूल करण्याची मोठी जिकीर पडे. रयत आपला वसूल नियमाने देत असली तरी महालानिहायचे व सुभ्यानिहायचे

अधिकारी नियमितपणें वसुलाचा भरणा करण्याची खळखळ करीत. व जेथें जाट रजपूत अशा नाखुष व शूर लोकांपासून खडण्या वसूल करण्याचा किंवा विशेषतः निजामासारख्या बलिष्ठ सुभेदाराकडून चौथाई वसूल करण्याचा प्रसंग येई तेथें तर बहुधा दरवर्षी कटकट मारामार व लष्करी स्वारी यांच्याशींच गांठ पडे. यामुळे शिंदे–होळकरप्रभृति सरदार आवश्यक झाले आणि त्यांच्या आवश्यकतेबरोबर त्यांचें महत्त्वहि वाढले.

केवळ कायद्याच्या भाषेने बोलावयाचे असतां शिंदे व होळकर हे दौलतीचे नोकर असे म्हणतां येण्यासारखे होते; शिरस्त्याप्रमाणे सरदारांकडून जहागिरीचे व सरंजामाचे हिशेब घेण्याचा योग येई त्या वेळी फडणीशी फडांतला एकादा यःकश्चित् कारकूनहि क्षणभर 'हुजूर' बनून शिंदेहोळकरांच्या डोळ्यांतून टिपें काढू शकला असता. पण या सरदारांचे महत्त्वच इतके वाढले होते की, त्यांना सरंजामाचे हिशेब पेशव्यांनी आपणास मागणे हा एक प्रकारचा अपमान किंवा कमीपणाहि वाटूं लागला होता. अर्थात् सरदार लोकांची प्रस्थें अशी सहजच माजल्यामुळे दौलतीचे व्यापक धोरण त्यांच्या अनुमतीशिवाय ठरविणे पेशव्यांस अशक्य झाले होते. मूळ राजसत्ता भोसल्याची, सर्वाधिकार पेशव्यांचा, मनसबा फडणविसांचा व तरवार सरदाराची, अशी मराठे दौलतीच्या सत्वाची चार ठिकाणी वांटणी झाल्यामुळे एकतंत्री कारभार चालणे अशक्यच होते. सरदारांनी लढाई जिंकून शत्रूला तहाला आणावे, फडणविसांनीं मुलकी धोरण पाहून तहाच्या अटी बनवाव्या, पेशव्यांनी यावर मखलाशी करावी व साताऱ्च्या छत्रपतीचे त्यावर शिक्कामोर्तब व्हावे. असा चौतंत्री कारभार चालत असून या प्रत्येकाला इतर तीन तंत्रे सभाळावी लागत. व ही चौतंत्रे परस्पर जोंपर्यंत आदरपूर्वक संभाळली जात तोंपर्यंत मराठेशाहीत अंतस्थ जोर जिवत राहिला. इंग्रज लोक मराठेशाहीचे वर्णन करतांना 'मराठी राज्य' असे न म्हणता 'मराठासंघ' (कॉन्फिडरसी) असे म्हणत व हेच वर्णन बरोबर आहे. हा संघ जोंपर्यंत टिकला तोंपर्यंत सर्व हिंदुस्थानभर सत्ता प्रस्थापित होण्याचा सभव होता, पण तो सघ मोडतांच हा संभव सर्वस्वी नष्ट झाला.

असो; आतां हा संघ अस्तित्वांत असतांना मराठ्यांनीं सर्व हिंदुस्थानभर आपली सत्ता प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला तो कशा रीतीनें केला हें थोडक्यांत पाहूं. एकीकडे मराठ्यांची मूळ गादी साताऱ्यास जिवंत होती व ती अजीबात मोडून पुण्यास आणणें पेशव्यांस इष्ट व शक्य नव्हते. दुसऱ्या बाजूस साताऱ्याच्या गादीसारखीच कमकुवत झालेली पण अद्यापि जीव धरून राहिलेली मोंगलांची गादी दिल्लीस शिल्लक होती. अशा स्थितीत पेशव्यांना, किंवा व्यापक भाषेनें बोलावयाचें तर मराठ्यांनाहि, सर्व हिंदुस्थानभर सत्ता पसरतां येणें अवघड होतें. किंबहुना साताऱ्ची गादी मोडण्यास फोड-

ण्यास जितक्या अडचणी होत्या तितक्या किंवा त्यांहूनहि अधिक अडचणी मोंगलांची गादी नष्ट करण्यास होत्या. कांहीं अंशीं सातारची गादी मोडूं नये असें राजनिष्ठेच्या भावनेमुळे पेशव्यांना वाटत होतें; पण मोगलांची गादी नष्ट करण्याच्या बाबतींत राजनिष्ठेचें बंधन नसतां, व प्रतिक्रियेच्या दृष्टीनें ती गादी नष्ट करणे मराठ्यांना योग्य वाटत असतांहि, मराठ्यांना तें घडवून आणणें कठीण होते. अर्थात् अशा स्थितींत गादी तर नष्ट करू नये पण तिची सत्ता तर आपल्या हाती आणावी कशी हाच प्रश्न मराठ्यांपुढे होता, आणि त्यानी कोणत्याहि रीतीची उतावळी न करतां केवळ युक्तीने तो सुटण्याच्या पथास आणला होता. सातारची सत्ता पुण्यास आणण्याचा प्रश्न नानासाहेब पेशव्याने शाहूकडून त्याच्या मृत्युसमयी सर्वाधिकाराचें मुखत्यारपत्र मिळवून सोडविला ही गोष्ट प्रसिद्धच आहे; व दिल्लीच्या पातशाहीची सत्ता आपल्या हाती आणण्यासहि मराठ्यानी त्याच युक्तीचा अवलंब केला. विशेष लक्षांत ठेवण्याची गोष्ट ही की, सातारची सत्ता पुण्यास येण्याच्या आधी पुष्कळ दिवस दिल्लीचीच सत्ता रायगडास आणण्याचा प्रयत्न झाला होता, व त्याचा उपक्रम खुद्द शिवाजीनें केला होता ! एवढेच नव्हे तर, आणखी असेंहि म्हणतां येईल कीं, सातारची सत्ता जी पुण्यास आणण्यांत आली ती देखील बऱ्याच अशी मोगलांची सत्ता मराठ्यांच्या हाती आणणे हे जे मुख्य साध्य ते साधण्याचे केवळ एक साधन म्हणूनच. पहिल्या बाजीरावाने जेव्हां मराठ्यांच्या पातशाही धोरणाचे विवरण वक्तृत्वपूर्ण रीतीने केले तेव्हा त्याचे मर्म समजण्यासारखा राजा म्हणजे स्वतः शाहू हा सातारच्या गादीवर होता. पण शाहूच्या मृत्यूनंतर हे मर्म समजण्याइतका मार्मिक जाणता राजा किंवा मुत्सद्दी साताऱ्यास यापुढे लाभणे शक्य दिसेना असे नानासाहेब पेशव्याने जेव्हां पाहिले, तेव्हांच कारभाराचे मुख्य केंद्र साताऱ्याहून हालवून पुण्यास न्यावे असे त्याला वाटले असेल असेंहि संभवते. शाहूचे मृत्युपत्र खरे म्हणा किंवा खोटे म्हणा, मोगलांची कार्यकारी सत्ता मराठ्यांच्या हाती आणावी हा जो शिवाजीमहाराजाचा मूळ हेतु तोच सिद्धीस नेण्याची खटपट पेशव्यानीं केली; व स्वतःचें महत्त्व वाढविले तरी त्यांनी जुने पातशाही धोरण पुढे चालविलें ही गोष्ट नाकबूल करता येत नाही. या पातशाही धोरणाच्या कल्पनेचे यश शाहूच्या कारकीर्दीत प्रचंड उलाढाली करणाऱ्या बाळाजी विश्वनाथास देण्यांत येते. पण या धोरणाची मूळ कल्पना बाळाजी विश्वनाथाची नव्हे, तर ती शिवाजीचीच होय !

कोणतेहि हक्क मारावयाचे झाले तर ते दुसऱ्या प्रतिपक्षी हक्कांनीच चांगले मारतां येतात ही गोष्ट शिवाजी चांगली जाणत होता. मोगल हे शत्रु असतांहि, आपल्या स्वराज्याचा हक्क वेगळा आणि हिंदुस्थानच्या इतर भागांत म्हणजे मोगलांच्या राज्यांत सत्ता गाजवण्याचा हक्क वेगळा असा विवेक

शिवाजीनें मनाशीं नसला तरी जनाशी केला होता ही गोष्ट उघड दिसून येते. त्याचा पहिला हक्क निसर्गसिद्ध होता, म्हणून स्वराज्याकरिता शिवाजी मोंगलांशीं लढला. या हक्काच्या बाबतीत समेट होणे शक्य नव्हते. शिवाजीच्या बापाच्या वेळेपर्यंत हे समेटाचेच धोरण अमलात होते. शहाजीपर्यंतचे मराठी राजे शिवाजीइतके धीट धाडसी किंवा निकरावर येणारे नव्हते म्हणा, किंवा त्यांच्या वेळची परिस्थिति अधिक बिकट होती म्हणा, कसेंहि मानले तरी थोड्याशा मुलखाचा कां होईना पण स्वतंत्र राजा म्हणवून घेण्याचा हट्ट शिवाजीच्या पूर्वजांनी उघडपणे अंगिकारला नाही एवढी गोष्ट खरी. म्हणून मनसबदारीच्या किंवा सरदारीच्या बहुमानाने त्यांचे समाधान झाले. शिवाजीचे मात्र समाधान या बहुमानाने झाले नाही; व असंतोषाला यशाचे स्वरूप देण्याची हिंमत त्याच्यामध्ये होती म्हणून त्याने प्रत्यक्ष युद्धास प्रवृत्त होऊन स्वतंत्र स्वराज्य संपादलें. शिवाजीची महत्त्वाकांक्षा अर्थातच एवढ्याने तृप्त होण्यासारखी नव्हती. पण जो मुलुख पूर्वी मराठ्यांच्या हातीं नव्हता व जो जिंकून मोंगलांनी त्यावर आपली सत्ता स्थापली होती तो आपल्या हातीं आणावयाचा तर त्याच्याहि करतां युद्धच करावे ही गोष्ट मात्र शिवाजीस संमत नव्हती असे दिसते.

या बाबतीत समेटाच्या धोरणाने चालणे अधिक बरें, असेच शिवाजीच्या मनाने ठरविले असावे. हा समेट म्हणजे अर्थात् मोंगलांची या मुलखावरील सत्ता नाकबूल न करतां त्या सत्तेचा अंशमात्र मोंगलांचा मुखत्यार म्हणून त्यांच्याच संमतीने आपल्या हाती मागणे व मिळविणे अशा स्वरूपाचा होता. ही सत्ता, मोंगलांच्या अनेक किंवा अनंत हक्कांतून चौथाई व सरदेशमुखी हे हक्क मिळविल्याने प्रारंभी कामापुरती आपल्या हातीं घेऊन तिच्याच बळावर उरलेली सर्व किंवा बहुतेक सत्ता आपण अखेर मिळवू असे शिवाजीस वाटत असावे असे दिसते. कदाचित् ही युक्ति शिवाजीनेंच आपल्या डोक्यातून प्रथम काढली नसेल; त्यालाहि ती जुन्या इतिहासाच्या ज्ञानपरिशीलनाने सुचली असेल. कारण, राजनीति किंवा राजकारणकुशलता ही मनुष्यवंशाच्या इतिहासाइतकीच सनातन आहे. 'धाता यथा पूर्वमकल्पयत्' हा न्याय इतिहासांत वारंवार दृष्टीस पडतो. फार काय पण न्यायमूर्ति रानडे यांनी मराठ्यांच्या इतिहासावरील आपल्या सर्वश्रुत निबंधांत दर्शविल्याप्रमाणे शिवाजीच्या नंतर शेसवाशे वर्षांनीं खुद्द इंग्रजांनीहि याच युक्तीने म्हणजे "हक्कांतून हक्कांच्या साहाय्याने हक्क मिळविणे व एका हक्काने दुसऱ्या हक्कास मारणें" या युक्तीचाच अवलंब केला किंवा त्यांना तो करावा लागला. रानडे म्हणतात, "मुसलमान बादशहाच्या हातांतून सर्व सत्ता नाहींशी होऊन अखेरीस ती मराठेमंडळाच्या हातांत आली. वरील हकीकतीचें

साम्य हिंदुस्थानच्या मागील इतिहासांत क्वचितच आढळून येतें. परंतु एकोणिसाव्या शतकाच्या आरंभी मार्क्विस ऑफ वेलस्ली याने जे मोठें कार्य सिद्धीस नेले त्याशी मात्र या गोष्टीचें चांगलें सादृश्य दिसून येतें. मार्क्विस ऑफ वेलस्लीने एतद्देशीय राजांबरोबर पैका घेऊन सैन्य पुरविण्याचे तहनामे करून त्यांत इंग्लिशांची फौज आपल्या मदतीसाठी प्रत्येक संस्थानिकानें आपल्या पदरच्या खर्चानें ठेवावी असें ठरविलें होतें. या प्रकारच्या तहांच्या योगानें ब्रिटिश कंपनीनें सर्व हिंदुस्थानावर स्वामित्व मिळविलें."

पण रानड्यांना या बाबतीत आणखीहि एका गोष्टीचा दाखला देतां आला असता; वरील तहांच्यापूर्वी सुमारें चाळीस वर्षे ईस्ट इंडिया कंपनीनें दिल्लीच्या पातशहाकडून जी दिवाणीची सनद मिळविली तिचा हेतु झाला तरी कनिष्ठ हक्कानें वरिष्ठ हक्क संपादण्याचाच नव्हता काय? रानड्यांच्याच शब्दांनी म्हणावयाचें तर इंग्रजांची कल्पना ही शिवाजीच्या कल्पनेची पुनरावृत्तिच होती. मोंगलांचे दास किंवा नोकर असें स्वतःस म्हणवून घेताघेतांच अखेर नोकरीच्या नात्याला इंग्रजांच्या हाती धनीपणाच्या नात्याचें परिणत स्वरूप प्राप्त झालें. फरक इतकाच कीं, हीं पुनरावृत्ति जरा "जास्त सुधारलेल्या तत्त्वांवर" सुरू केली होती. इंग्रजांनी जी गोष्ट सरंजामी फौज ठेवण्याच्या तहानें साधली तीच मराठ्यांनी चौथाई व सरदेशमुखीच्या हक्कांच्या सनदेनें साधण्याचा प्रयत्न केला होता. एक प्रयत्न साधला व दुसरा फसला ही गोष्ट वेगळी. पण दोघांच्याहि प्रयत्नाची मानसिक रंगभूमि एकाच प्रकारची होती, दोघांची साध्यसाधनाची योजना एकाच स्वरूपाची होती; दोघांचें धोरण एकच होतें. असो; वरून क्षुल्लक दिसणाऱ्या चौथाई–सरदेशमुखीच्या हक्कांचें खरें स्वरूप काय होतें, ते हक्क संपादण्याचा प्रयत्न मराठ्यांनी कसा केला आणि त्या प्रयत्नाचें परिणाम काय झालें हें आपण आतां पाहूं.

चौथाईच्या हक्काची हकीकत अशी आहे: मुसलमान लोक हिंदुस्थानांत येईपर्यंत सर्व देश हिंदूंचे ताब्यांत होता. दहाव्या अकराव्या शतकापासून या देशांत मुसलमानांच्या स्वाऱ्या होण्यास सुरुवात झाली. त्यांनी प्रथम पंजाबप्रांत, नंतर गंगायमुना नद्यांच्या कांठाकाठानें पूर्वेकडे जाऊन अखेर बंगालप्रांतासुद्धां सर्व उत्तरेकडचा मुलुख, नंतर मध्यप्रांत, नंतर महाराष्ट्र या अनुक्रमानें सर्व देश आपल्या ताब्यांत आणिला. पण एवढ्या प्रांतावर लष्करी ताबा ठेवून त्याची कायमची मुलकी व्यवस्था करणें त्यांना सोईचें नव्हतें. यामुळें त्यांनी या व्यवस्थेकरितां सुभेदार ( लष्करी मुलकी अधिकार ज्यांच्यामध्यें समाविष्ट झाले होते असे अधिकारी ) पाठविण्यास सुरुवात केली. कालांतरानें हे सुभेदार स्वतंत्र नबाब बनले. त्यांनी दिल्लीच्या पातशहास मधूनमधून वसूल पाठवावा, परंतु बहुतेक वसूल सैन्याच्या खर्चांत जिरला असें

दाखवावें अशी सुरुवात झाली. मात्र पातशाही सत्ता नाकबूल अशी कोणीच केली नाहीं. पातशाहीच्या हक्कांचा असा उपमर्द करणारास शासन करण्याचें सामर्थ्य दिल्लीच्या दरबारी राहिले नाही. शिवाय खुद्द दिल्लीस ज्या राज्यक्रात्या होत त्यांमुळे पातशहांस इतर भागांतील अमलाकडे लक्ष देण्यास फुरसत सांपडत नसे. औरंगजेबानंतर कोणीच पातशहा सैन्य घेऊन प्रांतांतील नोकरांचे बंड मोडण्यास किंवा नवीन मुलुख काबीज करण्यास बाहेर पडला नाहीं. औरंगजेबाच्या मृत्यूनंतर दिल्लीस वस्तुतः अराजकत्व निर्माण झाले असे म्हणण्यास हरकत नाहीं.

मुसलमान सुभेदाराना स्वतंत्र सत्ता स्थापन करण्यास हक्क नसेल; पण ज्यांची राज्यें मुसलमानानीं जिंकून घेतली त्याना म्हणजे शिवाजीप्रभृति मराठ्यांना तरी आपला मुलुख जिंकून किंवा इतर रीतीने परत घेण्यास खचित हक्क होता. पैकी स्वराज्याचा मुलुख तरी शिवाजीनें विजापूरकर व दिल्लीकर मुसलमान याजपासून जिंकूनच घेतला. पण केवळ स्वराज्याचा मुलुख परत मिळवून शिवाजीची तृप्ति झाली नाही. हिंदुपदपातशाहीवर जर हिंदू राजाना निसर्गसिद्ध हक्क होता तर शिवाजीनें तरी आपल्या राज्याची मर्यादा महाराष्ट्रापुरती संकुचित कां मानावी ? पण ही मोठी महत्त्वाकांक्षा शिवाजीच्या हयातीत सिद्ध झाली नाही. त्याच्या मरणापर्यंत दिल्लीस बादशहाचा अम्मल जोरात होता; यामुळे मोठ्या पराकाष्ठेने त्याला स्वराज्याच्या लहानशा मुलखाचा स्वतंत्र राजा होता आले. औरंगजेब दिल्लीस जिवंत असता शिवाजीनें स्वतःस राज्याभिषेक करून, आपल्या नावाचे नाणें पाडून, आपला शक सुरू करून, छत्रपति म्हणवून घेतले हाहि पराक्रम काहीं खचित लहान नाही ! तथापि शिवाजीस सुद्धा १६७४ पर्यंत ही गोष्ट करितां आली नाहीं.

स्वराज्याशिवाय शिवाजीनें अहमदनगर व विजापूर या पातशहाच्या राज्यांपैकी जे किल्ले आणि जो मुलुख जिंकून घेतला होता तो तू आपल्या ताब्यांत ठेवू नको असे शिवाजीस म्हणणारा औरंगजेब कोण ? ब्राह्मणी राज्यावर वास्तविक दिल्लीच्या पातशहाचा काय हक्क ? पण सन १६६५।६६ सालीं औरंगजेबानें जयसिंगास शिवाजीवर पाठवून त्याला रणकुंठित केल्यावर शिवाजीने ते किल्ले व तो मुलुख दिल्लीपातशहाच्या परवानगीनें आपल्या ताब्यांत ठेवण्याचा करार केला. मोगलांचा जो मुलुख शिवाजीनें घेतला होता तो तर त्यास परत द्यावा लागलाच. पण अहमदनगरच्या राज्यापैकीं घेतलेल्या ३२ किल्ल्यांपैकी २० किल्ले त्यांखालच्या मुलुखासह शिवाजीला मोगलांस देण्याचें कबूल करावे लागले. बाकीचे १२ किल्ले व इतर मुलुख शिवाजीनें 'पातशहानें दिलेली जहागीर' म्हणून आपणाकडे ठेवण्याची होती; आठ वर्षांचा संभाजी हा पातशहाचा पंचहजारी मनसबदार व्हावयाचा होता व विजा-

पूरच्या राज्याच्या कांहीं भागास शिवाजीस चौथ व सरदेशमुखी वसूल करण्याचा हक्क मिळावयाचा होता. या शेवटच्या हक्काकरितां शिवाजीने पातशहास ४० लक्ष रुपये तेरा हप्त्यांनीं देण्याचें कबूल केले. तात्पर्य, शिवाजी स्वराज्यापुरता राजा व शिवाय पातशहाचा जहागीरदार व पातशाही मनसबदाराचा बाप अशी तीन नाती एकत्र व्हावयाची होती! अर्थात् मुख्य लक्ष मुलुख मिळविण्यावर होते व अशा प्रकारचीं नाती ही तो मिळविण्याची साधने होतीं, ही जाणीव सर्वपक्षी सारखीच होती. वरील प्रकारचा करार करून शिवाजी पातशहाकडे गेला, तेथे बदीत पडून सुटका करून घेऊन परत आला व येतांच त्याने फिरून मोंगलाचे किल्ले घेतले वगैरे गोष्टी प्रसिद्धच आहेत.

पातशहाकडून सनदा मिळविण्याचा शिवाजीचा प्रयत्न १६५० सालीं सुरू झाला. या साली सरदेशमुखीच्या सनदेच्या मोबदला आपण पाच हजार स्वार ठेवून पातशहाची नोकरी करू, असा शिवाजीने शहाजहान पातशहाकडे अर्ज केला; पण त्याचा उपयोग झाला नाही. फिरून १६५७ साली त्याने हा अर्ज औरंगजेब दक्षिणेत आला तेव्हां त्याच्यापुढे मांडला. तेव्हां सरदेशमुखीच्या सनदेबद्दल शिवाजीने सैन्य जमा करून दाभोळ वगैरे कोकणांतील विजापूरकरांची ठाणी सर करावी, व दिल्लीकडील भांडणाच्या वेळीं दक्षिणेतील मोंगलांचे राज्य सभाळावे, असा करार करण्याची औरंगजेबाने शहाजहानाकडून परवानगी मिळवावी असे ठरले, व शिवाजीचे वकील रघुनाथपंत व कृष्णाजीपंत हे दिल्लीस शिवाजीच्या वतीने बोलणे करण्याकरिता पाठविण्यांत आले; परतु त्यांचाहि उपयोग झाला नाहीं. १६६६ मध्ये जयसिंगाच्या मध्यस्थीने शिवाजीने सरदेशमुखीबरोबर चौथाईचेहि मागणे केले. पण हा प्रयत्नहि फुकट गेला. १६६७ साली पातशहाने शिवाजीस वऱ्हाडांत एक जहागीर व राजा ही पदवी देऊन गौरविले. पण ती घेऊन शिवाजीने चौथाईची सनद मिळण्यापूर्वीच विजापूर व गोवळकोंडे या मुसलमानी राज्यांत चौथाई वसूल करण्यासहि सुरुवात केली, व राज्याभिषेकाच्या साली पोर्तुगीजांच्या मुलखातहि या हक्काची त्याने बजावणी केली. पुढे दोन वर्षांनी शिवाजीने कर्नाटकावर स्वारी करून तेथेहि हे हक्क वसूल करण्यास प्रारभ केला. हिंदुमुसलमान राजांकडून पैसा म्हणजे खडणी घेऊन त्याच्या मोबदला त्या राजाचे रक्षण करण्याची पद्धतहि शिवाजीने पाडली होती. त्याने सनदांची वाट पाहिली नाही, तर या सनदा मिळण्याचा आपला हक्क असून तो पातशहास नाकबूलच करितां येणार नाही असा आव त्याने घातला.

विजापूरच्या राज्यांत चौथाई व सरदेशमुखी मिळविण्याचे व अशा रीतीने या मुसलमानी राज्यांत आपल्या सत्तेचे बीज पेरून ठेवण्याचे शिवाजीचे धोरण यशस्वी झाले नाही, तरी हे धोरण मराठे विसरले नव्हते; व जो हक्क

शिवाजीला विजापूरच्या राज्यांत मिळाला नाहीं तो त्याचा नातू शाहू याने खुद्द मोंगलांच्या राज्यांतच मिळविला. १७०५ सालीं शाहूच्या मार्फत दक्षिणच्या सहा सुभ्यांपैकीं शेकडा दहा टक्के मराठ्यांस देऊन युद्ध संपवावें असें औरंगजेबानें बोलणें चालविलें. शाहू हा प्रथम दिल्लीच्या दरबारी कैदी म्हणून होता, पण त्याने त्या कैदेचा चांगला वचपा काढला! कारण, त्या दरबारी तो ऋणानुबंध जोडून आला. १७०७ सालापासून त्याने दिल्लीच्या दरबारीं आपले वकील पाठविण्यास सुरुवात केली. १७०७ सालीं मोंगल सुभेदार दाऊदखान याने मराठा सरदारांशी तह करून कांहीं प्रांतातील चौथाईचा हक्क दिला. १७०९ ते १७१३ पर्यंत ही चौथाई शाहूच्या अधिकाऱ्यांनी गोळाहि केली. सन १७१५ सालीं शाहूला मोंगलांकडून दहा हजारांची मनसबदारी मिळाली. अखेर सन १७१८ सालीं स्वतः बाळाजी विश्वनाथ हा दिल्लीस जाऊन त्याने शाहूच्या नांवे चौथ सरदेशमुखी व स्वराज्य अशा तिन्हींच्या सनदा आणल्या, व येतांना दिल्लीस मराठयांच्या वकिलाची कायमची स्थापना केली. या सनदा म्हणजेच मराठयांनी पुढें सर्व हिंदुस्थानभर जो मुलूख जिकला व ज्या खडण्या घेतल्या त्यांचा मूळ कायदेशीर पाया होय.

चौथाईच्या सनदेने (१)औरंगाबाद (२)वऱ्हाड (३) बेदर(४) विजापूर (५) हैदराबाद व (६) खानदेश या सहा सुभ्याच्या वसुलाचा $\frac{1}{4}$ हिस्सा शाहूस मिळाला. त्याकारितां त्याने आपले पदरी पातशाहीच्या रक्षणार्थ १५ हजार फौज ठेवावयाची होती. शाहूच्या वकिलाने पातशहास लिहून दिलेल्या 'ताहोदा' ची भाषा अशी होती; "यजमान खिजमतीच्या लवाजम्यानिशी कायावाचामने सादर राहून रयतेस आबादी विशेष होय व सरकारची दौलत सवाई व मुफसदाचे पारपत्य घडे तें करतील व पंधरा हजार फौज सुभेदाराच्या समागमे चाकरीस ठेवून रयतेस आपल्याकडोन राजी राखतील व उजाड गांवाची लावणी तीन सालांत करोन ऐसा बंदोबस्त करितील जे दुष्टाचा उपद्रव होणार नाहीं. कदाचित् कोणाच्या घरीं चोरी झाली किंवा कोणाचा माल चोरीस गेला तरी चोरास शिक्षा व ज्याचा माल त्यास देतील. कदाचित् चोरास शिक्षा न करो व चोरीचे ठिकाण न लागे तरी चोरीचे मालाची निशा आपण करितील. शिवाय चऊथ व सरदेशमुखीहून अधिक लोभ धरणार नाहीत अगर जाहीर झाल्यास जे रुपये ज्यादा तलबी करोन घेतील ते सरकार आलीत दाखल करितील." चौथाईच्या सनदेनंतर दहा दिवसांनीं सरदेशमुखीची सनद शाहूस बहाल करण्यांत आली. या सनदेचा अंमल वंशपरंपरा व्हावयाचा होता. या सनदेची दक्षणा ११$\frac{3}{4}$कोट रुपये; त्यांतील २·९३कोटी रुपये एकदम भरणेचे व ८·८१ कोटी रु. हप्तेबंदीनें देणेचे होते. सरदेशमुखीचें सालीना उत्पन्न १ कोटी ८० लक्ष रुपये अंदाजी होतें. हे सर्व आंकडे कागदी होते हें लक्षांत

ठेवलें पाहिजे; प्रत्यक्ष वसूल सर्वच कमी असे.

बाळाजी विश्वनाथामागून बाजीराव पेशवा झाला. त्याचें धोरण पहिल्यापासून उत्तरेकडे मुलुख वाढविण्याचें होतें. १७२४ सालीं त्यानें माळव्यांत फौजा पाठविल्या. बाजीराव आपल्या बापाबरोबर दिल्लीस गेलेला असल्यामुळें तेथील दरबारच्या परिस्थितीचें ज्ञान त्याला चांगले झालें होतें. शिवाय मनसुब्याप्रमाणे त्याची तरवारहि खबीर होती. यामुळे शाहूच्या दरबारीं जेव्हां पातशाही धोरणाचा वाद उपस्थित झाला तेव्हां त्याला ते धोरण शाहूसुद्धां बहुतेक दरबारी मुत्सद्द्यांना पटवितां आलें. या वादाचें वर्णन बखरकारानें फार सुरस केलें आहे.

शाहूला हैदराबादेच्या सुभ्यांत चौथाई वसूल करण्याचा हक्क मिळाला होता, तो निजाम उल्मुक यास सहजच विषादकारक झाला. कोणीकडून तरी मराठ्यांत कलागती लावून आपल्या सुभ्यांतील चौथाईच्या हक्कापासून स्वतःस सोडवून घ्यावे असा त्याचा प्रयत्न सतत चालू असे; व प्रतिनिधीच्या साहाय्याने निजामाने शाहूस इंदापुराकडे जहागीर देऊन चौथाईची माफी मिळविण्याचा घाट घातला. चौथाईसरदेशमुखीत शाहूप्रमाणे करवीरकर संभाजी हाहि हक्क सांगतो त्या पक्षीं खरा हक्कदार ठरेपर्यंत वसूल जप्तीत ठेवण्याचे ठरवून निजामाने शाहूचे मोकासदारांस व चौथाईसरदेशमुखींच्या वसुलास आलेल्या कामगारांस हांकून दिलें. तेव्हां युद्ध सुरू होऊन बाजीरावाने निजामाचा पुरा मोड केला व चौथवसुलीचा हक्क कायम करून घेतला ( १७३२ ). याच्या आधीं तीन वर्षे सुरबुलंदखान याने पेशव्यास गुजराथेतील चौथ व सरदेशमुखी वसूल करण्याचे हक्क दिले होते. या हक्कांत एका सुरतेखेरीज सर्व गुजराथेचा समावेश झाला होता. चौथाईच्या हक्काकरितां पेशव्यानें २५०० स्वारांची फौज चाकरीस ठेवून पातशहास जरूर पडेल तेव्हां मदत करावी असा करार होता. अशा रीतीने निजाम कोल्हापूरकर यांच्याशीं युद्धें करून आणि पातशहाकडून पुनःपुनः सनदा मिळवून पेशव्यांनीं कायदा व तरवार या दोहोंच्या बळावर चौथाईचा महत्त्वाचा हक्क मिळविला व तो सर्व हिंदुस्थानास कबूल करावा लागला. १७३३ सालीं बाजीरावाने महमदखान बगश याचा पराभव करून बुंदेलखंडचा राजा छत्रसाल याची सुटका केल्यामुळे छत्रसालानें त्यास झाशीनजीक सव्वादोन लक्षांची जहागीर व आपल्या राज्याचा तिसरा हिस्सा दिला. पुढच्या वर्षीं आग्रा व माळवा या प्रांतांचा नवा सुभेदार राजा जयसिंग यानें बाजीरावास माळवा प्रांताची सुभेदारी देऊं केली व त्याप्रमाणें बाजीरावानें माळव्यांत चौथाई वसूल करण्यासहि सुरवात केली; इतकेंच नव्हे तर, माळवा प्रांत आपणाकडे स्वतंत्र तोडून मिळावा अशी पातशहाकडे मागणी केली ! या वेळीं खान डौरान यानें बाजीरावाला देण्या-

करितां चौथाईसरदेशमुखीची सनद गुप्तपणें पाठविलीहि. पण बाजीरावाला हें कळतांच त्यानें पातशहापाशीं आणखी मागण्या मागण्यास सुरुवात केली. मांडू धार हे किल्ले, चंबळानदीच्या दक्षिणमुलखाची जहागीर, फौजदारी व खर्चास पन्नास लक्ष रु. असे त्यानें मागितलें. पातशहानें सहा लक्ष रुपये नजर घेऊन त्यास सहा सुभ्यांची सरदेशपांडेगिरी मात्र दिली. या सर्व गोष्टी खान डौरान यानें आपलें शत्रुत्व साधण्याकरतां केल्या असे निजामानें पाहतांच तो फौजेसह दिल्लीस गेला व बाजीरावाशी लढण्याचा विचार करूं लागला. बाजीरावहि ऐंशी हजार फौजेनिशीं नर्मदा उतरून मोठ्या मजला मारून दिल्लीदरवाजापर्यंत जाऊन भिडला. मोंगल फौजेसह बाहेर पडले, पण त्यांचा पराभव झाला; तथापि बाजीरावास याहून अधिक दिवस दिल्लीस राहतां न आल्यानें इष्टसिद्धि न होतां दक्षिणेत परत यावें लागलें. फिरून सन १७३८ साली बाजीराव नर्मदा उतरून जाऊन त्यानें भोपाळच्या लढाईत निजामाचा पराभव केला. अखेर दोराईसराई गांवीं उभयतांचा तह होऊन निजामानें बाजीरावास पन्नास लक्ष रुपये द्यावे व चबळा आणि नर्मदा या नद्यांमधील मुलखाचें आधिपत्य पातशहाकडून प्राप्त करून देण्यास निजामानें बाजीरावास मदत करावी असे ठरलें.

१७३९ साली मराठ्यांनीं पोर्तुगीजांशीं युद्ध करून वसई वगैरे किल्ले घेतले, ही गोष्टहि मराठ्यांच्या पातशाही धोरणाचीच द्योतक होय.

याच सालीं इराणचा बादशहा नादिरशहा यानें दिल्ली घेऊन तेथें कत्तल केली व तो एक लक्ष इराणी सैन्य घेऊन दक्षिणेवर चालून येणार अशीहि बातमी उठली. या संकटसमयीं दिल्लीच्या पातशहास बाजीरावाशिवाय कोणाचा आश्रय नव्हता; म्हणून बाजीराव मोठी फौज घेऊन दिल्लीकडे निघाला, व हिंदूंप्रमाणे मुसलमान लोकहि त्याच्या फौजेत सामील झाले. शिंदे होळकर हे त्यास येऊन मिळालेच होते व वसई घेतांच चिमाजीअप्पाहि त्यास जाऊन मिळणार होता. पण इतक्यांत नादिरशहा दिल्लीस पातशहाची तक्तावर स्थापना करून इराणाकडे निघून गेला. तेव्हां बाजीरावानें पातशहास पत्र लिहून त्याचें अभिनंदन केलें व १०१ मोहरा नजर पाठविल्या. उलट पातशहानेंहि बाजीरावास हत्ती घोडा जवाहीर पोषाख आणि आभारप्रदर्शक पत्र पाठविलें. पण या देणगींतही माळव्याची सनद आली नाहीं, हें पाहून यांत निजामाचेच कांहीं तरी कपट आहे असें त्यास वाटून निजामाचा दक्षिणेतून पुरा निःपात करावयाचें त्यानें योजिलें; पण इतक्यांत बाजीराव नर्मदातीरीं सन १७४० त एकाएकीं मरण पावला.

नादिरशहानें काबूल मुलतान वगैरे प्रदेश आपल्याकडे लावून घेतले व एकंदरीनें पातशहाचें तेज अधिक फिक्कें झालें; यामुळें दिल्लीपासून शंभर

मैलांवर लहानसहान मुसलमानी राज्यें निर्माण होऊं लागलीं. खान डौरान मारला गेला, व कमीरुद्दीनखान वगैरे तुराणी मुसलमानांचें जाळें त्याच्या-भोंवतीं पसरूं लागलें. रजपूतहि हळूहळू स्वतंत्र होऊं लागले. जाट हे मराठ्यांचे स्नेही झाले. रोहिल्यांनीं सवता सुभा स्थापन करण्याचा बेत केला. इंग्रज व फ्रेंच हे अद्यापि कमकुवत होते. युद्ध करून मराठ्यांशीं आपला निभाव लागेल असें त्यांस वाटत नव्हतें; व्यापारी पद्धतीनें ते आर्जव करून किंवा लांच देऊन आपला कार्यभाग साधीत; यामुळें बाजीरावाचा मुलगा नानासाहेब पेशवा यास आपलें पातशाही धोरण पुढें ढकलण्यास संधि मिळाली. याच सुमारास भोसल्यानें बंगाल्याकडे स्वारी केली, व नानासाहेबानें अलाहाबादेवर स्वारी करण्याचा विचार केला. बंगाल्यांत मराठ्यांच्या व अलिवर्दीखान याच्या सैन्याच्या लढाया झाल्या. भोसल्याचा कारभारी भास्करपंत यानें हुबळीशहर हस्तगत केलें; तेव्हां अलिवर्दीखानानें पेशवे व दिल्लीचा पातशहा यांजकडे कुमक मागितली. भास्करपंतामागून स्वतः भोसला बंगाल्यांत जाऊं लागला. तेव्हां कोणीकडून तरी बंगाल्यावरील मराठ्यांचा शह सुटावा म्हणून पातशहानें नानासाहेब पेशव्यास पत्र लिहून विनति केली कीं, " मी रोख खर्चास कांहीं रुपये देतो, शिवाय माळव्याची सनद देतो; पण भोसल्याच्या स्वारीचें हें संकट तुम्हीं निवारावें." ती विनति मान्य करून नानासाहेब अलाहाबादेवरून मुर्शिदाबादेस पोहोंचला व तेथून खालीं उतरून त्यानें रघूजी भोसल्याचा पराभव केला. पेशव्याची ही कामगिरी पाहून महमदशहा पातशहाला आपल्या वचनाप्रमाणें व पूर्वइतिहास लक्षांत घेऊन पेशव्यास माळव्याची सनद देणें अगत्याचें झालें. परंतु एवढा मुलुख दिल्यानें आपली नापत होते म्हणून त्यानें वरकरणी शहाजादा अहमद यास मुख्य सुभेदार करून पेशव्यांस त्याचा दिवाण किंवा मुतालीक केलें. नानासाहेबानें चार हजाराऐवजी बारा हजार घोडेस्वार नोकरीस ठेवण्याचें कबूल केलें. मात्र या अधिक आठ हजारांचा खर्च पातशहानें द्यावयाचा होता. हा तह घडवून आणण्यास पेशव्यास राजे जयसिंग व निजाम यांची मदत होती, आणि महमदशहा हा तह पाळील अशाविषयीं स्वतः जयसिंग हा जामीनदार झाला. उलटपक्षीं पेशव्यांच्या बाजूनें मल्हारराव होळकर राणोजी शिंदे व पिलाजी जाधव हे जामीन राहिले.

यानंतर भोसले व पेशवे यांचा तात्पुरता सलोखा होऊन शाहूच्या मध्यस्थीनें भोसल्यांनाच बंगाला द्यावा असें ठरलें. उलट पेशव्यांस सातारकर महाराजांनी सनद देऊन पेशव्यांनीं पूर्वीं मिळविलेले मोकासे जहागिरी, कोंकण व माळवाप्रांत यांचें आधिपत्य, शिवाय अलाहाबाद आग्रा अजमीर यांची खंडणी, पाटणाप्रांतांतील तीन तालुके, अर्काटजिल्ह्यापैकीं वीस हजार खंडणी, भोसल्यांच्या राज्यांतील कांहीं गांवें अशीं त्यास दिलीं. लखनौ. पाटणा

दक्षिणबंगाल, बहार व वऱ्हाडपासून कटकपर्यंतचा प्रांत यांतील खंडण्या भोसल्यांनीं वसूल कराव्या असें ठरलें. नंतर शाहूमहाराज आंतिष्ट होऊन मृत्यु पावण्याच्या बेतांत आले, त्या वेळीं त्यांनी नानासाहेब पेशव्यांच्या नांवें अशी सनद करून दिली कीं, यापुढें सर्व मराठी राज्याचा कारभार पेशवे यांनीं निरतर करीत जावा, व सातारच्या गादीचा सर्व प्रकारे मान राखावा. मराठेशाहींत ही निरतरच्या दिवाणगिरीची सनद मिळाल्याने पेशव्यांच्या पातशाही धोरणास अधिकच बळकटी आली.

पुढे अहमदशहा दिल्लीचा पातशहा असतां त्याचा वजीर सफदरजंग याने जे रोहिले उन्मत्त झाले होते त्यांजवर शस्त्र धरिले. या कामी मल्हारराव होळकर व जयाप्पा शिंदे यांनीं वजिरास मोठे सहाय्य केले, व त्याबद्दल वजिरानें मराठ्यांस गगायमुना नद्यांमधील कांहीं प्रांत बक्षीस दिला (१७४८). या सुमारास अहमदशहा अबदाली याने हिंदुस्थानावर फिरून स्वाऱ्या करण्यास सुरुवात केली होती, व पातशहाच्या हातून मुलतान व लाहोर ही शहरे घेतली होती. यामुळे दिवाण सफदरजग यास दिल्लीकडे मराठ्यांच्या फौजेची गरज लागली, व रोहिल्याशीं झालेल्या लढाईच्या खर्चाबद्दल ५० लक्ष रुपयांचा कागद लिहून घेऊन मराठी फौजा दुआब प्रांतांतून निघाल्या. दिल्ली येथील कारभारी लोकात वैमनस्य उत्पन्न झाले. खुद्द दिल्लीच्या आसपास वजिरांची युद्धे होऊ लागली. या सधीस होळकर दिल्लीस गेला, व त्याच्या सहाय्याने सन १७५४ मध्यें दुसरा अलमगीर नांवाचा पातशहा गादीवर बसविण्यांत आला. सन १७५६ मध्ये नानासाहेबाने रघुनाथराव याजबरोबर मोठी फौज देऊन त्याला उत्तरहिंदुस्थानात पाठविले. त्याच्या साहाय्याने वजीर शहाबुद्दीन याने दिल्ली शहर व त्याबरोबर अलमगीर बादशहा यांना ताब्यांत घेतलें. तेव्हां अबदल्लीचा प्रतिनिधि नजीब उद्दवला यास पळून जावे लागले. रघुनाथरावाचा मुक्काम दिल्लीजवळ बरेच दिवस पडला होता. त्यास लाहोर येथून आदिनाबेग याने बोलावणें पाठविल्यावरून रघुनाथरावाने तिकडे जाऊन त्याच्या साहाय्याने लाहोर घेतलें (१७५८), व आदिनाबेगच्या साहाय्यास कांहीं मराठी फौज ठेवून तो दक्षिणेत परत आला. पण या स्वारींत त्यास ७० लक्ष रुपये कर्ज झाल्यामुळे दौलतीचा कारभार पाहणार सदाशिवरावभाऊ याचें व त्याचे भांडण होऊन, पुढील स्वारींत स्वतः सदाशिवरावभाऊनें जावे असें ठरलें. लाहोर मराठ्यांनीं घेतल्याची बातमी अबदल्लीस कळतांच तो फिरून हिंदुस्थानांत येण्यास निघाला. दिल्लीस फिरून एक राज्यक्रांति झाली. अबदल्लीच्या फौजेने लाहोरास येऊन मराठी फौजेस पिटाळून लावलें. नंतर तो यमुनानदी उतरून रोहिल्यांच्या सैन्यास मिळण्याकरितां निघाला. होळकर व शिंदे हे त्यांच्याजवळ थोडें सैन्य असल्या-

मुळें मागें हटले. या बातम्या दक्षिणेंत येतांच मराठ्यांची उत्तरेकडील स्वारीची तयारी झाली; व नुकताच उदगीरच्या लढाईंत विजय पावलेला सेनापति सदाशिवरावभाऊ, नानासाहेब पेशव्यांचा मुलगा विश्वासराव यास बरोबर घेऊन उत्तरेकडे निघाला. पुढील सालीं ( १७६० ) सुप्रसिद्ध पानिपतची लढाई होऊन मराठ्यांचा मोठाच पराभव झाला आणि आजपर्यंत प्रस्थापित झालेला मराठ्यांचा दिल्लीशीं संबंध कायमचा तुटणार व मराठ्यांच्या पातशाही धोरणाचा येथेच अंत होणार असे सर्वांस वाटलें !

पण ही स्थिति फार दिवस टिकली नाहीं. पानपतच्या पराभवानें मराठ्यांचें नुकसान झालें ही गोष्ट खरी; पण ज्याकरतां पानिपतची लढाई झाली तें कारण केव्हांच दुरुस्त होण्याजोगें नव्हते. हे कारण म्हणजे दिल्लीच्या पात शहाचा कमकुवतपणा, व दिल्लीच्या दरबारीं माजलेला कारस्थानी प्रतिस्पर्धी अमीरउमरावांचा बुजबुजाट. दिल्लीकडे लष्कर घेऊन मराठ्यांनी जाण्याची सुरुवात बाळाजी विश्वनाथापासून झाली होती तेव्हां काय किंवा पानपतच्या वेळीं काय, मराठे हे स्वतःसाठीं दिल्ली हस्तगत करण्याकरतां गेले नव्हते, तर पातशहाच्या विनंतीवरून पातशहाचें सरक्षण करण्याकरतां गेले होते. दिल्लीस पानिपतेपूर्वी पन्नास वर्षांपासून दोन मुख्य पक्ष होते. पैकी, स्थूल शब्दांनीं वर्णन करावयाचे तर असें म्हणतां येईल कीं, एक पक्ष पानइस्लामिक म्हणजे मुसलमानाभिमानी व दुसरा पान-हिंदिक म्हणजे हिंद अभिमानी. पहिल्या पक्षाचे धोरण असें होते कीं, हिंदु विशेषतः मराठे यांना उत्तरहिंदुस्थानांत बिलकूल थारा द्यावयाचा नाहीं. दुसऱ्या पक्षाचें धोरण असें होतें कीं, पातशाहीचें रक्षण होतां होईतो हिंदुस्थानच्याच लोकांकडून करावयाचे; मग ते पातशाहीचे मित्र ऋणानुबंधी हिंदु असले तरी हरकत नाहीं.

खुद्द दिल्लीचे पातशहा हेहि या दुसऱ्या वर्गांत पडत. त्यांना प्रायः इराण व अफगाणिस्तान इकडील स्वधर्मीयांपेक्षां हिंदूंची मदत अधिक ग्राह्य वाटे. याचे एक कारण असे असावें की, इराण व अफगाणिस्तान येथील मुसलमानी राजांना दिल्ली हस्तगत करून तेथें आपली गादी स्थापावी अशी आकांक्षा होण्याचा संभव होता. पण हिंदु कितीहि प्रबल झाले तरी दिल्लीची पातशाही मोडून तेथें हिंदुपदपातशाही स्थापावी अशी आकांक्षा त्यांच्या मनांत येण्याचा संभव आहे अशी कल्पनाहि कधी पातशहास आली नाहीं. शहाजहानाच्या वेळेपासून दिल्ली येथील भांडणांत हिंदूंची मदत घेण्यास सर्रास सुरुवात झाली होती, व सर्व हिंदूत मराठे हेच विशेष प्रबळ असे दिसू लागतांच पातशाहीचें संरक्षण करण्याचा अधिकार अठराव्या शतकाच्या प्रारंभापासून मराठ्यांकडेच देण्यांत आला. निदान अफगाणिस्तानच्या राजाप्रमाणें खुद्द हिंदुस्थानांतले मुसलमानी नबाब हेहि स्वार्थी आहेत व त्यांजवर विश्वास

ठेवून चालावयाचें नाहीं असें वाटल्यामुळेच दक्षिणच्या सहा सुभ्यांची चौथाई मराठ्यांना देऊन पातशाहीचें रक्षण संकटसमयीं करण्याचें जबाबदारीचें काम त्यांजकडे देण्यांत आले होते. आणि या अधिकारास अनुसरूनच लष्कर घेऊन मराठे दिल्लीकडे स्वाऱ्या करूं लागले.

नादिरशहा व अबदल्ली हे दोघेहि दिल्लीकडे आले ते 'पानइस्लामिक' पक्षाच्या चिथावणीने, परंतु यापैकी कोणालाहि कायमचे दिल्लीस राहतां आले नाही किंवा कायमचे लष्कर ठेवतां आलें नाही. यामुळे पानपतानंतर लौकरच फिरून मराठ्यांस दिल्लीकडची बोलावणी येऊ लागली. पानिपत येथें मराठ्यांचा पराभव झाला तरी पेशव्यांची मध्यवर्ती सत्ता अद्यापि नष्ट झाली नव्हती व मराठेमंडळाचा संघ कायम होता. मराठ्यांची संबंध एक पिढी पानिपत येथे गारद झाली तरी पुढच्या पिढीच्या मनांत हे अपयश धुऊन काढू अशी प्रबळ आकांक्षा होती. शिवाय १७६१ पूर्वी दिल्लीस अराजक होते ते १७६१ नंतर कमी न होतां उलट बळावले. व पुढे कित्येक वर्षे तरी पातशहास दिल्ली सोडून बाहेर भटकत फिरावे लागले! पातशाही दिवाण व उमराव यांचे तुंबळ युद्ध दिल्लीस होऊन,पानपतच्या युद्धाच्या वर्षीच पातशहाने इंग्रजांना बंगाल बहार व ओरिसा या तीन प्रांतांची दिवाणी देऊ करून मराठ्यांप्रमाणे आणखीहि एक मुसलमानेतर असा स्नेही जोडला. पण दिल्लीचे राजकारण आपल्या हाती येण्याइतके आपण सबळ आहों असा आत्मप्रत्यय इंग्रजांस अद्यापि आला नव्हता. बंगाल अयोध्या रोहिलखंड या प्रांतांतहि त्यांचे वर्चस्व अद्यापि पुरे स्थापित व्हावयाचें होतें. अर्थात् स्थानभ्रष्ट झालेल्या पातशहास आत्मरक्षणाकरितां मराठ्यांकडेच धांव घेणें जरूर पडलें. मराठ्यांसहि पानपतचे संकट आपणांवर ज्यानी आणिले अशा नजीबखानादि शत्रूचे पारिपत्य करावयाचेच होते; म्हणून इंग्रजाच्या मदतीची निराशा होऊन शहाअलम याने मराठ्यांकडे आपणांस दिल्लीस नेण्याविषयीं बोलणे लावितांच त्यांनीं ती कामगिरी आनंदाने पत्करिली.

१७६८ साली दक्षिणेत स्थिरस्थावर होऊन महादजी शिंदे व तुकोजी होळकर हे उत्तरहिंदुस्थानांत शिरले. १७७० साली नजीबखान वारला व मराठ्यांचा एक प्रबळ प्रतिपक्षी कमी झाला. तेव्हां महादजी शिंद्याने शहाअलम यास १७७१ सालीं दिल्लीस नेऊन तक्तावर बसविलें. शहाअलम या वेळीं इंग्रजांच्या गोटांत होता व तेथून तो राजरोसपणे शिंद्याचा हात धरून मराठ्यांच्या गोटांत गेला, ही गोष्ट या ठिकाणीं लक्षात ठेवण्यासारखी आहे. कारण,या गोष्टीवरून इंग्रज व मराठे यांचें या वेळचें सापेक्ष बलाबल लक्षांत येते. पातशहा मराठ्यांच्या हातीं जावा ही गोष्ट इंग्रजांना अर्थातच आवडली नाहीं. त्यानें मराठ्यांची संगत धरूं नये असा इंग्रजांनी त्यास परोपरीने उपदेशही

करून पाहिला. परंतु मराठ्यांची मदत पातशहांनीं घेण्याची परंपरा जुनी व त्यांचा स्नेह खानदानीचा होता. शिवाय स्वतः इंग्रज त्याला तक्तावर बसविण्याची जबाबदारी घेण्यास तयार असते तरीहि गोष्ट वेगळी. अर्थात् आम्ही मदत देऊं शकत नाहींच, पण मराठ्यांची मदत मात्र घेऊ नका, हें इंग्रजांचें आपमतलबाचें दुहेरी बोलणे दिल्लीस जाण्याकरतां उतावळा झालेल्या शहाअलमास कसें पटावें ?

असो; महादजीनें शहाअलमास दिल्लीस नेऊन तक्तावर बसविलें; परतु तेथे त्याला पुष्कळ दिवस राहतां आले नाहीं. इकडे १७७३त नारायणरावाचा खून झाल्यामुळे नाना फडणविसास महादजीची गरज लागली; व तेथून पुढे सालबाईचा तह होईपर्यंत महादजी हा पेशवाईराजकारणांत गढून गेल्यामुळे त्याला दिल्लीकडे लक्ष देण्यास फारसे फावले नाही. पण या आठ वर्षांत महादजीने अप्रत्यक्ष रीतीने दिल्ली येथील आपल्या पायाखालची जमीन दृढ केली होती. ती अशी की, इग्रज व पेशवे याच्या सबंधांत स्वतःस अग्रेसरत्वाचा मान मिळवून दिल्लीकडील राजकारणात इग्रजांनी लक्ष घालूं नये, पातशाहीची सर्व व्यवस्था करण्याचें काम एकट्या आपल्या हातीं एकतंत्री रहावें—अशी महादजीनें इंग्रजांकडून गर्भित संमती मिळविली होती. १७७४ सालीं वॉरन हेस्टिंग्ज हा गव्हर्नर जनरल झाला. तो व महादजी यांचें चांगलेंच सूत जमले व हेस्टिंग्ज परत विलायतेस जाईपर्यंत त्या दोघांचा स्नेह अबाधित राहिला. इग्रजांनींहि दिल्लीचा एक शहाजादा आपल्या हातीं ठेविला. होता; परंतु या मोहऱ्याचा उपयोग त्यांना मनाजोगता करतां आला नाहीं.

सालबाईचा तह होऊन महादजीचे पाय दक्षिणेकडे मोकळे होतांच फिरून तो दिल्लीकडे गेला. पण तेथील स्थिति पाहतां पातशहाकडून आपणास आहे याहून कांही विशेष अधिकार मिळाल्याशिवाय आपला जम बसणार नाहीं असे दिसून आल्यावरून तसा अधिकार त्याने पातशहापाशीं मागितला, व पातशहाची 'वकील मुतलकी' पेशव्यांच्या नांवे देऊन त्यांच्यातर्फे दिल्लीस सर्व कारभार करण्याचा अधिकार महादजीस द्यावा असे पातशाहाने ठरविलेंही. पण या वेळीं दक्षिणी विरुद्ध हिंदुस्थानी अशा स्वरूपाची स्पर्धा प्रबळ होऊन रजपूत जाट मुसलमान यांनीं कट करून महादजीशीं युद्ध आरंभिलें. सन १७८९ त लालसोट येथें झालेल्या लढाईत रजपुतांनीं महादजीचा पराभव केला. या वेळीं महादजी हा पातशाही फौज घेऊन पातशाही सरदार म्हणून लढत होता. पण या फौजेवर विश्वास टाकतां येत नाही असे त्यास लवकरच आढळून आलें. कारण, एकदोन प्रसंगीं ऐन युद्धाच्या वेळीं मुसलमानी फौजा विश्वासघात करून उघडपणें शत्रूस जाऊन मिळाल्या ! तेव्हां खास विश्वासू अशा मराठी फौजा पुरेशा हातीं आल्याशिवाय दिल्लीस जाण्यांत

अर्थ नाहीं असें महादजीनें ठरवून त्यानें पेशव्यांकडे फौजेची मदत मागितली. ती मदत येईपर्यंत महादजी जवळपास मथुरेस असतां, पातशहानें निकडीचीं बोलावणीं पाठविलीं तरी तो पातशहाच्या मदतीस गेला नाहीं असा एक प्रवाद आहे; पण 'इतिहाससंग्रहां'त प्रसिद्ध झालेल्या दिल्ली येथील राजकारणाच्या पत्रांवरून हा आरोप खरा दिसत नाहीं. महादजीचा टिकाव तूर्त दिल्लीस लागणार नाहीं असे खुद्द पातशहास वाटत होते व महादजीने इतक्यांत येऊं नये असे पातशहा त्यास लिहीत होता. शिवाय दिल्लीच्या पेशवाई वकिलाच्या मतें या वेळी महादजीबरोबर दुसरे कोणी मराठे सरदार आल्यावांचून कार्यभाग होणार नाहीं असे होते.

१७८८ सालीं गुलाम कादराचा सैतानी स्वभाव कळसास पोंचून त्यानें शहाअलमाचे डोळे काढले व पातशाही जनानखान्याची अब्रू घेतली ! तेव्हां महादजीनें आपला सरदार राणाखान यास दिल्लीस पाठवून गुलाम कादरास पकडून त्याचा शिरच्छेद करविला. तथापि दिल्लीचा कारभार अद्याप डळमळीतच राहिला. कारण, महादजीस दक्षिणेत यावयाचे होते. १७९२ साली तो पुण्यास परत आला, व १७९३ सालीं इकडेच वारला. महादजीच्या मरणामुळे दिल्ली येथून मराठ्यांचा पाय अगदीच निघतो की काय अशी नाना फडणविसास भीति वाटत होती, परंतु ती ताबडतोब खरी ठरली नाही. पण महादजीच्या मरणानंतर लवकरच दिल्लींत आपला प्रवेश करून घेण्यासाठी इंग्रजांनी कबर बांधली, व दौलतराव शिंद्याच्या मूर्खपणामुळे व कमकुवतपणामुळें, हे त्यांचे धोरण यशस्वी होऊन, १८०३ साली इंग्रजांनीं दिल्ली घेतली. अशा रीतीने जवळ जवळ शंभर वर्षेपर्यंत मराठ्यांचे दिल्लीस चालू असलेले राजकारण व पातशाही धोरण समाप्त झाले !

इंग्रजांचा हात दिल्लीच्या राजकारणांत यापूर्वीच शिरावयाचा, पण केवळ वॉरन हेस्टिंग्ज याच्या सबूरीच्या धोरणामुळे तो शिरला नाही. पुष्कळ इंग्रज टीकाकारांनीं या धोरणाबद्दल हेस्टिंग्जला दोष दिला आहे; व कित्येकांनी तर हेस्टिंग्जने महादजीपासून भला मोठा लांच खाऊन हे सबूरीचे धोरण स्वीकारले असा आरोपहि केला आहे. तो खरा असो वा खोटा असो, पुण्याच्या दरबाराशीं राजकारण बोलावयाच्या कामीं महादजीची आपल्यास फार मदत होणार आहे, अशी हेस्टिंग्ज साहेबाची समजूत होती; व सालबाईचा तह ज्या रीतीने घडून आला ती लक्षांत घेतली असतां ही समजूत अगदीच खोटी होती असें म्हणतां येत नाहीं. १७७१ पासून १७८३ पर्यंत बारा वर्षे हेस्टिंग्जने दिल्लीकडे दुर्लक्ष केलें हें उघड दिसतें. परंतु १७७१ सालीं, म्हणजे इंग्रजांचा विश्वासू मित्र नजीबखान याच्या मरणानंतर लवकरच मेजर ब्राऊन व मेजर डेव्ही नांवाचे वकील त्यानें पातशहाच्या गुप्त भेटीस पाठविले. पण त्या भेटींतून कांहींच

निष्पन्न झालें नाहीं. १७८४ सालीं शहाअलमाचा मुलगा लखनौ येथें हेस्टिंग्जला भेटला व आपल्या बापास तक्तावर नेऊन बसविण्यासाठी त्याने इंग्रजांची मदत मागितली. परंतु, ईस्ट इंडिया कंपनीचे डायरेक्टर व कलकत्त्याचे इतर कौंसिलदार हे दिल्लीच्या राजकारणांत पडूं इच्छित नाहींत, याकरितां तुम्ही महादजी शिंद्याचीच फिरून मदत मागा, असा त्याने शहाजाद्याला जबाब दिला. मात्र हा जबाब त्याने शिंद्याच्या विश्वासू वकिलाची गुप्त भेट घेतल्यानंतर दिला. मग त्या भेटींत त्यांचें त्यांचें काय बोलणे झाले असेल तें असो.

महादजीकडे खुद्द इंग्रजांनीं बोट दाखविल्यावर पूर्वीप्रमाणे फिरून एक वेळ महादजीने पातशहाचा पक्ष स्वीकारला यांत त्याची काय चूक ? तरी पण इंग्रज इतिहासकार त्यालाच दुष्ट व कारस्थानी म्हणतात. पण या वेळीं महादजीनें एक गोष्ट पूर्वीपेक्षां अधिक केली, व ती त्याच्या शहाणपणाची साक्ष पटविते. ही गोष्ट म्हणजे शहाअलम याजकडून पेशव्यांस 'वकील मुतलक' व स्वतःस 'मुक्त्यार उल्मुल्ख' ही पदवी त्याने पातशहाकडून मिळविली. ज्याच्या बळावर पातशहा तक्तावर अढळ बसू पाहणार त्याला पातशाही वजिरापेक्षाहि वरिष्ठ अधिकार हातीं असणे अगदी योग्य होते. कारण, दिल्लीच्या वजिरानीच सारी डाळ नासली होती, व त्यांना कह्यांत ठेवावयाचे तर तरवारीच्या जोडीला अशा वरिष्ठ अधिकाराची आवश्यकता फार होती. शिंद्याच्या हाती एवढा अधिकार जावा ही गोष्ट इंग्रजांना पसत नव्हती. पण त्या वेळीं इंग्रज दिल्लीच्या राजकारणांत स्वतः पडण्यास तयार नव्हते. तेव्हां इंग्रज इतिहासकारांनीं मागाहून बोटे मोडण्यांत काय अर्थ ? महादजीस मिळालेल्या अधिकाराचे वर्णन इतिहासकार मिल याने खालील शब्दात केले आहे:—

" An authority which superseded that of the wazir and consolidated in the hands of the Mahrattas all the legal sovereignty of India."

" महादजीस मिळालेल्या अधिकारानें त्याला खुद्द दिवाणावरहि हुकमत चालवितां येऊ लागली, व मराठ्यांच्या हातात हिंदुस्थानच्या अधिराज्याची सर्व कायदेशीर सत्ता एकवटली."

हेस्टिंग्जने पातशहास शिंद्याकडे बोट दाखविलें तेव्हां महादजी पुढे अशा तऱ्हेचा सर्वाधिकार पातशहाकडून मिळवील असे त्याला स्वप्न पडले नव्हते, हे खरें. पण महादजीनें असा अधिकार घेतलेला पाहून केवळ या कुरापतीवर त्यांना मराठ्यांशीं युद्ध करणे वाईट दिसलें असते. हेस्टिंग्जने आपला " डिफेन्स " देते वेळीं यासंबंधाने असे प्रतिपादिले कीं, " महादजीचे व माझे गुप्त खलबत होऊन पातशहास आपण होऊन महादजीच्या पदरांत मीं घातले, ही गोष्ट खरी नाहीं. पण आम्हीं आश्रय देण्याचें नाकारल्यावर शिंद्यानें जर पात-

शहास आपल्या हातीं घेतलें व त्यानंतर पातशहानें त्यास सर्व अधिकार दिला तर त्याकरितां आम्हीं मराठयांशीं लढाई कशी करावी ? " यांतली खरी गोष्ट अशी आहे कीं, महादजी दिल्लीचें राजकारण हाती घेण्यास उत्सुक होता, व इंग्रज हें काम न झेंपण्यासारखें व खर्चाचें म्हणून अंगाबाहेर टाकीत होते. महादजी दिल्लीस गेल्यानें पातशहाचें खरोखर कल्याणच झालें. विल्सन् यानें मिलच्या इतिहासास टिपणें देतांना असे म्हटलें आहे की, " पातशहाचें स्वास्थ्य सुख व त्याचा मानमरातब यांच्या दृष्टीने पाहतां महादजीच्या हातीं पातशहा गेला हें चांगलें झालें. कारण, दिल्लीच्या दरबारी वंशपरंपरागत दिवाणगिरी किंवा उमरावी भोगिलेल्या मुसलमानांनीं त्याचा छळच केला होता."

असो. महादजीस सर्वाधिकार मिळाल्यावर पातशहाच्या इच्छेविरुद्ध महादजीने इंग्रजांकडे बंगाल्यांतील चौथाईची मागणी केली, व पातशहाची इच्छा नसती तरी दिवाणाहून वरिष्ठ अंमलदार या नात्याने अशी मागणी करण्याचा महादजीस अधिकारच होता. पण इंग्रजांस या मागणीचें मोठें वैषम्य वाटलें व महादजीनेहि स्नेहभावाने ती मागणी त्या वेळीं धसास लावली नाही. इंग्रजांप्रमाणे दिल्लीच्या अमीरउमरावांनाहि पातशहाने महादजीस कुलमुखत्यारी दिली ही गोष्ट आवडली नाही, हे पूर्वीं सांगितलेंच आहे. पण ही मुखत्यारी कोणास आवडो वा न आवडो महादजीने ती मिळविली खरी; व शिवाजीच्या वेळेपासून चौथाईच्या हक्करूपानें पातशाही धोरणाचा जो वृक्ष फोफावला त्याला महादजीने मिळविलेल्या या सर्वाधिकाराने मोहोर आला असेच म्हटलें पाहिजे. पण दुर्दैवानें दौलतरावासारख्या नादान मनुष्याचा शिंद्याच्या गादीस आणि बाजीरावासारख्या नादान मनुष्याचा पेशवाईच्या गादीस विटाळ झाल्यामुळें या मोहोरावर रोग पडून तो सगळा झडून गेला, ऐवढेच नव्हे, तर त्या मोहोराबरोबर वृक्षहि जळून गेला ! तथापि यशापयश हे जगांत सर्वांस सारखेच वाटले गेलेले नसते. प्रस्तुत प्रकरणांत पातशाही धोरणाची मीमांसा आम्हीं ज्या दृष्टीनें केली आहे त्या दृष्टीनें पाहतां, पातशाही सत्तेचे पांघरूण किंवा त्या सत्तेचा देखावा कायम ठेवून खरी कार्यकारी सत्ता आपल्या हातीं आणण्याचें, व अशा रीतीनें सर्व हिंदुस्थानभर आपली सत्ता प्रस्थापित करण्याचे, मराठयांचें जें धोरण शिवाजीच्या वेळीं सुरू झाले ते त्याच्यामागें कर्त्या पुरुषांची जी परंपरा महाराष्ट्रास लाभली तिने सुसंगत रीतीनें पुढें कसें चालविलें एवढेंच आम्हांस दाखवावयाचें होते; आणि प्रस्तुत प्रकरणांतील सर्व हकीकत वाचल्यावर वाचकांस आमची ही मीमांसा पटेल असें आम्हांस वाटते.

शेवटीं आम्हीं ज्या मुद्दयाची चर्चा केली आहे त्या मुद्दयावर प्रकाश पाडण्यासारखे कांहीं उतारे देऊन हें लांबलेलें प्रकरण पुरें करतों. हे उतारे या अखेरच्या दिवसांत खुद्द दिल्लींत राहणाऱ्या मराठ्यांच्या वकिलानें पुण्यास

नाना फडणविसास लिहिलेल्या पत्रांतील आहेत, एवढें सांगितलें असतां त्यांचें महत्त्व लक्षांत येईल.

दिल्ली येथलि मराठयांचा वकील गोविंदराव पुरुषोत्तम १७८३ च्या सप्टबर २६ तारखेस उत्तरहिंदुस्थानांतील परिस्थितीसंबंधानें नानास लिहितो, " हिंदुस्थान सारें रिकामें पडलें आहे. अफराशखान व नजबकुलीखान हे दोघे सरदार नजबखानाकडील आहेत. हे जो कोणी फौजबद सरदार येईल त्याची चाकरी करावयास सिद्ध आहेत. हिंदुस्थानांत लढाई तरवार राहिली नाहीं ! या अर्थी इकडे फौज पाठवून खबर घेणें जरूर आहे. नाहीं तर सिखाचा अथवा फिरंगी याचा काबू दिल्लीस जालियावर मग मसलत भारी पडेल. फिरंगी यांचे मानस दिल्लीस पातशहांपाशीं येऊन यास आपले ममतेत काबूत घ्यावें आणि सर्वोपर व्हावें, हे मर्जी इंग्रेजांची आहे. या अर्थी जलदी करून आपली फौज दिल्लीस आली तरी पातशहा व हिंदुस्थान काबूत राहील. जर या गोष्टीस विलंब लागल्यास मग पुढे मसलत भारी पडेल. म्हणून विनंति लिहिली आहे."

( १७८४ ) " पत्री आज्ञा कीं, पातशाहा पूर्वी प्रयागास असतां व त्याचे अगोदर व अलीकडे, इंग्रेजांसीं त्यांचे करारमदार कैसे कैसे जाले आहेत, व मुलकाच्या सनदा कोठकोठील कशा दिल्या आहेत ? अंतरवेदींत केवढ्याचा मुलुख दिल्हा, त्याच्या सनदा दिलेल्या आहेत किंवा कसे आहे ? याचा शोध वारकाईनें काढून तपसीलवार लिहून पाठाविणे " म्हणून पत्री आज्ञा. त्यास पातशाहाचे दप्तरीं मनास आणिले. त्यांत मजकूर कीं, प्रयागी पातशाहा होते त्या समयी, इंग्रेज, शिवाय तोफा ताहफ, सव्वीस लक्ष रुपये दरसाल देत होते. व प्रयागचा सुभा व कडाकुरा हे दोन्ही स्थळे सुजाउद्दौलाकडून सोडवून पातशाहास देविलीं होतीं. त्यांत तेहतीस लक्ष रुपये पातशाहास दरसाल येत होते. व पातशाहांनीं इंग्रेजांस सनद, बर्दवान व इसलाम नगर येथील कमाविसीने मामलत सांगितली आहे म्हणून सनद, व सुभे बंगाल व सुभे पट्टणा येथील दिवाणगिरीची सनद, याप्रमाणे दोन सनदा मात्र जाल्या आहेत. याशिवाय अंतरवेद वगैरे कोठीलहि सनद पातशाहाचे घरींहून दिधली नाहीं. त्याची याद पातशाही दप्तरची, पारसीची, राय सिद्धराय पेशकार दप्तरचे, त्याजपासून आणवून सेवेसी पाठविली आहे, त्याजवरून ध्यानास येईल. दप्तरीं सनदा बंगाल्याची व पट्टणाची दिवाणगिरी इंग्रेजांचे नांवें व सुभा पातशाही आलाबिर्दीखानाचा नातू मुबारक जंगबहादर याचे नांवे व बर्दवान इसलाम नगर यांची मामलत कमाविसीने आमानी सांगितली आहे. ह्याचा दप्तरीं दाखला इतकाच आहे. याजशिवाय पातशाहा त्याचे काबूंत होते ते समयीं, खास दसखतीशुके व फर्द दसखत करून त्यात दस्तऐवज कांहीं असल्यास न

कळे. सनदी दप्तरी दाखला इतकाच, म्हणून खालशाचे पेशकारांनीं सांगितले. व याजशिवाय महमदखान पठाण वगैरे पातशाहास देत होते. दप्तरींची पारसी याद पाठविली आहे. त्याजवरून श्रुत होईल. विशेष काय लिहिणें."

( १७८४ ) " इष्टीनसाहेब इंग्रज पातशाहाजाद्यास घेऊन श्रीकाशीस गेले. हें वर्तमान विलायतेस कंपनीनें ऐकून इष्टिनास पत्र लिहिले की तुम्ही हिंदुस्थानचे पातशाहाचा पुत्र पातशाहाजादा समागमे घेऊन येतां, त्यांस तुमचा काय इरादा आहे तें लिहून पाठविणे. एक तर, दक्षणी सरदारांचा आमचा सलूक जाला आहे, आणि त्यांचे मर्जीशिवाय त्यांसी बदसलूकी करून पातशाहाजाद्यास विना त्यांची मर्जी घेऊन आलां, ठीक नाही. तर देखत पत्र पातशाहाजाद्यास माघारां राजश्री पाटिलबावापाशी बिदा करणे. ते पातशाहास विनति करून, पातशाहाजाद्यास तकसीर माफ करून, त्याचे स्वाधीन करितील, तुम्ही या बखेड्यांत न पडावे म्हणून लिहिले होते. त्याजवरून इष्टीन इग्रज याने पातशाहाजाद्यासमागमे दोन पलटणे देऊन राजश्री सदाशिवपत बक्षी, राजश्री पाटिलबावाकडील, यांजसमागमे बिदा केले. ते लखनऊस आले आहेत."

" इदिनाचे मानस हिंदुस्थानांत पातशाहाजाद्यास घेऊन यावे.व राजश्री पाटीलबावांची व इष्टीनाची एकवाक्यता, इद्रसेन साहेब व मेजर ब्रौन साहेब इग्रेज याजपाशी आहेत त्यांचे विद्यमाने व सदाशिवपत बक्षी यांचे विद्यमाने आहे. त्यांच्या भेटी कालानुरूप जालियावर कोणती मसलत करतात ते पहावे."

( १७८५ ) " या दिवसांत मेजर ब्रौन यांचे येथे दोन वेळां खासे गेले होते; आणि त्याजकडील मौलवी म्हणून वकील आहे त्यासीहि बहुत खलबत असते. काय मजकूर आहे, हे सांगण्यांत येत नाही."

" पातशाहांनी राजश्री पाटिलबावा यांचे विचारे श्रीमत राजश्री पत प्रधानसाहेबांस मुखत्यारनमुलूख कितपत घेऊन...एकशे एक मोहरा श्रीमतां कडून नजर पातशहास केली. श्रीमंतांचा खिलत पुण्याकडे रवाना करून चद्र २१ ( १ मे १७८५ ) मिनहूस श्रीमत राजश्री पतप्रधान स्वामी यांचे नायबतीची वस्त्रे मुखत्यारीचीं आपण घेतलीं. चारकुबा व नालकी पातशाहांनी दिधली. चारकुबा म्हणजे एक अगरखा असतो, त्यास बाह्या नाहींत. बाहू पावेतों आणि आगा पिछा मात्र असतो. आणि अघाडीस व बाहूवर मोत्यांची झालर लागली असते. यास 'चारकुबा खिलत' म्हणतात. हा खिलत व मुखत्यारनमुलुक म्हणजे मुतलख वकील याचा मरातब जाला. पातशाहाजाद्यांनीं देखील आपले कामासाठीं यांचे घरास जावें, चिंता नाही. याप्रमाणे आहे......राजश्री पाटिलबावापाशीं फौज थोडी आणि सारे हिंदुस्थानचे काम भारी. **मुखत्यारीचा कारभार म्हणिजे पातशहाचे प्रतिनिधी**. वजिरा

व मीरबक्षीस वगैरे ज्यास ज्या समयीं च्याहतील त्या दूर करतील, अथवा ज्यास च्याहतील त्यास बहाल करतील, ऐसा प्रकार आहे. त्यास या प्रकारासीं आणि यांजपासीं फौज आहे या सामानासीं ठीक नाहीं."

( १७८६ ) पाटीलबावांची कर्तबगारी व हिंदुस्थानची परिस्थिति वर्णन करतांना गोविंदराव पुरुषोत्तम दिल्लीहून १७८६ साली लिहितो, " येथील प्रकार तर हिंदुस्थान निक्षत्री झाले. शीख आहेत, त्यांत फूट आहे. कोणी कोणाचे स्वाधीन नाही. तदवाव पडल्यास जमीदारी करावयासहि लागतील. जर जबरदस्ती न पाहिली तर लुटीत फिरतच आहेत. हे शिखाचे वर्तमान आहे. वजिराचा प्रकार म्हणावा तर इंग्रेजांवर त्याची दवलत आहे. त्यास सांप्रत्य इग्रजांचा प्रकार हलका दिसतो. हिस्टीन विलायतेस गेला. त्याचे बदली बडेसाहेब म्हणून आले आहेत. त्याचा बदोबस्त हिस्टनाप्रमाणे नाही. व खजीनाहि पूर्ववत्प्रमाणे नाही. परतु पहिली फरपट चालत आली आहे त्याचप्रमाणे कारभार चालतो. व पातशाहाचा प्रकार म्हणावा, तरी एक लाख तीस हजार रुपये दरमहाचा चाकर आहे. तितका पैसा अक्षत मरीट मिळाला म्हणजे त्यास एका गावाची व बिघाभर जमीनीची गरज नाही. याप्रमाणे हिंदुस्थानची अवस्था आहे. त्यास अवघे हिंदुस्थानचे बदोबस्ताचे ओझे एकल्या राजेश्री पाटीलबावावर आहे. जितका बंदोबस्त यांचे जीवेकडून जातीनें करणे तो केला आहे, व करावयाचा तो करतील. परंतु यांचे पदरी कोणी माणूस नाहीं कीं, यांचे सरदारीचा पडदा राखून, मुलकी बदोबस्त करून पैका उत्पन्न करून दौलत सांभाळीसा माणूस नाहीं. याजकरितां स्वामीस सूचनार्थ विनति लिहिली आहे. जो प्रकार दृष्टीने पाहिला आणि प्रत्ययास आला आहे ऐसे जाणून विनति लिहिली आहे."

( १७८७ ) पाटिलबावा हिंदुस्थानांतील कारभार आटपण्यास सर्वतोपरी लायक नाहीं, दुसऱ्या कोणी तरी 'शाहण्या' सरदाराची नेमणूक या कामगिरीवर झाली पाहिजे असें सुचविण्यासाठीं हाच गोविंदराव इ.स. १७८७ मध्यें लिहितो, " पातशहाची मर्जी की, पोटास मात्र लक्ष दीड लक्ष रुपये दरमहा देत जावा, वरकड राज्यकारभारासीं व दौलतीसी यांस गरज नाहीं. ऐसी यांची प्रकृत आहे. व यांचे पुत्र वगैरे शहाजादे मिळून शें दीडशें असामी आहे. परंतु त्यांतहि कोणी जुरतवाला व दैववान दिसत नाहीं कीं पातशाहीस आळा घालून दौलत आटोपील. श्रीमत राजेश्री रावसाहेब प्रारब्धवान प्रतापवंत आहेत. यांचे दैवेकरून पातशहाचे घरची मुखत्यारी पदरीं पडली आहे. यांजकरितां + + + हजार फौज सडी चांगली व सरदार मातबर व कारभारी राजश्री त्रिंबकराव मामा व विसाजीपंत बिनीवाले यांचे प्रतीचा शहाणा माणूस इकडे रवाना जालियास, जितके हिंदुस्थानी लहान थोर आहेत

त्यास पोटासीं धरून कांहीं दिवस त्यांचे पाळीग्रहण करून, दौलत हाताखाले घालून, **जैसें सातान्याचें संस्थान आपले स्वाधीन आहे, तैसें दिल्लीचें संस्थान आपले स्वाधीन राहे, ऐसा समय आहे.** या दौलतीस दोन रोग आहेत. एक अबदाली व एक इंग्रेज. त्यास अबदाली तर दूर, व त्यास त्या प्रांतीं पायबदी भारी. त्याचे येणें इकडे होत नाही. बाकी इंग्रेज समीप आहेत. व ते शहाणे बुद्धिवान् आहेत. परतु तूर्त दिल्लीचे कामांत मुखत्यारीचा हात घालावा ऐसी बडेसाहेबांची मर्जी नाही. त्यांनी विलायतेस कपनीस येथील वृत्त लिहिलें आहे. तेथून उत्तर आल्यावर कर्तव्य ते करावे ऐसे इंग्रेजांचे मानस आहे. इंग्रेजांचा पाय दिल्लींत शिरला म्हणजे मग आपले हातचे हिंदुस्थान गेले. जोपावेतो त्यांचा पाय दिल्लीत शिरला नाही तोपावेतो × × × मर्जीस येईल त्याप्रमाणे तेथील बदोबस्त करावा. जर हे सस्थान आपले काबूत व हातांत असले तर बगाला आदिकरून इंग्रेजांचे दौलतीवर देखील मालकियत व खाविंदी राहील. त्यास इकडे मुलूक बहुत. परतु तीन वर्षे काळ पडला; पांच सहा शेर अन्न विकले. याजकरितां तमाम दुनियेचे लोक रयत मृत्यु पावले. उजाडी जाली आहे. कांहीं दिवस सुरळीत बदोबस्त जालियावर करोडो रुपये अमदानी आहे. पैक्यास कमी नाहीं. तूर्त फौजहि पाहिजे व कांही थोडा-बहुत पैकाहि पाहिजे. तेव्हां जो तेथे राहील, त्याची अब्रू राहून, बदोबस्त होऊन पातशाहांत श्रीमतांचे घरांत राहे ऐसा समय पुढे येणार नाही."

पातशाहाच्या अजागळपणाचे वर्णन करतांना गोविंदराव १७८८ च्या एप्रील २९ च्या तारखेस लिहितो "येथील प्रकार तर जो कोणी पातशहां-पासीं राहील, त्याचेच लक्षावर सर्व बदोबस्त आहे. व पातशहांचा खमीर पक्का नाहीं. मेणाचे नाक आहेत. जो जबरदस्त जवळ येऊन राहील, त्याचे मर्जी-प्रमाणें पातशाहानीहि वर्तावे. दुसरा अर्थ रतिभर नाहीं."

इ. स. १७८८ च्या जुलैमध्यें दिल्लीकडील परिस्थितीचे व पाटील-बावांच्या गुणदोषांचे वर्णन करतांना गोविंदराव लिहितोः—"पातशाहाची मर्जी आहे कीं, पचवीस हजार फौज चांगली, व एक सरदार राजश्री हरिपंत तात्यासारखा इकडे येईल, तर सलतनतीचा बदोबस्त होऊन कांहीं दिवस आम्ही सुखाची भाकर खाऊं. ऐसें यांचें लक्ष आहे. **हिंदुस्थान सर्व राजश्री पाटिलबावांनीं मेळविलें होते, तैसे थोडक्याच दिवसांत गमाविलें. त्यास अजू-नहि दोन तीन महिन्यांत हुजूरची फौज येऊन, किल्ले कोट आहेत, तोपावेतों येऊन पोंहचली, तरी पुन्हां आपले सरकारचा कबजा होऊं शकतो, परंतु दुसरा सरदार आल्याखेरीज पातशाहांची तसल्ली होत नाहीं. राजश्री पाटील-बावांची मर्जी खुद्पसंदी व खुशामततलबी बहुत. कोणी डोईजड माणूस जवळ कार्यकर्ता नाहीं. जें करणें स्वतः जातीनशींच करावें. कोणाचींहि**

इतबार नाहीं. हलकें माणूस तोंडी लावून लोभास प्रवर्तून कामाची घाण केली. पातशहा दिक् झाले. यांतून एक रतिभर गोष्ट राजश्री पाटीलबावां-कडील वकिलास, अथवा त्यांचे ममतेचे माणसास समजल्यास आमचें पार-पत्य प्राणांत करितील ! याचें कारण हेंच कीं, हिंदुस्थानांत मजवांचून कोणी कोणाशीं बोललें किंवा लिहिले तर त्याचा प्राण घ्यावा, बेअब्रू करावें हे यांचें लक्ष आहे."

( १८९४ ) डिबॉईनसारख्या परदेशी मनुष्यावर फाजील विश्वास ठेवल्यामुळे पाटीलबोवांचें सैन्य एतद्देशियांविरुद्ध जबरदस्त ठरलें तरी इंग्र-जांशीं प्रसग पडल्यास त्याचा उपयोग होणार नाहीं, ही गोष्ट तत्कालीन कित्येक चाणाक्ष लोकांनी उत्तम प्रकारे ओळखली होती. पाटीलबावा मेल्यावर लौकरच १७९४ च्या सप्टबरांत डिबॉईनचे स्वरूप उघडकीस आले, त्याचें वर्णन करतांना गोविंदराव लिहितोः—

" राजश्री पाटीलबावांनी डिभाईस कपू देऊन ठेविले, त्या प्रसंगीं शाहाजीनीं(?)दुरदेशीने सर्व मसलत जाहीर करून दिल्हेच होतें कीं, डिभा-ईचा भरवसा एकरूप नसावा. कारण हे कीं, वरकड ठिकाणीं हा चाकरीत कमती करणार नाहीं. परंतु इंग्रेजांशी कदाचित् नाचाखी जाल्यास साफ फितूर करून निघून जाईल. तीन कपू दिधल्यास इकडे राजेरजवाडे हिंदुस्थानीं सर्व याच्या पेट्यांत शिरोन मुलुखांत फितूर करील. मग याचें आटोपणे फार कठीण पडेल. मशारनिल्हेचे कुटुंब वगैरे सरजाम सर्व इंग्रजांचे सामील आहेत...... पाटीलबावा अकस्मात् कैलासवासी जाले. आठ महिन्यांत येथे डिभाईसुद्धां सर्वांची नियत फिरली. डिभाईनीं जैपूरकर व नखतावरसिंग माचेडीकर व भरतपूरकर रणजितसिंग जाट व इंग्रेजांशीं वगैरे अंतस्थ साजीश करून हर-एकास आपल्या लगामीं लाऊन ठेविले. तात्पर्य हें कीं, आपसांत सरदाराचे फितूर प्रारंभ जालाच आहे." या वेळीं दिल्लीचें स्वामित्व बळकावण्याकरितां मराठ्यांखेरीज कोण कोण टपून बसले आहेत याचे वर्णन खुद्द पातशहाने असे केले आहे. तो म्हणतो, " आम्ही फकीर आहो. हरएक ठिकाणी बसोन गुजराण करण्यांत येईल. गुंता नाहीं ! येथील संस्थानची इच्छा इंग्रेज व विलायतवाले, रोहिले, राजेरजवाडे वगैरे सर्वांस आहे. त्या अर्थी आपसाचे बिगाडानें राज्यास बरबाद जाऊ देणें पाटीलबावांचे मागें ही गोष्ट लौकिकांत ठीक दिसणार नाहीं."

शके १७०० च्या सुमारास दिल्लीच्या राजकारणावर मराठ्यांची विशेष छाप पडलेली होती. पातशहा कमकुवत झालेला असून तो इंग्रज नजीबखान व मराठे अशा त्रिवर्गांच्या कचाटींत सांपडला होता. त्यांतल्या त्यांत पहातां मराठ्यांच्याकडे त्याची पर्ण अनकलता होती. इंग्रजांकडे पर्ण प्रतिकलता

होती; तथापि पातशहाचीं सर्व सूत्रें नजीबखानाच्या हातीं असून तो घडवून आणील त्याप्रमाणे पातशहा मराठ्यांच्या हातीं पडणे अगर इंग्रजांच्या हातीं पडणे हे बरेचसे अवलंबून होते. या महत्त्वाच्या राजकारणास अनुलक्षून असलेली कित्येक पत्रे राजवाडे यांचा खंड १२ यांत आढळतात, व ती बरीच मनोरंजक आहेत. उदाहरणार्थ, एका पत्रांत दिल्लीचा वकील पेशव्यांस लिहितो " स्वामीचे आज्ञेप्रमाणे पातशहास वरचेवर उत्तेजन देऊन इंग्रजांचा--यांचा स्नेहसंबंध होता तो तोडला......सेवकासीं पातशहांनीं व नबाब नजीबखानांनी शपथ वाहून सांगितले की, जे नानांनी लिहिले हेच आमचे चित्तांत आहे. " वझिराकडील फौज पातशहाजवळ होती त्याप्रमाणे पेशव्यांचीहि रहावी अशी वकिलाची सूचना होती. इंग्रज आपणाकडून पातशहाने पैसा व फौज घ्यावी म्हणून प्रयत्न करीत होते; पण वकील लिहितो कीं, " आम्ही स्वामीचे आज्ञेप्रमाणे आजवर इंग्रजांचा रुपया पातशहास घेऊं दिला नाही. दिल्ली आग्रा यांत स्वामीचा बंदोबस्त असलीयासी पातशहास सुख आहे. परंतु नजबखान नसावा हे अंतःकरण पातशहाचे आहे. यास्तव सेवेशीं विज्ञापना राजश्री हरिपंत अथवा रा. महादजी शिंदे एकाने दिल्लीस राहून दोन लक्ष रुपये दरमहा पातशहास देऊन हे स्थली करोडोची हस्तगत करावी.. इंग्रजीच जाली तर हिंदुस्तान गेले ! कोणाचे बरे नाही म्हणतात...इंग्रजाचे पारिपत्य होऊन नक्षा मोठा व्हावा ऐसा समय आहे. असे पुढे करूं गेलीयास होणार नाही ! ईश्वरे ज्यांस मोठेपण दिल्हे त्यांणी मोठे कार्य केलीयास नक्षा व कित्येक दिवस कीर्ति रहावी ऐसेच करावे हे उत्तम. या गोष्टीस गई गुजरल्यास टोपीवाले कांहीं दिवसात पातशहात घेतील. मग पश्चात्ताप होऊन फळ नाही." असे पेशवाईतील मुत्सद्द्याचे विचार होते. सन १७८० च्या आक्टोबरांत इंग्रजांनी दिल्ली व आग्रा येथे आपणास कोठीस जागा मिळावी व पातशहाने आपणाकडून दरमहा दोन लक्ष रुपये घ्यावे अशी खटपट चालविली होती. यास अनुलक्षून वकील लिहितो: " पूर्वीपासून इंग्रज जागा कोठीस जयपूर दिल्ली आग्रा वगैरे स्थळीं इच्छितात. आतां ग्वाल्हेर त्यांच्या हातास गेली. याकरितां इंग्रज सर्वास्थली अम्मल झाला असे जाणतात. श्रीइच्छा प्रमाण ! "

सन १७८१ सालीं बोरघाटांत लढाई होऊन इंग्रजाचा मोड झाला. ही हकीकत दिल्लीस गेली तेव्हां वकिलाने पेशव्यांच्या आज्ञेवरून पत्राचें फारशी भाषांतर करून ते पातशहाला व नजीबखानाला समजाविले. त्यास अनुलक्षून वकील पेशव्यास लिहितो: " वाचून बहुत संतोष पाऊन उत्तर केलें कीं, ईश्वर हमेष याप्रमाणेच श्रीमतांची फत्ते करो,व इंग्रजांचा कदम पातशाहींतून निघून हयाते पावो म्हणून आशीर्वाद ममतापूर्वक देऊन नजबखानास आज्ञा केली कीं, तुम्हीहि कांहीं उद्योग कराल की नाही ? इंग्रजांचा निःपात करणीयाची

तजवीज नबाब बहादुर विशेषच सांगतात. परंतु स्वामींचे प्रत्ययास येऊन आम्हांकडून लिहविले व यांनी शेवेसी लिहिले ते खरे होय तो सुदिन ! ”

सन १७८०च्या आगष्ट महिन्याच्या एका पत्रांत दिल्लीचा वकील नानास लिहितो कीं, पातशहा पेशव्यांच्या कारभाऱ्यावर खुष असून पेशवाईस नित्य आशीर्वाद देतो. पातशहाच्या स्तुतिवादाचे शब्द पुढीलप्रमाणे आहेत: “आज आठ वर्षे झाली. घरच्या धन्याचा फितूर व मुख्य धनी तो लहान नादान असे असून इग्रजांचे जुज आजपावेतों मोडले व पुढें लढाईस मुस्तेद आहेत. हे काम दक्षिणचे सरदारांचे की, इतके दिवस ठरून राहिले. ईश्वरे कारभारी व सरदार मुत्सद्दी दौलतीस द्यावे तर याप्रमाणे द्यावे...इग्रेजांस नेस्तनाबूद करावें यांतच सर्वांचे रूप अब्रू आहे. नाही तर जळचर पृथ्वीचे धनी झाले तर पागोट्याची अब्रू रहात नाही. पागोट्याची अब्रू सोडून टोपी घालाल तर पुरती टोपी बसेल ! ” तथापि सर्वच इग्रजांस मनांतून भीत होते. नजीबखान लंब्याचवड्या गोष्टी बोलत होता. पण दिल्लीच्या वकिलाच्या मताप्रमाणे नबाब साहेब जोपर्यंत शिंद्यांकडून ‘इंग्रजांचे पारपत्य होत नाहीं’ तोंपावेतो इंग्रेजांशी दुष्मनी करावयास भितात. फिरून त्याच महिन्यांत वकील नानास लिहितो कीं, नजीबखान केवळ शरमेने राहिला आहे, नाही तर पूर्वीच इग्रजांस मिळता.

मराठ्यांनी एका चौथाईच्या सनदेवर सर्व हिंदुस्थानभर नुसता धुमाकूळ घातला. कर्नाटक गुजराथ माळवा राजपुताना बुंदेलखंड आग्रा दिल्ली रोहिलखंड बंगाला या सर्व प्रांतांवर स्वाऱ्या करण्यास त्यांना या सनदेने हक्क प्राप्त झाला. हा हक्क त्यांना पातशाही धोरणाच्या दृष्टीने स्वराज्याच्या सनदेने दिलेल्या हक्कापेक्षां अधिक मोल्यवान वाटत होता, व त्याची अमलबजावणीहि त्यांनीं स्वराज्याच्या सनदेच्या बजावणीच्या आधीं केली. रा. खरेशास्त्री एके ठिकाणीं म्हणतात, “ मराठ्यांनीं १७४१ त त्रिचनापल्ली घेतली व १७५२ त त्र्यंबकचा किल्ला घेतला. १७५८ त त्यांचा लाहोरास अंमल बसला आणि १७५९ त अहमदनगर त्यांच्या हाती आलें. स्वराज्याची सनद त्यांना बादशहाकडून मिळाली होती व ते ‘स्वराज्य’ दक्षिणेंत खानदेश बागलान मध्यमहाराष्ट्र व उत्तरकर्नाटक यांमध्यें पसरलें होतें. तें तत्काळ घेण्याचा त्यांनीं प्रयत्न केला नाहीं; पण जेव्हां साधि आली तेव्हां निरनिराळ्या ठिकाणचें ‘स्वराज्य’ व त्याबरोबर ‘परराज्य’ हि त्यांनीं घेतलें.” मराठ्यांचे स्वराज्याचे प्रांत प्रथम मोंगलांनीं घेतले व त्यांच्यानंतर ते त्यांच्याच नबाबांच्या हातीं गेले. ते मोगलांकडून व नबाबांकडून घेण्यास मराठ्यांना स्वाऱ्या आणि युद्धें करावीं लागलीं. अर्थात् युद्धांत यश आल्यावर मग ते फक्त स्वराज्यावरच सतुष्ट होऊन कां बसतील ? त्यांना स्वराज्याचा मुलुख परत मिळवावयाचा होता; पण परराज्य मिळवावयाचेंच नाहीं अशी कांहीं त्यांनीं शपथ वाहिलेली नव्हती !

तथापि बरेच दिवसपर्यंत परत न मिळालेला असा स्वराज्याचा भागहि थोडा शिल्लक राहिलेला होता. उदाहरणार्थ तंजावर; व अशा प्रांतांत, म्हणजे एका अर्थानें स्वराज्यांतच, मराठ्यांना चौथाई वसूल करण्याचा प्रसंग येई व तिजवरच संतुष्ट व्हावें लागे.

चौथाईच्या सुताचा आधार घेऊन मराठ्यांनीं सर्व राज्यसत्तेचा स्वर्ग मिळविण्याची आकांक्षा धरल्याचीं उदाहरणें हिंदुस्थानच्या सर्व भागांत आढळतात. दुसऱ्याच्या घरांतील भांडणाचा फायदा घेऊन आपलें बोट शिरकावावयाचें कारस्थान साधण्यांत मराठे इंग्रजांप्रमाणेंच प्रवीण होते. कोठें हा डाव साधला तर कोठे तो फसला; पण रीति सर्वत्र एकच होती. मोगलाकडून प्रत्यक्ष अधिकार मिळाला नसला तरी चौथाईचा हक्क मराठे वाटेल तेथे सांगत. याचे एक उदाहरण म्हैसूर संस्थानाचे होय. म्हैसुरास पूर्वापार हिंदूचे स्वतंत्र राज्य असून ते मोगलांनीं जिंकलेले नव्हते. अर्थात् मोगलांच्या तर्फे या राज्यांत चौथाई वसूल करण्याचा हक्क मराठ्यांना कायदेशीर रीतीनें कसा असणार ? म्हैसुरास पुढे मुसलमानी राज्य झालें तें म्हैसूर दरबारचा एक मुसलमान नोकर हिंदु राजास पदच्युत करून स्वतः गादीवर बसल्यामुळे ! या मुसलमानाचा दिल्लीकर मोगलांशी अर्थाअर्थी कांहींएक संबंध नव्हता. असे असतां मराठ्यांनीं या राज्यांतहि चौथाईचा हक्क सांगण्यास कमी केलें नाहीं. कर्नाटकांत चौथाई वसूल करण्याचा हक्क मराठ्यांस होता; कर्नाटकच्या कांहीं भागांत त्यांचे स्वराज्यहि होतें. पण खुद्द म्हैसूरकरांकडून खंडणी मागण्यास मराठ्यांना हक्क होता असे वाटत नाहीं. १७५७ सालीं भाऊसाहेब पेशवे मोठी फौज घेऊन कर्नाटकांत गेला तेव्हां त्यानें खुद्द श्रीरंगपट्टणास वेढा देऊन म्हैसूरच्या राजापासून बेसुमार खंडणीची मागणी केली. तेव्हां नाइलाज होऊन म्हैसूरचा प्रधान व सेनापति नंदराज यानें म्हैसूरपैकीं उत्तम सुपीक असे चौदा महाल मराठ्यांकडे लावून दिले. पुढे हैदर प्रबळ झाल्यावर त्याच्या सल्ल्यानें नंदराजानें हे परगणे परत घेतले. नंतर नंदराज व हैदर यांच्यांत चुरस व वाद सुरू झाला तेव्हां त्याचा फायदा घेऊन मराठ्यांनी आपलें घोडे पुढे ढकलण्याचा विचार केला. या वेळीं म्हैसुरास मराठ्यांचा जो वकील होता त्यानें पेशव्यांस लिहिलेलें एक पत्र एप्रिल १९१० च्या 'इतिहाससंग्रहां'त छापलेलें आहे. या पत्रावरून मराठ्यांचें म्हैसुराकडील कारस्थान उघड होतें. वकील लिहितो: " स्वामींनीं आज्ञापत्र सादर केलें कीं, नंदराज सर्वाधिकारी यास व हैदर नाइकास जीद वाढला आहे या समयीं अंतरंगीं संदर्भ लावून नंदराजाकडून करारनामा आणवावा कीं, चौथाई व सरदेशमुखीचा अंमल बसवून घ्यावा. येणेंप्रमाणें आपल्या मोहरेनिशीं लिहून दिलिया हैदर नाइकाचें पारिपत्य करून नंदराजाची स्थापना करावी म्हणोन सदरहु पत्रें

( नंदराजाच्या कबुलीचीं ) निकडीनें माणून घेऊन येऊन दाखल झाले. वाजिन्नस त्यांचे मोहरेचा करारनामा येथें ठेविला आहे. त्याची नक्कल व नंदराजांनीं सेवकास लिहिलेलें पत्न बजिन्नस सेवेसी पाठविलें आहे. नदराजाकडे हैदर नाईक यांनीं राजकारण लाविलें होतें की लक्ष होनांचे राज्य तुम्हांस देतो; खाऊन सुखी रहाणें; परंतु सेवकांनी इकडून वरचेवर धीर देऊन पत्रे लिहीत गेले व स्वामीचें अभयपत्र त्यांस होतें तें प्रविष्ट केल्यावरून त्यांस धैर्य येऊन हैदर नाइकाची गोष्ट कबूल न करतां स्वामीचे ठायीं निष्ठा धरून म्हटल्याप्रमाणें कबूल करून करारनामाहि लिहून पाठविला. हल्लीं त्याचा अभिमान धरून नाईकमजकुराचे पारिपत्य होईल ते करणार धनी समर्थ आहेत. सारांश, हल्लीचा समय पुढे येणे नाही. हल्ली अल्प कष्ट करून नदराजाची स्थापना होऊन चौथसरदेशमुखीचा अमल बसतो, पुढे सस्थान आपले होते. हे समयीं स्वामीनी याजवर कृपा करून पांच हजार फौज जलदीने पाठविली पाहिजे ! " चौथाईच्या पिपळाची मुळी परराज्यांत एकदां शिरली, म्हणजे ती बळावून तें राज्य उलथून पाडण्यास समर्थ होते, ही गोष्ट या वकिलाच्या मनांत उत्तम बिंबलेली दिसते.

" आज चौथसरदेशमुखीचा अंमल बसतो, पुढे संस्थान आपलें होतें" हाच मराठ्यांचा पातशाही धोरणाचा महामंत्र !

## प्रकरण पांचवें

# उपसंहार

मोंगल पातशाही खाऊन टाकून वरती सर्व हिंदुस्थानांतील राज्यकारभार तोंडी लावण्याची ज्या मराठ्यांची महत्त्वाकांक्षा त्यांची ही महत्त्वाकांक्षा तर अखेर साधली नाहींच, पण उलट लवकरच स्वतःचेहि राज्य गमावण्याची पाळी त्यांच्यावर आली ही आश्चर्याची गोष्ट होय. पण ही गोष्ट आश्चर्याची असली तरी त्यांच्यावर ती पाळी आली खरी ! मराठेशाहीच्या नाशाला मराठ्यांच्या बाजूची कारणे काय घडली याचे थोडेसे विवेचन आम्हीं पूर्वी केलेंच आहे. पण इंग्रज हे हिंदुस्थानांत केवळ मराठ्यांच्या दोषामुळे यशस्वी झाले असे नसून इंग्रजांच्या अंगचे अनेक गुणहि त्यांना या कामीं उपयोगी पडले हे विसरतां कामा नये. इंग्रजांचा इकडे येण्याचा मूळ हेतु व्यापाराचा होता, व मराठ्यांनी जशी दिल्लीच्या पातशहाची नोकरी बजावतां बजावता साम्राज्य सत्ता आपल्या हातीं आणली, तसेंच इंग्रजांनीं व्यापार करितां करितां राज्य कमाविलें. राज्य हे कदाचित् त्यांचे मूळचे साध्य नसेल, पण निदान व्यापार वृद्धीचें ते एक उत्कृष्ट साधन आहे ही गोष्ट त्यांना लवकरच कळून आली व तेव्हांपासून ते राज्य कमावण्याच्या उद्योगास लागले. या कामीं त्यांना परिस्थिति बरीच प्रतिकूल होती. मूळ ठिकाण इंग्लंड, हिंदुस्थानास हजारों मैलांवरून केवळ समुद्रमार्गानें यावयाचें, हल्लीप्रमाणे वाफेची यंत्रे वगैरे शीघ्र गतीचीं साधनें नव्हतीं. वाटेत प्रतिस्पर्धी युरोपियन दर्यावर्दी लोकांकडून उपसर्ग लागण्याची भीति, हिंदुस्थानांत मुसलमान मराठे यांसारखे प्रबळ लढवय्ये शत्रु व त्यांना फ्रेंचांसारख्या युरोपियन लोकांची मदत, अशी स्थिति असतां, ईस्ट इंडिया कंपनीच्या पिंपळाची जी मुळी एकदां बंगाल्यांत रुजली तिनें कालांतराने सर्व हिंदुस्थानभर देशी राजेरजवाड्यांच्या सत्तेच्या प्रचंड इमारती भराभर उलथून पाडून जमीनदोस्त केल्या !

ईस्ट इंडिया कंपनीने हिंदुस्थानाशी प्रथम व्यापार सुरू केला. पण अवघ्या शंभर वर्षांचे आंत तिला राज्यस्थापनेचे डोहाळे होऊं लागले. हिंदुस्थानच्या त्या कालच्या परिस्थितींत इंग्रजांना स्वतंत्र लष्करी सामर्थ्याशिवाय वखारींचें संरक्षण व व्यापाराची वाढ करणे अशक्य होतें. आपल्या संरक्षणाकरतां लष्कर न ठेवावे तर मोंगलांच्या अधिकाऱ्यांच्या हातून आपलें संरक्षण होणे नाही, ही गोष्ट कंपनीच्या इकडील अधिकाऱ्यांच्या लक्षांत पुरी येऊन चुकली होती. लष्कर ठेवावयाचें तर त्याला कायमचें उत्पन्न हवें. शिवाय हिंदुस्थानांत

वाटेल तो येऊन स्वतंत्र राज्य स्थापतो मग आम्हीं तरी तें कां न स्थापावें,. असेहि विचार त्यांच्या मनांत हळूहळू येऊं लागले.

१६९० सालच्या एका खलित्यांत कंपनीच्या अधिकाऱ्यांनीं असे लिहिलेले आढळतें: " व्यापाराच्या नफ्याइतकाच इतर रीतीने वसूल मिळविण्याकडे आम्हीं लक्ष दिलें पाहिजे. राजसत्ता स्थापल्याशिवाय हा वसूल कसा मिळणार ? समजा, उद्यां व्यापार थांबला तर ? व्यापार थांबला तरी आपला पाय हिंदुस्थानांतून निघतां कामा नये, व हें व्हावयाचें तर खंबीर पायावर चिरकाल टिकण्यासारखें असें राज्यच आम्हांस हिंदुस्थानांत स्थापणे जरूर आहे." पण राज्य स्थापावयाचे तरी त्याकरतांहि लढण्याची तयारी पाहिजेच. लढण्याच्या भक्कम तयारीशिवाय व्यापार कदाचित् एक वेळ सांभाळवेल. पण राज्य मिळवावयाचें किंवा राखावयाचे तर त्याला लढण्याची तयारी अवश्य हवी, व ही तयारी पुढें पन्नास पाऊणशे वर्षे इंग्रज राज्यस्थापनेचे धोरण मनांत बाळगून करीत होते.फ्रेंच व इग्रज यांचे जें हाडवैर होतें ते इग्रजांस आपली लष्करी तयारी करण्यास एक प्रकारे उत्तेजक झाले. हिंदुस्थानांत अठराव्या शतकाच्या पहिल्या पाऊणशे वर्षांत फ्रेंचांशीं लढण्यांत इग्रजांनी जी कसरत केली ती त्यांना पुढे हिंदुस्थानांतील राजेरजवाड्यांशीं कुस्ती खेळण्यास चांगली उपयोगीं पडली. मात्र ही कुस्ती आपली चांगलीं तयारी होण्याच्या आधी जुपूं नये अशाविषयी इग्रजांनीं पुष्कळ खबरदारी घेतली होती. सर आल्फ्रेड लायल म्हणतो, " आम्हां इंग्रजांचें नशीब चांगले म्हणून आमची तयारी होण्यापूर्वी मराठ्यांचें व आमचे युद्ध सुरू झालें नाहीं." पण एकदां युद्ध सुरू झाल्यावर इग्रजांस कोठेहि फारसा माघारा म्हणून पाय घ्यावा लागला नाहीं. मराठ्यांशीं झालेल्या पहिल्या सहासात वर्षांच्या युद्धांत अखेरीस जो तह झाला त्यांत सूक्ष्मदृष्टीने पाहूं जातां इंग्रजांचाच फायदा अधिक झाला.गप्प बसायला काय घ्याल असे म्हणून जेव्हां एक दुसऱ्याला कांहीं देतो, तेव्हां, तो दुसरा उपद्रवापी असतो व मनांत आणलें तर तो आपणास उपद्रव करील अशी या पहिल्यास भीति वाटत असते म्हणून. एवढेच नव्हे तर, इग्रजांनीं मराठ्यांच्या ऐन उमेदीच्या दिवसांत, म्हणजे सन १७७५ सालीं, बेलाशक स्वारी करून साष्टी घेतली ती मराठ्यांना परत घेतां आली नाहीं!इग्रजांचा ज्यांत पुष्कळ नाश व तात्पुरता पराभव झाला अशा हिंदुस्थानांत घडून आलेल्या दहापांच लढायांचीं नांवें देतां येतील. पण सर्व मोहीमच्या मोहीम अंगावर येऊन शत्रूशीं इंग्रजांना नामुष्कीचा तह करावा लागला अशीं उदाहरणें फार तर एकदोनच आढळतील. एकदां दंड थोपटून ते हिंदी राजेरजवाड्यांशी लढण्यास तयार झाल्यावर त्यांची मोहिमेपाठीमागून मोहीम यशस्वी कशी होत गेली आणि त्यांना राज्यलाभ कसा झपाट्यानें होत गेला हें इतिहासवाच-

कांस माहीत आहेच. अवघ्या शंभर वर्षांच्या आंतच हिंदुस्थानच्या नकाशास तांबडा रंग फासण्याचें काम क्रमाक्रमानें कसें पुरें झालें हे यासोबत जोड- लेल्या चार तुलनात्मक नकाशांवरून दिसून येईल.

बोलूनचालून मराठे हे इंग्रजांचे सर्वांत बलिष्ठ असे प्रतिस्पर्धी. ह्यांनाहि इंग्रज अठराव्या शतकाच्या अखेरीस भारी झाले, तेव्हां मग इतरांची काय कथा ! इंग्रजांच्या सत्तेची प्रखर ज्योत एकदां पेटून राहिल्यावर तिच्यावर हिंदी राजा किंवा रजवाडा धरला कीं तो कांचेप्रमाणें वितळलाच असा अनुभव येऊं लागला ! बंगाल औध कर्नाटक वगैरे ठिकाणचे नबाब जाट रजपूत वगैरे उत्तर- हिंदुस्थानांतील संस्थानिक हे त्यांना फारच थोड्या श्रमानें हस्तगत झाले. कित्येकावर हत्यारहि धरावें न लागतां त्यांनी आपण होऊन स्नेहयाचना करून इंग्रजांशी तह केले. नाहीं म्हणावयास इंग्रजांना त्रास दिला असा तिघांनीं. एक मराठे दुसरे हैदर व टिपू आणि तिसरे शीख. कांहीं कांहीं बाबतींत मराठ्यां- पेक्षांहि हैदर व शीख यांनीच इंग्रजांना अधिक त्रास दिला. एरवीं, घर संस्थानिक घाल गुडघ्यावर आणि वांकीव किंवा मोड असा लीलेचा खेळच जवळजवळ इंग्रजांनीं एकसारखा केला ! लॉर्ड डलहौसी याच्या कारकीर्दींत संस्थानिकांना दत्तकाची परवानगी नसल्यामुळे जी अनेक राज्यें खालसा झाली तीं कांहीं जिंकलीं गेलीं नाहींत. या गोष्टीला आधीं राजसत्ता स्थापल्याची सबब होती असे सकृद्दर्शनी भासते. पण याचा अर्थ असा की, लॉर्ड डल- हौसीच्या वेळेच्या आधींच सर्व हिंदुस्थाननें इंग्रजांस 'निर्वीरमूर्वीतल' अशी कबुली देऊन टाकली होती. १८५७ चे बंड झाले म्हणून आहेत इतकीं तरी संस्थानें शिल्लक राहिलीं. नाहीं तर संस्थानांची सुधारणा करण्याचा जो प्रश्न आज प्रचलित आहे तो शिल्लकच उरताना !

इंग्रजांना हे जे अनिरुद्ध असे यश मिळत गेले त्यास इंग्रजांचें सुदैव हें तर एक कारण आहेच; पण दैवाइतकेच त्यांच्या अंगचे कांहीं ठळक गुणहि कारणीभूत झालेले आहेत हे नाकबूल करण्यांत अर्थ नाहीं. इतिहासाची चर्चा करावयाची तर ती ऐतिहासिक बुद्धीनेंच केली पाहिजे. तेवढ्या वेळेपुरती अभिमानाची भेसळ त्यांत होऊं देतां उपयोगी नाही. निव्वळ ऐतिहासिक दृष्टि लावूनहि आपणासहि मराठेशाहीविषयीं अभिमान वाटण्यासारखी पुष्कळ जागा आहे व त्याविषयी आम्हीं पुढे लिहिणारच आहों. पण इंग्रजांविषयीं बोलण्याचा प्रसंग असतां त्यांच्याहि चारित्र्याची परीक्षा आपण निःपक्षपाती- पणानें केली पाहिजे; तरच आम्हांस थोडीबहुत तरी ऐतिहासिक म्हणून दृष्टि आहे असें ठरेल.

इंग्रजांचें सुदैव म्हणून आम्हीं म्हटलें त्यांचीं तीन उदाहरणें तरी आम्हांस सांगतां येतील; तीं अशीं. पहिलें, इंग्रजांची व मराठ्यांची लढाई

प्रत्यक्ष झाली त्याच्या आधी होण्याची ती टळली. इंग्रजांसंबंधानें महादजी शिंदे व नाना फडणवीस यांना जो सशय आला तो शिवाजीस किंवा बाजीराव चिमाजी अप्पा यांस येता तर त्यांनीं इंग्रजांची मुंबईतील वखार व वसाहत केव्हांच उधळून लावली असती. इंग्रजांच्या सत्तेचे मुख्य केंद्र पडले बंगाल्यांत व ते मराठ्यांचा हात पोंचण्यापलीकडे होते; दुसरे, हिंदुस्थानांत इंग्रज व फ्रेंच यांचें युद्ध जुंपले व सपले ते हिंदी राजेरजवाड्यांना इंग्रजांचा राज्यलोभ स्पष्ट-पणें दिसून येण्यापूर्वी आणि तिसरे, एकूणीसाव्या शतकात वायव्यसरहद्दीच्या बाजूस शीख लोकासारखे लढवय्ये लोकांचे राष्ट्र उदयास येऊन त्याने वायव्ये-कडील सरहद्दीचा दरवाजा बंद करून टाकला होता. वरील तिन्हींपैकीं एकहि गोष्ट जरी विपरीत घडून येती तरी हिंदुस्थानांतील इंग्रजी राज्यास धोकाच येता; पण स्वतः काळच पक्षपाती बनून त्याने इंग्रजाचे मोठें साहाय्य केले ! असो; सुदैवाची जोड गुणवानास लाभली तरच त्याचा झाला तरी खरा उप-योग होतो. नादान मनुष्याला दैव हात देऊन तरी किती देणार ? पण सुदै-वाच्या लाभास स्वतःला पात्र करून घेण्यासारखे इंग्रजांच्या अंगचे गुण म्हटले म्हणजे ( १ ) शिस्त व व्यवस्थेची आवड ( २ ) धिम्मेपणाचा स्वभाव व दूरदृष्टि ( ३ ) चिकाटी व करारीपणा ( ४ ) स्वराष्ट्रप्रेम व राष्ट्राच्या कीर्तीची चाड ( ५ ) लोकोत्तर कर्तव्यनिष्ठा. वरील प्रकारचे गुण इंग्रजांचे अंगी होते म्हणूनच इतक्या प्रतिकूळ परिस्थितीत त्यांना एवढे राज्य मिळ-वितां आले. इंग्रजांच्या अंगी लोभ, अन्यायाकडे कानाडोळा करण्याचा स्वभाव, मानभावीपणा, कपटपटुत्व वगैरे ठळक दोष नव्हते असे नाहीं. उदा-हरणार्थ, मराठ्यांवर दुसऱ्याचा मुलुख लुबाडून घेतल्याचा आरोप केला जातो, पण या आरोपापासून स्वतः इंग्रजहि अलिप्त नव्हते. त्यांनी रोहिलखंडांतील रोहिले व अफगाण यांच्यावर १७७४ सालीं जी स्वारी केली, तिचे समर्थन इंग्रज ग्रंथकारहि करू शकत नाहीत. सर आल्फ्रेड लायल म्हणतोः—

"It was an unprovoked aggression upon the Rohillas who sought no quarrel with us and with whom we had been on not unfriendly terms. Nor is Warren Hasting's policy on this matter easily justifiable upon even the elastic principle that enjoins the governor of a distant dependency to prefer above all considerations the security of the territory entrusted to him."

राघोबाचा पक्ष इंग्रजांनी उचलून मराठ्यांशीं युद्ध आरंभिले तेंहि पण 'अन्याया'चे होते, असे खुद्द वॉरन हेस्टिंग्जलाहि वाटले. पण पूर्वीं रोहिल्यां-वर स्वारी करण्याचा अन्याय करण्याची पाळी कलकत्तेकर इंग्रजांची होती ती आतां मुंबईकर इंग्रजांची आली इतकेंच काय ते ! या कृत्याचें वर्णन करितांना सर

आल्फ्रेड लायलनें मुंबईकरांना " Anxious to distinguish themselves by the acquisition of territory" म्हणजे " मुलुखगिरीच्या कीर्तीला हपापलेले" असे म्हटले आहे. मराठ्यांना झाले तरी इंग्रज हेच विशेषण लावतात, दुसरे कोणतें ? पण आरास येथील लढाईत इंग्रजांचा पराभव झाल्यावर आपली लष्करी कीर्ति जाते या सबबीवर इंग्रजांनीं युद्ध चालविले, व पुढे तर कलकत्तेकर इंग्रजांनींच मराठ्यांशी युद्ध करण्याचा हुकूम आपण होऊन दिला. असली युद्धे अंगावर घेणे हे धोक्याचे आहे व आपण मुलुख मिळविण्याचा अभिलाष धरला तर हिंदुस्थानचे राजेरजवाडे आपणावर उठून आपणास देशाबाहेर घालवून देतील व हाती असलेला व्यापारहि बुडेल अशी भीति वाटणारे लोक कंपनीसरकारच्या दरबारात त्या वेळी होते, व त्यांच्याच मतभेदामुळें इंग्रजांच्या इकडील कृत्यांवर निंदात्मक निषेधाच्या कबुल्या आपणास पहावयास तरी मिळतात. पण पुढे पुढे ही भीति कमी झाली. इंग्रजांनी मुलुखगिरी आरंभल्याचा राग हिंदी राजेरजवाड्यास यावा तसा येत नाही, किंबहुना त्यांच्यापैकीं वाटेल ते आपल्याशीं मिलाफ करून स्वार्थ साधू पाहतात, आपले सैन्य त्यांच्या सैन्यापेक्षां बरे आहे, वगैरे गोष्टी जेव्हा इंग्रजाच्या ध्यानांत आल्या तेव्हां त्यांनी न्यायाची दृष्टि स्वतःस फारशी त्रासदायक होऊ दिली नाही. विलायतेतील स्वतंत्रमतवादी व न्यायनिष्ठुर लोक मौनव्रत धरू लागले, कंपनीच्या व्यापाराला किंवा भांडवलावरील व्याजाला धक्का लावू नका व मग काय वाटेल तें करा असे म्हणण्याची प्रवृत्ति झाली. हेस्टिंग्जसाहेबावर विलायतेत खटला झाला तोच शेवटचा. हा खटला होण्याचे कारण मुख्य हेच होते की, हेस्टिंग्जला खाजगी प्रतिस्पर्धी पुष्कळ होते व एकट्या कंपनीला व्यापाराचा मक्ता असल्यामुळे कंपनीच्या भागीदारांचे उखळ पांढरे झालेले विलायतेतील इतर इंग्रजाना पाहवत नसे. पण पुढे हा मक्ता बंद झाला, वाटेल त्या इंग्रजाने हिंदुस्थानांत जाऊन व्यापार करावा अशी द्वाही फिरविण्यात आली, तेव्हां अर्थात् घरचे भांडण संपले. हिंदुस्थानात भीति होती तीहि संपली. अशा रीतीने कंपनीसरकारच्या अन्यायबुद्धीवर विलायतेत व हिंदुस्थानांत असे जे दुहेरी दडपण होते ते गेल्यावर लॉर्ड वेलस्लीसारखे व लॉर्ड डलहौसीसारखे गव्हर्नर जनरल हिंदुस्थानात येऊन त्यांनी मनसोक्त मुलुखगिरी केली किंबहुना मराठ्यांच्यावरहि ताण केली व त्यांच्याविरुद्ध कोणी ब्रहि काढला नाहीं यांत आश्चर्य काय ?

पण मराठ्यांच्याहि अंगीं हे उपरिनिर्दिष्ट दोष मुळींच नव्हते असें कोणास म्हणतां येणार नाहीं. अर्थात् मराठे व इंग्रज या दोघांच्याहि अंगचे समान धर्म हिशेबांत धरण्यांत अर्थ नाही; ती दुबेरजी म्हणून टाकूनच दिली पाहिजे. मराठे व इंग्रज यांच्यामध्यें जर विषमता असेल तर ती वरील गुणांच्या

बाबतींत आणि वरील गुण मराठ्यांपेक्षां इंग्रजांच्या अंगी अधिक प्रमाणानें वसत होते म्हणून आपल्या अंगच्या लोभ अन्यायबुद्धि वगैरे दुर्गुणांचाहि इंग्रजांस जितका फायदा करून घेतां आला तितका मराठ्यांस करून घेतां आला नाहीं. या वरील गुणांपैकीं निदान एकदोन गुणांसबधाने तरी तत्कालीन मराठ्यांनाहि खात्री पटली होती यांत शका नाही. बाजीरावाचे वेळीं मराठी राज्यांतील बेशिस्तपणाचा खुद्द मराठी राज्यांतील लोकांसच वीट आला होता, व म्हणूनच बाजीरावशाही नष्ट झाली तेव्हां कोणाहि मराठ्याने इंग्रजांविरुद्ध हात उचलला नाहीं. पेशव्यांच्या दौलतीएवढी खानदानीची व श्रीमत दौलत एरवीं लोकांनी अशी आपल्या डोळ्यांदेखत नष्ट होऊ दिली असती काय ? बाजीराव जाऊन इंग्रज आले ही राष्ट्रास घातक अशी राज्यक्रांति झाली असे पुण्यांतील लोकांस न वाटतां आपण अनन्वित कृत्यें करणाऱ्या एका नराधमाच्या त्रासांतून सुटलो, असेच त्यांच्या मनास वाटत होतें. राजाचा पराभव होऊन तो देशोधडीस गेला असता राजाच्या प्रेमामुळे नव्हे पण राष्ट्रप्रेमानें व स्वाभिमानाने आपल्या राजधानीचें लढून रक्षण केल्याचीं उदाहरणे जगाच्या इतिहासांत किती तरी सांपडतील ! पण पुण्यास शनवारच्या वाड्यावरील पेशव्यांचें निशाण काढून टाकून ज्याने इंग्रजांचे निशाण लाविले तो मनुष्य —त्याला देशाभिमानाच्या दृष्टीने आतां नीच अधम कांहीहि म्हणा—पण त्या वेळच्या लोकांना तो उपकारकर्ता असा वाटल्याशिवाय आपल्या छातीवर लोकांनीं कसा नांदूं दिला असता ? सुराज्याचे उत्कृष्ट फायदेहि गडप करून टाकण्याइतके स्वातंत्र्यनाशाचे ढळढळीत घातक परिणाम आतां आम्हांस दिसू लागल्यावर इंग्रजाविषयींची आमची कृतज्ञताबुद्धि कांहीं अंशाने व कांही बाबतींत सहजच कमी झाली आहे ही गोष्ट वेगळी; पण कागदोपत्रींचा व दंतकथेचा पुरावा लक्षांत घेतला असतां, आज मर्यादित स्वराज्य मागण्याच्या वेळीं आमची इंग्रजांविषयींची जी आदरबुद्धि आहे तिच्यापेक्षां शंभर वर्षांपूर्वीं हातीं असलेले निर्भेळ स्वराज्य गमावण्याच्या वेळी तत्कालीन महाराष्ट्रीयांच्या मनांत इंग्रजांविषयीं अधिक आदरबुद्धि वागत होती असेंच म्हणावें लागतें. इंग्रज बाजीरावाचे राज्य न घेते तर पुण्याचे लोक म्हणजे त्यांस ते घेण्यास अर्जच करते असे नाहीं; पण इंग्रजांनी ते घेतलेंच तेव्हां मराठे युद्धास प्रवृत्त झाले नाहीत, एवढी गोष्ट खरी. पूर्वी संभाजीच्या पश्चात् मोगलांनी महाराष्ट्रावर झडप घातली तेव्हां ज्या मराठ्यांनीं वीस वर्षेपर्यंत जिवाचें रान करून स्वातंत्र्यरक्षणार्थ युद्ध केलें त्यांच्याच चवथ्या पांचव्या पिढीचे वंशज महाराष्ट्रांत या वेळीं होते व हल्लीप्रमाणें ते तेव्हां निःशस्त्रहि नव्हते ! १८५७ पेक्षांहि इंग्रजांशीं लढण्यास मराठ्यांना त्या वेळीं अधिक अनुकूल परिस्थिति होती. असें असतां सर्व मराठे घरच्या घरीं स्वस्थ बसले याचा अर्थ काय करावयाचा ? आतां त्या वेळीं युद्धास

प्रवृत्त होणारास हटकून यश आलें असतेंच असें नाहीं;पण स्वातंत्र्याकरतां बेफाम व जिवावर उदार होऊन कोणतेंहि राष्ट्र लढूं लागतें तेव्हां तें जयापजयाचा आगाऊ विचार करीत नसते!बोअर लोक इंग्रजांविरुद्ध किंवा बेल्जम लोक जर्मन विरुद्ध लढण्यास उभे राहिले तेव्हां आपण प्रतिपक्षांशी तुल्यबल आहों किंवा आपणास हटकून यश येईलच अशा भावनेनें ते उभे राहिले नाहींत. प्रेसिडेंट क्रूगर याने " आम्ही जगास थक्क करून सोडूं " असे जगजाहीर केलें याचा अर्थ इंग्रजांचा नाश करून जगास थक्क करून सोडूं असा नसून आपल्या स्वातंत्र्यप्रेममूलक आत्मयज्ञानें थक्क करून सोडूं असाच याचा अर्थ होता. पण मराठे स्वातंत्र्यास विटले होते म्हणा किंवा इंग्रज आल्यानें आपला फायदा होईल असे वाटत असल्यामुळे म्हणा त्यांनी यत्किंचितहि हालचाल केली नाहीं ! कारण कांहींहि असो, ते कार्य घडून आले एवढे खरं !

मराठेशाही निर्दोष नव्हती व होती तरी कां होईना ती मराठ्यांना आपल्या हातीं राखतां आली नाहीं हे खरेच आहे. पण आजची स्थिति त्या वेळच्या मराठेशाहीपेक्षां सर्वच बाजूनीं चांगली आहे असे मात्र नाहीं. पुष्कळच बाबतीत आज आम्हांस मराठेशाहीची आठवण होऊन दुःख होण्यास जागा आहे. सदोष पारतंत्र्य व सदोष स्वातंत्र्य यांत पसत नापसत करण्यासारखे कांहींच नाहीं असे कोण म्हणेल ? मराठेशाही सदोष होती तरी तिच्या वेळी मराठ्यांना जे तेज होते ते तेज त्यांना आज नाहीं यांत शंका कसली ? तेज म्हणजे अर्थातच अनेक अनुकूल गोष्टींचा एकत्र मिळून होणारा तो एक परिणाम असतो. मराठेशाहीत काय नव्हते याचा उल्लेख आम्ही जागोजाग केलाच आहे. पण कांही गोष्टी आजच्यापेक्षां मराठेशाहीच्या काळी महाराष्ट्रांत अधिक होत्या ही गोष्ट कोणासहि नाकबूल करतां याव-याची नाही. उदाहरणार्थ, आजच्यापेक्षां तेव्हां महाराष्ट्रांत सधनता, स्वतंत्रता, पौरुष व पराक्रम दाखविण्याची संधि, राज्यकारभाराचा अनुभव,नशीब काढण्यास साधनें व खुली जागा, राष्ट्रीय कीर्ति, ही सर्वच अधिक होतीं. पुण्यास मराठ्यांची राजधानी असल्यामुळे सर्व महाराष्ट्रांतून पुण्याकडे, आणि महाराष्ट्र हे सर्व हिंदुस्थानांत प्रमुख असल्यामुळे सर्व हिंदुस्थानाकडून महाराष्ट्राकडे संपत्तीच्या पाण्याचे प्रवाह वाहत होते. तेव्हांच्या स्वातंत्र्यास एक प्रकारची अस्वस्थता चिकटलेली होती हे खरें; तथापि अस्वस्थता ही देखील कांहीं प्रमाणांत मनुष्यास तेजस्वी राखण्यास उपयोगी पडते. ज्याचा जन्म माजघरच्या थंडगार सावलींत जातो त्याला छत्रीशिवाय बाहेर पडतांच येत नाहीं. आत्मसामर्थ्य व आत्मविश्वास हे वेदसंहितेप्रमाणे नित्यपाठानेंच जागृत राहूं शकतात. ज्याला दुसऱ्यावर विसंबावयास शिकविण्यांत येते त्याचे पाय कालांतरानें लुले होतात. मराठेशाहींत अस्वस्थता असली तरी तेव्हांचे मराठे

सदा सावध व आपल्या पायांवर उभे असत. जगांत गुणाची किंमत एक
तर संधीची दसपट असते. प्रत्येक फ्रेंच शिपायाला मी राष्ट्राचा मुख्य सेनाप
होईन किंवा प्रत्येक अमेरिकन नागरिकाला मी राष्ट्राचा अध्यक्ष होईन अ
महत्त्वाकांक्षा बाळगतां येते; तशीच प्रत्येक मराठ्याला मी पहिल्या प्रती
सरदार किंवा मुत्सद्दी होईन अशी महत्त्वाकांक्षा त्या वेळीं बाळगतां येत होत
राणोजी शिंदे याला एकाच पिढींत जोडे उचलणाऱ्या हुजऱ्यापासून पाउ
कोटि रुपये दौलतीचा मालक व दिल्लीच्या पातशहाला पेशव्यांच्या तर्फे प
णारा जामीन होतां आले ! ज्या मल्हारराव होळकराने पूर्ववयांत स्वतः मेंढ
राखल्या व कांबळीं विणली त्यालाच मराठेशाहींत साठ लक्षांची जहागीर
माळव्याची सुभेदारी मिळाली. बाळाजी विश्वनाथ हा खरोखरच प्याद्या
फर्जी झाला ! राज्यकारभार किंवा शिपाईगिरी यांच्या पात्रतेची व अनुभवा
गोष्ट अशीच आहे. मराठेशाहीच्या अखेरच्या शभर वर्षांत इतिहासांत न
नमूद होण्यासारखे कमींत कमी शभर वीर निर्माण झाले असतील; पण मरा
शाही नष्ट झाल्यानंतरच्या या शभर वर्षांत असे वीर किती झाले ? ना
फडणविसाच्या राज्यकारभारांतील शहाणपणाची इंग्रजांनीहि स्तुति केली अ
पण नाना हे शहाणपण शिकण्यास प्रत्यक्ष अनुभवाशिवाय दुसऱ्या कोण
शाळेंत कधीं गेला होता ? तो जन्मास येतांच ईश्वराने त्याच्यापुरती शहा
पणाची वेगळी शिदोरी त्याच्या पदरांत खचित बांधून दिली नव्हती !

अंगावर पडले म्हणजे कर्तेपण येते ही गोष्ट मराठेशाहीच्या इति
सांत ठिकठिकाणीं दिसून येते. हे कर्तेपण नुसते पुरुषांत नसून स्त्रियांतहि
चांगलेच दिसून येई. शिवाजीचा बालपणाचा वृत्तांत प्रसिद्धच आहे. बाप
मुलास टाकून दिलेला; आईशिवाय पाठीराखे कोणी नाहीं; तीन दिश
तीन मुसलमानी राज्यांची कैची व मुसलमान पातशाही सत्तेशीं झगडा
करण्याबद्दल बापाचा सक्त उपदेश; असे असतां, शिवाजीमहाराजांनी अग
बालपणीं वाखाणण्यासारखे कर्तृत्व दाखविले, व तेंहि अंगावर पडल्या
नव्हे, तर स्वतःच्या स्फूर्तीने, तत्कालीन लोकमताच्या विरुद्ध शिवाजीने स
आठ वर्षांच्या वयाचा असतां, विजापूरच्या दरबारी स्वाभिमानाचे अपूर्व ह
दाखविले ही दंतकथा मानली तरी आपल्या वयाच्या अवघ्या एकुणिसाव्या व
त्याने तोरणा किल्ला घेऊन आपल्या राज्यपदाकांक्षेचें निशाण उभारले, ही ग
तरी कोणास नाकबूल करतां येणार नाहीं. शिवाजीच्या वेळीं कृत्रिम शांत
नव्हती, अस्वस्थता होती; पण ती तेजस्वीपणाला पोषक अशी होती. संभ
इतर गुणांनी कसाहि असो; पण तो बालपणापासूनच तेजस्वी होता. वया
आठव्या वर्षी त्याला पातशहाकडून मिळालेल्या पांचहजारी मनसबदारी
कारभार करतां येणें शक्य नव्हतें. पण शिवाजीबरोबर तो एवढ्या अल्प व

दिल्लीस गेला असतां तेथील संकटांत तो धिटाईने वागला. पचविसाव्या वर्षांचे आंत स्वतः स्वाऱ्या शिकाऱ्या करून व लढाईवर जाऊन त्याने शूर योद्धा अशी कीर्ति संपादिली होती. राजारामावर तर संभाजीपेक्षांहि मोठे कठिण प्रसंग आले; व संभाजीच्या वधानंतर स्वातंत्र्यार्थ जे प्रचंड युद्ध मराठ्यांनी केले त्यांत राजाराम हा नेता असून रायगडापासून जिंजीपर्यंत प्रवास व घाल-मेली करून त्यानें आपले कर्तृत्व दाखविले. पहिला बाजीराव हा लहानपणा-पासूनच राज्याच्या उलाढालींत पडला होता. नानासाहेबास पेशवेपद अवघ्या एकुणिसाव्या वर्षी लाभले; पण पहिल्या दिवसापासून तो कारभार पाहू लागला. नानासाहेबाइतकी वैभवशाली कारकीर्द क्वचितच पहावयास सापडते; व ही त्याच्या चाळीसाव्या वर्षाच्या आंतच आटोपली! थोरल्या माधवरावाबद्दल तर बोलावयासच नको. आयुष्याचा सर्व ग्रंथ सत्तावीस वर्षांत आटोपला व त्यांत पेशवाईचा भार संभाळला अकरा वर्षे! इतक्या अल्प वयांत इतके कर्तृत्व इतका शहाणपणा इतके गांभीर्य इतकी प्रौढबुद्धि क्वचितच पहावयास मिळते. रघुनाथरावाने पंचविसाव्या वर्षी दिल्ली घेऊन अटकेस झेंडा लाविला. नाना फडणविसाने अल्प वयांतच मराठेशाहीची फडणिशी संभाळली. सदाशिवराव भाऊ याने पंचविशीच्या आंत कारभारांत शिरून तिसाव्या वर्षी उदगीरची लढाई जिंकली, व एकतिसाव्या वर्षी पानिपतचा घोर संग्राम करून शौर्याची ख्याति केली. विश्वासराव उत्तरहिंदुस्थानच्या स्वारीस गेला तेव्हां एकुणीस वर्षांचा होता. दौलतराव शिंद्यास शिंद्याची गादी अगदीं तरुणपणी मिळाली व त्याचे सर्व चांगले व वाईट पराक्रम विशीच्या सुमारास झाले. कर्तृत्वाचा वयाशी संबंध नाहीं. किंबहुना जी कर्तबगारी अल्प वयांत घडून येते ती मोठ्या वयांत घडून येत नाही. वरील सर्व कर्ते पुरुष मुत्सद्देगिरी तरवारबहाद्दरी राजकारण हीं शिकण्यास कोणत्याहि शाळेत गेले नव्हते. आधुनिकदृष्ट्या त्यांचे शिक्षण बेता-पुरते व चालचलाऊच होतें. पण कोणत्याहि कामाचे खरे शिक्षण ते काम प्रत्यक्ष करण्यांत जसे मिळते तसे इतर कोठे मिळणे शक्य नाही. आज हिंदु-स्थानांत विलायतेहून तरणीबांड तिशीच्या आंतील युरोपियन मुले सिव्हिल सर्व्हिस परिक्षा देऊन कारभार करतात हे पाहून आपण मोठे कौतुक करतो; पण मराठेशाहींत जेव्हां मोठा कारभार करण्यास वाव होता तेव्हां लहान वयाच्या मुलांनीच मोठमोठी कामे केलेलीं आढळून येतील. जेथे वावच नाहीं तेथें केस पिकले तरी नालायखी वाटावयाचीच! असो.

एका अर्थाने मराठेशाही नष्ट होऊन सुमारें शंभर वर्षे झाली; तर दुसऱ्या एका अर्थानें ती अद्यापि जिवंत आहे असेहि कोणास म्हणतां येईल. ग्वाल्हेर इंदूर धार देवास कोल्हापूर अक्कलकोट सांवतवाडी मुधोळ वगैरे मरा-ठ्यांचीं, आणि सांगली जमखंडी मिरज रामदुर्ग वगैरे ब्राह्मणांचीं संस्थाने

अद्यापि हयात असून खुद्द पेशव्यांच्या वंशजासहि थोडीशी जहागीर चालू आहे. यांतलि बहुतेकांशीं इंग्रज सरकारचे स्वतंत्र तह झालेले असून त्यांच्या आधारावर यांना आपण इंग्रजसरकारचे दोस्त असें कायदेशीर रीतीने म्हणवून घेतां येईल. पण नुसत्या नांवाला घेऊन काय करावयाचें ? प्रत्यक्ष पाहू गेलें असतां त्यांना स्वतंत्र राजकीय सत्ता अशी फार थोडी आहे. त्यांच्यापैकीं कांहीं थोड्यांना अंतर्व्यवस्थेची व न्यायमनसुब्याची पूर्ण अखत्यारी आहे. परंतु त्यांचे बाह्य स्वातत्र्य इतके सकुचित आहे कीं, त्यांना परराष्ट्रांशीं तर राहोच, पण आपापसांतहि रेसिडेंट किंवा पोलिटिकल एजट यांच्या मध्यस्थीशिवाय स्वतंत्र असा राजकीय व्यवहार कोणताच करतां येत नाहीं. त्यांना आपल्या इच्छेप्रमाणे पदरी सैन्य ठेवतां येत नाही. हत्यारे वगैरे तयार करण्याचे कारखाने त्यांस अर्थातच काढता येत नाहीत. व्यापारावरील कर जकाती अबकारी रेल्वे तारायंत्र वगैरेच्या बाबतींत इंग्रजसरकारनं त्यांना अनेक बंधने घातलेली आहेत; व केवळ अतर्व्यवस्थेसंबधानेंहि पाहिले तरी त्यांना पोलिटिकल अधिकाऱ्यांच्या तंत्रानेच वागावें लागते. या अधिकाऱ्यांनी दिलेला 'सल्ला' त्यांना सहसा नाकारतां येत नाहीं व त्यांनीं तो नाकारलाच तर प्रत्यक्ष अप्रत्यक्ष पुष्कळ त्रास त्यांस सोसावा लागतो. म्हटले तर इग्रज सरकारच्या बरोबरीचे स्नेही; पण प्रत्यक्ष व्यवहारांत पाहिले तर त्यांना ब्रिटिश प्रजाजनाइतकीहि स्वतंत्रता नाही. सामान्य प्रजाजनांपेक्षां त्यांना मानसन्मान अधिक असतो हे कांही खोटें नाही. कित्येकाना मोठमोठ्या राजे महाराजे अशा पदव्या आहेत. कित्येकांना तोफांची सलामी मिळते, कित्येकांना राजप्रतिनिधीशीं भेटी अगर परत भेटीचा हक्क आहे. तथापि त्यांना स्वातंत्र्य म्हणून काडीइतकेंहि नाही. या सर्व गोष्टी लक्षांत घेतां. मराठेशाही आज जिवंत आहे असे यथार्थपणें म्हणतां येणार नाहीं. राजकीय नभोमंडळांत मराठे ब्राह्मण राजे महाराजे हे अद्यापि लहान मोठ्या ग्रहोपग्रहासारखे लुकलुकत चाहेत तरी त्यांचा सर्व प्रकाश ब्रिटिशसरकाररूपी मध्यवर्ती सूर्यापासून मिळत असून त्यांची गतीहि या सूर्याभोवतीं नियमित कक्षेत होत आहे. मराठ्यांचें खरें स्वराज्य शभर वर्षांपूर्वीच मृत झालें ! मृत्यूसारखी दुसरी हानी नाहीं; निदान स्वराज्याच्या मृत्यूसंबंधाने तरी दुसरें काय म्हणतां येणार ? गेल्याचा शोक करू नये हे तत्त्वज्ञान खरें आहे; पण गेल्याची स्मृति कोणाला नष्ट करतां येईल ?

शंभर वर्षें ही कालावधि कांहीं लहान नाहीं. तथापि तींत फार तर चारपांच पिढ्या बसतात. शिवाय पेशवाईच्या स्मरणाची गोष्ट दुर्दैवानें पांच चार पिढ्यांचीहि नाही. स्वतः बाजीराव चिरायु होता, आणि जवळजवळ तितकेंच चिरायुष्य लाभलेली त्याची मुलगी बयाबाई आपटे ही गेल्यासालींच वारली; या बाईना आम्हीं स्वतः पाहिलें आहे व त्यांच्याशीं संभाषणहि केलेलें

आहे. बाजीरावाच्या औरस संततीशीं भाषण करून, तिच्या तोंडून बाजी-रावासंबधाच्या—पुसट आठवणींच्या कां होईना पण—प्रत्यक्ष अनुभवाच्या हकीकती ज्याला आपल्या कानांनीं ऐकावयास सांपडल्या त्याला पेशवाई ही फार जुनी गोष्ट नाहीं असें वाटल्यास त्याचा तो दोष अक्षम्य आहे असें कोणी मानणार नाहीं असें वाटते.‡

केवळ स्मरणानें कोणतीहि गतगोष्ट डोळ्यांपुढे मूर्तिमत उभी राहिल्या-सारखी भासूं शकेल. डोळ्यांनी न पाहिलेल्या वस्तूच्याहि स्वरूपाची ज्याची त्याची स्वतःची म्हणून एक कल्पना असतेच. पेशवाईतला कोणताच पुरुष किंवा कोणतीच स्त्री तुम्ही आम्हीं पाहिलेली नाही; कित्येकांची ढोबळ चित्रेहि उपलब्ध नाहींत. तरी पण डोळे मिटून पहा, म्हणजे पेशवाईतलाच काय पण रामायण-महाभारतांतला वाटेल तो पुरुष किंवा वाटेल ती स्त्री तुम्हां आम्हांस निरनिराळ्या स्वरूपानें दर्शन देईल! मन हा खरोखर एक दिव्य

---

‡१९१३ सालीं एक विलक्षण योगायोग घडून आला. 'तोतयाचें बंड' या आमच्या नाटकाचे प्रयोग त्या वेळी पुण्यास चालू होते. श्री० बयाबाई-साहेब आपटे या पुण्यास मधूनमधून क्वचित् येत; तशा त्या या वेळीहि आल्या असून जोगेश्वरीच्या बोळांतील भिडे याच्या वाड्यांत उतरल्या होत्या. त्यांना पाहण्याचे व भेटण्याचें कौतुक वाटून आम्ही त्यांजकडे जाऊन बराच वेळ त्यांच्याशीं बोलत बसलो होतों. या प्रसंगीं आमच्या नाटकाची गोष्ट कोणीं सहज काढली. तेव्हां, "आपल्या इतिहासप्रसिद्ध चुलत आजोबांचें व आपल्या धीरोदात्त आजीबाईचे चरित्र नाटकरूपाने मांडण्याचे मी धारिष्ट केले आहे; तरी आपण हे नाटक पहावयास याल काय?" अशी विनति आम्हीं भीत भीत केली; पण त्यांनीं ती आनंदाने मान्य केली. प्रयोग किर्लोस्कर थिएटरांत म्हणजे नाना फडणविसाच्या खास राहत्या वाड्याच्या एका भागांत झाला; व नाटकांतील कांहीं भाग तर सवाशे वर्षांपूर्वी कदाचित् त्याच जागी व कांहीं त्या जागेपासून हाकेच्या अंतरावर प्रत्यक्ष घडला असावा!

प्रत्यक्ष पेशवाई पाहिलेले एकाददुसरें दीर्घायुषी माणुस अद्यापिहि आढळतें. उदाहरणार्थ, परवां नुकताच ता. २६।२।१८ च्या ज्ञानप्रकाशांत पुढील मजकूर इहवृत्तांत प्रसिद्ध झाला आहेः—

पुणें येथील लष्करमध्यें रणीयाबाई कोम नारायण लोधी या परदेशी ज्ञातींतील एक वृद्ध बाई ता. २० रोजीं मरण पावल्या. पेशवाई बुडून श्रीमंत दुसरे बाजीरावसाहेब इंग्रजांच्या स्वाधीन झाले त्या वेळीं या बाईचें वय दहा वर्षांचें होतें. मरणसमयीं यांचें वय ११० वर्षांचें असून फक्त चारसहा महिने त्या अंथरुणावर पडून होत्या!

चितारी आहे व तो काळाचाहि जेता आहे. तथापि केवळ स्मरणाने कोणतीहि गतगोष्ट आपणाला प्रत्यक्ष व्यवहार्य करितां येत नाही. येथे मात्र काळ आपला दावा पुरा उगवून घेतो !

पण आठवण करावयाची ती नेहमी आठवणीची वस्तु व्यवहार्य करण्याच्या बुद्धीनेच मनुष्य करितो असे नाहीं. तुमच्या आमच्या घराण्यांतले सर्व पूर्वज तुम्हा आम्हाला प्रिय किंवा वद्य आहेत. पण आठवणीने अमृत शिंपडून जर तुम्हां आम्हांला ते सर्व जीवत करितां आले तर त्यांना तुमचे आमचे घर राहावयाला कसे पुरणार ? आणि कदाचित् आपण अमर झालो तर पुढे आपल्या सर्वांच्या वंशजांनी कोठे राहावे ? दुसरीहि एक गोष्ट यासंबधांत ध्यानांत ठेवली पाहिजे. जरी मृत मनुष्ये आम्हास आठवणीने जीवत करितां आली, तरी कोणत्याहि रीतीने त्यांच्यातले दोष वगळून ती जीवत करितां आली तर हवी, असेच कोणाहि मनुष्याला वाटेल. जुन्या काळाची आठवण करणे हे कौतुकास्पद व स्वाभिमानाचे लक्षण आहे; आणि जुन्यापैकी शेलक्या शेलक्या चांगल्या व्यक्ति जर आठवणीच्या अमृतासिंचनाने आम्हास जीवत करिता आल्या तर त्याची गर्दी आम्ही सोसू इतकेच नव्हे तर, त्या मोबदल्याशिवाय परत मिळणाऱ्या नसल्या तर आम्ही स्वतः मरण्यास तयार होऊन आमची जागा त्यांना मोकळी करून देऊ ! पण केवळ जुन्या काळची येवढ्याचकरितां वाटेल ती वाईटहि व्यक्ति आम्हीं जीवत करण्यास तयार होऊं काय ? इतिहासात नांव नोंदले गेले एवढ्यावरून कोणतीहि व्यक्ति चांगलीच असे होत नाही. त्र्यंबकजी डेंगळे, दुसरा बाजीराव, चंद्रराव मोरे, सर्जेराव घाटगे या व्यक्ति ऐतिहासिक खऱ्या. पण त्या आज आम्ही पत्करू काय ? खुद्द त्यांच्याच काळांत जर त्या लोकांना नकोशा होत्या तर आज त्या आम्हांला हव्याशा कशा वाटतील ? केवळ ऐतिहासिक प्रसिद्धी म्हणजे कांहीं खरी कीर्ति नव्हे ! ज्या व्यक्ति आपल्या अंगच्या सद्गुणांमुळे नामांकित व कीर्तिमान ठरल्या त्याच आज आम्हास फिरून मिळाल्या तर आपण घेऊ. ज्यांनीं आपल्या दुष्ट चरित्राने इतिहास केवळ कलंकित केला व राष्ट्राचे नुकसान केलें त्या काळाच्या उदरांत आयत्या गडप होऊन गेल्या त्याच बऱ्या ! त्यांची दुःस्मृतिहि शल्यासारखी अद्यापि आपल्या मनाला बोचते तेवढीच पुरे, असें आपण म्हणणार नाहीं काय ?

पण काळ हा तरी आपणास नेमक्या शेलक्या तेवढ्या व्यक्ति उचलून घेऊ देईल की नाही, हाहि प्रश्नच आहे. एखादा व्यवहारचतुर धंदेवाईक दुकानदार आपल्याजवळच्या विकाऊ मालापैकी सरमिसळ–चांगल्या व वाईट मालाच्या मिळून–पेंढ्या बांधून ठेवितो; आणि गिऱ्हाइकाने घ्यायची तर सर्व पेंढीच्यापेंढी तो घेऊ देतो· पेंढी सोडून हवा तेवढा माल घ्यावा व वाईट

तेवढा टाकावा असें तो सहसा करूं देत नाहीं. काळहि प्राय: असेंच करील असें वाटतें. कारण, कोणतीहि पिढी ही चांगल्या व वाईट व्यक्तींची मिळून त्यानें कौशल्यानें बांधलेली एक जुडीच असते; मग तो तरी तुम्हां आम्हांला ही जुडी सोडून चांगल्याच तेवढ्या व्यक्ति कशा उचलूं देईल ? नाना फडणवीस हवा असेल तर त्याबरोबर दुसरा बाजीरावहि उचलावयास पाहिजे.असे न होईल तर एक पिढी सर्वच चांगल्या माणसांची व दुसरी सर्वच वाईट माणसांची अशी स्थिति होईल. पण अशानें ईश्वराचे लीलाकैवल्य कसे सिद्ध होणार ?

आपल्या पूर्वजांच्या जुन्या काळाकडे पाहण्याच्या दोन दृष्टि असतात. एक अभिमानाची व दुसरी केवळ ऐतिहासिक किंवा विवेकाची. अभिमानाच्या दृष्टींत बऱ्यावाइटाचा विवेक नसतो; आणि कांही एका मर्यादेपर्यंत गुणदोष विसरून जुन्याचा केवळ अभिमान बाळगणे हे स्वाभाविकच नव्हे तर योग्यहि ठरतें. अभिमानाच्या दृष्टीला स्वकीयांच्या इतिहासरूपी पर्वतांची सर्वात उच्च शिखरे कर्तृत्वरूप शुभ्र बर्फानें मढविलेलीं व कीर्तिरूपी उज्ज्वल सूर्यप्रकाशांत चमकणारीं तेवढींच दिसतात. कारण, अभिमान हा दुरून आणि केवळ कौतुकबुद्धीनें पाहणारा असतो. ऐतिहासिक किंवा चिकित्सक बुद्धि ही जवळ जाऊन शोधक बुद्धीने पाहणारी असल्यामुळे तिला त्या पर्वतांच्या शरीरांचा खडबडीतपणा, त्यांतील खोल व भयकर दऱ्याखोरी, त्यांतील हिंस्र श्वापदे, विषारी वृक्ष, कांटेरी वेली, हे सर्व कांही दिसतें व शोधावे लागते.

रा. राजवाडे यांच्याहून मराठेशाहीचा अधिक अभिमान धरणारा मराठा बहुधा सांपडणार नाहीं; तथापि त्यांनीहि आपल्या तिसऱ्या खडाच्या प्रस्तावनेंत खालीलप्रमाणें उद्गार काडले आहेत:—

" १७९६ पासून १८१८ पर्यंत बाजीरावाच्या कारकीर्दींत दंगेधोपे परस्पर मत्सर देशद्रोह यादवी भ्रष्टाचार वगैरे सर्व कांही प्रकार होऊन शेवटीं भरतखंडांतील मराठ्यांची सत्ता नष्ट होण्याचा वेळ आला. दुष्ट भ्रष्ट भेकड अविश्वासी कर्तृत्वशून्य असा जो बाजीराव त्याचा द्वेष जर सर्व सरदारांना झाला होता तर त्याला काढून किंवा दाबांत ठेवून मराठ्यांची संयुक्त सत्ता राहिली नसती असें नाहीं; शिंदे होळकर गायकवाड भोंसले पटवर्धन वगैरे सरदारांची इभ्रत संयुक्त सत्ता तोलून धरण्याइतकी नव्हती अशी कांहीं गोष्ट नव्हती; महाराष्ट्रांतील शिलेदार सुखवस्तु लोक साधुसंत भिक्षुक शास्त्री कोठें पळून गेले होते अशांतलाहि प्रकार नव्हता; परंतु परस्पर विश्वास देशाभिमान वगैरे जे राष्ट्रीय नीतिमत्तेचे मुख्य घटक त्यांची सर्वत्र वाण पडल्यामुळें ह्या सरदार शिलेदार व मुत्सद्दी मडळींनी बाजीराव ब्रह्मावर्तास गेलेला सुखानें पाहिला ! ब्रह्मेंद्रस्वामीनें घालून दिलेला चुगल्या करण्याचा

भांडणे लावण्याचा व विश्वासघात करण्याचा धडा दोन पिढ्या गिरविल्याचा हा परिणाम झाला ! औरंगजेबाच्या वेळीं ज्या राष्ट्रांतील पुढाऱ्यांनीं स्वातंत्र्यार्थ जिवापाड मेहनत घेतली त्याच राष्ट्रांतील मंडळी बाजीरावाच्या वेळी केवळ स्तब्ध व उदासीन राहिली. रामदासी व भार्गवरामी धड्याचे हे असे निरनिराळे परिणाम झाले. १७९५ त नाना फडणविसाच्या कारकीर्दींत जी टोलेजंग इमारत भक्कम असावी असे वाटलें ती त्याच्यानंतर दहापांच वर्षांत अशी एकाएकी डबघाईस कशी आली याचें कित्येकांना आश्चर्य वाटते. परंतु ह्या राष्ट्राची राष्ट्रीय नीतिमत्ता ब्रह्मेंद्रस्वामीपासून दोन तीन पिढ्या बिघडत जाऊन ती बाजीरावाच्या कारकीर्दींत पूर्णपणे नासून गेली ही गोष्ट जर लक्षांत घेतली तर आश्चर्य वाटण्याचे कांहींएक कारण राहणार नाही. नाना फडणविसाच्या कारकीर्दींत महादजी शिंदे, तुकोजी होळकर, फत्तेसिंग, गायकवाड, भोसले पटवर्धन वगैरे महाराष्ट्रसाम्राज्यांतील सरदारांनी संयुक्त सत्तेला न जुमानतां परराष्ट्रांशीं तह करण्याचा अभ्यास केला व संयुक्त सत्तेची शकलें बहुतेक अर्धीं मुर्धीं करून ठेविलीं. नाना फडणविसासारख्या नीतिमान मुत्सद्द्याचें दडपण गेल्यावर ही अनीतिमत्ता पूर्णपणें अनियंत्रित झाली व ब्रह्मेंद्रस्वामीनें लाविलेल्या रोपास फळें–कडू फळें–आलीं ! " राजवाड्यांच्या लिहिण्यांत ब्रह्मेंद्रस्वामी 'प्रस्तुत' आहेत; पण ते एक उपलक्षण मानले असतां, मराठेशाहीच्या कट्ट्या अभिमान्यासहि मराठेशाहीविषयीं ऐतिहासिक दृष्टि अंगिकारल्यावर कसे कठोरपणानें बोलावे लागते हे दिसून येईल.

आपण जरी आज जुन्या मराठेशाहीची आठवण करतों तरी ती जुनी मराठे शाहीच, जशीच्या तशी तर नाहींच पण किंबहुना सुधारलेली कां होईना, पण नुसती मराठेशाहीच प्राणप्रतिष्ठित करूं इच्छितों असें नाहीं. इतकेच नव्हे तर तें करण्याची इच्छा असली तरी शक्ति नाही, हेंहि आम्हांस समजते. मराठी पातशाही राखण्याची शक्ति त्या परिस्थितींत त्या लोकांच्या अंगीं आजच्याहून शंभरपटीनें अधिक होती; आणि उलट आजची आमची परिस्थिति मात्र त्या काळच्या परिस्थितीतीहून शंभरपटीनें, या कार्याच्या दृष्टीनें, खालावली आहे.

सन १९११ सालीं ना. मि. मॉरिसन, तेव्हांचे मुंबईच्या गव्हर्नरसाहेबांचे एक कौंसिलर यांना आम्ही कांही कारणानें भेटावयास गेलों होतों. त्या वेळीं त्यांचें आमचें झालेलें संभाषण आम्हांस या ठिकाणी आठवते. साहेब जरा रागांतच होते; व ते बोलतांना उसळून म्हणाले, " तुम्हीं चालविलेलें वर्तमानपत्र हातांत घेतांच ते न वाचतांहि केवळ उपजतबुद्धीनें मला असें समजते कीं, त्यांत राजद्रोही मजकूर असलाच पाहिजे ! तुमच्या मनांत काय विचार घोळतात हें मला बरोबर माहीत आहे."त्यावर आम्ही म्हणालों, " आपण मनकवडे आहां असें जर आपल्यास खरोखरच वाटतें तर माझ्या मनांत काय विचार

घोळतात हें एकदम उघडच सांगून टाकाना कां ? म्हणजे सुचल्यास त्याचा कांही खुलासा करीन." तेव्हां साहेब म्हणाले, "तुमच्या मनांत दोन प्रकारचे विचार घोळतात. एक तर तुम्हांला तुमचें स्वतःचें मराठेशाही राज्य गेले याबद्दल वाईट वाटतें; व दुसरें तुम्हांला असे वाटते कीं, आम्हां इंग्रजांना ताबडतोब आपले चंबूगवाळे घेऊन हिंदुस्थानांतून बाहेर घालवून द्यावें." यावर आम्ही उत्तर दिलें, "आपण मजवर दोन आरोप ठेवले आहेत. पैकीं पहिल्या आरोपाची कबुली मी आपणास ताबडतोब देतो; व त्याबद्दल मला काय शासन करावेंसें वाटेल ते करा. होय खरेंच आहे ! शंभर वर्षांच्या पलीकडे अगदीं याच शहरांत आमच्या मराठे लोकांचे राज्य होतें याबद्दल मला अभिमान वाटतो; व ते नष्ट झाले याबद्दल मनापासून दुःख होते. पेशवाई पाहिलेल्या माणसांबरोबर प्रत्यक्ष बोललेल्या माणसांशीं जर आम्हांस आज बोलतां येते इतकी पेशवाई अलीकडची आहे, तर आम्ही तिची आठवण विसरू म्हटले तरी ती आम्हांस विसरतां येणार नाहीं. आणि तिची आठवण होऊन खेद वाटणे मनुष्यस्वभावास अनुसरूनच आहे. पण आपण जो दुसरा आरोप मजवर करितां तो मात्र खरा नाहीं. पेशवाईच्या गुणांबरोबर आम्हांला तिचे दोषहि आठवतात. शिवाय, मराठेशाही पुनः प्रस्थापित व्हावी अशी आमची इच्छा आहे असे घेऊन चालले तरी, इष्टानिष्ट शक्याशक्य यांच्यामधला विवेक करण्याची बुद्धि मला काय किंवा माझ्या मताच्या इतरांना काय, ईश्वराने दिलीच नाही असे आपण कसें मानतां ? "

असो. मराठे आपल्या जुन्या नांवाचा अभिमान केव्हांहि विसरणार नाहीत; पण नवीन परिस्थिति न ओळखण्याइतके मूढहि ते कधीं बनणार नाहींत. किंबहुना आज सर्व हिंदुस्थानांत मराठ्यांचा जो लौकिक आहे त्याला त्यांच्या देशाभिमानाइतकेंच त्यांचे समयज्ञत्वहि कारण आहे. पूर्वी दिल्लीकडे मराठे धांव घेत तसेच आजहि ते घेऊ लागले आहेत; व त्या वेळी काय आणि आतां काय राजकीय महत्त्वाकांक्षा हेच त्यांचे प्रवृत्तिकारण होय; पण पूर्वीपेक्षां एका निराळ्याच अर्थानें आज सर्व हिंदुस्थान हा आपला देश असें त्यांना वाटूं लागलें आहे. उलट इतर भागांतील जे लोक पूर्वी मराठ्यांचा द्वेष करीत ते तो द्वेष टाकून मराठ्यांशीं बधुत्वाच्या नात्यानें वागूं लागले आहेत. कलकत्त्याच्या शिवेवर 'मराठा डिच' म्हणजे मराठ्यांचा खंदक ही जागा अजून कायम आहे; तिची ओळख बंगाली लोक किंवा मराठे यांपैकीं कोणींच विसरले नाहींत. पण पूर्वी जे नांव मराठ्यांच्या अपकीर्तीला तिकडे कारणीभूत झालें होतें, त्यांतील ती अपकीर्ति आज समूळ नाहींशी झाली आहे. पाळण्यांतल्या अज्ञान बंगाली अर्भकांना भिवविण्याचें साधन म्हणून ज्या नांवाचा पूर्वी उपयोग करण्यांत येत असे त्या नांवाला आज पाळण्यांतले तरु-

णच काय पण प्रौढ व वृद्धहि प्रेमानें आणि कौतुकानें आदरितात असें आढळून येतें.

अभिमानविषय जसा वाढतो तसा स्वतः अभिमान हाहि विस्तृत होतो. मराठ्यांना 'मराठे' हें नांव जरी केव्हांहि प्रियच राहील तरी 'हिंदवासी' हें नांव त्यांना आतां 'मराठे' या नांवापेक्षांहि अधिक आवडूं लागलें आहे. स्कॉच लोकांना स्कॉच या नांवाचा अभिमान फार असून वर्षांतून एक दिवस —म्हणजे सेंट ॲन्ड्रयूज या साधूच्या पुण्यतिथीचा दिवस—ते आपल्या स्कॉच या नांवाच्या जयघोषांत घालवितात; पण उरलेले तीनशें चौसष्ट दिवस ते इंग्रजांसमवेत स्वतःस 'ब्रिटिश' म्हणवून घेण्यास खुषी असतात. मराठ्यांचेंहि कांहीं अंशीं असेंच स्थित्यंतर झालें आहे. सर्व हिंदुस्थान हाच जर आतां त्यांचा स्वदेश झाला तर स्वतःस 'मराठे' म्हणवून घेण्यापेक्षांहि 'हिंदी' म्हणवून घेण्यांत त्यांना अधिक अभिमान वाटावा हे साहजिक आहे. पूर्वी मराठ्यांनीं युद्धांतले विजय मिळविले. आज ते शांततेंतले विजय मिळवीत आहेत. उद्यांचे त्यांचे विजय कशा प्रकारचे होणार हें, ईश्वरा, तुलाच माहीत !

समाप्त

---

मुद्रक

के. रा. गोंधळेकर, 'जगद्धितेच्छु छापखाना,' ५०७, शनवार पेठ, पुणें.

प्रकाशक

केशव रावजी गोंधळेकर, मालक–रावजी श्रीधर गोंधळेकर–बुकडेपो,

बुधवार चौक पुणें शहर.